।। पूर्ण परमात्मने नमः।।

# अंध श्रद्धा भक्ति खतरा-ए-जान

## (मराठी)

{ शास्त्र विरुद्ध साधना करणे आत्महत्या करण्यासमान आहे :- रामपाल दास }

लेखक :- (संत) रामपाल दास

जीव हमारी जाति है, मानव (Mankind) धर्म हमारा।
हिन्दू, मुस्लिम, सिक्ख, ईसाई, धर्म नहीं कोई न्यारा।।

# अवश्य पहा

## जगतगुरु तत्वदर्शी संत रामपाल जी महाराज यांचे मंगलमय प्रवचन






पहिली आवृत्ती

एकूण खर्च – 30 रूपये
धर्मार्थ मूल्य – 10 रुपये

प्रकाशक :– प्रचार प्रसार समिती तथा सर्व संगत
सत्लोक आश्रम, हिसार–टोहाना रोड, बरवाला.
जिल्हा–हिसार (राज्य–हरियाणा) भारत.

मुद्रक :– कबीर प्रिंटर्स
C-117, सैक्टर–3, बवाना इन्डस्ट्रियल ऐरिया, नई दिल्ली.



संपर्क : 8222880541, 8222880542, 8222880543, 8222880544, 8222880545

E-mail: jagatgururampalji@yahoo.com
Visit us at : www.jagatgururampalji.org

# अनुक्रमणिका


| अनु.क्रं. | तपशिल | पान नं. |
|---|---|---|
| 1. | भुमिका | I-II |
| 2. | दोन शब्द | 1 |
| 3. | अंध श्रद्धा भक्तीचे वर्णन मूर्ति पूजा काय आहे? | 8 |
| | ● मुर्तीपुजा काय आहे? | 8 |
| | ● शास्त्राची स्थिति | 8 |
| | ● आन उपासना करणे व्यर्थ आहे | 14 |
| | ● शिवलिंगाची पूजा कशी सुरू झाली? | 16 |
| | ● शास्त्रविरोधी साधनेची प्रेरणा देखील काल ब्रह्मच करतो | 18 |
| 4. | अन्य अंध-श्रद्धा भक्तीवर प्रकाश | 20 |
| | ● श्राद्ध, पिंडदान करावे की नाही | 22 |
| | ● श्राद्ध-पिण्डदानासंबंधी रुची ऋषिंचे वेदमत | 26 |
| | ● मार्कंडेय पुराणात पित्तरांच्या दुर्गतीचे प्रमाण | 27 |
| | ● प्रभू कबीरजी द्वारा श्राद्ध भ्रम खंडन | 30 |
| | ● श्री नानकजी द्वारा श्राद्ध भ्रम खंडन | 31 |
| | ● संत गरीबदासजी द्वारा श्राद्ध भ्रम खंडन | 33 |
| | ● लेखक (रामपाल दास) द्वारा श्राद्ध भ्रम खंडन | 33 |
| | ● श्राद्ध करण्याची श्रेष्ट विधि | 36 |
| | ● पिंपळ,वड तसेच तुळशीची पूजा | 39 |
| | ● परमात्म्याबरोबर धोखा | 40 |
| | ● सोळा शुक्रवारचे व्रत करणे | 41 |
| | ● व्रताविषयी गीतेत | 43 |
| | ● तीर्थ तसेच धाम काय आहेत? | 43 |
| | ● वैष्णव देवी, नैना देवी, ज्वाला देवी तसेच अन्नपूर्णा देवीच्या मंदिराची स्थापना | 44 |
| | ● केदारनाथ मंदिर भारतात तसेच पशुपति मंदिर नेपाळात कसे बनले? | 45 |
| | ● तीर्थ व धामाची अन्य माहिती | 46 |
| | ● तीर्थ स्थापणेचे प्रमाण | 47 |
| | ● सर्व श्रेष्ठ तीर्थ | 49 |
| 5. | सूक्ष्म-वेदाचे रहस्य | 51 |
| 6. | चार वेद तसेच सूक्ष्म-वेद कसे प्राप्त झाले? | 52 |

| | | |
|---|---|---|
| 7. | श्रृंगी ऋषि व दशरथ–पुत्रि शांता ची प्रेम कथा | 57 |
| 8. | पाहा फोटो कॉपी वेदमंत्राची | 65 |
| 9. | हिन्दू धर्मात प्रचलित शास्त्र–विरूद्ध धार्मिक साधना | 78 |
| 10. | हिन्दू धर्म शास्त्र काय सांगतात? | 79 |
| 11. | आध्यात्मिक रहस्य | 88 |
| 12. | स्वामी विवेकानंद यांचा संक्षिप्त परिचय | 100 |
| 13. | अंध–श्रद्धा भक्ती कशी सुरू झाली? | 100 |
| 14. | तत्वज्ञानाच्या अभावाने साधकाची दुर्दशा | 102 |
| 15. | कबीर परमेश्वरांचा कालाशी संवाद | 105 |
| | ● काल निरंजनाने कबीरजींकडून तीन युगांमध्ये कमी जीव घेऊन जाण्याचे वचन घेतो | 108 |
| | ● तप्त–शिळेवर जळणाऱ्या जीवांशी संवाद | 114 |
| | ● परमेश्वर कबीरजींचे कालब्रह्म बरोबर विवाद करणे | 119 |
| 16. | संत गरीबदासजी म्हणजे बाराव्या पंथात भक्तीची झलक | 127 |
| 17. | प्रत्येक देव व परमेश्वराची स्थिति | 129 |
| 18. | भक्ति कोणत्या प्रभुची केली पाहिजे गीता अनुसार | 130 |
| 19. | पूजा आणि साधना मधील फरक | 141 |
| 20. | ऋषि दुर्वासांची कारगुजारी | 147 |
| 21. | भक्ति अवश्य करा | 153 |
| 22. | कथा :– मार्कण्डेय ऋषि आणि अप्सरा यांचा संवाद | 157 |
| 23. | आज बंधू निवांत आहे | 161 |
| 24. | भक्ती न केल्याने होणाऱ्या नुकसानाचे वर्णन | 165 |
| 25. | भक्ति न केल्याने अती दुःख होईल | 167 |
| 26. | भक्ति मार्गावरील प्रवास | 168 |
| 27. | गुरू विना मोक्ष नाहीं | 169 |
| 28. | पूर्ण गुरूच्या शब्दांच्या शक्तिने भक्ति होत असते | 170 |
| 29. | वासुदेवाची परिभाषा | 177 |
| 30. | संक्षिप्त सृष्टि रचना | 183 |
| | ● आपण काल लोकात कसे आलो? | 185 |
| | ● श्री ब्रह्माजी, श्री विष्णुजी व श्री शिवजी ची उत्पत्ति | 187 |
| 31. | संपुर्ण सृष्टि रचना | 192 |
| | ● जीवात्मे काल च्या महाभयंकर जाळ्यात कसे फसले? | 195 |
| | ● श्री ब्रह्माजी, श्री विष्णूजी, श्री शिवजी यांची उत्पत्ती | 199 |
| | ● काय आहेत त्रिगुण? प्रमाणासहित | 200 |

- ब्रह्मची (काल) अव्यक्त राहण्याची प्रतिज्ञा 201
- आपला पिता च्या प्राप्तीसाठी ब्रह्माचे प्रयत्न 203
- माता (दुर्गा) कडून ब्रह्माला शाप 204
- विष्णूचे आपले पिता च्या प्राप्तीसाठी प्रस्थान आणि मातेचा आशीर्वाद प्राप्त करणे 206
- परब्रह्मच्या सात संख ब्रह्मांडांची स्थापना 212
- पवित्र अथर्ववेदामधील सृष्टिरचनेचे प्रमाण 213
- पवित्र ऋग्वेदामधील सृष्टिरचनेचे प्रमाण 217
- पवित्र श्रीमददेवी महापुराणामध्ये सृष्टिरचनेचे प्रमाण 223
- पवित्र शिव महापुराणामधील सृष्टिरचनेचे प्रमाण 224
- पवित्र श्रीमद्भगवत गीतेमधील सृष्टिरचनेचे प्रमाण 225
- पवित्र बायबल आणि पवित्र कुर्आन शरीफमधील सृष्टिरचनेचे प्रमाण 227
- पूज्य कबीर परमेश्वर (कविर् देव) यांच्या अमृतवाणीमधील सृष्टिरचनेचे प्रमाण 229
- आदरणीय गरीबदास साहेबजींच्या अमृतवाणीमध्ये सृष्टिरचनेचे प्रमाण 231
- आदरणीय नानक साहेबजींच्या वाणीमध्ये सृष्टिरचनेचे प्रमाण 236
- अन्य संतांद्वारे सृष्टिरचनेची दंतकथा 240

32. भक्ती मर्यादा 242
- नामदीक्षा घेणाऱ्या व्यक्तींसाठी आवश्यक माहिती 242
- कर्म काण्डा विषयी सत्य कथा 248

33. जिव वाचला तर लाखो मिळावले 253
- लग्नाच्या चौदा वर्षांनंतर परमात्म्याने संतान दिले 253
- परमात्माने जिवन दान दिले 254
- उध्वस्त परिवार एकत्र झाला 255
- परमात्म्याने यमदूतापासून वाचवले 257
- भूते आणि आजारांनी त्रासलेल्या कुटुंबाला सुखी केले 258
- लुटले गेलेल्यांना सहारा 260
- शास्त्रविरुद्ध साधनेपासून सुटका 261
- भगवान असावा तर असा 262
- भक्तमती सविताची आत्मकथा 264


❑❑❑

# भुमिका

अंध श्रद्धा चा अर्थ आहे कि विचार–विवेक न करता कोणत्याही प्रभु मध्ये आस्था ठेवुन त्यांच्या प्राप्ति त्याच्या प्राप्तीच्या तडफतेमध्ये पुजेत मग्न होउन जातो. मग आपली साधना सोडुन शास्त्र प्रमाणित भक्तीला देखिल स्विकार न करणे. दुसऱ्या शब्दांमध्ये प्रभु भक्ती मध्ये अंधविश्वासास आधार मानने. जे ज्ञान शास्त्रानुसार नसते, त्यास ऐकून–ऐकून त्याच्याच आधारे साधना करत राहणे. जी साधना शास्त्रांच्या विपरीत आहे, खुप हानिकारक आहे. अनमोल मानव जिवन नष्ट होऊन जाते. जि साधना शास्त्रांमध्ये प्रमाणित नाही, त्यास करणे तर असे आहे कि जसे आत्महत्या केली आहे. आत्महत्या करणे महापाप आहे. यामुळे अनमोल मानव जिवन नष्ट होऊन जाते.

याप्रकारे शास्त्राविधीचा त्याग करुन मनमानी आचरण करणे म्हणजे अज्ञान अंधकाराच्या कारणाने अंधश्रद्धा च्या आधारे भक्ती करणाऱ्याचे अनमोल मानवी (स्त्री–पुरुषाचे) जिवन नष्ट होऊन जाते कारण पवित्र श्रीमद भगवत गिता अध्याय १६ श्लोक २३ मध्ये सांगितले आहे कि:–

जे साधक शास्त्रविधीचा त्याग करुन आपल्या ईच्छेने मनमानी आचरण करतात म्हणजे कोणास पाहुन किंवा कोणाच्या सांगण्यावरुन भक्ती साधना करतात तर त्यांना कोणतेच सुख प्राप्त होत नाही, ना कोणती सिद्धी म्हणजे भक्तीची शक्ती प्राप्त होते, ना त्याचा मोक्ष होतो. (गीता अध्याय १६ श्लोक २३)

❖ या तिन्ही फायद्यांसाठी साधक साधना करतात जे मनमानी शास्त्र विरुद्ध साधनेने मिळत नाही. त्याकरिता अंधश्रद्धाचा त्याग करुन आपल्या शास्त्रामध्ये वर्णित भक्ती करा.

गीता अध्याय १६ श्लोक २४ :– यामध्ये स्पष्ट केले आहे कि, ''यातुन तुझ्या साठी अर्जुन! कर्तव्य म्हणजे जी भक्ती क्रिया केली पाहिजे तसेच अकर्तव्य म्हणजे जी भक्ती क्रिया केली नाही पाहिजे, च्या व्यवस्थेत शास्त्रामध्ये वर्णित भक्ती क्रिया हेच प्रमाण आहे म्हणजे शास्त्रांमध्ये सांगितलेली साधना कर. जी शास्त्रविपरीत साधना करत आहेस, त्यास ताबडतोब सोडुन दे.''

या पुस्तकामध्ये आपणास कर्तव्य म्हणजे जी साधना केली पाहिजे आणि अकर्तव्य म्हणजे जी त्यागली पाहिजे, सर्व विस्तृत शास्त्रातील प्रमाणां सहित वाचावयास मिळतील. आपल्या पवित्र धर्मग्रंथातील प्रमाणांना या पुस्तकात वाचा आणि परत शास्त्रासंगे मिळवून पहा. डोळ्यांनी पाहुन ताबडतोब शास्त्रविरुद्ध साधना त्यागुन शास्त्रविधी अनुसार साधना माझ्याजवळ (लेखका जवळ) येउन प्राप्त करा.

आपणास स्पष्ट करतो की वर्तमानात संपुर्ण विश्वात माझ्या (रामपाल दासाच्या) व्यतिरिक्त शास्त्रांच्या अनुसार संपुर्ण अध्यात्म ज्ञान तसेच संपुर्ण भक्ती विधी कोणाजवळही नाही. आपणास हे पवित्र पुस्तक ''अंध श्रद्धा भक्ती खतरा ए जान'' वाचल्यानंतर स्वत: विश्वास होईल. जर कोणी डोळ्यांनी पाहुन–वाचुन देखिल शास्त्रविधी विरुद्ध साधना त्यागणार नाही आणि शास्त्रविधी अनुसार सुरवात करत नाही तर तो भक्ती करु ईच्छित नाही.

कबीर जींनी अशा व्यक्तीच्या विषया मध्ये म्हटले आहे की :–

कबीर, जान बुझ साची तजै, करै झुठ से नेह ।
ताकि संगति हे प्रभु, स्वपन में भी ना दे ।।

शब्दार्थ :- जे डोळ्यांनी पाहुन देखील सत्यास स्विकार करत नाहीत, ते शुभकर्म हीन प्राणी आहेत. अशा व्यक्तींना भेटणे देखील उचीत नाही. जागे असतानाची तर गोष्ट सोडा, असे कर्महिन व्यक्तींपासून (स्त्रि-पुरुषांपासून) स्वप्नात देखील सामना होऊ नये. पुन्हा कबीरजींनी म्हटले आहे कि :-

ऐसा पापी प्रभात ना भैटो, मुख देखें पाप लगै जाका ।
नौ-दश मास गर्भ त्रास दई, धिक्कार जन्म तिस की माॅ का ।।

शब्दार्थ :- असा भाग्यहिन व्यक्ती सकाळी-सकाळी भेटु नये. अशांचे तर तोंड पाहिल्याने देखील पाप लागते. त्याने तर आपल्या आईस देखिल विनाकारण नउ-दहा महिने गर्भामध्ये त्रास दिला. त्याने तर आपल्या आईचा जन्म देखील व्यर्थ केला आहे. कबीर जींनी परत म्हटले आहे कि :-

कबीर, या तो माता भक्त जनै, या दाता या शुर ।
या फिर रहै बांझडी, क्यो व्यर्थ गवावै नुर ।।

शब्दार्थ :- कबीर जींनी म्हटले आहे की एकतर आईने भक्तास जन्म दिला पाहिजे ज्याने शास्त्रातील प्रमाण पाहुन सत्य स्विकारुन असत्य साधनेचा त्याग करुन आपले जिवन धन्य करेल. किंवा कोणत्यातरी दानशुर पुत्रास जन्म दिला पाहिजे जो दान-धर्म करुन आपले शुभ कर्म बनवेल. किंवा शुरविर मुलास जन्म दिला पाहिजे जो परमार्था करिता कुर्बान होण्यासाठी कधीच घाबरत नसावा. सत्याच्या बरोबर राहत असावा, असत्य तसेच अत्याचाराचा विरोध करेल. त्यामुळे तर तो स्वत: मरुन जातो किंवा अत्याचारीच्या सेनेस मारून टाकतो. आपल्या उद्देशापासुन विचलीत होत नाही. जर अशी चांगली मुले उत्पन्न होत नसेल तर निपुत्रिक राहणेच आईस शुभ आहे. जनावरासारख्या मुलास गर्भामध्ये पालन करुन आपल्या तारुण्यास का नष्ट करायचे म्हणजे निकम्मी मुले चुका करुन आई-वडिलांवर ३०४-B चा दावा बनवुन जेल मध्ये टाकतात. यापेक्षा तर वांझ राहणे उत्तम आहे.

सर्व मानव समाजास हाथ जोडुन नम्र निवेदन आहे कि आपण सर्वजण शास्त्राच्या विरुद्ध साधना करत आहात. या पवित्र पुस्तकास वाचुन सत्याची ओळख करुन आपले अनमोल मानव (स्त्री-पुरुषाचे) जीवन धन्य बनवा. आपले कल्याण करावे.

।। सत साहेब ।।

दिनांक : ०८-०९-२०१४

सर्वांचा शुभचिंतक
लेखक

दासांचा दास रामपाल दास
मुलगा / शिष्य स्वामी रामदेवानंद जी
सतलोक आश्रम बरवाला
जिल्हा - हिसार, हरियाणा (भारत)

❑❑❑

# दोन शब्द

आपल्या आराध्य देवा विषयी असलेल्या दृढ प्रेमाला श्रद्धा म्हणतात. आपल्या आराध्य विषयी श्रद्धा कोणत्या कारणाने होते? उत्तर असे आहे कि मानवास (स्त्री–पुरषास) माहित होते कि परमात्मा सर्व सुख देत असतो. संकट समयी तो श्रद्धाळूचे रक्षण करतो. मनोकामनांची पूर्ण करतो. रोगी ला स्वस्थ करतो. परमात्मा भक्त/भक्तमर्तीचे आयुष्य देखिल वाढवून देतो. दुर्घटनेपासून रक्षण करतो. निर्धनांना धन, अंधाळ्यांना डोळे, वांझास पुत्र परमात्मा देतो.

श्रद्धाळुंचा उद्धेश परमात्माची भक्ति करून वरील लाभ प्राप्त करणे असतो. श्रद्धाळु आपल्या धर्मशास्त्रांना सत्य मानतात. हे देखिल मानतात कि आमचे धर्मगुरू आम्हाला जी साधना ज्या देखिल आराध्य देवाची करावयास सांगतात, ती साधना शास्त्रातुनच सांगत आहेत कारण की गुरुजी राहुन–राहुन कधी गीतेस आधार सांगुन, कधी शिव पुराण, विष्णु पुराण, देवी पुराण, कधी कधी चारही वेद (ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद तसेच अथर्ववेद) मधुन कोणत्या एक किंवा दोन वेदांचा आधार घेऊन आपल्याद्वारा सांगितलेल्या भक्तीस विधीस शास्त्रोक्त सिद्ध करतात. श्रद्धाळुंना पुर्ण विश्वास होतो कि जी साधना आपल्या धर्माच्या व्यक्ति (स्त्री–पुरुष) करत आहेत, हेच सत्य आहे. जेव्हा मुले (मुलगा–मुलगी) समजण्या इतपत मोठी होतात तेव्हा ते आपल्या धर्माच्या व्यक्तिंना जशी देखिल भक्ति–साधना करताना पाहतात, तो नि:संशय होतो कि हे सर्व वर्षांपासुन करत आहेत, हिच साधना सत्य आहे. तो देखिल त्याच पूजा–पाठास करण्यास लागतो. आयुष्य संपून जाते.

अंध श्रद्धा भक्ति :– एक–दुसऱ्याला पाहून केली जाणारी भक्ति जर ती शास्त्रोक्त नसेल तर ती अंध विश्वासी म्हणजे अंध श्रद्धा भक्ति समजली जाते.

❖ या ठिकाणी सांगणे अनिवार्य समजतो कि काही व्यक्तींनी माझ्याबाबतीत संभ्रम पसरवला आहे कि हे देवी–देवतांची भक्ति सोडवतात. हे बिलकुल चुकीचे आहे. मी सर्व देवी देवतांची शास्त्रोक्त भक्ति करण्याचा सल्ला देतो ज्यामुळे साधकाला यथार्थ लाभ मिळतो तसेच पुर्ण परमात्मास ईष्ट रुपामध्ये पुजा करण्याचा सल्ला देतो ज्यामुळे मोक्ष्याची प्राप्ती होते. वर्तमान जीवनांमध्ये अनेक लाभ होतात ज्यांची परमात्माकडे अपेक्षा केली जाते.

धार्मिक भावनांना ठेंस :– जर कुणी सज्जन (स्त्री–पुरुष) त्या अंधश्रद्धाळुंना सांगेल कि आपण ज्या देवी–देवतांना आराध्य मानून साधना करत आहात, ती चुकीची आहे. त्यापासून आपणास कसलाच लाभ मिळणार नाही. आपले मानव जीवन नष्ट होऊन जाईल. आपण देवी–देवतांना आराध्य मानुन करु नका. आपण मूर्ति पूजा करू नका. आपण धाम तसेच तीर्थावर मोक्ष उद्धेशाने जाऊ नका. आपण श्राद्ध करु नका, पिंडदान करू नका. तेरवी, सतरावी क्रिया किंवा अस्थि उचलुन गती विसर्जन करण्यासाठी घेऊन जाऊ नका. आपण व्रत करू नका. त्याऐवजी अन्न पाणी खाण्यामध्ये संयम करा, जास्त खाऊ नका, बिलकुल उपाशी राहू नका. आपण आपल्या धर्मशास्त्रात सांगितलेल्या भक्ति मार्गानुसार साधना करा.

तो अंध श्रद्धावान व्यक्ति त्या सज्जन व्यक्तिला म्हंटला कि तू चांगली व्यक्ति नाहीस. आपण आमच्या धार्मिक भावना दुखावल्या आहेत. चल इथुन निघून जा, नाहीतर तुझे हाडे खिळखिळी करुन टाकिल. जोरजोराने गोंधळ करु लागतो. त्याच्या गोंधळास ऐकुन त्या ठिकाणची त्याच्याप्रमाणेच देवी–देवतांची व तिर्थांची पूजा करणाऱ्या उपासकांचा समुह गोळा होतो. गोष्ट धर्मगुरुपर्यंत पोहचते. धर्मगुरु देखिल तीच शास्त्रविरुद्ध मनमानी आचरण करणारे – करून घेणारे असतात. त्या धर्मगुरुची पोहच उच्च पदावर विराजमान राजनेता पर्यंत असते.

त्या धर्मगुरूंचे फोन मंत्री–मुख्यमंत्र्यांना तसेच स्थानिक नेत्यांना जातात. उच्च पदा वर बसलेले राजनेता स्थानिक प्रशासनास फोन करुन धार्मिक भावना भडकवल्याबद्दल कोर्ट केस दाखल करण्यास सांगतात. त्यांच्या दबावा मुळे प्रशासनिक अधिकारी ताबडतोब त्या सज्जन पुरुषाला अटक करून कोर्ट केस करून तुरुंगात पाठवतात.

जिवंत उदाहरण :– इ.स.वी. २०११ मध्ये माझे (लेखक रामपाल दास चे) अनुयायी (ज्यामध्ये मुलीसुद्धा सहभागी होत्या) मध्यप्रदेशातील जबलपुर शहरात पुस्तक ''ज्ञांन गंगा'' (ज्या मध्ये माझ्या सत्संग प्रवचनाचा संग्रह करुन तयार केलेली आहे) चा प्रचार करत होते. खर्च ३० रुपये, परंतु १० रुपये मध्ये विकत होते. त्यामुळे ते हिन्दू श्रद्धाळू मोठ्या उत्साहात घेऊन जात होते. जेव्हा त्यांनी घरी गेल्यानंतर वाचन केले तेव्हा अनर्थ झाला. देवी देवताचे पूजा चुकीची लिहली आहे. धाम–तीर्थ स्थळावर जाणे व्यर्थ लिहले आहे. दुर्गा मातेचा पति सांगितला आहे. श्री ब्रह्मा, श्री विष्णु तसेच श्री शिवांचे जन्म–मरण सांगितले आहे. यांचे माता–पिता देखिल सांगितले आहेत. आमच्या देवतांचा अपमान केला आहे. मारा–मारा! त्या अंधश्रद्धाळूंनी प्रथम तर प्रचार करणाऱ्या स्त्री–पुरुषांना स्वत: मारले, नंतर पोलिस स्टेशन मध्ये घेऊन गेले. हजारों अंध श्रद्धावान गोळा झाले. जिल्हा प्रशासनामध्ये बेचैनी झाली कारण राजनेत्यांचे फोन स्थानीय D.C., S.P., I.G. तसेच कामिश्नरांकडे येऊ लागले. आमच्या एका अनुयायाने सांगितले कि माननीय उपायुक्त (Deputy Commissioner) तसेच पोलिस अधीक्षक महोदय पोलिस स्टेशन मध्ये आले. पुस्तक ''ज्ञान गंगा'' घेतले, त्यास बसुन वाचावयास सुरुवात केली.

सुशिक्षित व हुशार असतात हे अधिकारी I.P.S. तसेच I.A.S., त्यांना समजण्यास उशिर नाही लागला कि या पुस्तकात असे काहिही लिहिलेले नाही जेणेकरून धार्मिक भावनेस ठेंस लागेल. सर्व विवरण शास्त्राचा आधार घेऊन लिहिलेले आहे. सकाळी दहा वाजल्यापासून ते संध्याकाळी पाचवाजेपर्यंत ते अधिकारी जण मुकदमा दाखल करण्याचे टाळत होते, परंतु त्या अंध श्रद्धावानांनी मध्यप्रदेश विधानसभेच्या अध्यक्षांनी परत फोन वर सांगितल्यामुळे नाइलाजाने प्रशासनाला धार्मिक भावना भडकवण्याचा गुन्हा IPC ची धारा २९५ – A च्या अंतर्गत दाखल करून जवळपास ३५ स्त्री–पुरूषांना जेलमध्ये पाठवले. मुकदमा क्रमांक २०१ दिनांक ०८–०५–२०११, थाना – मदन महल (जबलपुर).

विधानसभा अध्यक्षांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करून पाप केले. {त्याचे फळ देखिल परमात्म्याने त्यास लगेच दिले. तो विधानसभा अध्यक्ष दोन महिन्यांनंतर मृत्यूस प्राप्त झाला. त्याचे नाव होते ईश्वर दास रोहाणी.} या खटल्यास माननीय हायकोर्ट जबलपुर येथे दावा खारीज (**Quash**) करण्याचा अर्ज (M.Cr.C. No.१३५७७–२०१३) दाखल केला जो माननीय हायकोर्ट जबलपुर (मध्य प्रदेश) यांनी तो मुकादमा दिनांक २०–०७–२०१७ ला संपवला कारण पुस्तकातील सर्व ज्ञान हे शास्त्राप्रमाणित मिळाले. परंतु सन २०११ ते २०१७ पर्यंत खालील कोर्टात तारख़ेवर तारखा पडल्या. त्यांवर सर्व ३५ अनुयायी आपले काम सोडून गेले. भाडे लागले, हजेरी सोडली, आर्थिक नुकसान तसेच त्रास त्या अंधश्रद्धाळूच्या हितासाठी सोसले कि ते या पुस्तकात लिहलेल्या प्रमाणांना डोळ्यांनी पाहुन शास्त्रीविधिरहित साधना त्यागून शास्त्रसम्मत साधना करुन आपल्या जीवनास धन्य बनवतील कारण की श्रीमद्भगवत गीता अध्याय १६ श्लोक २३–२४ मध्ये प्रमाण आहे. या दोन्ही श्लोकाचे वर्णन भूमिकेमध्ये करण्यात आलेले आहे, तेथे वाचा.

❖ धार्मिक भावना :–

आपल्या धर्माच्या क्रिया तसेच परमात्म्या संबंधीत पूजा–पद्धतीविषयी असलेली गहन आस्था याला धार्मिक भावना म्हणतात.

❖ धार्मिक भावनेला क्षति पोहचवणे :–

कोणत्याही धर्मात सुरु असलेली पूजा तसेच त्यांच्या परमात्म्या वरती आधारहीन टीका किंवा आलोचना करणे धार्मिक भावनेला ठेस पोहचवणे आहे.

❖ तर्क–वितर्क :– कोणाच्या ही विषयावर आपले–आपले मत देणे, दुसऱ्यांच्या मताचे खंडन करणे व आपल्याच्या मंडन करणे, दुसऱ्याद्वारे आपल्या मताचे समर्थन करणे, त्याच्या विचारांना चुकीचे सांगणे, हे तर्क–वितर्क आहेत. यामध्ये एखाद्या ग्रंथाचा आधार घेतला तर समाधान आहे, अन्यथा खोटे भांडण आहे.

लेखकाचा उद्धेश कोणाच्याही धार्मिक भावनेला ठेस पोहचवणे नाही, परंतु शास्त्राना आधार मानुन तर्क–वितर्क केला आहे. सर्व शास्त्रातील प्रमाणाना आधार रुपा मध्ये देऊन यथार्थ आध्यात्मिक ज्ञान तसेच मोक्ष मार्गास उद्धत (उजागर) केला आहे. जर कुणी याला धार्मिक भावना दुखावणे असे समजले असेल तर दु:ख होईल. माझा (लेखकाचा) उद्धेश विश्वातील मानवाला परमात्मा शोधासाठी इकडे–तिकडे भटकण्यापासून वाचवून प्रमाणित तसेच लाभदायक अध्यात्म ज्ञान व साधना सांगावी. त्याच्या मानव जीवनाचे रक्षण करावे. जर धार्मिक भावना दुखवणार असतील तर कोणतीच गोष्ट नाही, मग हे करणे आवश्यक्य आहे.

उदाहरण :– एकदा एका मुलाने काही मुलांना पार्क मध्ये एका लाकडाच्या खांबावर चढण्या–उतरण्याचा खेळ खेळताना पाहिले. त्याने गल्लीतील विजेच्या खांबावर चढण्यास सुरुवात केली. एका सज्ञन माणसाने ते पाहिले आणि त्याला पळत जाऊन तसे करण्यापासून थांबवले. मुलगा रडू लागला. आई–वडिलांना सांगितले कि एका व्यक्तीने मला खेळण्यापासुन थांबविले. तो व्यक्ति त्याच गल्लीत राहत होता. आई–वडील आपल्या मुलाला घेऊन त्याच्याकडे गेले आणि माहिती करुन घेतल्यावर माहित झाले कि त्या व्यक्तीने मुलाच्या जिवनाचे रक्षण केले आहे. मुलाचे आई–वडिल तर भांडावयाच्या उद्देशाने गेले होते, परंतु त्या व्यक्तीच्या उपकाराचे आभार मानुन परत आले.

❖ माझा (लेखकाचा) हाच उद्देश आहे कि हिन्दू धर्माचे सर्व व्यक्ति लाकडाच्या खांबावर खेळुन (शास्त्रोक्त साधना न करता) विजेच्या खांबावर चढून मरत आहेत म्हणजेच शास्त्रविरोधी मनमुखी आचरण करून अमूल्य मानवी जीवन व्यर्थ करत आहेत, त्यांना शास्त्रोक्त साधना करण्यासाठी प्रवरत करतो कारण ते माझे बांधव आहेत. माझे देशवासी आहेत. परम्यात्म्याचे अबोध (आध्यात्मिक ज्ञानापासून वंचित) मुले आहेत. मला परम्यात्म्याने सर्व शास्त्रांचे यथार्थ ज्ञान दिलेले आहे. वर्तमानात सर्व शिक्षित आहेत. शास्त्रातील अध्याय, श्लोक व पान क्रमांक देखील पुस्तकात लिहलेले आहेत. तपासा, नंतर मान्य करा.

❖ या पुस्तकास ''अंध श्रद्धा भक्ति खतरा–ए–जान'' लिहण्याचा उद्धेश आहे कि तुम्ही व मी या हिन्दू धर्मात जन्मलो आहे. अगोदर हा दास (रामपाल दास) देखील आपली साधना लोकवेदाची साधना करत होता. परमात्माच्या कृपेने एक तत्वदर्शी संत भेटले. त्यांनी शास्त्रातील प्रमाण दाखवून माझी शास्त्रविरोधी साधना (जी वर्तमानात हिन्दू धर्मात प्रचलित आहे) सोडवून शास्त्रात लिहीलेल्या सत्य साधनेचा उपदेश देवून माझे मानव जीवन नष्ट होण्यापासून वाचवले. त्या महापुरुषाची म्हणजे माझे पूज्य गुरु स्वामी रामदेवनांदजी महाराजांची माझ्या येणाऱ्या १०१ पिढ्या ऋणी राहतील. सूक्ष्मवेदात म्हंटले आहे की:–

''सत्य भक्ति करे जो हंसा, तारूं तास के इकोतर बंशा।''

शब्दार्थ :- परमात्मा जींने म्हंटले आहे कि जो साधक शास्त्रानुसार सत्य साधना भक्ती करतो तर मी त्याच्या (101) पिढ्यांना संसार सागरातुन पार करुन देईल म्हणजेच पूर्ण वंशाला मोक्ष प्रदान करुन देईल.

प्रिय वाचक हो! माझीतर १०१ वी पिढी नि:संदेह पार होईल. मला दीक्षा देण्याचा अधिकार त्या महापुरुषाने दिला आहे. जो कुणी माझ्या कडून दीक्षा घेऊन शास्त्र विरुद्ध जुनी साधना सोडून शास्त्रोक्त साधना आपल्या डोळ्याने शास्त्रामध्ये पाहुन विश्वासाने आजीवन करेल, तो तसेच त्याच्या (१०१) पिढ्या भवसागरातून पार होतील.

❑ कृपया विश्वासासाठी वाचा याच पुस्तकातील पान क्रमांक २५३ पहा ''जिव वाचला तर लाखो मिळावले'' अध्यायात.

❖ शास्त्रोक्त साधना तसेच शास्त्रविधी त्यागून मनमानी आचरण (साधना) मध्ये काय फरक आहे?

उत्तर :- हे वर सांगितले आहे कि जो शास्त्रविरोधी भक्ति साधना करतो, त्यास कोणताच आध्यात्मिक लाभ होत नाही. शास्त्र अनुकूल साधना करण्याने सर्व लाभ मिळतात.


शंका :- काही व्यक्ति म्हणतात कि रामपाल श्री ब्रह्मा, श्री विष्णु तसेच श्री शिव जी यांची पूजा सोडवतात.


समाधान :- हे सरासर चुकीचे आहे. मी (लेखक) या देवतांची शास्त्रोक्त साधना करण्यासाठीचे मूळ मंत्र देतो. जसे श्रीमद्भगवत गीता अध्याय १५ श्लोक क्रमांक १-४ तसेच १६-१७ मध्ये सांगितले आहे कि हा संसार पिंपळाचे उलटे लटकलेले झाड आहे असे समजा. वर मूळ (जड) तर परम अक्षर पुरुष आहे. खोड अक्षर पुरुष आहे. त्यापासून मोठी फांदी निघाली आहे, ती क्षर पुरुष म्हणजेच काल ब्रह्म आहे ज्यास ज्योति निरंजन देखील म्हणतात. त्या फांदीपासून तीन गुणरूपी (रजगुण ब्रह्मा, सतगुण विष्णु व तमगुण शिव रूपी) फांद्या निघाली आहेत तसेच त्या फांद्यांवर लागलेल्या पानांना या संसाराचा अंश समजा.

विचार करा वाचकांनो ! आपण आंब्याचे रोप नर्सरीमधून आणून जमिनीत गड्डा करून रोपित करतो. त्याच्या मुळाला पाणी देतो. उद्धेश राहील की हे रोप मोठे झाड होईल फांद्यांना फळे लागतील आणि आम्ही खाऊ आणि बाकीच्यांना खायला घालु नाहीतर बाजारात विकून आपला उदरनिर्वाह करू. काय आपण रोपाच्या फांद्यांना तोडून फेकु? उत्तर असेल कदापि नाही. याच प्रमाणे तीन देवता (श्री ब्रह्मा जी, श्री विष्णु जी व श्री शिव जी ) प्राण्यांना कर्माचे फळ देतात. ते तर आमच्या साधनेचे अभिन्न अंग आहेत. त्यांना सोडू शकत नाही. या तीन्ही देवतांपासून लाभ मिळवण्याचे विशेष मंत्र आहेत जे सूक्ष्म वेदात सांगितले आहे जे माझ्याजवळ आहे. विश्वात कोणाजवळ नाहीत.

जसा रेडा (झोटा) असतो. त्या रेड्याचा एक मूलमंत्र असतो. त्याला त्याने बोलावण्याने तो लगेच सक्रिय होतो. तो त्या मंत्राच्या वशात आहे. त्याच्या हातातील गोष्ट नाही राहत. तो मंत्र आहे हुर्रर-हुर्रर आहे त्यास ऐकताच रेड्याचे कान उभे राहतात. या मंत्राचा प्रयोग तोच व्यक्ति करतो ज्याला आपली म्हैस त्या रेड्याकडून गाभण करून घायची आहे. जर त्या प्राण्यास त्याचे प्रचलित नाव रेडा-रेडा करुन बोलावले तर तो जागेवरून हालत सुद्धा नाही.

ठिक याच प्रमाणे या तीन देवतांची (श्री ब्रह्मा जी, श्री विष्णु जी तसेच श्री शिव जी)


गीता अध्याय नं. 15
श्लोक नं. १ ते ४ तसेच
श्लोक नं. १६ व १७
चा आशय
कबीर-अक्षर पुरुष एक पेड है,
निरंजन (क्षर पुरुष) वाकी डार।
तीनों देवा शाखा हैं,
पात रुप संसार।।
ब्रह्मा
विष्णु
शिव
तिन्ही शाखा = ब्रह्मा, विष्णु, शिव
फांदी (डार) = ब्रह्म (क्षर पुरुष)
खोड (तना) = अक्षर पुरुष
(परब्रह्म)
मूळ (जड) = परम अक्षर पुरुष
अर्थात पूर्ण ब्रह्म (कबीर साहेब जी)
शास्त्रानुकूल साधना
अर्थात सरळ पेरलेले भक्ती रुपी रोपटे


गीता अध्याय नं. 15
श्लोक नं. १ ते २ तसेच
श्लोक नं. १६ व १७
चा आशय
मूळ(जड)=परम अक्षर पुरुष
अर्थात पूर्ण ब्रह्म (कबीर साहेब जी)
कबीर–अक्षर पुरुष एक पेड है,
निरंजन (क्षर पुरुष) वाकी डार।
तीनों देवा शाखा हैं,
पात रुप संसार।।
खोड = अक्षर पुरुष (परब्रह्म)
फांदी (डार) = ब्रह्म (क्षर पुरुष)
तिन्ही शाखा = ब्रह्मा, विष्णु, शिव
विष्णु
ब्रह्मा
शिव
शास्त्र विरुद्ध साधना
अर्थात उलटे पेरलेले भक्ती रुपी रोपटे

यांच्या यथार्थ मंत्र साधना करवायची आहे ज्यांच्या जापाने ते शीघ्र प्रभावित होतात तसेच लगेच कर्म फळ देतात.

आपण पूजा मूळ रूपात परम अक्षर ब्रह्म म्हणजेच परमेश्वराला ईष्ट रूप मानुनच करवायची आहे. ज्या प्रमाणे आंब्याच्या रोपाची मुळाला पाणी दिल्यामुळेच (पुजा) रोपाचे सर्व अंग विकसित होतात म्हणजेच सर्व देवता प्रसन्न होतात. शास्त्रविधी विरुद्ध साधना तर ती आहे ज्यामधे संसार रुपी रोपट्याला फांद्यांच्या बाजुने जमिनीत खड्डा करुन मातीत गाडुन या फांद्यांची सिंचाई (पूजा) करतात, मुळांना वर करतात ते व्यर्थ आहे. मुर्खच असे करु शकतात, बुद्धिमान नाही.

या विषयामध्ये अधिक माहिती आपणास ''भक्ति कोणत्या प्रभुची केली पाहिजे'' गीता अनुसार'' या पुस्तकाच्या पान क्रमांक १३० वर वाचा. कृपया पुढील पानावर दोन आंब्याच्या रोपाची ज्यामध्ये शास्त्रविरुद्ध आणि शास्त्र अनुकूल साधना चित्राद्वारे समजावली आहेत.

हे तत्वज्ञान परमेश्वर कबीर जीने सांगितलेले आहे तसेच माझे पूज्य गुरुदेव श्री रामदेवानंदजी च्या कृपा व आशीर्वादाने मला समजले आहे. हे एक अटळ सत्य ज्ञान आहे, पण सर्वसाधारण म्हणजे वर्तमानातील सर्व मानवासाठी इतके कठीण जितके चारसे (४००) वर्षापूर्वी वैज्ञानिक निकोडीन कोपरनिकस यांनी सांगितलेले होते की सुर्याचे पृथ्वीच्या चारही बाजुने फिरल्याने दिवस-रात्र होत नाही. पृथ्वी आपल्या अक्षावर फिरते, ज्या कारणाने दिवस-रात्र होतात. त्यावेळी सर्वांची धारणा होती कि सूर्य पृथ्वीच्या चारही बाजुने फिरतो. या कारणामुळे दिवस-रात्र होतात. त्यावेळेस त्या सच्च्या वैज्ञानिकाचा धर्मांर्थ व्यक्तींनी जनतेला भडकाऊन इतका प्रखर विरोध केला कि हा खोटे बोलत आहे. हा धर्माविरोधी आहे. त्याला फासीवर लटकाऊन मारावे. त्या देशामध्ये दंड देण्याचा व क्षमा करण्याचा अधिकार गव्हर्नरकडे होता. म्हणतात कि त्यावेळेस गव्हर्नरने त्या वैज्ञानिकला सांगितले होते कि आपण एक वेळेस सर्व जनतेसमोर म्हणा कि पृथ्वी फिरत नाही. सूर्याच्या फिरण्यामुळे दिवस-रात्र होत आहे. मी आपणास क्षमा करेल. परंतु सत्याच्या पूजारी वैज्ञानिकाने सांगितले कि हे असत्य आहे, मी कधीच म्हणणार नाही, जे करायचे आहे ते करा. त्या वेळेस त्या खऱ्या व्यक्तिला फासावर लटकवण्यात आले. नंतर चारशे वर्षांनंतर त्या दिवंगत वैज्ञानिकाच्या आत्म्याची विश्वाने क्षमा याचना केली कि आपण सांगितलेले विधान सत्य होते. आम्हाला क्षमा करावी. हीच दशा माझी आहे. मी म्हणत आहे कि श्री ब्रह्मा-विष्णु-शिव नाशवान आहेत. यांचा जन्म-मृत्यु होतो. यांचे आई वडील आहेत. ज्या पुराणांना आपण सत्य मानत आहात, त्या मध्ये प्रमाण दाखवले आहेत. धर्मार्थ संत-मंडलेश्वर, आखाड्याचे महंत-जन माझ्या सत्यज्ञांनाचा तीव्र विरोध करत आहेत तसेच करवत आहेत. ज्या कारणामुळे माझ्यावर खोटे मुकदमे बनवून तुरुंगात टाकले जाते. प्रचार बंद केला जातो. परंतु वर्तमानात शिक्षित मानव आहे. सर्व प्रमाण ग्रंथामध्ये आहे. यामुळे मी जीवंत आहे. जर शंभर वर्षापूर्वी हे ज्ञान सांगितले असते तर केंव्हाचा परलोक गेलो असतो.

आपल्याला पुन: निवेदन आहे कि या पुस्तकाला अगदी मनापासून श्रद्धाने वाचून उमजून मज दासाकडे (लेखक) यावे आणि शास्त्रोक्त साधना घेवून आपले तसेच परिवाराचे नि:शुल्क कल्याण करुन घ्यावे.

।। सत साहेब ।।

लेखक
(संत) रामपाल दास

## ''अंध श्रद्धा भक्तीचे वर्णन'' मूर्ति पूजा काय आहे?

मूर्ति पूजे मध्ये अंध श्रद्धाळूंना बऱ्याच गोष्टी सांगितलेल्या आहेत कि :-

श्री विष्णु जी, श्री शिव जी, श्री देवी दुर्गा माता जी, श्री गणेश जी, श्री लक्ष्मी जी, श्री पार्वती जी तसेच अन्य अनेक लोक प्रसिद्ध देवी-देवतांच्या मूर्त्यांची पूजा म्हणजेच त्यांना प्रतिदीन स्नान करवणे, नवे वस्त्र घालणे, तिलक लावणे, त्यांच्या वर फूल वाहणे, चांगले जेवण बनवुन त्यांच्या तोंडाला भोजन लावुन खाण्याची प्रार्थना करणे. दूध पाजणे, अगरबत्ती व ज्योति लावून त्यांची आरती करणे. त्यांच्या जवळ आपल्या परिवाराच्या सुख-शांती, समृद्धि साठी प्रार्थना करणे. नौकरी-रोजगार, संतान व धन प्राप्तीसाठी प्रार्थना करणे ईत्यादी-ईत्यादी तसेच शिव जींचे लिंग (Private Part) म्हणजेच गुप्तांगाची पूजा करणे. त्या लिंगावर दूध घालणे, त्यावर तांबे किंवा पितळाचे स्टँड ठेवुन तांबे किंवा पितळाचा घडा (लहान कळशी) च्या खालील तळावर बारिक छिद्र करुन पाण्याने भरुन ठेवणे त्यातुन अविरत लिंगावर थंड पाण्याची धार पडत राहील. ही मूर्ति पूजा आहे.

❖ निवेदन :- श्रीमद्‌भगवत गीता अध्याय १६ श्लोक २३-२४ मध्ये स्पष्ट निर्देश आहे कि जो साधक शास्त्रामध्ये वर्णित भक्ति च्या क्रिया व्यतिरीक्त साधना व क्रिया करतात, त्यांना ना सुखाची प्राप्ति होते, ना सिद्धि म्हणजेच आध्यात्मिक शक्ती प्राप्त होते, ना त्यांना गति म्हणजेच मोक्ष प्राप्ती होते म्हणजेच व्यर्थ पूजा आहे. ति केली नाही पाहिजे कारण साधक या तिन्ही लाभांसाठी परमात्माची भक्ति करतो. त्यामुळे ती धार्मिक क्रिया त्यागली पाहिजे जी गीता तसेच वेदासारख्या प्रभुदत्त शास्त्रा मध्ये वर्णित नाही. वरील मूर्ति पूजेचा उल्लेख वेदांमध्ये तसेच गीतेमध्ये नसल्यामुळे शास्त्रविरुद्ध साधना आहे.

❖ विशेष :- या ठिकाणी काही तर्क देणे आवश्यक समजतो.

## ''शास्त्राची स्थिति''

संसाराच्या उत्पत्ती नंतर परम अक्षर ब्रह्म म्हणजेच परमेश्वर ने क्षर पुरुष म्हणजे काल ब्रह्म (ज्यास ज्योती स्वरुप नीरंजन तसेच क्षर पुरुष देखील म्हणतात) त्यास तपाच्या प्रतिफळात एकवीस ब्रह्मांडाचे राज्य दिले. काल ब्रह्मने सनातन परम धाम म्हणजे सत्यलोक (सच्चखण्ड) मध्ये एक भयंकर चूक केली. देवी दुर्गा जीने तसेच आपण सर्वांनी देखिल तेथे चुक केली. ज्या कारणामुळे यास तसेच देवी दुर्गाने तसेच आपण सर्व प्राण्यांसहित त्याच्या एकविस ब्रह्मंडा सहित सतलोकातून काढुन टाकले. त्याचे एकविस ब्रह्मांडे आम्हा सर्वांना बरोबर घेउन सतलोका पासून सोळा (१६) संख कोस म्हणजेच ४८ संख किलोमीटर एव्हढ्या दूर अंतरावर आले. क्षर पुरुष म्हणजेच काल ब्रह्मच्या अगोदर परमेश्वर (सत पुरुष) ने अक्षर पुरुषाची म्हणजेच परब्रह्मची उत्पत्ति केली होती. त्याला सात संख ब्रह्मांडाचे क्षेत्र दिले होते. सतपुरुष म्हणजेच परमेश्वराला परम अक्षर पुरुष किंवा परम अक्षर ब्रह्म देखील म्हणतात. या तिन्ही पुरुषाचे (क्षर पुरुष, अक्षर पुरुष तसेच परम अक्षर पुरुष) चे वर्णन गीता अध्याय १५ श्लोक १६-१७ मध्ये स्पष्ट केले आहे. श्लोक १७ मध्ये परम अक्षर पुरुषाची महिमा सांगितली आहे.(अधिक व संपूर्ण महितीसाठी याच पुस्तकातील पान क्रमांक १९२ वर ''सृष्टि रचना'' अध्याय कृपया वाचावा).

क्षर पुरुष हा केवळ एकवीस ब्रह्मांडाचा स्वामी आहे :- हा क्षर पुरुष म्हणजेच काल ब्रह्म आहे. एक ब्रह्मांडा मध्ये तीन लोक विशेष प्रसिद्ध आहेत. १. पृथ्वी लोक, २. स्वर्ग लोक,

३. पाताळ लोक. याच्या व्यतिरिक्त शिव लोक, विष्णु लोक, ब्रह्मा चे लोक, महास्वर्ग लोक म्हणजेच ब्रह्म लोक, देवी दुर्गा चे लोक, इन्द्र चे लोक, धर्मराय चे लोक, सप्तपुरी लोक, गोलोक, चंद्र, सूर्य, नऊ गृह, नऊ लाख तारे, शहान्नव करोड मेघ माला, अठ्याऐंशी हजार ऋषि मंडल, तेहतीस करोड देव स्थाने इत्यादि–इत्यादि विद्यमान आहेत.

ज्यामधे आपण राहतो, हे या काल ब्रह्मंच्या एकविस ब्रह्मांडापैकी एक आहे. या एका ब्रह्मांडाचा संचालक देखील काल ब्रह्म (क्षर पुरुष) आहे.

पाच ब्रह्मांडाना मिळून एक महाब्रह्मांड आहे. एक ब्रह्मांडाच्या मधोमध तसेच इतर चार या मधल्या ब्रह्मांडा भोवती परिक्रमा करत राहतात. परिक्रमा करणाऱ्या एका ब्रह्मांडावर आपण राहतो. ज्या ब्रह्मांडात आपण राहतो तसेच एक जो मध्यभागचा ब्रह्मांड आहे, वर्तमानात केवळ या दोनच ब्रह्मांडात जीव आहेत. महाब्रह्मांडाच्या मधल्या ब्रह्मांडात जीव आहेत. हे ज्ञान केवळ क्षर पुरुष आणि दुर्गा देवीलाच आहे. इतर सर्व समजतात की केवळ यामध्येच जिव आहेत, अन्य ब्रह्मांडात जीव नाहीत. ज्यावेळी या ब्रह्मांडावर प्रलय होईल, त्यावेळी त्या परिक्रमा करणाऱ्या एकावर सृष्टी क्रम सुरू होईल. काल ने प्रतिज्ञा केली आहे कि मी कुणालाच आपल्या वास्तविक स्वरूपांत (काल रूप जो याचा खरा चेहरा आहे) दर्शन देणार नाही. (प्रमाण :– गीता अध्याय ७ श्लोक २४–२५). त्यामुळे तो आपल्या पूत्राच्या श्री ब्रह्मा जी, विष्णु जी तसेच शिव जीच्या रूपात आपल्या साधकाला दर्शन देतो. ज्या कारणामुळे ऋषिना साधना करताना ज्या रुपात दर्शन झाले, त्याचीच महिमा सांगायला सुरुवात केली. यास शिव पुराणात सदाशिव किंवा महाशिव म्हटले जाते. विष्णु पुराणात महाविष्णू तसेच ब्रह्मा पुराणात महाब्रह्मा म्हटले गेले आहे. या कारणामुळे वर्तमानात सर्व ऋषिजन संभ्रमात पडून रजगुण ब्रह्मा जी, सतगुण विष्णु जी, तमोगुण शिव जी यांना सर्वेसर्वा मानु लागले कारण ऋषिजणांनी वेदांना वाचले. (त्या वेळेस पुराणाची रचना झालेली नव्हती. पुराण ऋषिंचे अनुभव आहेत आणि वेद ज्ञान म्हणजे चारही वेद परमात्मा द्वारा दिले गेलेले आहेत). वेदांमध्ये केवळ ओं (ओम्=ॐ) मंत्र आहे भक्ती करण्याचा, अन्य कोणताच मंत्र मोक्षाचा नाही. (प्रमाण :– यजुर्वेद अध्याय ४० मंत्र १५ मध्ये).

ऋषिंनी ॐ (ओम्) नामाचा जाप केला जो ब्रह्म (काल ब्रह्म = क्षर पुरुष) चा आहे. ब्रह्म (क्षर पुरुष) हा आपल्या प्रतिज्ञे अनुसार आपल्या वास्तविक रुपा मध्ये दर्शन न देता आपले पुत्र (ब्रह्मा, विष्णु, शिव) च्या रूपात दर्शन देवून त्यांच्या भक्तीच्या प्रतिफळात आशीर्वाद देऊन अंतर्धान झाले. कोण्या ऋषिला ब्रह्माजीच्या रूपात दर्शन दिले. त्या ऋषिला विश्वास झाला कि रजगुण ब्रह्मा जी जो सर्गुण देवता आहे, हाच पूर्ण परमात्मा आहे.

ऋषिंना चारही वेदांचे संपूर्ण ज्ञान नव्हते. (कारण लगेचच पुढे सांगतो, त्यासाठीच ही भूमिका लिहीत आहे कि ऋषिना वेदांचे ज्ञान व्यवस्थित का नव्हते.) त्यांनी वेदांमध्ये वाचले कि पूर्ण परमात्मा ची भक्ति केल्यानेच मोक्ष मिळतो. जरा–मरण समाप्त होते. अन्य देवतांची (रजगुण ब्रह्मा, सतगुण विष्णु, तमोगुण शिव जी व अन्य देवी–देवता, हे सर्व अन्य देवतांच्या श्रेणीमध्ये येतात) भक्ति केल्याने पुर्ण मोक्ष संभव नाही. ऋषिनी अज्ञानाच्या कारणाने पूर्ण परमात्माची भक्ति व साधनेचा मंत्र ओं (ॐ) मानला तसेच श्री ब्रह्मा जीं कडुन ऐकून हठयोगाने तप देखील बरोबर केले कारण ब्रह्माजीना वेद प्राप्ती अगोदर ते जेंव्हा विष्णुजीच्या नाभीतून उत्पन्न झाले, कमळावर युवा अवस्थेत सचेत झाले तर क्षर पुरुषाने (काल ब्रह्मने) आकाशवाणी केली कि तप करा–तप करा. श्री ब्रह्माजीने एक हजार वर्षे तप केले. त्यांच्या हठपूर्वक तपाला ब्रह्माजीने पूर्ण परमात्मा द्वारा झालेली आकाशवाणी मानली परंतु ही आकाशवाणी तर क्षर

पुरुषाने (काल ब्रह्मने) केली होती ज्यांना ऋषिजन ब्रह्म म्हणतात. हा पूर्ण परमात्मा नाही. पूर्ण परमात्मा तर परम अक्षर ब्रह्म आहे ज्याचे वर्णन गीता अध्याय ८ श्लोक १ मध्ये अर्जुनाने केलेला प्रश्न कि ''तत् ब्रह्म काय आहे?'' च्या उत्तरात याच अध्याय ८ च्या श्लोक ३ मध्ये गीता सांगणाऱ्याने दिलेले आहे कि ''तो परम अक्षर ब्रह्म आहे.'' याचेच ज्ञान अध्याय ८ च्या श्लोक ८,९,१० तसेच २०,२१,२२ मध्ये आहे तसेच अध्याय १५ श्लोक ४ तसेच १७ मध्ये आहे. त्याच्याच शरणा मध्ये जाण्यासाठी गीता ज्ञानदात्याने गीता अध्याय १८ श्लोक ६२ तसेच ६६ मध्ये सांगितले आहे. त्याच्या साधनेचा मंत्र गीता अध्याय १७ श्लोक २३ मध्ये सांगितले आहे ज्याच्या भक्ती चे ज्ञान तत्वदर्शी संताकडून प्राप्त करावयास सांगितले आहे. (प्रमाण :- गीता अध्याय ४ श्लोक ३४ मध्ये) ते तत्वज्ञान ना चार वेदां मध्ये, ना गीता, ना पुराणात व उपनिषदामध्ये आहे. ते सुक्ष्मवेदा मध्ये आहे. (कारण मी पुढे सांगणार आहे).

ऋषिंनी अज्ञान आधाराने हठयोग करून घोर तप तसेच ओं (ॐ) मंत्राचा जप केला. त्या कारणाने काल ब्रह्मने कोणास विष्णुजीच्या रूपात साधक ऋषिस दर्शन दिले. त्या ऋषिंनी सतगुण विष्णु देवतास पूर्ण परमात्मा मानले कारण ते ऋषिजन चुकुन ॐ मंत्राचा जाप पूर्ण परमात्माचा समजुन बसले आहेत तीच चूक वर्तमान पर्यंत चालू आहे. याचप्रमाणे काल ब्रह्मने अन्य ऋषिला तमोगुण शिव देवताच्या रूपात दर्शन दिले तर त्याने श्री शिव तमोगुण ला पूर्ण परमात्मा घोषित केले. कोण्या ऋषि साधकाला ब्रह्मा जीच्या रूपात दर्शन दिले तर त्याने श्री ब्रह्मा जी रजोगुण देवतास पूर्ण परमात्मा सांगितले. ज्या कारणाने या तीन देवतांपैकी (ब्रह्मा, विष्णु व शिव) दोन देवतांचे (श्री विष्णु जी तसेच श्री शिव जी) तसेच अन्य देवी-देवतांची पूजा करु लागले. ऋषिना पुराणाचे ज्ञान देणारे श्री ब्रह्मा जी ने दिले. हे एकच बोध होते. ऋषिंनी आपले वडील, पितामह श्री ब्रह्मा कडून ऐकलेल्या पुराण ज्ञाना मध्ये आपला अनुभव एक-दुसऱ्या पासुन ऐकलेल्या कथा मिळुन-मिसळुन अठरा पुराण बनवले ज्यामध्ये वेदांचे ज्ञान नाममात्र आहे. अधिक ज्ञान हे ऋषिंचा आपला अनुभव जो भक्ती मार्ग म्हणजेच पूर्ण मोक्ष मार्गामध्ये प्रमाणात घेतले जाऊ शकत नाही म्हणजेच जी साधना करण्याची विधी पुराणांमध्ये ऋषिंद्वारा लिहली आहे आणि ती वेद तसेच वेदांच्या सारांश रुप श्रीमद्‌भगवत गीतासंगे मेळ करत नाही तर ती शास्त्रविरुद्ध आहे. त्या साधनेला करू नये. याच ऋषिंनी शास्त्र विरुद्ध साधना जसे कि मूर्ति पूजा, श्राद्ध करणे, पिन्ड दान करणे, मंदिर बनवणे तसेच त्यामध्ये मूर्तिची स्थापना करणे, त्यामध्ये प्राण-प्रतिष्ठा करणे, शिव लिंगाची पूजा करणे, अन्ये देवी-देवतांचे पूजन इष्ट रूपात करणे, चे प्रचलन केले जे ना पवित्र वेदात वर्णित आहे, ना चारही वेदांच्या सारांशरूपी पवित्र गीतेत वर्णित आहे. जी साधना वेद तसेच गितेमध्ये वर्णीत नाही, ती करावयाची नाही कारण ती शास्त्रविधीला त्यागुन मनमानी आचरण असल्याने व्यर्थ आहे.

आपल्याला स्पष्ट झाले कि पुराण ऋषिंचे कृत ज्ञान आहे जे वेदांच्या प्राप्ती नंतरचे आहे जे ऋषिंच्या अर्धवट वेद ज्ञानाचा परिणाम आहे आणि भक्ती च्या योग्य नाही.

उपनिषद :- उपनिषद देखील ऋषिंचे आपले स्वत:चे अनुभव आहेत. पुराणात ज्या ऋषिंनी पुराणाचे ज्ञान कोण्या जन-समूहाला प्रवचन करुन ऐकवले. त्यामध्ये आपला अनुभव तसेच अन्य कोणाकडुन ऐकलेले ज्ञान देखील मिसळले आहे. परंतु उपनिषद एकाच ऋषिचे आपला अनुभव आहे. त्यांच्याच नावावरून उपनिषदे प्रसिद्ध आहेत. जसे कि कठोपनिषद हा कठ ऋषिंद्वारा लिहिलेला आपला अनुभव, हे उपनिषद आहे. जर उपनिषदाचे ज्ञान वेद विरुद्ध आहे तर ते देखील अमान्य आहे. भक्ति व साधने मध्ये प्रयोग करण्या योग्य नाही.

❖ शास्त्राची स्थिति सांगितली जात आहे :- पुराण तसेच उपनिषदच्या स्थितीचे वर्णन

केलेले आहे.

❖ चार वेदांची स्थिति :- ज्या वेळी क्षर पुरुषाला (काल ब्रह्म म्हणजेच ज्योति स्वरुप निरंजन काल) आपल्या सहित एकविस ब्रह्मांडा सहित सतलोका पासून दूर पाठवण्यात आले, त्यानंतर काल ब्रह्मने आपली पत्नि दुर्गा देवी (अष्टंगी) सोबत विलास करून तीन पुत्रांची (रजगुण ब्रह्मा, सतोगुण विष्णु, तमोगुण शिव जी) उत्पत्ति केली. श्री दुर्गा देवी ने आपल्या वचनाने तीन तरुण मुलींची उत्पत्ति केली. त्यांची नावे सावित्री, लक्ष्मी आणि पार्वती ठेवले. त्यांचा विवाह क्रमश: ब्रह्मा, विष्णु आणि शिव सोबत केला. त्यानंतर काल ब्रह्मच्या (क्षर पुरुष) एकविस ब्रह्मांडात जीव उत्पन्न होणे व मरणाचा खेळ सुरू झाला.

पूर्ण परम्यात्म्याला हे माहीत होत कि जे आत्मे आपल्या चुकीने काल ब्रह्म (क्षर पुरुष) सोबत गेलेले आहेत, ते तेथे फार मोठे कष्ट भोगतील. परत सुख स्थान म्हणजेच सतलोकात (सनातन परम धाम) येण्यासाठी यथार्थ साधनेची आवश्यकता भासेल तसेच त्यांना ज्ञान झाले पाहिजे कि ते कोणत्या कारणामुळे या काल लोकात जन्म-मरणात आहेत? कुत्रा, गाढव, पक्षी इत्यादींचे जीवन भोगत आहेत? या जन्म-मरणाच्या संकटातुन मुक्ति कशी मिळेल? या विषयीचे संपुर्ण वेद ज्ञान म्हणजेच सूक्ष्मवेद पूर्ण परमात्मा (परम अक्षर ब्रह्म) याने आपल्या आत्म्यामधुन काल ब्रह्मच्या आत्म्यामध्ये ई-मेल केले. काही वेळानंतर ते संपूर्ण वेद ज्ञान (सूक्ष्मवेद) काल ब्रह्म (ज्योती स्वरुप नीरंजन म्हणजे क्षर पुरुष) च्या श्वासाद्वारे बाहेर प्रकट झाले. ज्या प्रमाणे कम्प्युटरद्वारे प्रिंटरला कमांड दिल्याबरोबर मैटर स्वत: बाहेर येतो. परम अक्षर पुरुषाने कमांड दिल्याबरोबर काल ब्रह्मच्या आत्माच्या श्वासाद्वारा पूर्ण वेद बाहेर आले. क्षर पुरुषाने त्या सुक्ष्म वेदास वाचले तेव्हा त्याने आपल्या बरोबर धोका केला. त्याला असे वाटले कि या ज्ञानाची माहिती तसेच समाधान माझ्याबरोबर आलेल्या प्राण्यांना माहित झाले तर ते सर्व सत्य साधना करून माझ्या लोकातून सतलोकात (सनातन परम धामात) निघुन जातील. त्याने त्या संपूर्ण वेदांना काटछाट करुन विशेष ज्ञान नष्ट केले. केवळ तेच प्रकरण व साधना वाले ज्ञान भक्तीचे वर्णन ठेवले ज्यामुळे जन्म-मरण सुरू राहील आणि मनुष्य जीवन प्राप्त प्राणी उरलेल्या अपूर्ण वेदाचे ज्ञान घेत राहतील व ते या भ्रमात राहतील कि आम्ही पूर्ण परमात्म्याचीच भक्ति करत आहोत, परंतु ते मंत्र काल ब्रह्मच्या साधनेचे असल्यामुळे यांचे जन्म-मरण, स्वर्ग-नरक कायमस्वरुपी चालूच राहील व ते माझ्या लोकात अडकून राहतील. असा विचार करून काल ब्रह्म ने ते अर्धवट वेद ज्ञान समुद्रात लपवून ठेवले. गुप्त रुपाने आपली पत्नी देवी दुर्गाला संदेश दिला कि या तीन पुत्रांना (ब्रह्मा, विष्णु, शिव) समुद्र मंथनास पाठव. मी पूर्ण व्यवस्था करून ठेवलेली आहे. एक ज्ञान बाहेर पडेल, त्यास माझा मोठा मुलगा ब्रह्मा प्राप्त करेल. त्यानंतर तो दुसऱ्यास तेच सांगेल. असेच केले गेले. समुद्र मंथनातून वेद ब्रह्माजीस मिळाले ज्यामधे पूर्ण अध्यात्म ज्ञान तसेच पूर्ण मोक्ष प्राप्तीची विधि नव्हती. केवळ स्वर्ग महास्वर्गाच्या (ब्रह्मलोक) पर्यंत प्राप्तीची भक्ती विधी वर्णित आहे. त्याकारणाने सर्व प्राणी त्या सनातन परमधामास प्राप्त करु शकत नाहीत ज्याच्या विषयी गीता ज्ञान दाताने गीता अध्याय १८ श्लोक ६२ मध्ये सांगितले आहे. त्या परमेश्वराचे स्पष्ट ज्ञान उरलेल्या वेदांमध्ये नाही. त्यामुळे गीता अध्याय ४ श्लोक ३२ मध्ये सांगितले आहे कि संपूर्ण आध्यात्मिक ज्ञान तसेच धार्मिक यज्ञ (अनुष्ठांना) संबंधीच्या संपूर्ण विधीचे ज्ञान स्वत:हा (ब्रह्मण: मुखे वितता:) सच्चिदानंद घन ब्रह्मने (परम अक्षर पुरुष) आपल्या मुखातून वर्णन करून विस्ताराने सांगितलेले आहे. तेच ज्ञान तत्वज्ञान (सूक्ष्मवेद) आहे. त्यामधील वर्णीत विधिद्वारे सर्व प्रकारचे पाप नष्ट होतात आणि ती साधना आपले दैनिक कर्म (कार्य) करता-करता करावायाचे प्रावधान आहे.

(गीता अध्याय ४ श्लोक ३२) (अधिक माहितीसाठी वाचा याच पुस्तकाचे पान क्रमांक ५१ वर ''सुक्ष्मवेदाचे रहस्य''.)

❖ गीता अध्याय ४ श्लोक ३४ :- यामध्ये गीता ज्ञानदात्याने म्हटले आहे कि जे तत्वज्ञान स्वत: परमात्मा पृथ्वीवर प्रकट होऊन आपल्या मुख कमलाने बोललेल्या वाणी मध्ये सांगतात, त्या ज्ञानास तू तत्वदर्शी संताकडे जाऊन समज. त्यांना दंडवत प्रणाम केल्यानंतर निष्कपट होऊन नम्रतापूर्वक प्रश्न विचारल्यानंतर ते परमात्म तत्वास भली-भांती समजणारे ज्ञानी महात्मा त्या तत्वज्ञानाचा उपदेश करतील. (गीता अध्याय ४ श्लोक ३४).

❖ गीता अध्याय १५ श्लोक ४ :- यामध्ये असे सांगितले आहे कि तत्वज्ञानाच्या प्राप्तिनंतर अज्ञानाला या तत्वज्ञानरूपी शस्त्राने कापुन म्हणजेच तत्वज्ञानाला भली-भांती समजून घेतल्यानंतर परमेश्वराच्या त्या परमपदाचा शोध घेतला पाहिजे जिथे पोहचल्यानंतर साधक पुन्हा या संसारात परत कधीच येत नाहीत. ज्या परमेश्वरामुळे संसाररूपी वृक्षाची प्रवृति विस्तारास प्राप्त झाली आहे म्हणजेच ज्या परमेश्वराने सर्व ब्रह्मांडाची उत्पति केली आहे, त्या परमेश्वराची भक्ति करा. (गीता अध्याय १५ श्लोक ४)

❖ गीता अध्याय १८ श्लोक ६२ :- हे भारत! तू सर्व भावा सहित त्या परमेश्वराच्या शरण मध्ये जा. त्या परमेश्वराच्या कृपेनेच तू परम शांतीला म्हणजेच जन्म-मरणाच्या चक्रातून नेहमीसाठी सुटून तसेच (शाश्वतम् स्थानम्) सनातन परम धामास म्हणजेच सतलोकास प्राप्त करशील.

विशेष :- हे तत्वज्ञान गीता सांगणाऱ्याला माहीत नाही. जर माहीत असते तर अजून एक अध्याय सांगितला असता. म्हणाला असता कि त्या अध्यायात वाचा. यामुळे हे स्वसिद्ध आहे कि ते तत्वज्ञान गीता-वेद वाचणाऱ्या जवळ देखिल नाही.

पाठकजन! गीता अध्याय ४ श्लोक ३२ तसेच ३४ मध्ये सांगितलेल्या तत्वज्ञानाला समजणारा एकमात्र तत्वदर्शी संत हा दास (रामपाल दास) आहे. त्या तत्वज्ञानाला आपल्या मुख कमलातून बोलणारे परम अक्षर ब्रह्म कबीरजी आहेत.

प्रश्न:- कोण कबीर? उत्तर (संत गरीबदास जीं चे) :-

गरीब, हम सुलतानी नानक तारे, दादू को उपदेश दिया। जाति जुलाहा भेद ना पाया, काशी मांहे कबीर हुआ।।
गरीब, अनन्त कोटि ब्रह्मण्ड का, एक रति नहीं भार। सतगुरू पुरूष कबीर हैं, कुल के सिरजनहार।।

शब्दार्थ :- संत गरीबदासजी (गाव-छुडांनी, जिल्हा-झज्जर, हरियाणा) वाले यांना दहा वर्षाच्या आयुष्यात शेतामध्ये गायी चारत असताना फाल्गुन महिन्याच्या शुक्ल पक्षात (पौर्णिमा) द्वादशीला सकाळी जवळपास दहा वाजता परम अक्षर ब्रह्म सतलोकातून खाली येवून जिंदा बाबाच्या रूपात भेटले होते. त्यांच्या आत्म्याला श्री नानकजी (सिक्ख धर्माचे प्रवर्तक) प्रमाणे वरती सतलोकात घेवून गेले होते. श्री दादूजींना सुद्धा तेच परम अक्षर ब्रह्म जिंदा बाबाच्या रूपात भेटले होते. त्यांच्या आत्म्याला सुद्धा सतलोकात घेवून गेले होते. नंतर सर्वांना पुन्हा शरीरात प्रवेश केला होता. या महात्म्यानी परमात्म्याचे सनातन परम धाम तसेच परम अक्षर ब्रह्मास डोळ्यांनी बघितले आणि संसारामध्ये त्यांचे साक्षी बनले. संत गरीबदासजींना देखील दहा वर्षाचे असताना सन १७२७ (विक्रमी सवंत १७८४) मध्ये भेटले होते. श्री नानक जी तसेच श्री दादूजींना अगोदर भेटले होते. त्यामुळे संत गरीबदास जींनी स्पष्टपणे सांगितले कि जे पूर्ण परमात्मा मला भेटले होते, त्यांनीच श्री नानकजी तसेच श्री दादूजींना देखील प्रकट दर्शन देऊन सत्य भक्ती व ज्ञान सांगून संसारातून मुक्त केले होते. ते अजून कोणी नाही, ते तेच

आहेत जे काशी मध्ये कबीर जुलाहाच्या नावाने प्रगट झालेले होते. त्या परमेश्वराने वेळोवेळी सतलोकातून पृथ्वीवर प्रकट होऊन आपल्या मुख-कमलाद्वारे बोलुन-बोलुन आपल्या अमृतवाणीतुन म्हटले आहे जे लिहिले गेले आहे आणि जे सूक्ष्मवेद (तत्वज्ञान) म्हणजेच संपूर्ण वेद ज्ञान आहे.

या सूक्ष्मवेदात चार वेदांचे (ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद तसेच अथर्ववेद) ज्ञान म्हणजेच सूक्ष्म पासून घेतलेले अर्धवट ज्ञान तसेच या चार वेदांचे सारांश रूप श्रीमद्भगवत गीतेचे ज्ञान तर आहेच तसेच जे काल ब्रह्मने नष्ट केले होते, ते देखिल ज्ञान आहे. या दासाजवळ (रामपाल दास) सूक्ष्म वेदाच्या ज्ञानापासून संपुर्ण मोक्ष प्राप्ती च्या साधनेची शास्त्रोक्त मंत्र आहे. यांची साधना केल्यामुळे मन वाईटांचा तिरस्कार करु लागतो. चोरी-डाका, हत्या, हिंसा, भ्रष्टाचार, बलात्कार इत्यादी सर्व प्रकारच्या नशापासून आपोआप ग्लानि व्हायला लागते. आत्मा निर्मळ होऊन जातो. ह्दयात दयेचा संचार होऊ लागतो. आवश्यकतेपेक्षा जास्त धन संचय करणे व मोठमोठी घरे बनवण्याची आवड राहत नाही. त्याची पुर्ण ईच्छा परमात्माच्या त्या सनातन परम धामास (सतलोक) प्राप्त करणे तसेच कायमस्वरुपी जन्म-मरणा पासुन सुटका मिळवण्याची होती. त्यामुळे माझ्याकडून (लेखक) दीक्षा घेवुन मर्यादा मध्ये राहुन साधना केल्यास परमेश्वराचे ते परम पद प्राप्त होते जेथे गेल्यानंतर साधक परत या संसारात येत नाहीत म्हणजेच (शाश्वतं स्थानं) सनातन परम धाम (सतलोक) व परम शांतीची प्राप्ती होते ज्या विषया मध्ये गीता अध्याय १८ श्लोक ६२ तसेच गीता अध्याय १५ श्लोक ४ मध्ये म्हटले आहे.

गीता अध्याय ८ चे श्लोक ८,९,१० मध्ये गीता ज्ञान बोलणाऱ्याने स्वतः म्हटले आहे कि त्या दिव्य परम पुरुषाची म्हणजेच परम अक्षर ब्रह्म ची भक्ति करणारे त्या परम पुरुष परमेश्वराला प्राप्त होतात आणि गीता अध्याय ८ श्लोक ५ तसेच ७ मध्ये गीता ज्ञानदात्याने आपल्या विषयी म्हटले आहे कि माझी भक्ति करणारा मलाच प्राप्त होईल. याच अध्याय ८ च्या श्लोक १३ मध्ये म्हटले आहे कि माझ्या भक्तिचे केवळ ओम् (ॐ) अक्षर आहे. लक्ष्यात असुद्या कि गीता ज्ञान दात्याने गीता अध्याय २ श्लोक १२, अध्याय ४ श्लोक ५ व अध्याय १० श्लोक २ मध्ये स्पष्ट केले आहे कि हे अर्जुन! तुझे व माझे अनेक जन्म झालेले आहेत, पुढे ही होतील. या वरुन हेच सिद्ध होते कि गीता ज्ञान दाता स्वत: जन्मतो-मरतो तर त्याचे उपासक देखील जन्मत-मरत राहणारच.

ओं (ॐ) नामाच्या जापाने ब्रह्मलोकाची प्राप्ती होते म्हणजेच ॐ (ओं) मंत्र चा जाप करणारा साधक ब्रह्मलोकात निघुन जातो. प्रमाण :- श्री देवीपुराण गीता प्रेस गोरखपूर हुन प्रकाशित चे सातवे स्कंद पान क्रमांक ५६२-५६३ वर देवी दुर्गा जी ने हिमालय राजाला ब्रह्म उपदेश देताना हे रहस्य सांगितले आहे.

गीता अध्याय ८ श्लोक १६ मध्ये हे सुद्धा स्पष्ट आहे कि ब्रह्मलोकात गेलेले साधक पुनरावर्ती मध्ये आहेत म्हणजेच ब्रह्मलोकात गेलेले साधक देखील आपला स्वर्गातील कार्यकाल पूर्ण करून पुन्हा पृथ्वीवर परत येतात. हा पूर्ण मोक्ष नाही. ॐ (ओम्) नामाच्या जापाने ब्रह्मलोक प्राप्त होतो. पूर्ण मोक्ष्यासाठी गीता अध्याय १७ श्लोक २३ मध्ये सांगितलेल्या तीन मंत्राचे (ॐ,तत्,सत्) नाम स्मरण केल्यानेच (ब्रह्मण:) सच्चिदानंद घन ब्रह्मची म्हणजेच परम अक्षर ब्रह्मची प्राप्ती होते. गीता वाचकांनी गीता शास्त्र वाचले आहे, समजून घेतले नाही कारण गीता अनुवादक गीतेच्या गुढ सांकेतिक शब्दाला समजू शकले नाहीत. जे तीन मंत्र आहेत :- ॐ (ओम्), तत्, सत्. हे गीता अध्याय १५ श्लोक १६-१७ मध्ये वर्णित तीन्ही पुरुषाचे (प्रभुंचे) आहेत. :-

१. क्षर पुरुषाचा (काल ब्रह्म) ॐ (ओम्) हे नाम आहे जे प्रत्यक्ष आहे. काल ब्रह्म केवळ २१ ब्रह्मांडाचा स्वामी आहे. तो नाशवान आहे. त्याच्या लोकातील सर्व प्राणी देखील नाशवान आहेत.

२. अक्षर पुरुषाचा (परब्रह्म) तत् मंत्र आहे, जो सांकेतिक आहे. याचा यथार्थ मंत्र माझ्या (लेखक) जवळ आहे. हा प्रभू सात संख ब्रह्मांडाचा स्वामी आहे. हा सुद्धा नाशवान आहे. त्याच्या लोकातील सर्व प्राणी देखील नाशवान आहेत.

३. परम अक्षर पुरुषाचा (परम अक्षर ब्रह्म) सत् मंत्र आहे, जो सांकेतिक आहे. यथार्थ मंत्र माझ्या जवळ आहे कारण सूक्ष्मवेद म्हणजेच तत्वज्ञाना मध्ये या मंत्राच्या वास्तविक शब्दाचा उल्लेख आहे. सूक्ष्मवेद केवळ लेखक (रामपाल दास) जवळ आहे आणि त्यास योग्य रितीने समजावून घेतले आहे. परम अक्षर पुरुष वास्तवात अविनाशी तसेच पुरुषोत्तम व परमात्मा आहे. त्यांच्या लोकातील सर्व जिवात्मे देखिल अविनाशी आहेत. हाच सर्वांचा पालनकर्ता परमेश्वर आहे.

मुज दासाला एक वैद्य समजून आपल्या जन्म-मरणरूपी दीर्घ रोगाचा उपचार नि:शुल्क करून घ्यावा. जोपर्यंत संसारात राहसाल, आपली प्रत्येक आवश्यक मनोकामना पूर्ण होईल. ही गोष्ट हा दास (रामपाल दास) दाव्यानिशी व पूर्ण विश्वासाने सांगत आहे. जे लाभ आपणा सर्वांना साधुन म्हणजेच अनेक देवी-देवतांची भक्ति व मूर्ति, तीर्थ, धामाची इत्यादींची पूजा करून सुद्धा प्राप्त करून घेऊ शकत नाहीत, ते सर्व लाभ आपणास ''एकै साधै'' म्हणजे एक मूळ रूप परम अक्षर ब्रह्मच्या साधनेने मिळेल. ज्या प्रमाणे आंब्याच्या रोपाच्या मुळाला (जड) पाणी दिले तर रोपाचा सर्व भाग (खोड, मोठी फांदी, उप-फांध्या, पाने) विकसित होऊन झाड बनुन फांद्यांना फळे देऊ लागतात. पहा सरळ रोपित केलेले रोप याच पुस्तकातील पान क्रमांक १३४ वर. आपण सर्व देवतांची पूजा साधना करत आहात. आपण भक्ति रूपी आंब्याचे रोप उलटे लावलेले आहे जे नष्ट होत आहे म्हणजेच आध्यात्मिक लाभ प्राप्त होत नाही. कृपया पहा उलटे रोपित केलेले आंब्याच्या रोपाचे चित्र याच पुस्तकातील पान क्रमांक १३५ वर. या विषयीची संपूर्ण माहिती आपण वाचा याच पुस्तकातील पान क्रमांक १३० वर ''भक्ती कोणत्या प्रभूची केली पाहिजे? गीता अनुसार'' मध्ये.

## आन-उपासना करणे व्यर्थ आहे.

सूक्ष्मवेदामध्ये (तत्वज्ञान) आन उपसानेचा निषेध सांगितलेला आहे. उपासनेचा अर्थ आहे आपल्या ईष्ट देवाजवळ जाणे म्हणजेच ईष्टास प्राप्त करण्यासाठी केलेली तडफ, दुसऱ्या शब्दा मध्ये पूजा करणे.

आन-उपासना ही अशी पूजा जिचे वर्णन शास्त्रामध्ये नाही.

❖ मूर्ति-पूजा आन-उपासना आहे :-

या विषयावर सूक्ष्मवेदामध्ये कबीर साहेब याप्रकारे स्पष्टीकरण केले आहे :-

कबीर, पत्थर पूजें हरि मिले तो मैं पूजूँ पहार। तातें तो चक्की भली, पीस खाए संसार।।
बेद पढ़ैं पर भेद ना जानें, बांचें पुराण अठारा। पत्थर की पूजा करें, भले सिरजनहारा।।

**शब्दार्थ :-** कुणा देवाची दगडाची मूर्ति तयार करून त्याची पूजा करणे हे शास्त्र विरूद्ध आहे. त्यापासून कसलाच लाभ होणार नाही. कबीर परमेश्वरांनी म्हटले कि जर लहानश्या दगडाच्या मूर्तिची (देवाची प्रतिमा) पूजा करून परमात्म्याची प्राप्ती होणार असेल तर मी

लवकरच मोक्षप्राप्तीसाठी मोठ्या डोंगराचीच पूजा करेल. परंतु अशी मूर्ति पूजा व्यर्थ आहे. यापेक्षा (मूर्तीच्या दगडापेक्ष्या) तर घरात असलेला दगडाची गिरण लाभदायक आहे ज्याच्यामुळे दळण (धान्याचे पीठ) दळून सर्वजण जेवण बनवुन खात आहेत.

वेदांचे व पुराणाचे यथार्थ ज्ञान नसल्या कारणाने हिन्दू धर्माचे धर्मगुरु वेद, पुराण, गीता इत्यादी वाचतात, परंतु पूजा दगडाची करतात तसेच आपल्या अनुयायांकडुन करवितात. त्यांना सृजनहार म्हणजेच परम अक्षर ब्रह्म चे ज्ञान नाही. त्याला न पूजता अन्य देवी-देवतांची पुजा तसेच त्यांची काल्पनिक मूर्ति दगडाची बनवून पुजा चे विधान लोकवेद (दंत कथा) च्या आधाराने बनवून यथार्थ परमात्म्याला विसरून गेले आहेत. त्या परमेश्वराच्या भक्ति-विधीचे देखील ज्ञान नाही.

❖ विवेकाने काम घेतात :- परमात्मा कबीर जींनी समजावण्याचा प्रयत्न केला आहे कि आपल्याला आंबा खायची ईच्छा झाली. कुणी आपणास सांगितले की ही दगडाची मूर्ति आंब्याचे फळच आहे. आंब्याच्या फळाचे सर्व काही गुण सांगितले. आपण त्या आंब्याच्या फळाचे गुण तर त्यास खाऊनच प्राप्त करु शकता. जी दगडापासुन बनवलेली आंब्याची मुर्ती आहे, त्यापासून ते लाभ प्राप्त करु शकत नाहीत. आपणास आंब्याचे फळच पाहिजे. त्याचा यथार्थ विधी आहे कि अगोदर मोल-मजुरी करून धन प्राप्त करा. मग बाजारातून जाउन आंबा विक्रेत्यादाला शोधा. मग ती इच्छित वस्तु मिळेल.

याच प्रमाणे ज्या देखिल देवाच्या गुणाने प्रभावित होऊन त्यांच्याकडुन लाभ घेण्यासाठी आपण प्रयत्नशिल आहेत, त्याच्या लाभाची प्राप्ती त्याच्या मूर्तीपासून नाही होऊ शकत. त्याची विधी शास्त्रामध्ये वर्णीत आहे. ती अनुसरा तसेच मजुरी म्हणजे साधना करून भक्ति धन संग्रह करा. त्यानंतर देवरुपी वृक्षाच्या फांदीकडून आपणास इच्छित फळ आपल्या भक्ति कर्माच्या आधारे देतील.

अन्य उदाहरण :- कोणा संताकडून (बाबा) त्याच्या अनुयायांना बरेच लाभ मिळत असत. श्रद्धाळू त्यांच्या अडचणी बाबा म्हणजेच गुरुजींना सांगत असत. गुरुजी त्यांना कष्ट निवारण्याची युक्ति सांगत असत. अनुयायांना त्याचा फायदा होत असे. त्या बाबाच्या मृत्यू नंतर श्रद्धाळूनी श्रद्धेपोटी त्या महात्मांची दगडाची मूर्ति बनवली आणि मंदिर बनवून त्यामध्ये स्थापन केली. नंतर त्याची पूजा सुरू झाली. त्या मूर्तीला जेवण तयार करून भोग लावला जाऊ लागला. त्या मूर्तीसमोर आपल्या संकट निवारण्यासाठीच्या प्रार्थना होऊ लागल्या. त्या मूर्तीत प्राण प्रतिष्ठा करण्याचे आयोजन देखील केले. ही एक अंधश्रद्धा भक्ति आहे जी मानवी जीवनास नाशक आहे.

विचार करा :- एक डॉक्टर (वैद्य) होता. जो कोणी रोगी त्याच्याकडून उपचार करून घ्यायचा, तो बरा व्हायचा. डॉक्टर रोग्याला त्याच्या रोगासंबंधी माहिति द्यायचा व त्याच्या साठीचे औषध देऊन कश्याप्रकारे घ्यावे याची विधी समजून सांगायचा. या सोबत काय वस्तु खायच्या, काय नाही खायचे, या संबंधीची सूचना देत असे. याप्रमाणे त्याच्या उपचाराने रोगी बारे व्हायचे. त्यामुळे तो डॉक्टर त्या क्षेत्रात आदरणीय झाला होता. त्याची प्रसिद्धी दूर-दूर पर्यत होती. जर त्या डॉक्टरच्या मृत्यू नंतर त्याची मूर्ति बनवुन मंदिर बनवुन प्राणप्रतिष्ठा करुन स्थापित केली गेली. त्यानंतर त्याच्यासमोर रोगी उभा राहुन आपल्या रोगाच्या उपचारासाठी प्रार्थना केली तर काय तो दगड बोलू शकेल? काय अगोदर जीवंत असताना ज्याप्रमाणे औषध सेवन, माहिती तसेच पद्धती सांगु शकेल? नाही, बिलकुल नाही. त्या रोग्यांना त्यासारखाच अनुभवी जीवंत डॉक्टर शोधावा लागेल. दगडाच्या मूर्ति कडून उपचाराची

इच्छा करणारे आपल्या जीवनाबरोबर धोका करतील. ते बिलकुल भोळे किंवा बालबुद्धीचे असू शकतात.

❖ अजून एक विचार करण्यासारखी गोष्ट आहे कि काही जण म्हणतात मूर्तिमध्ये प्राणप्रतिष्ठा केल्यामुळे ती सजीव मानली जाते. जर का मूर्तीत प्राण (जीवन–श्वास) टाकले असतील तर त्या मूर्तिने आपल्यासोबत बोलायला देखिल पाहिजे होते. फिरायला गेली पाहिजे. जेवण सुद्धा करायला पाहिजे. असे तर कोणतीच प्राण प्रतिष्ठित मूर्ति करत नाही. यावरून हेच सिद्ध होते कि ही केवळ एक अंधश्रद्धा भक्ति अतिरिक्त काहीही नाही.

❖ शिव लिंग पूजा :– जे साधक आपल्या धर्मगुरुनी सांगितलेली धार्मिक साधना करतात, ते त्या साधंनेबाबत पुर्णपणे संतुष्ठ आहेत कि ही साधना खरी आहे. त्यामुळे ते अंधविश्वास (Blind Faith) करत आहेत.

या शिवलिंगावर प्रकाश टाकताना मला अत्यंत दू:ख व लाज वाटत आहे. परंतु अंधविश्वास समाप्त करण्यासाठी प्रकाश टाकणे अनिवार्य आहे तसेच मजबूरी देखील आहे.

शिव लिंगाचे (शिवजींचे लघवी करण्याचे इंद्रीय) चित्र बघितल्यानंतर स्पष्ट होते कि शिवाचे लिंग (Private Part) स्त्रिच्या लिंगीत (लघवी इंद्रीय – योनी) प्रविष्ठित आहे. त्याची पूजा हिन्दू श्रद्धाळु करत आहेत.

## शिवलिंगाची पूजा कशी सुरू झाली?

शिव महापुराण {ज्याचे प्रकाशक आहेत ''खेमराज श्रीकृष्णदास प्रकाशन मुंबई (बम्बई), हिन्दी टीकाकार (अनुवादक) आहेत विद्यावारिधि पंडित ज्वाला प्रसाद जी मिश्र} भाग–१, विद्यवेश्वर संहिता अध्याय ५ पान क्रमांक ११ वर नंदिकेश्वर म्हणजे शिवच्या वाहनाने सांगितले आहे कि शिव लिंगाची पूजा कशी सुरू झाली?

❖ विद्यवेशर संहिता अध्याय ५ श्लोक २७–३० :- पूर्वीच्या काळी पहिल्या कल्पामध्ये ज्या लोकामध्ये विख्यात आहेत. त्यावेळी महात्मा ब्रह्मा आणि विष्णु यांचे परस्पर युद्ध झाले.(२७) त्यांच्या अहंकाराला दूर करण्यासाठी त्या दोघांच्या मध्ये निष्कळ परमात्म्याने स्तम्भरूप स्वरुप दाखवले.(२८) त्यावेळेस जगताच्या कल्याणाच्या ईच्छेने तेजोमय निर्गुण शिवाने आपल्या लिंग आकाराचे स्वरुप दाखवले. (२९) त्या दिवसापासून जगामध्ये त्या निष्कळ शिवाचे लिंग प्रसिद्ध झाले (३०).

❖ विद्यवेशर संहिता पान १८ अध्याय ९ श्लोक ४०–४३ :– यामुळे माझे अज्ञात स्वरूप आहे. पाठिमागे तुम्हाला दर्शन देण्यासाठी त्याक्षणापुरता मी सगुण रूपात झालो आहे.(४०). माझ्या ईश्वर रूपाला सकल रूपात जाणा आणि हा निष्कल स्तंभ ब्रह्म बोधक आहे (४१). लिंग रक्षण झाल्यामुळे हे माझे लिंग स्वरूप निर्गुण असेल. त्यामुळे हे पुत्रांनो! तुम्ही याची नित्या अर्चना करा.(४२) हे माझे आत्मरूप आहे आणि यामुळे माझ्या निकटताचे कारण आहे. लिंग आणि लिंगीच्या अभेद मुळे हे महत्व नित्य पूजनीय आहे.(४३)

विवेचन :– हे विवरण शिव महापुराणातून (खेमराज श्रीकृष्णदास प्रकाशन मुंबईतून प्रकाशित) शब्दश: लिहले आहे. यावरून हे स्पष्ट होते कि काल ब्रह्म ने जाणून–बुजून शास्त्रविरूद्ध साधना सांगितली कारण त्याची ईच्छा नव्हती कि कुणी शास्त्रात सांगितल्याप्रमाणे साधना करावी. यासाठी त्याने आपल्या लिंगाची (गुप्तांग) पूजा करायला सांगितली. अगोदर एक तेजोमय खांब ब्रह्मा तसेच विष्णु या दोघांमध्ये उभा केला. नंतर शिव रूपात प्रकट होऊन


आपल्या पत्नीला दुर्गेला पार्वती रूपात प्रकट केले आणि नंतर त्या तेजोमय खांबाला गुप्त केले आणि नंतर आपल्या लिंगाच्या (गुप्तांग) आकाराची दगडाची मूर्ति प्रगट केली तसेच स्त्रीचा गुप्तांगाची (लिंगी) दगडाची मूर्ति प्रकट केली. त्या दगडाच्या लिंगाला दगडाच्या लिंगीत म्हणजेच स्त्री योनीत घालून ब्रह्मा तसेच विष्णुला सांगितले कि हे लिंग तसेच लिंगी अभेद आहेत म्हणजेच या दोघांना अशाच प्रकारे ठेऊन नित्य पूजा करावी.

यानंतर ही बेशरम पूजा एकमेकाचे पाहून पूर्ण हिन्दू समाजात चालू आहे. आपण मंदिरामध्ये शिवलिंगाला पाहा. त्याच्या चहुबाजुने स्त्रि–इंद्रियाचे चित्र आहे ज्यात शिवलिंग प्रविष्ट झालेले दिसते. ही पूजा काल ब्रह्मा ने प्रचलित करून संपूर्ण मानव समाजाला दिशाहीन केले. वेद तसेच गीतेच्या विरूद्ध अशी साधना सांगितली.

आपण वर उल्लेखित शिव पुराण–१ विद्यवेशर संहिताचे पान ११ वर अध्याय ५ श्लोक २७–३० मध्ये वाचले कि शिवाने एक तेजोमय खांब उभा केला होता. नंतर त्या खांबाला गुप्त करून एका दगडाला आपल्या लिंगाचा (गुप्तांग) आकार दिला आणि सांगितलं कि याची पूजा करा. अश्या प्रकारचा बकवास तर पशु चारणारा खोडकर मुलगा, तो गुराखी करत असत तो वादविवादात इतर मुलांना म्हणत असे कि घे माझे हे (गुप्तांग). हीच दशा शिवलिंगाची पुजा सांगणारे काल ब्रह्मची आहे म्हणजे सदाशिवाची जे ब्रह्मा, विष्णु आणि शिवाचे पुज्य पिताजी आहेत.

❖ चेतावणी :– वेळ आहे, आता तरी सावरा. एकदा का हे मानव शरीर निघून गेले तर मग पश्चाताप करून रडण्यावाचून काहींच राहणार नाही. गीता व वेदाचे ज्ञान हे परम अक्षर ब्रह्म ने सांगीतेलेले आहे. त्यामुळे ते प्रमाणित आणि लाभदायक आहे.

आपण पहा हे शिवलिंगाचे चित्र :–




या शिवलिंगाची पूजा अंध श्रद्धावान करतात हे एक लाजेची बाब आहे, परंतु धर्माच्या विरूद्ध देखील आहे कारण कि हे गीता व वेदशास्त्रात लिहिलेले नाही.

याचे खंडन सूक्ष्म वेदात याप्रकारे केलेले आहे. :–

**वाणी :–** धरै शिव लिंगा बहु विधि रंगा, गाल बजावैं गहले।
जे लिंग पूजें शिव साहिब मिले, तो पूजो क्यों ना खैले।।

**शब्दार्थ :–** परमेश्वर कबीरजी समजावले आहे कि तत्वज्ञानहीन मूर्तिपूजक आपल्या साधनेला श्रेष्ठ ठरवण्यासाठी व्यर्थची बडबड करतात म्हणजे गाल वाजवतात म्हणजे व्यर्थ

बडबड करतात ज्याचा काहीच शास्त्रीय आधार नसते. ते जनतेला भ्रमित करण्यासाठी विविध रंग-बिरंगाच्या दगडाचे शिवलिंग ठेवून आपली रोजी रोटी चालवतात.

कबीर जी म्हणतात कि मी त्यांना सांगू इच्छितो कि शिवलिंगाच्या पूजेमुळे तुम्हाला शिव भगवान चे लाभ मिळवू इच्छित असाल तर तुम्ही भ्रमात आहात. जर तुम्हाला अशी लाजिरवाणी साधना करायचीच असेल तर एखाद्या वळूच्या (**Ox = Male Cow**) लिंगाची पूजा करा ज्यामुळे गायीला गर्भ राहील. त्यातुन अमृत दूध मिळते. नांगरण्यासाठी बैल व दूध पिण्यासाठी गाय उत्पन्न होईल अशा प्रकारे प्रत्यक्ष लाभ दिसतो. आपल्याला माहीत आहे कि वळूच्या लिंगापासून किती प्रकारचे लाभ होतात. परंतु तरीही त्याची पूजा करू शकत नाहीत कारण कि हे एक लाजीरवाणे काम आहे.

यावरून हे स्पष्ट होते कि आपण अंध श्रद्धावानांना हे माहीत नाही कि हा दगडाचा शिवलिंग आणि तो कशात प्रविष्ट दाखवलेला आहे, हे काय आहे? जर आपणास हे माहीत असते तर तुम्ही त्याच्याकडे ढुकून सुद्धा बघितले नसते, पूजा करणे तर फार दूरची गोष्ट.

## ''शास्त्रविरोधी साधनेची प्रेरणा देखील काल ब्रह्मच करतो.''

ज्या प्रमाणे लिंगाची (शिवलिंग) पूजा काल ब्रह्मने सुरू केली. त्याचप्रमाणे शास्त्रविधी पासून भ्रमित करण्याचे काम देखील तोच करतो. प्रमाण:-श्री विष्णु पुराण तृतीय अंश अध्याय १७ श्लोक १-४४ आणि अध्याय १८ श्लोक १-३६ मध्ये.

कालाच्या जाळ्याचे अन्य प्रमाण :- श्री विष्णु पुराणाच्या तृतीय अंशात अध्याय १७ श्लोक १-४४ तसेच अध्याय १८ श्लोक १-३६ मध्ये पान क्रमांक १२५-२२१ वर असे लिहिले आहे कि देवता तसेच दानव दोघेही वैदिक धर्मानुसार साधना करायचे. एकदा त्यांचे शंभर दिव्य वर्षापर्यंत युद्धं झाले. देवता पराजित झाल्या. देवांनी क्षीर समुद्राच्या उत्तरीय तटावर जाऊन तपस्या केली आणि भगवान विष्णूच्या आराधनेपोटी स्तवणाचे गाणे केले. देवगण म्हणाले आम्ही लोकनाथ भगवान विष्णूची आराधना करण्यासाठी ज्या वाणीचा उच्चार करत आहोत, त्याने आध्यपुरुष भगवान विष्णु प्रसन्न होवोत. (अध्याय १७/मंत्र ११) तो ब्रह्मस्वरुपास जो निराकार आहे. त्या ब्रह्म स्वरुपाला नमस्कार असो. हे पुरुषोत्तम! आपले जे क्रूरता आणि मायाने घोर तमोमय रूप आहे, त्या राक्षस स्वरूपाला नमस्कार असो.(२०) जो कल्पांता मध्ये समस्त भूतांना अर्थात प्राण्यांना भक्षण करतो, तुझ्या काल स्वरूपाला नमस्कार असो.(२५) जो प्रलय काळात देवांचे व समस्त प्राण्याचे भक्षण करून नृत्य करतो, त्या रुद्र स्वरूपाला नमस्कार असो.(२६) विष्णु पुराण तृतीय अंश अध्याय १७ श्लोक ११ ते ३४ पर्यंतचे स्तोत्र समाप्त झाल्यानंतर देवतांनी श्री हरीला हातात शंख चक्र, गदा घेऊन गरुडावर स्वार होऊन विराजमान झालेले पाहिले.(३५) देवांची प्रार्थना ऐकून भगवान विष्णुंनी आपल्या शरीरातून (वचन शक्तीने) एका मायामोहाला उत्पन्न केले आणि सांगितले कि हा मायामोह दैत्यांना वेदमार्गाच्या साधनेपासून दूर करून मनमुखी साधनेवर आरुढ करेल. त्या कारणाने दैत्य भक्तिहीन होतील, त्यावेळेस तुम्ही देवता त्यांना मारून टाका. असेच झाले, माया मोहने सर्व दैत्यांना (राक्षसांना) वैदिक मार्गाहून विचलित करून मनमुखी साधनेवर आरुढ केले. काही काळानंतर देवांनी तपस्या करून (बॅटरी चार्ज करून) दैत्यांसोबत युद्धं करण्यासाठी उपस्थित झाले. दैत्यांनी तपस्येचा त्याग केला होता त्यामुळे त्यांच्यामध्ये सिद्धी शक्ति राहिली नाही. (त्यांची बॅटरी चार्ज झाली नव्हती) त्या कारणाने देवांनी दैत्यांना मारून टाकले.

उपरोक्त विष्णु पुराणाच्या उल्लेखाचा निष्कर्ष:-

काल ब्रह्मने सर्व प्राण्यांना (देवता, ऋषि, ब्रह्मा, विष्णु, शिव तसेच अन्य प्राणि) भ्रमित केलेले आहे. तो स्वत: आपल्या तीन्ही पुत्रांचे (ब्रह्मा, विष्णु व शिव) रूप धारण करतो. उपरोक्त स्तोत्रात देवतांनी श्री विष्णुंची स्तुति करवायची होती, पण करत आहे काल ब्रह्मची. तो काल ब्रह्मच विष्णुरूप घेऊन गरुडावर बसुन आश्वासन देऊन गेला. आपल्या वचनाने एक व्यक्ति उत्पन्न करून मायामोह नाव ठेऊन राक्षसाकडे पाठवले. जे दैत्यगण तपस्या अर्थात हठयोग करत होते, त्यामुळे त्यांना सिद्धि प्राप्त होत असत. मायामोहने त्यांची ती साधना देखिल सोडवली ज्यामुळे असुरगण सिद्धीरहित झाले. देवतागण देखील या अगोदर दैत्यांसोबत युद्धं करून आपल्या सर्व सिद्धि समाप्त केली होती तसेच पराभूत होवून आपला जीव वाचवुन निघुन गेले होते. त्यांनी परत तपस्या केली व सिद्धि प्राप्त करुन राक्षसां सोबत युद्ध केले तसेच विजय मिळविला. ज्यावेळी देवतागण राक्षसाकडुन हरले होते, त्यावेळी राक्षसगण देखिल तीच साधना (तपस्या अर्थात हठ योग) करत होते जी देवता करत होते. यावरून हेच सिद्ध होते की भक्ति करून देखील देवता, राक्षसांपेक्षा रद्दी (पाठीमागचे) होते कारण की राक्षस सुद्धा तीच भक्ति करुन देवतांवर विजय मिळवायचे जी भक्ति देवतागण करत होते.

वास्तवा मध्ये शास्त्रविधी अनुसार साधना न देवता करायचे न दैत्य. केवळ काल ब्रह्म द्वारा सांगितलेली तपस्या (जी ब्रह्माला कमळफुलावर विराजित असताना त्याच्या जन्माच्या वेळी काल ब्रह्मने आकाशवाणी द्वारा सांगितली होती, ती तपस्या) अर्थात हठ योगास दोन्हीही करत होते. दोघेही सिद्धि प्राप्त करत होते. जसे दारू देवतानी पिली काय अन राक्षसांनी पिली काय, नशा तर दोघांनाही होणार. सिद्धि प्राप्तिंनंतर प्राण्यांना अभिमानाची नशा होते. मग आपापसात एक-दुसऱ्यांवर सिद्धिंचा प्रयोग करून स्वत:चे जीवन नष्ट करतात. हे सर्व काल ब्रह्म द्वारे पसरवलेले भयंकर जाळे आहे ज्याला तत्वज्ञानानेच समजू शकता तसेच या जाळ्यातुन बाहेर काढले जाऊ शकते.

वर्तमानामध्ये असे काही पंथ आहेत जे ना तर तुपाची ज्योति लावू देतात, ना गीता, वेद आणि स्वसंवेदच्या वाणीचा पाठ करायला सांगतात, ना वास्तविक नाम जाप देतात. ते म्हणतात कि संत जे नाम जपायला सांगतात, ते मोक्षदायक आहे. अडीच तास सकाळी तसेच कमीत कमी अडीच तास सायंकाळी हठयोग करायला सांगतात. हा मोक्षमार्ग नाही. हे संत काल ब्रह्म द्वारा मायामोह प्रमाणे पाठवलेले आहेत ज्यांनी ती साधना देखील सोडवली ज्यामुळे स्वर्गापर्यंत जाण्याची भक्ति तर होत आहे. जसे प्रत्येक दिवशी गीता, वेद आणि स्वसम वेद (कबीर वाणी किंवा कबीर परिचित संताची वाणी) वाणीच्या पाठामुळे ज्ञान यज्ञाचे फळ मिळते तसेच देशी तुपाच्या दिव्यामुळे हवन यज्ञाचे फळ मिळते. दंडवत प्रणाम केल्यामुळे प्रणाम यज्ञाचे फळ मिळते. ते नकली पंथ ऐकीव-ऐकून सतलोक-सतलोक म्हणतात परंतु सतलोकामध्ये सतपुरुष निराकार सांगतात. तिथे प्रकाशच प्रकाश,आनंदी ही आनंद आहे. आत्मा देखिल त्या प्रकाशा मध्ये अशी सामावली जाते जसे समुद्रामध्ये थेंब सामावला जातो आहे. असे व्यर्थ ज्ञान अनुयाईंना सांगुन म्हणतात चला सतलोक मध्ये, तेथे आनंदच आनंद आहे. विचार करा कोण्या मुलीला कोणी मूर्ख व्यक्ति म्हणेल कि तुझी सोयरीक अमुक गावात केली आहे. तेथे तुझा पती निराकार आहे. तुझ्या पतीच्या घरात प्रकाशच प्रकाश आहे, पण पती साकार नाही, तिथे तू लग्न करून जा, मुली तिथे आनंदच आनंद आहे. त्या मूर्खाला विचारा कि जर पती साकार नसेल तर त्या कन्येला लग्न करून पतीच्या घरी जायचा काय उत्साह राहील लग्न करणे व बिना पतीच्या घरी जाण्याचा? कसलाच उत्साह असु शकत नाही.

ठीक याच प्रमाणे जे गुरु सत्य पुरुषाला अर्थात परम्यात्म्याला निराकार संबोधतात

तसेच म्हणतात कि प्रभूचा केवळ प्रकाशच पाहता येऊ शकतो. ते भ्रमित करत आहेत. त्यांना काहिही ज्ञान नाही. त्यांना परमात्मा प्राप्ती देखिल झालेली नाही. त्यांना कुणी विचारा कि तुम्ही म्हणता कि सतपुरुषाचा (अविनाशी परमेश्वर) केवळ प्रकाश दिसू शकतो कारण कि सतपुरुष (सच्चा परमेश्वर) तर निराकार आहे. जसे कुणी आंधळा म्हणेल कि सूर्य तर निराकार आहे, पण त्याचा केवळ प्रकाश दिसू शकतो. सूर्याशिवाय प्रकाश कोणाचा दिसला? जर सूर्य निराकार असेल तर प्रकाश काय आहे? याच प्रमाणे जे नेत्रहीन संत, ऋषि, महर्षि परम्यात्म्याला निराकार म्हणतात तसेच परम्यात्म्याला सूर्यासारखा प्रकाशमानही समजतात तसेच परमात्म्याचा प्रकाश दिसला म्हणतात, ते संदिताप झालेल्या तापाच्या रोग्याप्रमाणे बडबडत आहेत, त्यांना हे माहीत नाही कि आपण काय बडबड करतो. ते सर्व कालब्रह्म द्वारे पाठवलेले मोहमाया सारखे भ्रमित करणारे दूत आहेत ज्यांनी भोळ्या भाबड्या आत्म्याना उलटा धडा शिकवुन दिशा भुल केले आहे.

## अन्य अंध-श्रद्धा भक्तीवर प्रकाश

**परमात्मा कबीरांचे शब्द:**

रै भोली-सी दुनिया, सतगुरू बिन कैसे सरियाँ।(टेक)
अपने लला के बाल उतरवावैं, कह कैंची ना लग जईयाँ।
एक बकरी का बच्चा लेकर, उसका गला कटईयाँ।।१।।
काचा-पाका भोजन बनाकर, माता धोकने गईयाँ।
इस मूर्ति माता पर कुत्ता मूतै, वह क्यों ना मर गईयाँ।।२।।
जीवित बाप से लठ्ठम-लठ्ठा, मूवे गंग पहुँचईयाँ।
जब आवै आसौज का महीना, कऊवा बाप बणईयाँ।।३।।
पीपल पूजै जाँडी पूजे, सिर तुलसाँ के अहोइयाँ।
दूध-पूत में खैर राखियो, न्यूं पूजूं सूं तोहियाँ।।४।।
आपै लीपै आपै पोतै, आपै बनावै होईयाँ।
उससे भौंदू पोते माँगै, अकल मूल से खोईयाँ।।५।।
पति शराबी घर पर नित ही, करत बहुत लड़ईयाँ।
पत्नी षोडष शुक्र व्रत करत है, देहि नित तुड़ईयाँ।।६।।
तज पाखण्ड सत नाम लौ लावै, सोई भवसागर से तरियाँ।
कह कबीर मिले गुरू पूरा, स्यों परिवार उधरियाँ।।७।।

**शब्दार्थ :- परमेश्वर कबीर साहेबांनी अंधश्रद्धा भक्ति करणाऱ्या तत्वज्ञानहीन जनतेला त्यांच्या द्वारे केली जाणारी शास्त्र विरूद्ध साधनेला म्हणजे उपासनेला तर्क करुन लाभरहीत म्हणजेच व्यर्थ सिद्ध केले आहे. म्हटले आहे की :-**

**हे भोळी जनता! गुरुशिवाय तुमचे कोणतेही अध्यात्म कार्य सरणार नाही म्हणजेच सिद्ध होणार नाही.**

**वाणी संख्या १ :-** अपने लला के बाल उतरवावैं, कह कैंची ना लग जईयाँ।
एक बकरी का बच्चा लेकर, उसका गला कटईयाँ।।१।।

**भावार्थ :- शास्त्रविधिला त्यागुन मनमानी आचरण करण्यासाठी अज्ञानी गुरुकडून भ्रमित होवून अंध श्रद्धाळु माता आपल्या नवजात बाळाला घेवून त्यांच्या इष्ट देव-देवीच्या मंदिरात जातात. आन-उपासकांद्वारे रचलेल्या शास्त्रविरुद्ध अज्ञान अनुसार नवजात बाळाचे**

डोक्यावरचे पहिल्या वेळेचे केस उतरवतात म्हणजे जावळ काढतात (कापतात). त्या केसांना मंदिरात जावून आपल्या इष्ट देवी-देवतेला अर्पण करतात. असे मानतात कि असे केल्याने इष्ट देवी-देवता प्रसन्न होत आहे तसेच मुलांचे नेहमीसाठी रक्षण करते. केस कापण्यासाठी मंदिरात जत्रेच्या वेळी उपस्थित नाव्हीपाशी लांबच-लांब रांग लागलेली असते. न्हावी लवकरात लवकर उरकण्याच्या नादात जोर जोराने कात्री चालवत असतो. काही-काही बालकाला कात्री लागते देखील. तो मुलगा रडू लागतो. आपल्या मुलाचा केस कापण्यासाठी नंबर आल्याबरोबर त्याची आई सतर्क करते कि हे न्हावी भाऊ! थोड लक्ष देवून कात्री चालव, माझ्या बाळाचे (बालक-मुलगा) कच्चे डोक आहे, कुठे कात्री ना लागेल. मुलाच्या कापलेल्या केसांना कपड्यामध्ये बांधून देवाला अर्पण करण्यासाठी मंदिरात घेवून जाते. पूजारी त्यास सोडून त्यातील केस रिकाम्या कट्ट्यात टाकतो. यात्रा संपल्यावर गोळा झालेले सर्व केस मंदिरापासून दूर कचऱ्याच्या ढिगाऱ्यात टाकून देतो. केस मंदिरात अर्पण केल्यानंतर ईष्टास बकऱ्याचा बळी दिला जातो जो अगोदर पासुनच आपल्या होणाऱ्या बाळाच्या रक्षणासाठी (खैर) संकल्प केलेला असतो.

❖ कबीर परमेश्वर याविषयी एक उत्तम तर्क देवून सांगतात कि हे अंध श्रद्धावान! थोडासा तरी विवेक कर. आपल्या बाळाला कात्री लागण्यापासुन देखिल वाचवत आहे, त्याच्या रक्षणासाठी (खैर) एका निरपराध बकरीच्या मुलाचे मुंडके कापते वेळी देखिल तुला थोडी देखील दया (तरस) आली नाही? परम्यात्म्याचे विधान आहे कि जे पाप केले (बकऱ्याचा बळी दिला) ते तर तुला भोगावच लागेल. ही दगडाची देवी किंवा देव तुझी किंवा तुझ्या बाळाची कसल्याच प्रकारे मदत करणार नाही जे आपणास भ्रम आहे.

विचार करा :- जर खरोखरच त्या मंदिरामध्ये देवी किंवा देव असता आणि आपण त्याच्या घरात कापलेले केस टाकले असते तर या गोष्टीवर आपल्या वर नाराज होवून दंड दिला असता. देवी-देवता सभ्य आणि शाकाहारी नेक प्रवृत्तीच्या असतात. त्या कधी मांस, दारु तसेच नशिल्या पदार्थाचे सेवन करत नाहीत. पूजारी या केसांना फेकून देतात. काय हे केस बँकेत जमा करण्यायोग्य आहेत? त्यापेक्ष्या तुम्ही तुमच्या बाळाचे केस स्वत:च कुण्या न्हाव्याकडून कापून घ्या. कोण्या मंदिरात जाऊन तुमचे धन व कर्म तसेच वेळेची नासाडी करू नका.

पूर्ण गुरु कडून शिक्षण घ्या म्हणजे आध्यात्मिक ज्ञान ऐका आणि दिक्षा ग्रहण करा म्हणजेच पूर्ण गुरुकडून शास्त्र वर्णीत साधना करुन पापांपासून मुक्त व्हा तसेच मोक्ष मिळवा.

**वाणी संख्या २:-** काचा-पाका भोजन बनाकर, माता धोकने गईयाँ।
इस मूर्ति माता पर कुत्ता मूतै, वह क्यों ना मर गईयाँ।।२।।

भावार्थ :- आन उपासनेची एक विधी ही आहे कि गाव किंवा नगराच्या बाहेर कोण्या एका झाडाखाली झाडाच्या खोडाला लागून किंवा कोणत्या उंच ठिकाणी झाडाशिवाय देखिल दहा फुट लांब लचक किंवा यापेक्षा देखिल लहान पार (चबुतरा) म्हणजे प्लॅटफार्म बनवून त्यावर तीन-चार फुट उंच तसेच एक-दीड फुट रुंद एक छोट मंदिरवजा घर बनवतात, त्याला मढी म्हणतात. वर्षातुन एकदा किंवा दोनदा, कोणत्यातरी निश्चित दिवशी त्या धामावर भोग लावण्यासाठी (पूजा करण्यासाठी) आजी आपल्या संपूर्ण परिवारास घेऊन जाते. तिला माहीत असते कि भोजन ईष्ट साठी बनवुन त्या मढीवर ठेवतात, त्यास कुत्रेच खातात. ती वृद्ध आपल्या सुनेला म्हणते कि मुली! आज माताला भोग लावायला मढीवर जायचे आहे. त्यासाठी तू पुरण-पोळी किंवा पुरी-भाजी बनवून घे. सून मातेचा भोग तयार करायला लागते. उशीर तर होतोच आहे. वरुन शेतात किंवा मजुरीसाठी जाण्याची वेळ देखिल होते. म्हतारी म्हणते कि मुली! कच्चे-पक्के बनव, लवकर कर. कुत्र्यांनातर खायचे आहे. संपूर्ण परिवारास

बरोबर घेऊन ती म्हतारी मढीवर तयार केलेला प्रसाद दुरूनच फेकते तसेच संपुर्ण परिवाराला म्हणते कि हात जोडून उभे रहा व चच-चच म्हणा. एका तांब्यात पाणी घेऊन जाते. ते मातेवर टाकते. परिवार मातास भोग चढवून खाली देखिल उतरत नाही, त्याच वेळी कुत्रे जे भोग लावण्यासाठी उताविळपणे (बेताब) उभे असतात, माता च्या मंढीच्या चबुतऱ्यावर चढुन प्रथम तर माता चा भोग चाखतात, जाता जाता त्या मातेवर लघवी करतात. परमेश्वर कबीर जींनी या विषयावर एक उत्तम तर्क दिला आहे कि हे भोळी अंध-भक्ती करणारी जनता! विचार करा, ज्या मंढीवर देवीची पूजा आपण यासाठी करतो कि या मंढीवर उपस्थीत देवी आपल्या परिवाराची तसेच शेतीची आणि पशूंची रक्षा करत आहे. जर त्या मढी मध्ये देवी उपस्थित असती तर तिचे जेवण तर कुत्रा खाऊन गेला, तिच्यावर मूत्राची धार लावुन गेला. तो कुत्र्यास तुझ्या दगडाच्या माताने मारले का नाही? जर आपण भोजन करत आहात आणि कुत्रा येऊन आपले जेवण खाऊ लागला तर तुम्ही त्याला काठीने माराल. जर आपल्यावर मुतला तर तुम्ही त्याची हडडी-पसली एक कराल. परंतु आपली पुज्य देवी तर विवश आहे किंवा तिला आंधळेपणा आला आहे. तिच्यापासून भक्ति लाभाची खोटी आशा सोडून पूर्ण गुरु कडून शास्त्र विधिनुसार सत्य भक्तीची दीक्षा व शिक्षा (ज्ञान) घेऊन आपले तसेच परिवाराचे कल्याण करा.

## ''श्राद्ध, पिंडदान करावे की नाही.''

**वाणी संख्या ३ :-** जीवित बाप से लठ्ठम-लठ्ठा, मूवे गंग पहुँचईयाँ।
जब आवै आसौज का महीना, कऊवा बाप बणईयाँ।।३।।

**भावार्थ :-** परमेश्वर कबीर साहेब लोकवेदावर (दंतकथेवर) आधारित चालु असलेल्या पितर तसेच भूत पूजेवर शास्त्रोक्त तर्क दिला आहे. म्हटले आहे कि शास्त्रोक्त अध्यात्म ज्ञानाच्या अभावाने मुले आपल्या वडीलासंगे कोणत्या न कोणत्या गोष्टीवर विरोध करत असतात. वडीलांना माहित असते कि या कामात मुलाला नुकसान होईल. परंतु पुत्र वडीलांच्या शिक्षणाला कमी आणि बाहेरच्यांच्या शिक्षणाला जास्त महत्व देत असतो. त्याला माहीत नसते कि वडीलासारखे हितचिंतक कुणी असु शकत नाही. मुलगा तारुण्य आणि अज्ञानाच्या नशेमुळे शिष्टाचार विसरुन जातो. बापाला मात्र माहीत असते कि मुलाला या मध्ये नक्कीच तोटा होईल. परंतु पुत्र बापाचे ऐकत नाही. उलट बापालाच चांगले-वाईट बोलतो. बाप आपल्या मुलाचे नुकसान पाहू शकत नाही. तो पुन्हा आपल्या मुलाला आग्रहाने सांगतो कि हे पुत्र! असे करू नकोस. ज्या कारणाने तारुण्याच्या नशेत सभ्यताच्या कमीमुळे इतका निर्लज्ज होऊन जातो, कित्येक मुलांना पाहिले आहे कि ते बापाला काठीने देखिल मारतात. तेच होते ज्याची बापाला आशंका असते. बाप पुन्हा समजावून सांगतो कि पुढे असे करु नको. हे नुकसान हळू हळू भरून येईल. बाप हा बापच असतो. तो आपल्या मुलांना सुखी पाहू इच्छितो. पुढे चालून जो बाप भक्ति करत नव्हता, त्यास वृद्धावस्थेमुळे कोणता न कोणता नक्की रोग होतो. मुले बरीच कमी असतात जे बापाला तेच प्रेम देतात जे प्रेम आई-वडील आपल्या मुलांकडून तसेच सुनेकडून मिळण्याची अपेक्षा करतात. वर्तमानात वृद्धांची परवड कुणापासून लपून राहिलेली नाही. आई-वडील आपले उरलेले दिवस वृद्धाश्रमात किंवा अनाथालयात घालवत आहेत नाहीतर आपल्या घरात मुलं-सुनांचे कडवे बोल पचवून दिवस मोजत असतात. कबीर जींनी म्हटले आहे कि :-

वृद्ध हुआ जब पड़ै खाट में, सुनै वचन खारे। कुत्ते तावन का सुख भी कोन्या, छाती फूकन हारे।।

**शब्दार्थ :-** वृद्धा अवस्थेमध्ये शरीर निर्बल होत असते. डोळ्यांची नजर कमी होते.

ज्यामुळे वृद्ध आई–वडील जास्तीजास्त वेळ पलंगावर घालवतात. एक स्त्री आपल्या सासूबाईला सांगते कि सासूबाई लक्ष असू द्या कि मी पाणी आणायला नळावर किंवा विहीरीवर चालले आहे. एखादा कुत्रा घरात येवून नासधूस करु नये. वृद्धेला कमी दिसत होते. कुत्रा खरोखरच घरात शिरला. एका तांब्या दोन लीटर दूधाने भरलेला होता. त्यास पिवून टाकले व तांब्या लवंडून दिला. वृद्धेला दिसलेच नाही. सून आली आणि कुत्र्याने केलेलं नुकसान पाहुन रागाने म्हणाली कि तुमच्या पासून (सासु–सासऱ्यांचे) तर एवढ ही सुख नाही कि तुम्ही कुत्र्यापासून घराचे रक्षण करू शकाल. तुम्ही माझ काळीज जाळलत म्हणजेच फुकटचा खर्चाचा भार सुनेला पडत होता. त्यामुळे ती असे जळजळीत बोल बोलत होती. सासू–सासऱ्यास व्यर्थचा भार मानत होती. कबीरांनी सांगितले आहे कि अशी दशा त्या व्यक्तीची होते जे परमात्म्याचे स्मरण कधीच करत नाहीत जे गुरु धारण करून सत्य भक्ति करत नाहीत.

आता वाणी क्रमांक ३ चा शब्दार्थ पूर्ण करतो.

अंध श्रद्धा भक्तीवाले जेव्हा आई–वडील जीवंत राहतात, तो पर्यंत त्यांना प्रेम व सन्मानाने अन्न–वस्त्र देखिल देत नाहीत. झीग झीग करतात. (सर्व नाही) मृत्यनंतर मात्र अपार श्रद्धा दाखवतात. त्यांच्या शरीराला अग्नि वर जाळले जाते. काही हाडे न जळालेली छोटे छोटे शिल्लक राहतात. शास्त्र नेत्रहीन गुरुच्या सांगण्यावरून भ्रमित पुत्र त्या हाडांना उचलुन हरिद्वारला हरीच्या पावडी मध्ये टाकण्यासाठी आपल्या कुळातील पुरोहित कडे घेऊन जातात. तिथे पूरोहित त्यांच्या मनमानी शास्त्रविरोधी पूजेद्वारे त्या अस्थिना गंगेत प्रवाहीत करतो. त्यासाठी पूरोहित जी दक्षिणा मागतो, ती त्याला आनंदाने दिली जाते. कारण हेच असते कि वडिल किंवा आई च्या मृत्यु नंतर प्रेत बनून घरी येऊ नयेत. त्यामुळे त्यांची गती करण्यासाठी कुलगुरू पंडित जी दक्षिणा मागेल ती दिली जाते कि पक्के काम करेल. नंतर पुरोहिताचा म्हणण्यानुसार आपल्या घराच्या दरवाज्यावर लोखंडाचा एक मोठा खिळा ठोकला जातो कि जेणे करून आई–वडीलाच्या गती करण्यामध्ये काही त्रुटी राहून गेल्यामुळे ते प्रेत बनून घरात घुसत असतील तर त्यांना घरात घुसता येणार नाही.

कबीर परमेश्वर सांगतात कि वडील जीवंत असताना वेळेवर तुकडा (भाकर) देखिल देत नाही. त्यांचा अपमान केला जातो. (सर्व नाही, जास्तजण) मृत्यूनंतर त्यांच्या अस्थि नदीमध्ये विसर्जन करतात. किती तरी पैसा खर्च करतात. आपल्या आई–वडिलांना जिवंत असताना त्यांची प्रेमाने सेवा करा. त्यांच्या आत्म्याला त्यांना प्रसन्न ठेवा. त्यांची वास्तविक श्रद्धा सेवा तर ही आहे.

कबीर साहेब जे स्पष्ट करु इच्छित आहेत कि आध्यात्मिक ज्ञान नसल्या कारणाने अंधश्रद्धा भक्तीच्या आधाराने सर्व हिन्दू समाज आपले अनमोल जीवन नष्ट करत आहेत. जसे की मृत्यूनंतर आपल्या वडिलांच्या अस्थि गंगा नदी मध्ये पुरोहिताद्वारे क्रिया करुन वडिलांची गती केली.

❖ त्यानंतर तेरवा किंवा सतरावा म्हणजेच मृत्यच्या १३ व्या दिवसानंतर केली जाणारी विधीस तेरावा म्हणतात. १७ दिवसांनंतर केल्या जाणाऱ्या क्रियेस दंतकथेनुसार सतरावा म्हणतात. महिन्यानंतर केली जाणारी मासिक क्रिया तसेच सहा महिन्यांनंतर केल्या जाणाऱ्या क्रियास सहामाही व वर्षानंतर केल्या जाणाऱ्या क्रियेस वर्षश्राद्ध (बरसौदी) म्हणतात. लोकवेद (दंतकथा) सांगणारे गुरुजन वरील सर्व क्रिया करावयास सांगतात. या सर्व क्रिया मृतात्म्याच्या गतीच्या उद्देशाने केल्या जातात.

❖ सूक्ष्मवेदामध्ये या शास्त्र विरुद्ध धार्मिक क्रियांच्या म्हणजेच साधनांवर तर्क याप्रकारे

केला आहे कि घरच्या सदस्याच्या मृत्यूनंतर ज्ञानहीन गुरूजी काय-काय करतात-करवित आहेत :-

कुल परिवार तेरा कुटम्ब-कबीला, मसलित एक ठहराई।
बांध पींजरी (अर्थी) ऊपर धर लिया, मरघट में ले जाई।
अग्नि लगा दिया जब लम्बा, फूंक दिया उस ठांही। पुराण उठा फिर पंडित आए, पीछे गरुड पढाई।
प्रेत शिला पर जा विराजे, पितरों पिण्ड भराई। बहुर श्राद्ध खाने कूं आए, काग भए कलि माहीं।
जै सतगुरू की संगति करते, सकल कर्म कटि जाई। अमरपुरी पर आसन होता, जहाँ धूप न छांई।।

शब्दार्थ :- काही व्यक्ति मृत्यूनंतर वरील क्रिया तर करतातच, त्याच बरोबर गरुड पुराणाचा पाठ देखील करतात. परमेश्वर कबीर जींनी सूक्ष्मवेदात (तत्वज्ञान) वाणीद्वारा स्पष्ट केले आहे कि लोकवेदाच्या (दंतकथेच्या) आधारावर ज्ञानहीन गुरुजन मृतात्म्याच्या शांतीसाठी गरुड पुराणाचा पाठ करतात. गरुड पुराणात एक विशेष प्रकरण आहे कि जी व्यक्ति धर्म-कर्म करत नाही तसेच पाप कर्माद्वारे धनार्जन करते, मृत्युनंतर त्यास यम चे दुत फरफटत नेतात. तांब्याची गरम जमिन असते, अनवाणी पायाने चालवत नेतात. त्याला खूप त्रास देतात. जे शुभ कर्म करून जातात, त्या स्वर्गामध्ये हलवा-खीर खाताना दिसतात. त्या धर्म-कर्महीन व्यक्तिला भूक-तहान सतावते. तो म्हणतो की भूक लागली आहे, भोजन खातो. यमदूत त्याला मारतात. त्याला म्हणतात की तू भोजन मिळण्यासारखे चांगले कर्म तर केलेलं नाहीस. चल तुला धर्मराजाकडे नेतो. तुझ्यासाठी जसा आदेश असेल, तसेच करतील. धर्मराज त्याच्या कर्माचा लेखा बघून म्हणतो कि याला नरकात टाका किंवा प्रेत व पितर, वृक्ष किंवा पशू-पक्ष्याच्या योनी दिली जाते. पितर योनि भूत प्रजाती मध्ये श्रेष्ठ आहे. यमलोकात भूक तहानेने व्याकुळ राहतात. त्यांच्या तृप्ति साठी श्राद्ध करण्याची प्रथा शास्त्रविरुद्ध मनमानी आचरण मुळे सुरु झालेली प्रथा आहे. असे म्हणतात कि एका वर्षातून जेव्हा अश्विन (आसौज) महिना येतो तेंव्हा भाद्रपद (भाद्र) महिन्याच्या पौर्णिमे पासून ते अश्विन महिन्याच्या अमावस्ये पर्यत सोळा दिवस श्राद्ध केले जाते. ज्या तिथीला परिवाराच्या सदस्याचा मृत्यू झाला होता, त्या तिथीला वर्षातून एकदा श्राद्ध केले जाते. ब्राह्मणाला भोजन केले जाते. त्यामुळे यमलोकातील पितरांना भोजन प्राप्त होते. ते एका वर्षापर्यंत तृप्त राहतात. कांही भ्रमित करणारे गुरुजन हे देखील म्हणतात कि श्राद्धाच्या या सोळा दिवसात यमराज त्या पितरांना पृथ्वीवर जायची परवानगी देतात. पितर यम लोकातून (नरकातून) येवून श्राद्धाच्या दिवशी भोजन करतात. ते आपल्याला दिसत नाहीत किंवा आपण त्यांना ओळखू शकत नाही.

❖ भ्रमित करणारे गुरुजन आपल्याद्वारे सांगितलेल्या शास्त्र विरुद्ध साधनेच्या सत्यतेसाठी अशा प्रकारे उदाहरण देतात कि रामायणात एका प्रकरणात असे लिहिले आहे कि वनवासात असताना श्राद्ध चा वेळ आला तर सीतेने देखील श्राद्ध घातले होते. भोजन करते समयी सीतेला रामचंद्राचे वडील दशरथासोबत रघुकुळातील किती तरी आजोबा-पणजोबा दिसले. त्यांना पाहून सीतेला लाज वाटली. त्यामुळे तिने तोंडावर पदर (घुंघट) घेतला.

❖ विचार करा पाठकांनो :- श्री रामचंद्राचे सर्व वंशज प्रेत-पितर बनले तर अन्य सामान्य नागरिक देखील त्याच क्रिया करतात. ते देखील पितर बनून नरकातील पितरासोबत जातील. यामुळे ही शास्त्रविधि विरुद्धची साधना आहे, जी साधना पूर्ण हिन्दू समाज करत आलेला आहे. श्रीमद्भगवत गीता अध्याय ९ श्लोक २५ मध्ये देखील हेच सांगितले आहे कि जे पितर पूजा करतात त्यांचा मोक्ष होत नाही, तर ते यमलोकात पितरांना प्राप्त होतात.

❖ जे भूत पूजा करतात (अस्थि घेऊन पुरोहिताकडून पूजा करून गंगेत प्रवाहीत करणे,

तेरवी, सतरावी, महिना, सहमाहि, वर्षश्राद्ध इत्यादि-इत्यादि) ते प्रेत बनून गया स्थानी प्रेताशीळेवर बसलेले असतात.

❖ काही व्यक्तींना धर्मराज त्यांच्या कर्मानुसार पशु, पक्षी, वृक्ष इत्यादि इत्यादि च्या शरीरात पाठवतात.

❖ परमात्मा कबीर जी समजावतात कि हे भोळ्या प्राण्यांनो! गरुड पुराणाचा पाठ त्याला मृत्युच्या पूर्वी वाचून दाखवायला पाहिजे होता जेणेकरून त्याला परमात्म्याचे विधान समजले असते व तो पाप कर्मापासून वाचला असता. पूर्ण गुरुकडून दीक्षा घेवून मोक्ष मिळवला असता. त्यामुळे तो ना तर प्रेत बनला असता, न पितर, ना पशू-पक्षी वगैरे वगैरेच्या शरीरात कष्ट भोगत असता. मृत्यूनंतर गरुड पुराण पाठाचा काहीही लाभ नाही.

सूक्ष्मवेदात (तत्वज्ञान) तसेच चार वेदात (ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद तसेच अथर्ववेद) आणि चार वेदाचे सारांश असलेल्या गीतेत हे स्पष्ट सांगितले आहे कि वरील प्रमाणे अन्य उपासना करू नये कारण कि तिचे वर्णन शास्त्रात नाही व त्यामुळे ती मनमुखी आचरण आहे जे गीता अध्याय १६ श्लोक २३-२४ मध्ये व्यर्थ सांगितली आहे. शास्त्रोक्त साधना करण्याचा आदेश दिला आहे. सर्व हिन्दू समाज वरिल आन-उपासना करतात ज्यामुळे भक्ति सफल होत नाही. ज्या कारणामुळे ते नरकात जातात तसेच प्रेत-पितर, पशू-पक्षी वगैरे वगैरेच्या शरीरात महाकष्ट भोगतात.

➢ दासाचा (लेखकाचा) उद्देश कोणाच्या साधनेवर टीका करण्याचा नाही आहे, तर तुम्हाला सत्य साधनेचे ज्ञान देवून त्या महाकष्टातून वाचवण्याचा आहे.

प्रसंग चालला आहे कि जे शास्त्र विरोधी साधना करतात, त्यांच्या सोबत मोठा धोखा होत आहे. सांगतात कि;

१. मृताच्या गतीसाठी (मोक्ष) अगोदर तर त्याच्या अस्थि उचलुन गुरुजी द्वारा पूजा करून गंगा नदीमध्ये प्रवाहीत करतात आणि सांगतात कि त्याची गती झाली आहे.

२. त्यानंतर तेरवी, सतरावी, मासिक, सहामाही, वार्षिक वगैरे-वगैरे क्रिया त्यांची गती करण्यासाठी केल्या.

३. पिण्डदान केले गती करण्यासाठी.

४. श्राद्ध घालु लागले, त्यांना यमलोकी तृप्त करण्यासाठी.

❖ श्राद्धात गुरुजी भोजन बनवून सर्वात आधी घराच्या छतावर ठेवतात. कावळा त्या भोजनास खातो. पूरोहित सांगतो कि बघ! तुझे वडील कावळा बनून भोजन करत आहेत. कावळ्याला भोजन मिळाल्यावर श्राद्ध सफल होते असे म्हणतात.

❖ परमेश्वर कबीर साहेबांनी हाच भ्रम तोडला आहे. म्हणाले कि आपल्या तत्वज्ञान नेत्रहीन (आंधळ्या) धर्मगुरूंनी आपल्या धर्म शास्त्रांना नीट समजावून घेतले नाही. लोकवेदाच्या (दंतकथा) आधारे मनमानी साधना करवून घेवून आपले जीवन नष्ट करत आहेत.

कबीरजी म्हणतात कि विचार करा. वरील अनेक प्रकारच्या पूजा मृत वडिलांच्या गती करण्यासाठी, शेवटी कावळा बनवून सोडले. आता श्राद्धांचा आनंद गुरुजी घेत आहेत. ते गुरुजी सुद्धा नरकात किंवा पशू-पक्ष्याच्या योनींना प्राप्त होतील. हा दास (रामपाल दास) परमात्मा कबीरांनी सांगितलेले तत्वज्ञान द्वारा समजुन सत्य साधना शास्त्र विधीनुसार सांगून आपले तसेच आपल्या अज्ञानी धर्मगुरूंचे कल्याण करण्यासाठी हा परमार्थ करत आहे. माझे

अनुयायी याच दलदलीत फसलेले होते. याच तत्वज्ञानाला समजून शास्त्रवर्णित सत्य साधनेला आपल्या डोळ्याने पाहून अकर्तव्य साधनेचा त्याग करुन कर्तव्य शास्त्रोक्त साधना करून आपले तसेच आपल्या परिवाराचे जिवन धन्य बनवत आहे. हे दान देतात. मग या पुस्तकांना छापून आपल्या पर्यंत पोहचवण्यासाठी पुस्तक वाटण्याची सेवा निस्वार्थ ते नि:शुल्क करतात. ते आपले हितैषी आहेत. परंतु तुम्ही पुस्तकांना बरोबर न वाचता त्यांचा विरोध करता, प्रचार कार्यात बाधा उत्पन्न करून पापाचे भागीदार होत आहात. आपण या पुस्तकांना वाचा व शांत मनाने विचार करा तसेच पुस्तकात दिलेल्या शास्त्राचे अध्याय व श्लोकाचा पडताळा करा. त्यानंतर जर चुकीचे भेटले तर आम्हाला सूचित करा, आपल्या शंकेचे समाधान केले जाईल.

❖ श्राद्ध इत्यादी-इत्यादी शास्त्रविरुद्ध क्रिया खोट्या गुरुंच्या सांगण्यानुसार करून आपण आपले जीवन नष्ट करत आहात. जर सतगुरु (तत्वदर्शी संत) चे सत्संग ऐकाल, त्यांची संगती कराल तर पाप नष्ट होतील. सत्य साधना करून अमरलोकी म्हणजेच गीता अध्याय १८ श्लोक ६२ नुसार (शाश्वत स्थान) सनातन परम धामा मध्ये आपले आसन म्हणजेच स्थाई ठिकाणी कसलेच कष्ट असणार नाहीत. त्या ठिकाणी परम शांति आहे कारण तिथे जन्म-मरण होत नाही. गीता अध्याय १५, श्लोक ४ मध्ये सुद्धा ह्या सनातन परम धामास प्राप्त करण्यासाठी सांगितले आहे. त्यासाठी गीता अध्याय ४ श्लोक ३४ मध्ये तत्वदर्शी संताकडून शास्त्रोक्त ज्ञान व साधना मिळवण्याचे सांगितले आहे. तो तत्वदर्शी संत वर्तमानात (एकविसाव्या शतकात) हा दास (रामपाल दास) आहे. या आणि आपले कल्याण करा.

❑ भूत पूजा तसेच पितर पूजा काय आहे? हे आपण या वरती (अगोदर) वाचलेच आहे.

या पूजाच्या निषेधाचे प्रमाण पवित्र गीता शास्त्राच्या अध्याय ९ श्लोक २५ मध्ये लिहलेले आहे जे आपणास अगोदर वर्णन केले आहे कि भूत पूजा करणारे भूत बनुन भुतांच्या समूहात मृत्युनंतर जातात. पितर पूजा करणारे पितर लोकात पितर योनीला प्राप्त करुन पितरांच्या जवळ जातील. मोक्ष प्राप्त प्राणी नेहमीसाठी जन्म-मरणातून मुक्त होतो.

➢ प्रेत (भूत) पूजा तसेच पितर पूजा त्या परमेश्वराची पूजा नाही. त्यामुळे गीता शास्त्रानुसार व्यर्थ आहे.

➢ वेदांमध्ये भूत-पूजा व पितर पूजा म्हणजेच श्राद्ध इत्यादी कर्मकांडास मुर्खाचे काम सांगितले आहे.

❖ पवित्र मार्कण्डेय पुराणातील प्रमाण :-

## ''श्राद्ध-पिण्डदानासंबंधी रुची ऋषिंचे वेदमत''

मार्कण्डेय पुराणात ''रौच्य ऋषिंच्या जन्माची'' कथा येते. एक रुची ऋषि होता. तो ब्रह्मचर्याचे पालन करत वेदांनुसार साधना करत होता. त्याने विवाह केला नाही. रुची ऋषिचे वडील, आजोबा, पणजोबा तसेच पड-पणजोबा हे सगळे पितर (भूत) योनीत भूक-तहानेने व्याकुळ होवून भटकत होते. ज्यावेळी रुची ऋषि ४० वर्षाचे झाले, त्यावेळेस त्यांना या चौघांनी दर्शन दिले तसेच म्हणाले कि बेटा! तू लग्न का बरे नाही केलेस? लग्न करून आमचे श्राद्ध कर. रुची ऋषि म्हणाले की हे पितामहो! वेदामध्ये या श्राद्ध पिंड विधिला अविध्या अर्थात मूर्खांची कार्य असे म्हंटले आहे. तर तुम्ही हे कार्य करण्यासाठी मला का बर सांगता?

पितरांनी ते स्वीकारले आणि म्हणाले कि श्राद्धादी कर्माला वेदात अविदया अर्थात मूर्खाच कार्य म्हटले आहे. नंतर त्या पितरानी त्याला वेदाविरूद्ध ज्ञान सांगून भ्रमित केले,

कारण कि मोह सुद्धा अज्ञानाच मूळ आहे. रुचीला लग्न करायला लावले. नंतर त्याने श्राद्ध-पिंड दानाची क्रिया करून आपले जीवन नष्ट केले.

मार्कण्डेय पुराणाच्या या प्रकरणाने सिद्ध केले कि, वेदात आणि वेदांचे संक्षिप्त रूप गीतेत श्राद्ध-पिंड, भूत पूजेच्या कर्म कांडाचा निषेध केला आहे, ह्या विधी नाही करायला पाहिजे. त्या मुर्ख ऋषिनी श्राद्धविधी साठी आपल्या मुलाला विवश केले. त्याने विवाह केला. त्यातून रौच्य ऋषिच जन्म झाला. मुलगा सुद्धा पापाचा भागी बनला.

रुची ऋषि ब्राम्हण होते. त्यानी, वेदांना योग्यप्रकारे जाणून घेतले होते. आपल्या आत्म्याच्या कल्याणासाठी, शास्त्रविरुद्ध सर्व मनमुखी साधना त्यागून केवळ एका ब्रह्मची भक्ति केली. त्याचे वडील, आजोबा, पणजोबा आणि पड-पणजोबा हे मात्र शास्त्रविरुद्ध मनमुखी साधना करत-करवून घेत होते. त्यामुळे गीता अध्याय ९ श्लोक २५ मध्ये सांगितल्या प्रमाणे कि पितर पुजनारे पितरांना प्राप्त होतात, आणि तसेच झाले होते. आता, वर्तमानातील सुशिक्षित जनतेने अंध-श्रद्धा भक्तीचा त्याग करून, विवेकाने गीता अध्याय १६ श्लोक २४ मध्ये सांगितलेल्या आदेशाचे पालन करायला पाहिजे.ज्यात सांगितले आहे कि हे अर्जुना! तूझ्यासाठी तर केवळ शास्त्र आणि शास्त्रच प्रमाण आहे. म्हणजेच शास्त्रात सांगितल्याप्रमानेच कर. जे शास्त्र-प्रमाणित नाही त्याचा त्याग कर. परम्यात्म्याने सांगितलेले विधान म्हणजे गीता आहे, आणि पुराण म्हणजे ऋषिच्या अनुभवाचा संग्रह. जर पुराणात श्राद्धादी कर्मकांड सांगितले असतील तर ते गीतेच्या विरुद्ध असल्यामुळे अमान्य आहेत.

उदाहरण :- एका व्यक्तीची दोस्ती ठाणेदाराबरोबर होती. एके दिवशी त्याने आपला मित्र ठाणेदाराला सांगितले कि माझ्या गावातील एक गुंड मला परेशान करत आहे. ठाणेदार म्हणाले कि त्याला काठीने मार! कांही झाले तर मी बघून घेईल. त्याची कोर्ट-केस होऊ देणार नाही. त्या व्यक्तीने ठाणेदाराच्या आदेशाप्रमाणे त्या गुंडाच्या डोक्यात काठी मारली, आणि त्यात त्याचा मृत्यू झाला. हत्याची केस ठाणेदाराच्या मित्रावर झाली. ठाणेदार त्या एरियाचा प्रभारी ठाणेदार असल्यामुळे त्याला हत्येचा मुकदमा करावा लागला व त्यात त्याच्या मित्राला मृत्यू-दंडाची शिक्षा झाली.

❖ विचार करा :- राजाचा कायदा म्हणतो कि कुणाशी भांडू नका. कायदेशीर कारवाई करा. त्या मित्राने ठाणेदाराच्या आदेशाचे पालन केले, जे राज्याच्या कायद्याच्या विपरीत होते. ज्याकारणामुळे जीवनापासुन हात धुवुन बसला म्हणजे दंडाचा भागीदार झाला. अगदी त्याच प्रमाणे ऋषिचे पितरांचे श्राद्ध करणे, पिंड्दान इत्यादी करण्याचे आदेश परम्यात्म्याच्या शास्त्रोक्त विधांनाच्या विरुद्ध आहेत. त्याच पालन केल्यामुळे परमात्म्याच विधान भंग होते. ज्यामुळे मोक्ष मिळण्याच्या ठिकाणी भूत, पितर, पशू-पक्षी वगैरेचे शरीर धारण करून अनेक प्रकारचे कष्ट भोगावे लागतात.

## ''मार्कण्डेय पुराणात पितरांच्या दुर्गतीचे प्रमाण''

जिंदा महात्मा अर्थात परमेश्वर कबीर धर्मदासास म्हणाले कि, हे धर्मदास! आपण सांगता कि आपण भूत पूजा (तेरवी, सतरावी वगैरे वगैरे करता तसेच अस्थि विसर्जन देखील करतात) पितर पूजा (श्राद्ध करणे, पिंडदान करणे) तसेच देवांची श्री विष्णु, शिव वगैरे वगैरे ची पूजा देखील करतात. पण गीता ज्ञानदात्याने गीता अध्याय ९ श्लोक २५ प्रमाणे तर या गोष्टीची मनाई केली आहे. संक्षिप्त मार्कण्डेय पुराणात मदालसेच्या प्रकरणात पान ८० वर लिहिले आहे कि, ''जे पितर देवलोकामध्ये आहेत, जे तिर्यग्योनि मध्ये पडलेले आहेत, जे मनुष्य

योनि मध्ये किंवा भूतवर्ग मध्ये अर्थात् प्रेत बनलले आहेत, ते पुण्यात्मा असो किंवा पापात्मा जेव्हा भूख-तहानेने व्याकुळ (तड़फतात) होतात ते पिंडदान तसेच जलदान द्वारा तृप्त केले जातात. **(लेख समाप्त).**

**विचार करा :- शास्त्रविधीचा त्याग करून मनाला वाटेल तसे आचरण अर्थात मनमुखी पूजा करून (देवांची, पितरांची,भुताची पूजा) प्राणि, पितर व भूत (प्रेत) बनले. ते देवलोकात असोत (जे देवतांची पूजा करून देव लोकात जातात ते, त्यांचे पुण्य संपल्यावर पितररूपात राहतात.) वा यमलोकात प्रेत बनून असोत, अत्यंत कष्टमय जीवन व्यतीत करतात. आता त्याची पूजा करणारे सुद्धा त्याच कष्टमय योनीला प्राप्त होणार. त्यामुळे सर्व मानव समाजाने शास्त्रविधिनुसार साधना करावयास हवी ज्यामुळे त्यांच्या पितरांची पितर योनि सुटेल तसेच साधक देखील पूर्ण मोक्ष पदाला जावून मिळेल.**

**श्री विष्णु पुराणाचा तृतीय अंश अध्याय १४ श्लोक १० ते १४ मध्ये श्राद्धाविषयी श्री सनत्कुमार सांगतात कि तृतीया, कार्तिक, शुक्ल नवमी, भाद्रपद कृष्ण त्रयोदशी तसेच माघ महिन्याची अमावस्या या चार तारखा अत्यंत पुण्यदायी आहेत. चंद्र अथवा सूर्य ग्रहणाच्या वेळी तीन अष्टके अथवा उत्तरायण किंवा दक्षिणायनाच्या सुरूवातीस जो पुरुष एकाग्र चित्ताने तिळासहित पाण्याचे दान करतो त्याला जणू एक हजार वर्षापर्यंतचे श्राद्ध केले असे समजा. हे परम रहस्य स्वत: पितर सांगतात. (लेख समाप्त).**

**विचार करा उपरोक्त श्राद्ध विधी पितरांनी सांगितलेली आहे न कि वेदोक्त आणि श्री मदभगवत गीतेच्या आधारे आहे.**

**श्री विष्णु पुराणाचा तृतीय अंश अध्याय १६ श्लोक ११ पान २१४ वर लिहिले आहे** ''क्षीरमेकशफाना यदौष्ट्रमाविकमेव च। मार्ग च माहिष चैव वर्जयेच्छाकर्माणि''।। **या श्लोकाचा मराठी अनुवाद = एक खूर असलेल्या उंटनीचे, बकरीचे, हरणीचे तसेच म्हैसिचे दूध श्राद्धकर्मासाठी वापरु नका.**

**समीक्षा :- वर्तमानात (सन २००६ पर्यत) सर्व व्यक्ति श्राद्धात म्हैसीचे दूध वापरायचे जे कि पुराणा प्रमाणे वर्ज आहे. ज्या कारणाने त्यांच्या द्वारे केलेले श्राद्ध कर्म व्यर्थ झाले. श्री विष्णु पुराणाच्या तृतीय अंशात अध्याय १६ श्लोक १ ते ३ पान २१३ वर (मांसाद्वारे श्राद्ध केल्याने पितरगण नेहमी तृप्त राहतात) लिहिले आहे.** ''हविष्यमत्स्य मांसैस्तु शशस्य नकुलस्य च। सौकरछाग लैणेयरौरवैर्गवयेन च।। (१) और भ्रगव्यैश्चतथा मासवृद्धया पिता महा: (२) खडगमांसमतीवात्रा कालशाकं तथा मधु। शस्तानि कर्मण्यत्यन्ततृप्तिदानि नरेश्वर ।। (३)

**मराठी अनुवाद :-** हवि, मासे (मच्छली) ससा (खरगोश) नकुल, डुक्कर (सुअर), छाग, कस्तूरि हरिण, काळे हरिण, गाय (नील गाय/वन गाय) आंणि म्हैस (भेड़) च्या मांसापासुन गायी (गाय चे तुप, दूध) पासुन पितरगण एक-एक महिना अधिक तृप्त रहतात आणि वार्ध्रीणस पक्ष्याच्या मांसाने सदा तृप्त रहतात. (१-२) श्राद्ध कर्म मध्ये गेड़े चे मांस काळा शाक आणि मधु अत्यंत प्रशस्त आणि अत्यंत तृप्ती दायक आहे.(३) श्री विष्णु पुराण अध्याय २ चतुर्थ अंश पृष्ठ २३३ वर देखिल श्राद्ध कर्म मध्ये मांस प्रयोग प्रमाण स्पष्ट आहे.

**समीक्षा :- उपरोक्त पुराणाच्या ज्ञानानुसार श्राद्ध कर्म केल्यामुळे पुण्या ठिकाणी पापच प्राप्त होईल.**

**काय वरील प्रमाणे मांस द्वारा श्राद्ध करण्याचे आदेश अर्थात प्रावधान न्याय संगत आहे अर्थातच नाही. त्यामुळे पुराणात वर्णन केलेली भक्ति विधी तसेच साधना शास्त्र विरोधी आहे.**

**जी लाभाच्या जागी हानीकारक आहे.**

**विशेष :– उपरोक्त श्लोक १–२ च्या अनुवाद कर्त्याने काही अनुवादास फिरवून लिहिले आहे. मूल संस्कृत भाषेत गायीचे मांस श्राद्ध कर्मात वापरावे असे स्पष्टपणे लिहिले आहे. हिन्दी अनुवाद कर्त्याने गव्य अर्थात गायीच्या मांसाच्या जागी ''गायीच्या तुपाने दुधाने'' असे लिहिले आहे. विचार करा काय हिन्दू धर्मी वरील मांसहाराला श्राद्ध कर्मात समाविष्ट करतील. कधीच नाही. त्यामुळे असे श्राद्ध न करता पूर्ण संतांनी सांगितल्याप्रमाणे श्रद्धापूर्वक धार्मिक अनुष्ठांन केले पाहिजे. ते आहे नाम मंत्राचा जाप, पाच यज्ञ, तिन वेळेची उपासना वाणी पाठ जे हा दास (रामपाल दास) सांगतात. त्यामुळे पितर, प्रेत इत्यादींचे कल्याण होवून उपासक पूर्ण मोक्ष प्राप्त करेल. तसेच त्याचे पितर (पूर्वज) जे भूत आणि पितर योनीत कष्ट झेलत आहेत, त्यांची त्या योंनीतून लगेच सुटका होवून माणूस जन्म मिळून ते सुद्धा या भक्तीला प्राप्त करतील. ज्यामुळे त्यांचा देखील पूर्ण मोक्ष होईल.**

**मार्कण्डेय पुराणात (गीता प्रेस गोरखपुर प्रकाशन) पान ९२ वर श्राद्ध कर्माचे वर्णन या अध्यायात लिहिले आहे कि,** ''जो प्रपितामह च्या वर के तीन पीढ़ी जे नरक मध्ये निवास करतात, जे पशु–पक्षी ची योनि मध्ये पडतात, तसेच जे भूत प्रेत इत्यादी चे रूप मध्ये स्थित आहेत त्या सर्वांची विधि अगोदर श्राद्ध करणारा यजमान तृप्त करतो. पृथ्वी वर जे अन्न बिखेरले आहे (श्राद्ध कर्म करते वेळी) त्यापासुन पिशाच योनि मध्ये पडलेल्या पितरांची तृप्ति होती आहे. स्नान च्या वस्त्रापासुन जे जल पृथ्वी वर टपकते आहे, त्यापासुन वृक्ष योनि मध्ये पडलेलें पितर तृप्त होतात. आंघोळीच्या वेळी आपल्या शरीर पासुन जे जल चे कण पृथ्वी पर पडते आहे त्यापासुन त्या पितरांची तृप्ति होती आहे जे देव भावास प्राप्त झाले आहेत. पिण्डांना उचलण्यामुळे जे अन्न चे कण पृथ्वी वर पडतात, त्यापासुन पशु–पक्षी ची योनि मध्ये पड़लेले पितरांची तृप्ति होती आहे. अन्यायोपार्जित धनापासुन जे श्राद्ध केले जाते, त्यापासुन चाण्डाल इत्यादी योनिंमध्ये पडलेल्या पितरांची तृप्ति होती आहे.

**विचार करा :– उपरोक्त योनीमध्ये आपले पूर्वज पडले आहेत. त्याचे मुळ कारण आहे त्यांनी शास्त्रविधीनुसार भक्ति केली नाही. पवित्र गीता आणि वेदांमध्ये वर्णित विधीनुसार साधना केली असती तर वरील प्रकारच्या महाकष्टदायक योनीमध्ये पडले नसते. माझी या दासाची (लेखक–रामपाल दास) सर्व मानव समाजाला हात जोडून विनंती आहे कि आता तरी जागे व्हावे मागे ज्या चुका झाल्या आहेत त्याची पुनरावृत्ती नको. जी साधना हा दास (रामपाल दास) सांगतो त्यामुळे आपले पूर्वज (सात पिढी पर्यंतचे) जे कोणत्याही योनीत असतील (पितर, भूत, पिशाच्च, पशू, पक्षी, वृक्ष वगैरे वगैरे ) त्या सर्वांची वर्तमानातील योनी सोडवुन लगेच मानव जन्म मिळेल. नंतर ते माझ्याकडून (रामपाल दास) भक्ति साधना प्राप्त करुन जर मर्यादापूर्वक आजीवन भक्ति करीत राहिले तर पूर्ण मोक्ष प्राप्त करतील. हेच प्रमाण कबीर परमेश्वर द्वारा दिलेल्या तत्वज्ञानास संत गरीबदासजी खालील प्रमाणे सांगतात :–**

अग्नि लगा दिया जद लम्बा, फूंक दिया उस ठाई। पुराण उठाकर पण्डित आए, पीछे गरूड़ पढ़ाई।।
नर सेती फिर पशुवा किजे गधा बैल बनाई, छप्पन भोग कहा मन बौरे किते कुरड़ी चरने जाई।
प्रेत शिला पर जाय विराजे पितरों पिण्ड भराई, बहुर श्राद्ध खाने को आऐ काग भए कलि माहीं।
जै सतगुरू की संगत करते सकल कर्म कट जाई। अमर पुरी पर आसन होते जहाँ धूप ना छांई।

**वरील वाणी पाचव्या वेदाची (सूक्ष्म अर्थात स्वसम वेद) आहे ज्यामधे स्पष्ट केले आहे कि पितर वगैरेचे पिंड दान करून अर्थात श्राद्ध कर्म करून सुद्धा प्राणी जर पशू–पक्षी**

आणि भूत–प्रेताच्या योनीत पडत असतील तर ते श्राद्धकर्म काय कामी आले? पुढे म्हंटले आहे कि जर सतगुरु (तत्वज्ञानदाता तत्वदर्शी संत) ची संगत केली असती अर्थात त्यांनी सांगितलेल्या भक्ती साधना केली असती तर सर्व पाप कर्म कटले असते. न पशू बनले असते, न पक्षी, ना पितर बनले असते, न प्रेत. सरळ सतधामात (शाश्वत स्थान) गेले असते जिथे गेल्यानंतर परत माघारी या संसारातील कुठल्याच योनीत आले नसते. (प्रमाण गीता अध्याय ४ श्लोक ३४ अध्याय १५ श्लोक १–४ तसेच श्लोक १६–१७ आणि अध्याय १८ श्लोक ६२ मध्ये व अध्याय ९ श्लोक २५ मध्ये)

❖ पुराणात लिहिले आहे (जो ऋषिचा अनुभव आहे) कि पितर धन देतात, पुत्र देतात. रोग नष्ट करतात वगैरे वगैरे .

विचार करा :– पितर स्वत: भूक तहानेने व्याकुल झालेले यमलोकात (नरक लोकात) कष्ट झेलतात. आपली तहान भुक भागवण्यासाठी तुम्हाला श्राद्ध करायला सांगतात भ्रमित ज्ञानाच्या आधारे ते काय तुम्हाला सुखी करणार, ही गोष्ट न्यायसंगत नाही. आपले धर्मगुरु हे सुद्धा सांगतात कि नशिबात जे लिहिले आहे त्याचीच प्राप्ती प्राण्याला होते. त्याच्या मध्ये जरा सुद्धा परिवर्तन होत नाही. परंतु खरे हे आहे कि जर साधक पूर्ण परमात्म्याची सत्य साधना करत असेल तर परमात्मा भाग्या व्यतिरिक्त वेगळे देऊ शकतो. अन्य कुणा देवी–देवतांना किंवा पितरांना हा अधिकार नाही. गीता अध्याय ७ श्लोक १२–१५ तसेच २०–२३ मध्ये तर तीन देवांची (श्री ब्रह्मा रजगुण, विष्णु सतगुण तसेच श्री शिव तमोगुण) ची भक्ति करणे देखील निषिद्ध सांगितले आहे. हिन्दू हे ब्रह्मची साधना न करता उपरोक्त देवतांची किंवा अन्य देवतेची पुजा करतात. यांची पूजा करणाऱ्यांना राक्षस स्वभावी, मनुष्यात नीच व दूषित कर्म करणारे मूर्ख संबोधले आहे. तुम्ही विचार करा कि पितर कोणत्या खेतातील मुळी आहेत? पितर साधकास धन, पुत्र वगैरे वगैरे देतील, ही तर फारच दूरची गोष्ट आहे.

## ''प्रभु कबीरजी द्वारा श्राद्ध भ्रम खंडन''

एका वेळी काशी नगरात (बनारस) गंगा नदीच्या काठावर काही पंडित श्राद्धाच्या दिवसात आपल्या पितरांना जल दान करण्याच्या उद्धेशाने लोट्यात गंगा जल भरून रस्त्यावर उभे राहुन सकाळच्या वेळी सूर्याकडे तोंड करून लोट्यातून पाणी जमिनीवर टाकत होते. परमात्मा कबीर जीनी ते पाहिल आणि विचारले कि हे तुम्ही कोणत्या उद्देशान करत आहात? पंडित म्हणाले कि आम्ही आमच्या पूर्वजांना जे पितर बनून स्वर्गात राहत आहेत, त्यांना जल दान करत आहोत. हे जल आमच्या पितरांना प्राप्त होईल. हे ऐकून व त्यांचा अंधविश्वास घालवण्यासाठी परमेश्वर कबीर जी गंगा नदीत गुडघाभर पाण्यात उतरले आणि आपल्या दोन्ही हातांनी पाणी सूर्याकडे पटरीच्या दिशेने जोर–जोरात फेकु लागले. त्यांना तसे करताना पाहून शेकडो पंडित तसेच शेकडो नागरिक तिथे गोळा झाले. पंडितांनी विचारले कि कबीरजी! आपण ही कोणती कर्मकांडाची क्रिया करत आहात? या पासून काय लाभ होईल? हे तर कर्मकांडात लिहिलेले नाही.

कबीरजी नी उत्तर दिले कि येथून एका मैलावर (दीड किलोमीटर) माझ्या झोपडी समोर एक बगीचा लावलेला आहे. त्याला पाणी देण्यासाठी ही क्रिया करत आहे. हे पाणी माझ्या बागेत सिंचन करत आहे. हे ऐकून सर्व पंडित हसू लागले आणि म्हणाले हे कधीच शक्य होऊ शकत नाही? एक मैल दूर पाणी कसे काय जाईल? हे तर इथेच वाळूत जिरत आहे. कबीरजी म्हणाले कि जर तुम्ही दिलेल पाणी करोडो मैलावर असलेल्या स्वर्गात जात असेल

तर मी दिलेले पाणी एका मैलावर असलेल्या बगीच्यात जाण्यावर कोणती आश्चर्याची गोष्ट आहे? ही गोष्ट ऐकून पंडितजींनी समजून घेतले कि आपण जी क्रिया कर्म करतो ते व्यर्थ आहे. कबीरजींनी एक तास तेथे रस्त्यावर उभे राहुन कर्मकांड म्हणजेच श्राद्ध व अन्य क्रियावर सटिक तर्क केला आहे. आपण एकीकडे म्हणता कि आमचे पितर स्वर्गात आहेत. दुसरीकडे असे ही म्हणतात कि, त्यांना पिण्याचे पाणी मिळत नाही. ते तिथे तहानलेले आहेत. सूर्याला अर्ध्य देवून त्यांना पाणी पार्सल करत आहात. जर स्वर्गात पिण्याच्या पाण्याचा अभाव असेल तर त्याला स्वर्ग नाही म्हणु शकत. ते तर वाळवंट आहे. वास्तवात पितरगण यमराजाच्या ताब्यात कारागृहात अपराधी म्हणून टाकले जातात. त्या ठिकाणी जो आहार निर्धारित आहे, तोच सर्वांना दिला जातो. जेव्हा पृथ्वीवर बनलेल्या कारागृहात देखील कुणी कैदी उपाशी पोटी राहत नाही. सगळ्यांना जेवण–पाणी दिले जाते तर यमलोकांच्या कारागृहात जो निरंजन काल राजाने बनवलेला आहे, त्यामध्ये देखिल भोजन पाण्याचा अभाव नाही.

काही पितरगण पृथ्वीवर फिरण्यासाठी यम राजाची आज्ञा घेवून पैरोल वर येतात. ते चटोऱ्या जिभेचे असतात. त्यांना कारागृहाचे सामान्य जेवण चांगले लागत नाही. ते सुद्धा मानव असताना ह्याच भ्रमात अंधभक्ति करत होते कि श्राद्धामध्ये एका दिवसाच्या श्राद्ध कर्मामुळे पितरगण एका वर्षासाठी तृप्त होतात. त्याच आधारावर रुची ऋषिच्या चार पूर्वजांनी पेरोलवर येवून काळाच्या प्रेरणेने, रुची ऋषिना भ्रमित करून वेदांनुसार शास्त्रोक्त साधना सोडवुन विवाह करूवुन श्राद्ध इत्यादी शास्त्रविरुद्ध कर्मकांडासाठी प्रेरित केले. त्या चांगल्या ब्राह्मणाला पितर बनवून सोडले. पृथ्वीवर येवून पितर रूपी भूत कोण्या व्यक्तीक (स्त्री–पुरुषात) प्रवेश करून भोजनाचा आनंद घेतात. इतरांच्या शरीरात प्रवेश करुन जेवण करतात. भोजनाच्या सूक्ष्म वासनेने त्यांचे सूक्ष्म शरीर तृप्त होते. पण एका वर्षासाठी नाही. जर कुणी वडील, आजी–आजोबा, आई वगैरे वगैरे कोण्या पशूच्या शरीरास प्राप्त झाले असतील तर त्यांना कसली तृप्ति? त्यांना तर चांगला दहा–पंधरा किलो चारा खाण्यासाठी पाहिजे. कुणी श्राद्ध करणारा गुरु–पूरोहित भुसा खाताना पाहिला काय. आवश्यक नाही कि सर्वांचेच आई–वडील, आजी–आजोबा इत्यादी–इत्यादी पितरच बनले असतील. काहींचे पशू–पक्ष्याच्या व अन्य योनीला देखील प्राप्त होतात. परंतु श्राद्ध सर्वांचेच केले जाते. याला म्हणतात अंध श्रद्धा भक्ति.

## ''श्री नानकजी द्वारा श्राद्ध भ्रम खंडन''

❖ अन्य उदाहरण :– सिक्ख धर्माचे प्रवर्तक श्री नानकदेव साहेब यांच्या जीवनातील अशी एक घटना आहे ज्याचे वर्णन करत आहे जे पवित्र पुस्तक ''भाई बाले वाली जन्म साखी श्री नानक देव'' मध्ये लिहिलेले आहे ज्याचे हेडिंग आहे ''आगे साखी दुनिचन्द खत्री नाल होइ''।

संक्षिप्त प्रकरण या प्रमाणे आहे :–

❖ श्री नानक जींना परमात्मा (परम अक्षर ब्रह्म) बेई नदीच्या किनाऱ्यावर त्यावेळी भेटले होते, ज्यावेळी श्री नानकजी सुलतानपुर शहरात नेहमीप्रमाणे सकाळच्या वेळी बेई नदीवर स्नानास गेले होते. अन्य नगरवासी सुद्धा स्नान करत होते. त्यावेळी परमेश्वर कबीरजी जिंदाबाबाच्या रूपात आले आणि नानकजी बरोबर नदीमध्ये स्नानास उतरले. अन्य उपस्थित व्यक्ति पाहत होते. दोघांनी पाण्यात डुबकी मारली, परंतु ते बाहेर आले नाहीत. दोघांनाही नदीत बुडाले असे समजण्यात आले. परमेश्वर कबीरजींनी नानकांच्या आत्म्याला (शरीरास दूर जंगलात सोडून) आपल्याबरोबर आपल्या निवास स्थानी सत्यलोकत (सचखण्ड) घेवून गेले.

तीन दिवसापर्यंत त्यांना काल ब्रह्मचे एकविस ब्रह्मांडे, अक्षर पुरुषाचे सात शंख ब्रह्मांडे तसेच आपल्या सतलोकातील असंख्य ब्रह्मांडाची स्थिति डोळ्यांनी दाखवली, यथार्थ आध्यात्मिक ज्ञान सांगितले तसेच यथार्थ मोक्षमंत्र सतनाम (जो दोन अक्षराचा आहे ज्यात एक ॐ आहे तसेच दूसरा गुप्त आहे जो उपदेश घेणाऱ्यालाच सांगितला जातो) मुळे मुक्ति होते असे सांगितले. नंतर एक नाम (सारनाम) जे मानवाच्या मोक्ष साधनेमध्ये आहे, त्याच्याशी परीचित केले तसेच सतनाम व सारनाम कलियुगाचे पाच हजार पाचशे पाच (५५०५) वर्षे संपे पर्यत गुप्त ठेवण्याचा आदेश दिला. श्राद्ध-पिंडदान इत्यादि कर्मकांडास व्यर्थ सांगितले आणि स्वर्ग-नरक सुद्धा दाखवले. तिसऱ्या दिवशी नानकजीच्या आत्म्याला त्यांच्या शरीरात सोडून अंतर्धान पावले. त्यानंतर नानक साहेबानी आपल्या दोन शिष्याला ''भाई बाला तसेच मर्दाना'' या दोघांना सोबत घेवून प्रभू कडून मिळालेले यथार्थ ज्ञान व स्वत: डोळ्यांनी पाहिलेली वरच्या लोकांची व्यवस्थेचा प्रचार करण्यासाठी विविध देश-परदेशात बारा वर्षे भ्रमण केले. त्या दरम्यान ते दुनिचन्द खत्री नावाच्या एका श्रीमंत व्यक्तीकडे त्याने प्रार्थना केली म्हणून गेले. त्यादिवशी दुनिचन्द खत्रीनी आपल्या वडिलांचं श्राद्ध घातले होते. कितीतरी ब्राह्मणांना जेवण घातले होते तसेच वस्त्र व  हजारो रुपयाची दक्षिणा दिली होती. नानकजी म्हणाले कि हे दुनिचन्द! आज कोणत्या गोष्टीसाठी एवढे पक्वान्न बनवले. दुनिचन्द म्हणाले कि महाराज आज माझ्या वडिलाचं श्राद्ध आहे. नानकजीनी विचारले कि आता वडील कुठे आहेत? दुनिचन्द म्हणाले कि ते स्वर्गवासी झालेले आहेत. श्राद्ध केल्यामुळे त्यांना वर्षभर भूक लागणार नाही. हे ऐकून नानकजी म्हणाले कि हे दुनिचन्द! तुम्हाला तुमच्या अज्ञानी गुरूंनी भ्रमित केले आहे. तुझे वडील तर एक वाघ बनून त्या जंगलात एका झाडाखाली भुकेने व्याकुळ होवून बसले आहेत. तुला माझ्या बोलण्यावर विश्वास नसेल तर तू स्वत: पडताळणी करू शकतोस. तू एका व्यक्तीचे भोजन तयार कर त्या जंगलात घेवून जा. तुझी दृष्टी पडताच माझ्या आशीर्वादाने त्या वाघास मनुष्य बुद्धि येईल. दुनिचन्दाचा नानकजी वर पूर्ण विश्वास होता कि त्यांनी जे सांगितले ते सिद्ध होणार. लोक म्हणतात कि या महात्म्यात मोठी शक्ति आहे.

दुनिचन्द शेठने एका व्यक्तीचे भोजन जे श्रध्दानंतर उरले होते सोबत घेतले व सांगितल्या प्रमाणे जंगलात झाडाखाली जिथ वाघ बसला होता तेथे पोहाचला. दुनिचन्दास बघून तो वाघ आपली शेपूट कुत्र्यासारखी हलवू लागला हे दर्शवण्यासाठी कि जवळ ये मी तुला कसलीच हानी करणार नाही. दुनिचन्दानी ती भोजनाची थाळी त्या वाघासमोर जमिनीवर ठेवली. त्या वाघाने संपूर्ण भोजन खाल्ले. दुनिचन्दानी विचारले कि पिताजी तुम्ही तर बरेच धर्म-कर्म करीत होतात नेहमी शाकाहारी राहिलात. मग अशी दशा का बर झाली? श्री नानक साहेबांच्या कृपेने वाघ बोलू लागला. म्हणाला कि बेटा! ज्या वेळेस माझा प्राण बाहेर पडत होता त्या वेळेस आपल्या बाजूच्या घरात मांस शिजवले जात होते. त्याचा वास माझ्यापर्यंत आला व माझी मांस खाण्याची इच्छा झाली. त्याच वेळी माझा प्राण बाहेर पडला. त्या कारणाने मला हा वाघाचा देह प्राप्त झाला. बेटा दुनिचन्द! तू कुण्या पूर्ण संताकडून दीक्षा घेवून आपल्या जीवनाचे कल्याण कर. मानव जीवन बऱ्याच प्रयत्नाने मिळते. असं म्हणून तो वाघ जंगलाकडे निघून गेला. दुनिचन्दानी त्या सर्व अज्ञानी गुरूंना धिक्कारल, जे सर्वांना भ्रमित करत होते. त्याला आता विश्वास पटला कि श्राद्ध केल्यामुळे मृत व्यक्तिला कसलाच लाभ होत नाही. घरी येवून त्याने नानकजीचे पाय धरले आणि आपल्या कल्याणासाठी यथार्थ भक्तीचे ज्ञान आणि मंत्र घेऊन आजीवन त्याचे स्मरण केले तसेच जी शास्त्रविरूद्ध साधना होती तिचा त्याग केला. मानव जीवन सफल केले.

❖ अन्य उदाहरण :-

## ''संत गरीबदासजी द्वारा श्राद्ध भ्रम खंडन''

संत गरीबदासजींना (गाव-छुडांनी, जिल्हा-झझजर, प्रांत-हरियाणा) देखील श्री नानकजी प्रमाणे ते दहा वर्षाचे असताना सन १७२७ मध्ये (विक्रम सवंत १७८४) नला नावाच्या शेतात जिंदाबाबाच्या वेश्यात परम अक्षर ब्रह्म भेटले होते. त्यावेळेस छुडांनी गावाच्या दहा-बारा व्यक्तींनी जिंदाबाबाला पाहिले, त्यांच्याशी बोलले देखील होते. इतर सर्व व्यक्ती आपआपल्या कामाला लागले. बालक गरीबदासजींच्या आत्म्याला काढून परमात्मा सतलोकात गेले. वरच्या सर्व लोकांचे अवलोकन करुन सर्व यथार्थ अध्यात्मिक ज्ञान सांगुन जवळपास ८-९ तासानंतर शरीरात प्रविष्ट केले. बालक गरीबदास जींना मृत समजून चितेवर ठेवले होते. अग्नि देणार होते. त्याच वेळी गरीबदास चितेवरून उठले आणि आपल्या घराकडे निघाले. परमेश्वर कबीर जींनी त्यांना यथार्थ ज्ञान दिले. पुढे त्यांचे बरेच शिष्य झाले. गाव छुडांनी च्या एका भक्ताला संत गरीबदासाच्या गोष्टीवर विश्वास नव्हता कि श्राद्ध केल्यानंतर ते मृतात्म्यास मिळत नाही. श्राद्धाच्या दिवसात दोन्ही आई वडिलांचे श्राद्ध लागोपाठ दोन दिवस केले. पहिल्या दिवशी आईचे आणि दुसऱ्या दिवशी वडिलांचे श्राद्ध केले. गरीबदास जी म्हणाले कि हे भक्ता! तुझे आई वडील तर तुझ्या शेतातील जोहडीत (शेतातील छोटेसे तळे/पाणवठा) भुकेपोटी रडत आहेत. आपण दोन व्यक्तीचे भोजन घेवून माझ्याबरोबर चला. तो भक्त अतिशीघ्रतेने श्राद्धात उरलेली खीर आणि दोन व्यक्तिला पुरेल इतके अन्न (रोटी) घेवून संत गरीबदासजी सोबत गेला. त्यांच्या शेतात तयार केलेल्या जोहडीच्या जवळपास २०० फुट अंतरावर उभे राहुन संत गरीबदासजींनी आवाज दिला कि हे फतेहसिंग व दयाकौर (काल्पनिक नावे) इकडे या. तुमच्या पुत्राने तुमच्यासाठी भोजन आणले आहे. त्याच वेळेस झाडीतून एक गिधाड व एक गिधाडी बाहेर आले. अगोदर त्यांनी वर तोंड करून आवाज काढला. नंतर पळत-पळत गरीबदास जी जवळ आले. दोघांच्या समोर खीर-रोटी ठेवली. लवकर लवकर खाऊन पळाले. त्या दिवशी त्या भ्रमित भक्ताचे अज्ञान भंग झाले. तो दररोज दोन व्यक्तीचे भोजन जसे जमेल तसे, जोहाडीच्या झाडाजवळ ठेवत होता व ते दोन गिधाड दररोज जेवण करू लागले. काही वर्षानंतर त्यांचा मृत्यू झाला. ते पाहून गावातील अन्य लोक त्या भक्ताची खिल्ली उडवायचे. म्हणायचे कि तुला गरिबूने (संत गरीबदासजींना गावातील लोक गरीबा-गरीबु इत्यादी इत्यादी अपभ्रंस नावाने बोलत होते) बहकवले आहे. तू श्राद्ध करत नाहीस, मोठे नुकसान होईल. परंतु त्या भक्ताचा अटल विश्वास झाला होता. आजीवन मर्यादेत राहून साधना करुन जीवन सफल केले. जीवनात कसल्याच प्रकारचे नुकसान झाले नाही, याउलट अद्भुत लाभ झाले. धनी झाले. शेकडो गाई घेतल्या. मोठ घर बनवलं. काही वर्षानंतर त्यांच्या मुलांनी देखिल दीक्षा घेतली. सुखी जीवन जगले.

❖ अन्य उदाहरण :-

## ''लेखक (रामपाल दास) द्वारा श्राद्ध भ्रम खंडन''
## ''सत्य कथा''

माझे पूज्य गुरुदेव श्री रामदेवानन्द जी गाव-बडा पैंतावास, तालुका-चरखी दादरी, जिल्हा-भिवानी, (प्रांत-हरियाणा) येथील निवासी होते ते जवळपास सोळा वर्षाचे असताना परमात्मा प्राप्ती साठी अचानक घर सोडून निघून गेले. दररोज परिधान करत असलेल्या अंगावरच्या वस्त्राला आपल्या शेतीच्या जवळच्या घनदाट जंगलात कोण्या मृत पशूच्या हाडाशेजारी टाकून निघून गेले. संध्याकाळी घरी न आल्यामुळे घरच्यांनी जंगलात तपास केला. रात्रीची

वेळ होती. कपडे ओळखून दू:खी मनाने पशूच्या हाडाला मुलाची हाडे समजून उचलून आणले आणि विचार केला कि मुलगा जंगलात गेला होता, कोण्या हिंसक पशुने खाल्ले. अंतिम संस्कार केले. सर्व क्रिया केल्या, तेरवी–वर्षश्राद्ध वगैरे वगैरे तसेच दर वर्षी श्राद्ध देखील घालत राहिले. जवळपास १०४ वर्षाचे आयुष्य झाल्यानंतर स्वामीजी अचानक आपल्या गावात बडा–पैतावास, तालुका चरखी–दादरी, हरियाणा मध्ये पोहचले. स्वामीजींचे लहानपणीचे नाव श्री हरिद्वारि जी असे होते तसेच जन्म पवित्र ब्राह्मण कुळात झालेला होता. मुझ दासाला कळल्यानंतर मी देखील दर्शनार्थ तेथे पोहोचलो. स्वामीजींच्या वहिनी जवळ–जवळ ९२ वर्षाच्या होत्या. मी त्या वृद्धास विचारले कि आमचे गुरुजी घर सोडून गेल्यानंतर तुम्हाला कसे वाटले? त्या वृद्धा ने सांगितले कि ज्या वेळेस माझे लग्न झाले होते त्या वेळेस मला सांगण्यात आले कि यांचा एक भाऊ हरिद्वारी होता ज्याला हिंसक पशुने जंगलात खाल्ले होते. त्यांचे श्राद्ध घालत आहोत. मला देखील त्यांचे श्राद्ध घालायला सांगितले होते. त्या वृद्धेने सागितले कि जवळपास ७० श्राद्ध तर मी माझ्या हाताने घातले. ज्या ज्या वेळी पीक चांगले यायचे नाही किंवा घरातील कोणी आजारी पडायचा त्या वेळी आमचे पूरोहित सांगत असे कि हरिद्वारी पितर बनला आहे, तो तुम्हाला दु:खी करतो. श्राद्ध करण्यात काही अशुद्धी राहिली आहे. यावेळेस सर्व क्रिया मी स्वत: माझ्या हाताने करीन. अगोदर मला वेळ मिळला नव्हता कारण एकाच दिवशी बऱ्याच ठिकाणी श्राद्धासाठी जावे लागायचे. त्यामुळे मुलाला पाठवत होते. तो पर्यंत काही भेट चढावा ज्यामुळे त्याला शांत करण्यात येईल. त्यावेळेस त्यांना २१ किंवा ५१ रुपये जे ते म्हणतील, भीतीने भितीने भेट करत असत. नंतर श्राद्धाच्या वेळी गुरुजी स्वत: श्राद्ध करायचे. तेव्हा मी त्यांना म्हणालो माताजी आता तरी सोडा या गीतेविरुद्धच्या साधनेला, नाहीतर तुम्ही देखील प्रेत बनाल. गीता अध्याय ९ श्लोक २५ ऐकवला. त्यावेळेस ती वृद्धा म्हणायला लागली कि गीता तर मी देखील वाचते. दासाने म्हटले कि तुम्ही वाचले, समजले नाही. आता या पुढे ही साधना बंद करा. तेव्हा वृद्धा म्हणाली नाही बाबा, कसे सोडु श्राद्ध करणे, ही तर वर्षानुवर्षाची जुनी परंपरा आहे. पाठक हो! हा दोष भोळ्या आत्म्याचा नाही. हा दोष मूर्ख गुरूंचा (निम हकीम) आहे ज्यांनी आपल्या पवित्र शास्त्रांना न समजता मनमानी आचरण (पूजेचा मार्ग) सांगितले. ज्यामुळे ना तर कोणते कार्य सिद्ध होते, ना परमगती तसेच ना तर कोणत्या सुखाची प्राप्ती होते. (प्रमाण :– पवित्र गीता अध्याय १६ श्लोक २३–२४).

शंका प्रश्न :– जर कोणाचे माता–पिता भुखेले आहेत, हे पाहुनही त्यांची ईच्छा पुर्ण करणार नाही तो मुलगा नाही.

शंका समाधान :– एखाद्याचा मुलगा विहरीत पडला आणि ओरडू लागला मला वाचवा, मला वाचवा, अहो पिताजी या. मि मरत आहे. तो पिता मुर्ख असेल जो भावूक होवून लगेचच विहरीत उडी घेवून वाचवायच्या नादात स्वत:चा देखील बुडुन मरेल. मुलाला देखील वाचवू शकणार नाही. त्यासाठी अगोदर एक लांब दोरीचा प्रबंध केला पाहिजे. नंतर त्या विहरीत ती दोरी सोडावी. मुलगा त्याला पकडेल. त्यानंतर बाहेर ओढून मुलाला विहरीच्या बाहेर काढले पाहिजे. याच प्रमाणे आपले पूर्वज शास्त्रविधिला त्यागून मनमानी आचरण (पूजा) करून पितर बनले आहेत. मुलांना सुद्धा पितर बनवण्यासाठी बोलवत आहेत. तत्वज्ञानास समजून आपले कल्याण करा तसेच मुझ दासाजवळ (रामपाल दास) परमेश्वर कबीर बंदी छोड जींनी प्रदान केलेली विधी आहे जी साधकाचे तर कल्याण करतेच, त्यांच्या पितरांचा देखिल पितर योनीतून सुटका होऊन मनुष्य जन्म प्राप्त होईल तसेच भक्ति युगात जन्म होवून सत्य भक्ति करुन एक किंवा दोन जन्मात पूर्ण मोक्ष प्राप्त होईल.

**विचार करा :- जसे कि उपरोक्त रुची ऋषिच्या कथेत पितरांना भीती वाटत होती कि जर आमचे श्राद्ध केले नाहीत तर आम्ही पतन ला प्राप्त होऊ अर्थात आमचे पतन (मृत्यु) होईल. आता त्यांना ही पितर योनि जी अत्यंत कष्टमय आहे, चांगली वाटू लागते. तिचा त्याग करण्याची इच्छा होत नाही. ही तर त्या कहाणी सारखीच गोष्ट आहे कि ''एका वेळी एका ऋषिला आपल्या भविष्यातील जन्माचे ज्ञान झाले. त्याने आपल्या मुलांना सांगितले कि माझा पूढचा जन्म अमुक व्यक्तीच्या घरी एका डुकरीपासून होईल. मला डुकराचा जन्म मिळणार. त्या डुकरिणीच्या गळ्यात गाठ आहे. ही तिची ओळख असणार. तिच्या पोटी माझा जन्म होणार. माझी ओळख असेल कि माझ्या डोक्यावर गाठ असणार, जी दुरून दिसेल. माझ्या मुलांनो! मला त्या व्यक्तीच्या कडून खरेदी करा आणि त्वरित मारून टाका, माझी गती करा. मुले म्हणाली ठीक आहे पिताजी. ऋषिने परत डोळ्यात पाणी आणून सांगितले कि मुलांनो! कोठे लालचेपोटी मला विकत घेऊ नका आणि तुम्ही मला मारू नका, हे काम तुम्ही अवश्य करा, नाहीतर मी डुक्कर योनीत महाकष्ट भोगेन. मुलांनी पूर्ण विश्वास दिला. त्यानंतर काही दिवसांनी त्या ऋषिचा देहांत झाला. त्याच व्यक्तीच्या घरी त्याच गळ्यात गाठ असलेल्या डुकरिणीच्या पोटी डोक्यावर गाठ असलेले पिल्लू इतर पिल्लाबरोबर जन्मले. त्या ऋषिच्या मुलांनी त्या डुकरीनीच्या मुलाला खरेदी केले. ज्यावेळेस त्याला मारू लागले. त्यावेळेस तो मुलगा म्हणाला, बेटा! मला मारू नका. माझे जीवन नष्ट करून तुम्हाला काय मिळणार? तेव्हा ऋषिच्या पूर्वजन्मातील मुलांनी म्हटले, पिताजी! आपण म्हटला होता. तेव्हा ते डुकराच्या मुलाच्या रुपातील ऋषि म्हणाले कि मी तुमच्या समोर हात जोडतो. मला मारू नका, माझ्या भावासोबत (इतर पिल्लासोबत) माझं मन रमले आहे. मला सोडा. मुलांनी तो मुलगा सोडून दिला, मारला नाही. याचप्रमाणे हा जीव ज्या देखिल योनीत जन्म घेतो, त्याला त्यागु इच्छित नसतो. परंतु प्रतेकाला एक न एक दिवस शरीर सोडावेच लागते. त्यामुळे भावूक न होता विवेकाने काम केले पाहिजे. हा दास (रामपाल दास) जी साधना सांगेल, त्यामुळे आंब्याचे आंबे व कैरीची देखिल किंमत मिळेल. विष्णु पुराणाच्या तृतीय अंशात अध्याय १५ श्लोक ५५-५६ पान २१३ वर लिहिले आहे कि ''(और्व ऋषि सगर राजास सांगत आहेत)** ''हे राजन् श्राद्ध करणाऱ्या पुरूषापासुन पितरगण, विश्वदेव गण इत्यादी सर्व संतुष्ट होऊन जातात. हे भूपाल! पितरगण चा आधार चन्द्रमा आहे आणि चन्द्रमा चा आधार योग (शास्त्राअनुकूल भक्ति) आहे. यामुळे श्राद्ध मध्ये योगी जनास (तत्व ज्ञान अनुसार शास्त्राविधि अनुसार साधक जन) अवश्य बोलवा जर श्राद्ध मध्ये एक हजार ब्राह्मण जेवण करत आहेत त्यांच्यासमोर एक योगी (शास्त्राअनुकूल साधक) देखिल असो तो त्या एक हजार ब्राह्मणां चा देखिल उद्धार करतो तसेच यजमानांचा देखिल उद्धार करतो. **(पित्तराच्या उद्धाराचा अर्थ आहे कि त्यांची पित्तर योनीतून सुटका होवून मानव जन्म प्राप्त होईल. यजमान तसेच ब्राह्मणाच्या उद्धराचा तात्पर्य हे आहे कि त्यांना सत्यसाधनेचा उपदेश मिळून मोक्षाचा अधिकारी बनवेल.**

**योग्याची परिभाषा :- गीता अध्याय २ श्लोक ५३ मध्ये सांगितले आहे कि हे अर्जुन! ज्या वेळी आपण बुद्धिच्या भिन्न-भिन्न प्रकारच्या भ्रमित करणाऱ्या ज्ञानास बाजूला करुन एका तत्वज्ञानावर स्थिरावते, त्यावेळेस तू योगी बनशील अर्थात भक्त होशील (योगास प्राप्त होशील). भावार्थ असा कि तत्वज्ञान आधारे साधना करणारा मोक्षाचा अधिकारी बनतो. त्याच्या जवळ नाम साधनेचे (भक्तीचे) धन असते. तो राम नामाच्या कमाईचा धनी होतो.**

**यासाठी हा दास (रामपाल दास) आपल्याला ती शास्त्रानुकूल साधना प्रदान करतो ज्यामुळे तुम्ही योगी (सत्य साधक) बनाल. आपले कल्याण तसेच आपल्या पितरांचे देखिल**

कल्याण होईल. जसे कि विष्णु पुराण तृतीय अंश अध्याय १५ श्लोक १३ ते १७ पान २१० वर लिहिले आहे कि देवाच्या निमीत्ताने श्राद्धात (पूजेत) विषम संख्येत (३,५,७,९ च्या संख्येत) ब्राह्मणांना एकावेळी भोजन द्यावे तसेच त्यांची तोंडे पूर्वेकडे करुन बसवुन भोजन करवावे तसेव श्राद्ध (पुजा) करते वेळी सम संख्येत (२,४,६,८ च्या संख्येत) व उत्तरेकडे तोंडे करून बसवावे तसेच भोजन करवावे. विचार करण्यासारखी गोष्ट आहे कि विष्णु पुराण, तृतीय अंश अध्याय १५ श्लोक ५५-५६ पान २१३ वर हे सुद्धा लिहिले आहे कि एक योगी (शास्त्रानुकूल सत्य साधक) एकटाच पितरांचा, ब्राह्मण तसेच पाहुण्यांसहित सर्वांचा उद्धार करू शकतो. का नाही आपण योग्याला शोधावे ज्यामुळे सर्व लाभ प्राप्त होतील. कबीर परमेश्वर म्हणतात कि :-

एकै साधे सब सधै, सब साधै सब जाय। माली सीचें मूल को, फलै फूलै अघाय।।

हा दास (रामपाल दास) देखील धार्मिक अनुष्ठान (श्रद्धायुक्त पूजा) करतो आणि करवितो. ज्या करण्याने साधक पितर, भूत बनत नाही व त्याला पूर्ण मोक्ष प्राप्त होतो तसेच जे पूर्वज चुकीची साधना (शास्त्रविधी त्यागुन मनमानी आचरण अर्थात पुजा) करून पितर भूत बनले आहेत, त्यांची देखील सुटका होते. हेच प्रमाण या विष्णु पुराणात पान न. २०९ वर याच तृतीय अंश अध्याय १४ श्लोक २० ते ३१ मध्ये लिहिले आहे कि ज्याच्या जवळ श्राद्ध करण्यासाठी धन नाही तर त्यांनी हे म्हणायचे, ''हे पितरांनो! तुम्ही माझ्या भक्तीने तृप्त लाभ प्राप्त करा कारण माझ्याजवळ श्राद्ध करण्यासाठी पैसा नाहीत.'' कृपया पाठक जनानी विचार करावा कि जर भक्तीने (मंत्र जापाच्या कमाईने) पितरगण तृप्त होत असतील तर अन्य कर्मकांडाची काय आवश्यकता आहे? हा सर्व प्रपंच ज्ञानहीन गुरु लोकांनी आपल्या उदर निर्वाहासाठी केलेला आहे कारण गीता अध्याय ४ श्लोक ३३ मध्ये लिहिले आहे कि द्रव्य (धन द्वारा केलेला) यज्ञ (धार्मिक अनुष्ठान) मुळे ज्ञान यज्ञ (तत्वज्ञानाधारे नाम जप साधना) श्रेष्ठ आहे.

अजून एक विचार करण्यासारखा विषय आहे कि विष्णु पुराणात पितर व देव पूजण्यासाठीचे आदेश एका ऋषिचा होता तसेच वेद आणि गीता मध्ये पितर आणि देवांच्या पूजेचा निषेध आहे जो आदेश ब्रह्म (काल रूपी ब्रह्म) भगवांनाचा आहे. जर पुराणांनुसार साधना करत असाल तर प्रभूच्या आदेशाची अवहेलना होते. ज्यामुळे साधक दंडाचा अधिकारी होतो.

## ''श्राद्ध करण्याची श्रेष्ट विधि''

श्री विष्णु पुराणाच्या तिसऱ्या अंशात अध्याय १५ श्लोक ५५-५६ पान न.१५३ वर लिहिले आहे कि श्राद्धाच्या भोजनात जर एका योग्याला म्हणजेच शास्त्रोक्त साधकाला भोजन केले गेले तर ते श्राद्ध भोजनात आलेले हजारो ब्राह्मण तसेच यजमानाच्या संपूर्ण परिवारासहित तसेच सर्व पितरांचा उद्धार करतो.

विवेचन :- माझ्या (लेखकाच्या) तत्वज्ञानास ऐकून-समजून भक्त दीक्षा घेऊन साधना करतात. ते योगी म्हणजेच शास्त्रोक्त साधक आहेत. आम्ही सत्संग समागम करत आहेत. त्यात भोजन-भंडारा (लंगर) पण चालवत आहेत. जो व्यक्ति त्या भोजन-भंडाऱ्यात दान करत आहेत. त्याच्यापासून बनवलेल्या भोजनास योगी म्हणजेच माझे शिष्य तसेच हा दास (लेखक) सर्व जण खातात. हा दास (लेखक) सत्संग ऐकवून नव्या व्यक्तीना यथार्थ भक्ति ज्ञान सांगत आहे. शास्त्रातील प्रमाण प्रोजेक्टर वर दाखवत आहे. त्या कारणाने श्रोता शास्त्र विरुद्ध साधनेचा त्याग करून शास्त्रोक्त साधना करतात. अश्याप्रकारे त्यांच्या परिवारचा उद्धार झाला. त्याच्या द्वारे दिलेल्या दानातुन बनवलेल्या भोजनास भक्ताने खाल्ले. त्यामुळे पितरांचा

उद्धार झाला. पितरांना जुने सोडुन अन्य जन्म मिळतो. सत्संगात जर हजारो ब्राह्मण देखिल उपस्थित असतील तर ते देखील सत्संग ऐकून शास्त्र विरुद्ध साधनेचा त्याग करून आपले कल्याण करून घेतील. जसे आपण अगोदर वाचले कि कबीरजीनी गंगाच्या किनाऱ्यावर ब्राह्मणांना ज्ञान देवून त्यांची शास्त्र विरुद्ध साधनेला चुकीचे सिद्ध करून सत्य साधने साठी प्रेरित केले. त्या ब्राह्मणांनी सतगुरू कबीरांकडुन दीक्षा घेवून आपले कल्याण केले. अन्य साधना जी शास्त्र–विरुद्ध होती, त्यागली. सुखी झाले.

दासाची प्रार्थना आहे कि वर्तमानात मानव समाज शिक्षित आहे, त्यांनी अवश्य लक्ष्य देवून तसेच शास्त्र विधिंनुसार साधना करून पूर्ण परमात्म्याच्या सनातन परम धाम (शाश्वतम् स्थानम्) अर्थात सतलोकास प्राप्त करावे ज्यामुळे पूर्ण मोक्ष तसेच परमशांति प्राप्त होते. (गीता अध्याय १५ श्लोक ४ तसेच अध्याय १८ श्लोक ६२ मध्ये ज्याला प्राप्त करावयास सांगितले आहे). त्यासाठी तत्वदर्शी संताचा शोध घ्या. (गीता अध्याय ४ श्लोक ३४)

एक श्रध्दाळु म्हणाला कि मी तुमच्याकडून उपदेश घेवून तुम्ही सांगीतलेली साधना ही करेन तसेच श्राद्ध देखिल काढत राहिल तसेच घरातील देवी–देवतांचे देखिल वरच्या मनाने पुजा करत राहिल. यामध्ये काय दोष आहे?

मुज दासाची प्रार्थना :– सविधांनाच्या एखादया कलमाचे उल्लंघन केल्यास शिक्षा तर नक्की मिळणारच. त्यासाठी पवित्र गीतेमधील व पवित्र चार वेदांतील वर्णीत व वर्जित साधनेच्या विरुद्ध साधना करणे व्यर्थ आहे. (प्रमाण पवित्र गीताजीचा अध्याय १६ श्लोक २३–२४ मध्ये) जर कोणी म्हणेल कि मी कार मध्ये पंक्चर वरच्या मनाने करेल. नाही, राम नामाच्या गाडी मध्ये पंक्चर करणे मना आहे. ठीक याच प्रमाणे शास्त्र विरुद्ध साधना हानिकारक आहे.

एक श्रधाळू म्हणाला कि मी आणि काही विकार (मदिरा–मास सेवन) करत नाही. केवळ तंबाखूचे (बिडी–सिगारेट–हुक्का) सेवन करतो. तुमच्या द्वारे सांगितलेली पुजा व ज्ञान अति उत्तम आहे. मी गुरु सुद्धा केलेला आहे, परंतु हे ज्ञान आज पर्यंत कोण्या संताकडे नाही, मी २५ वर्षापासून फिरतो आहे तीन गुरुदेव बदलले आहेत. कृपया मला तंबाखू सेवनाची सूट दया, बाकी सर्व अटी मला मान्य आहेत. तंबाखू मुळे भक्तित काय बाधा येत आहे?

लेखकाची प्रार्थना :– दासानी प्रार्थना केली आहे कि आपल्या शरीरास ऑक्सिजनची आवश्यकता आहे. तंबाखुचा धूर हा कार्बन–डायआक्साईड असतो जो फुफ्फसास कमजोर व रक्त दूषित करतो. मानव शरीर प्रभू प्राप्ति व आत्म कल्याणसाठी मिळाले आहे. यात परमात्म्याच्या प्राप्तीचा रस्ता सुष्मना नाडीतून प्रारंभ होतो. जे नाकाच्या दोन छिद्रापैकी उजव्याला इडा तसेच डाव्याला पिंगला असे म्हणतात. या दोन्हीच्या मध्यात सुष्मना नाडी आहे ज्यात एका छोट्या सुई (needle) मध्ये धागा ओवण्याइतक्या बारीक छिद्रासमान द्वार असते जे तंबाखुच्या धुरामुळे बंद होते. ज्यामुळे प्रभू प्राप्तीच्या मार्गात अडथळा निर्माण होतो. जर प्रभु प्राप्तीचा रस्ता बंद झाला तर हा मानव शरीर व्यर्थ झाले. त्यामुळे प्रभू भक्ति करणाऱ्या साधकासाठी प्रत्येक नशिल्या व अखाद्य (मांस आदि) पदार्थाच्या सेवनाचा निषेध आहे.

एक श्रद्धाळू म्हणाला मी तंबाखुचे सेवन करत नाही. मांस–मदिरेचे सेवन नक्की करतो. यामुळे भक्तित काय बाधा आहे? ही तर खाण्या–पिण्यासाठी बनवले आहेत तसेच वृक्ष–वेली मध्ये सुद्धा जीव असतो, ते खाणे सुद्धा मासं भक्षण केल्यासारखेच आहे.

दासाची प्रार्थना :– जर कोणी आपल्या आई–वडील–भाऊ–बहिणीस व मुलांना मारून खाल्लं तर कसं वाटेल?

जैसा दर्द आपने होवै, वैसा जान बिराने। कहै कबीर वे जाऐं नरक में, जो काटें शिश खुरांनें।।

जी व्यक्ति पशुंना मारते वेळी त्याचे डोके तसेच खुरांस बेरहमीने कापुन मांस खातात, ते नरकाचे भागी होतील. जसे दु:ख आपल्या मुलांची तसेच नातेवाईकांच्या हत्या झाल्यावर होते, असेच दु:ख दुसऱ्यासाठी समजले पाहिजे. आता राहिली गोष्ट वृक्ष-वेली खाण्याची. त्यांना खाण्याचा प्रभूचा आदेश आहे तसेच मुळ जुनेच आहे. अन्य जिवंत प्राण्याचा वध प्रभू आदेशा विरुद्ध आहे, त्यामुळे अपराध (पाप) आहे.

मदिरा सेवन देखिल प्रभूचा आदेश नाही, परंतु स्पष्ट मना केलेले आहे तसेच मानव जीवन नाश करण्याचा आहे. दारु पिलेला व्यक्ति काहीही चुका करु शकतो. मदिरापान धन-तन, पारिवारीक शांति तसेच समाज सभ्येतेचा महाशत्रू आहे. प्रिय मुलांच्या भावी चरित्रावर कुप्रभाव पडतो. मदिरापान करणारा व्यक्ति कितीही प्रामाणिक असो परंतु त्याची ना तर इज्ज़त राहते तसेच ना विश्वास.

एका वेळी हा दास गावात सत्संग करण्यासाठी गेला होता. त्यादिवशी नशा निषेध वर सत्संग केला. सत्संगानंतर एक अकरा वर्षाची कन्या जोर-जोरात रडु लागली. विचारल्यावर तिने सांगितले कि महाराज माझे वडील पालम विमानतळावर चांगली नोकरी करत आहेत. परंतु सगळ्या पैशाची दारू पितात. माझ्या आईने मनाई केल्यावर एवढे मारतात की तिच्या अंगावर काळे-निळे वळ उमटतात. एके दिवशी माझे वडील माझ्या आईला मारायला लागले. मी आईच्या वर पडून आईला वाचवू लागले तर त्यांनी मला सुद्धा मारले. माझा ओठ सुजला. ठीक व्हायला दहा दिवस लागले. माझी आई आम्हाला सोडून मामाकडे गेली. सहा महिन्यांनंतर माझ्या आजीने तिला परत घरी आणले. तोपर्यंत आम्ही आज्ञीकडेच राहिलोत. वडिलांनी औषध देखील दिले नाही. सकाळी लवकर उठून नोकरीवर गेले. संध्याकाळी दारू पीवून यायचे. आम्ही तिन बहिणी आहोत, दोन माझ्या पेक्षा लहान आहेत. आता जेंव्हाही वडिल संध्याकाळी दारू पिऊन येतात आम्ही तिन्ही बहिणी खाटेखाली जावून लपतो.

विचार करा पुण्यात्म्यानो! ज्या मुलांना वडिलांनी आपल्या छातीला लावायला पाहिजे होते तसेच मुले देखील वडील घरी येण्याची वाट पाहतात कि वडील येतील, फळे आणतील. आज या मानव समाजाचा शत्रु ने दारुने काय घर घातले? दारुडी व्यक्ति आपलेच नुकसान करतो त्याचबरोबर बऱ्याच व्यक्तीचा आत्मा दुखवण्याचे पाप देखील आपल्या डोक्यावर ठेवतो. जसे की पत्नीच्या दू:खात तिचे आई-वडील, भाऊ-बहीण दुखावतात, परत स्वत:चे आई-वडील, भाऊ-बहीण, आजी-आजोबा इत्यादी परेशान होतात. एक दारुडी व्यक्ती आजु-बाजूच्या सभ्य व्यक्तीच्या अशांतीचे कारण बनतो कारण तो घरात भांडण करतो. पत्नी व मुलाचे रडणे ऐकून शेजाऱ्यानी मध्ये पडावे तर दारुड्या ओरडतो, मध्ये नाही पडावे तर सभ्य लोकांना झोप येत नाही. या दासाकडून उपदेश घेतल्यानंतर दररोज दारु पिणाऱ्या जवळपास एक लाख व्यक्तींनी सर्व अमली पदार्थाचे सेवन तसेच मांस भक्षण पुर्णपणे त्यागले आहे तसेच संध्याकाळी जिथे दारूचा धिगांना होत होता, आता ते पुण्यात्मे आपल्या मुलांसहित बसुन संध्या आरती करतात. हरियाणा प्रदेश व जवळपासच्या राज्यात जवळपास दहा हजार गावात आणि शहरातील आज देखील प्रत्येकात चार - पाच चैम्पियन (एक नंबरचे दारुडे) उदाहरण आहे जे सर्व विकार रहीत होऊन आपले मानवी जीवन सफल करत आहेत. काहीजण म्हणतात कि आम्ही इतके खात-पित नाही, बस कधी तरी घेतो. विष तर थोडेच खराब आहे, जे भक्ति व मुक्ति मध्ये बाधक आहे.

समजा दोन किलो गावराण तुपाचा हलवा बनवला (सतभक्ती केली). मग २५० ग्रॅम

वाळू (तंबाखू–मांस–मदिरा सेवन व आन उपासना केली) देखील टाकली. हे तर केलेले व्यर्थ झाले. त्यामुळे पूर्ण परमात्म्याची (परम अक्षर ब्रह्म) पूजा पूर्ण संताकडून प्राप्त करून आजीवन मर्यादेत राहून भक्ति करत राहिल्यानेच पूर्ण मोक्ष लाभ होईल.

❑ उपरोक्त प्रमाणाना वाचून बुद्धीजीवी समाजाने विचार करावा आणि अंध श्रद्धा भक्तीचा त्याग करून सत्य श्रद्धा भक्ती करुन जीवन धन्य करावे.

दासाच्या (लेखक) परमार्थी प्रयत्नांना आलोचना समजू नका. माझा उद्धेश तुम्हाला शास्त्रोक्त भक्ति साधना सांगून तुमच्यावर भविष्यात येणाऱ्या पर्वता सारखे कष्ट (चौऱ्याऐंशी लाख प्रकारच्या प्राण्यांच्या शरीरात कष्ट भोगणे तसेच नरकात जाण्यापासून) वाचणे आहे. माझे अनुयायी या तत्वज्ञाना पासुन परिचीत आहेत. ते सुद्धा आपल्यापर्यंत माझ्याद्वारे लिहिलेले पुस्तक पोहचवुन आपले भविष्य सुखी बनवण्याच्या उद्धेशाने वितरीत करत आहेत. परंतु काही धर्मांध व्यक्तिंनी आपल्या स्वार्थासाठी आपण व परमेश्वरामध्ये भिंत बनून उभे आहेत. मला तसेच माझ्या अनुयायांना खोटे आरोप लावून बदनाम करत आहेत. आपण आपल्या डोळ्याने प्रमाण पहा आणि सत्याची कास पकडा. आमचा उद्देश आहे कि आम्ही संसारातील लोकांना वाइट चाली–रिर्ती पासून दूर करून सुखी बघू इच्छितो. आम्ही आमचा प्रयत्न चालू ठेऊ. आपण कधी समजून घ्याल? वाट पाहू.

## ''पिंपळ, वड तसेच तुळशीची पूजा''

**वाणी संख्या ४ :–** पीपल पूजै जाँडी पूजे, सिर तुलसाँ के होइयाँ।
दूध–पूत में खैर राखियो, न्यूं पूजूं सूं तोहियाँ।।४।।

**शब्दार्थ :– परमेश्वर कबीर जींनी अन्य श्रद्धा भक्ति करणाऱ्यांच्या साधनाचे वर्णन केले** आहे कि भोळी जनता ज्ञानहीन आध्यात्मिक गुरुंनी किती खालच्या स्तराच्या साधनेला लावुन त्यांच्या जीवनाबरोबर किती मोठा धोका केला आहे. अज्ञानी गुरूंकडुन भ्रमित होऊन पिंपळ व वडाच्या झाडास तसेच तुळशी च्या रोपाची पूजा करतात. प्रार्थना करतात कि आपल्या सर्वांची पूजा यासाठी करतो कि आमच्या दुध म्हणेच दुधी पशूंची तसेच आमचे पुत्र–पौत्रांची राखण करणे (रक्षा करणे) म्हणजेच पशु पुर्ण वेळ दुध देतील. मृत्यू होऊ नये तसेच पुत्र, पोत्रों व परपात्रोंची मृत्यु न होवो. त्यांची आपण (पिंपळ तसेच वडाचे झाड तसेच तुळसी चे रोप) रक्षा करावी.

परमेश्वर कबीरजी समजावतात कि हे आंधळ्या पूजाऱ्यांनो! थोड तरी डोक वापरा. जे जड (चालू–फिरू शकत नाहीत. त्यांना पशू नुकसान पोहचावतात. ते आपली रक्षा करू शकत नाहीत.) वृक्ष आणि रोपांची पूजा करून घर परिवारात आपण धन वृद्धी तसेच जीवनाची रक्षा करण्याची आशा करत आहात. ते स्वत: विवश आहेत. तुमची रक्षा कशी काय करणार? ही आपली अंध श्रद्धा आहे जी आपल्या अनमोल मानव जीवनासाठी धोका आहे म्हणजेच आपले मानवी जीवन शास्त्र वर्णित साधना त्यागुन शास्त्र विरुद्ध साधना रुपी मनमानी आचरण केल्याने नष्ट होईल. वाणी संख्या ४ मध्ये एक वाक्य आहे कि :–

पीपल पूजै, जांडी पूजै, सिर तुलसां के होइयां।

''सिर होना'' याचा तात्पर्य आहे कि जे काहीच करू शकत नाहीत, अज्ञानताच्या कारणामुळे त्या व्यक्तीकडे आपल्या कामासाठी वारंवार निवेदन करणे. ती व्यक्ति त्या भोळ्या मानवाला म्हणते कि तू माझ्या डोक्यावर का बसतोस? मी तुझे हे काम करू शकत नाही. परमेश्वर कबीर जी समजावतात कि जी व्यक्ति आपले काम करण्यासाठी सक्षम नाही, जे कार्य

**परमात्म्याशिवाय कुणीही करू शकत नाही आणि जी व्यक्ति स्वत: असहाय आहे, त्यांच्याकडून आपण कार्य सिद्धीची अपेक्षा करत आहात. ही अज्ञानता आहे.**

**वाणी संख्या ५ :-** आपै लीपै आपै पोतै, आपै बनावै अहोइयाँ।
उससे भौंदू पोते माँगै, अकल मूल से खोईयाँ।।५।।

**शब्दार्थ :- परमेश्वर कबीरजींनी आन उपासनेच्या अजून एका अंधश्रद्धेबद्दल स्पष्टीकरण दिले आहे. म्हणतात कि एक भोळी वृद्धा लोकवेदानुसार आन उपासना करताना स्वत:च अहोई नावाच्या मातेचे (देवी) चित्र बनवते. त्यासाठी भिंतीला अगोदर गायीच्या शेणाने लिपून घेते (प्लास्टर करते) तिच्यावर अहोई देवीचे चित्र काढते. नंतर तिची पूजा करून आपल्या सुनेसाठी एक पुत्र मागते. परमात्मा कबीर जींनी म्हटले कि अशा अंधश्रद्धा भक्ति करणाऱ्यांची बुद्धी (अकल) मुळातुन म्हणजे जडमधुन संपलेली आहे, ते अर्ध मूर्ख आहेत. नवस मांगताना वृद्धा म्हणते कि हे अहोई देवी! आपण सुनेला मुलगा द्या, गाईला वासरू द्या. (जुन्या काळी वासरू होने लाभदायक होते कारण कि वासरू बैल बनतो. जो शेतीच्या कामाला येतो.). म्हैशीला वाटले तर वगारू (मादा बछडा) दिले तरी चालेल. वृद्धा किती चतुर होती. तिच्या म्हणण्याचा भावार्थ कि हे देवी तुला नर म्हणजेच बछडा मागून परेशान करू इच्छित नाही. म्हैशीला वगारू (मादा बछडा) दिले तरी चालेल. तिला माहीत आहे कि वगारू किती लाभदायक आहे. म्हैशीचे वासरू तर कसायाकडे कापण्यासाठी विकले जाते, काही कामात येत नसत. वृद्धा देवीबरोबर सुद्धा किती चतुराई करते. आपल्या देवताबरोबर सुद्धा चाल-बाजीच्या गोष्टी करते. वरिल पुज्य बनावलेली देवी तसेच वृक्ष-वल्ली कडे नवस मागताना दक्षिणा स्वरुपात सव्वा रुपये (एक रुपया व पंचवीस पैसे) आपल्या पदराच्या टोकाला बांधून म्हणते कि माझा नवस पूर्ण झाला तर मी या सव्वा रुपयाचा प्रसाद वाटीन. ही दक्षिणा सुद्धा तेव्हा देईल, जेव्हा सर्व नवस पुर्ण होतील. एक जरी नवस अपुरा राहिला तर दक्षिणा दिली जाणार नाही.**

## ''परमात्म्याबरोबर धोखा:''

**कबीर जी म्हणतात कि :-**

अहरण की चोरी करें, करें सूई का दान। स्वर्ग जान की आस में, कह आया नहीं विमान।।

**शब्दार्थ :- परमात्मा कबीरजीनी कंजूस व्यक्तीचे नियत कशी असते ते सांगितले दोन नंबरचे काम करून म्हणजेच चोरी, हेरा-फेरी करून, रीश्वत घेवून, धान्यात भेसळ करून करोडोचे धन प्राप्त करतो आणि दान सव्वा रूपायच करतो. जसे चोरी तर ऐरणी एवढ्या लोखंडाची करतो (ऐरण लोहाराजवळ असते, जीच वजन ३०-४० किलो असते) आणि दान करतो केवळ सुई एवढ्या लोखंडाच्या किमतीचे. त्याच धर्म-कर्माला तो मूर्ख एवढेजास्त समजतो आणि अपेक्षा करतो कि परमात्मा मला स्वर्गात नेण्यासाठी विमान पाठवतील. जेव्हा मनोकामना पूर्ण होत नाही तो विचार करू लागतो की परमेश्वर विमान पाठवण्यास उशीर का बरे करत आहेत?**

**परमेश्वर कबीरजींनी अशा धर्मकार्या बद्दल म्हटले आहे कि:-**

कबीर, जिन हर जैसा सुमरिया, ताको तैसा लाभ। ओसां प्यास ना भागही, जब तक धसै नहीं आब।।

**शब्दार्थ :- परमात्मा कबीरजींनी स्पष्ट केले आहे कि जो साधक जशी भक्ति आणि दान-धर्म करतो, त्याला त्या अनुसार लाभ मिळतो. पूर्ण लाभासाठी धर्म-कर्म सुद्धा पुर्णपणे केल्याने पर्याप्त लाभ मिळतात. जसे गवतावर पडलेले दवबिंदू प्राशनाने तहान भागणार नाही.**

तहान भागण्यासाठी किमान ग्लास भरून पाणी पिणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे परमात्म्याकडून पूर्ण लाभ घेण्यासाठी दान-धर्म सुद्धा पर्याप्त प्रमाणात केले पाहिजे.

उदाहरण :- एका कंजूस व्यक्तीची दुधारू म्हैस हरवली. तिला शोधण्यासाठी बाप व मुलगा दोघही घराबाहेर पडले. रस्त्यात सर्वात अगोदर हनुमानाचे मंदिर लागले. बापाने मूर्तीच्या समोर संकल्प केला कि, हे बजरंगबली! आपण तर साता-समुद्रापार असलेल्या सीता मातेला शोध घेतला होता. आपल्यासाठी तर आमची म्हैस शोधणे असे कोणते कठीण कार्य आहे? जर माझी म्हैस मिळाली तर हे अंजनीलाल, तिच्या एका स्तनाचे दूध, जो पर्यन्त म्हैस दूध देत राहील, आपल्याल अर्पण करीत राहील. कृपया ध्यान द्या, शीघ्रता करा. हा संकल्प मुलगा देखिल ऐकत होता.

❖ थोड पुढे गेल्यानंतर शिवजीचे मंदिर लागले. त्याठिकाणी सुद्धा त्याने संकल्प केला कि, म्हैस मिळाली तर एका स्तनाचे दूध अर्पण करीन.

❖ पुढे गेल्यानंतर रस्त्यामध्ये श्रीकृष्ण जींचे मंदिर लागले. एका स्तनाचे दूध त्याच्यासाठी सुद्धा बोलले.

❖ थोडे पुढे गेल्यानंतर रस्त्यामध्ये गणेशजीचे मंदिर लागले. एका स्तनाचे दूध त्याच पद्धतीने अर्पण करण्याचा संकल्प करुन पिता-पुत्र पुढे निघुन गेले तर मुलाने वडिलांना म्हटले कि पिता जी! जो पर्यत म्हैस दूध देत राहील, तोपर्यंत चारही स्तनाचे (थनाचे) दूध म्हणजे सर्व दुध तर देवता पीतील. मग आपण म्हैसीचा शोध कश्यासाठी करायचा? चला आपण परत जाऊ या. हेराफेरीत तरबेज वडील त्याला म्हणाले, बेटा! एक वेळेस म्हैस मिळू दे. नंतर या देवतांना मी कसे त्यांच्या मनाप्रमाणे दूध पाजतो ते तू बघ. मुलगा म्हणाला पिताजी मी समजलो नाही. त्यावर पिताजी म्हणाले कि म्हैस मिळाल्यावर प्रथम तिचे दोन ग्लास दूध काढेन व त्यामध्ये दोन ग्लास पाणी मिसळून, एक दिवस एक-एक ग्लास चारही देवतांना अर्पण करून म्हणेल, देवतानो! तुमचे धन्यवाद. तुमच्या मुळे म्हैस मिळाली, परंतु मला देखील लेकरं-बाळ आहेत. माझ्याकडून आपल्या पुजेमध्ये एवढ्याच दुधाची सेवा होऊ शकते म्हणजेच माझी आर्थिक स्थिती एवढेचे दुध देण्याची आहे. या पुढे दूध अर्पण करू शकणार नाही. माफ करा. आपण सर्वांना दूध पाजणारे आहात. आपल्याला दुधाची काय आवश्यकता आहे? म्हैस मिळाली, ही पूजा केली गेली.

❖ परमेश्वर कबीर जी सांगु इच्छितात कि तत्वज्ञान नसल्यामुळे भक्तांची नियत साफ राहू शकत नाही. ज्या कारणामुळे तो संसारीक क्षेत्रात तर हेराफेरी करतोच. परमात्म्याला देखील सोडत नाही. ही अंध भक्ति आहे जी शास्त्र विरुद्ध आहे ज्यापासून कसलाच लाभ होणार नाही. ज्यामुळे जीवाच्या मानसिकतेचा विकास होऊ शकत नाही.

## ''सोळा शुक्रवारचे व्रत करणे''

**वाणी संख्या ६:-** पति शराबी घर पर नित ही, करत बहुत लड़ईयाँ।
पत्नी षोडष शुक्र व्रत करत है, देहि नित तुड़ईयाँ।।६।।

**शब्दार्थ :-** परमेश्वर कबीर जी नी तत्वज्ञान हीन उपासकाच्या अंध श्रद्धा भक्तीवर प्रकाश टाकला आहे. म्हणाले कि जे विवेक केल्या शिवाय जी साधना करतात, ही व्यर्थ आहे.

उदाहरण :- एका मुलीचा नवरा दारू प्यायचा. नशा सुद्धा करायचा. कसलाच काम-धंदा करत नसे. जमिनीचा सांभाळ ती मुलगीच करायची. दारू पिण्यास मनाई केल्यावर तो

दारुडा आपल्या पत्निला हाणत-मारत असे. घराचे नरक झाले होते. त्या मुलीच्या आई-वडिलांनी, भाऊ-वहीणींनी सर्वानी मुझ दाज (लेखक) कडून दीक्षा घेतलेली होती. ज्ञान देखील चांगल्या प्रकारे समजून घेतले होते. ते आपल्या मुलीच्या दुर्दशेबद्दल चिंतेत होते. एक दिवस ते मुलीला समजावुन दिक्षा देण्यासाठी आश्रमात माझ्याकडे आणले. मुलीला सांगितले कि कसल्याच प्रकारची आन-उपासना मूर्ति पूजा, व्रत करणे वगैरे वगैरे करायचे नाही. मुली ने सांगितले कि मी सोळा शुक्रवारचे व्रत करण्याची प्रतिज्ञा केली आहे कि घरात शांति होईल. आता तर मी अर्धेच केलेले आहे, ते पूर्ण झाले कि मी दीक्षा घेईल.

त्या मुलीला चांगल्या प्रकारे समजावले, तेव्हा ती शास्त्र विरुद्ध साधनेचा त्याग करण्यास तयार झाली आणि दीक्षा घेऊन सुखी झाली. पतिने देखील दारू सोडली. पूर्ण परिवार दिक्षा घेऊन शास्त्रविधी अनुसार साधना करत आहे.

विचार :- अंध श्रद्धा भक्ति करणाऱ्याना इतकाही विवेक नाही कि जे साधना करत आहेत, त्यापासून लाभ आहे कि नुकसान.

त्या मुलीला विचारले कि ''सोळा शुक्रवाराच्या व्रताने तुमच्या ज्ञानहीन गुरूंनी काय लाभ सांगितला?'' त्या मुलीने एक कथा सांगितली कि एका स्त्रीचा पती रोजगारासाठी दूर देशात गेला होता. तो बऱ्याच वर्षापर्यंत आला नाही. त्या स्त्रीला चिंता सतावू लागते. एके दिवशी तिला देवी संतोषी माता दिसली आणि म्हणाली कि तू माझे सोळा शुक्रवाराचे व्रत लागोपाठ कर. तुझे पती घरी परत येतील. असचे झाले.

विचार कर मुली! तुझा पती तर तुझ्याजवळ राहतो. दररोज भांडतो. तुझे शरीर तोडतो म्हणजेच तुला मार-हान करतो. मग हे व्रत तू कश्यासाठी करतेस? तू तर असे व्रत करायला पाहिजेस कि जेणेकरून तो कित्येक दिवस घरी नाही आला पाहिजे आणि तुला मार-हान होणार नाही. तू तर तुझ्यावर संकट ओढवून घ्यायचं व्रत करतेस.

गीता अध्याय ६ श्लोक १६ नुसार व्रत करण्यास मनाई केलेली आहे. म्हटले आहे कि जे बिलकुल अन्न खात नाहीत म्हणजे व्रत करतात, त्यांचा योग म्हणजे भक्ति कर्म कधीही सफल होत नाही. तीने पुढे सांगितले कि माझी एक मैत्रीण गुरुकडे जाते. तिने सांगितले होते. मी देखिल व्रत करु लागले. मला तर आजच माहीत झाले कि मी व्यर्थची भक्ति करत होते.

सूक्ष्मवेदात परमेश्वर कबीर म्हणतात कि :-

गुरूवाँ गाम बिगाड़े संतो, गुरूवाँ गाम बिगाड़े।
ऐसे कर्म जीव कै ला दिए, बहुर झड़ैं नहीं झाड़े।।

शब्दार्थ :- परमेश्वर कबीर जींनी समजावले आहे कि तत्वज्ञानहीन गुरुंनी गावच्या गाव शास्त्रविरुद्ध साधनेवर लावुन त्यांच्या जिवनाचा नाश केला आहे.

भोळ्या-भाबड्या जनतेचा शास्त्रविरुद्ध साधनेवर इतके दृढ केले आहे कि ते शास्त्रा मध्ये प्रमाण पाहुन सुद्धा त्या व्यर्थ पुजेला त्यागण्यास तयार नाहीत.

वाणी संख्या ७ :- तज पाखण्ड सत नाम लौ लावै, सोई भव सागर से तरियाँ।
कह कबीर मिले गुरू पूरा, स्यों परिवार उधरियाँ।।७।।

शब्दार्थ :- परमेश्वर कबीर जींनी स्पष्ट केले आहे कि उपरोक्त तसेच अन्य शास्त्रविरुद्ध पाखंड पूजा त्यागून पूर्ण सतगुरुकडून खऱ्या नामाची प्राप्तिचा जाप प्राप्त करून श्रद्धेने भक्ति करून भक्तजण पार होतात. त्यांच्या परिवारातील सर्व सदस्य देखील भक्ति करून कल्याणास प्राप्त होतात.

## ''व्रताविषयी गीतेत''

❖ प्रश्न :- काय एकादशी, कृष्णाष्टमी तसेच अन्य व्रत देखील शास्त्रात वर्जित आहेत?

उत्तर :- गीता अध्याय ६ श्लोक १६ मध्ये सांगितले आहे कि बिलकुल न खाणारे म्हणजे व्रत उपवास करणाऱ्याचा योग म्हणजेच परमात्मा मिलन प्राप्तीचा उद्देश पूर्ण होत नाही.

➢ गीता अध्याय ६ श्लोक १६ :- हे अर्जुना! हा योग (म्हणजेच परमात्मा प्राप्ती साठी केली गेलेली साधना) ना तर भरपूर खाणाऱ्यांना आणि ना काहिच खाणाऱ्यांना तसेच ना भरपुर झोपणाऱ्यांना आणि ना कायमस्वरुपी जागे राहणाऱ्यांना सिद्ध होते.

❖ त्यामुळे व्रत ठेवणे शास्त्रविरुद्ध असल्यामुळे व व्यर्थ सिद्ध होते.

## ''तीर्थ तसेच धाम काय आहेत?''

प्रश्न :- तीर्थावर, धामावर श्रद्धा ने दर्शनार्थ तसेच पूजा केल्याने हिंदु गुरुजन भरपुर पुण्य सांगतात. ही साधना लाभदायक आहे कि नाही? कृपया शास्त्रानुसार सांगावे.

उत्तर :- तीर्थ किंवा धाम हे असे पवित्र स्थान आहे कि जिथे कोणत्या तरी महापुरुषाचा जन्म झाला अथवा निर्वाण (परलोक वास) झाला होता किंवा एखादया साधकाने साधना केली होती किंवा एखादया ऋषिचे अथवा देवी-देवतांच्या कथेशी संबंधीत आठवणी आहेत.

विचार करा :- पवित्र तीर्थ तसेच पवित्र धाम ही आठवणी आहेत कि येथे अशा घटना घडल्या होत्या जेणे करुन त्याचे प्रमाण बनलेले राहिल.

उदाहरण :- जसे अमरनाथ धाम आहे. त्याच्या कथेच सर्व हिन्दुना ज्ञान आहे कि त्या एकांत ठिकाणी श्री शिवजींनी आपल्या पत्नी पार्वतीला नाम दीक्षा दिलेली होती जिचा देवी जाप करत आहे. त्या मंत्र साधनेच्या प्रभावाने त्यांना अमरत्व प्राप्त झाले.

वर्तमानात ते एक आठवणी व्यतिरिक्त काहीही नाही. ते प्रमाण आहे कि येथे वास्तवात देवी-पार्वतीला श्री शिव भगवानाने अमर होण्याचा मंत्र दिला होता. जर कुणाला विश्वास वाटत नसेल तर ते तिथे जाऊन पाहू शकतात व आपला भ्रम दूर करू शकतात. परंतु कोण हे म्हणत असेल कि त्या ठिकाणच्या दर्शनाने तसेच तेथे दान धर्म केल्याने मुक्ति मिळेल किंवा भक्ती लाभ मिळेल, असे काहीच नाही. राहिली गोष्ट दान-धर्म करण्याची, आपण कोठेही धर्म कार्य करा, आपल्याला त्याचे फळ मिळणारच कारण कि परमात्मा आपल्या चांगल्या कर्मांना त्याच वेळी लिहून ठेवतात. जसे कोणी व्यक्ती एकांत स्थानी कोणती हत्या अथवा अपराध करत असेल तर त्याच्या अशुभ कर्मात लिहिले जाते, त्याचे फळ अवश्य मिळते.

त्यामुळे पुण्याचे कार्य कोठेही करा. त्याचे फळ तर मिळणारच. पुण्य करण्यासाठी दूर स्थान तिर्थावर जाणे बुद्धीमत्ता नाही. हाच प्रश्न एक वेळी जिंदा साधु रूपात मथुरेत प्रकट परमेश्वर कबीर जींना एका तीर्थ यात्रीने धर्मदास सेठ द्वारा केला गेला होता हे मथुरा तीर्थावर स्नानार्थ तसेच दान धर्म करण्यासाठी आपल्या गुरु रूपदास वैष्णव यांच्या सांगितलेले भक्ति कर्म करण्यासाठी 'बांधवगढ' नावाच्या शहरातून (मध्य प्रदेश) आले होते. परमात्म्याने त्याला समजावले कि येथे मथुरा-वृंदावनात वर्तमानात श्रीकृष्ण नाहीत आणि विचार करा कि श्रीकृष्णाने या स्थानाला त्यागून येथून हजारो किलोमीटर दूर द्वारकेत सहपरीवारा सहित तसेच सर्व यादवाना घेवून गेले होते तर या स्थानाचे काय महत्व राहीले? ही तर एक आठवण आहे कि कधी श्रीकृष्णाने काही काळ येथे व्यतीत केला होता. कंस, केशी तसेच चाणूर अन्यायांना मारले होते. परमात्मा म्हणाले कि हे धर्मदास! तुम्ही गीता शास्त्राला बरोबर घेतले

आहे, त्याचे नित्य पठन देखिल करता आहात. त्यात असे काही वर्णन आहे का कि हे अर्जुन तीर्थावर जात जा, बेडा पार होईल. धर्मदास जी म्हणाले, नाही प्रभू! गीतेत कुठेच प्रभुचा आदेश लिहलेला नाही. परमेश्वर म्हणाले कि गीता अध्याय १६ श्लोक २३ वाचा. त्यानुसार हि तीर्थ यात्रा शास्त्र वर्णीत नसल्यामुळे व्यर्थ साधना आहे.

❑ जर तुमच्या तत्वज्ञानहीन गुरुचे ऐकले कि तीर्थावर जाण्यामुळे पुण्य मिळते. तर एक पुण्य मिळेल आणि करोडो-अरबो पापे लागतील. हे ऐकून सेठ धर्मदास अंध श्रद्धा भक्ति करणारा थरथर कापू लागला आणि त्याचा घसा सुकून गेला. बोलला कि हे जिंदा! इतके पाप कसे लागले. कृपया समजून सांगा.

❖ परमेश्वर कबीर जी (जिंदा वेशधारी प्रभु) नी समाधान अश्या प्रकारे केले :-

➢ म्हणाले कि हे धर्मदास! आपण बांधवगढावरून मथुरानगरी मध्ये वृंदावणास आला आहात. बांधवगढ येथून जवळपास दोनशे पन्नास कोस (जवळपास साडे सातशे किलोमीटर) दूर आहे. तिथून येथपर्यंत पायी चालत आल्यामुळे आपल्याद्वारे अनेक जीवांची हिंसा झाली. तसेच तुम्ही या मथुरा तीर्थात स्नान केले. करोडो सूक्ष्म जीव तिर्थाच्या पाण्यात होते जे तुमच्या स्नानामुळे अंग रगडल्यामुळे मारले गेले आणि आपण भोजन तयार करण्याअगोदर चुल तयार केली व गायीच्या शेणाने सारवले लिपले, त्यासाठी पाण्याचा उपयोग केला तसेच लिपत असताना पृथ्वीवर असलेले करोडो जीव मारले गेले. हे सर्व पाप तुम्हाला लागले. आता आपण सांगा कि आपण लाभाचा सौदा केला कि नुकसानीचा? धर्मदासाच्या तोडून कोणतीच गोष्ट निघत नव्हती, उत्तर आले नाही कारण तो भीतीमुळे स्तब्ध झाला होता. काही क्षणानंतर तो परमात्मा जिंदा वेशधारीच्या पायावर पडला आणि यथार्थ शास्त्रोक्त ज्ञान सांगण्याची याचना केली. परमात्मा कबीर जींनी शास्त्र मध्ये वर्णीत साधना सांगितली तसेच अन्य सर्व आन उपासना म्हणजेच पाखंड पुजा त्यागण्यास सांगितले. धर्मदासजी विवेकी होते. बरेचसे प्रश्नोत्तर करून समजून घेतले. आपल्या कल्याणचा मार्ग जाणून घेतला आणि आपल्या पत्नीला सुद्धा समजावुन सतगुरु कबीरजी कडून दीक्षा देवून स्वत:ला तसेच आपल्या परिवाराला शास्त्रोक्त साधनेवर लावले. भक्तीचा पूर्ण लाभ प्राप्त केला.

❖ धर्मदासजीनी अनेक शंकाचे समाधन करून घेतले. त्यापैकी एक शंका होती कि :-

## ''वैष्णव देवी, नैना देवी, ज्वाला देवी तसेच अन्नपूर्णा देवीच्या मंदिराची स्थापना''

प्रश्न :- वैष्णव देवी, नैना देवी, ज्वाला देवी तसेच अन्नपूर्णा देवी इत्यादि पवित्र स्थानावर अनेक हिन्दू जातात. काय तिथं गेल्यानंतर ही भक्ति लाभ नाही?

उत्तर (कबीरजी जिंदा महात्म्याचे उत्तर) :- हे धर्मदास! आताच सांगितले होते कि तीर्थ-स्थानावर गेल्यावर काय हानी-लाभ होतो. तरी सुद्धा ऐक.

पूर्ण हिन्दू समाज जाणतो कि पवित्र स्थान कसे बनले. आपण समजून न समजल्यासारखे करू नका. ज्यावेळेस दक्ष पुत्री सतीजी आपल्या पतिवर रुष्ट होवून आपल्या पित्याच्या दक्ष्याच्या घरी आली. त्यावेळेस राजा दक्षाने तिचा अनादर केला. राजा दक्ष त्यावेळेला यज्ञ करत होते. एका मोठ्या हवन कुंडात हवन चालू होता. सतीजी आपल्या पित्याच्या बोलण्याने दु:खी होऊन हवन कुंडात पडुन मेली. भगवान शिवांना हे कळल्यानंतर त्यांनी तिचे शिल्लक राहिलेले कंकाळास उचलले पत्नीच्या वियोगात तिला घेऊन फिरू लागले. पत्नीच्या मोहवश

महादु:खी होते. आपल्या पुराणात लिहले आहे कि दहा हजार वर्षांपर्यंत सती पार्वतीच्या कंकाळास घेऊन फिरत राहिले. मग श्री विष्णु जींनी सुदर्शन चक्राने त्या कंकाळाचे (अस्थि पिंजर) तुकडे–तुकडे केले. त्यावेळेस श्री शिवजींचा मोह भंग झाला. सतिच्या शरीराचे भाग बऱ्याच ठिकाणी पडले.

➢ वैष्णों देवी मंदिराची स्थापना :–

ज्या ठिकाणी देवी जीच्या धड वाला भाग पडला. तेथे आठवण बनवुन ठेवण्यासाठी श्रध्दाळूंनी धडास पृथ्वीत दफन करुन त्यावर एक छोटसी मंदिरवजा आठवण बनविली. नंतर वेळे नुसार त्याचा विस्तार होत राहिला.

त्या आठवणीला पाहण्यासाठी आणि पुजा करण्यासाठी गेल्याने कसलेच पुण्य नाही, याउलट पापच लागते जे येता–जाताना जीव हिंसा होते.

➢ नैना देवीच्या मंदिराची स्थापना :–

ज्या स्थानावर सती पार्वतीचे डोळ्या वाला भाग पडला, त्या ठिकाणी देखिल त्या प्रकारे जमिनीत दफन करुन मंदिर बनवले म्हणजेच घटनेचे प्रमाण राहील. कोणी पुराण कथेस चुकीचे सांगु नये.

➢ ज्वाला जी ची स्थापना :–

ज्या ठिकाणी कांगडा जिल्ह्यात (हिमाचल प्रदेश) देवीची अर्धवट जळालेल्या जीभ वाला भाग पडला, त्यास श्रद्धाने त्या ठिकाणी पृथ्वीमध्ये त्या जिभेस श्रद्धेने दाबुन आठवणीच्या रुपात छोटसे मंदिर बनवले. नंतर खुप मोठे मंदिर बनविले गेले. ते ज्वाला देवीचे मंदिर आहे.

➢ अन्नपूर्णा देवीच्या मंदिराची स्थापना :–

ज्या ठिकाणी सती पार्वतीच्या शरिराचा बेंबीचा भाग पडला. त्यास श्रद्धाने पृथ्वीमध्ये दाबुन त्याच्या वर आठवणिच्या रुपात एक छोटेसे मंदिर बनवले होते. नंतर त्याचा बराच विस्तार केला गेला आणि शास्त्र विरुद्ध साधना सुरू केली गेली.

हे सगळे प्रमाण रूप आहे.

विचार करा :– अश्या ठिकाणी भक्ति व पूजा तसेच पुण्य प्राप्त करण्यासाठी जाणे शास्त्र विरुद्ध असल्याने हानिकारक आहे. यासाठी हे व्यर्थ आहे.

जर कुणाला पुराणात लिहीलेल्या गोष्टीवर विश्वास नसेल तर पाहण्यासाठी जायचे असेल तर जावा, परंतु पुण्याच्या जागी जीव हिंसेचे पाप प्राप्त होईल.जे येता–जाता पायाखाली किंवा गाडी–घोड्याच्या खाली दबुन मरतील. याच प्रमाणे अन्य दर्शनीय स्थळावर (बद्रीनाथ, केदारनाथ, जगन्नाथपुरी, द्वारकापुरी इत्यादी–इत्यादी) कोणत्या आध्यात्मिक लाभासाठी जाणे हे अंध श्रद्धा भक्ति च्या व्यतिरिक्त काहिही नाही.

## ''केदारनाथ मंदिर भारतात तसेच पशुपति मंदिर नेपाळात कसे बनले?''

### (केदारचा अर्थ आहे दलदल)

महाभारतात कथा आहे कि पाच पांडव (युद्धिष्ठर, अर्जुन, भीम, नकुल व सहदेव) जीवनाच्या अंतिम वेळी हिमालय पर्वतावर तप करत होते. एके दिवशी सदाशिव म्हणजेच काल ब्रह्मने दुधारू म्हैशीचे रूप घेतले आणि त्या क्षेत्रात फिरू लागले. दूध मिळवण्यासाठी भीमाने तिला पकडण्यासाठी धाव घेतली तर ती म्हैस जमिनीमध्ये जावू लागली. भीमाने म्हशीचा

मागचा भाग पकडला जो पृथ्वीच्या बाहेर शिल्लक होता. तो दगड झाला व बाहेरच राहिला ते केदारनाथ बनले. म्हशीच्या शरीराचे अन्य भाग जसे पुढचे पाय, मागचे पाय इत्यादी इत्यादी जेथे जेथे निघाले तेथे तेथे अन्य केदार बनले. असे असे सात केदार हिमालयात बनले आहेत. त्या म्हशीच्या डोक्याचा भाग काठमांडूत निघाला ज्यास पशुपति म्हटले गेले. त्यावर मंदिर बनवले गेले. त्या म्हशीच्या मागच्या भागावर तसेच अन्य अंग जेथे जेथे निघाले, त्याला केदार नाव देवून आठवण बनवली गेली ही पौराणिक घटना सत्य आहे. हे साक्षी आहेत. सर्व मंदिर कोणत्या न कोणत्या कथेचे साक्षी आहेत. परंतु पूजा करणे चुकीचे, व्यर्थ आहे. जवळपास शंभर वर्षापूर्वी केदारनाथला जास्त पाऊस पडल्यामुळे दलदल जास्त झाली होती. जवळपास साठ (६०) वर्षापर्यंत तिथे कुठल्याच प्रकारची पूजा-आरती केली गेली नाही. ना कोणी दर्शनाला गेला होता. नंतर तीस-चाळिस वर्षानंतर परत दर्शनार्थी जाऊ लागले.

❑ सन २०१२ मध्ये केदारनाथ धामाच्या दर्शनासाठी व पूजनासाठी गेलेल्या लाखो व्यक्ति पुरात वाहून गेल्या. अंध-श्रद्धाभक्ति करणारे परिवारचे-परिवार मारले गेले. जर हीच साधना पवित्र गीतेत सांगितल्याप्रमाणे असती तर तेथे जाणारे श्रद्धाळू मेले असते तरी पुण्याच्या बरोबर परमात्म्याच्या दरबारात गेले असते. शास्त्रविरुद्ध भक्ति करत असताना असे मरत असतिल तर ते जीवन व्यर्थ आहे.

## ''तीर्थ व धामाची अन्य माहिती''

कोण्या साधक ऋषिंनी एका ठिकाणी जलाशयावर बसून साधना केली व आपल्या आध्यात्मिक शक्तीचे प्रदर्शन केले. तो आपली भक्ति कमाई सोबत घेऊन आपल्या इष्टलोकी गेला. त्या साधना स्थळाचे नंतर तीर्थ किंवा धाम असे नाव पडले. आता जर कुणी त्या स्थानाला बघायला जाईल की इथें कुणी असा साधक राहत होता. ज्यांनी बऱ्याच लोकांचे कल्याण केले. आता तर तो संत तेथे नाही, जो उपदेश देईल. तो तर आपली कमाई करून निघून गेला.

विचार करा :- कृपया तीर्थ व धामास एक उखळ (हमोमदस्ता) समजा. (एक दिड फुटाचे लोखंडाचे गोल पात्र जवळपास नऊ इंच व्यासाचे उखळासारखे असते तसेच दिड फुट लांब तसेच दोन इंच व्यासाचे गोल लोखंडाचा दांड्यासारखे मुसळ जसे असते जी सामुग्री औषध व इतर सामुग्री कुटण्याच्या कामी येते, त्यास उखळ (हमोमदस्ता) म्हणतात.) एका व्यक्तीने आपल्या शेजाऱ्याचे उखळ मागून आणले. त्यांने हवनाची सामुग्री कुटली तसेच धुवून-पुसून परत केले. ज्या खोलीमध्ये ते उखळ ठेवले होते त्या खोलीत सुगंध येऊ लागला. घरच्या सदस्याने पाहिले कि हा सुंगंध कोठून येतो तर त्यांना कळले कि हा सुगंध त्या उखळाचा येतो. ते समजून गेले कि शेजाऱ्याने ते नेले होते, त्याने सुगंधी वस्तु कुटल्या आहेत. काही दिवसांनंतर तो सुगंध येणे थांबले.

याचप्रकारे तीर्थ आणि धामास एक उखळ (हमोमदस्ता) समजा. जसे सामुग्री कुटणाऱ्या व्यक्तीने आपल्या सर्व वस्तु पुसून ठेवले. मोकळे उखळ परत दिले. आता जर कुणी त्या उखळाचा चा सुगंध घेवून स्वत:ला कृत्यार्थ मानू लागला तर ती एक प्रकारची नादानी आहे. त्याला सुद्धा सामुग्री आणावी लागेल, तेव्हा पुर्ण लाभ होईल.

ठीक याच प्रकारे कोण्या धामावर व तीर्थावर राहणारा पवित्र आत्मा तर राम नामाची सामुग्री कुटून झाडून-पुसून आपली सर्व भक्ती साधना ची कमाईस सोबत घेऊन गेला. नंतर नादान श्रद्धाळू, त्या स्थानावर गेल्या मात्राने कल्याण समजले तर त्यांचे मार्गदर्शक (गुरुने)

**शास्त्र विधी रहित सांगितलेल्या साधनेचा परिणाम आहे. ती महान आत्मा संताप्रमाणे प्रभु साधना केली तरच कल्याण संभव आहे. त्यासाठी तत्वदर्शी संतांचा शोध घेऊन त्यांच्याकडून उपदेश घेऊन आजीवन भक्ति करुन मोक्ष प्राप्त केला पाहिजे. शास्त्र विधी अनुकूल सत साधना मुझ दास (रामपाल दास) जवल उपलब्ध आहे कृपया नि:शुल्क प्राप्त करा.**

## ''तीर्थ-स्थापनेचे प्रमाण''

**१. शुक्र तीर्थ कसे बनले?** :- श्री ब्रह्मा पुराण लेखक कृष्णद्वेपायन अर्थात व्यास जी प्रकाशक गीता प्रैस गोरखपुर पान १६७-१६८ वर भृगु ऋषि चे पुत्र कवि अर्थात शुक्रने गौतमी नदी च्या उत्तर किनाऱ्यावर जेथे भगवान महेश्वराची आराधना करुन ज्ञान ग्रहण केले होते, ते स्थान शुक्र तीर्थ म्हणुन ओळखले गेले.

**२. सरस्वती संगम तीर्थ आणि पुरुरव तीर्थ :-** श्री ब्रह्मा पुराण पान क्रं. १७२-१७३ वर एक दिवस राजा पुरूरवा, ब्रह्मा च्या सभेमध्ये गेले होते, तेथे ब्रह्मा जी ची मुलगी सरस्वतीस पाहुन तिला भेटण्याची इच्छा प्रकट केली. सरस्वती ने हा म्हटले. सरस्वती नदी च्या किनारी सरस्वती तसेच पुरूरवा ने अनेक वर्षापर्यंत संभोग (सैक्स) केला. एक दिवस ब्रह्मा ने त्यांना विलास करताना पाहिले. आपल्या मुलीला शाप दिला. तिचे रुप नदीत सामावले गेले. जेथे पुरूरवा तसेच सरस्वती ने संभोग केला होता. ते पवित्र तीर्थ सरस्वती संगम नावाने प्रसिद्ध झाले. जेथे पुरूरवा ने महादेवाची भक्ति केली ते स्थान पुरूरवा तीर्थ नावाने प्रसिद्ध झाले.

**३. वृद्धा संगम तीर्थ :-** श्री ब्रह्मा पुराण पान क्रं. १७३ ते १७५ एक गौतम ऋषि होते. त्यांचे एक हजार वर्ष वय होत पर्यंत विवाह झाला नव्हता. त्यांनी वेद ज्ञान देखिल वाचले नव्हते केवळ गायत्री मंत्रच येत होते. त्याचाच जाप करत होते. एक दिवस ते एका पर्वतावर एका गुहे मध्ये गेले. तेथे नव्वद हजार वर्षाची एक वृद्ध स्त्री भेटली. दोघांनी विवाह केला. एक दिवस वशिष्ठ ऋषि तसेच वाम देव ऋषि तेथील गुहेत अन्य ऋषिंबरोबर आले. त्यांनी गौतम ऋषिंची चेष्टा केली व म्हटले कि हे गौतम जी! ही वृद्ध आपली आई आहे की आजी? त्यांच्या तेथुन जाण्यानंतर दोघेही खुप दु:खी झाले. अगस्त ऋषिच्या विचाराने गोदावरी नदी च्या गौतमी किनाऱ्यावर गेले आणि कठोर तपस्या करु लागले. त्यांनी भगवान शंकर आणि विष्णु यांना प्रार्थना केली तसेच पत्नीसाठी गंगास देखील खुष केले. गंगा ने त्यांच्या तपाने प्रसन्न होउन म्हटले:- ब्राह्मण आपण मंत्र वाचन करुन माझ्या पाण्याने आपल्या पत्नीचा अभिषेक करा. त्यामुळे ती रूपवती होउन जाईल. गंगा जी च्या आदेशाने दोघांनीही एकमेकांसाठी असे केले. दोन्ही पति-पत्नी सुदंर रूपात झाले. ते पाणी मंत्रयुक्त होते. त्याने वृद्धा नावाची नदी वाहु लागली. त्याच ठिकाणी गौतम ऋषि ने त्या वृद्धा संगे जी युवती झाली होती तिच्यासोबत मन भरे पर्यंत संभोग केला. तेव्हापासुन त्या ठिकाणास ''वृद्धा संगम'' तीर्थ या नावाने ओळखले जाउ लागले. तेथेच गौतम ऋषि ने साधना करुन एक शिवलिंग स्थापित केले होते. ते देखिल वृद्धाच्या नावाने वृद्धेश्वर म्हटले गेले. ह्या वृद्धा संगम तीर्था ची कथा सर्व पापांचा नाश करणारी आहे. तेथे केलेले स्नान-दान सर्व आशा-आकांशा पुर्ण करणारे आहे.

**४. अश्वतीर्थ अर्थात भानु तीर्थ आणि पंचवटी आश्रमाची स्थापना :-** श्री ब्रह्मा पुराण पान क्रं १६२-१६३ तसेच श्री मार्कण्डेय पुराण पान क्रं १७३ ते १७५ वर लिहले आहे की ''महर्षि कश्यप चे ज्येष्ठ पुत्र आदित्य (सूर्य) आहे, त्यांच्या पत्नी चे नाव उषा आहे (मार्कण्डेय पुराण मध्ये सूर्य ची पत्नी चे नाव संज्ञा लिहले आहे जे महर्षि विश्वकर्मा च्या मुलीचे आहे) सूर्य पत्नी आपल्या पति सूर्य च्या तेजास सहन करु शकत नसल्याने दु:खी राहत होती. एक दिवस आपल्या

सिद्धि शक्ति ने अन्य स्त्री आपल्या ही स्वरूप ची उत्पन्न केली व तिला सांगितले की तु माझ्या पतिची पत्नी म्हणुन रहा तुझा तसेच माझा चेहरा एकसारखा आहे. तु हा फरक माझी मुले तसेच पति यांना सांगणार नाही हे बोलुन संज्ञा (उषा) तप करण्याच्या उद्देश्याने उत्तर कुरूक्षेत्रा मध्ये गेली. तेथे घोड़ी चे रूप धारण करुन तपस्या करु लागली. फरक माहित झाल्यानंतर सूर्य देखिल घोड़्या चे रूप धारण करुन तेथे गेला जेथे संज्ञा (उषा) घोड़ी च्या रूपात तपस्या करत होती. घोड़्या रूपात सूर्याने घोड़ी रूप धारी संज्ञा संगे संभोग करु इच्छिला. उषा (संज्ञा) घोड़ी रूपात तेथुन पळुन गौतमी नदी च्या किनारी आली घोड़ा रूप धारी सूर्याने देखिल पाठलाग केला. तेथे येउन घोड़ी रूपात आपल्या पतिव्रत धर्माचे रक्षण करण्यासाठी घोड़ा रूप धारी पतिस न ओळखता त्याच्याकडे आपला पृष्ठ भाग न करता तोंडाच्या बाजुनेच सामना केला. दोघांच्या नसा मिळाल्या. सूर्य वासना च्या वेगास रोकु शकला नाही तसेच घोड़ी रूप धारी उषा (संज्ञा) च्या तोंडाच्या बाजुनेच संभोग करण्याच्या उद्देश्याने प्रयत्न केला. नासिका द्वारा वीर्य प्रवेश मुळे घोड़ी रूप धारी उषा च्या तोंडुन दोन पुत्रा अश्वनी कुमार (नासत्य तथा दस्र) उत्पन्न झाले. तसेच उर्वरीत वीर्य जमीन वर पडल्याने रेवन्त नावाचा पुत्र उत्पन्न झाला. ते स्थान अश्व तीर्थ भानु तीर्थ तसेच पंचवटी आश्रम नावाने प्रसिद्ध झाले. त्याच ठिकाणावर सुर्याच्या मुलींना अरूणा तसेच वरूणा नावाच्या नदीमध्ये समागम झाले. त्यामध्ये वेगवेगळ्या देवातांचे आणि तिर्थांचे पृथक-पृथक समागम झाले आहे. उर्वरित संगमात सत्ताविस हजार तिर्थांचा समुदाय आहे. तेथे केलेले स्नान व दान अक्षय पुण्य देणारा आहे. नारद! त्या तिर्थाच्या स्मरणार्थ कीर्तन आणि श्रवणाने मनुष्य सर्व पापातुन मुक्त होउन धर्मवान् आणि सुखी होतात.

**५. जन स्थान तीर्थाची स्थापना :-** श्री ब्रह्म पुराण (गीता प्रैस गोरखपुर मधुन प्रकाशित) पान क्रं १६१-१६२ वर ऋषि याज्ञवल्क्यास राजा जनकाने विचारले कि हे द्विजश्रेष्ठ! मोठ्या-२ मुनिंनी निर्णय केला आहे कि भोग आणि मोक्ष दोन्हीही श्रेष्ठ आहेत. आपण सांगा! भोग मधुन मुक्ति कसी प्राप्त होते? ऋषि याज्ञवल्क्य जी ने म्हटले ह्या प्रश्नाचे उत्तर आपणास श्वशुर वरूण जी ठीक-२ सांगु शकतील. चला त्यांना विचारुयात. दोघेही भगवान वरूणाच्या जवळ गेले तसेच वरूण ने सांगितले कि ''वेदामध्ये हा मार्ग निश्चित केला आहे कि कर्म न करण्यापेक्षा कर्म करने श्रेष्ठ आहे. धर्म, अर्थ, काम तसेच मोक्ष हे चारही पुरूषार्थ कर्मातुन बांधली आहे. नृप श्रेष्ठ! कर्म द्वारा सर्व प्रकारच्या साधनांची सिद्धी असते, याकरिता मनुष्यास सर्व प्रकारच्या वैदिक कर्माचे अनुष्ठान केले पाहिजे. यामुळे ते या लोकात भोग तसेच मोक्ष दोनीही प्राप्त करतात. अकर्म पेक्षा कर्म पवित्र आहे यापेक्षा राजा जनक ने ऋषि याज्ञवल्क्य यास पुरोहित बनवुन गंगा च्या किनारी अनेक यज्ञ केले. याकरिता त्या स्थान चे नाव ''जन स्थान'' तीर्थ च्या नावाने प्रसिद्ध झाले. त्या तिर्थाचे चिंतन केल्याने, तेथे गेल्याने आणि भक्ती पूर्वक त्याचे सेवन (पूजन) केल्याने मनुष्य सर्व अभिलाषित वस्तुंचे पात्र आणि मोक्ष चे भोगी होतात.

**उपरोक्त पुराणाच्या लेखाचा निष्कर्ष:- प्रमाण संख्या १ मध्ये म्हटले आहे कि भृगु ऋषिचा पुत्र शुक्र यांनी गौतमी नदीच्या उत्तर तटावर साधना केली होती ज्या कारणाने त्याचे नाव शुक्ल तीर्थ पडले. जर कुणी त्या तीर्थावर स्नान केल्यामुळे व तिथे बसलेल्या कामचोर व्यक्तीस दान केल्यामुळे मोक्ष मिळेल असे मानतो तो व्यक्ति ज्ञानहीन आहे. परमात्म्याची साधना ज्याप्रकारे शुक्राचार्याने केली होती. त्याचप्रकारची साधना कोणत्याही जागी बसून एखाद्या साधकाने केली तर जो लाभ शुक्राचार्य यांना झाला तसाच लाभ त्याला देखील होईल. अशी स्थिति प्रमाण संख्या ५ ची समजा कि राजा जनकाने गंगेच्या किनाऱ्यावर अनेक अश्वमेघ यज्ञ केले होते. एका अश्वमेघ यज्ञात करोडो रुपये (वर्तमानातील अरबो रुपये) खर्च**

झाले होते. त्यावेळेस राजा जनकाला स्वर्ग प्राप्ती झाली होती. जर कुणी अज्ञानी म्हणेल कि त्या जन स्थान तीर्थावर जावून व स्नान करून तसेच तिथ उपस्थित असलेल्या ऐबी (शराब, तबांखू, मांस सेवन करणारे) व्यक्तींना दान केले तर राजा जनकासारखा लाभ मिळेल. तर हि गोष्ट न्याय संगत आहे काय? एवढे सगळे करून सुद्धा राजा जनक मुक्त होऊ शकला नाही. तोच आत्मा कलियुगात संत नानकजीच्या रूपात श्री काळूराम मेहताच्या घरी जन्मले. नंतर कबीर परमेश्वराकडून नाम प्राप्त करून पूर्ण परमेश्वरांची भक्ति साधना केल्याने मोक्ष प्राप्त झाला. प्रमाण संख्या २ मध्ये ब्रह्माची पूत्री सरस्वतीने पुरूरवा नामक राजाबरोबर आपल्या पिताजीपासून लपुन संभोग (सेक्स) केला. पिताजीने ज्यावेळेस ते पाहिले त्यावेळेस तिला श्राप दिला. ते स्थान जिथ राजा पुरुरवा आणि सरस्वतीने दुराचार केला ते स्थान सरस्वती संगम तीर्थ या नावाने प्रसिद्ध झाले.

विचार करा :- अशा स्थानावर जाऊन स्नान केल्याने काही लाभ होऊ शकतो का? प्रमाण संख्या ३ मध्ये म्हटले आहे कि एक गौतम नावाच्या ऋषीने त्यांचे वय एक हजार वर्ष असताना नव्वद हजार वर्षे वयाच्या वृद्धेबरोबर विवाह केला. आपल्याला तरुण बनवण्याच्या उद्देशाने दोघांनी गोदावरी नदीच्या तटावर घोर तप केले. त्यानंतर मंत्राद्वारे जल मंत्रित करून एकमेकावर टाकले. दोघेही तरुण झाले. त्यानंतर त्यांनी त्या स्थानावर येथेच्छ संभोग अर्थात विलास (सेक्स) केला. ते स्थान पुढे वृद्धा तीर्थ नावाने प्रसिद्ध झाले.

विचार करण्यासारखी गोष्ट आहे कि अशा स्थानावर गेल्यावर आत्मकल्याण तर दूरच पतन मात्र होईल. आत्मउद्धार होणार नाही. प्रमाण संख्या ४ मध्ये म्हटले आहे कि सूर्याची पत्नी घोडीचे रूप धारण करून तप करत होती. सुर्य कामवासनेने (सेक्स प्रेशर) विव्हळ होवून घोड़ा रुप धारण करुन घोडी रुप धारी आपल्या पत्नीजवळ घोडीजवळ. घोडीने त्याला आपल्या पृष्ठ भागाकडे (मागे) जाऊ दिले नाही. सूर्य एतका कामवासनेच्या दबावामध्ये (सेक्स प्रेशर) होता कि तो घोडीच्या तोंडाकडुनच संभोग क्रिया करण्यास सुरुवात केली ज्या कारणाने त्यांना तीन पुत्र प्राप्त झाले. ते स्थान अश्वंतीर्थ नावाने प्रसिद्ध झाले. त्या ठिकाणी सूर्याच्या दोन मुली जाऊन नदी बनून वाहू लागल्या. त्या कारणाने ते स्थान पंचवटी आश्रम या नावाने प्रसिद्ध झाले. त्या स्थानाला भानू तीर्थ या नावाने देखील ओळखतात. त्या तिर्थाचा लाभ सांगितला आहे कि त्याच्या नुसत्या स्मरणाने तसेच कीर्तनश्रवण करण्याने तसेच याची कथा ऐकल्याने सर्व पापातून मुक्त होतो धर्मवान व सुखी होतो विचार करा पुण्यात्म्यानो काय अशा कथा ऐकून तसेच अशा ठिकाणावर जावून आत्म कल्याण शक्य आहे. यासाठी शास्त्रानुसार (पाच वेद व गीता) जी भक्ति करून सर्व पापापासून मुक्ति होवून पूर्ण मोक्ष संभव आहे.

## ''सर्व श्रेष्ठ तीर्थ''

**प्रश्न :- सर्व श्रेष्ठ तीर्थ कोणते आहे ज्याच्या सर्व तीर्थापेक्षा अधिक लाभ होईल?**

**उत्तर :- सर्व श्रेष्ठ चित्त शुद्धी तीर्थ आहे.**

**चित्तशुद्धी तीर्थ अर्थात तत्वदर्शी संताचा सत्संग सर्व तीर्थापेक्ष्या श्रेष्ठ आहे. :-** श्री देवीपुराण ६ वा स्कन्द अध्याय १० पृष्ट ४१७ वर लिहिले आहे व्यास जीने राजा जनमेजयास म्हणाले राजन! तीर्थ हे देहाला स्वछ करतात, पण मनावरचा मळ ते काढण्याची शक्ती तिर्थात नाही. चित्तशुद्ध तीर्थ हे गंगा इत्यादि तीर्थापेक्षा ही जास्त पवित्र मानले जाते. जर भाग्यानुसार चित्तशुद्ध तीर्थ सुलभ झाले अर्थात तत्वदर्शी संताचा सत्संग रुपी तिर्थ प्राप्त झाले तर मानसिक मळ धुवून जाईल या मध्ये कसलाच संशय नाही. परंतु राजन! या चित्तशुद्ध तीर्थास प्राप्त करण्यासाठी

ज्ञानी पुरुषाची अर्थात तत्वदर्शी संताची आवश्यकता आहे. वेद, शास्त्र, व्रत, तप, यज्ञ आणि धंनांनी चित्तशुद्ध होणे फार कठीन आहे. वशिष्ठ हे ब्रह्माचे पुत्र होते. त्यांनी वेद आणि विद्याचा सम्यक अभ्यास केला होता. गंगेच्या किनाऱ्यावर राहायचे आणि द्वेशामुळे त्यांचे विश्वामित्र ऋषिबरोबर वैमनस्य झाले होते. त्यांनी एकमेकांना श्राप दिला तसेच त्यांच्या मध्ये भयंकर युद्धं होऊ लागले. यावरून सिद्ध होते कि संताच्या सत्संगाने चित्तशुद्ध करणे अति आवश्यक आहे. अन्यथा वेद, ज्ञान, तप, व्रत, तीर्थ, दान तसेच धर्माचे जितके साधक आहेत ते सगळेच्या सगळे विशेष प्रयोजन सिद्ध करू शकत नाहीत. (श्री देवी पुराणातील लेख समाप्त).

**विशेष विचार :- उपरोक्त श्री देवी पुराणाच्या लेखावरून हे स्पष्ट आहे कि तत्वदर्शी संताच्या सत्संगापेक्ष्या कोणतेच तीर्थ श्रेष्ठ नाही तसेच तत्वदर्शी संतानी दाखवलेल्या मार्गानेच साधना केल्यानेच कल्याण संभव आहे. तीर्थ, व्रत, तप, दान वगैरे व्यर्थ प्रयत्न आहेत. तत्वदर्शी सन्ताच्या अभावामुळे केवळ चार वेदात वर्णीत भक्ति विधी पासून पुर्ण मोक्ष लाभ होणार नाही. परमेश्वर कबीरजी ने म्हटले आहे. :-**

सतगुरु बिन वेद पढ़ें जो प्राणी, समझे ना सार रहे अज्ञानी।।
सतगुरु बिन काहू न पाया ज्ञाना, ज्यों थोथा भुष छिड़ै मूढ किसाना।।
अड़सठ तीर्थ भ्रम-भ्रम आवै सर्व फल सतगुरू चरणा पावै।।
कबीर तीर्थ करि-करि जग मुआ, उड़ै पानी नहाय। सतनाम जपा नहीं, काल घसीटें जाय।।

**सूक्ष्म वेद (तत्वज्ञानात) सांगितले आहे कि :-**

अड़सठ तीर्थ भ्रम-भ्रम आवै। सो फल सतगुरू चरणों पावै।।
गंगा, यमुना, बद्री समेते। जगन्नाथ धाम है जेते।।
भ्रमें फल प्राप्त होय न जेतो। गुरू सेवा में फल पावै तेतो।।
कोटिक तीर्थ सब कर आवै। गुरू चरणां फल तुरंत ही पावै।।
सतगुरू मिलै तो अगम बतावै। जम की आंच ताहि नहीं आवै।।
भक्ति मुक्ति का पंथ बतावै। बुरा होन को पंथ छुड़ावै।।
सतगुरू भक्ति मुक्ति के दानी। सतगुरू बिना ना छूटै खानी।।
सतगुरू गुरू सुर तरू सुर धेनु समाना। पावै चरणन मुक्ति प्रवाना।।

**सरलार्थ :- पूर्ण परमात्मा द्वारे दिलेल्या तत्वज्ञानात म्हणजे सुक्षवेदात सांगितले आहे कि तीर्थ धामावर गेल्यामुळे काहीच पुण्य लाभ होणार नाही. खऱ्या तीर्थावर सतगुरूचा (तत्वदर्शी संत) सत्संग ऐकण्यास जाणे आहे. जिथे तत्वदर्शी संताचा सत्संग होतो, ते सर्वश्रेष्ठ तीर्थ तसेच धाम आहे. या कथनाचे साक्षी संक्षिप्त श्रीमददेवी भागवत महापुराणात देखिल आहे. त्यात ६ व्या स्कंदाच्या १० व्या अध्यायात लिहिले आहे कि सर्वश्रेष्ठ तीर्थ तर चित्त-शुद्ध तीर्थ आहे. जिथे तत्वदर्शी संताचा सत्संग चालू आहे. त्या आध्यात्मिक ज्ञानाने चित्त शुद्ध होते. शास्त्रोक्त आध्यात्मिक ज्ञान तसेच शास्त्रोक्त भक्ति विधीचे ज्ञान होते ज्यामुळे जीवाचे कल्याण होते. अन्य तीर्थ केवळ भ्रम आहेत. त्याच पुराणात लिहिले आहे कि सतगुरु रूपी तीर्थ मिळणे अत्यंत दुर्लभ आहे.**

**सूक्ष्मवेदात सांगितले आहे कि सतगुरु कल्पवृक्ष तसेच कामधेनु समान आहेत. जसे पुराणामध्ये म्हटले आहे कि स्वर्गात कल्पवृक्ष तसेच कामधेनु आहे. त्यांच्याकडे जे मागाल, सर्व सुविधा प्रदान करतात. याचप्रमाणे सतगुरू जी सत्य साधना सांगून सर्व प्रकारचे लाभ साधकाला प्रदान करवुन देतात तसेच आपल्या आशिर्वादाने अनेक लाभ देतात. भक्ति करवून मुक्तीचा रस्ता सोपा करतात. त्यामुळे म्हटले आहे कि,**

एकै साधै सब सधै, सब साधैं सब जाय। माली सींचै मूल को, फलै फूलै अघाय।।

शब्दार्थ :– एका सतगुरू रुपी तीर्थावर गेल्याने सर्व प्रकारचा लाभ होतो. सर्व तीर्थ–धामावर व अंध श्रद्धा भक्तीने सर्व लाभ समाप्त होतात. जसे की आंब्याच्या रोपाच्या मुळाला पाणी दिल्यामुळे झाड विकसित होवून बरेचसे फळ देते. जर त्या रोपाला उलटे करुन जमिनीच्या खड्यात फांद्या पुरून त्याला पाणी घातले तर ते रोप नष्ट होऊन जाते. कसलाच फायदा मिळत नाही. त्यामुळेच एका सतगुरु रूपी तीर्थावर गेल्यामुळे सर्व लाभ मिळतात. जसे की संक्षिप्त श्रीमद्देवीभागवत महापुराणात लिहिले आहे कि सतगुरु रूपी तीर्थ मिळणे अति सुर्लभ आहे. हा दास (लेखक रामपाल दास) विश्वातील एकमेव सतगुरु तीर्थ आहे म्हणजेच तत्वज्ञानी आहे. या आणि सत्य भक्ति प्राप्त करून जीवन सफल करा.

तुम्हाला परत आठवण करून देतो कि गीता शास्त्राचे ज्ञान हे चार वेदांचा (ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद तसेच अथर्ववेद) सारांश आहे. वेदाचे ज्ञान पूर्ण परमात्म्याने म्हणजेच परम अक्षर ब्रह्म ने दिलेले आहे जे कालब्रह्मच्या अंत:करणात टाकले होते. कालब्रह्मच्या श्वासावाटे ते त्याच्या शरीरातून बाहेर आले होते ज्याचा काही अंश कालब्रह्मने जाणून–बुजून समाप्त केला होता. उरलेला भाग आपला पूत्राला ब्रह्माजीला दिला. श्रीकृष्ण द्वैपायन यांनी त्याला चार भागात (ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद) विभागले. ज्या कारणामुळे त्यांना वेदव्यास (वेदाचे विस्तारक) असे म्हणु लागले. हेच ज्ञान श्रीमद्भगवत गीतेत कालब्रह्मने श्रीकृष्णजीच्या शरीरात प्रवेश करून सांगितले. त्यामुळेच गीतेच ज्ञान हे परमात्म्याने सांगितलेले आहे. पुराणाचे ज्ञान हे श्री ब्रह्मा जी तसेच ऋषिचे अनुभव आहे. पुराणात जे ज्ञान गीता–वेदांशी मिळत नाही, ते शास्त्र–विरुद्ध आहे. त्याला आधार मानून साधना करणे व्यर्थ आहे.

❖ चार वेद (ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद तसेच अथर्ववेद) तसेच याचेच सार रूप गीता मध्ये केवळ ब्रह्म (याला काल ब्रह्म देखिल म्हणतात) पर्यंत चीच साधनाचे ज्ञान आहे. या शास्त्रात परम अक्षर ब्रह्म अर्थात त्या परमेश्वराच्या साधनाचे ज्ञान नाही ज्या विषयी गीता ज्ञान दाताने गीता अध्याय १८ श्लोक ६२ मध्ये म्हटले आहे कि हे भारत ! तू सर्व भावाने त्या परमेश्वराच्या शरणामध्ये जा. त्याच्या कृपेने तू परमशांतीस तसेच सनातन परम धामास प्राप्त होशील.

❖ त्या परमेश्वराचे ज्ञान समजण्यासाठी गीता अध्याय ४ श्लोक ३२,३४ मध्ये म्हटले आहे कि त्या तत्वज्ञानास जे स्वत:हा परमेश्वराने आपल्या मुख कमलाद्वारे बोलुन वाणीद्वारा सांगितले आहे, ते तत्वदर्शी संताकडे जाऊन समज. यावरून सिद्ध होते कि गीतेमध्ये ते ज्ञान नाही कि तो परमेश्वर कोण आहे तसेच त्यांच्या प्राप्तीचे साधनेचे वर्णन नाही, परंतु गीतेचे ज्ञान आपल्या स्तरापर्यंतचे सत्य ज्ञान आहे. जसे की दहावी वर्गा पर्यंतचा पाठ्यक्रम आहे, तो त्या स्तरापर्यंत सत्य ज्ञान आहे, परंतु बी.ए. तसेच एम.ए. चा नाही. तो सूक्ष्मवेद म्हणजेच तत्वज्ञानात आहे. सूक्ष्मवेद पाचवा संपूर्ण वेद आहे ज्यात गीता–वेद व पुराणाचे ज्ञान सुद्धा आहे. जे यांच्यात नाही, ते ज्ञान देखील आहे. वर्तमानात सूक्ष्मवेदाचे संपूर्ण ज्ञान विश्वामध्ये माझ्या शिवाय (लेखका शिवाय) कुणाकडेच नाही.

## सूक्ष्मवेदाचे रहस्य

वेदाचा अर्थ आहे ज्ञान. चार वेद अगोदर एकच वेद (ज्ञान) होता. ऋषि कृष्ण द्वैपायन पुत्र ऋषी पारासर यांनी यास चार भागात विभाजन करुन ऋग्वेद, यजुर्वेद,सामवेद तसेच अथर्ववेद नाव दिले. ज्या कारणाने ऋषिजींना वेदव्यास म्हणू लागले ज्याचा अर्थ आहे ''वेद विभाजक''. चार वेदामध्ये ऋषि वेदव्यासांनी काहीही मिसळले नाही. फक्त चार भाग केले

आहेत. चार वेद तसेच सूक्ष्मवेद पुर्ण परमात्मा म्हणजेच परम अक्षर ब्रह्म (सत पुरुष) यांनी प्रदान केले आहेत. यापुढे विस्ताराने वर्णन आहे.

➢ प्रथम पुराण देखिल एक बोध (ज्ञान) होता जो ब्रह्मा जींनी आपल्या कुळातील दक्ष तसेच मनू इत्यादी ऋषिनां ऐकवला होते ज्यात आपल्या उत्पत्ति नंतरचा घटनाक्रम सांगितला होता. पुराणात ब्रह्माजीने काही वेद ज्ञान तसेच बरेचसे आपले अनुभव सांगितलेले आहेत. पुराणाचे ज्ञान वेदाबरोबर मिळत होते, ते ब्रह्माजी द्वारा सांगितलेले आहे. त्यानंतर ऋषिंनी पुराण बोधाचे आठरा भाग बनवले. प्रत्येक ऋषिनी ब्रह्माजीं कडुन ऐकलेल्या ज्ञानात आपला अनुभव देखील जोडुन विस्तार केला. पुराणात श्राद्ध-पिंडदान, मूर्ति-पूजा इत्यादी-इत्यादी तसेच काही मंत्र जाप ऋषिंनी लिहले तसेच काल ब्रह्मने म्हणजे सदाशिवाने भ्रमित करण्यासाठी शिवलिंग पूजा वैगेरे सांगितली जी वेदाच्या विरूद्ध असल्यामुळे मान्य नाही. तसेच ती व्यर्थ साधना आहे. अध्यात्म ज्ञानास समजण्यासाठी पुराणाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. वेद तसेच त्याचाच सारांश श्रीमदभगवत गीतेचे ज्ञान पूर्ण ब्रह्म ने दिले आहे, ते सत्य आहे. मान्य आहे तसेच ते लाभदायक व मोक्षदायक आहे.

## चार वेद तसेच सूक्ष्म-वेद कसे प्राप्त झाले?

❖ सर्वप्रथम सतपुरुषाने (परम अक्षर ब्रह्म) सूक्ष्मवेद हा कालब्रह्मच्या (ज्योति निरंजन जो २१ ब्रंह्मांडाचा स्वामी आहे) अंत:करणात (हृदय) टाकला (E-mail केला होता). संपूर्ण अध्यात्म ज्ञान म्हणजेच सूक्ष्मवेद काल ब्रह्मच्या श्वासाबरोबर बाहेर आला. त्यान सूक्ष्मवेद वाचला. सूक्ष्मवेदात सत्पुरुषाचे तसेच सतलोकाचे (सनातन परम धामाचे) संपूर्ण विवरण होते. आपण का जन्म-मरणत आहोत? जन्म-मरणापासून मुक्ति तसेच सतपुरुष तसेच सतलोकाची प्राप्ती कशी होते? हे विस्ताराने सांगितले होते. हा काल ब्रह्म ज्याला वेदाचे विद्वान ब्रह्म म्हणतात, धोकेबाज आहे. त्याने त्या सूक्ष्मवेदातून ते प्रकरण काढून नष्ट करून टाकले ज्यामध्ये वरील वर्णन होते. शेष ज्ञान ठेवले ज्याने प्राण्याचे जन्म-मरण तसेच अन्य प्राण्यांचे शरीर प्राप्त करण्याचे चक्र कायम चालू राहील. त्यापाठीमागे काल ब्रह्मचा विशेष स्वार्थ आहे जो आपण पुढे वाचाल. शेष उरलेल्या वेदज्ञानास श्री वेदव्यास ऋषिजींनी चार भागात (ऋग्वेद, यजुर्वेद,सामवेद तसेच अथर्ववेद) विभाजित केले जे वर्तमानात प्राप्त आहेत. वेदाचे जे महत्वपूर्ण ज्ञान, कालब्रह्माने नष्ट केले होते, ते सांगण्यासाठी सतपुरुष (परम अक्षर ब्रह्म) स्वत: पृथ्वीवर प्रकट होवून आपल्या मुख कमलाद्वारे दोहे, चौपाई, कविता इत्यादींच्या रूपात बोलून सांगतात. ती वाणी लिहिली जाते. ती सतपुरुषाची वाणी म्हटली जावू लागते. त्या वाणीत संपूर्ण आध्यात्मिक ज्ञान आहे. उपरोक्त वर्णनाची पुष्टी साठी कृपया वाचा जे पुढे विस्तारपुर्वक सांगीतले आहे.

❖ याच पुस्तकात ''अंध श्रद्धा भक्ति खतरा-ए-जान'' मध्ये अध्याय ''सृष्टि रचना'' आहे. त्याच वाचन केल्यानंतर समजेल कि आपण सगळे प्राणी जे काल ब्रह्म च्या एकविस ब्रह्मंडात जन्म-मृत्यु व अन्य अनेक कष्ट सहन करत आहोत, कसे आलोत? का जन्मतो आणि मरतो? काही संक्षिप्त वर्णन येथे केले जात आहे.

आम्ही सर्व प्राणी, मानव, पशू-पक्षी इत्यादींचे शरीर धारण करून राहत आहोत. अगोदर त्या सनातन परम धामात (सत्यलोकात) परम अक्षर ब्रह्म सोबत राहत होतो. तिथे जरा-मरण व जन्म नाही. त्यामुळे तिथे परम शांति आहे. त्यामुळे गीतेचे ज्ञान सांगणाऱ्या ने अध्याय १८ श्लोक ६२ मध्ये सांगितले आहे कि हे भारत! तू सर्व भावाने त्या परमेश्वराला

(तत् ब्रह्म) शरण जा. त्या परमेश्वराच्या कृपेने तू परमशांतिला तसेच सनातन परमधामास प्राप्त होशील.

❖ जो पर्यत जन्म-मृत्यू समाप्त होणार नाही, तो पर्यत जरा म्हणजे वृद्धावस्था देखील येईलच. जरी पूर्ण जीवन जगून मृत्यू झाला तरीही जीवाला परम शांति प्राप्त होऊ शकत नाही. त्यामुळे गीता अध्याय १५ श्लोक ४ मध्ये म्हटले आहे कि तत्वज्ञानाच्या प्राप्ती नंतर त्या परमेश्वराचा शोध घेतला पाहिजे जिथे गेल्यानंतर साधक परत माघारी संसारात कधीच येत नाही. ज्या परमेश्वराने संसाररूपी वृक्षाचा विस्तार (सृजन) केला आहे, त्याची भक्ति करा.

गीता ज्ञान देणारा तर स्वत: जन्म-मरणाात आहे. प्रमाण गीता अध्याय ४ श्लोक ५ अध्याय २ श्लोक १२ आणि अध्याय १० श्लोक २ मध्ये. त्याने आपली भक्ति करण्यासाठी गीता अध्याय ८ श्लोक ५ आणि ७ मध्ये म्हटले आहे. त्याच्या भक्ति मुळे जन्म-मरण नेहमी चालू राहील. उपरोक्त परम शांति होणार नाही. गीता ज्ञान सांगणाऱ्याने आपल्या साधनेचे ज्ञान गीता अध्याय ८ श्लोक १३ मध्ये सांगितले आहे कि माझे ब्रह्म केवळ एक 'ओम'(ॐ) अक्षर आहे. याचे स्मरण करणाऱ्याला ब्रह्मलोक प्राप्त होतो आहे ज्या ठिकाणी अन्य देवतांच्या भक्ति पासून मिळणाऱ्या स्वर्ग सुखापेक्षा हजार पटीने जास्त लाभ प्राप्त होतात. परंतु ब्रह्मलोकात गेलेले देखील परत पुनरावर्ती (जन्म-मरण) मध्ये येतात. (प्रमाण गीता अध्याय ८ श्लोक १६ मध्ये) गीता सांगणारे प्रभू क्षर पुरुषास इष्ट मानून भक्ति करणाऱ्यास परम शांति प्राप्त होऊ शकत नाही. त्यामुळे गीता अध्याय १८ श्लोक ६२ मध्ये आपल्या पेक्षा अन्य त्या परमेश्वराच्या शरणामध्ये जाण्यास म्हणजे इष्ट मानून भक्ति करण्यास गीता ज्ञानदात्याने सांगितले आहे. त्यासाठी गीता अध्याय ४ श्लोक ३४ मध्ये कोण्या तत्वदर्शी संताकडून तत्वज्ञान (सूक्ष्म) वेद जाणून घेण्याचे सांगितले आहे कारण सूक्ष्मवेदाचे ज्ञान गीतेत व वेदांत नाही.

❖ जसे की वर सांगितल्याप्रमाणे आपण सगळे त्या परमेश्वरासोबत (सतपुरुष) राहत होतो. तिथे आपने चूक केली होती. आम्ही आपले परम सुखदाई परमात्मा (सतपुरुष) च्या पेक्षा कालब्रह्म मध्ये आस्था बनवली होती. तो सतलोकात तप करुन घोर तपस्या करत होता. आम्ही त्याला चांगली व्यक्ति समजुन मनापासुन आवड निर्माण झाली. नेमकी हीच चूक प्रकृतीदेवीनेही केली. तीने सुद्धा त्याला चांगली व्यक्ति समजून आसक्त झाली. ज्या कारणाने परमात्मा म्हणजेच सतपुरुषाचे आमचा त्याग केला. या काल ब्रह्मने तपस्येच्या प्रती फळा मध्ये सतपुरुषाकडून एकविस ब्रह्मांड प्राप्त केले आहेत. त्याने सतलोकामध्ये युवती प्रकृती देवी (दुर्गा) बरोबर दुष्कर्म करण्यासाठी प्रयत्न केला होता. प्रकृती देवीने (दुर्गा) आपल्या इज्ज़तीच्या रक्षणासाठी सूक्ष्म रूप धारण करुन व काल ब्रह्मच्या उघडलेल्या मुखाद्वारा त्याच्या पोटात निघुन गेली. परम अक्षर ब्रह्म ने देवीला काल ब्रह्मच्या पोटातून काढले व देवीसहित आपण सर्वांना काल ब्रह्मसोबत सत्यलोकापासुन सोळा (१६) संख कोस (४८ शंख कि.मी.) दूर येथे पाठवले गेले.

परम अक्षर ब्रह्म ने प्रकृतीदेवी बरोबर केलेल्या दुरव्यवहारा मुळे काल ब्रह्मस एकविस ब्रह्मांडासहित सतलोकातून काढून टाकले.

इथे आल्यानंतर या कालने आपली आठवण लुप्त करून टाकली कि आपण कोठून आलो आहोत? जन्म-मरण कोणत्या कारणामुळे होत आहे? आपणावरती भक्ति करत असताना देखील कष्ट येत राहतात? काय कारण आहे?

❖ सतपुरुषाने म्हणजेच परम अक्षर ब्रह्म ने पाहिले कि माझे अबोध मुले या धोखेबाज

ज्योति निरंजन म्हणजेच कालब्रह्म सोबत आपल्या चुकीने गेले आहेत. त्याने यांना सुखसागर स्थान (सनातन परम धाम) चे तसेच माझे ज्ञान देखिल समाप्त केले आहे. स्वत:ला परमेश्वर तसेच जगत उत्पन्नकर्ता तसेच पालनकर्ता सिद्ध केले आहे. त्यामुळे परमेश्वराने सूक्ष्मवेद (तत्वज्ञान) या काल ब्रह्म च्या अंत:करणात टाकले आहे म्हणजेच ई-मेल केला. सूक्ष्मवेदात ते सर्व वर्णन होते जे याच पुस्तकात पान न. १९२ वर सृष्टी रचनेत लिहिलेले आहे तसेच सत्य साधना देखिल लिहली आहे. ज्यास वाचुन-ऐकुन सत्यसाधना करुन प्रत्येक मानव (स्त्री/पुरुष) सतलोकामध्ये निघुन जातो. परमात्माच्या कृपेने ते संपूर्ण ज्ञान काल ब्रह्मच्या नासिके द्वारा श्वासांबरोबर बाहेर प्रकट झाले. काल ब्रह्म ने वाचले तर तो घाबरून गेला जर माझ्या सोबत आलेल्या प्राण्यांना या ज्ञानाची माहिती झाली तर सगळे माझ्या लोकातून निघून जातील.

त्याने विचार केला मला तर परमात्माने एक लाख मानव शरीरधारी प्राण्यांना नित्य खाण्याचा शाप दिला आहे. माझी भुख कशी शांत होईल? असा विचार करून या काल ब्रह्मने प्रकट झालेल्या सूक्ष्मवेदातून सृष्टि रचना आणि पूर्ण परमात्म्याच्या साधनेचे मंत्र काढून टाकले. केवळ आपला स्वत:च्या साधनेचा मंत्र ओम (ॐ) सोडुन दिला तसेच अन्य सामान्य ज्ञान सुद्धा सोडुन दिले. जे आध्यात्मिक ज्ञान शिल्लक राहिले म्हणजे चार वेदांना काल ब्रह्मने समुद्रात लपवून ठेवले. जे सागर मंथनातून बाहेर आले, कालब्रह्म ने आपली पत्नी अष्टांगी देवी (दुर्गा देवी) ला सांगितले कि चार वेदाचे ज्ञान जे सागर मंथनातून बाहेर येईल ते ब्रह्माला द्यावे तो वाचेल. ब्रह्माजींनी वेद प्राप्त केले आणि वाचले. त्यांनी वेदाला जसे समजले तसे ते आपल्या ऋषि पुत्रांना सांगितले. ज्यात स्पष्ट लिहले आहे कि जर साधक पूर्ण मोक्ष प्राप्त करू इच्छित असेल तर त्याने एक पूर्ण ब्रह्मची साधना इष्टरूपात करावी. अन्य देवी-देवताची साधना करू नये. विद्वान ऋषिनी वेदांना वाचून काही ब्रह्माजी कडून ऐकुन स्वत: निष्कर्ष काढला कि संपूर्ण वेदात केवळ यजुर्वेद अध्याय ४० मंत्र १५ मध्ये एक मंत्र ओम (ॐ) चा जप करण्याचे लिहले आहे. त्याच मंत्राला पूर्ण ब्रह्मची साधना समजून या (''ॐ'' नाम) चा जप केला. याचबरोबर वेदाच्या प्राप्ती च्या अगोदर जेव्हा ब्रह्माजी सचेत झाले तर कमळाच्या फुलावर विराजमान होते. विचार करत होते कि मी कोठून उत्पन्न झालो आहे? मला जन्म देणारा कोण आहे? या अगाध जलाशयात माझे काय प्रयोजन आहे? जवळपास कोणीही दिसत सूद्धा नाही.

त्यावेळेस काल ब्रह्मने आकाशवाणी करून सांगितले कि तप करा, तप करा!! ब्रह्माजीने त्या आकाशवाणीस पूर्ण ब्रह्मची समजून त्या फुलावर बसल्या बसल्या घोर तप केले. एक हजार वर्षापर्यंत तप करत असताना परत आकाशवाणी झाली सृष्टि करा. त्यानंतर त्यांनी त्या घोर तप साधनेला आपल्या मुलांना ऋषिंना करण्याचा उपदेश दिला. घोर तप करणे हे गीतेच्या आणि वेदाच्या विरुद्ध साधना असल्यामुळे मोक्षदायक नाही. (गीता अध्याय १७ श्लोक ५-६ मध्ये प्रमाण आहे कि जे शास्त्र विधिरहित घोर तप करतात. ते शरीराच्या कमला मध्ये विराजमान असणाऱ्या देवी-देवतां तसेच परमेश्वर सहित ते मला देखील क्रश करणारे आहेत. त्या अज्ञानाना तू असुर स्वभावाचे समज).

❖ चार वेदात वर्णीत साधनेने परमात्मा प्राप्ती होत नाही कारण काल ब्रह्मने प्रतिज्ञा केली आहे कि मी माझ्या वास्तविक रूपात कोणासही कधीच दर्शन देणार नाही. मी माझ्या योगमायेने आणि सिद्धिशक्तीने लपून राहील (प्रमाण गीता अध्याय ७ श्लोक २४-२५ मध्ये) त्यामुळे माझे दर्शन किंवा माझी प्राप्ती ना तर वेद वर्णीत विधिनी, ना तर काल द्वारा आकाशवाणी द्वारा तपाने होऊ शकत नाही.

प्रमाण :- गीता अध्याय ११ श्लोक ४८ मध्ये:- गीता ज्ञान दाता काल ब्रह्म आहे जो श्रीकृष्णाच्या शरीरात प्रवेश करून बोलत होता. म्हणतो कि हे अर्जुन! मनुष्य लोकात या प्रकारच्या रुपात मी न वेदात आणि यज्ञा च्या अध्ययनाने म्हणजेच वेदामध्ये लिहीलेल्या धार्मिक क्रियाना वाचून साधना केल्याने, ना दान केल्याने, ना अन्य क्रियाने (श्राद्ध, पिंडदान इत्यादि-इत्यादि कर्मकांड क्रियाने) ना उग्र तपाने मी दिसू शकतो. गीता अध्याय ११ श्लोक ३२ मध्ये स्पष्ट केले आहे कि मी काल आहे.

➢ ऋषिंनी ॐ नामाचा जाप तसेच ब्रह्माजीद्वारे सांगितलेले शास्त्रविधी रहित तप तसेच वेदांमध्ये वर्णीत हवन इत्यादी यज्ञांना केले. त्यांना परमात्माचे दर्शन झाले नाही. त्या ऋषिंना एक किंवा दोन सिद्धी प्राप्त झाल्या. त्याचेच प्रदर्शन करून लोकप्रसिद्धी प्राप्त करत राहिले. मोक्षापासून वंचित राहिले. त्या ऋषिंना काल ब्रह्मने छळ करुन काहींना आपला पुत्र ब्रह्माच्या रूपात दर्शन दिले त्यामुळे त्या ऋषिंना विश्वास झाला कि अन्य कुणीही परमात्मा नाही. हा साकार (सगुण) देवताच ब्रह्माच सर्व काही आहे.

➢ काही ऋषिंना श्री विष्णुच्या रूपात दर्शन दिले तर त्यांनी सुद्धा चुकून श्री विष्णुजीं नाच पूर्ण परमात्मा मानले जे साकार देवता आहेत.

➢ काही ऋषिना श्री शिवजीच्या रूपात दर्शन दिले तर त्यांनी देखिल श्री शिवजींना भ्रमवशात साकार देवतास पूर्ण ब्रह्म मानले.

ज्या ऋषिंनी श्री ब्रह्माजीच्या रूपात पाहिले होते. त्यांनी हजारोच्या संख्येने जावून श्री ब्रह्माजींना सांगितले कि आपण आपल्याला लपवत आहात. आम्ही साधना काळात समाधी दशेत आपले दर्शन केले. आपण पूर्ण परमात्मा आहात.

❖ ज्या ऋषिंनी श्री विष्णुजीच्या रूपात दर्शन घेतले होते त्यानी हजारोच्या संख्येने जावून विष्णुजीना सांगितले कि आपण पूर्ण परमात्मा आहात. आपण आपल्याला लपवत आहात.

❑ याचप्रमाणे ज्या ऋषिंनी श्री शिवजीच्या रूपात दर्शन घेतले होते त्यानी हजारोच्या संख्येने जावून शिवजींना सांगितले कि आपण पूर्ण परमात्मा आहात आपण आपल्याला लपवत आहात.

विशेष :- काल ब्रह्मद्वारे केल्या जाणाऱ्या छळाचे प्रत्यक्ष प्रमाण श्री शिव महापुराणात विद्यवेश्वर संहितेत आहे. उपरोक्त ऋषिंनी आपली आपली महिमा मंडन ऐकुन भ्रमित श्री ब्रह्माजी तसेच श्री विष्णुजी एक दुसऱ्याला आपला पुत्र आणि स्वत:लाच सर्वाचा मालक सांगितले. ज्या कारणाने दोघांचे युद्धं झाले. त्यावेळी तो काल ब्रह्म म्हणजेच सदाशिव आपल्या पुत्राच्या शिवाच्या रूपात प्रकट झाला आणि त्यांना भ्रमित केले कि मी सर्वांचा मालक आहे. तुम्ही ईश्वर नाहीत. त्या दोघांना त्याने आपल्या लिंगाच्या (गुप्तांग) आकाराचा दगडाचा लिंग बनवून त्यास दगडाच्या स्त्री योनित प्रवीष्टीत करुन दिऊन वेद विरुद्ध साधना त्या लिंगाची पुजा करुन कल्याण होईल असे सांगितले. त्यावेळी शिवजीच्या रूपात प्रकट झाला आणि म्हटले की तुम्हा दोघांना (ब्रह्मा व विष्णु) उत्पति आणि स्थिति दोन प्रकारचे कार्य दिलेले आहे आणि माझ्या स्वरूपासारख्या रुद्र तसेच शिव ला संहार तसेच तिरोभाव कार्य दिलेले आहे. यावरून सिद्ध होते कि काल ब्रह्म प्रतिज्ञावशात आपल्या वास्तविक रूपात दर्शन देत नाही. असा छळ करून प्रकट होतो.

❖ या कारणाने ऋषिना परमात्म्याची प्राप्ती झाली नाही. परंतु त्यांनी केलेल्या साधनेपोटी त्यांना सिद्धी प्राप्त झाल्या ब्रह्मलोकाची प्राप्ती झाली तसेच तपामुळे राज्य प्राप्ती आणि शेवटी

नरक प्राप्ती जन्म-मरण चक्र प्राप्ती झाली, कारण ॐ (ओउम्) नाम जपाच्या प्रतीफलस्वरूपात ब्रह्मलोक प्राप्त झाला. त्याठिकाणी आपला सुखी कार्यकाल संपवुन, पृथ्वी लोकात तपाच्या प्रतिफळात राजा बनले. कालब्रह्मचे अटळ विधान आहे कि जो जीव जसे कर्म करील, त्याला तसेच फळ मिळेल म्हणजेच पुण्य व भक्ति कर्माच्या योगे स्वर्ग तपाने राज्य तसेच पाप कर्मामुळे नरक आणि अन्य प्राण्याच्या शरीरात कष्ट भोगावे लागतील.

❖ या कर्म चक्रात महाकष्ट भोगत असलेल्या आपल्या आत्म्यावर दया करण्यासाठी वडीलाचे कर्तव्य पार पाडीत परम अक्षर ब्रह्म हे सूक्ष्मवेद (तत्वज्ञान) सांगण्यासाठी स्वत: पृथ्वीवर प्रकट झाले. जे वेद ज्ञान कालब्रह्मने नष्ट केले होते, त्याची पूर्ती केली.

❖ आपणाला चार वेद तसेच गीता वरून सिद्ध करतो कि वास्तवात पूर्ण परमात्मा पृथ्वीवर प्रकट होवून यथार्थ संपूर्ण आध्यात्मिक ज्ञान म्हणजेच सूक्ष्मवेद स्वत: आपल्या मुखाद्वारे सांगतात. त्याला लिहिले जाते. त्याला सच्चिदानंद घन ब्रह्म ची वाणी म्हणतात.

❖ चार वेद आणि गीता मध्ये जी भक्ति विधी आहे, ती जन्म-मरण समाप्त करण्याची विधी नाही परंतु तरीही ती पुराणाच्या भक्ति विधी पेक्ष्या हजार पटीने चांगली आहे. यात सांगितलेली भक्ति विधी शास्त्रोक्त आहे जी अन्य अंधश्रद्धा भक्ति पेक्ष्या मनमान्या आचारणा पेक्ष्या हजार पटीने लाभ देणारी आहे, परंतु त्यामुळे जन्म-मरण समाप्त करणे आणि परमेश्वराच्या त्या परमपदास प्राप्त होत नाही जिथे गेल्यानंतर साधक संसारात कधीच येत नाही. परंतु सूक्ष्मवेदात संपूर्ण अध्यात्म ज्ञान आणि जन्म मरणाच्या फेऱ्यातुन नेहमीसाठी सुटण्याची भक्ति विधी वर्णीत आहे. वेद गीताची साधना देखील आहे, याच्या पुढची साधना जी वेद गीतेत नाही ती तत्वदर्शी संताकडून जाणून घेण्यास सांगितले आहे.

प्रमाण:- यजुर्वेद अध्याय ४० मंत्र १० तसेच गीता अध्याय ४ श्लोक ३४ मध्ये :-

हे सांगण्यासाठी कि चार वेद तथा सूक्ष्मवेद कसे मिळाले, हे सगळे वर्णन करणे अनिवार्य आहे आणि पुढे ही केले जाईल. जर सरळ लिहू कि तत्वज्ञान परमेश्वराने (परम अक्षर ब्रह्म) दिले तर संशय येईल. त्यामुळे विस्तारपूर्वक लिहून स्पष्ट केले जात आहे.

❖ पवित्र गीता शास्त्रात सांकेतिक अनमोल ज्ञान आहे ज्यास आमचे हिन्दू धर्मगुरू समजू शकले नाहीत. याला केवळ तत्वदर्शी संत (सूक्ष्मवेद चा ज्ञाता) ही समजू शकतो आणि समजून सांगू शकतो. तो तत्वदर्शी संत हा दास (रामपाल दास) आहे.

❑ गीतेच्या सांकेतिक ज्ञानाने हे प्रमाणित करत आहे कि सूक्ष्मवेद (तत्वज्ञान) कुणी सांगितले. त्यानंतर वेदाद्वारे प्रमाणित केले जाईल.

➢ गीता अध्याय ४ श्लोक २५-३० पर्यंत सांगितले आहे कि ज्याला जेवढे ज्ञान यज्ञाबद्दलचे आणि धार्मिक अनुष्ठानाचे आहे, तो त्यालाच पापनाशक आणि कल्याणकारक समजून साधना करतो.

➢ गीता अध्याय ४ श्लोक २५:- यात लिहिले आहे कि काही अन्य योगीजन (साधक) देवतांची पूजा चांगल्या प्रकारे करतात. अन्य साधक परमात्म्यासाठीच्या तडफरुप आगीत आपल्या मतानुसार साधना करून जीवन नौछावर करतात.

➢ गीता अध्याय ४ श्लोक २६ मध्ये:- अन्य योगीजन (साधकजन) आपले डोळे-कान इत्यादि इंद्रियाना बंद करून संयम करुन आपली सफलता मानत आहेत म्हणजेच याच अग्नित म्हणजे तडफ मध्ये यालाच मोक्षदायक मानून आपले जीवन हवन म्हणजे नौछावर मानत

आहेत. अन्य साधक शब्द, स्पर्श, रूप, गंध या विकारावर आपल्या इंद्रियांना जाण्यापासून रोखण्याची म्हणजेच संयम करण्याची साधना रूपी अग्नित लागुन राहतात म्हणजे या विषयांचे हवन (नष्ट) करण्यामध्ये लागलेले असतात आणि काहीच साधना करत नाहीत. यालाच आपल्या भक्तीची सफलता मानून याच साधनेतच आपले जीवन समाप्त करत आहेत.

## ''श्रृंगी ऋषि व दशरथ-पुत्रि शांता ची प्रेम कथा''

{श्री तुलसी कृत रामायणामध्ये ''बाल काण्ड'' अध्यायामध्ये शांताचे काही वर्णन आहे. चौपाईत श्री रामचंद्राच्या विवाहाच्या वेळी वधू पक्ष्याच्या बायकांनी ही चेष्ठा (सीठणें) करतान म्हटले की हे रामजी! तुमची बहीण शांता ही श्रृंगी ऋषिसोबत पळून गेली होती कि विवाह करून गेली होती. विवाह तर आपल्या जातीच्या व्यक्तीबरोबर होतो. श्रृंगी ऋषि तर ब्राह्मण आहेत.}

उदाहरण :- श्रृंगी ऋषिंनी इंद्रियावर विजय मिळवण्यासाठी म्हणजे काम (Sex), क्रोध, मोह, अहंकार तसेच लोभ यांना वश करण्याच्या उद्देशाने कठीण साधना केली तसेच मान्य केले कि मी पाचही विकारावर (रूप, रस, गंध, स्पर्श, शब्द) नियंत्रण मिळवले आहे. संपुर्ण दिवसातून फक्त एकदाच झाडाच्या सालीला जीभ लावात होते. त्यानेच तृप्त होत असत. एक वेळी आपल्या भक्तीचे प्रदर्शन करण्यासाठी श्रृंगी ऋषी अयोध्याच्या जवळ जंगलामध्ये एका वृक्षाकडे तोंड करून बसले. दहा दिवस निघुन गेले. अयोध्येतील धार्मिक व्यक्तींनी खीर, हलवा इत्यादि स्वादिष्ट भोजन घेऊन गेले कि ऋषिजी साधंनेतून उठल्यावर त्यांना भोजन देऊ. परंतु श्रृंगी ऋषि दिवसातून एकदाच वृक्षाच्या खोडाच्या सालीला जीभेने चाटत होते. डोळे सुद्धा उघडत नव्हते आणि ध्यानमग्न होत असे. ऋषिंची चर्चा अयोध्या नगरीमध्ये अग्नीसारखी पसरली. राजा दशरथास माहीत पडल्यानंतर तर तो आपली मुलगी शांता तसेच राण्यांना सोबत घेऊन ऋषिच्या दर्शन करण्यासाठी गेले, परंतु ऋषिंनी डोळे उघडले नाहीत. फक्त एक वेळेस जीभेने त्या वृक्षाला चाटले. किती तरी दिवस असेच निघून गेले. दशरथ राजाची मुलगी तरुण होती. त्या वेळे पर्यत श्री रामचंद्र इत्यादी मुलांचा जन्म झालेला नव्हता. कौशल्या राणीपासून शांता मुलीचा जन्म झाल्यानंतर जवळपास २० वर्षापर्यंत कोणत्याही राणीला कोणीही मुले झाली नव्हते. त्यावेळेस शांति तरुण होती. ती दररोज आपल्या नोकराणींबरोबर ऋषिच्या दर्शनाला वडिल दशरथांची आज्ञा घेवुन जाऊ लागली. शांताने एका वैद्याला विचारले कि ऋषिजींची समाधी कशी उघडावी? त्याची विधी सांगा. वैद्याने सांगतले कि वृक्षाच्या ज्या जागेवर ऋषि आपली जीभ लावतात त्या जागी थोडेसे मध लावावे. शांता ने तसेच केले. अगोदर ऋषि दिवसातून फक्त एकदा जिभेने चाटायचे, त्या दिवशी दोन वेळा चाटले. दुसऱ्या दिवशी परत मध लावला. आता त्याने चार वेळा चाटले. तीसऱ्या दिवशी परत मध लावले, ऋषिंनी बऱ्याच वेळा चाटले आणि आपले डोळे उघडले. समोर बघितले तेव्हा शांताने आपला परिचय दिला आणि भोजन करण्याची विनंती केली. ऋषिंनी केवळ खीर खाल्ली. राजा दशरथाने ऋषिंना आपल्या घरी येण्याची विनंती केली. ऋषिंनी त्याला लगेच सहमति दिली. शांता बेटीला ऋषींची सेवा करण्यास सांगितले. शांता आपल्या नोकराणींकडुन भोजन बनवून स्वत: ऋषिकडे घेऊन जाऊन खाऊ घालायची. बऱ्याच वेळ परमात्म्याची चर्चा करत होती. राजा दशरथाने श्रृंगी ऋषिकडे मुलासाठी याचना केली. ऋषिंनी पुत्र प्राप्ती साठी एक यज्ञ करण्याचा सल्ला दिला तसेच म्हटले की त्या यज्ञास मीच करेल तर आपणास अवश्य पुत्र प्राप्ती होईल. शुभ मुहूर्त पाहून सहा महीने पुढची वेळ यज्ञासाठी निश्चित केली गेली.

श्रृंगी ऋषि राजा दशरथाला म्हणाले कि मी आपल्या मुलीबरोबर शांताबरोबर लग्न करू इच्छितो. ऋषिचे वय ४० वर्षाचे आणि शांताचे वय २० वर्षाचे. राजा दशरथ क्षत्रीय तर श्रृंगी ऋषि ब्राह्मण जातीचे. त्यामुळे राजा दशरथ धर्मसंकटात सापडून चिंता करू लागला. जर नकार दिला तर ऋषिच्या शापाचे भय लग्न करून दिले तर आपल्या जातीवाल्याचे भय. एका दुसऱ्या ऋषीने राजाला संकटात पाहून मधला मार्ग काढला. त्या दुसऱ्या ऋषीने शांताला दत्तक (गोद) घेतले आणि श्रृंगी ऋषिचा विवाह शांताबरोबर लावून दिला. श्रृंगी ऋषि शांताला घेवून वनात झोपडी बनवुन राहू लागले.

कथासार :– गीता अध्याय ४ श्लोक २६ चे तात्पर्य हे आहे कि काही साधक म्हणतात कि ज्यांनी आपल्या इंद्रियाचे दमन केले त्यांनाच मुक्ति मिळते. त्याच उदधेशाने श्रृंगी ऋषिंनी जंगलात साधना केली आणि मानवाच्या इंद्रियावर ताबा मिळवला. त्यामुळे अयोध्या शहराजवळ बसून आपल्या साधनेचे प्रदर्शन करू लागले. परंतु शेवटी काय झाले. ते इंद्रियांना ताब्यात ठेऊ शकले नाहीत.

सूक्ष्मवेदा मध्ये लिहिलेले आहे :–

कुरंग मतंग पतंग श्रंग भृंगा, इन्द्री एक ठग्यो तिन अंगा।

शब्दार्थ :– पाच विषय विकार आहेत (शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध)

➢ शब्द विषय :– शब्द म्हणजे संगीताचे आकर्षण कानाद्वारे शरीरात जावून जीवाला विवश करतो आहे. शब्द विषयाचा (विकारचा) प्रभाव हरणांमध्ये जास्त प्रमाणात असतो. मृगाला पकडणारे जंगलामध्ये वाद्य यंत्राने संगिताची विशेष धुन (Tune) काढतात ज्याला ऐकून आपल्या शब्द विकाराच्या वश झालेला कुरूंग (मृग) शिकाऱ्याच्या दिशेने ओढला जातो आणि शिकाऱ्यासमोर बसून धूंनीचा (Tune) आनंद घेऊ लागतो. शिकारी त्याला पकडून मारून आपला धंदा चालवतो आहे. हरिण एका विषयाला वश होऊन मरून गेला.

➢ स्पर्श विषय :– स्पर्श म्हणजे मादीबरोबर मिलन (Sex) करण्याचा विकार शरीरासोबत छेदछाड केल्याने वाढतो. हत्ती या विकाराच्या जास्त वशिभूत असतो. हत्तीला पकडणारे जंगलात एक वीस फुट रुंद व दहा फुट लांब आणि शंभर फुट खोल असा एक खड्डा खोदून त्यावर छोट्या पातळ लाकडाच्या बल्ल्या टाकून त्यावर ताजे गवत पसरवतात. ते असे दिसत कि जमीनीवरचे गवत आहे. त्यानंतर एका तयार केलेल्या हत्तीनीला, हत्तीच्या कळपात पाठविले जाते. ती हत्तीच्या शरीराला आपले शरीराने स्पर्श करते जसे गर्भधारणेच्या वेळी हत्तींणी हत्तींच्या शरीरासंगे छेडछाड करून प्रेरीत करते. ती कित्येक हत्तीच्या शरीरावर आपले शरीर घासून परत निघुन जाते. ज्या ज्या हत्तीशी तिने छेडछाड केली होती, ते सर्व हत्ती कामवासनेच्या प्रभावाने हत्तींनीशी मिलन (Sex) करण्याच्या इच्छेने तिच्या मागे–मागे पळू लागतात. हत्तीन जोरात पळत जाऊन त्या तयार केलेल्या खड्ड्यापासुन वाचुन बरोबर बाजुने निघुन खड्ड्याच्या मध्यभागी दुसऱ्या बाजुला उभी राहते. कामांध हत्ती खड्याला ओळखत नाहीत. हवसपूर्तीसाठी सरळ चालत जातात आणि खड्ड्यात पडून परवश होतात. एक स्पर्श म्हणजे कामवासना विकारामुळे विवश होऊन हत्ती नेहमीसाठी पराधीन होऊन जातात म्हणजे शिकाऱ्याचा जाळ्यात फसतात.

➢ रूप विषय :– रूप विषय डोळ्यारूपी इंद्रियाने प्रभावित होते ज्याचा सर्वात जास्त प्रभाव किटपतंगात पाहावयास मिळतो. तो दीपक किंवा मेणबत्तीच्या ज्योतिवर, रूपविकारवश प्रभावित होऊन, झडप घालून जळून मरतो. तो स्वत:च्या ताब्यात नाही. तो तर नेत्ररूपी

इंद्रियाच्या ताब्यात आहे.

➢ रस विषय :– रस विषय हा जीभ ह्या इंद्रियाद्वारे प्रभावित होतो. श्रंग (मासोळी) मध्ये रस या विषयाचा जास्त प्रभाव असतो. मासळी पकडणारे मच्छीमारांद्वारा एका लोखंडाच्या आकड्याला मासाचा तुकडा लावून तलावात टाकले जाते. मासळी जीभ इंद्रियाच्या वश होऊन रस विषयाने प्रभावित होवून त्यास खाण्यासाठी आंधळी होऊन आकड्याला पाहत नाही आणि आपल्या जीवनापासून हात धुऊन बसते म्हणजे काट्यामध्ये फसवून मच्छिमाराच्या हाताने मरण पावते. ती रस या विषयाने प्रभावित आहे. जीभ इंद्रियाच्या आधीन आहे.

➢ गंध विषय :– गंध विकार नासिका इंद्रियाद्वारा जीवाला प्रभावित करतो. भृंग (भुंगा) गंध विषयाच्या कारणाने फूल–बागेत जातो. फुलावर बसून सुंगद्धाच्या आनंदात मस्त होतो. रात्रीच्या वेळी फूल बंद होऊ लागते, परंतु तो भुंगा सुंगध घेण्याच्या धुंद मध्ये फुला मध्ये बंद होवून मरून जातो. त्या गंधापासून दूर होत नाही. भुंगा प्राणि नासिका इंद्रियांच्या अधीन आहे.

❖ सूक्ष्मवेदा मध्ये परमेश्वर कबीर जींनी समजावले आहे कि जे साधक शास्त्रविधीच्या विपरीत आपल्या इच्छेने मनमाना आचरण करुन आपल्या इंद्रियांना विषयांपासुन (विकारांपासुन) दुर करण्यासाठी दमन करतात आणि यालाच आपली आध्यात्मिक उपलब्धी तसेच सफलता मानत आहेत. हा त्यांना संपूर्ण आध्यात्मिक ज्ञानाचा अभावाच्या कारणाने भ्रम आहे कारण:–

कुरंग मतंग पतंग श्रंग अरू भृंगा। इन्द्री एक ठगा तिस अंगा।।
तुम्हरे संग पाँचों प्रकाशा। योग युक्त की झूठी आशा।।

शब्दार्थ :– परमेश्वर कबीरजीनी सूक्ष्मवेदात समजावले आहे कि, मृग, हत्ती, पतंग, मासळी तथा भुंगा हे तर फक्त एका–एका विषयाच्या प्रभावाने धोक्यात येतात आणि मरतात, वाचु शकत नाही.

हे मानव (स्त्री–पुरुष)! आपल्या मध्ये तर पाचही विषयाचा प्रबळ प्रभाव आहे. यामुळे पाचही इंद्रियाचे दमन करण्याचा व्यर्थ प्रयत्न करतात. वेळ आल्यावर तुम्ही ह्या इंद्रियाच्या दोषापासून वाचू शकत नाहीत. त्यावेळी इंद्रियाना अधीन करण्याची तुमची मनमानी साधना व्यर्थ सिद्ध होईल. त्यामुळे शास्त्रविरूद्ध उपासनाद्वारे योगयुक्त होण्याची आपली आशा खोटी होती. वर प्रमाण सांगितले आहे कि श्रृंगी ऋषिंनी अन्न–पाणी त्यागून स्वत:ला योगयुक्त मानले होते. गीता अध्याय ६ श्लोक १६ मध्ये हेच सांगितले आहे कि हा योग म्हणजे परमात्मा मिलनाची साधना आधिक खाणाऱ्याची अथवा बिलकुल न खाणाऱ्याची अधिक झोपणाऱ्याची अथवा बिलकुल न झोपणाऱ्याची सफल होत नाही. श्रृंगी ऋषिंनी बिलकुल न खाता पिता आणि बिलकुल न झोपण्याची क्रिया हठयोगाने केली. गीतेत सांगितलेली मर्यादा तोडल्यामुळे असफल झाले.

१. श्रृंगी ऋषि आपल्या जिभ इंद्रिय म्हणजे रस विकारामुळे मध चाटू लागले.

२. नेत्र इंद्रिय म्हणजेच रूपामुळे शांतावर आसक्त (मोहित) झाले. आपले उद्देशच विसरले.

३. श्रवण इंद्रियामुळे म्हणजेच शब्द विषयाद्वारे प्रभावित झाले कारण शांता महालाच्या बाहेर पार्कमध्ये मस्तीने फिरत होती आणि मधुर आवाजात गाणे गाय होती. श्रृंगी ऋषि ते ऐकुन–ऐकून कुर्बान झाले होते.

४. शांता सुगंधित तेलाचा प्रयोग करायची. त्यामुळे सुद्धा ऋषीचे आकर्षण झाले.

५. मुलगी आपल्या शरीराच्या अंगांना ऋषिला जाणून बुजून अजान बनुन स्पर्श करत होती. त्या कारणामुळे श्रृंगी ऋषि मुलीला प्राप्त करण्यासाठी तडफु लागले. आपला उद्देश विसरुन शांता बरोबर विवाह केला.

विचार करण्यासारखी गोष्ट आहे कि ती अनेक वर्षांची साधना जो इंद्रिय विषयांना (विकारांना) समाप्त करण्याचा काय प्रयोजन होते, ती व्यर्थ होती. परतु त्यास मोक्षदायक तसेच पाप नाशक समजून करत होता जो श्रृंगी ऋषी ची अध्यात्मिक ज्ञानाच्या अर्धवट पणाचा परिणाम होता.

कबीर परमेश्वरजीनी म्हटले आहे कि सर्व इंद्रिये मनाच्या अधीन आहेत. जोपर्यंत मनावर अंकुश ठेवला जात नाही तोपर्यंत इन्द्रियांना वशात करणे दुरापास्त आहे. कोणतीही साधना सफल होणार नाही. मनावर अंकुश केवळ तत्वज्ञानामुळे (सूक्ष्मवेद) ठेवता येतो. त्या ज्ञांनाचा अभाव आहे. पूर्णमोक्ष म्हणजेच जन्म–मरण तसेच जरा (वृद्धावस्था) पासुन सुटण्यामध्ये बाधा आहे.

❖ हे सूक्ष्मवेद (तत्वज्ञान) स्वत:हा परमेश्वराने (सच्चिदानंद घन ब्रह्म) पृथ्वीवर प्रकट होऊन आपल्या स्वत:च्या मुख कमलाद्वारे बोलुन वाणीद्वारा सांगितात. ज्याचे वर्णन गीता अध्याय ४ श्लोक ३२ तसेच ३४ मध्ये आहे. हे पुढे सांगितले जाईल. आता गीता अध्याय ४ च्या अन्य श्लोक २७ ते ३0 चे वर्णन करतो.

❖ गीता अध्याय ४ श्लोक २७ :– या श्लोकात म्हटले आहे कि अन्य साधक सुद्धा दहा इंद्रियाना म्हणजे पाच कर्मेंद्रिय (हात, तोंड, पाय, गुदा व लिंग) आणि पाच ज्ञानेद्रिय (कान, जीभ, डोळे, नाक, त्वचा) तसेच प्राण म्हणजेच श्वासाला साधण्याची क्रिया करून संतुष्ट होतात. येणाऱ्या जाणाऱ्या, श्वासावर लक्ष केंद्रित करून आपली साधना सफल झाल्याचे समजतात.

❖ गीता अध्याय ४ श्लोक २८ :– या श्लोकात म्हटले आहे कि बरेच साधक द्रव्य म्हणजे धनाद्वारे धार्मिक अनुष्ठान म्हणजे यज्ञ केल्यानेच संतुष्ट होतात. आम्ही आमचे पाप नष्ट केले म्हणजे यानेच मोक्ष झाला असे मानतात. द्रव्य यज्ञ तो आहे ज्याच्या द्वारे धार्मिक भोजन भंडारा, लंगर करणे, गरीबांना किंवा संतांना–भक्तांना घोंगडी, कपडे वाटणे, पाणीपोई लावणे, धर्मशाला, विहिरी बनवने इत्यादि इत्यादि. याच विषयावर गीता अध्याय ४ श्लोक ३३ मध्ये म्हटले आहे कि द्रव्य यज्ञापेक्ष्या ज्ञान यज्ञ श्रेष्ठ आहे. गीता अध्याय ४ श्लोक २८ मध्ये परत म्हटले आहे कि :–

➢ काही साधक घोर तप करून आपली साधना सफल झाल्याचे मानतात.

➢ काही योग आसन करून त्याने चालती कार रोकून तसेच छातीवर दगड फोडून दाखवतात. वजनदार गाडीला ओढून दाखवतात. हातावर चालून दाखवतात. ते यालाच मोक्षदायक, पापनाशक समजत (मानत) आहेत म्हणजे आपल्या जीवनाचे अंतिम उधीष्ट समजत आहेत.

➢ भरपुर जण तोंडावर कापडाची पट्टी बांधून, अनवाणी पायाने राहुन हिंसा चे व्रत म्हणजे परहेज करतात अर्थात हिंसापासुन वाचतात. मनमान्या मंत्राचा जाप करतात. यालाच पूर्ण साधना मानतात.

काही याच्या सोबत स्वाध्याय करतात म्हणजे नेहमी कोण्यातरी ग्रंथाचे पठन–पाठन

करत असतात. अशा प्रकारच्या यज्ञांना म्हणजे धार्मिक अनुष्ठानास करुन पापापासून मुक्ति समजतात.

❖ गीता अध्याय ४ श्लोक २९ ते ३० :- या दोन्ही श्लोकात म्हटले आहे कि अन्य साधक प्राणायाम क्रिया करतात. प्राण वायु तो आहे जो श्वासाद्वारे आत मध्ये शरीरामध्ये घेतात. अपान वायु तो आहे जो श्वासाद्वारे बाहेर सोडला जातो तसेच तो गुदद्वारा द्वारे गॅसच्या रूपाने बाहेर पडतो. त्याला सुद्धा अपान वायु म्हणतात. काही साधक अपान वायुला प्राण वायुत हवन करतात म्हणजे रेचक-कुंभक क्रियांचा अभ्यास करतात. काही नियमित भोजन करतात आणि प्राणायामाचा देखिल अभ्यास करतात. प्राणायाम करणारे श्वासाद्वारे आत घेणारा वायु तसेच अपान (अधोगती चा वायु) ला रोकून साधना करतात. याच योगिक क्रियाना मोक्षदायक मानत आहेत.

➢ उपरोक्त श्लोक २५ ते ३० पर्यत मध्ये म्हटले साधक आपआपल्या यज्ञाद्वारे म्हणजेच अध्यात्मिक क्रियाद्वारे पाप नाश होतो असे मानतात. पापरहित साधकच मोक्ष प्राप्त करतो. याचाच भावार्थ आहे कि सर्व साधक आपआपली धार्मिक क्रियांद्वारा मोक्षदायक मानतत.

❖ गीता अध्याय ४ श्लोक ३१ मध्ये म्हटले आहे कि हे कुरूश्रेष्ठ अर्जुना! उपरोक्त श्लोकांचे वर्णनामध्ये जे यथार्थ ज्ञान नाही, त्यास उरलेल्या यज्ञांना म्हणजे साधनांची क्रियांचे ज्ञान जे गीता मध्ये नाही, ते तत्वज्ञानात आहे ज्याचे वर्णन शिल्लक आहे. त्या उरलेल्या यज्ञांना म्हणजे धार्मिक साधनांचे ज्ञान अर्थात सुक्ष्मवेदाच्या अनुसार अनुष्ठांन करून उरलेला प्रसाद खाणारे तत्वज्ञानापासून परिचित होऊन सत्य साधना करून सनातन ब्रह्मस प्राप्त होतात. जे अशी भक्ति करत नाहीत, ते याच लोकात दू:खी राहतात तर ते वरच्या अन्य लोकात कसे सुखी राहतील? त्या सनातन परमात्मास तत्वज्ञानाद्वारे प्राप्त केले जाते.

तत्वज्ञान(सुक्षवेद) कसे प्राप्त झाले? त्याबद्दलचे संकेत गीता अध्याय ४ श्लोक ३२ मध्ये खालील प्रकारे आहे:

गीता अध्याय ४ श्लोक ३२ :- या श्लोकात सुक्ष्मवेदाच्या उत्पत्तीचा संकेत दिला आहे. म्हटले आहे कि सूक्ष्मवेदात या प्रकारच्या क्रिया (उपरोक्त क्रिया) तसेच अन्य यज्ञ म्हणजेच धार्मिक साधनाचे वर्णन विस्ताराने दिलेले आहे. उपरोक्त साधनेमुळे लाभ काय आणि हानी काय? हे सुद्धा सूक्ष्मवेदात सांगितलेले आहे. तसेच यथार्थ भक्ति साधना जी मोक्षदायक आहे त्याच वर्णन देखील सच्चिदानंद घन ब्रह्मने आपल्या मुखाद्वारे (ब्रह्मण मुखे) बोलून विस्तृतपणे सांगितले आहे. ते तत्वज्ञान (सूक्ष्मवेद) आहे ज्यात यथार्थ मोक्षदायक साधना आहे. ती साधना कर्म (कार्य) करत करत करण्याची आहे म्हणजे हठयोगाची आवश्यकता नाही. या प्रमाणे साधक सूक्ष्मवेदाला जाणून सत्य साधना करून मोक्ष प्राप्त करतो.

❑ प्रसंग चालला आहे कि सूक्ष्मवेद आणि चार वेदाचे ज्ञान कसे प्राप्त झाले?

➢ गीता अध्याय ४ श्लोक ३२ मध्ये संकेत केला आहे कि परम अक्षर ब्रह्मने आपल्या मुखाद्वारे जी वाणी बोलली त्यामध्ये समस्त आध्यात्मिक क्रियांचे (यज्ञों) वर्णन आहे. ते तत्वज्ञान (सूक्ष्मवेद) आहे. त्याला जाणण्यासाठी गीता अध्याय ४ श्लोक ३४ मध्ये सांगितले आहे कि कोण्या तत्वदर्शी संताकडून जाणून घेण्यासाठी म्हटले आहे. या वरुन सिद्ध होते कि हे ज्ञान गीतेत नाही.

गीता चार वेदाचे संक्षिप्त रूप आहे. अठरा हजार वेद मंत्राना सातशे मंत्रामध्ये समाविष्ठ करण्यासाठी सांकेतिक शब्दाचा प्रयोग केला आहे. गीता अध्याय ४ श्लोक ३२ मध्ये केवळ

एवढाच संकेत केला आहे कि ''ब्रह्मण: मुखे वितता'' म्हणजे सच्चिदानंद घन ब्रह्म आपल्या मुखाद्वारे वाणी बोलुन त्या वाणी मध्ये धार्मिक क्रियांचे (यज्ञांचे) विस्तारपूर्वक वर्णन करतो.

❑ याचेच विस्तृत वर्णन ऋग्वेदाच्या खालील मंत्रात केले आहे :-

(या ऋग्वेदाच्या मंत्रात तुम्ही तुमच्या डोळ्यांनी गूढ रहस्य वाचाल).

या वेदमंत्राचे भाषांतर देखील त्या व्यक्तीकडून केलेले आहे जे समजतात कि वर्तमानात आमच्या पेक्षा जास्त वेदाचे ज्ञान कुणालाही नाही. महर्षि दयानंदजी पेक्षा जास्त अध्यात्म ज्ञान व वेदाचे ज्ञानात विद्वान कोणालाच समजत नाही. महर्षि दयानंद जींनी त्यांच्या द्वारे लिहिलेले पुस्तक ''सत्यार्थ प्रकाश'' यात स्पष्ट लिहिले आहे कि जे वेदामध्ये लिहिलेले आहे, ते सर्व खरे आहे. आम्ही वेदाविरुद्ध कुणाच्याही म्हणण्याला मानणार नाही. त्या ठिकाणी माझे (महर्षि दयानंदाचे) जरी मत असेल म्हणजे वेदाविरुद्ध जर माझे (महर्षि दयानंदाचे) मत असेल तरी देखील ते खोटे समजा. महर्षि दयानंद जींनी सत्यार्थ प्रकाश या त्यांच्या पुस्तकात लिहिले आहे कि परमात्मा निराकार आहे. त्यामुळे तो कोणत्या वरच्या खालच्या लोकात एका ठिकाणावर बसलेला नाही किंवा तो येत जात देखील नाही. सर्व व्यापक असल्यामुळे तो कणा कणात विदयमान आहे.

❖ आता वेद काय म्हणतात पाहू या? ऋग्वेदाच्या मंत्राची खालील फोटोकॉपी ज्याचा अनुवाद महर्षि दयानंदाच्या शिष्याने केला आहे म्हणजेच आर्य समाजाच्या शास्त्रीने केला आहे. तुम्ही पहा वेदात काय लिहिले आहे:-

➢ परमेश्वर सर्वोपरी म्हणजे सगळ्यात वरच्या लोकात बसलेला (तिष्टती) आहे अर्थात तिथे विराजमान आहे. (तेथे विदयमान आहे)

प्रमाण :- ऋग्वेद मंडल न. ९ सूक्त ५४ मंत्र ३ मध्ये:- (सूर्य: न) सूर्याच्या समान म्हणजे सूर्य वर विदयमान आहे तसे (पुनान:) पवित्र (सोम देव:) शीतल अमर परमेश्वर (विश्वानी) विश्वातील सर्व (भूवनोपर तिष्ठति) लोकांच्या वरच्या लोका मध्ये बसलेला आहे.

➢ ऋग्वेद मंडल न. ९ सूक्त ९६ मंत्र १८ मध्ये म्हटले आहे कि पूर्ण परमात्मा आहे, तो वर आकाशात तिसऱ्या मुक्तिधामात विराजमान आहे (सोम: तृतीयम् धामं विराजम्).

➢ ऋग्वेद मंडल न. ९ सूक्त ९६ मंत्र १९ :- या मंत्रात म्हटले आहे कि तो परमात्मा त्या (तुरीयम् धाम) चौथ्या धामाची देखील (विवक्ति) विस्तारपूर्वक भिन्न वर्णन करतो ज्यात बसलेल्या परमात्म्याने त्याच्या खालील सर्व लोकांची रचना केली. तो लोक समुद्रासारखा आहे. ज्याप्रमाणे सर्व पाण्याचे मूळ स्तोत्र समुद्र आहे.

➢ ऋग्वेद मंडल न. ९ सूक्त ९६ मंत्र २०:- या मंत्रात स्पष्ट केलेले आहे कि तो परमात्मा या प्रमाणे पृथ्वीवर प्रकट होतो ज्याप्रमाणे मनुष्य (शुभ्र: तन्वम् मृजान: ) शुभ्र म्हणजे सर्व श्रेष्ठ शरीराला धारण करतो आहे आणि खाली असा राहतो आहे जसे कोणत्या संघाचा सेनापती राहत असतो म्हणजे परमात्मा सतगुरू रूपात प्रकट होतात. त्यांच्या अनुयायांच्या सेनापती रूपात राहत असतात. वरच्या लोकतून तो तीव्र गतीने चालुन पृथ्विवर येत असतात.

➢ ऋग्वेद मंडल न. ९ सूक्त २० मंत्र १ :- यात म्हटले आहे कि तो परमात्मा कवीरदेव आहे. सर्वाचे रक्षण करणारा आहे. तो जिज्ञासुना यथार्थ ज्ञान देतो व त्यांची ज्ञानाद्वारे तृप्ती करतो.

➢ ऋग्वेद मंडल न. ९ सूक्त ९४ मंत्र १ :- या मंत्रात म्हटले आहे कि तो परमात्मा

(कवियन् न व्रजम्) कवि प्रमाणे आचरण करत इकडे–तिकडे फिरतो अर्थात कविता आणि लोकोक्तिद्वारे तत्वज्ञान सांगत भटकत राहतो.

➢ ऋग्वेद मंडल न. ९ सूक्त ९५ मंत्र २ :– या मंत्रामध्ये म्हटले आहे कि (हरी) पूर्वोक्त परमात्मा (सृजान:) साक्षात पृथ्वीवर प्रकट होवून वाक् म्हणजे आपली वाणीद्वारे बोलून (ऋतस्य:) सत्य (पथ्याम्) भक्ति मार्गाची प्रेरणा करत असतो अर्थात खोट्या शास्त्र विरूद्ध साधनेपासून दुर होणे तसेच शास्त्रोक्त साधना करण्याची प्रेरणा करतो आहे म्हणजे सत्य भक्ति मार्ग सांगत आहे. (देवनाम् देव:) सर्व देवाचा प्रभू म्हणजे परमेश्वर स्वत:च (गुह्यानि) गुप्त (नाम आविष्कृणोति) भक्ति नाम मंत्राचा शोध करतो. (प्रवाचे) त्यास प्रवचन करून म्हणजे बोलून बोलून सांगतात.

➢ गीता अध्याय ८ श्लोक १३ मध्ये गीता ज्ञान दात्याने आपली भक्ति करण्याचा मंत्र एक ओम (ॐ) आहे हे तर स्पष्ट सांगितले आहे. गीता अध्याय १७ श्लोक २३ मध्ये (ब्रह्मण:) सच्चिदानंद घन ब्रह्म अर्थात परम अक्षर ब्रह्मच्या प्राप्तीचा संपूर्ण साधना मंत्र सांकेतिक ॐ, तत्, सत् हा तीन अक्षरी मंत्र लिहिला आहे. ओं (ॐ) मंत्र तर वेदात (यजुर्वेद अध्याय ४0 मंत्र १५) आणि गीतेत ब्रह्म अर्थात क्षर पुरुषाच्या साधनेचा प्रत्यक्ष मंत्र आहे. या शास्त्रात पूर्ण ब्रह्म (परम अक्षर ब्रह्म) च्या प्राप्तीचा मंत्र नाही. केवळ तत्, सत् सांकेतिक मंत्र लिहिले आहेत. या मंत्राचा आविष्कार परम अक्षर ब्रह्म स्वत: करतात. त्याचीच माहिती ऋग्वेद मंडल न. ९ सूक्त ९५ मंत्र २ मध्ये सांगितली आहे कि जसे गीता अध्याय न. १५ श्लोक १६–१७ मध्ये तीन पुरुष सांगितले आहेत.

१. क्षर पुरुष (काल ब्रह्म) :– हा गीता ज्ञान दाता आहे याच्या साधनेचे (मंत्र) नाव ॐ (ओं) आहे.

२. अक्षर पुरुष :– याच्या साधनेचे नाव गीता मध्ये ''तत्'' असे सांगितले आहे जे सांकेतिक आहे. वास्तविक नाव सूक्ष्मवेदामध्ये लिहिलेले आहे जे हा दास दीक्षा घेताना दीक्षा घेते वेळी दिक्षा घेणाऱ्याला सांगत असतो. ते सार्वजनिक केले जात नाही. परंतु सूक्ष्मवेदामध्ये सार्वजनिक आहे.

३. परम अक्षर पुरुष (परम अक्षर ब्रह्म) :– यांच्या साधनेचा नाम (मंत्र) सत् सांकेतिक आहे. याचा वास्तविक नाम (मंत्र) सूक्ष्म वेदात आहे. याच परमेश्वराची आपल्या मुख कमलद्वारा उच्चारित वाणी कविर्वाणीत (कबीर वाणी) लिहिली आहे. ज्याचे वर्णन गीता अध्याय न. ४ श्लोक न. ३२ मध्ये लिहिले आहे.

❖ प्रसंग वेदाचा चालू आहे. ऋग्वेद मंडल न. ९ सूक्त ९५ मंत्र २ चे वर्णन चालू आहे. त्यात असे म्हटले आहे कि परमेश्वर असे गुप्त नाम सांगतात, त्याच्या साधनेने साधक भव सागरातून अश्या प्रकारे तरुन जातो (आरितेव नावम्) जसे कि नावेत बसलेला व्यक्ति सकुशल जातो.

❖ ऋग्वेद मंडल न. ९ सूक्त ८६ मंत्र २६–२७: या मंत्रात स्पष्ट केले आहे कि परमेश्वर अमर लोकात तिसऱ्या प्रष्ठावर (स्थानावर) विराजमान आहे अर्थात तीथे तो आहे. (मंत्र २७)

यज्ञ म्हणजे धार्मिक क्रिया करणाऱ्या यजमानासाठी म्हणजेच पूजा करणाऱ्यासाठी आकाशातून विद्युत सारखी गती करुन त्या स्थानावरून चालुन येतात. सतलोकात परमेश्वराच्या (सतपुरुष) एका रोमाचा (शरीरावरच्या केसाचा) केसाचा प्रकाश करोडो सूर्य तसेच करोडो चंद्राच्या प्रकाशापेक्षा देखिल जास्त आहे. जर परमेश्वर त्याच प्रकाशयुक्त शरीरासहित पृथ्वीवर प्रकट झाले तर आपली चर्म दृष्टी तो प्रकाश सहन करू शकणार नाही. आपण पाहू शकणार

नाहीत. त्यामुळे परमेश्वर आपल्या शरीराचा प्रकाश कमी करून पृथ्वीवर येतात. वरणीय पुरुषांना म्हणजे श्रेष्ठ भक्तांना भेटतात. त्यांच्या संकटाचे निवारण करतात. तो परमात्मा कविर्देव आहे. (मंत्र न. २६)

❖ ऋग्वेद मंडल न. ९ सूक्त ८२ मंत्र १-२ :- या वेद मंत्रात वर्णन आहे कि जो सर्व उत्पादक म्हणजे ज्या परमेश्वरांनी सर्व ब्रह्मांडे आणि प्राण्याची रचना केली आहे, तो पापाचे हरण करतो आहे म्हणजे पापनाशक आहे. तो वर आपल्या लोकात राजा समान सिंहासनावर विराजमान आहे. डोक्यावर मुकुट धारण करून वर छत्र लावलेले आहे, दिसण्या मध्ये राजा समान दिसतो आहे. तो तिथून चालुन पृथ्वीवर येत असतो. वरणीय पुरुष म्हणजे श्रेष्ठ व्यक्ति, जे दृढ भक्त आहेत, त्यांनाच प्राप्त होतात. त्याला साक्षात भेटतात. त्यांना यथार्थ भक्ति चे ज्ञान असलेले सूक्ष्मवेद (तत्वज्ञान) सांगतात.

तो परमात्मा आपल्या चांगल्या आत्म्याना अश्या प्रकारे भेटतो जसे कि आकाशातील वीज त्याच पदार्थावर पडते ज्या पदार्थाची आकर्षण शक्ति जास्त असते. ज्या प्रकारे कास्य नावाच्या धातुवर वीज पडते किवा अन्य अशा स्थानावर जिथे आकर्षण जास्त आहे. पडते त्याच प्रकारे चांगल्या आत्म्यांना भेटतात. उदाहरण १. श्री धर्मदासजी सेठ बांधवगढ, मध्यप्रदेश वाले यांना भेटले. २. श्री नानक देवजी, सिक्ख धर्माचे प्रवर्तक यांना भेटले ३. संत गरीब दास (गाव-छुडांनी, जिल्हा-झज्जर, हरियाणा) यांना भेटले. ४. श्री दादू दास (अजमेर वाले) यांना भेटले. ५. श्री घीसा दास (गाव-खेखडा, जिल्हा-बाघपुर, उत्तरप्रदेश वाले) यांना भेटले. ६. श्री मलूक दास अरोडा यांना भेटले.

या सर्व संतांनी भक्तीची तीच विधी सांगितली जी सूक्ष्मवेदात परमेश्वरांनी स्वत: येऊन सांगीतलेली आहे. या वरुन हे सिद्ध होत आहे कि चार वेद, गीता आणि या संताचे ज्ञान सूक्ष्मवेदाशी मिळते जुळते आहे. परंतु पुराणाचे आणि उपनिषधाचे ज्ञान काही वेदाशी थोडेसे जुळते. काल ब्रह्मच्या प्रेरणेने मिथ्या ज्ञान लिहिलेले आहे. जसे की काल ब्रह्मने शिवपुराण (खेमचंद श्रीकृष्णदास प्रकाशन-मुंबईहून प्रकाशित) भाग न. १ च्या विद्यवेश्वर संहिता अध्याय न. ५ आणि ९ मध्ये आपले पुत्र ब्रह्मा आणि विष्णु यांना आपल्या लिंगाच्या (गुप्तांग) आकाराचा दगड स्त्री-लिंगी (गुप्तांग) आकाराच्या दगडात प्रवीष्टीत करून सांगितले कि या दोघांना असेच अभेद ठेवून अर्थात याच स्थितीत ठेवून पूजा करावी. तुमचे कल्याण होईल. या प्रकारची साधना शास्त्रविरूद्ध असल्यामुळे हानिकारक आहे. बेशरमी देखील आहे. जर ही पूजा शास्त्रसम्मत असती तर ती देखील केली असती. परंतु ती पूर्णपने व्यर्थ आहे (ऋग्वेद मण्डल न. ९ सूक्त ८२ मंत्र १)

➢ ऋग्वेद मण्डल न. ९ सूक्त ८२ मंत्र २:- या मंत्रात हे प्रमाण आहे कि परमात्मा यथार्थ ज्ञानाचा उपदेश करण्यासाठी महापुरुषांना भेटतात आणि अत्यंत गतिशील पदार्थासमान अर्थात आकाशातील वीज जशी **(Full Speed)** पूर्ण गतीने पृथ्वीवर येते त्याच गतीने परमात्मा पृथ्वीवर येतात. ते परमात्मा कविर्देव आहेत.

➢ ऋग्वेद मण्डल न. ९ सूक्त ९६ मंत्र १६-२० :- या मंत्रात सांगितले आहे कि :-

मंत्र १६ मध्ये प्रश्न केला आहे कि परमात्म्याचे गुप्त नाव काय आहे? मंत्र १७ मध्ये म्हटले आहे कि परमात्मा प्रत्येक युगात शिशु रूपात प्रगट होतात अर्थात बाळाच्या रूपात प्रगट होतात. त्यावेळी ते लीला करत मोठे होतात. त्यावेळी (काव्येना) ते काव्याद्वारे म्हणजेच दोहे, चौपाई, शब्द, कविता, लोकोक्तिच्या रूपात (कविर्गिर्भि) कविर्वाणीद्वारे (आम्ही याला

आपल्या भाषेत कबीरवाणी म्हणतो) यथार्थ आध्यात्मिक ज्ञान अर्थात सूक्ष्मवेद (तत्वज्ञान) उंच आवाजात सांगतात. ते लिहिले जाते. ते सर्वे आध्यात्मिक ज्ञान आहे. त्या परमात्म्याचे नाव कबीर परमेश्वर आहे. मंत्र न. १८,१९,२० चा सरल अर्थ या पूर्वी केलेला आहे.

➢ ऋग्वेद मण्डल न. ९ सूक्त १ मंत्र ९ :– या मंत्रात म्हटले आहे कि परमेश्वर जेव्हा शिशु रुपात पृथ्वीवर प्रकट होतात, त्यावेळी त्यांचे संगोपण म्हणजे बालक रुपातील पोषण कुमारी गायींद्वारा होते. वासरु (दिड वर्षे वयाची गायीची मुलगी) परमेश्वराच्या आर्शिवादाने बैलाद्वारे गर्भ धारण न करता दुध देते. त्या दुधास बालक रुपातील लिलाधारी परमेश्वर पितात.

❖ तुम्हाला विस्तारपूर्वक सांगितले आहे कि सूक्ष्मवेद कसा प्राप्त झाला. तुम्ही तुमच्या डोळ्याने वेदांच्या उपरोक्त मंत्राची फोटो कॉपी पहा.

## (पाहा फोटो कॉपी वेदमंत्राची)

### (प्रमाण ऋग्वेद मंडल नं. ९ सुक्त ८६ मंत्र २६–२७)

इन्दुः पुनानो अति गाहते मृधो विश्वानि कृण्वन्त्सुपथानि यज्यवे ।
गाः कृण्वानो निर्णिजं हर्यतः कविरत्यो न क्रीळन्परि वारमर्षति ॥२६॥

**पदार्थः**—(**यज्यवे**) यज्ञ करने वाले यजमानों के लिये परमात्मा (**विश्वानि सुपथानि**) सब रास्तों को (**कृण्वन्**) सुगम करता हुआ (**मृधः**) उनके विघ्नों को (**अतिगाहते**) मर्द्दन करता है। और (**पुनानः**) उनको पवित्र करता हुआ और (**निर्निजं**) अपने रूप को (**गाः कृण्वानः**) सरल करता हुआ (**हर्य्यतः**) वह कान्तिमय परमात्मा (**कविः**) सर्वज्ञ (**अत्यो न**) विद्युत् के समान (**क्रीळन्**) क्रीड़ा करता हुआ (**वारं**)वरणीय पुरुष को (**पर्य्यर्षति**) प्राप्त होता है ॥२६॥

**विवेचन :** हि फोटोकॉपी ऋग्वेद मंडल ९ सुक्त ८६ मंत्र २६ ची आहे. जी आर्यसमाजाच्या आचार्य व महर्षी दयानंद शिष्याद्वारा अनुवादित आहे. ज्यामध्ये स्पष्ट आहे कि यज्ञ करणाऱ्या अर्थात धार्मिक अनुष्ठान करणाऱ्या यजमाना अर्थात भक्तासाठी परमात्मा सर्व रस्त्यांना सुगम करून अर्थात जीवनरुपी प्रवासातील दुःख रहित करून सुगम करतो. त्यांच्या विघ्नाना अर्थात संकटाना मर्दन करतो. अर्थात समाप्त करतो. भक्तांना पवित्र अर्थात पापरहित अर्थात विकाररहित करतात. जसे कि पुढील मंत्र २७ मध्ये म्हटले आहे कि, ''जो परमात्मा द्युलोक अर्थात सत्यलोकाच्या तिसऱ्या पृष्ठवर विराजमान आहे, तेथे परमात्माच्या शरीराचा प्रकाश खूप अधिक आहे.'' उदाहरणादाखल परमात्म्याच्या एक रोमा (शरीरावरील केस)चा प्रकाश करोडो सूर्य तेवढेच तेवढयाच चंद्राच्या मिळत्या जुळत्या प्रकाशापेक्षा अधिक आहे. जर तो परमात्मा त्याच प्रकाशयुक्त शरीराने पृथ्वीवर प्रकट झाला तर आमची चर्मदृष्टी त्यांना नाही पाहू शकत. जसा वटवाघूळ पक्षी दिवसा सूर्यप्रकाशामुळे काहीही पाहू शकत नाही. हि दशा मनुष्याची होईल. यासाठी तो परमात्मा आपले रूप अर्थात शरीराच्या प्रकाशाला सरल (योग्य) करून त्या स्थानावरून जेथे परमात्मा वरती राहतो. तेथे गति करून विजे समान क्रीडा करत अर्थात लीला करून चालून येतो. श्रेष्ठ पुरुषांना भेटतो. हे स्पष्ट आहे कि तुम्ही कविः अर्थात कविर्देव आहात. आम्ही त्यांना कबीर साहेब म्हणतो.

असश्चतः शतधारा अभिश्रियो हरिं नवन्तेऽव ता उदन्युवः ।
क्षिपो मृजन्ति परि गोभिरावृतं तृतीये पृष्ठे अधि रोचने दिवः ॥२७॥

पदार्थः—( उदन्युवः ) प्रेम की ( ताः ) वे ( शतधाराः ) सैंकड़ों धाराए ( असश्चतः ) जो नानारूपों में ( अभिश्रियः ) स्थिति को लाभ कर रही हैं । वे ( हरिं ) परमात्मा को ( अवनवन्ते ) प्राप्त होती हैं । ( गोभिरावृतं ) प्रकाशपुञ्ज परमात्मा को ( क्षिपः ) बुद्धिवृत्तियां ( मृजन्ति ) विषय करती हैं । जो परमात्मा ( दिवस्तृतीये पृष्ठे ) द्युलोक के तीसरे पृष्ठ पर विराजमान है और ( रोचने ) प्रकाशस्वरूप है उसको बुद्धिवृत्तियाँ प्रकाशित करती हैं ॥२७॥

**विवेचन :–** फोटोकॉपी ऋग्वेद मंडल ९ सूक्त ८६ चे मंत्र २७ ची आहे यात स्पष्ट आहे कि ''परमात्मा द्यूलोक अर्थात अमर लोकच्या तिसऱ्या पृष्ठ अर्थात भागावर विराजमान आहे. सत्यलोक अर्थात शाश्वत् स्थानाचे तीन भाग आहेत. एका भागात वन–पहाड–झरने, बाग–बगीचे आदी आहेत. हा बाह्यभाग अर्थात बाहेरचा भाग आहे.'' (जसे भारताची राजधानी दिल्ली पण तीन भागात वेगळी झाली आहे. बाह्य दिल्ली ज्यामध्ये गाव, शेती आणि नद्या आहेत. दुसरा बाजार/मार्केट आहे. तिसरा संसद भवन तथा कार्यालय आहे.)

या पश्चात द्युलोकात वस्त्या आहेत. सहपरिवार मोक्ष प्राप्त हंसात्मा राहतात. (पृथ्वीवर जसे भक्ताला भक्तात्मा म्हणतात तसेच सत्यलोकात हंसात्मा म्हणतात.) (३) तिसऱ्या भागात सर्वोपरी परमात्माचे सिंहासन आहे. त्यांच्या आसपास केवळ नर आत्मा राहतात. तेथे स्त्रि–पुरुषाचा जोडा नाही आहे. ते जर आपला परिवार करू इच्छीतात तर शब्दा (वचन) ने केवळ पुत्र उत्पन्न करू शकतात. याप्रकारे शाश्वत स्थान अर्थात सत्यलोकात तीन भागात परमात्मने विभागले आहे. त्याठिकाणी म्हणजे प्रत्येक स्थानावर राहणाऱ्याला वृद्धावस्था नाही. तेथे मृत्यू नाही. त्यामुळे गीता अध्याय ७ श्लोक २९ मध्ये म्हटले आहे कि जो जरा अर्थात वृद्धावस्था तथा मरण अर्थात मृत्यू पासून सुटका करण्याचा प्रयत्न करतो, ते तत् ब्रह्म अर्थात परम अक्षर ब्रह्म ला समजतात. सत्यलोक मध्ये सतपुरुष राहतो आहे, जेथे जरा–मरण नाही आहे, मुल होऊन सदा युवा राहतात.

**(प्रमाण ऋग्वेद मंडल नं ९ सुक्त ८२ मंत्र १–२)**

असावि सोमो अरुषो वृषा हरी राजेव दस्मो अभि गा अचिक्रदत् ।
पुनानो वारं पर्येत्यव्ययं श्येनो न योनिं घृतवन्तमासदम् ॥१॥

पदार्थः—(सोमः) जो सर्वोत्पादक प्रभु(अरुषः) प्रकाशस्वरूप (वृषा) सद्गुणों की वृष्टि करने वाला (हरिः) पापों के हरण करने वाला है, वह (राजेव) राजा के समान (दस्मः) दर्शनीय है । और वह (गाः) पृथिव्यादि लोक-लोकान्तरों के चारों ओर (अभि अचिक्रदत्) शब्दायमान हो रहा है । वह (वारं) वरणीय पुरुष को जो (अव्ययं) दृढ़भक्त है उसको (पुनानः) पवित्र करता हुआ (पर्य्येति) प्राप्त होता है । (न) जिस प्रकार (श्येनः) विद्युत् (घृतवन्तं) स्नेहवाले (आसदं) स्थानों को (योनिं) आधार बनाकर प्राप्त होता है । इसी प्रकार उक्त गुण वाले परमात्मा ने (असावि) इस ब्रह्माण्ड को उत्पन्न किया ॥१॥

कविर्वेधस्या पर्येषि माहिनमत्यो न मृष्टो अभि वाजमर्षसि ।
अपसेधन्दुरिता सोम मृळय घृतं वसानः परि यासि निर्णिजम् ॥२॥

**पदार्थः**—हे परमात्मन् ! (**वेधस्या**) उपदेश करने की इच्छा से आप (**माहिनं**) महापुरुषों को (**पर्येषि**) प्राप्त होते हो । और आप (**अत्यः**) अत्यन्त गतिशील पदार्थ के (**न**) समान (**अभिवाजं**) हमारे आध्यात्मिक यज्ञ को (**अभ्यर्षसि**) प्राप्त होते हैं । आप (**कविः**) सर्वज्ञ हैं (**मृष्टः**) शुद्ध स्वरूप हैं (**दुरिता**) हमारे पापों को (**अपसेधन्**) दूर करके (**सोम**) हे सोम ! (**मृळय**) आप हमको सुख दें । और (**घृतं वसानः**) प्रेम-भाव को उत्पन्न करते हुए (**निर्निजं**) पवित्रता को (**परियासि**) उत्पन्न करें ॥२॥

**विवेचन** : वरती ऋगवेद मंडल ९ सुक्त ८२ मंत्र १–२ ची फोटोकॉपी आहे. हा अनुवाद महर्षि दयानंद जी च्या दिशा–निर्देशाने त्यांच्याच शिष्याने केले आहे आणि सार्वदेशिक आर्य प्रतिनिधि सभा दिल्ली येथुन प्रकाशित आहे.

**यामध्ये स्पष्ट आहे कि :–** मंत्र १ मध्ये म्हटले आहे कि ''सर्वांची उत्पत्ती करणारा परमात्मा तेजोमय शरीर युक्त आहे, पापांचा नाश करणारा आणि सुखांचा वर्षाव करणारा अर्थात सुखाचे झाड लावणारा आहे. तो वरती सत्यलोकात सिंहासनावर बसला आहे जो पाहण्यात राजा समान आहे.'' हेच प्रमाण सुक्ष्मवेदात आहे :–

अर्श कुर्श पर सफेद गुमट है, जहाँ परमेश्वर का डेरा।
श्वेत छत्र मुकुट विराजे, देखत न उस चेहरे नूं ।।

हेच प्रमाण बाईबल ग्रंथ तसेच कुर्आन् शरीफ मध्ये आहे कि परमात्मा ने सहा दिवसात सृष्टि रचली आणि सातव्या दिवशी वरती आकाशात तख्त अर्थात सिंहासनावर जाऊन विराजमान झाला. (बाईबल च्या उत्पत्ति ग्रंथ २/२६–३० तसेच कुर्आन् शरीफ चे सुर्त फुर्कानी २५ आयत ५२ ते ५९ मध्ये आहे.)

तो परमात्मा आपल्या अमरधामातुन चालुन पृथ्वीवर शब्द वाणीने ज्ञान ऐकवतो. तो वर्णिय अर्थात आदरणीय श्रेष्ठ व्यक्तिंना प्राप्त होतो. त्यांना भेटतो. (जसे १. संत धर्मदास जी बांधवगढ (मध्य प्रदेश वाल्यांना मिळाले) २. संत मलूक दासांना मिळाले, ३. संत दादू दास जींना आमेर (राजस्थान) मध्ये भेटले. ४. संत नानक देव जींना भेटले. ५. संत गरीबदास जी गाव छुडानी जिला झज्जर हरियाणावाल्यांना भेटले ६. संत घीसादास जी गाव खेखडा जिला बागपत (उत्तरप्रदेश) वाल्यांना भेटले. ७. संत जम्भेश्वर जी (बिश्नोई धर्माचे प्रवर्तक) यांना गाव समराथल राजस्थान वाल्यांना भेटले.)

तो परमात्मा चांगल्या आत्म्यांना भेटतो. जे परमात्म्यांचे दृढ भक्त असतात, त्यांच्यावर परमात्माचे विशेष आकर्षण असते. उदाहरण देखील सांगितले आहे. जसे विद्युत अर्थात आकाशातील विज आकर्षीत ठिकाणाचा आधार बनुन पडते. जसे कास्यच्या धातुवर विज पडते. अगोदर कास्य धातुचे भांडी, ग्लास–थाळी, इत्यादी होते. पावसाच्या वेळी लगेच उचलुन घराच्या आतमध्ये ठेवत असत. वयस्कर म्हणत असत कि कास्यच्या भांड्यावर विज नक्की पडते. याकारणाने परमात्मा आपल्या प्रिय भक्तांवर आकर्षीत होऊन भेटतात.

मंत्र नं. २ मध्ये तर हेच स्पष्ट केले आहे की परमात्मा त्या चांगल्या आत्म्यांना उद्देश

करण्याच्या इच्छेने स्वत: महापुरुषांना भेटतात. उपदेशाचा भावार्थ हा आहे कि परमात्मा तत्वज्ञान सांगुन त्यांना दिक्षा देखील देतात. त्यांचे सदगुरु देखील स्वत: परमात्मा असतात. हे देखील स्पष्ट केले आहे कि परमात्मा अत्यंत गतीशील पदार्थ अर्थात विजेच्या समान तिव्रगती करुन आपल्या धार्मिक अनुष्ठान मध्ये पोहचतात. आपण मागे वाचले की संत धर्मदासास परमात्माने हेच सांगितले होते की मि तेथे आवश्य जातो जेथे जेथे धार्मिक अनुष्ठान होतात कारण माझ्या अनुपस्थिति मध्ये काल कोणतेदेखील उपद्रव करतो. त्यामुळे साधकांची आस्था परमात्म्याविषयी सुटुन जाते. मि तेथे असल्यावर अशी गडबड करु नाही शकत. यामुळे गिता अध्याय ३ श्लोक १५ मध्ये म्हटले आहे कि तो अविनाशी परमात्मा ज्याने ब्रह्मास उत्पन्न केले, कायम यज्ञामध्ये प्रतिष्ठित आहे अर्थात धार्मिक अनुष्ठानात त्यास इष्ठ रुपात समजुन आरती स्तुती केली पाहिजे.

या ऋग्वेद मंडल ९ सुक्त ८२ मंत्र २ मध्ये हे स्पष्ट केले आहे कि, आपण (कविर्वेधस्य) कविर्देव आहे जे सर्वांना उपदेश देण्याच्या इच्छाने येतात, आपण पवित्र परमात्मा आहात. आमच्या पापांना सोड्डुन अर्थात नाश करुन हे अमर परमात्मा ! आपण आम्हा सर्वास सुखः द्या आणि (द्युतम वसानः निर्निजम् परियसि) आम्ही आपली मुले आहोत. आमच्या प्रती वात्सल्य प्रेम भाव उत्पन्न करत त्याच (निर्निजम्) सुंदर रुपास (परियासि) उत्पन्न करा अर्थात आम्हास आपली मुले समजुन जसे पहिले आणि जेव्हा पाहिजे तेव्हा आपण आपल्या प्रिय आत्म्यांना प्रकट होऊन भेटता तसे आम्हाला देखील दर्शन द्या.

**(प्रमाण ऋग्वेद मंडल नं ९ सुक्त ९६ मंत्र १६ ते २०)**

**स्वायुधः सोतृभिः पूयमानोऽभ्यर्ष गुह्यं चारु नाम ।**
**अभि वाजं सप्तिरिव श्रवस्याभि वायुमभि गा देव सोम ॥१६॥**

**पदार्थः**—हे परमात्मन् ! ( **गुह्यम्** ) सर्वोपरि रहस्य ( **चारु** ) श्रेष्ठ ( **नाम** ) जो तुम्हारी संज्ञा है । ( **अभ्यर्ष** ) उसका ज्ञान करायें । आप ( **सोतृभिः, पूयमानः** ) उपासक लोगों से स्तूयमान हैं । ( **स्वायुधः** ) स्वाभाविक शक्ति से युक्त हैं और ( **सप्तिरिव** ) विद्युत् के समान ( **श्रवस्याभि** ) ऐश्वर्य के सम्मुख प्राप्त कराइये और ( **वायुमभि** ) हमको प्राणों की विद्या का वेत्ता बनाइये । ( **देव** ) हे सर्वशक्ति-सम्पन्न परमेश्वर ! हमको ( **गाः** ) इन्द्रियों के ( **अभिगमय** ) नियमन का ज्ञाता बनाइये ॥१६॥

**शिशुं जज्ञानं हर्यतं मृजन्ति शुम्भन्ति वह्निं मरुतो गणेन ।**
**कविर्गीर्भिः काव्येना कविः सन्त्सोमः पवित्रमत्येति रेभन् ।१७॥**

**पदार्थः**—( **शिशुम्** ) "श्यति सूक्ष्मं करोति प्रलयकाले जगदिति शिशुः परमात्मा" उस परमात्मा को ( **जज्ञानम्** ) जो सदा प्रकट है, ( **हर्यतः** ) जो अत्यन्त कमनीय है, उसको उपासक लोग ( **मृजन्ति** ) बुद्धिविषय करते हैं और ( **शुंभन्ति** ) उसकी स्तुति द्वारा उसके गुणों का वर्णन करते हैं और ( **मरुतः** ) विद्वान् लोग ( **वह्निम्** ) उस गतिशील परमात्मा का ( **गणेन** ) गुणों के गणों द्वारा वर्णन करते हैं और ( **कविः** ) कवि लोग ( **गीर्भिः** ) वाणी द्वारा और ( **काव्येन** ) कवित्व से उसकी स्तुति करते हैं । ( **सोमः** ) सोमस्वरूप ( **पवित्रम्** ) पवित्र वह परमात्मा कारणावस्था में अतिसूक्ष्म प्रकृति को ( **रेभन्, सन्** ) गर्जता हुआ ( **अत्येति**) अतिक्रमण करता है ॥१७॥

ऋग्वेद मंडल ९ सुक्त ९६ च्या मंत्र १६ मध्ये म्हटले आहे कि हे परमात्मा! आपण आपल्या श्रेष्ठ गुप्त नावाचे ज्ञान करा. त्या नावास मंत्र १७ मध्ये सांगितले आहे कि तो कवि: म्हणजीच कविर्देव आहात.

मंत्र १७ ची केवळ मराठी :– (शिशुम् जज्ञानम् हर्यन्तम्) परमेश्वर जाणुन–बुजुन तत्वज्ञान सांगण्याच्या उद्देशाने शिशु रुपात प्रकट होतात, त्यांच्या ज्ञानास ऐकुन (मरुतो गणेन) भक्तांचा खुप मोठा समुह त्या परमात्म्यांचे शिष्य बनतात. (मृजन्ति शुम्यन्ति वहिन्)

ते ज्ञान बुद्धिजीवी लोकांना समजते, ते त्या परमात्म्याची स्तुति भक्ति तत्वज्ञानाच्या आधाराने करतात, ती भक्ति (वहिन्) लवकर लाभ देणारी असते. तो परमात्मा आपल्या तत्वज्ञानास (काव्येना) कवितेने अर्थात कविते सारखे दोहे, शब्द्, लोकोक्तिया, चौपाई द्वारा (कविर् गीर्भी:) कविरवाणी द्वारा अर्थात कबीर वाणी द्वारा (पवित्रम् अतिरेभन्) शुद्ध ज्ञानास उंच आवाजात गर्जना केल्यासारखे बोलतात. तो (कवि:) कवि सारखा आचरण करणारा कविर्देव (सन्त्) संत रुपात प्रकट (सोम) अमर परमात्मा असतो. (ऋग्वेद मंडल ९ सुक्त ९६ मंत्र १७) विशेष : या मंत्राचे मुळ पाठात दोन वेळा ''कवि:'' शब्द आहे, आर्य समाजाच्या अनुवाद कर्ताने एक (कवि:) चा अर्थ केला नाही.

ऋषिमना य ऋषिकृत्स्वर्षाः सहस्रंणीथः पदवीः कवीनाम् ।
तृतीयं धाम महिषः सिषासन्त्सोमो विराजमनु राजति ष्टुप् ।।१८।।

पदार्थः—( सोमः ) सोमस्वरूप परमात्मा ( सिसासन् ) पालन की इच्छा करता हुआ ( महिषः ) जो महान् है वह परमात्मा ( तृतीयं, धाम ) देवयान और पितृयान इन दोनों से पृथक तीसरा जो मुक्तिधाम है । उसमें ( विराजम् ) विराजमान जो ज्ञानयोगी है उसको ( अनुराजति ) प्रकाश करने वाला है और ( स्तुप ) स्तूयमान है । ( कवीनाम्, पदवीः ) जो क्रान्तदर्शियों की पदवी अर्थात् मुख्य स्थान है और ( सहस्रनीथः ) अनन्त प्रकार से स्तवनीय है, ( ऋषिमनाः ) सर्वज्ञान के साधनरूप मनवाला वह परमात्मा ( यः ) जो ( ऋषिकृत ) सब ज्ञानों का प्रदाता ( स्वर्षाः ) सूर्यादिकों को प्रकाशक है । वह जिज्ञासु के लिए उपासनीय है ।।१८।।

विवेचन :– हे ऋग्वेद मंडल ९ सुक्त ९६ मंत्र १८ ची फोटोकॉपी आहे ज्याचा अनुवाद महर्षि दयानंद जींच्या शिष्याने केला आहे. सार्वदेशिक आर्य प्रतिनिधि सभा दिल्ली द्वारा अनुवादित आहे. यावरती विवेचन करत आहे. याच्या अनुवादात देखील खुप चुका आहेत ज्या आर्यसमाजाच्या आचार्याने केली आहे. आम्ही संस्कृत देखील समजु शकतो. विवेचन करत आहे तसेच यथार्थ अनुवाद व भावार्थ देखील स्पष्ट करत आहोत. मंत्र १७ मध्ये म्हटले आहे कि ऋषि किंवा संत रुपात प्रकट होऊन परमात्मा अमृतवाणी आपल्या मुख कमलाद्वारे सांगतात व त्या ज्ञानास समजुन अनेक शिष्यांचा समुह तयार होतो. (य) जो वाणी परमात्मा तत्वज्ञानाने ऐकवतात, ते (ऋषिकृत्) ऋषि रुपात प्रकट परमात्मा कृत (सहंस्रणीय:) हजारो वाणी अर्थात कबिरवाणी (ऋषिमना) ऋषि स्वभावाच्या भक्तांसाठी (स्वर्षा:) आनंददायक असते. (कविनाम पदवी:) कविताने दोहे, चौपाई मध्ये वाणी बोलण्यामुळे तो परमात्मा प्रसिद्ध कविमध्ये एका कवीची पदवी देखील प्राप्त करतो. तो (सोम) अमर परमात्मा (सिषासन्) सर्वांना संभाळण्याची इच्छा करत सर्व प्रथम (महिष:) मोठी पृथ्वी अर्थात वरच्या लोकांमध्ये (तृतीयम् धाम) तीसरे धाम अर्थात सत्यलोकाच्या तिसऱ्या पृष्ठावर (अनुराजति) तेजोमय शरीर युक्त (स्तुप) गुम्बज (घुमट) मध्ये (विराजम्) विराजमान आहे. तेथे बसले आहेत. हेच प्रमाण ऋग्वेद मंडल ९ सुक्त ५४ मंत्र ३ मध्ये आहे कि परमात्मा सर्व लोकांच्या वरच्या लोकात विराजमान आहे, (तिष्ठन्ति) बसलेला आहे.

चमूषच्छ्येनः शकुनो विभृत्वा गोविन्दुर्द्रप्स आयुधानि बिभ्रत् ।
अपामूर्मिं सचमानः समुद्रं तुरीयं धाम महिषो विवक्ति ।।१९।

पदार्थः—( अपामूर्मिम् ) प्रकृति की सूक्ष्म से सू म शक्तियों के साथ ( सचमानः ) जो संगत है और ( समुद्रम् ) "सम्यक् द्रवन्ति भूतानि यस्मात् स समुद्रः" जिससे सब भूतों की उत्पत्ति, स्थिति और प्रलय होता है। वह ( तुरीयम् ) चौथा ( धाम ) परमपद परमात्मा है। उसको ( महिषः ) मह्यते इति महिषः महिष इति महन्नामसु पठितम् नि० ३—१३ । महापुरुष उक्त तुरीय परमात्मा का ( विवक्ति ) वर्णन करता है। वह परमात्मा ( चमूसत् ) जो प्रत्येक बल में स्थित है ( श्येनः ) सर्वोपरि प्रशंसनीय है और ( शकुनः ) सर्वशक्तिमान् है। ( गोविन्दुः ) यजमानों को तृप्त करके जो ( द्रप्सः ) शीघ्रगति वाला है ( आयुधानि, बिभ्रत् ) अनन्त शक्तियों को धारण करता हुआ इस सम्पूर्ण संसार का उत्पादक है ।।१९।।

**विवेचन :** ऋग्वेद मंडल ९ सुक्त ९६ मंत्र १९ चा देखील आर्य समाजाच्या विद्वानांनी अनुवाद केला आहे. यात देखील खुप चुका आहेत. पुस्तकाच्या विस्तारामुळे फक्त आपल्या कामापुरती माहिती प्राप्त करूयात.

या मंत्रात चौथ्या धामाचे वर्णन आहे जे आपण सृष्टिरचनेत वाचाल, त्यामुळे पुर्ण माहिती होईल वाचा याच पुस्तकात पान १९२ वर.

परमात्माने वरिल चारही लोक अजर-अमर रचले आहेत. १. अनामी लोक सर्वात वरती आहे. २. अगम लोक ३. अलख लोक ४. सत्यलोक.

आपण पृथ्वी लोकात आहे. याच्या वरच्या लोकांची मोजणी कराल तर १. सत्यलोक २. अलख लोक ३. अगम लोक ४. अनामी लोक मोजले जाते. त्या चौथ्या धामामध्ये बसुन परमात्मा ने सर्व ब्रह्मांडाची व लोकांची रचना केली. उर्वरीत रचना सत्यलोकात बसुन केली. आर्य समाजाच्या अनुवादकांनी तुरिया परमात्मा अर्थात चौथ्या परमात्म्याचे वर्णन केले आहे. हा चौथा धाम आहे. त्यामध्ये मुळ पाठ मंत्र १९ चा भावार्थ आहे कि तत्वदर्शी संत चौथा धाम तसेच चौथा परमात्मा चा (विवक्ति) वेग-वेगळा वर्णन करतात. वाचक जन कृपया वाचा सृष्टि रचना याच पुस्तकात पान १९२ वर ज्यामुळे आपणास ज्ञान होईल कि लेखक (संत रामपाल दास) हेच ते तत्वदर्शी संत आहेत जे तत्वज्ञानाने परिचीत आहेत.

मर्यो न शुभ्रस्तन्वं मृजानोऽत्यो न सृत्वा सनये धनानाम् ।
वृषेव यूथा परि कोशमर्षन्कनिक्रदच्चम्वोरा विवेश ।।२०।।

पदार्थः—वह परमात्मा ( यूथा, वृषेव ) जिस प्रकार एक संघ को उसका सेनापति प्राप्त होता है, इसी प्रकार ( कोशम् ) इस ब्रह्माण्डरूपी कोश को ( अर्षन् ) प्राप्त होकर ( कनिक्रदत् ) उच्च स्वर से गर्जता हुआ ( चम्वोः ) इस ब्रह्माण्ड रूपी विस्तृत प्रकृति-खण्ड में ( पर्याविवेश ) भली-भांति प्रविष्ट होता है और ( न ) जैसे कि ( मर्यः ) मनुष्य ( शुभ्रस्तन्वं, मृजानः ) शुभ्र शरीर को धारण करता हुआ ( अत्योन ) अत्यन्त गतिशील पदार्थों के समान ( सनये ) प्राप्ति के लिए ( सृत्वा) गतिशील होता हुआ (धनानाम्) धनों के लिए कटिबद्ध होता है; इसी प्रकार प्रकृति-रूपी ऐश्वर्य को धारण करने के लिए परमात्मा सदैव उद्यत है ।।२०।।

विवेचन : ऋग्वेद मंडल ९ सुक्त ९६ मंत्र २० चा यथार्थ ज्ञान समजुयात.

ह्या मंत्राचा अनुवाद महर्षि दयानंद च्या शिष्यांद्वारा केला गेला आहे. यांचा दृष्टिकोन हाच राहिला आहे कि परमात्मा निराकार आहे. कारण महर्षि दयानंद जींनी हि गोष्ट दृढ केली आहे कि परमात्मा निराकार आहे. याकरिता अनुवादकाने सरळ मंत्राचा अनुवाद फिरवा–फिरव करुन केला आहे. जसे मुळ पाठात लिहले आहे कि :–

मर्य न शुभ्रः तन्वा मृजानः अत्यः न सृत्वा सनये धनानाम् ।
वृर्षेव यूथा परि कोशम अर्षन् कनिक्रदत् चम्वोः आविवेश ।।

**अनुवाद :–** जैसे (मर्य: न) मनुष्य सुंदर वस्त्र धारण करतो, असेच परमात्मा मनुष्यासमान (शुभ्र: तन्व) सुंदर शरीर (मृजान:) धारण करुन (अत्य:) अत्यन्त गतीने चालुन (सनये धनानाम) भक्ती धनाच्या धन्यास अर्थात पुण्यात्मांना (सनये) प्राप्त होण्यासाठी येतात. (युथा वृषेव) जसे एका समुदायास त्याचा सेनापती प्राप्त होतो. असाच तो परमात्मा संत व ऋषि रुपात प्रकट होतो तेव्हा त्याचे मोठ्या संखेने अनुयायी बनतात आणि परमात्मा त्यांचा गुरु रुपात पुढारी असतो. तो परमात्मा (परि कोशम्) प्रथम ब्रह्मांडात (अर्षन्) प्राप्त होऊन अर्थात येऊन (कनिक्रदत्) उंच आवाजात सत्यज्ञान उच्चारण करत (चम्वो:) पृथ्वी मध्ये (अविवेश) प्रविष्ट होत असतो.

**भावार्थ :–** जसे अगोदर वेद मंत्रामध्ये म्हटले आहे कि परमात्मा वरच्या लोकात राहतात तेथुन गति करुन अर्थात आपल्या शरीरातील तेजास हलके करुन पृथ्वीवर येतात. ह्या ऋग्वेद मंडल ९ सुक्त ९६ मंत्र २० मध्ये त्याचीच पृष्टि केली आहे. म्हटले आहे कि जसे मनुष्य वस्त्र धारण करतात, असे अन्य शरीर धारण करुन परमात्मा मानव रुपात पृथ्वीवर येतात और (धनानाम्) दृढ भक्तो (चांगल्या पुण्यात्मांना) प्राप्त होतात त्यांना वाणी उच्चारण करुन तत्वज्ञान सांगतात.

**विवेचन :** हे ऋग्वेद मंडल ९ सुक्त ९६ मंत्र १६ ते २० ची फोटोकॉपी आहे. ज्याचा हिन्दी अनुवाद महर्षि दयानंद सरस्वती आर्यसमाज प्रवर्तकाच्या दिशा–निर्देशाने त्यांच्या आर्यसमाजी शिष्यांनी केला आहे. हा अनुवाद काहीसा ठिक आहे, चुकीचा जास्त आहे. अगोदर जास्त ठिक होता व काहिसा चुकीचा होता. जो माझ्याद्वारे दुरुस्त करुन विवेचन मध्ये लिहला गेला आहे. आता अधिक चुकिचा आहे त्यास दुरुस्त करुन लिहीत आहे.

ऋग्वेद मंडल ९ सुक्त ९६ मंत्र १६ मध्ये म्हटले आहे कि :–

हे परमात्मा आपले जे गुप्त वास्तविक (चारु) श्रेष्ठ (नाम) नाव आहे. त्यास सांगावे. प्रिय वाचकांनो! जसे भारताच्या राजास प्रधानमंत्री म्हणतात. हे त्यांच्या पदवीचे प्रतीक आहे. त्यांचे वास्तविक नाव काही अन्यच असते. जसे पहिले प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरु होते. ''जवाहरलाल'' हे त्यांचे वास्तविक नाव आहे. या मंत्र १६ मध्ये म्हटले आहे की हे परमात्मा! आपले जे वास्तविक नाव आहे ते (सोतृमि:) उपासना करण्याचा (स्व आयुध:) स्वचालित शस्त्रासारखे (पूयमान:) अज्ञान रुपी गंधाचा नाश करुन पापनाशक आहे. आपण आपल्या त्या सत्य मंत्राचा आम्हाला ज्ञान करावे. (देव सोम) हे अमर परमेश्वर! आपला हा मंत्र श्वासांद्वारा नाक आदि (गा:) इन्द्रियांनी (वासुम् अभि) श्वास–उश्वासाने जपल्याने (सप्तिरिव = सप्ति: इव) विजे सारख्या गतीने अर्थात लगेचच (अभिवाजं) भक्ति धनाने परिपुर्ण करुन (श्रवस्यामी) ऐश्वर्य तसेच मोक्ष प्राप्त करतील.

प्रिय वाचकांना निवेदन आहे कि ह्या ऋग्वेद मंडल ९ सुक्त ९६ मंत्र १६ च्या अनुवादामध्ये

खुपच चुका होत्या ज्या आता दुरुस्त केल्या आहेत. प्रमाणासाठी मुळ पाठात ''अभिवाजं'' शब्द आहे याचा अनुवाद नाही असा लिहला गेला आहे. याच्या जागी ''अभिगयम'' शब्द चा अर्थ जोडला आहे जो मुळ पाठात नाही.

**विवेचन :–** ऋग्वेद मंडल ९ सुक्त ९६ मंत्र १७ च्या अनुवादामध्ये खुपच चुका आहेत ज्या आर्यसमाजाद्वारा अनुवादित आहेत. आता दुरुस्त करुन लिहित आहे.

जसे कि अगोदर ऋग्वेद मंडल ९ सुक्त ८६ तसेच ८२ च्या मंत्रामध्ये प्रमाण आहे कि परमात्मा आपल्या श्वाश्वत स्थान जे द्यूलोकाच्या तिसऱ्या स्थानी विराजमान आहे. तेथुन चालुन पृथ्वीवर जाणुन–बुजुन कोणत्यातरी खास उद्देशाने प्रकट होतात. परमात्मा सर्व ब्रह्मांडामध्ये बसलेल्या प्राण्यांचा संभाळ तीन स्थीतीत करतात. १. परमात्मा वरती सत्यलोक अर्थात अविनाशी धामामध्ये सिंहासन (तख्त) वर बसुन सर्व ब्रह्मांडाचे संचालन करतात. २. जेव्हा वाटेल तेव्हा साधु संत रुपात आपल्या शरीराचे तेज कमी करुन चांगल्या आत्म्यांना मिळतात. ३. प्रत्येक युगात कोणत्यातरी जलाशयात उमललेल्या कमळाच्या फुलावर नवजात शिशु रुपात प्रकट होतात. तेथुन नि:संतान जोडी आपल्या घरी घेऊन जातात. लहापणापासुनच तो परमात्मा आपले वास्तविक भक्तीज्ञान ज्यास तत्वज्ञान देखिल म्हणतात, चौपाईया, दोहे, ओव्या व कविताच्या रुपात ऐकवतात. जसे सन् १३९८ वि.सं. १४५५ मध्ये परमात्मा आपल्या मुळ ठिकाणाहुन चालुन भारतवर्षात काशी शहराच्या बाहेर लहरतारा नावाच्या जलाशयातील कमळाच्या फुलावर शिशुरुप धारण करुन प्रकट झाले होते. तेथुन निरु–नीमा विणकराच्या दंपत्याने आपल्या घरी घेऊन गेले. हळु–हळु परमात्मा मोठे झाले. कबीर वाणी सांगुन ज्ञान सांगितले. प्रमाण ऋग्वेद मंडल ९ सुक्त १ मंत्र ९ मध्ये जे आर्य समाजाचे आचार्यांद्वारा अनुवादित आहे. त्यामध्ये देखील काही चुका आहेत. जास्त नाहीत कृपया वाचा ऋग्वेद मंडल ९ सुक्त १ मंत्र ९ ची फोटोकॉपी.

**अभी ईममघ्न्या उत श्रीणन्ति धेनवः शिशुम् ।**
**सोममिन्द्राय पातवे ॥९॥**

पदार्थः—( इमं ) उस ( सोमं ) सौम्यस्वभाव वाले श्रद्धालु पुरुष को ( शिशुं ) कुमारावस्था में ही ( अभि ) सब प्रकार से ( अघ्न्याः ) अहिंसनीय ( धेनवः ) गौवें ( श्रीणन्ति ) तृप्त करती हैं ( इन्द्राय ) ऐश्वर्य्य की ( पातवे ) वृद्धि के लिये । ( उत ) अथवा उक्त श्रद्धालु पुरुष को अहिंसनीय वाणियें ऐश्वर्य्य की प्राप्ति के लिये संस्कृत करती हैं ॥९॥

**विवेचन :–** ही फोटोकॉपी ऋग्वेद मंडल ९ सुक्त १ मंत्र ९ ची आहे यामध्ये स्पष्ट आहे कि (सोम) अमर परमात्मा जेव्हा शिशु रुपामध्ये प्रकट होतात तेव्हा त्याचा संभाळाची लिला कुमारी गायी (अभि अध्न्या धेनुव:) द्वारे होती. हेच प्रमाण कबीर सागर च्या अध्याय ''ज्ञान प्रकाश'' मध्ये आहे कि ज्या परमेश्वर कबीरास नीरु–नीमा ने आपल्या घरी घेऊन गेले होते. तेव्हा शिशु रुपधारी परमात्माने अन्न खाल्ले नाही, दुध पिले नाही. मग स्वामी रामानन्दांच्या सांगण्यावरुन एक कुमारी गाय अर्थात एक बछडे नीरुने आणले. तीने लगेच दुध दिले. त्या कुमारी गायीच्या दुधाने परमेश्वरास संभाळण्याची लिला झाली. कबीर सागर जवळपास ६०० (सहाशे) वर्ष अगोदर लिहला आहे.

ऋग्वेद मंडल ९ सुक्त १ मंत्र ९ च्या अनुवादात काही चुका आहेत. जसे (अभिअध्न्या) चा अर्थ अहिंसनीय केला आहे जो चुकीचा आहे. हरियाणा मधील रोहतक जिल्ह्यातील धनाना गावात लेखकाचा जन्म झाला जो वर्तमानात सोनीपतमध्ये आहे. ह्या श्रेत्रात ज्या गायीने गर्भ धारण केला नाही तिस ही धनाई नाही, ही बिना धनाई आहे. हा शब्दाचा अपभ्रंस आहे. एका गायीस ''अध्नि'' शब्द आहे. अनेकवचन केल्यास ''अध्न्या'' शब्द आहे. ''अध्न्याचा'' अर्थ बिना धनाई गाया तसेच अभिध्न्या चा अर्थ पुर्ण रुपाने बिना धनाई अर्थात कुमारी गाय अर्थात बछडी.

आता ऋग्वेद मंडल ९ सुक्त ९६ मंत्र १७ चा दुरुस्त अनुवाद करत आहे.

केवळ मराठी :- (शिशुम् जज्ञानम् हर्यन्तम्) परमेश्वर जाणुन-बुजुन तत्वज्ञान सांगण्याच्या उद्देशाने शिशु रुपात प्रकट होतात. त्यांच्या ज्ञानास ऐकुन (मरुतो गणेन्) भक्तांचा खुप मोठा समुह त्या परमात्म्याचे शिष्य बनतात (मृजन्ति शुम्यन्ति वहिन्)

ते ज्ञान बुद्धिजीवी लोकांना समजते. ते त्या परमात्म्याची स्तुती-भक्ती तत्वज्ञानाच्या आधारे करतात. ती भक्ती (वहिन) लगेच लाभ देणारी असते. ते परमात्मा आपल्या तत्वज्ञानास (काव्येना) कवित्व अर्थात काव्यासारखे दोहे, शब्द्, लोकोक्तिया, चौपाई द्वारा (कविर् गीर्भि:) कविर् वाणी द्वारा अर्थात कबीर वाणी द्वारा (पवित्रम् अतिरेभन्) शुद्ध ज्ञानास उंच आवाजात मोठमोठ्याने सांगतात. तो (कवि:) कविसारखे आचरण करणारा कविर्देव (संत) संतरुपात प्रकट (सोम) अमर परमात्मा असतो. (ऋग्वेद मंडल ९ सुक्त ९६ मंत्र १७)

**विशेष :-** ह्या मंत्राच्या मुळ पाठात दोन वेळा ''कवि:'' शब्द आहे. आर्य समाजाच्या अनुवादकर्तांने एक (कवि:) चा अर्थ केला नाही.

**विवेचन :-** ऋग्वेद मंडल ९ सुक्त ९६ मंत्र १८ वर विवेचन करत आहे. याच्या अनुवादात खुपच चुका आहेत. आम्हास सस्कृत देखील समजते. विवेचन करत आहे तसेच यथार्थ अनुवाद व भावार्थ स्पष्ट करत आहे. मंत्र १७ मध्ये म्हटले आहे कि ऋषि किंवा संत रुपात प्रकट होऊन परमात्मा अमृतवाणी आपल्या मुखकमलाने बोलतात आणि त्या ज्ञानास समजुन अनेक शिष्यांचा समुह बनतो. (य) जी तत्वज्ञानाची वाणी परमात्मा सांगतात. ते (ऋषिकृत) ऋषि रुपात प्रकट परमात्मा कृत (सहंस्त्रणीथ:) हजारो वाण्या अर्थात कबीर वाणी (ऋषिमना) ऋषि स्वभावाच्या भक्तांसाठी (स्वर्षा:) आनंददायक असते. (कविनाम पदवी:) कविताने दोहे, चौपाई मध्ये वाणी बोलण्यामुळे परमात्मा कविंमध्ये एक प्रसिद्ध कवीची पदवी देखील प्राप्त करतात. तो (सोम) अमर परमात्मा (सिषासन्) सर्वांच्या पालनाची इच्छा करत असताना प्रथम स्थितीमध्ये (महिष:) मोठी पृथ्वी अर्थात वरच्या लोकात (तृतीयम् धाम) तिसरे धाम अर्थात सत्यलोकाच्या तिसऱ्या पृष्ठावर (अनुराजति) तेजोमय शरीरयुक्त (स्तुप) घुमटामध्ये (विराजम्) विराजमान आहे. तेथे बसले आहेत. हेच प्रमाण ऋग्वेद मंडल ९ सुक्त ५४ मंत्र ३ मध्ये आहे कि परमात्मा सर्व लोकांच्या वरती वरच्या लोकामध्ये विराजमान आहे (तिष्ठन्ति) बसलेला आहे.

**विवेचन :-** ऋग्वेद मंडल ९ सुक्त ९६ मंत्र १९ चा देखील आर्यसमाजाच्या विद्वानांनी अनुवाद केला आहे. यामध्ये देखील खुपच चुका आहेत. पुस्तकाच्या विस्तारामुळे केवळ आपल्या कामापुरतीच माहीती प्राप्त करुयात.

या मंत्रामध्ये चौथ्या धामाचे वर्णन आहे. आपण सृष्टिरचना मध्ये वाचाल, त्यातुन पुर्ण माहिती होईल. वाचा याच पुस्तकात पान १९२ वर.

परमात्माने वरील चारही लोक अजर-अमर रचले आहेत. १. अनामी लोक जे सर्वात वरती आहे २. अगम लोक ३. अलख लोक ४. सत्य लोक.

आपण पृथ्वी लोकात आहे. याच्या वरच्या लोकांची मोजणी कराल तर १. सत्यलोक २. अलख लोक ३. अगम लोक ४. अनामी लोक मोजले जाते. त्या चौथ्या धामामध्ये बसुन परमात्मा ने सर्व ब्रह्मांडाची व लोकांची रचना केली. उर्वरीत रचना सत्यलोकात बसुन केली. आर्य समाजाच्या अनुवादकांनी तुरिया परमात्मा अर्थात चौथ्या परमात्म्याचे वर्णन केले आहे. हा चौथा धाम आहे. त्यामध्ये मुळ पाठ मंत्र १९ चा भावार्थ आहे कि तत्वदर्शी संत चौथा धाम तसेच चौथा परमात्मा चा (विवक्ति) वेग-वेगळा वर्णन करतात. वाचक जन कृपया वाचा सृष्टिरचना याच पुस्तकात पान १९२ वर ज्यामुळे आपणास ज्ञान होईल कि लेखक (संत रामपाल दास) हेच ते तत्वदर्शी संत आहेत जे तत्वज्ञानाने परिचीत आहेत.

विवेचन :- ऋग्वेद मंडल ९ सुक्त ९६ मंत्र २० चा यथार्थ ज्ञान समजुयात.

ह्या मंत्राचा अनुवाद महर्षि दयानंद च्या शिष्यांद्वारा केला गेला आहे. यांचा दृष्टीकोन हाच राहिला आहे कि परमात्मा निराकार आहे. कारण महर्षि दयानंद जींनी हि गोष्ट दृढ केली आहे कि परमात्मा निराकार आहे. याकरिता अनुवादकाने सरळ मंत्राचा अनुवाद फिरवा-फिरव करुन केला आहे. जसे मंत्र २० च्या मुळ पाठात लिहले आहे कि :-

मर्य न शभ्रः तन्वा मृंजानः अत्यः न सृत्वा सनये धनानाम् ।
वृर्षेव यूथा परि कोशम अर्षन् कनिक्रदत् चम्वोः आविवेश ।।

**अनुवाद :-** (मर्य:) मनुष्य (न) जसे सुंदर वस्त्र धारण करतो, असेच परमात्मा मनुष्यासमान (शुभ्र: तन्व) सुंदर शरीर (मृजान:) धारण करुन (अत्य:) अत्यन्त गतीने चालुन (सनये धनानाम्) भक्ती धनाच्या धन्यास अर्थात पुण्यात्मांना (सनये) प्राप्त होण्यासाठी येतात. (यूथा वृषेव) जसे एका समुदायास त्याचा सेनापती प्राप्त होतो. असाच तो परमात्मा संत व ऋषि रुपात प्रकट होतो तेव्हा त्याचे मोठ्या संखेने अनुयायी बनतात आणि परमात्मा त्यांचा गुरु रुपात पुढारी असतो. तो परमात्मा (परि कोशम्) प्रथम ब्रह्मांडात (अर्षन्) प्राप्त होऊन अर्थात येऊन (कनिक्रदत्) उंच आवाजात सत्यज्ञान उच्चारण करत (चम्वौ) पृथ्वी खंडमध्ये (अविवेश) प्रविष्ट होत असतो.

**भावार्थ :-** जसे अगोदर वेद मंत्रामध्ये म्हटले आहे कि परमात्मा वरच्या लोकात राहतात तेथुन गति करुन अर्थात आपल्या शरीरातील तेजास हलके करुन पृथ्वीवर येतात. ह्या ऋग्वेद मंडल ९ सुक्त ९६ मंत्र २० मध्ये त्याचीच पृष्टि केली आहे. म्हटले आहे कि जसे मनुष्य वस्त्र धारण करतात, असे अन्य शरीर धारण करुन परमात्मा मानव रुपात पृथ्वीवर येतात और (धनानाम्) दृढ भक्तो (चांगल्या पुण्यात्मांना) प्राप्त होतात त्यांना वाणी उच्चारण करुन तत्वज्ञान सांगतात.

**(प्रमाण ऋग्वेद मंडल ९ सुक्त ९५ मंत्र २)**

हरिः सृजानः पथ्यांमृतस्येयर्ति वाचमरितेव नावम् ।
देवो देवानां गुह्यानि नामाविष्कृणोति बर्हिषि प्रवाचे ।।२।।

**पदार्थः**—( **हरिः** ) वह पूर्वोक्त परमात्मा ( **सृजानः** ) साक्षात्कार को प्राप्त हुआ ( **ऋतस्य पथ्यां** ) वाक् द्वारा मुक्ति मार्ग की ( **इयर्ति** ) प्रेरणा करता है। ( **अरितेव नावम्** ) जैसा कि नौका के पार लगाने के समय में नाविक प्रेरणा करता है और ( **देवानां देवः** ) सब देवों का देव ( **गुह्यानि** ) गुप्त ( **नामाविष्कृणोति** ) संज्ञाओं को प्रकट करता है ( **बर्हिषि प्रवाचे** ) वाणीरूप यज्ञ के लिए ।।२।।

ऋग्वेद मंडल ९ सुक्त ९५ मंत्र २ चा अनुवाद महर्षि दयानंदाच्या शिष्यांनी केला आहे जो खुप चांगला केला आहे.

याचा भावार्थ आहे कि अगोदर परमात्मा अर्थात ज्या परमात्म्याच्या विषयात पहिला वाला मंत्रात म्हटले गेले आहे कि, तो (सृजान:) आपले शरीर धारन करुन (ऋतस्य पथ्यां) सत्य भक्तीचा मार्ग अर्थात यथार्थ अध्यात्मिक ज्ञान आपल्या अमृतमयी अर्थात वाणीद्वारा मुक्ती मार्गाची प्रेरणा करतात.

तो मंत्र असा आहे कि जसे (अरितेव नावम्) नावाड्या नावेत बसुन पार करतो. असेच परमात्मा सत्यभक्ति मार्ग रुपी नावेद्वारा संसाररुपी नदीमधुन पार करतो. तो (देवानाम् देव:) सर्व देवांचा देव अर्थात सर्व प्रभुंचा परमेश्वर (बर्हिषि प्रवाचे) वाणी रुपी ज्ञान यज्ञासाठी (गुह्यानि) गुप्त (नामा आविष्कृणोति) नावांचा अविष्कार करत आहे. अर्थात जसे गीता अध्याय १७ श्लोक २३ मध्ये ''ॐ तत् सत्'' मध्ये तत् तसेच सत् हे गुप्त मंत्र आहेत जे त्याच परमेश्वराने मला (संत रामपाल दास) सांगितले त्यानेच पुर्ण मोक्ष शक्य आहे.

सुक्ष्म वेदात परमेश्वराने म्हटले आहे कि :-

''सोहं'' शब्द हम जग मे लाए, सारशब्द हम गुप्त छिपाए ।

**भावार्थ :-** परमेश्वराने स्वत ''सोहं'' शब्द भक्ती साठी सांगितला आहे. हा सोहं मंत्र कोणत्याही प्राचीन ग्रंथ (वेद, गीता, कुर्आन, पुराण तसेच बाईबल) मध्ये नाही. परत सुक्ष्म वेदात म्हटले आही कि :-

सोहं ऊपर और है, सत्य सुकत एक नाम । सब हंसो का जहाँ बास है, बस्ती है बिन ठाम ।।

**भावार्थ :-** ''सोहं'' नाम तर प्रकट केले आहे, आविष्कार केला आहे परंतु सार शब्द गुप्त ठेवले आहे. आता मला (लेखक संत रामपाल यांना) सांगितले आहे जे साधकांना दिक्षा घेताना सांगितले जाते. याचे गीता अध्याय १७ श्लोक २३ मध्ये म्हटल्याप्रमाणे ''ॐ तत् सत्'' चा संबंध आहे.

**(प्रमाण ऋग्वेद मंडल ९ सुक्त ९४ मंत्र १)**

अधि यदस्मिन्वाजिनीव शुभः स्पर्धन्ते धियः सूर्ये न विशः ।
अपो वृणानः पवते कवीयन्व्रजं न पशुवर्धनाय मन्म ।।१।।

पदार्थः—( सूर्य्ये ) सूर्य के विषय में ( न ) जैसे ( विशः ) रश्मियां प्रकाशित करती हैं । उसी प्रकार ( धियः ) मनुष्यों की बुद्धियां ( स्पर्धन्ते ) अपनी-अपनी उत्कट शक्ति से विषय करती हैं । (अस्मिन् अधि ) जिस परमात्मा में ( वाजिनीव) सर्वोपरि बलों के समान ( शुभः ) शुभ बल है वह परमात्मा ( अपोवृणानः ) कर्मों का अध्यक्ष होता हुआ ( पवते ) सबको पवित्र करता हैं । ( कवीयन् ) कवियों की तरह आचरण करता हुआ ( पशुवर्धनाय ) सर्वद्रष्टृत्व पद के लिए ( व्रजं, न ) इन्द्रियों के अधिकरण मन के समान 'व्रजन्ति इन्द्रियाणि यस्मिन् तद्व्रजम्' ( मन्म ) जो अधिकरणरूप है वही श्रेय का धाम है ।।१।।

**विवेचन :-** ऋग्वेद मंडल ९ सुक्त ९४ मंत्र १ चा अनुवाद देखील आर्यसमाजाच्या विद्वानांद्वारा केला गेला आहे.

**विवेचन :-** पुस्तक विस्तारास ध्याना ठेवता त्याच अनुवादमधुन आपले मत सिद्ध करत आहे. जसे अगोदर लिहलेल्या वेद मंत्रामध्ये सांगितले गेले आहे कि परमात्मा आपल्या मुख कमलाद्वारे वाणीचे उच्चारण करुन तत्वज्ञान बोलतात लोकोक्तियांच्या माध्यमातुन, कवितांच्या दोह्यांमधुन, शब्द, ओवी, चौपाई द्वारा वाणी बोलुन प्रसिद्ध कविंमध्ये देखील एक कवि ची उपाधी प्राप्त करतात. त्याचे नाव कविर्देव अर्थात कबीर साहेब आहे.

ह्या ऋग्वेद मंडल ९ सुक्त ९४ मंत्र १ मध्ये देखील हे स्पष्ट आहे कि जो सर्वशक्तीमान परमेश्वर आहे. तो (कवियन् व्रजम् न्) कविंप्रमाणे आचरण करत पृथ्वीवर फिरत असतो.

**(प्रमाण ऋग्वेद मंडल ९ सुक्त २० मंत्र १)**

प्र कविर्देववीतयेऽव्यो वारेभिरर्षति ।
साह्वान्विश्वा अभि स्पृधः ॥१॥

पदार्थः—वह परमात्मा ( **कविः** ) मेधावी है और ( **अव्यः** ) सबका रक्षक है ( **देववीतये** ) विद्वानों की तृप्ति के लिये ( **अर्षति** ) ज्ञान देता है ( **साह्वान्** ) सहनशील है ( **विश्वाः, स्पृधः** ) सम्पूर्ण दुष्टों को संग्रामों में ( **अभि** ) तिरस्कृत करता है ॥१॥

**विवेचन :** ऋग्वेद मंडल ९ सुक्त २० मंत्र १ चा अनुवाद आर्यसमाजाच्या विद्वांनी केला आहे याचा अनुवाद थोडा कमी जास्त चुकीचा आहे याच्य मुळ पाठात लिहले आहे :-

प्र कविर्देव वीतये अव्यः वारेभिः अर्षति सहान् बिश्वाः अभि स्पृस्धः

**सरलार्थ :** (प्र) वेद ज्ञानदाता व्यतीरीक्त जो दुसरा (कविर्देव) कविर्देव कबीर परमेश्वर आहे, तो विद्वान अर्थात जिज्ञासुंना (वीतये) ज्ञान धनाच्या तृप्ति साठी (वारेभिः) श्रेष्ठ आत्मांना (अर्षति) ज्ञान देतो. तो (अव्यः) अविनाशी आहे, रक्षक आहे, (साह्यान्) सहनशील (विश्वाः) तत्वज्ञान हीन सर्व दुष्टांना (स्पृधः) अध्यात्म ज्ञानाची कृपा स्पर्धा अर्थात ज्ञान गोष्टी रुपी वाक युद्ध मध्ये (अभि) पुर्ण रुपाने तिरस्कृत करतो, त्यांचे तोंड बंद करतो.

विशेष :- (क) ह्या मंत्राच्या अनुवादामध्ये आपण फोटोकॉपी मध्ये पहाल तर कळेल कि कित्येक शब्दांचा अर्थ आर्य विद्वानांनी सोडले आहे जसे = ''प्र'' ''वारेभिः'' ज्या मुळे वेदांचा यथार्थ भाव समजत नाही.

(ख) माझ्या अनुवादातुन स्पष्ट आहे कि तो परमात्मा चांगल्या आत्मांना (दृढ भक्तांना) ज्ञान देत आहे. त्याचे नाव देखील लिहले आहे :- ''कविर्देव'' आम्ही कबीर परमेश्वर म्हणतो.

**(प्रमाण ऋग्वेद मंडल ९ सुक्त ५४ मंत्र ३)**

अयं विश्वानि तिष्ठति पुनानो भुवनोपरि ।
सोमो देवो न सूर्यः ॥३॥

पदार्थः—( **सूर्यः, न** ) सूर्य के समान जगत्प्रेरक ( **अयम्** ) यह परमात्मा ( **सोमः, देवः** ) सौम्य स्वभाव वाला और जगत्प्रकाशक है और ( **विश्वानि, पुनानः** ) सब लोकों को पवित्र करता हुआ ( **भुवनोपरि, तिष्ठति** ) सम्पूर्ण ब्रह्माण्डों के ऊर्ध्व भाग में भी वर्तमान है ॥३॥

**विवेचन :-** ऋग्वेद मंडल ९ सुक्त ५४ मंत्र ३ च्या फोटोकॉपी मध्ये आपण पहा. याचा अनुवाद आर्यसमाजाच्या विद्वानांनी केला आहे. त्याच्या अनुवादात स्पष्ट आहे कि तो परमात्मा (भूवनोपरि) संपुर्ण ब्रह्मांडाच्या ऊर्ध्व अर्थात वरती (तिष्ठति) विराजमान आहे, वरती बसलेला आहे :-

याचा यथार्थ अनुवाद या प्रकारे आहे :-

(अयं) हा (सोम: देव) अमर परमेश्वर (सूर्य:) सुर्याच्या (न) समान (विश्वानि) सर्वांना (पुनान:) पवित्र करत (भुवनोपरि) सर्व ब्रह्मांडाच्या ऊर्ध्व अर्थात वरती (तिष्ठति) बसलेला आहे.

**भावार्थ :** जसा सूर्य वरती आहे आणि आपला प्रकाश तथा उष्णता ने सर्वांना लाभ देत आहे. याप्रकारे तो अमर परमेश्वर ज्याचे वरील मंत्रामध्ये वर्णन केले आहे. सर्व ब्रह्मांडाच्या वरती बसुन आपली निराकार शक्तीने सर्व प्राण्यांना लाभ देत आहे तसेच सर्व ब्रह्मांडाचे संचालन करत आहे.

**तर्क :-** महर्षि दयानंद चा अर्थात आर्य समाजिंचे मत आहे कि परमात्मा कोणत्या एका ठिकाणी कोणत्या विशेष लोकात नाही राहत.

**प्रमाण :-** सत्यार्थ प्रकाश समुल्लास (Chapter) नं. ७ पान १४८ वर (आर्य साहित्य प्रचार ट्रस्ट ४२७ गल्ली मंदीरवाली नविन बांस दिल्ली ७८ वा संस्करण)

**कोणी प्रश्न केला :-** ईश्वर व्यापक आहे किंवा कोणत्या देश या विशेष ठिकाणी राहतो?

**उत्तर** (महर्षि दयानंद यांचे) :- व्यापक आहे कारण जर एका देशात राहत असता तर सर्व अंतर्यामी, सर्वज्ञ, सर्वनियन्ता, सर्वांचा सृष्टा, सर्वांचा धर्ता आणि प्रलय कर्ता होऊ शकत नव्हता. अप्राप्त देशात कर्ताच्या क्रिया होणे असंभव आहे. (सत्यार्थ प्रकाश मधील लेख समाप्त)

महर्षि दयानंद मानत नव्हते कि परमात्मा कोणत्या देश अर्थात स्थान ठिकाणी राहतात. महर्षि दयानंद जी वेद ज्ञानास सत्य मानत होते.

आपण अनेक वेदमंत्रा मध्ये आपल्या डोळ्यांनी वाचले कि परमेश्वर वरती एका ठिकाणावर राहतात. तेथुन गती करुन येथे देखील प्रकट होतात. महर्षि दयानंद तसेच आर्यसमाजी परमात्मा को निराकार मानतात.

**प्रमाण :-** सत्यार्थ प्रकाश के समुल्लास नं. ९ पृष्ठ १७६, समुल्लास ७ पृष्ठ १४९ समुल्लास ११ पृष्ठ २५१ वर म्हटले आहे कि परमात्मा निराकार आहे.

प्रिय वाचकांनी अनेक वेदमंत्रामध्ये वाचले कि परमात्मा साकार आहे. तो मनुष्य जसा आहे. वरच्या लोकात राहतो, तेथुन गती करुन चालुन येतात. पृथ्वी वर प्रकट होतात. चांगल्या आत्म्यांना जे दृढ भक्त असतात, त्यांना भेटतात. त्यांना तत्वज्ञान आपल्या मुख कमलाने बोलकर ऐकवतो. कविंसारखे आचरण करतात. पृथ्वीवर फिरुन परमात्मा आपले अध्यात्म ज्ञान उंच आवाजात ऐकवतात.

गीता अध्याय ४ श्लोक ३२ मध्ये हे प्रमाण आहे.

प्रिय वाचकांनो, आपण स्वत: निर्णय करा कोणाला किती अध्यात्म ज्ञान होते. विशेष आश्चर्य हे आहे कि वेद मंत्राचा अनुवाद देखील महर्षि दयानंदांनी तसेच त्यांच्या शिष्य आर्यसमाजींनी केला आहे. त्यामध्ये त्यांच्या मताचा विरोध आहे.

**निवेदन :** वेद मंत्रांची फोटोकॉपी लावण्याचा उद्देश हाच आहे कि जर मी (लेखक)

अनुवाद करुन पुस्तकात लावतो तर अन्य व्यक्ती हे म्हटले असते की संत रामपालांना संस्कृत भाषेचे ज्ञान नाही. आता हि शंका उत्पन्न होऊ शकत नाही. आता तर ही दृढता येईल कि संत रामपाल दासांनी जे वेद मंत्रांचा अनुवाद केला आहे, तो यथार्थ आहे.

## ''हिन्दू धर्मात प्रचलित शास्त्र विरूद्ध धार्मिक साधना''

विश्वात धार्मिक व्यक्तिंची कमतरता नाही. प्रत्येक धर्माचे अनुयायी आपआपल्या साधनेस सत्य मानुन पूर्ण श्रद्धेने तसेच समर्पित भावनेने करत राहतात. एकमेकाचे बघून व ऐकून ते धार्मिक क्रियाकर्म करत असतात. विशेष तपास करत नाहीत. हेच कारण आहे कि आध्यात्मिक लाभापासून वंचित राहतात. एका पूजापासुन लाभ नाही झाला तर ते दुसऱ्याच्या सांगण्याने दुसरी पूजा सुरु करतात. जर आपल्याला एखादा व्यापार किंवा धंदा सुरू करायचा विचार करत असेल तर आधी आपण त्याची संपूर्ण माहीत प्राप्त करतो.

उदाहरणासाठी आपण एखादा कोर्स करतो जसे डॉक्टर, इंजीनियर, बँकेत नोकरी प्राप्त करण्यासाठी अभ्यास करतो, कोणी व्यापार किंवा रोजगारासाठी व्यवसाय करतो तेंव्हा त्यापासून होणाऱ्या फायद्याची त्याला माहिती असते. त्याविषयी त्याला पूर्ण विश्वास असल्यामुळे तन-मन-धनाने यशस्वी होण्याचा प्रयत्न करतो. परंतु धार्मिक लाभ मिळवण्यासाठी आपण कोणताही विवेकपूर्ण विचार न करता कोणी एखादया दुसऱ्याने सांगीतलेले धार्मिक क्रिया करतो किंवा कोणाचे बघून अनुकरण करतो. मात्र त्या धार्मिक क्रियाकर्माची सत्यता पडताळून पाहण्यासाठी प्रमाण पाहणे आवश्यक समजत नाही. सर्वप्रथम विश्वातील सर्वात जुना धर्म म्हणजे सनातन पंथा (ज्याला वर्तमानात हिन्दू धर्म म्हणतात) विषयी चर्चा करू या.

पवित्र हिन्दू धर्माला मानणारे श्रद्धाळू धार्मिकतेने ओतप्रोत भरलेले आहेत. जो मानव (स्त्री-पुरुष) परमात्म्याच्या प्रती जिव्हाळा ठेवतो, तो त्याच्या पूर्व-कर्माच्या शक्तीमुळेच. तो भक्ति केल्याशिवाय राहू शकत नाही. लहानपणापासून घरपरिवारात व जवळपास कोणत्या तरी देवी देवताची किंवा बाबा, सिद्ध, नाथव सती यांची साधना- पूजा ची परंपरा चालू असते, त्यांची पुर्ण आस्थेने करतात. मोठे झाल्यावर कोण्या एकाकडून ऐकून घेतो कि देवीची पूजा करण्यासाठी वैष्णोदेवी मंदिरात दर्शनात जाने जास्त लाभदायक आहे तर तो साधक विना विलंब तेथे ही जाऊ लागतो. त्यानंतर कधी एखाद्या संताच्या शिष्याला भेटल्यावर त्या साधकाला वाटते कि आपण देखील गुरु करावा. तो त्याला सांगतो कि गुरु शिवाय मोक्ष मिळू शकत नाही. परमात्मा प्राप्ती साठी आतुर असलेला तो श्रद्धाळू, फारसा विवेक विचार न करता त्या शिष्यासोबत जावून त्याच्या गुरुकडून दीक्षा घेवून स्वत:ला धन्य समजतो. विचार करतो कि माझे जीवन धन्य झाले. तो संत सुद्धा त्याच देवी-देवतांची पूजा इष्ट रूपात मानून करतो व तशीच पूजा करण्याची दीक्षा त्याला देतो. एक दोन मंत्राचा (हरे राम, हरे कृष्ण, ओम् भगवते वासुदेवाय् नम:, ओम् नम: शिवाय किंवा गायत्री मंत्र) जाप करण्याचे सांगतो. श्राद्ध करणे, पिंडदान करणे इत्यादि कर्मकांड सुद्धा आवश्यक सांगतो. श्री विष्णु जी आणि त्यांचेच इतर स्वरूप अवतार-गण श्री राम, श्री कृष्ण यांना इष्ट रूपात मानने, वैष्णव देवी, इतर देवीदेवता, बालाजीची पूजा, श्री शंकर जींची पूजा करण्याचा सल्ला देतो. साधक (शिष्य) गुरुजीचा आदेश समजून सर्व धार्मिक क्रिया करावयास लागतो. त्याचा समज होतो कि जी धार्मिक साधना पूज्य गुरुजींनी मला सांगितली, ती साधना भक्ति हे सर्व हिन्दू धर्माच्या शास्त्रामधूनच सांगितलेली आहे. कारण कि गुरुजी संस्कृत भाषेला चांगल्या प्रकारे वाचतात आणि ते गीता, वेद, पुराण यांचे पूर्ण विद्वान आहेत. याच शास्त्राचा हवाला देवून बऱ्याच वेळेस

आपल्या धार्मिक साधनेची सत्यता ते प्रमाणीत करतात. त्यामुळे पूर्ण हिन्दू धर्माला मानणारे उपरोक्त सर्व धार्मिक साधना करतात ज्या मोक्षदायक नाहीत. गीता अध्याय १६ श्लोक २३ नुसार त्यांना ना सुखाची प्राप्ती होते ना सिद्धी प्राप्त होते. ना त्यांची गती म्हणजे मुक्ति होते म्हणजेच सर्व व्यर्थ आहे. त्यामुळे त्यांचा अनमोल मनुष्य जन्म नष्ट होवून जातो.

## हिन्दू धर्म शास्त्र काय सांगतात?

हिन्दू धर्म म्हणजे सनातन पंथाचे (धर्म) व्यक्ति (स्त्री-पुरुष) पवित्र चार ही वेद, पवित्र १८ पुराण, पवित्र श्रीमद्भगवत् गीता (गीतास चार ही वेदांचा साररूप मानतात व सर्व शास्त्राचा निष्कर्ष मानतात) तसेच सुधा सागर व उपनिषद यांना सत्य शास्त्र मानतात. यांचे हे सुद्धा मानणे आहे कि आमच्या गुरुजनांनी ह्या सर्व शास्त्रांना योग्य प्रकारे समजून घेतले आहे, व त्यानुसार आम्हाला सुद्धा या शास्त्रामध्ये वर्णीत भक्तिसाधना सांगितली आहे. सामान्यपणे हिन्दू भक्त व भक्तमती श्रीमद्भगवत गीतेला अधिक महत्व देतात कारण कि गीतेचा हिन्दी अनुवाद अनेक वर्षापासून अभ्यासला जातो आणि तो संक्षिप्त ही आहे कारण चार ही वेदात १८ हजार श्लोक (मंत्र) आहेत. परंतु गीता शास्त्रात फक्त सातशे (७००) श्लोक आहेत. त्यामुळे गीतेला सर्वोत्तम मानले जाते. त्याला हिन्दू धर्माचे धर्मगुरु सुद्धा पाठ्यपुस्तक समजतात. त्याच बरोबर सुधासागर (श्रीमद् भागवत) याला सुद्धा विशेष महत्व देतात. ज्याच्यात श्रीकृष्णजीच्या जीवन लीला अधिक आहेत. काही पुराणाना सामान्य भक्त वाचतात जसे की, श्री देवी पुराण, श्री विष्णु पुराण, श्री शिव पुराण, श्री ब्रह्मा पुराण, श्री गरुड पुराण, श्री मारकण्डेय पुराण इत्यादि-इत्यादि.

❖ मी (लेखक) ह्या सर्व शास्त्राचा अभ्यास खूप बारकाईने केला आहे. त्याच्या सोबतच पाचवा वेद म्हणजे सूक्ष्मवेदाला सुद्धा योग्य प्रकारे समजलो आहे (पाचवा वेद काय आहे? हे सुद्धा आपण याच पुस्तकात वाचले. आधी वर वर्णीत शास्त्रानी साधनेची सत्यता प्रमाणित करतो.)

❖ श्रीमद्भगवत गीता अध्याय १६ श्लोक २३-२४ मध्ये म्हटले आहे कि जो साधक शास्त्रविधिला त्यागून मनमानी आचरण करतो आहे म्हणजे जी साधना शास्त्रात वर्णीत आहे, त्याच्या विपरीत आचरण करणे याला मनमानी आचरण म्हंटले जाते. त्या मनमानी आचरण करणाऱ्याला ना तर सुखाची प्राप्ती होते, ना सिद्धी म्हणजे अध्यात्म शक्ति प्राप्त होते, ना त्याची गती होते. (या तीन गोष्टीसाठीच तर साधक साधना करत असतो. जर जी साधना केल्याने या तिन्ही गोष्टीचा लाभ नाही मिळत तर ती साधना व्यर्थ आहे).

❖ श्री गीता अध्याय १६ श्लोक २४ :- यातुन तुझ्यासाठी हे अर्जुन! कर्तव्य म्हणजे जी साधना केली पाहिजे तसेच अकर्तव्य म्हणजे जी साधना केली नाही पाहिजे, च्या व्यवस्थेमध्ये शास्त्र हेच प्रमाण आहे. भावार्थ आहे कि ज्या धार्मिक क्रिया करण्याचा निर्देश धर्माच्या पवित्र शास्त्रात वर्णीत आहे. त्याच धार्मिक क्रिया केल्या पाहिजेत, इतरांना अकर्तव्य समजून त्याग केला पाहिजे.

कबीर परमेश्वर (कविर्देव) यांनी म्हटले आहे कि:

कबीर, पीछे लागा जाऊं था, लोकवेद के साथ। रास्ते में सतगुरु मिल गये, दीपक दीन्हा हाथ।।

शब्दार्थ :- परमात्मा कबीर जीनी सूक्ष्म वेदाचे ज्ञान आपल्या मुख कमलाने बोललेल्या वाणीत सांगितलेले आहे. स्वत:ला पात्र बनवून भक्त समाजाला समजावले कि जो पर्यत सतगुरु (वेद-शास्त्राचे यथार्थ ज्ञाता गुरु) भेटत नाहीत तो पर्यत पूर्व जन्मांचे शुभ संस्काराने

प्रेरित साधक लोकवेद (लोकाकडून ऐकलेले ज्ञान जे शास्त्र प्रमाणित नसून स्थानिक ज्ञान (दंतकथावर) आधारित साधना करत असतात. या शास्त्र विरूद्ध साधनेच्या प्रवासात ज्यावेळेस सतगुरु भेटतात तेव्हा सतगुरु शास्त्रोक्त ज्ञान म्हणजे तत्वज्ञान रूपी दीपक आपल्या हातात देतात. ज्याच्या प्रकाशात साधक अंध श्रद्धा भक्ति अज्ञानरूपी अंधारात करत होता, दिशाहीन भटकत होता, त्यागुन सरळ भक्ति मार्गावर चालत जातात जी लाभदायक आहे. जीला केल्याने गीता अध्याय २३ मध्ये म्हटलेले तीन लाभ (सुख, सिद्धी तसेच मोक्ष) प्राप्त होतात जी केल्याने भक्तीचा यथार्थ लाभ मिळाल्याने मनुष्य जीवन सफल होते. याच्या विपरीत मनमाना आचरण शास्त्र विरुद्ध च्या आधाराने केल्याने अनमोल मानव जीवन नष्ट होवून जाते. कबीरजींनी सूक्ष्म वेदाचे ज्ञान या प्रकारे सांगितले आहे :-

कबीर, मानव जन्म दुर्लभ है, मिले ना बारम्बार। जैसे तरवर से पत्ता टूट गिरे, बहुर ना लगता डार।।

कबीर, कहता हूँ कहि जात हूँ, कहूं बजा कर ढ़ोल।
स्वांस जो खाली (नाम बिना) जात है, तीन लोक का मोल।।

शब्दार्थ :- परमात्मा कबीर जींनी सांगितले आहे कि मानव शरीर (स्त्री-पुरुष) बऱ्याच युगानंतर प्राप्त झाल्यामुळे दुर्लभ आहे. परमात्मा शुभ संस्कारी प्राण्याला मानव शरीर संस्कारी कार्या सोबतच शास्त्रोक्त भक्ति करून आपल्या जीवनाचा मोक्ष करण्यासाठी देतो आहे. जर मानव शरीर प्राप्त प्राणी भक्ति न करता किंवा शास्त्रविरुद्ध भक्ति करत असेल तर तो त्याचे प्रत्येक श्वास व्यर्थ नष्ट होत आहेत. प्रत्येक प्राण्यास श्वासाच्या आधारे जीवन प्राप्त होते. प्रत्येक श्वास (घेता-सोडता) ने मानव जीवन कमी होत असते. सूक्ष्मवेदात म्हटले आहे कि मनुष्याच्या या एका श्वासाचे मोल तिन्ही लोकांच्या (पृथ्वी, स्वर्ग, पाताळ) समान आहे म्हणजे अनमोल (बेशकीमती) आहे जे सत्य साधनेविना नष्ट होत आहे. त्यामुळे शास्त्रानुसार सत्यसाधना करून आपले अनमोल मनुष्य जीवन यशस्वी करा. सांसारिक आशा आकांशा मध्ये गुंतलेले मानव आध्यात्म ज्ञांनाने अपरिचित असल्या कारणाने भक्ती विना किंवा शास्त्र विरुद्ध साधना करून मृत्यूस प्राप्त होतात. ते संसार व परिवारापासून कायमचे दूर होतात जसे वृक्षाच्या फांदीचे पान तुटून गळून पडल्यावर ते परत त्या वृक्षाला कधीही जुळू शकत नाही म्हणजेच मानव शरीर तत्काळ प्राप्त होऊ शकत नाही. तो जीव परमात्म्याच्या दरबारी (कार्यालय) आपल्या शुभ-अशुभ कर्मांना पाहुन आपल्या चुकांना समजून खूप रडतो. परमात्म्याला विनवणी करतो कि चूक झाली क्षमा करावी. मी शास्त्रविरुद्ध भक्ति केली किंवा बिलकुलच केली नाही. मला अजुन एक मानव जीवन द्या, यावेळेस कोणतीच चुक करणार नाही. पूर्ण गुरुंचा शोध घेवून सांसारिक कार्यासोबतच भक्ति निश्चित करेल. माफ करा! माफ करा! परमात्मा म्हणतात कि बघ तुझ्या पुर्व जन्माची DVD, तू प्रत्येक वेळेस हीच चूक करत आला आहेस. आता तू तर आपल्या पापकर्माचे फळ प्रथम नरकात, नंतर पशू-पक्ष्याच्या शरीरात भोग. नंतर तुला कधी मनुष्य शरीर प्राप्त झालेच तर तेव्हा सतभक्ति अवश्य कर. तेथे गेल्यावर ते ज्ञान सत्य वाटू लागते जे पृथ्वीवर आपले शास्त्र सांगतात किंवा तत्वदर्शी संत (पूर्ण गुरु=सतगुरू) सांगतात कि जिवास मानव शरीर प्राप्त होणे खूपच दुर्लभ आहे. ही संधी पुन्हा पुन्हा मिळत नाही. जर मानवाने जीवनात सतभक्ति (शास्त्रोक्त साधना) नाही केली तर पशू तुल्य जीवन प्राणी संसारातून चालला जातो. पुढे परमात्म्याचा न्यायधीश म्हणजे संत भाषेत धर्मराय संपुर्ण मानव जीवनात केलेल्या कर्माचा हिशोब घेतो. तेथे जो सतभक्ति करून आजीवन मर्यादेत राहून शरीराचा त्याग करुन जातो. त्याचा हिशोब बघून धर्मराय प्रसन्न होतो. त्याला उंच सिहासनावर बसवले जाते. जो मानव शरीरधारी प्राणी एकतर भक्ति अजिबात करत नाही

किंवा शास्त्रविरूद्ध मनमाना आचरण करतो म्हणजे व्यर्थ भक्ति करून शरीर त्यागुन धर्मरायच्या समोर उपस्थित केला जातो. त्याच्या शुभ–अशुभ कर्मांना पाहतो तर दु:खी होतो कि हे भोळ्या प्राणी! अशी सुवर्ण संधी (Golden Chance) गमावून येऊन उभा आहेस. बघ तुझे पाप–कर्म! कुठलीही भक्ति किंवा शुभ कर्म नाहीत. तो प्राणी जी शास्त्रविरुद्ध साधना केली होती आणि खोटा गुरु सुद्धा बनवला होता म्हणतो कि हे प्रभू! मी तर गुरुजीच्या सांगितल्या प्रमाणे तन–मन–धनाने आपली भक्ति केली होती. त्या भक्तीची कसलीच कमाई माझ्या खात्यावर कोणत्याच कारणामुळे जमा नाही. धर्मराज त्याला सांगतात कि तुमचे धर्मगुरू शास्त्रापासुन परिचित नव्हते. त्यांनी तर स्वत:चाही मानव जीवन नष्ट केले तसेच हजारो–लाखो भोळ्या अनुयायांना सुद्धा शास्त्रविरुद्ध साधना सांगून त्याचे पाप देखील आपल्या डोक्यावर घेतले. त्याचे अनुयायी सुद्धा आपले मानव जीवन नष्ट करून गेले.

जो साधक एखादया नकली गुरुकडून दीक्षा घेऊन साधना करून धर्मरायच्या दरबारात जातो, तो निवेदन करतो कि हे भगवंत! यात माझा काय दोष आहे? मला शिक्षा कश्यामुळे भेटली? मी तर त्यांना पूर्ण गुरु समजून साधना केली. त्यावर धर्मराय म्हणाले कि हा बघ तुझ्या जीवनाचा चित्रपट (DVD), याच्यात हे कबीरदास नावाचे पूर्ण गुरु तुला सांगत होते कि तुमची भक्ति शास्त्राच्या विरुद्ध आहे. तुमचे गुरुजी तत्वज्ञान नेत्रहीन आंधळे आहेत. यांच्या जवळ मोक्षमार्ग नाही. माझ्या जवळ शास्त्रोक्त सत्य साधना आहे. त्यामुळे या नकली गुरुस त्यागून माझ्या शरणी ये. तुझे कल्याण होईल. तेंव्हा तू काय म्हटलेस, ऐकून घे! चित्रपटात म्हणतो आहेस कि हे महात्मा! आपण स्वार्थी वाटत आहात. तुमची इच्छा आहे कि मी माझ्या गुरूचा त्याग करून तुमचा शिष्य व्हावे. हे दक्षिणा लोभी! माझ्या गुरुविषयी काहीही बोलू नका नाहीतर मी भांडण करेल. त्यांनी पुन्हा नम्रतेने सांगितले कि तुमच्या सोबत तुमचे नकली गुरु धोका करत आहेत. तुम्हाला धर्मराजाच्या दरबारात पश्चाताप करावा लागेल. धर्मराज जी म्हणाले कि हे मूर्ख जीव! आपण त्या पूर्ण गुरुला नम्रतेने विचारायला पाहिजे होते कि हे महात्मा जी! आपली साधना शास्त्रविरूद्ध आहे. याचे आपल्या जवळ काय प्रमाण आहे? त्यानंतर त्यांनी तुला शास्त्राद्वारे प्रमाणित करून दाखवले असते. आपण आपल्या डोळ्यांनी बघीतल्यावर खोट्या गुरूला त्यागून शास्त्रोक्त सत्य साधना केली असती तर तुला हा दिवस बघावा लागला नसता. तू तर अंध श्रद्धा भक्तीच्या आधारे जीवन नष्ट केले आहेस. आपला हाच दोष आहे. जर कुणी चुकीच्या मार्गाने जात असेल आणि रस्त्यात आपणास एखाद्या सज्जन माणसाने निदर्शनास आणून दिले की आपण चुकीच्या मार्गाने जात आहात. आपल्या घरी जाण्याचा हा मार्ग नाही. आपल्याला कुणी तरी चुकीचा मार्ग दाखवला आहे तेव्हा आपण त्या सज्जन माणसास विचारायला पाहिजे कि मला खरा रस्ता सांगा कि ज्यावर मि विश्वास करु शकेल, असा पुरावा दाखवावा. तो सज्जन व्यक्ति आपल्याला आपल्या डायरीतून नकाशा (Map) काढून दाखवून म्हणेल कि बघ! तू दिल्ली वरुन निघालास आणि तुला मथुरेला जायचे आहे. हे पहा की आपण हिसार च्या बस स्टँड च्या जवळ उभे आहात ''तेव्हा आपण काय कराल? त्या प्रमाणास बघून आपण त्या चुकीच्या मार्गदर्शन करणाऱ्याला बरेवाईट बोलसाल तसेच म्हणाल कि ''त्या दुष्ट माणसाला काय मिळाले, माझा इतका वेळ नष्ट केला?'' काय आपण त्यास चांगला व्यक्ति म्हणाल? जीव म्हणाला ''कधीच नाही''. धर्मराज म्हणाला, हे मुला/मुली! हीच दशा त्या खोट्या गुरुंची समज जे आपले अनमोल जीवन नष्ट करतात. कबीरजीनी सूक्ष्मवेदाचे ज्ञान सांगितले आहे :–

मोती मुक्ता दर्शत नाहीं, यह जग है सब अंध रे। दीखत के तो नयन चिशम हैं, फिरा मोतिया बिंद रे।।

शब्दार्थ :- कबीर परमेश्वरजीनी म्हटले आहे कि जो नकली गुरु आहे, तो असा आहे जसा कि मोतीबिंदू झालेला व्यक्ति दिसायला तर चांगला दिसतो. वाटते याला सर्व काही स्वच्छ दिसत असेल. परंतु तो अर्धवट आंधळा आहे. हीच दशा खोट्या धर्मगूरूंची आहे. ते सहज संस्कृत बोलतात. आपल्या शास्त्राचे प्रमाण बोलून आपल्या भक्तीला सत्य सांगतात, परंतु त्यांना शास्त्राचे कुठलेच ज्ञान नाही. संस्कृतचे विद्वान बनून आपल्याला धोका देतात. आपण (भक्त समाज) यांना महाविद्वान, महामंडलेश्वर, गीता मनीषी, पूर्ण गुरु समजून बसलो आहोत. परंतु यांना आपल्या हिन्दू धर्म शास्त्राचे ज्ञान नाही. हिन्दू धर्माचे वर्तमानातील सर्व गुरुजन, आचार्य, शंकराचार्य, सर्व आखाड्याचे महंत, महामंडलेश्वर तसेच जे गीता मनीषी उपाधी प्राप्त आहेत, इत्यादी इत्यादी हे सर्व शास्त्रहीन नेत्रहीन आहेत म्हणजे यांना आध्यात्मिक मोतिबिंदू झालेला आहे. वर्तमानात सध्या माझ्या (लेखक म्हणजे रामपाल दास परमेश्वर पंथाचे) व्यतिरिक्त सर्वांना आध्यात्मिक मोतिबिंदूचा रोग झालेला आहे. यांना आपल्याच हिन्दू धर्माच्या शास्त्राचे ज्ञान नाही. करोडो अनुयायांना यांनी दिशाभुल केले आहे. स्वत: देखील यथार्थ भक्ति दिशेपासून भरकटलेले आहेत. ते आपले सुद्धा जीवन नष्ट करत आहेत तसेच त्यांचे अनुयायी जे यांना पूर्ण गुरु समजुन धोक्यात आहेत. त्यांनाही आपल्या मागे लावून नरकात पाडत आहेत. कबीर जींनी परत सूक्ष्मवेदाचे ज्ञान सांगितले आहे कि :-

सच्चा सतगुरु कोए ना करही, झूठो जग पतियावै। अंधे की बांह गही अंधे ने, सत मार्ग कौन बतावै।।

शब्दार्थ :- कबीर परमात्मा जींनी सांगितले आहे कि खऱ्या मार्गदर्शक गुरुकडून कोणी दीक्षा घेत नाही. याच्या उलट खोट्या गुरुवर हा भक्त समाज विश्वास ठेवत आहे. यांची तर अशी दशा आहे जशी एखादा आंधळा (मोतीबिंदू) झालेला व्यक्ति ने स्वत:ला डोळस असल्याचे घोषित कलेले आहे आणि त्याला डोळस समजून अनेक नेत्रहीन त्याचा हात धरून व एकमेकाचे हात धरून बागेत फिरायच्या उद्देशाने चालत आहेत. त्यांना एखादा डोळस व्यक्ति रस्त्यात थांबवून विचारतो कि हे सूरदासांनो! कुठे चालले? उत्तर मिळते कि आम्ही बागेत जात आहोत. डोळस व्यक्ति म्हणतो कि हा रास्ता घोर जंगलात जात आहे ज्यात अनेक घातक सिंह, चित्ता व अस्वल इत्यादि सारखे हिंस्त्र प्राणी तसेच साप, विंचू सारखे विषारी जीव आहेत. ते तुमचे आयुष्य संपवू शकतात. मी तुम्हाला बागेचा रस्ता सांगू शकतो. यावर ते सर्व आंधळे त्या डोळस व्यक्तीस म्हणतात कि, आमच्या गुरुजींनी आम्हाला योग्य मार्ग दाखवला आहे. ते योग्य दिशेला आम्हाला घेऊन जात आहेत. आम्ही तुझ्या बोलण्याला फसणार नाही. बघता बघता ते त्या घनदाट जंगलात चालले गेले. रात्रीच्या वेळी जंगली जनावरांनी त्यांचा फाडुन फाडुन खाल्ले, त्यांच्या जीवनलीलेचा अंत केला.

अशा प्रकारे त्या अंधश्रद्धाळू व त्यांच्या खोट्या गुरूचे अनमोल मानव (स्त्री-पुरुष) जीवन नष्ट होवून जाते. आपले सर्व धर्मगुरू व त्यांचे अनुयायी यांना मोतीबिंदूचा रोग लागलेला आहे. आपण आपल्या धर्मशास्त्राच्या ज्ञानाशी अपरिचित आहोत म्हणजे अध्यात्म ज्ञान नेत्रहीन आहोत. आपणा सर्वांचा (गुरु तसेच अनुयायी) मोतीबिंदुवरील उपचार या विश्वात केवळ माझ्याजवळ (लेखक रामपाल दास सतलोक आश्रम बरवाला, जिल्हा हिसार, हरियाणा) आहे. विनाविलंब येवून वेळीच आपल्या अध्यात्मिक ज्ञानरूपी मोतीबिंदूचा उपचार नि: शूल्क करवून घ्यावा, मी कधीही उपस्थित आहे. आपला शुभचिंतक आपला सेवक, आपला खास मित्र आहे. या गोष्टी वाचून रागावू नका (क्रोध करु नका) डोक्यावर जोर द्या. माझ्याशी भांडू नका. जर आपल्याला काही चुकीचे वाटत असेल तर कोर्टाची शरण घ्या. विवाद मिटवण्यासाठी आपल्याला हिसार कोर्टात अर्ज दाखल करावा लागेल. जर सर्वोच्च न्यायालयात अर्ज दाखल

करायचा असेल तर आपण दिल्लीला जावे. जर हायकोर्टात दाखल करायचा असेल तर आपण पंजाब व हरियाणा हायकोर्टात जावू शकता. कोर्टात सर्व प्रमाण दाखवून आपल्याला साधना शास्त्राद्वारे चुकीचे प्रमाणीत करून सत्य स्वीकार करण्याचे निवेदन कोर्टात सादर करेन. पुराव्या सोबत सांगतो कि दूसरा पर्याय हा आहे कि आपण आमच्या आश्रमाच्या वेब साईट www. jagatgururampalji. org वर जावे. तेथून नि:शुल्क माझ्या प्रवचनाची डी.व्ही.डी प्राप्त करावी. माझ्या द्वारे लिखित पुस्तके ''गीता तुझे ज्ञान अमृत'', ''जगण्याचा मार्ग '', ''भक्ति पासून परमेश्वर पर्यंत'' तसेच इतर पुस्तके माझ्या प्रवचनांनी लिखित ''ज्ञान गंगा'' इत्यादि पुस्तके नि:शुल्क याच वेबसाईट वरुन डाउनलोड करावे व वाचावे. सत्संग बघा व ऐका. आपल्या अध्यात्मिक अज्ञानरूपी मोतीबिंदूचा उपचार नि:शूल्क होवून जाईल. नंतर माझ्याजवळ येवून शास्त्रोक्त भक्ति साधना प्राप्त करून आपल्या मनुष्य जन्माचे सार्थक करावे. आपल्या खोट्या गुरूंना समजावून त्यांनाही माझ्या (रामपाल दास) कडून दीक्षा देवून ह्या ज्ञानभ्रष्ट गुरूंचे देखिल कल्याण करवावे.

प्रिय वाचक हो! तुम्हाला सांगतो कि संपूर्ण हिन्दू धर्माचे (सनातन पंथ) वर्तमानातील सर्व धर्मगुरु तसेच अनुयायी देवी-देवतांची पूजा करतात व करवून घेतात. एकूण तेहतीस करोड देवता मानले गेले आहेत. तेवढ्याच त्यांच्या धर्मपत्नी (देवी) आहेत. देवताचा राजा इंद्र आहे. (देवराज इंद्र म्हणतात) तो फक्त स्वर्गाचा राजा आहे. ज्याचे वय बाहत्तर (७२) चौकडी युग म्हणजे ७२ चतुर्युग आहे.

याच्या व्यतिरिक्त तीन मुख्य देवता आहेत. त्यांचे शुभ नावे या प्रमाणे आहेत: - १. श्री ब्रह्माजी (रजगुण), २. श्री विष्णु जी (सतगुण), ३. श्री शिव शंकरजी (तमोगुण).

मारकण्डेय पुराणात पान १२३ वर लिहिले आहे कि श्री ब्रह्मा, श्री विष्णु व श्री शिवजी हे ब्रह्मच्या मुख्य प्रधान देवता आहेत. याच तीन देवता आहेत व हेच तीन गुण आहेत. तीन गुण (रजगुण, सतगुण, तमगुण) हे प्रकरण या तीन देवतांचा श्री ब्रह्मा जी, श्री विष्णु जी ,श्री शिव जी बोध करवतात. उदाहरणसाठी गीता अध्याय ७ श्लोक १२ ते १५ गीता ज्ञानदाता ब्रह्मने म्हटले आहे कि तिन्ही गुणाकडून जे होत आहे (रजगुण ब्रह्मा कडून उत्पत्ति, सतगुण विष्णु कडून स्थिति, तमगुण शिव जीकडून संहार) त्याचे निमित्त मूळ कारण मीच आहे. कारण कि कालब्रह्मला शापवश एक लाख मनुष्य शरीरधारी प्राण्यांना खावे लागते. (त्यामुळे कालब्रह्मने आपल्या तीन पुत्राकडून (रजगुण ब्रह्मा, सतगुण विष्णु व तमगुण शिव जी) आपल्या अन्नाची व्यवस्था करण्यासाठी तिघांना काम दिले आहे. तो स्वत: या तिघापासून वेगवेगळ्या गुप्त स्थानावर राहतो. याविषयीचे संपूर्ण ज्ञान आपण याच पुस्तकात पान १९२ वर सृष्टिरचना प्रकरणात वाचावे). त्यामुळे म्हटले आहे कि हे तीन गुण माझ्यात तसेच मी यांच्यात नाही. (गीता अध्याय ७ श्लोक १२).

❖ गीता अध्याय ७ श्लोक १३:- हे तीन गुण म्हणजे रजगुण ब्रह्मा जी, सतगुण विष्णु जी व तमोगुण शिवजी जी यांच्या कार्य रूपाने या तीन प्रकारच्या भावामुळे हा सारा संसार यांच्यावर मोहित होत आला आहे. म्हणजे तीन ही देवतांचे कार्य उत्पत्ति, स्थिति तसेच संहार यांच्यामुळे प्रभावित या तिन्ही देवताना ईष्ट समजून यांच्यावर आसक्त होत आहेत. या तीन देवापासून वेगळा मला जाणत नाहीत. ( गीता अध्याय ७ श्लोक १३).

❖ गीता अध्याय ७ श्लोक १४:- कारण कि ही अलौकिक अर्थात अतिअद्भुत त्रिगुणमयी माझी माया अतिदुस्तर आहे. म्हणजे श्री ब्रह्मा, विष्णु तसेच शिव द्वारे पसरलेले मोह-ममताचे जाळे भयंकर आहे. परंतु मला कालब्रह्मला जो भजतो, तो या मायेला उल्लंघून पार करून

जातो. म्हणजे ह्या संसारातून तरुन जातो. भावार्थ हा कि जो ह्या तीन देवताची भक्ति त्यागून, कालब्रह्मला ची इष्ट रूपात भक्ति करतो, तो ब्रह्म लोकात चालला जातो. त्याचा स्वर्गकाळ हा या तीन देवतांच्या भक्तीने प्राप्त स्वर्गसुखापेक्षा (जे देवतांकडे जाऊन यांचे पुजारी स्वर्ग सुख भोगतात) खूप अधिक आहे. परंतु ब्रह्मलोकात गेलेल्या साधकाची पुनरावृती होते म्हणजे जन्म-मरण आहेच प्रमाणासाठी पहा गीता अध्याय ८ श्लोक १६. (गीता अध्याय ७ श्लोक१४).

❖ गीता अध्याय ७ श्लोक १५:- मायेच्या (रजगुण ब्रह्मा, सतगुण विष्णु व तमोगुण शिव यांच्या क्षणिक स्वर्ग कालावधीस पूर्ण लाभ समजून) या लाभामुळे ज्यांचे ज्ञान हरण झालेले आहे म्हणजे यांचे पुजारी यांच्या व्यतिरिक्त अन्य दुसऱ्या प्रभूला महत्व देत नाहीत. याच कारणाने यांचे यथार्थ आध्यात्मिक ज्ञान हरण झालेले आहे. असे असुर स्वभाव धारण केलेले मनुष्यामध्ये नीच दूषित कर्म (दुष्कर्म) करणारे, मूढ (मूर्ख) लोक मला (कालब्रह्मला म्हणजे ब्रह्मा, विष्णु व शिवजींच्या वडिलांना) भजत नाहीत. (ते तीन गुणांना म्हणजे ब्रह्मा, विष्णु व शिवजी यांनाच भजत राहतात.) (गीता अध्याय ७ श्लोक १५).

❖ गीता अध्याय ७ श्लोक २०-२३ मध्ये स्पष्ट केले आहे कि :-

त्या-त्या भोगांच्या कामनेद्वारे ज्यांचे ज्ञान हरण झालेले आहे. (ते लोक) आपल्या स्वभाववश प्रेरित होवून त्या नियमांचे पालन करतात म्हणजे ज्या देवतांचे पूजेचे नियम त्या क्षेत्रात लोकवेदांच्या आधारे प्रसिद्ध आहेत, त्या विधिंनुसार इतर देवतांना भजतात म्हणजे पूजा करतात. (गीता अध्याय ७ श्लोक २०).

❖ गीता अध्याय ७ श्लोक २१:- काल ब्रह्म स्पष्टपणे म्हणतो कि जो भक्त ज्या देवतांच्या स्वरूपास श्रद्धेने पूजतो. त्या भक्ताच्या श्रद्धेस मी त्याच देवतांच्या प्रती स्थिर करतो. (गीता अध्याय ७ श्लोक २१).

भावार्थ :- कालब्रह्म ने वरील श्लोक गीता अध्याय ७ श्लोक १२-१५ तसेच २० मध्ये स्पष्ट केले आहे कि तिन्ही देवतांना पूजणाऱ्या चे ज्ञान हरण झालेले आहे. ते यांच्या कडून प्राप्त होणाऱ्या अस्थाई लाभावर मोहित (आसक्त) आहेत. हे राक्षस स्वभाव धारण केलेले मनुष्यामध्ये नीच, दूषित कर्म करणारे (दुष्कर्मी) मूर्ख माझी भक्ति करत नाहीत. जेव्हा मी बघितले के हे मूर्ख या देवतांच्या जाळ्यातून निघायची इच्छा ठेवत नाहीत त्यामुळे जो ज्या देवतेला इष्ट रूपात आहे त्याची आस्था मी त्याच्यावरच दृढ करतो. नाही मानत तर पडा विहिरीत जाऊन.

❖ गीता अध्याय ७ श्लोक २२:- कालब्रह्म ने स्पष्ट केले कि या देवतांना मी काही शक्ति प्रदान केली आहे. त्याच्यानेच या देवता आपल्या पूजाऱ्याच्या काही मनोकामना सिद्ध करून देतात म्हणजे त्या देवतांच्या पूजेणे काही तात्पुरते लाभ मिळवतात. श्लोक २३ मध्ये स्पष्ट करून दिले आहे कि:-

❖ गीता अध्याय ७ श्लोक २३:- परंतु त्या अल्प बुद्धिच्या म्हणजे अज्ञानींचे ते लाभ नाशवान आहेत. देवतांना पूजणारे देवतांना प्राप्त होतात. माझे भक्त मला प्राप्त होतात.

❖ गीता अध्याय ९ श्लोक २३:- हे अर्जुन! जरीही जे भक्त दुसऱ्या देवतांना श्रद्धेने पूजतात. ते देखील मलाच पूजतात (कारण कि माझ्याकडून दिलेल्या काही शक्तिद्वारे त्या देवता आपल्या पुजाऱ्याला तात्पुरते छोटे मोठे लाभ देतात. त्यामुळे कालब्रह्म म्हणतो की ते देखील माझीच पूजा करतात). परंतु ती पूजा अविधिपूर्वक म्हणजे शास्त्रविधीच्या विपरीत आहे. (ज्याला गीता अध्याय १६ श्लोक २३ मध्ये व्यर्थ सांगितले आहे.)

❖ गीता अध्याय ९ श्लोक २५:- या श्लोकात काल ब्रह्म ने काही शंकाचे समाधान करून

दिले आहे. म्हटले आहे की जो देवतांची पूजा करतो, तो देवतांना प्राप्त होतो. (हेच प्रमाण गीता अध्याय ७ श्लोक २३ मध्ये सुद्धा आहे. ).

पित्तरांना पूजणारे पित्तरांना प्राप्त होणार (म्हणजे जो श्राद्धकर्म करतो, तो पितर योनीला प्राप्त होतो व पितरलोकी यमराजाच्या अधीन यम लोकामध्ये कष्ट भोगतो). भूतांची म्हणजे प्रेतांची पूजा करणारे (तेरावे, सतरावे, महिना, वर्षीला पिंड-दान करतात. अस्थि उचलून गती (विसर्जित) करण्यासाठी पुरोहिताकडे जातात. या सर्व भूतांच्या पूजा आहेत ज्या गीता शास्त्रात स्पष्ट केल्या आहेत कि अश्या पुजांचे फळ मोक्षदायक नाही. जोपर्यंत पूर्ण मोक्ष होणार नाही तो पर्यत जीवाचा जन्म-मृत्यू होतच राहील. पापपुण्य कारणाने दुख व अस्थायी सुख भोगावेच लागेल. मनुष्य जीवनाचा खरा लाभ प्राप्त होणार नाही.)

कालब्रह्म ने म्हटले आहे कि माझी पूजा करणारा मलाच प्राप्त होईल. याच्यानेही जन्म-मृत्यू समाप्त होत नाहीत. कारण कि गीता अध्याय २ श्लोक १२ गीता अध्याय ४ श्लोक ५ आणि गीता अध्याय १० श्लोक २ यामध्ये गीता ज्ञानदाता काल ब्रह्म स्वत: म्हणतो की हे अर्जुन! तुझे व माझे अनेक जन्म झालेले आहेत. तुला माहीत नाही पण मला माहीत आहेत. तू, मी व हे राजे महाराजे लोक आधीही जन्मले आहेत आणि पुढेही जन्मतील. माझ्या उत्पत्तीस हे देवता व ऋषिगण जाणत नाहीत कारण की यांची उत्पति माझ्यापासून झालेली आहे.

त्यामुळे गीता ज्ञानदाताने गीता अध्याय १८ श्लोक ६२ मध्ये पूर्ण मोक्ष्यासाठी आपल्या व्यतिरिक्त अन्य परमेश्वराच्या शरणास जाण्यासाठी सांगितले आहे. ज्याचा कृपेने परम शांति व सनातन परम धाम प्राप्त होईल. गीता अध्याय १५ श्लोक ४ मध्ये वर्णीत पूर्ण मोक्ष म्हणजे परमेश्वराचे परम पद प्राप्त होईल. जेथे गेल्यानंतर साधक कधीच या संसारात परत माघारी येत नाही.

❖ हिन्दू धर्माचे गुरुजन तसेच अनुयायी गीता शास्त्रामध्ये वर्जित साधना करत आहेत जे शास्त्रविधिस त्यागून मनमाना आचरण असल्यामुळे परमात्मा ची भक्ति पासून मिळणाऱ्या लाभापासून वंचित राहत आहेत. अनमोल मानवाचे (स्त्री-पुरुषाचे) जीवन नष्ट करत आहेत. त्यांना हे निवेदन आहे कि वर्तमानात विश्वामध्ये अरबो मनुष्यांमध्ये केवळ हा दास (रामपाल दास म्हणजे लेखक) शास्त्रविधी अनुसार साधना जाणत आहे जी सर्व सदग्रंथामध्ये वर्णीत आहे. माझ्या ज्ञांनाचा आधार सूक्ष्मवेद आहे, जो परमेश्वर द्वारा पृथ्वीवर प्रकट होऊन आपल्या मुख कमलाद्वारे सांगितले जाते. ज्याला सच्चिदानंद घन ब्रह्मची वाणी म्हटली आहे. त्यालाच तत्वज्ञान देखील म्हटले आहे. ज्याचे प्रमाण गीता अध्याय ४ श्लोक ३२ मध्ये आहे. गीता ज्ञान दाताने म्हटले आहे कि यथार्थ भक्तीच्या क्रिया म्हणजे यज्ञाचे ज्ञान सच्चिदानंद घन ब्रह्मने आपल्या मुख कमलाने बोललेल्या वाणीत सांगितले आहे. ते तत्वज्ञान आहे. जे काम करता-करता साधना करण्याचे आहे. ज्याच्याने पूर्ण मोक्ष प्राप्त होतो.

❖ गीता अध्याय ४ श्लोक ३४:- या श्लोकामध्ये गीता ज्ञान देणाऱ्याने म्हटले कि ते तत्वज्ञान मलाही माहीत नाही. त्यामुळे तर म्हटले आहे की त्या तत्वज्ञान परमात्मा स्वत: बोलून आपल्या वाणीमध्ये ऐकवत असतात, ते एखाद्या तत्वदर्शी संताजवळ जाऊन समजाऊन घे. त्यांना दंडवत प्रणाम केल्याने, नम्रतापूर्वक प्रश्न केल्याने ते तत्वज्ञानासा चांगल्या रितीने समजणारे ज्ञानी महात्मा तुला तत्वज्ञानाचा उपदेश करतील.

❖ गीता अध्याय ७ श्लोक २९ मध्ये गीता ज्ञान दाता याच प्रकरणाच्या आधारे म्हणतो कि :- जो माझ्या द्वारे दिलेल्या ज्ञानाच्या आधारे म्हणजे माझ्या ज्ञानाचा आश्रय घेवून

तत्वदर्शी संताचा शोध घेतात, तो केवळ जरा (वृद्धावस्था) व मरण (मृत्यू) पासून सुटका करण्यासाठी प्रयत्न करतो. तो या संसारातील कोणत्याही वस्तूची इच्छा ठेवत नाही. ते (तत ब्रह्म) त्या परमेश्वराला जाणतात व संपूर्ण कर्म तसेच संपूर्ण अध्यात्माला जाणतात. गीता ज्ञान दाताने गीता अध्याय ८ श्लोक १ मध्ये प्रश्न केला कि तत ब्रह्म काय आहे? गीता ज्ञान दाताने गीता अध्याय ८ श्लोक ३ मध्ये सांगितले की तो परम अक्षर ब्रह्म आहे.

गीता अध्याय ८ च्या श्लोक ५ व ७ मध्ये आपली साधना करण्याचे साठी गीता ज्ञान दाताने सांगितले आहे की माझी भक्ति केल्याने मलाच प्राप्त होशील, परंतु युद्धं सुद्धा करावेच लागेल. (जेथे युद्ध आहे, तेथे परम-शांति होऊ शकत नाही.)

गीता ज्ञान दाता कालब्रह्म ने गीता अध्याय ८ श्लोक १३ मध्ये आपल्या भक्तीचा केवळ एक अक्षराचा ''ओम्'' (ॐ) मंत्राचा जप सांगितला आहे.

❖ गीता अध्याय ८ श्लोक १६ मध्ये स्पष्ट केले आहे कि ओम नाम ब्रह्मचे आहे. त्याची भक्ति केल्याने ब्रह्म लोकाची प्राप्ती होते. (हेच प्रमाण देवी पुराणाच्या ७ व्या स्कंदात पान ५६२-५६३ वर श्री देवी (दुर्गाजी) जी हिमालयास ज्ञान देताना म्हणते कि हे राजन! तुम्ही माझ्या पूजेसह सर्व पुजांचा त्याग करून केवळ एक ॐ नामाचा जप करावा. हा मंत्र ब्रह्म प्राप्तीचा आहे. याचा जप केल्याने ब्रह्मला प्राप्त होवून ब्रह्म लोकाला जावून दिव्य आकाशात ब्रह्मजवळ राहणार. तुमचे कल्याण हो. यावरून हे सिद्ध होते कि ॐ (ओम्) मंत्र जप ब्रह्मचा आहे. याची साधना केल्याने ब्रह्मलोक प्राप्त होतो (गीता अध्याय ८ श्लोक १६ मध्ये स्पष्ट केले आहे कि ब्रह्म लोकात गेलेल्या साधकाचा जन्म-मृत्यू होतो). यावरून सिद्ध होते कि ब्रह्मची साधना केल्याने परम शांति तसेच परमधाम प्राप्त होत नाही. त्यामुळे गीता ज्ञान दात्याने गीता अध्याय ८ श्लोक ८,९,१० मध्ये आपल्या शिवाय अन्य सच्चिदानंद घन ब्रह्म म्हणजे परम अक्षर ब्रह्म सांगितला आहे. म्हटले आहे कि त्याची भक्ति केल्याने त्यालाच प्राप्त होशील. त्याच्या भक्तीचा मंत्र गीता अध्याय १७ श्लोक २३ मध्ये सांगितले आहे कि ''सच्चिदानंद घन ब्रह्म म्हणजे परम अक्षर ब्रह्मचे स्मरण करण्याचा तीन अक्षर मंत्राचा ओम्-तत्-सत् चा जाप आहे. त्याची भक्ति केल्याने त्यालाच प्राप्ती होशील.'' गीता अध्याय १८ श्लोक ६२ मध्ये गीता ज्ञान सांगणारा त्याच परमेश्वराच्या शरणास जाण्यास सांगत आहे. ज्याच्या कृपेने परमशांति म्हणजे जन्म-मृत्यू कायमस्वरूपी समाप्त होतो व (शाश्वत् स्थान) सनातन परमधाम प्राप्त होते. त्याच परमेश्वराच्या प्राप्तीसाठी गीता अध्याय १५ श्लोक ४ मध्ये म्हटले आहे कि तत्वज्ञानरूपी शास्त्राद्वारे अज्ञान नष्ट करून म्हणजे तत्वज्ञान समजल्या नंतर परमेश्वराच्या या परमपदाचा शोध घेतला पाहिजे जेथे गेल्यानंतर मनुष्य कधीच या संसारात परत येत नाही. ज्या परमेश्वरानी संसाररूपी वृक्षाचा विस्तार केला आहे म्हणजे ज्यांनी सर्व ब्रह्मांडाची रचना केली आहे, त्याचीच भक्ति कर).

❖ गीता अध्याय १५ श्लोक १६-१७ मध्ये तीन पुरुष सांगितले आहेत. क्षर पुरुष व अक्षर पुरुष हे दोघेही तसेच यांच्या अंतर्गत जेवढेही प्राणी आहेत ते सर्व नाशवान आहेत. क्षर पुरुषाचे २१ ब्रह्मांडे व अक्षर पुरुषाचे सात संख ब्रह्मांडे आहेत.

❖ गीता अध्याय १५ श्लोक १७ मध्ये स्पष्ट केले आहे कि पुरुषोत्तम तर उपरोक्त दोन्ही पेक्ष्या अन्यच आहे ज्याला परमात्मा म्हटले जाते तो तिन्ही लोकात प्रवेश करून सर्वाचे धारण पोषण करतो. तोच वास्तविक अविनाशी परमेश्वर आहे. (गीता अध्याय १५ श्लोक १६-१७).

❖ शंका समाधान :- काही भ्रमित श्रद्धाळू म्हणतात कि गीता अध्याय १५ श्लोक १८

मध्ये गीता ज्ञान दाता स्वत:ला पुरुषोत्तम म्हणत आहे.

❖ समाधान :- या श्लोकात गीता ज्ञान दाताने म्हटले आहे कि जेवढे प्राणी माझ्या अंतर्गत आहेत त्याच्यात मी उत्तम म्हणजे श्रेष्ठ आहे. ज्यामुळे लोकवेद म्हणजे लोकचर्चेत ऐकलेल्या ज्ञानाच्या आधाराने मी पुरुषोत्तम म्हणून प्रसिद्ध आहे (वास्तविक पुरुषोत्तम तर गीता अध्याय १५ श्लोक १७ मध्ये सांगितला आहे).

❖ हिन्दू धर्माचे सर्व धर्मगुरु (शंकराचार्य, आचार्य, श्री ज्ञानानंद जी, वृंदावनवाले, आसाराम, सुधांशु व इतर हिन्दू धर्माचे महंत-आखाडा परिषद् वाले) तीन्ही देवता श्री ब्रह्मा जी, श्री विष्णु जी व श्री शिव जी तसेच ३३ करोड देवता देवीं पैकी कोणाची ना कोणाची भक्ति करतात-करवितात. श्राद्ध कर्म, भूत पूजा देखिल करतात-करवितात जे शास्त्रविधिला त्यागून मनमाना आचरण करतात तसेच करवितात. हा भक्त समाजा बरोबर सर्वात मोठा धोका करत आहेत कारण कि या सर्वांना गीता शास्त्राचे अजिबात ज्ञान नाही. यांनी मानबढाई तसेच अहंकाराचा त्याग करून यावर पुनर्विचार केला पाहिजे. नाहीतर परमात्म्याच्या दरबारामध्ये लपण्यास जागा मिळणार नाही. त्या वेळेस खूप उशीर झालेला असेल.

❖ पूर्वी सांगीतलेले आहे कि इंद्राचे जीवन ७२ चतुर्युगाचे असते म्हणजे देवाचा राजा सुद्धा नाशवान आहे. सर्व देवता सुद्धा नाशवान आहेत.

❖ श्री ब्रम्हाजी, श्री विष्णुजी व श्री शिवजी सुद्धा नाशवान आहेत. :-

प्रमाण :- श्री देवी पुराणात तिसऱ्या स्कंदात स्वत: श्री विष्णुजी म्हणतात कि हे माते! तू शूद्ध स्वरूपा आहेस. संपूर्ण संसार तुझ्यापासून ऊदभाषित होत आहे. मी (विष्णु), ब्रह्मा व शंकर अविनाशी नाहीत. आमचाही आविर्भाव (जन्म) व तिरोभव (मृत्यू) होत असतो. हे माता मी तुम्हाला त्यावेळेस बघितले होते जेव्हा मी लहान बालक होतो. तुम्ही मला पाळण्यात झुलवत होतात. मी माझ्या पायाच्या अंगठ्यास तोंडात घेऊन चघळत होतो.

शंकर जींनी म्हटले कि तुमच्या पोटी विष्णु व ब्रह्माचा जन्म झाला. त्याच्यानंतर मला जन्म देणारी माता सुद्धा तुम्हीच आहात. काय तमोगुणी लीला करणारा मी (शंकर) तुझा मुलगा नाही? तूच माझी व ब्रह्मा, विष्णूची जननी आहेस.

❖ वरील प्रमाणावरून हे स्पष्ट होते कि तिन्ही (श्री ब्रह्मा, श्री विष्णु व श्री शिव) नाशवान आहेत. यांचाही जन्म-मृत्यू होतो. यांची माता दुर्गा देवी आहे.

❖ या तिघांचे वडील कालब्रह्म आहेत :-

प्रमाण :- श्री शिव पुराणात रुद्र संहिता व विद्यवेश्वर संहिता मध्ये आहे. (गीता प्रेस, गोरखपुरहून प्रकाशित).

रुद्र संहितेमध्ये म्हटले आहे कि सदाशिव म्हणजे काल ब्रह्म ने आपल्या मधून एक स्त्री उत्पन्न केली. तिला प्रकृतिदेवी, त्रिदेवजननी म्हटले गेले आहे. जिचे आठ हात आहेत. या दोघानी पती-पत्नी रूपात विलास करून एका पुत्राला जन्म दिला त्याचे नाव विष्णु ठेवले.

❖ त्यानंतर ब्रह्माजीला देखील याच पद्धतीने उत्पन्न केले.

❖ विद्यवेश्वर संहितेत स्पष्ट केले आहे कि काल ब्रह्मचे ब्रह्मा, विष्णु व शिव असे तीन पुत्र आहेत. हे प्रकरण अशा प्रकारे आहे कि -

एकदा श्री ब्रह्मा जी तसेच श्री विष्णु जी यांचे युद्ध होऊ लागले. कारण हे होते कि श्री ब्रह्मा जी एकदा श्री विष्णु जीच्या निवास स्थानावर गेले होते. त्यावेळेस श्री विष्णुजी आपल्या

शेष शय्येवर झोपलेले होते. त्यांच्या जवळ श्री लक्ष्मी जी बसलेल्या होत्या तसेच त्यांच्या जवळ पास सेवक (नोकर) बसलेले होते. त्यांनी ब्रह्मा जींचे स्वागत केले नाही. त्यामुळे ब्रह्माजींना राग आला. ते रागाच्या भरात म्हणाले कि हे विष्णु! बघ तुझा बाप आला आहे पण तू ऊठून सन्मान करत नाहीस. तुला येवढा कसला अभिमान झाला आहे. मी सर्वांचा उत्पत्तिकर्ता आहे. त्यामुळे मी तुझा देखील जनक आहे. हे ऐकून विष्णुजी आतून क्रोधित झाले परंतु वरुन शांत राहून बोलले कि हे ब्रह्मा! तुझा जन्म माझ्या नाभी मधून निघालेल्या कमळावर झाला. त्यामुळे मीच तुझा बाप आहे. परंतु तू आपल्या वडीलाचे चरण स्पर्श करत नाहीस. तुला गर्व झालेला आहे. तुझा अभिमान ठीक करावा लागेल. असे म्हणत दोघांनी आप-आपले शस्त्र उचलून युद्ध करण्यास तयार झाले. त्याचवेळेस तेथे त्या उभयताचे वडील सदाशिव म्हणजे कालब्रह्म ज्यास ज्योति स्वरुप नीरंजन देखील म्हणतात, त्यांनी या दोघामध्ये तेजोमय स्तंभ उभा केला. ते दोघे शांत झाले. (ही एक मोठी कथा आहे, पण पुस्तक विस्तार बघून संक्षिप्त वर्णन करत आहे). त्यावेळेस तेथे काल ब्रह्म प्रकट झाले, ज्याने आपले पुत्र शिवाचे रूप धारण केले होते. त्यांच्या सोबत त्यांची पत्नी दुर्गा देखील पार्वती रूपात प्रकट झाली. सदाशिवानी ब्रह्मा व विष्णुला म्हंटले कि मुलांनो! तुम्ही दोघेही ईश (भगवान) नाहीत. तुम्हा दोघांना तुमच्या तपाच्या बदल्यात उत्पत्ति व स्थिति हे दोन कार्य दिलेले आहेत. याच प्रकारे रुद्र तसेच शंकराला संहार व तिरोभाव म्हणजे देव स्तराच्या जीवांना मारण्यास तिरोभाव म्हंटले आहे जाते, परंतु संहार करणे हाच अर्थ आहे.

या प्रकरणात हे सिद्ध झाले कि श्री ब्रह्मा, श्री विष्णु व श्री शिव यांचे वडील कालब्रह्म आहेत व माता प्रकृती देवी म्हणजे देवी दुर्गाजी(अष्टांगी) आहेत. हे प्रकरण श्री शिव पुराणात आहे ज्याचे प्रकाशक आहेत श्री खेमचंद कृष्णदास व मुद्रक :- वैंकटेश्वर प्रेस मुंबई ज्यात संस्कृतभाषेचा हिन्दी अनुवाद आहे.)

❖ हिन्दू धर्माचे गुरुजन आजपर्यंत या सत्यापासून अपरिचित आहेत आणि दंतकथा ऐकवतात कि श्री ब्रह्माजी, श्री विष्णुजी व श्री शिवजींचे कोणी माता-पिता नाहीत. हे स्वयंभू आहेत. अविनाशी आहेत. यांचा जन्म-मृत्यू कधी होत नाही.

हे एवढेही सांगतात कि ब्रह्माजींचे वय शंभर वर्षे आहे. यांचे एक्कावण (५१) वे वर्ष चालू आहे.

विचार करण्यासारखी गोष्ट ही आहे कि ही दंतकथा नाही तर अन्य काय आहे? यामुळे हे सिद्ध होते कि हिन्दू धर्माचे धर्मगुरु आपल्या सर्व धर्म शास्त्राचे पूर्ण ज्ञान ठेवत नाहीत. हे सर्व निमहकीम सारखे धोकादायक अर्धवट वैध्य आहेत. यांच्या पासून स्वत: ला वाचवा व या दासाजवळ (रामपाल दास) बरवाला आश्राम (जिल्हा हिसार, हरियाणा) येथे येवून शास्त्रोक्त ज्ञान व भक्तिसाधना प्राप्त करून आपल्या जीवाचे कल्याण करून घ्यावे.

## ''आध्यात्मिक रहस्य''

प्रश्न :- जादू काय आहे? जादूगर हा आकाशात स्वत: उडून जातो. इतरांना सुद्धा हवेत पृथ्वीच्या थोड्या अंतरावर स्थिर करू शकतो. एखाद्या रिकाम्या पेटीतून (पिटाऱ्यातुन) कबुतर काढतो. कारला हवेमध्ये चालवतो. नदीच्या पाण्यावर जमिनीसारखे चालून पार करतो इत्यादि-इत्यादि.

जसे जादूगर पी.सी. सरकार :- हा भारताचा जादूगार आहे जो महिलाला हवेत

उडवतो होता. हवेमध्ये थांबवत होतो. एक डायनामो नावाचा जादूगार दुसऱ्या देशाचा आहे :– याच्या विषयामध्ये लिहिले आहे कि हा इंग्लंड देशाचा रहिवाशी आहे. हा चालता–चालता अदृश्य होत असे. कधी हवेत उडतो देखिल. लंडनच्या थेम्स नदीवर पायाने चालुन पार करत असे. उडून डबल डैकर म्हणजे दोन मजली बसच्या वर चढुन जात असे. क्षणातच बर्फाचे पाणी आणि पाण्याचा बर्फ करत असे.

सुहाणी शाह : – ही महिला जादूगारनी अनेक आश्चर्यकारक कारनामे दाखवते. ती गाड्यांना हवेत उडवत असे. स्टेज वरून उभ्या–उभ्या गाडीला चालवत असे म्हणजे चालु करत असे. गाडीला पळवत असे. इतर अनेक जादूगार बघितले आहेत जे गावात आपल्या कलेचे प्रदर्शन करत राहतात. जसे तोंडात बोराच्या फळासारख्या काचेच्या गोट्या (अन्टे) टाकत असे. काही क्षणामध्ये आकाशाकडे तोंड करून काही मंत्र बडबडत असे आणि मोठ मोठे चिकणे दगडी गोटे जुन्या वेळेचे बाट (दगडाचे गोल गोटे) बाहेर काढतात जे जवळपास ३००–४०० ग्रॅम चे असतात आणि खूप कठोर असतात. अशा प्रकराची अनहोनी तर एकच व्यक्ती करतो. ही काही आध्यात्मिक शक्ति आहे का हात चलाखी आहे किंवा नजरबंद करण्याच्या कलेचा भ्रम आहे ?

उत्तर :– जादू – जादू अध्यात्माचे विकृत (बिघडलेले) रूप आहे. जादुमध्ये सफलता त्यांनाच मिळते आहे जे पूर्व जन्मा मध्ये परमात्माची उपासना करत होते. सत्य साधना न मिळाल्यामुळे त्यांच्यात सिद्धीशक्ति येतात. त्या सिद्ध शक्तीने भ्रमित साधक त्या पूर्व जिवनामध्ये देखिल सिद्धी शक्तीमुळे प्रसिद्ध होतात. ज्या कारणामुळे त्यांच्या काही सिद्धी शक्ति त्या पूर्व जन्मात प्रदर्शन केल्यामुळे नष्ट होतात. उरलेल्या पुढच्या जन्मामध्ये जादूगार बनून नष्ट करतात. पुन्हा पशू–पक्ष्यांचे जीवन प्राप्त करतात.

उदाहरणसाठी एक सत्य कथा :– एका प्रसिद्ध महात्म्याच्या आश्रमात त्यांचे काही शिष्य राहत होते. सर्वांना त्या महातम्याने तप साधना तसेच काही शास्त्रविरूद्ध मंत्र जप करण्यासाठी सांगितले होते. त्याने कांही सिद्धी प्राप्त करण्याचा उद्धेश सांगितला होता. हीच जीवनाची उपलब्धी सांगितली होती. त्या महात्म्याच्या मृत्यू नंतर तिचा एक शिष्य त्या आश्रमाचा महंत बनला. तो देखील एक सिद्ध शिष्य होता. त्यांच्यात जे मोठे शिष्य होते ते आश्रम सोडून वेगवेगळ्या दिशेने आपली साधना करण्यासाठी निघून गेले. त्यांच्यात दोन घनिष्ट मित्र होते. ते देखील साधना करण्यासाठी एकांतामध्ये तसेच एकटे राहण्याच्या उद्देशाने वेगवेगळे झाले होते. एकाचे नाव गुलाब नाथ व एकाचे नाव भाणींनाथ होते. गुलाबनाथ यास कबीर परमेश्वरांच्या अनुयायांचा सत्संग ऐकण्यास मिळाला. त्यामुळे त्याला आपली साधना व उद्धेश व्यर्थ वाटू लागला तसेच परमेश्वर कबीरजींचे ज्ञान समजून गुलाब नाथजींनी कबीर पंथात त्या कबीरपंथी संताकडून दीक्षा घेतली तसेच पूर्वीच्या गुरुजींना तसेच त्यांनी सांगितलेल्या उद्धेश तसेच साधनेचा त्याग केला. सत्य साधना करून सतलोकात जाणे तसेच पुन्हा जन्म न प्राप्त करण्याच्या उद्देशाने समर्पित होऊन साधना करू लागले. त्यांची निष्ठा पाहून कबीरपंथी संत उदय दास यांनी गुलाब नाथा चे नाव गुलाब दास ठेवले तसेच आपला उत्तराधिकारी बनवले. काही काळानंतर संत उदय दास यांचा देहांत झाला. गुलाब दास दीक्षा देऊ लागले. जवळपास १२ वर्षांनंतर एका नदीच्या किनाऱ्यावर कोणत्यातरी धार्मिक धनी व्यक्तीने धर्म यज्ञाचे आयोजन केले होते. त्यामध्ये आजूबाजूच्या सर्व संत–महात्म्यांना आमंत्रित केले होते. संत गुलाब दास जी देखिल आपल्या काही शिष्यांबरोबर त्या संत समागम मध्ये गेले. दैवयोगाने त्याचा मित्र तसेच पूर्वीच्या सिद्धचा शिष्य गुरुभाऊ देखिल आला होता. दोघांचा अचानक

आमना–सामना झाला. दोघांची गळाभेट घेतली. बरे–वाईट विचारपूस झाली. नंतर आप–आपली आध्यात्मिक उपलब्धी सांगू लागले. भाणीं नाथ जींनी आपला मित्र गुलाब दास जींना प्रश्न केला कि आपल्याला काय उपलब्धी झाली?

गुलाबदासानी उत्तर दिले कि मला सर्व काही प्राप्त झाले. परमेश्वरास प्राप्त करणे व जन्म–मृत्यु पासून सुटका करण्याचा मार्ग प्राप्त झाला. भाणींनाथजीनी विचारले कि एखादी सिद्धी दाखवा जी तुम्हाला प्राप्त झाली असेल. गुलाबदासजीने सांगितले कि मला आता सिद्धीची आवश्यकताच नाही राहिली. भाणींनाथ म्हणाला कि मी दाखवतो मला किती मोठी सिद्धी प्राप्त झाली आहे. असे म्हणून भाणींनाथ उठला आणि नदीच्या पाण्यावर असे चालू लागला जसे जमिनीवर चालतात. त्या प्रमाणे पाण्यावर चालू लागला. नदीच्या दुसऱ्या किनाऱ्यावर जावून पुन्हा परत आला. आपली सिद्धशक्तीची उपलब्धी दाखवत गर्वाने म्हणाला कि बघितलेस माझ्या १२ वर्षाच्या तपस्याची कमाल. गुलाबदास म्हणाला कि हे मित्रा! या नदीला पार करण्याचे भाडे नाविक एक आणा घेतो (आधी सोळा आण्याचा एक रुपया मूल्य होत असे) आणि परत येण्याचे एक आणा भाडे घेतो म्हणजे दोन आणे भाडे होते. तू तर १२ वर्षामध्ये दोन आण्याची आध्यात्मिक कमाई करून आला आहेस. याने जनता तर प्रशंसा करु शकते. पण ना जन्म–मरण सुटेल आणि ना मोक्ष होऊ शकतो. मग ही व्यर्थ साधना करून, व्यर्थचे धोंडे वाहण्याची काय आवश्यकता? याच्यातच तुझा मनुष्य जन्म व्यर्थ नष्ट होऊन जाईल. ही गोष्ट ऐकून भाणीनाथ खूपच प्रभावित झाला व नंतर त्याने गुलाबदासाकडून सत्य ज्ञान समजून त्याचा शिष्य बनून भाणींनाथ नंतर भाणीदास होऊन सत्य साधन करू लागला. मनुष्य जन्म यशस्वी केला. जर भाणींनाथाला सत्य साधना प्राप्त झाली नसती तर त्याचे जन्ममृत्यू चे चक्र चालूच राहिले असते. पुढच्या जन्मात जेव्हा मनुष्य जीवन मिळेल जादूगार बनून शेष सिद्धी समाप्त केली असती व नंतर पशू–पक्ष्याच्या योनीत कष्ट भोगत राहिला असत. ही आहे जादूगाराची कहाणी. एका सिद्ध महात्म्याने गव्हाच्या ८० गोण्या आकाश मार्गाने हवेत उडवत आपला मित्र सिद्धच्या आश्रमात पाठवल्या होत्या व तेथे महाप्रसाद (भंडारा) भोजनाचे आयोजन केले होते.

एका सिद्ध महात्म्याने आपल्या सिद्धशक्तीचा प्रभाव दाखवण्यासाठी इतर प्रसिद्ध सिद्धाच्या आश्रमामध्ये गाव रामथली (जिल्हा–अम्बाला, हरियाणा प्रांत) येथे गेला. त्या सिद्धाने खूप गाई पाळल्या होत्या. ज्या वेळेस तो सिद्ध आपल्या सिद्ध शक्तीचा प्रभाव दाखवण्यासाठी त्या दुसऱ्या सिद्धाच्या आश्रमाजवळ पोहचला तर त्या आश्रमाच्या सिद्धांने बघितले कि एक सिद्ध आपल्या सिद्ध शक्तीने एका सिंहावर (शेर) बसून येत आहे. त्यावेळेस आश्रमावाल्या सिद्धाने आश्रमाची ३ फुट उंच कुंपणाच्या **(Boundary Wall)** भिंतीवर बसून दात घासत होता. त्याने आपल्या आश्रमाकडे सिंह **(Lion)** वर बसुन सिद्धाला येताना पाहुन समजायला वेळ नाही लागला कि त्याचा उद्धेश काय आहे. येणाऱ्या सिद्ध बाबास सिंहावर बसलेला पाहुन गाव–रामथली (जिल्हा–अम्बाला) च्या व्यक्ती देखिल त्याच्या मागेमागे चालू लागले. ज्यावेळी तो सिंहवाला सिद्ध आश्रमापासून जवळपास ६० फुट अंतरावर राहिला तर आश्रमावाल्या सिद्धाने म्हटले कि हे कुंपणाच्या भिंती! चल सिद्धचे स्वागत करू या. हे लांबुन चालत आले आहेत. त्याच वेळी ज्या भिंतीवर आश्रमवाला सिद्ध बसला होता, तो साठ (६०) फुट येणाऱ्या सिद्धसमोर जावून थांबली. आश्रमवाल्या सिद्धाने खाली उतरून स्वागत केले. सिंहवाल्या सिद्धाने विचारले कि माझ्या सिंहाला कुठे ठेवणार? आश्रमवल्या सिद्धाने म्हटले की माझ्या गाईच्या गोठ्यात (काटेदार सुकलेलेल्या झाडापासून फांद्यापासून बनवलेल्या

कुंपणास गोठा म्हणतात) मध्ये सोडून देऊ. सिहाला गायांच्या मध्ये सोडून दिले. तो सिंह शांतपणे गायांच्या मध्ये उभा राहिला. सिंहवाल्या सिद्धाची हार झाली व आश्रमातील सिद्धाची अजून महिमा झाली. मात्र मोक्ष दोघां देखिल झाला नाही. पुढच्या मनुष्य जन्मात उर्वरित सिद्धी जादूगार बनून प्रसिद्धी प्राप्त करतात. परत ८४ लाख जिवाच्या जन्म मरणाच्या चक्रात फसून जातात. असे सिद्ध पुरुष जेव्हा केव्हा मनुष्य शरीर प्राप्त करतात तेव्हा उर्वरित सिद्धि-शक्ति जादूगार बनून प्रसिद्ध होतात. जादूगार असेच प्राणी असतात.

प्रश्न :- मी तर योगी त्यालाच मानतो जो आसन करतो व करवतो (शिकवतो) तसेच विशिष्ट आसनावर बसून तपस्या भक्ति करतो?

उत्तर :- योगी त्याला देखिल म्हणतात परंतु तो योगी तर एक मात्र प्राकृतिक चिकित्सक (वैद्य) आहे. हा अष्टांग योग प्रभू साधनेत यासाठी सहाय्यक मानला जातो कि यामुळे शरीर स्वस्थ राहते. स्वस्थ शरीराने चांगली भक्ति होते. परंतु आध्यात्मिक मार्गात या योगाची भूमिका मानली जात नाही कारण कि परमात्माची सत्य साधनेमुळे (योग) साधकाचे असाध्य रोग देखील ठीक होतात. ज्यामुळे साधकाची श्रद्धा अधिक वाढली जाते तो अधिक श्रद्धेने साधना (योग) करून परमात्मा प्राप्ती करून घेतो. एक अष्टांग योगी (आसन व क्रिया करणारा) दुर्घटनाग्रस्त होवून त्याचे दोन्ही पाय तुटुन गेले. त्यामध्ये स्टील (इस्पात) चे रॉड (सळई) टाकण्यात आले. त्यानंतर तो आजीवन अष्टांग योग करू शकला नाही. एखाद्या स्थानावर बसून देखील तो दुर्घटनाग्रस्त व्यक्ति भक्ति देखिल करू शकत नाही. आपल्या अनुसार तो भक्ति पासुन वंचित राहिला जाईल. शास्त्रानुकूल साधकाचे अश्या घटनापासून परमात्मा बचाव करतात.

श्री मद्भगवत् गीता अध्याय ३ श्लोक ४ ते ८ मध्ये म्हटले आहे कि जो मूर्ख व्यक्ति हठयोग करत (एका विशिष्ट स्थानी आसनावर बसून) भक्ति करतो, तो पाखंड करतो. कारण कि तो तर कर्म इंद्रियांना हठपूर्वक रोखून स्थिर करतो. परंतु आतून ज्ञान इंद्रियाद्वारे बाह्य वस्तूच्या चिंतनात गुंतलेला असतो. जर अर्जुन! तू एका स्थानावर विशिष्ट आसन करून, बसून राहिलास तर तुझा उदरनिर्वाह कसा होईल? त्यामुळे तू संसारीक कर्म करता-करता, तू त्या परमेश्वराला स्मरण कर. गीता अध्याय ८ श्लोक ७ व १३ मध्ये तर येथे पर्यत सांगितले आहे कि माझे स्मरण करण्याचे तर एक ॐ (ओं) अक्षर आहे ज्याच्या अंतिम श्वासपर्यंत स्मरणाने, माझ्या पर्यंतची गती प्राप्त होते. म्हणून अर्जुन तू युद्धं सुद्धा कर आणि माझे स्मरण देखील कर.

विचार करा :- युद्धासारखे कठीण कार्य काहींच नसते. त्यात सुद्धा प्रभूचे स्मरण करण्यास सांगितले आहे. यावरून हे सिद्ध होते कि परमात्म्याची भक्ति कार्य करता-करता करायची आहे. ज्याचे सर्व सदग्रंथामध्ये प्रमाण आहे. यजुर्वेद अध्याय ४० मंत्र १५ मध्ये म्हटले आहे! ओम् (ॐ) मंत्राचे स्मरण काम करता-करता कर. विशेष तळमळीने कर. मानव जीवनाचे मूळ कर्तव्य समजून स्मरण कर त्यामुळे मृत्यूनंतर तुझे लिंग शरीर अमर होवून जाईल. जोपर्यंत स्थूल शरीर आहे म्हणजे जीवंत असताना स्मरण केल्याने लाभ प्राप्त होतो. यावरून हेच सिद्ध होते कि एका स्थानावर आसन लावून बसने शास्त्रविरुद्ध आहे. वाचकांच्या मनात प्रश्न ऊद्भवेल कि गीता ज्ञान दाताने गीता अध्याय ६ श्लोक १० व १५ मध्ये हे सुद्धा म्हटले आहे कि एकांतात एका स्थानावर बसून नाकाच्या अग्रभागी पाहुन साधना करा. या प्रश्नाचे उत्तर पवित्र गीतेत मिळते. गीता ज्ञानदात्याने (कालरूपी ब्रह्म) अध्याय ४ श्लोक ३४ मध्ये म्हंटले आहे कि तत्वज्ञान (पूर्ण मोक्ष मार्गाच्या भक्तीविधीचे ज्ञान) समजण्यासाठी तत्वदर्शी संतांना विनम्र भावाने त्याविषयी प्रश्न करा व ते जसे मार्गदर्शन करतील. त्याप्रमाणे

साधना करा. तत्वदर्शी संताची खून(ओळख) गीता अध्याय १५ श्लोक १ व ४ मध्ये सांगितली.

अश्या प्रकारे ज्ञान दाता प्रभूने स्वत: ला दोषमुक्त करून ठेवले आहे तसेच आपल्या गीता ज्ञानात अनेक ठिकाणी म्हटले आहे कि हे माझे मत (विचार) आहे. वास्तविक खरी भक्ति विधी तर तो तत्वदर्शी संतच सांगेल. या (गीता अध्याय ६ श्लोक १० व १५ मध्ये सांगितलेल्या ज्ञानाचे खंडन) ज्ञानाचे खंडन गीता अध्याय ३ श्लोक ४-८ मध्ये व गीता अध्याय ६ श्लोक १६ मध्ये केलेले आहे. पूर्ण परमात्मा द्वारा मिळणारा पूर्ण मोक्ष हा (न एकांतम्) एका विशेष स्थानावर बसून सिद्ध होत नाही. ना जास्त खाणाऱ्याचा, ना मुळीच न खाणाऱ्याचा (व्रत/उपवास करणाऱ्याचा) तसेच ना अधिक जागणाऱ्याचा (हठयोग करणारे) ना जास्त झोपणाऱ्याचा सिद्ध होतो म्हणजेच उपरोक्त क्रिया करणाऱ्याची भक्ति व्यर्थ आहे. कारण गीता अध्याय ६ श्लोक १० व १५ मध्ये गीता ज्ञान दात्याने आपली भक्ति साधना विधी सांगितली आहे. त्याने होणारी मुक्ति(गती) ला गीता अध्याय ७ श्लोक १८ मध्ये अश्रेष्ट (नीच) म्हटले आहे. ज्यामुळे गीता अध्याय ४ श्लोक ५ मध्ये म्हटले आहे कि अर्जुन! तुझे व माझे अनेक जन्म होवून गेलेले आहेत, मी जाणतो तू जाणत नाहीस. म्हणजे आपण (मी, तू व माझे साधक) पूर्ण मोक्ष प्राप्त करू शकत नाही. म्हणून गीता ज्ञान दात्याने गीता अध्याय १८ श्लोक ६२ मध्ये आणि अध्याय १५ श्लोक ४ मध्ये कोण्या अन्य परमात्म्याची साधना करण्याचे म्हण्टले आहे. त्या परमात्म्याची भक्ति विधी कुणी तत्वदर्शी (पूर्ण) संत सांगेल.(म्हणून वाचकांनी भ्रमित न राहता, तत्वज्ञान समजून घ्यावे).

श्री विष्णु पुराणाच्या ज्या वर्णनाविषयी आपण म्हटले आहे त्याचा निष्कर्ष हा आहे कि, श्री पराशर जीनी आपला शिष्य श्री मैत्रेयजींना सांगितले कि ज्या श्राद्धकर्म (पितर पूजा) इत्यादि विषयी आपण मला विचारले, हाच प्रश्न राजा सगरनी भृंगू वंशी ऋषि और्यजींना विचारला होता. त्यावेळेस जे और्य ऋषिंनी राजा सगरला श्राद्धकर्माविषयी सांगितले होते ते मी तुम्हाला सांगतो लक्षपूर्वक ऐका. वाचकांनी कृपया पूर्ण संवाद श्री विष्णु पुराण, तृतीय अंश, अध्याय १३ ते १६ पान २०३ ते २१५ वाचावे. येथे पुस्तक विस्तार विचारात घेऊन संक्षिप्त व सांकेतिक वर्णन विवेचन करून लिहिले आहे. प्रथम तर श्री विष्णु पुराणाचे महर्षि पराशरजींना, तत्वज्ञानरूपी तराजूत तोलूया. मग निर्णय करूया कि पराशरजी किती विद्वान होते.

श्री पराशर महर्षींनी श्री विष्णू पुराण द्वितीय अंशाचा अध्याय ७ श्लोक ५ पृष्ट न.१२६-१२७ वर ग्रहांची माहिती दिली आहे. ज्यात पृथ्वीच्या जवळ सूर्याला सांगितले आहे. ज्याची पृथ्वीपासून दूरी एक लाख योजन म्हणजे १३ लाख किलोमीटर सांगितली आहे. त्यानंतर म्हटले आहे कि, चंद्र हा सूर्यापेक्षा एक लाख योजन दूर आहे, ज्याचे पृथ्वीपासून अंतर २ लाख योजन म्हणजे (२६ लाख किलोमीटर) सांगितले आहे.

विचार करा :- वर्तमान (सन २००६ पर्यंतच्या शोधावरून) हे स्पष्ट झालेले आहे कि चंद्र पृथ्वीच्या जवळ आहे ज्याची पृथ्वीपासून दूरी सूर्याच्या तुलनेने कित्येक पटीने कमी आहे.

दुसरे प्रमाण :- श्री विष्णु पुराण प्रथम अंश अध्याय ५ पान १७ वर दिवस-रात्र कसे बनले याची माहिती अशी आहे. श्री पराशरजीनी म्हटले आहे कि प्रजापती ब्रह्माजींना सृष्टिरचना करण्याची इच्छा झाली. तेव्हा तमोगुणाची वृद्धी झाली. सर्वात आधी असुर उत्पन्न झाले. ब्रह्माजीने त्या शरीराचा त्याग केला. ते सोडलेले शरीर रात्र झाले. दुसरे शरीर धारण केले त्या शरीरापासून देव उत्पन्न झाले. प्रजापती ब्रह्माने ते शरीर सुद्धा त्यागले. ते त्यागून दिलेले शरीर दिवस झाले. वाचकांनो! जरा विचार करा. काय हे विचार एका विद्वानाचे आहेत?

**श्री विष्णु पुराण सांगणारे, यांचे सामान्य ज्ञान सुद्धा व्यवस्थित नाही तर त्यांच्याकडून सांगितलेले आध्यात्मिक ज्ञान कसे व्यवस्थित असणार. पराशरजीनी परत ग्रहांची वेगळी व्याख्या केली :- श्री विष्णु पुराणाचे वक्ता श्री पराशरजींनी श्री विष्णु पुराण (गीता प्रेस गोरखपुर वरुन प्रकाशित) चा दूसरा अंश अध्याय ८, श्लोक १ त ७ मध्ये, पान न. १२९ वर, सूर्य (जो अग्नीचा गोला आकाशात तापतो आहे) याच्या रथाविषयी म्हण्टले आहे,** ''सुर्याच्या रथाचा विस्तार नउ हजार योजन आहे. याच्या जूआ (दुरी) आणि रथामधील अंतर १८ हजार योजन आहे. त्याचा मध्य दिड करोड़ सात लाख योजन आहे. अर्थात् एक करोड़ ५७ लाख योजन लांब आहे. ज्यामध्ये त्याचे पाय लावले आहे इत्यादी इत्यादी भरपुर काही लिहले आहे. **कृपया वाचकजन विचार करा! कि हे ज्ञान कोण्या विद्वानाचे असू शकेल? श्री विष्णु पुराणात अग्नि पिंड सूर्याविषयी पान १६६ ते १६७ वर तृतीय अंश अध्याय २ च्या श्लोक १ त १३ मध्ये श्री पराशर ऋषीने म्हटले आहे कि :-** ''सूर्याचा विवाह विशकर्माच्या मुलीशी संज्ञा सोबत झाला. त्यापासून दोन पुत्र मनू व यम आणि पुत्रि यमी उत्पन्न झाली. सूर्याची पत्नी सज्ञा आपल्या पतीच्या तेजाने दुखी होवून तपस्या करण्यासाठी जंगलात निघून गेली. तेथे घोडीचे रूप बनवून तपस्या करू लागली. आपल्या स्थानी स्वत:ची प्रतिकृती(हुबेहूब दिसणारी) स्त्री प्रगट करून तिचे नाव छाया ठेवले व तिला सज्ञाने सांगितले कि तू माझ्या पतीची पत्नी म्हणून रहा. हा भेद कुणालाही सांगू नकोस. माझा पती तुला संज्ञाच समजेल. छाया म्हणाली जशी तुमची इच्छा. सूर्याने छायाला संज्ञा समजून दोन संतान उत्पन्न केली. एक मूलगा व एक मुलगी.

एका दिवशी सत्य समजल्यावर सूर्य आपला सासरा विश्वकर्माजवळ गेला व म्हणाला कि तुम्ही माझे तेज कमी करून दया. या तेज प्रकाशामुळे तुमची मुलगी घाबरून वनात पळून गेली. विश्वकर्माने सूर्याला भ्रमियंत्रावर (सान) चढवून त्याचे तेज छाटून टाकले. तो कचरा (छाटलेले कट-पीस) पृथ्वीवर पडला, ज्याच्या पासून विश्वकर्माने भगवान विष्णूचे चक्र व भगवान शिवाचे त्रीशूल तसेच कुबेराचे विमान इत्यादि बनवले. त्यानंतर सूर्य घोडा बनून संज्ञाजवळ वनात गेला. संज्ञाशी त्याने घोडीरूपात संभोग करून तीन पुत्र उत्पन्न केले. दोन घोडीच्या मुखातून उत्पन्न झाले, त्यांना अश्वनी कुमार म्हटले जाते. ज्यांची नावे (१) नासत्य (२) दस्त्र, असे हे दोघे अश्वनी कुमार देवांचे वैध्य बनले. तिसरा मुलगा रेत :- स्त्राव उत्पन्न झाला. जेथे सूर्याचे वीर्य सांडले जेंव्हा तो घोडीरूपातील संज्ञाच्या तोंडाकडून संभोग करण्याचा प्रयत्न करत होता तेंव्हा तेथे पडलेल्या वीर्यापासून रेत: स्त्राव हा पुत्र जमिनीवरच उत्पन्न झाला. तो घोड्यावर बसलेला व हातात धंनुष्य इत्यादि घेतलेला उत्पन्न झाला होता. ज्या ठिकाणावर या आगीचे गोळे (अग्नि पिण्ड) सुर्याने घोड्याचे रुप धारण करुन घोडी रुप स्त्री संज्ञा संगे संभोग केला होता. जेथे दोन पुत्र अश्वनी कुमार (नासत्य व दस्त्र) उत्पन्न केले होते. त्या तिर्थाचे नाव अश्व तीर्थ, भानु तीर्थ आणि पंचवटी आश्रमाच्या नावाने प्रख्यात आहे. सूर्याच्या दोन्ही मुली दोन नध्या, अरुणा व वारूणा नावाने आपल्या वडिलांना भेटण्यासाठी आल्या होत्या. त्या दोघींचा जेथे गंगा नदीत संगम झाला आहे ते खूप उत्तम तीर्थ आहे. त्या तीर्थात स्नान केल्याने व दान दिल्याने अक्षय धनाची प्राप्ती होते. त्या तिर्थाचे स्मरण, कीर्तन, श्रवण (ऐकण्याने) इत्यादीने सर्व पापांचा नाश होऊन मनुष्य सुखी होतो. **(वरील वर्णन मार्कंडेय पुराण गोरखपूरहुन प्रकाशित पान १७२ ते १७५, अध्याय वैवस्वत मन्वंतरची कथा व सावर्णिक मन्वंतरच्या संक्षिप्त परिचयावरुन व ब्रह्म पुराण अध्याय ''जन स्थान, अश्व तीर्थ, भानु तीर्थ आणि अरुणा वरुणा संगमाची महिमा यावरून तसेच विष्णु पुराणाचा तृतीय अंश अध्याय २, श्लोक १ ते १३ पान १६६-१६७ वरुन घेतला आहे).** ह्याच विष्णु पुराण द्वीतीय अंश अध्याय ८, श्लोक ४१ ते ५२ पान १३२ वर म्हंटले आहे कि सूर्य कधी

दिवसा तीव्र गतीने चालतो तर कधी रात्री मंद गतीने चालत असतो. अश्या प्रकारे आपल्या दिवस रात्रीचे चक्र गोलाकार फिरून पूर्ण करत असतो. {**पुराण सांगणाऱ्याचा भावार्थ हा आहे कि सूर्य पृथ्वीच्या चारही बाजूने चक्राकार फिरण्याने दिवस-रात्र होतात.). परंतु वर्तमानात (सन २००६ च्या शोधांनंतर) स्पष्ट झालेले आहे कि पृथ्वी स्वत: भोवती फिरते, ज्यामुळे दिवसरात्र होतात व पृथ्वी एका वर्षात (३६४ दिवसात) सूर्याच्या चारीबाजूने फिरते त्यामुळे दिवस व रात्री छोट्या मोठ्या होतात.**}

पुराणाच्या वक्त्याने हे सुद्धा लिहिले आहे कि संध्याकाळी मांदेहा नावाचे भयंकर राक्षस सूर्याला खायचा प्रयत्न करतात. संध्याकाळी त्यांचे सूर्याशी भयंकर युद्ध होते.

**निष्कर्ष :- वरील पुराणाच्या लेखावरून पुराणाचे वक्ता श्री पराशर ऋषिच्या आध्यात्मिक व सामान्य ज्ञानाचा अंदाज येतो व समजते कि ते विद्वान नव्हते. त्यामुळे अश्या महापुरुषाने सांगितलेले श्राद्धकर्म ज्याला आपण करतो ते कसे श्रेष्ठ मानले जाईल. खरे तर पवित्र वेद व पवित्र गीताजी इत्यादि प्रभुदत्त ग्रंथामध्ये श्राद्ध कर्म व देवतांची पूजा ही मूर्खाची साधना म्हण्टले आहे. पूर्वोक्त लेखात रुची ऋषिच्या प्रकरणात आपण वाचले. ज्यात वेदाचे ज्ञाता रुची ऋषिजी आपले पित्तर यांना वेदांचे प्रमाण देवून सांगत आहेत कि वेदामध्ये श्राद्ध कर्म, देवतांची पूजा, भूत (प्रेत) पूजा ह्या सर्व साधना मुर्खाच्या साधना म्हटल्या आहेत. मग आपण मला कशासाठी शास्त्रविरुद्ध साधना करण्यासाठी प्रेरणा देत आहात. श्री रुची ऋषि जी व चारही पितर देखील, ह्या गोष्टीचे समर्थन करत आहेत कि हे तर सत्य आहे कि वेदामध्ये श्राद्ध कर्म, देवतांची पूजा, भूत (प्रेत) पूजेचा निषेध केला आहे. मूर्खाची पूजा म्हटली आहे. यात किंचीत देखिल संशय नाही. यानंतर देखील पितरांनी आपल्या भोळ्या-भाबड्या वंशज रुची ऋषिला शास्त्रविधिं अनुसार साधना त्यागून तसेच शास्त्रविधी विरुद्ध मनमानी आचरण (पूजा) करण्यासाठी विवश केले ज्या कारणामुळे श्री रुची ऋषि देखिल मनमाना आचरण (पूजा) करून मानव जीवनास व्यर्थ करून पितर योनीला (जुनीला) प्राप्त झाले. श्री मद्भगवत् गीतेच्या (जो चारी वेदांचा सारांश आहे) अध्याय १६ श्लोक २३-२४ मध्ये म्हटले आहे कि जो साधक शास्त्रविधि त्यागून मनमानी आचरण (पूजा) करतो, त्याला ना कोणतीही सिद्धी प्राप्त होते, ना त्याची गती (मोक्ष) होते. ना कोणतेही सुख प्राप्त होते. म्हणजे त्या शास्त्रविधि विरुद्ध साधना करणार्यात योग्याचे (भक्ताचे) जीवन नष्ट होऊन जाते. हे प्रमाण गीता अध्याय १६ श्लोक २३ मध्ये आहे. श्लोक २४ मध्ये लिहिले आहे कि जी साधना करायला पाहिजे व जी त्यागायला हवी त्यासाठी तुला शास्त्रच (चार वेद) प्रमाण आहेत. अन्य कोणत्याही लोकवेदाचा (दंत कथा) अवलंबन केला नाही पाहिजे.**

**प्रश्न :- पुराणाची रचना कोणत्या कारणामुळे झाली? वेदांना सोडून श्रद्धाळू पुराणावर कोणत्या प्रकारे आसक्त झाले?**

**उत्तर :- पवित्र श्री मद्भगवत् गीता जी चारही वेदांचा सारांश आहे. गीतेच्या अध्याय ४ श्लोक ३४ मध्ये तसेच यजुर्वेद अध्याय ४० मंत्र १० व १३ मध्ये लिहिले आहे कि गीता व वेद ज्ञान दाता प्रभू म्हणत आहेत कि पूर्ण परमात्म्याला कोणी उत्पन्न होणारा अर्थात् जन्म घेणारा म्हणत आहे, तर कोणी उत्पन्न न होणारा म्हणतात परंतु त्या परमात्माच्या तत्वज्ञानास तत्वदर्शी (धीराणाम्) संतजणच सांगू शकतील. त्यांना विनम्रपणे विचारा. ऋषिंनी वेदांना वाचले त्यानुसार तसेच काल प्रेरणेने हठयोगाने तप इत्यादि साधना केल्या. ज्यामुळे परमात्मा प्राप्ती झाली नाही. त्या साधनेने सिद्धी प्राप्त करून चमत्कार करू लागले. आशीर्वाद देऊ लागले. साधारण व्यक्तींना त्याचा अत्यंत लाभ होऊ लागला. त्यामुळे साधारण जनता त्या**

ऋषीच्या प्रत्येक गोष्टीवर विश्वास ठेऊ लागली. ऋषिच्या शरणी गेलेल्या व्यक्ति ऋषिचे प्रवचन ऐकत. ऋषि सांगत कि, परमात्म्याची भक्ति करायला पाहिजे नाही तर मानव जन्म व्यर्थ आहे. अनुयायी म्हणत कि हे गुरवर! आपल्या सारखी कठीण साधना आम्ही करू शकत नाही. त्यामुळे ते ऋषिजन, आपल्या अनुयायांना कोणतीही दुसरी साधना सांगत. अनुयायी आपल्या ऋषिद्वारा सांगितलेली साधना करू लागले जी शास्त्रविरुद्ध होती. ज्या उद्देशाने साधना करत असत जसे की पुत्र प्राप्ती, पुत्र विवाह, धनवृद्धी, कष्ट निवारण इत्यादि इत्यादि. यातील काही लाभ त्यांना ऋषिच्या आशीर्वादाने व आपल्या पूर्व जन्माच्या पुण्याने होऊ लागले. परंतु अनुयायांच्या शास्त्र विरुद्ध साधना ज्या त्यांच्या गुरुजींनी (ऋषिनी) सांगितल्या होत्या, त्यापासून त्यांना कोणताही लाभ होत नव्हता. श्रद्धाळू मात्र हे मानत कि आम्ही जी भक्ति करत आहोत, त्यामुळे आम्हाला लाभ होत आहेत. त्यामुळे ते अनुयायी शास्त्र विरुद्ध साधनेवर आरुढ झाले. याच्यामागे काल भगवानाची (कालरूपी ब्रह्म, जो ब्रह्मा, विष्णु, शिव यांचा पिता आहे) चाल आहे. त्याची इच्छा आहे कि सर्व प्राणी शास्त्र-विरुद्ध साधना करून, त्याच्या (काल ब्रह्मच्या) जाळ्यात अडकून राहावेत. जर कोणी ज्ञानी व्यक्ति परमात्म्याला, वेदांना आपल्या इच्छेने समजून केवळ एक पूर्ण परमात्म्याची भक्ति करण्याने मोक्ष होतो हे समजून वेदांनुसार साधना करील, तरी सुद्धा तो काल जाळ्यातून निघू शकत नाही. कारण वेदामद्धे भक्ति विधी फक्त ब्रह्म पर्यंत चीच आहे. पूर्ण मोक्ष तर, केवळ परम अक्षर ब्रह्मची उपासना केल्यानेच संभव आहे. ती साधना फक्त तत्वदर्शी संतच सांगू शकतात. तो तत्वदर्शी संत त्या ऋषिना भेटला नाही. त्या ऋषिचे अनुयायी आपल्या गुरूंनी सांगितलेल्या कोणत्याही मंत्राचा जप करत किंवा नदी किनारी स्नान करून, किंवा दगडाची व मातीचा पिंड करून त्याची पूजा करत. त्यांना त्या ऋषिच्या आशीर्वादाने व पूर्वजन्माच्या भक्तीने इच्छित लाभ मिळत असत. कारण सत्य युगात खूप पुण्यकर्मी प्राणी जन्माला येत असत. त्यांचे पूर्व जन्माचे शुभ कर्म अत्यधिक होते. जास्त करून त्यांची मनोकामनापूर्ती पूर्व जन्माच्या पुण्याईनेच होत असे. ते श्रद्धाळू त्या शास्त्र विरुद्ध साधनेला सत्य मानून करत होते तर ते समजत होते कि जी साधना (नाम जप, मूर्ति पुजा किंवा नदीचे स्नान) केली आहे. त्यामुळेच माझी मनोकामना पूर्ण झाली आहे. वास्तविक ते सर्व लाभ त्या साधकांना त्यांच्याच पूर्व जन्मीच्या शुभ कर्माचे फळातून होत होते. काही लाभ त्या ऋषि गुरूंच्या आशीर्वादाने प्राप्त होत असत. त्यामुळे त्या ऋषि गुरूंची भक्ति कमी होत जाते. जसे एकाधा धनवान व्यक्ति आपल्या प्रशंसकाला, आपल्या धनातील थोडेसे धन देतो, त्यामुळे त्याचे धन कमी होते. त्याच्यापासून त्याच्या सोबत्याला आर्थिक लाभ होऊन जातो. जर तो धनवान व्यक्ति आपला व्यवसाय न करता नुसता धनच वाटत राहिला तर तो एक न एक दिवस निर्धन होईल. अशा प्रकारे ऋषिजन काही दिवस वनात जावून सिद्धी प्राप्तीच्या साधना करून येतात. नंतर त्याच सिद्धी शक्तींना आपल्या अनुयायात वाटून टाकतात. शेवटी भक्तिहिन् होऊन पितरयोनीला प्राप्त होतात. ऋषिचे शिष्य आपल्या गुरुजींना म्हणतात कि हे गुरुवर! आपण जो मंत्र जप (ओम गुरु, ॐ नमो: भगवते् वासुदेवाय:, ओम् ऐ नम: इत्यादि) अमुक व्यक्तिला जप करण्यास दिला व नदीमध्ये स्नान करण्याची विधी सांगितली होती तसेच मूर्ति पूजन, लिंग पूजण्याची विधी सांगितली होती, त्यामुळे त्या व्यक्तिला मनोवांछित फळ प्राप्त झाले. हे सर्व मंत्र वेदामध्ये कुठेच लिहिलेले नाहीत. यांना करणे तर शास्त्र विरुद्ध साधना आहे, जी हानिकारक सांगितली आहे. मग ही हानिकारक साधना का बर सांगत आहात. ह्या शास्त्रविरुद्ध साधनेपासून लाभ सुद्धा होत नाही. परंतु वेदात व गीतेत लिहिले आहे कि शास्त्रविधिला त्यागून जो साधक

**मनमाना आचरण(पूजा) करतो, त्याला कोणताही लाभ होत नाही. ना तर त्याला त्यापासून सिद्धी प्राप्त होते, ना कोणतेही सुख होते, ना त्याची परम गती होते. (गीता अध्याय १६ श्लोक २३ मध्ये सुद्धा प्रमाण आहे) तुमच्या द्वारे सांगितलेल्या विधिने लाभ मिळतो तर, वेदाचे व गीतेत लिहिलेले वर्णन ठीक नाही काय? ऋषिजी उत्तर देत होते:- यजुर्वेद अध्याय ४0 मंत्र १0 व १३ मध्ये (व गीता अध्याय ४ श्लोक ३४ मध्ये) लिहिले आहे कि ज्या तत्वज्ञानाला वेद सुद्धा जानु शकत नाहीत, त्याला तत्वदर्शी संत जन (ऋषिजन) जाणतात. ते तत्वज्ञान आमच्या जवळ आहे. त्याच्याच आधारे आम्ही ही साधना सांगत असतो. या कारणामुळे ते ऋषिचे शिष्य ऋषिजन देखिल आपल्या गुरुदेवाच्या अज्ञानास तत्वज्ञान समजून शास्त्रविधीचा त्याग करुन मनमुखी जाप करू लागले. जर कोणालाही लाभ झाला नाही तर ते अज्ञानी गुरुजन ऋषि आपल्या ऋषी शिष्यांना कठीण हठयोग करण्यास सांगू लागले. कोणाला पाण्यात उभे राहून, कोणाला शिर्षासनावर (डोके जमिनीवर ठेऊन आणि वर पाय करून), कोणाला पदमासनावर बसून साधना करण्यास सांगू लागले. ज्यामुळे त्या शिष्य ऋषिंमध्ये काही आपल्या पूर्व जन्माच्या शुभ कर्मानी तसेच सिद्धीने वर्तमानातील हठयोग तपाने तसेच काही गुरुजीच्या आशिर्वादरूपी कमाई द्वारा (जर त्या ऋषिची शेष असेल तर) सिद्धी प्राप्त होत असे. त्यानंतर ते शिष्य स्वत: गुरु बनुन आपल्या अनुयायांना मनमुखी साधना सांगू लागले. ज्या कारणामुळे सर्व भक्त समाज शास्त्रविधिला त्यागून मनमाना आचरण (पूजा) करू लागला.**

**प्रमाण :- (१) श्री देवी पुराण सहावा स्कंद अध्याय १0 पान ४१४ वर महर्षि व्यास राजा जन्मेजयाला ज्ञान ऐकवत आहेत :-** म्हटले आहे राजन्! हे निश्चित आहे कि सतयुगात ब्राह्मण वेदाचे पूर्ण विद्वान होते. ते भगवती जगदम्बाची पूर्ण आराधना करत होते. भगवतीच्या दर्शनासाठी ते सदा लालायित (आतुर) असायचे. गायत्रीचे ध्यान, प्राणायाम व जप करण्यात आपला सर्व वेळ घालवायचे. माया बीज जप करणेच त्यांचे मुख्य कार्य होते. प्रत्येक गावात शक्ति (दुर्गा) चे मंदिर स्थापन करायचे हीच सतयुगातील ब्राह्मणाची इच्छा होती. तत्वज्ञानाचे जाणकार त्या ब्राह्मणाकडून जेही कर्म होत असे त्यात सत्य, दया आणि शौच्य हे तिन गुण निश्चित असत (लेख समाप्त).

**सार विचार :- वरील उल्लेख श्री देवी पुराणातिल आहे. यात म्हण्टले आहे कि सतयुगात ब्राह्मण वेदाचे पूर्ण विद्वान होते. म्हणजे तत्वदर्शी होते. देवीची पूजा करायचे. गावा-गावात दुर्गा देवीचे मंदिर बनवायची इच्छा करायचे.**

इतर प्रमाण :- (२) श्री देवी पुराण प्रथम स्कंद अध्याय ४, पान २८-२९ वर श्री ब्रह्माजीच्या विचारण्यावर श्री विष्णुजींनी उत्तर दिले, म्हटले कि मी भगवती शक्तीच्या सदा अधिन् राहतो. तिच्याच अधीन होवून मी शेष शय्येवर झोपतो व वेळ आल्यावर परत जागे होतो. मी निरंतर त्याच भगवती शक्ति (दुर्गा) चे ध्यान करतो. माझ्या मते या शक्ति पेक्ष्या मोठी कोणतीही देवता नाही. मी जास्त करून तप करण्यात वेळ घालवतो व राक्षसाचा संहार करण्यात वेळ घालवतो.

**विशेष विचार :- विचार करण्याची गोष्ट ही आहे कि वेदात कुठेही दुर्गा (प्रकृति) ची पूजा करण्याचे प्रयोजन नाही. केवळ ब्रह्म म्हणजे क्षर पुरुषाची साधना ओम नामाच्या जपाद्वारे करण्याचा उल्लेख आहे. पूर्ण ब्रह्म म्हणजे परम् अक्षर ब्रह्म च्या पूजेने पूर्ण मोक्ष होतो. त्याचा ओम्-तत्-सत् मंत्र जाप आहे ज्यामध्ये तत् तसेच सत् मंत्र सांकेतिक आहे. ज्याच्या विषयी फक्त तत्वदर्शी संतच सांगेल. हा उल्लेख वेदात व श्री मद्भगवत्गीतेत आहे. ब्रह्म साधनेचा ॐ (ओं) मंत्र आहे. परंतु हा सुद्धा पूर्ण मोक्षदायक नाही. अशा प्रकारे वेदज्ञान**

**हीनाना तत्वदर्शी म्हटले जात होते, व त्यांच्या द्वारे सांगितलेले भक्ति विधी(मार्ग) सर्व श्रद्धाळूंनी ग्रहण करून घेतली, जी व्यर्थ आहे. परंतु श्री देवी दुर्गाजीने (श्री देवी पुराणाचा ७ वा स्कंद अध्याय ३६ पान न.५६२-५६३ पर्यत मध्ये) म्हटले आहे किः-** ''त्या ब्रह्म चे काय स्वरूप आहे? असे म्हटले जाते कि जो प्रकाश स्वरूप आहे, सर्वांच्या अत्यंत जवळ स्थित, महान पद म्हणजे परमप्राप्य आहे, तो समस्त पूजेच्या ज्ञानापासून परे म्हणजे वेगळा आहे. म्हणजे कोणाच्या बुद्धीत येण्यासारखा नाही. हे तुम्ही जाणा. जो प्रकाश स्वरूप आहे. जो सुक्ष्म पेक्ष्या अति सुक्ष्म आहे. ज्यात संपूर्ण लोक व त्या लोकामध्ये निवास करणारे प्राणी स्थित आहेत. हा तोच ''अक्षर ब्रह्म'' आहे. तो परम सत्य आणि अमृत अविनाशी तत्व आहे. तुम्ही त्या वेध घेण्याजोग्या लक्षाचा वेध घ्या. मन लावून त्यात तन्मय होवून जा. त्या एक परमात्म्याला जाणा. दुसऱ्या गोष्टी सोडून द्या. तो परमात्मा सर्व प्राण्याच्या ह्रदयात अंतर्यामी स्वरुपात वर्तमानात राहतो. या विश्वात्म्याचे अर्थात ब्रह्म चे ध्यान ॐ नामाच्या जपासोबत करा. यामुळे अज्ञान्मय अंधकारापासून सर्वथा लांब आणि संसार समुद्रापासून (पार) दूर जो ब्रह्म आहे, त्याला प्राप्त करून घेणार. तो सर्वांचा आत्मा ब्रह्म-ब्रह्मलोक रूपी दिव्य आकाशात स्थिर आहे. त्याला धीर पुरुष म्हणजे तत्वदर्शी संत (धीर-बुद्धीमान पुरुष) आपल्या विज्ञाना (तत्वज्ञान) द्वारा त्या अविनाशी ब्रह्म ला पाहतात. त्या पुरुषोत्तमला बघितल्यावर ह्या जीवाचे अज्ञान नाहीसे होते. तो निर्मल आणि निष्कलंक ब्रह्म प्रकाशमय लांब दिव्य परमधामात विराजमान आहे. हे संपूर्ण विश्व सर्व श्रेष्ठ ब्रह्मच आहे. जो श्रेष्ठ पुरुष अश्या प्रकारे अनुभव करतो तोच कृतार्थ होतो. असे ब्रह्मला प्राप्त पुरुष नित्य प्रसन्नचित असतात.(लेख समाप्त).

**सार विचार :- वरील उल्लेखात श्री देवी पुराणातील सहाव्या स्कंदात अध्याय १० पृष्ट ४१४ वर व्यासजींनी सांगितले आहे कि सतयुगाचे ब्राह्मण वेदाचे महान विद्वान अर्थात तत्वदर्शी होते. वरील वर्णीत उल्लेखात ह्याच श्रीदेवी पुराणात श्री देवीजी म्हणत आहेत कि त्या ब्रह्म ची उपासना करा त्याचा जप करण्याचा मंत्र ॐ आहे. इतर सर्व गोष्टीचा त्याग करा. तो ब्रह्म, ब्रह्मलोकात आहे. त्याच्याच पूजेने संसार समुद्राच्या पलीकडे जो ब्रह्म आहे त्याला प्राप्त करून घेणार. तो निर्मल आणि निष्कलंक ब्रह्म दिव्य धामात विराजमान आहे. श्री विष्णु भगवान तर (श्री देवी पुराण प्रथम स्कंद अध्याय ४, पान २८-२९) म्हणत आहेत कि देवी दुर्गा पेक्ष्या मोठा कोणी भगवान नाही. मी तिचीच पूजा करतो. इतर ऋषिजन सुद्धा देवी दुर्गालाच प्रभू मानून पूजा करत होते. तिचे मंदिर देखील बनवले जात होते. परंतु देवी दुर्गा (प्रकृति) म्हणत आहे कि कोणी अन्यच पूर्ण परमात्मा आहे. त्याचीच पूजा केली पाहिजे. यावरून हे सिद्ध होते कि ना श्री विष्णुजीना वेदांचे पूर्ण ज्ञान आहे, ना इतर ऋषिना. केवळ लोकवेद (फक्त दंतकथा) ऐकवायचे. श्री देवी ही सुद्धा म्हणत आहे कि सर्व संसारच ब्रह्म आहे. हे ज्ञान विचलित करणारे आहे. याच्या पेक्ष्या श्रेष्ठ वेदाचे ज्ञान आहे, जे श्री देवीने (दुर्गा) सांगितले आहे. ब्रह्म काल व दुर्गा (प्रकृति देवी) जी दोन्ही यथार्थ ज्ञानासोबत भ्रमित ज्ञान सुद्धा प्रदान करत आहे. कारण हे आहे कि या दोघांची इच्छा नाही कि कालब्रह्म च्या अंतर्गत जेवढे प्राणी आहेत, त्यांना तत्वज्ञान व्हावे. त्यामुळे भ्रमित ज्ञान देवून ऋषिमहर्षि, देव, ब्राह्मण व श्री ब्रह्मा, विष्णु व शिव देखील तत्वज्ञानाशी अपरिचित आहेत. याच कारणाने सर्वांचे जन्म-मरणाचे चक्र चालू राहते. पूर्ण परमात्मा स्वत: ह्या कालब्रह्मच्या लोकात प्रकट होऊन तत्वदर्शी संताची भूमिका करून तत्वज्ञान प्रदान करतात.**

**उदाहरण :- संक्षिप्त ब्रह्म पुराण (गीता प्रेस गोरखपुरहून प्रकाशित) चा अध्याय ''अहिल्या संगम तीर्थाचे महात्यम्'' पान क्रं. १५८-१५९ वर** श्री ब्रह्माजीने म्हटले:- मी एका

सुंदर कन्येची उत्पत्ति केली. ती तरुण असल्याने तिच्या विवाहाचा विचार केला. त्या मुलीस पत्नी रूपात प्राप्त करण्यासाठी इंद्र, वरुण इत्यादि देवता आल्या. माझ्याकडे त्या कन्येस पत्नी रूपात देण्याची प्रार्थना करू लागले. मी त्या कन्येचा विवाह गौतम ऋषि सोबत करण्यास उत्सुक होतो. अधिक प्रमाणात देवतागण असल्यामुळे मी एक अट ठेवली कि जो पृथ्वीप्रदक्षिणा करून सर्वप्रथम येईल, त्याच्या सोबत अहिल्या नावाच्या कन्येचा विवाह केला जाईल. सर्व देव चालले गेले. गौतम ऋषिनी एक गाय बघितली जी एका वासराला जन्म देत होती. अर्धे वासरू बाहेर होते आणि अर्धे आतमध्ये. गौतम ऋषिनी त्या गाईची पृथ्वी भावनेने परिक्रमा केली. याबरोबरच गौतम ऋषिंनी शिव लिंगाची देखिल प्रदक्षिणा केली आणि सर्व प्रथम माझ्याकडे (ब्रह्माकडे) आले. मी (ब्रह्मा) देखील त्या कन्येचा विवाह गौतम ऋषि बरोबर लावण्यास इच्छुक होतो. गौतम ऋषि म्हणाले ''कमलासन! विश्वात्मन आपणास वारंवार नमस्कार आहे. ब्रह्मण! मी संपूर्ण वसुधेची प्रदक्षिणा करून घेतली!. (ब्रह्माजी म्हणाले) मी समाधीस्त होवून सर्व गोष्टी बघितल्यावर गौतम ऋषिना म्हटले, ब्राह्मन्! तुम्हाला ही सुंदर कन्या दिली जात आहे. खऱ्या अर्थाने तुम्ही पृथ्वी प्रदक्षिणा केली आहे, जी वेदानाही दुर्बोध आहे (अर्थात ज्याचे ज्ञान वेदानाही नाही.). या धर्माचे स्वरूप तुम्हाला ज्ञात आहे. जी गाय अर्धी प्रसवली आहे, ती सात द्विपाच्या पृथ्विसमान आहे. अशी प्रदक्षिणा केली तर संपूर्ण पृथ्वीची प्रदक्षिणा होवून जाते. शिवलिंगाच्या प्रदक्षिणेचेही हेच फळ आहे.''

**विचार करा :- श्री ब्रह्म देवांना काल सृष्टिचे सर्वात विद्वान मानले जाते. त्यांच्या द्वारे सांगीतलेले वचन वेद-वचन मानले जाते. मात्र ब्रह्मदेवाला वेदांचे अजिबात ज्ञान नाही. याचे प्रमाण त्यांच्याद्वारे सांगितलेल्या वरील ज्ञानावरून कळते. गौतम ऋषिच्या मनात कालब्रह्मने प्रेरणा केली, त्यानंतर आपल्या इच्छा पुर्तिसाठी त्या शास्त्रविरुद्ध साधनेची पूर्तता आपला मुलगा रजोगुणी ब्रह्मा यात भुतासारखा प्रवेश करून केली कि गायीची आणि शिवलिंगाची प्रदक्षिणा केल्याचे फळ हे संपूर्ण पृथ्वीच्या परिक्रमाचेच फळ आहे. श्री ब्रह्माजीच्या मुखातून निघालेल्या वचनांना, सर्व देवतांना आणि ऋषिना स्वीकारावे लागले. अशा प्रकारे सर्व पुराणाची रचना झाली. त्यानंतर हे सर्व पुराण महर्षि वेदव्यास (कृष्ण द्वैपायन) यांनी लीपी बद्ध केले.** विष्णु पुराणात प्रथम खंडात अध्याय १५ श्लोक ११ ते ५१, पान न.६३ पासून ६६ पर्यन्त लिहिले आहे. पूर्व काळात वेद जाणकारामध्ये (तत्वदर्शी संतामध्ये) श्रेष्ठ एक कंन्डू नावाचे मुनिश्वर होते. त्यांनी गोमती नदीवर घोर तप केले. नंतर एका प्रम्लोचा नावाच्या अप्सरेने त्यांचे तप खंडित केले. त्यांनी नऊ वर्षे तिच्यासोबत भोगविलास केल्यानंतर ती निघून गेली. **विचार करा :- पवित्र गीता, जी वेदाचा सारांश आहे तीच्या अध्याय १६ व १७ तसेच अध्याय ३ मध्ये प्रमाण आहे. हठयोग करणे, घोर तप करणे व्यर्थ सांगितले आहे. तसेच गीता अध्याय ३, श्लोक ४ ते ८ मध्ये म्हटले आहे कि, जी व्यक्ति एका स्थानावर बसून तपश्चर्या करते, ती शास्त्रविरुद्ध साधक आहे. गीता अध्याय १७, श्लोक ५ ते ६ मध्ये तप करणे मनाई आहे. श्री गौतम ऋषि, कंडू ऋषि आणि इतर ऋषिनी जे वेदाविरुद्ध ज्ञान सांगितले, त्यामुळे त्यांच्या इतर अनुयायांना त्या ऋषिच्या भक्तीच्या कमाईमुळे लाभ मिळाले. ज्या कारणामुळे त्या तत्वज्ञानहीन ऋषिना तत्वता (तत्वज्ञानास समजणारे) म्हटले जाऊ लागले. परंतु पवित्र श्री मद्भगवत् गीता अध्याय ४ श्लोक ३४ मध्ये वर्णीत तत्वदर्शी संताची ओळख गीता अध्याय १५ श्लोक १ ते ४, १६ ते १७ श्लोकांमध्ये सांगितले कि जो संत किंवा ऋषि उलट्या लटकलेल्या संसार रुपी वृक्षाचे विस्तृत विवरण सांगेल तो (वेदवित्) वेदांच्या तात्पर्यास जाणणारा अर्थात तत्वदर्शी संत आहे. जसे वरती मूळ (मूल) तर परम अक्षर ब्रह्म अर्थात पूर्ण ब्रह्म समजा. जमिनीवरती जो वृक्षाचा भाग दिसून येतो**

तो भाग (खोड) त्याला अक्षर ब्रह्म म्हणजे परब्रह्म जाणा. त्या खोडाला एक मोठी फांदी असते, ती म्हणजे क्षर पुरुष अर्थात ब्रह्म जाणा. त्या मुख्य फांदीस तीन उपफांद्या (शाखा) म्हणजे रजोगुण ब्रह्मा, सतोगुण विष्णु व तमोगुण शिव जाणा. त्या उप–फांद्यांना लागलेली पाने (पर्ण) इतर संसारी प्राणी जाणा. हे वरील ज्ञान स्वत: पूर्ण परमात्मा सांगतात. ते स्वत: कांही दिवस या कालाच्या लोकात अतिथि सारखे राहतात. आपले तत्वज्ञान लोकवाणी, दोहे व कविता (शब्द–भजन) याच्याद्वारे उच्चारण करून सांगतात. याच पूर्ण परमात्म्याने कलियुगात प्रकट होवून सन १३९८ पासून सन १५१८ पर्यंत १२० वर्षे काशी मध्ये विणकराची भूमिका करून आपले तत्वज्ञान सांगितले.

कबीर, अक्षर पुरूष एक पेड़ है निरंजन वाकी डार। तीनों देवा शाखा है ये पात रूप संसार ।।

हेच तत्वदर्शी संताचे प्रमाण ऋग्वेद मण्डल ९ सूक्त ९६ मंत्र १६ ते २० मध्ये आहे (कृपया वाचा याच पुस्तकात पान न. ६८ ते ७२ पर्यंत) ज्या तत्वज्ञानाचा (संसाररूपी वृक्षाच्या प्रत्येक विभागाचे) ज्ञान कोणत्याही ऋषि व संतांना नाही. ते तत्वज्ञान स्वत: परमात्मा कबीर बंदीछोड यांनी सांगितले. ते वर्तमानात मुज दास द्वारा (रामपाल दास) प्रकाशात आणले गेले आहे. ते तत्वज्ञान वर्तमानात माझ्या दासा व्यतिरिक्त अन्य कोणाजवळही नाही.

पुराण रचनेचे दुसरे कारण :– श्री ब्रह्माजी सर्व प्रथम उत्पन्न झाले होते. त्यामुळे त्यांच्या वंशजांनी ब्रह्माजिना सर्व ज्ञानी मानून सृष्टि रचनेचे कारण व सर्व रचणहार परमात्म्याविषयी जाणून घेण्याचा प्रयत्न केला. देवी पुराण तिसरा स्कंद अध्याय ३ ते ६ मध्ये श्री ब्रह्माजी स्वत: म्हणतात कि मी ज्यावेळी सचेत झालो त्यावेळी मी कमळावर बसलो होतो. मला समजले नाही कि त्या प्रचंड जलाशयावर मी कुठून उत्पन्न झालो. मला उत्पन्न करणारा परमात्मा कोण आहे? यावरून हे सिद्ध होते कि ब्रह्माजी सर्व ज्ञानी नाहीत. त्यांच्याद्वारे सांगीतलेले ज्ञान सुद्धा सत्य होऊ शकत नाही. परंतु आपल्या जन्मानंतरचे पुराणातील वर्णन ठीक आहे. परंतु भक्तिसाधनेची विधी व परमेश्वराची माहिती ही वेदाशी जुळत नाही तर ते सर्व ज्ञान असत्य आहे.

श्री शिव पुराण, श्री विष्णु पुराण, श्री ब्रह्म पुराण तसेच श्री देवी पुराण इत्यादी या पुराणांचे ज्ञान दाता श्री ब्रह्मा जी भगवान आहेत. श्री देवी पुराणातिल तिसरा स्कंद (गीता प्रेस गोरखपूर येथून प्रकाशित त्याचे अनुवाद कर्ता श्री हनुमान प्रसाद पोददार व चिमनलाल गोस्वामी) मध्ये ब्रह्मांडाच्या रचनेचे ज्ञान देताना श्री ब्रह्माजींनी आपले पुत्र नारद मुनी यांना म्हटले कि ''मुला! ज्यावेळेस माझी उत्पत्ति झाली, तेव्हा मी कमळाच्या फुलावर बसलो होतो. मला माहित नाही मला उत्पन्न करणारा प्रभू कोण आहे? या अथांग जलाशयात मी कसा उत्पन्न झालो.......................''

श्री ब्रह्मजी द्वारा दिलेले पुराणाचे ज्ञान अपूर्ण आहे. ते संपूर्ण ज्ञान नाही. कारण श्री ब्रह्माजींनी ब्रह्मांड रचनेचे ज्ञान देण्याचा प्रयत्न केला आहे जो संशययुक्त तसेच मनघडंत आहे व तोड–जोड करून सांगितलेले आहे. कारण कि ब्रह्माजींना परमात्मा अग्नि ऋषिच्या नावाने प्रकट होवून भेटले होते. तसेच पाचवा सूक्ष्म वेद म्हणून सृष्टि रचनेचे ज्ञान व कालाचा जाळ समजून सांगितले होते. श्री ब्रह्माजींनी त्या ऋषिकडून उपदेश प्राप्त केला. परंतु नंतर कालरूपी ब्रह्म ने श्री ब्रह्माजीची बुद्धि बदलून टाकली. अंतर प्रेरणेने म्हटले कि कोणताही पाचवा वेद नाही, केवळ चारच वेद आहेत. त्याचेच ज्ञान श्रेष्ठ आहे. इतर कोणावरही विश्वास करू नये. तू जगाचा ज्ञानदाता आहेस. तुला कोणाचेही ज्ञान ग्रहण करायची गरज नाही.

याच कारणामुळे श्री ब्रह्माजींनी परमेश्वराकडून ऐकलेले ज्ञान असत्य समजून आपल्या

बुद्धिद्वारे कालरूपी ब्रह्म ने गुप्तप्रेरणेने सोयिस्कररित्या तोडून मोडून आपल्या वंशजाना (वारसांना) सांगितले जे पुराणामध्ये लिपीबद्ध आहे. श्री ब्रह्मदेवाने आपल्या जन्मानंतर घडेलेल्या घटनाचे सत्य विवरण सांगितले आहे. जे उपरोलेखित पुराणात लिहिलेले आहे.

जिंदा वेशधारी परमेश्वर ने म्हटले आहे कि धर्मदास! आपण जे हे तिर्थ यात्रा करत आहात याचा गीता जी मध्ये कोणते विवरण नाही.

## ''स्वामी विवेकानंद यांचा संक्षिप्त परिचय''

स्वामी विवेकानंद जी यांचा जन्म १२ जानेवारी १८६३ ला एका कायस्थ परिवारा मध्ये झाला. ते आपल्या आई-वडिलांचे सहावे अपत्य होते. स्वामी विवेकानंद जींचे बालपणीचे नाव नरेन्द्र दत्त होते. सन् १८८२ मध्ये दक्षिणेश्वर कालिका मंदिर मध्ये श्री रामकृष्ण परमहंस यांना आपले आध्यात्मिक गुरु मानले. १ मे १८९३ मध्ये त्यांनी रामकृष्ण मिशन ची स्थापना केली.

तिव्र बुद्धिमत्तेचे धनी स्वामी विवेकानंद यांना एक वेळेस वाचून शेकडो पानाचे पुस्तक तोंडपाठ करुन लक्षात राहायचे. त्यांनी (L.L.B.) वकिलीचे शिक्षण घेतले होते. परंतु पूर्ण सतगुरु विना आध्यात्मिक ज्ञान अपूर्णच असते. काली देवीची पूजा तसेच श्री कृष्णाची पूजा शास्त्र विरुद्ध विधिने करून मानवी जीवनाचा मुख्य उद्दीष्ट पूर्ण मोक्ष प्राप्त करणे यापासून वंचित राहिले.

असाध्य रोगाच्या कारणाने सन १९०२ मध्ये मात्र ३९ वर्षाच्या कमी वया मध्ये ते परलोकी गेले. त्यांचे गुरुजी श्री राम कृष्ण परमहंस जी देखिल गळ्याचा कॅन्सर झाल्यामुळे मृत्युला प्राप्त झाले होते. श्री राम कृष्ण परमहंस जी काली देवीचे परम भक्त होते. याच्या बरोबर राम तसेच कृष्ण अवतारांची देखिल भक्ती करत-करवत होते. स्वामी विवेकानंद जी देखिल आपल्या गुरूं जींद्वारा सांगितलेली भक्ति करत होते. दोघेही रोगाच्या कारणामुळे मृत्युस प्राप्त झाले. यथार्थ भक्तिपासुन वंचित राहुन दोघांचे मानव जीवन व्यर्थ गेले.

## ''अंध श्रद्धा भक्ती कशी सुरू झाली?''

काल ब्रह्म म्हणजे ज्योति निरंजन याला नेहमी चिंता असते कि जर मानव समाजास या रहस्याचे ज्ञान झाले तर संपूर्ण मानव समाज परमशांतिला तसेच सनातन परम धामास प्राप्त होईल. ज्याचे वर्णन गीता अध्याय १८ श्लोक ६२ मध्ये केले आहे. या काल ब्रह्म चे २१ ब्रह्मांडे रिकामे होतील. याच कारणामुळे अंध श्रद्धा भक्ति म्हणजे शास्त्र विधियुक्त भक्तीचा त्याग करून मनमानी भक्तिसाधना करण्याची सुरुवात सत्ययुगा पासूनच काल ब्रह्मा ने केली होती. ऋषिंनी पहिल्यांदा तर वेदामध्ये वर्णीत विधिने साधना केली {ॐ (ओं) नामाचे स्मरण तसेच पाच यज्ञ केले.} या साधनाने परमात्मा प्राप्ती होत नाही. हेच गीता अध्याय ११ श्लोक ४८ मध्ये स्पष्ट केले आहे कि चारही वेदां मध्ये वर्णीत नाम जप, यज्ञ, दान, उग्र तपामुळे काल ब्रह्म ची प्राप्ती होत नाही. ज्या कारणाने ऋषिंनी परमेश्वरास निराकार म्हणून संतोष केला. या कारणामुळे ऋषिजन काहि रिद्धि व काही सिद्धी प्राप्त करत होते. त्यामुळे ते सामान्य लोकात प्रसिद्ध झाले. नंतर स्वत:चा जीवन निर्वाह करण्यासाठी त्यांनी इतर सामान्य लोकांना व सेवकांना त्यांचे कष्टनिवारणार्थ तसेच धनप्राप्ती साठी वेदाचे काही मंत्र व श्लोक नित्य पाठ करण्यास देऊ केले. काही जिज्ञासूना देखील ते वेदाचे ज्ञान व आपला अनुभव सांगायचे. सांगायचे कि, परमात्मा निराकार आहे. आम्ही वेदलिखित ॐ (ओउम्) चा जप तसेच पाच यज्ञ करून समाधी लावून प्रयत्न केला पण परमात्मा भेटला नाही. तो निराकार आहे.

श्री ब्रह्मा रजोगुण, श्री विष्णु सतोगुण तसेच श्री शिवजी तमोगुण या ज्या साकार देवता आहेत, हेच परमेश्वराचे साकार रूप आहेत. जे जिज्ञासु ऋषि होते त्यांनी आपल्या पूर्वज वरिष्ट ऋषिकडून ऐकलेल्या अपूर्ण ज्ञानाचा प्रसार करण्यास सुरू केले. त्यांना संस्कृत भाषेचे ज्ञान असायचे. वेद मंत्र संस्कृत मध्ये बोलत होते. मात्र प्रवचन वेदांच्या विरुद्ध करत कि, परमात्मा निराकार आहे. त्याला आपण पाहू शकत नाही. श्री ब्रह्मा, श्री विष्णु तसेच श्री शिवजी हे परमेश्वराचे साकार स्वरूप आहे. ते अविनाशी आहेत. त्यांचे कोणी आई वडील नाहीत. श्री ब्रह्माजींची भक्ति निषिद्ध सांगितली आहे, तसेच श्री विष्णु व श्री शिवजी यांच्या भक्तीचे विधान सांगितले आहे. जे वेद व गीतेच्या विरुद्ध आहे. याच बरोबर या ऋषींनी दुर्गा देवीची (अष्टांगी माया), काली देवीची व इतर देवीची साधना केली व तसा सल्ला दीला. ऋषिनी परमाप्तप्राप्तीचा उद्देश त्यागून दिला. लोकामध्ये प्रसिद्धी व उदरनिर्वाहाच्या उद्देशाने धनप्राप्ती साठी, त्यांनी अनेक साधना करणे प्रारंभ केले. याच कारणामुळे श्राद्ध–पिंडदान, मूर्तिपूजा करण्यास प्रोत्साहन मिळाले. हे सर्व कालाचे जाळे आहे.

उदाहरण :– ज्यावेळेस राजा परीक्षित यास सर्पदंश झाला होता आणि राजाचा मृत्यू निश्चित होता ही गोष्ट ऋषिंना माहीत होती. ऋषि कश्यप यांनी साधना करून शरीरकष्ट निवारण्याची सिद्धी प्राप्त केली होती. ऋषि कश्यप आपल्या निवास स्थांनापासून राजा परीक्षितास भेटण्यास हस्थिनापुर (वर्तमानामध्ये दिल्ली) कडे निघाले. उद्देश हा होता कि तक्षक सर्प राजाला दंश करेल व मी आपल्या सिद्ध केलेल्या मंत्रसिद्धीने त्यास जिवंत करेल. त्या बदल्यात राजा मला खूप धन देईल. या गोष्टीचे ज्ञान तक्षक सर्पास झाले आणि तो त्याच मार्गात ज्या मार्गाने ऋषि कश्यप हस्थिनापुर जात होते. मनुष्य रूप धारण करून उभा राहिला. तक्षकाने ऋषिस विचारले कि ऋषि जी! कुठे जात आहात? ऋषिने उत्तर दिले कि मी हस्थिनापुरास जात आहे. राजा परीक्षितास तक्षक सर्प दंश करेल. राजाचा मृत्यू होईल. मी त्याला जीवंत करेल. तक्षक सर्पाने सांगितले कि मीच तक्षक सर्प आहे. मी आपल्या विषाने या अवाढव्य पिंपळाच्या वृक्षास जाळून भस्म करू शकतो. ऋषिने सांगितले कि माझ्याकडे असा मंत्र आहे कि मी या वृक्षास पुन्हा तसाच हिरवागार करून टाकीन. तक्षकाने मनुष्य रूप त्यागून सर्पाचे रूप धारण करून त्या पिंपळवृक्षाला दंश केला. पाहता पाहता वृक्ष जळायला लागला व त्याचा कोळसा झाला. कश्यप ऋषिनी आपल्या कमंडलूतून पाणी घेवून मंत्र म्हणत वृक्षाच्या राखेवर व कोळस्यावर शिंपडले. पिंपळवृक्ष तसाच पुन्हा हिरवागार झाला.

तक्षक म्हणाला कि ऋषिजी आपण कोणत्या उद्देशाने राजास जीवंत करणार आहात. ऋषिनी धनप्राप्तीचा उद्धेश सांगितला. तक्षक म्हणाला कि हे ऋषिजी! माझ्या दंशाने राजाचा मृत्यू नाही झाला तर भिण्डी ऋषिचा शाप मला लागेल कि तू जाणून बुजून त्याला दंश केला नाहीस. हे कश्यप ऋषिजी! मी आपल्याला राजा परीक्षितापेक्ष्या जास्त धन देईल. असे म्हणून तक्षकाने अनेक हीरे, सोन्याच्या मोहरा ऋषिच्या समोर ठेवल्या. म्हटले कि आपण हे घेऊन परत जावे. ऋषिनी विचार केला कि, बघून तर घेऊ राजा परीक्षिताचे आयुष्य शिल्लक आहे कि नाही. जर राजाचे आयुष्य शेष नसेल तर मी त्याला आपल्या मंत्र शक्तीने जीवंत करू शकणार नाही. कश्यप ऋषिने बघितले कि राजाचे आयुष्य शिल्लक नाही. फक्त त्या दिवसापर्यंत शेष होते. त्यामुळे तक्षकापासून खूप सारे धन घेऊन ऋषि परत गेले. जर राजा परीक्षिताचे जीवन शेष असते तर ऋषिनी तक्षकाचे म्हणणे मान्य केले नसते. कारण राजाने तक्षकापेक्ष्या जास्त धन दिले असते. दूसरा फायदा हा होता कि राजास जीवनदान दिल्यामुळे लोका (देश) मध्ये त्यांची खूप महिमा झाली असती. राजाचे आयुष्य शेष नसल्यामुळे ऋषिनी तक्षकाच्या धनावर

समाधान मानणे योग्य ठरवले.

## ''तत्वज्ञानाच्या अभावाने साधकाची दुर्दशा''

➢ श्री विष्णु पुराण प्रथम अंश अध्याय १ श्लोक १२ ते २१ पान न. २ वर लिहिले आहे :- श्री पराशर जींचे वडील श्री शक्ति ऋषिना ऋषि विश्वा मित्राच्या प्रेरणेने राक्षसानी खाऊन टाकले होते. श्री पराशरजीने राक्षसाना नष्ट करण्यासाठी एक यज्ञ प्रारंभ केला. ज्यात शेकडो राक्षस नष्ट झाले. तेव्हा पराशरजीचे आजोबा वशिष्ठ जीनी त्याला समजावले कि बेटा! तुझ्या वडीलांसाठी हे होणे आवश्यक होते. राग हा मूर्खांनाच येतो. विचारशील मनुष्यास कसा येऊ शकतो. हे प्रियवर! रागाने तर मनुष्याचे अत्यंत कष्ट करून मिळवलेले यश आणि तप याचा नाश होत असतो. हे मुला! या लोकात आणि परलोकालाही बिघडवणाऱ्या रागाचे महर्षिगण सर्वथा त्याग करतात. म्हणून तू रागाच्या आहारी जाऊ नकोस. आपल्या या यज्ञाला समाप्त कर. सदा दया करणे हेच साधूसंताचे धन. आपल्या आजोबाने अशा प्रकारे समजवल्याने ऋषि पराशरजीने तो राक्षसना नष्ट करणारा यज्ञ समाप्त केला.

पुन्हा श्लोक २२ ते ३१ पर्यत पान २-३ वर लिहिले आहे कि ऋषि पूलस्त्य व महर्षि वशिष्ठ यांनी सांगितलेले ज्ञान त्यांच्याच आशीर्वादाने मला (पराशरजीना) आठवले. ऋषि पराशरजीने आपले शिष्य मैत्रेय! ऋषिना हे विष्णु पुराण ऐकवले. हे मैत्रेय! हे विश्व (जगत) विष्णुजी पासून उत्पन्न झाले आहे. त्यांच्यातच स्थित आहे. तेच याच्या स्थिति आणि लयाचे कर्ता आहेत. हे जग सुद्धा तेच आहेत.

➢ विष्णु पुराण चौथा अंश अध्याय ५ श्लोक १ ते १० पान न. २५२ वर लिहिले आहे कि:- इक्ष्वाकूचा जो निमि नावाचा मुलगा होता त्याने एक सहस्त्र (एक हजार) वर्षापर्यंत अखंड यज्ञ करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी श्री वशिष्ठ ऋषिना यज्ञ कर्ता होण्याची प्रार्थना केली. वशिष्ठजिनी सांगितले कि मी इंद्राकडे यज्ञ करण्याची स्वीकृती दिली आहे. तो यज्ञ पाचशे वर्ष चालेल. त्यानंतर मी तुझा यज्ञ करेन. त्याच्या अशा बोलण्यावर राजा निमिने काहीही उत्तर दिले नाही. वशिष्ठ जींना वाटले कि राजाने त्याचे म्हणणे स्वीकारले आहे. वशिष्ठजींनी इंद्राचा पाचशे वर्षे चालणारा यज्ञ प्रारंभ केला. परंतु राजा निमिने सुद्धा ऋषि गौतम आणि अन्य ऋषिकडून यज्ञ प्रारंभ केला.

इंद्रचा यज्ञ समाप्त करून वशिष्ठ मुनि राजा निमीच्या घरी आले तर तेथे गौतम ऋषिंना यज्ञात बघून वशिष्ठ मुनींनी राजा निमिस श्राप दिला कि तुझा मृत्यू होईल. त्या वेळेस राजा निमि झोपलेला होता. झोपेतून जाग आल्यावर समजले कि वशिष्ठ मुनींनी त्यांना मृत्युचा श्राप दिला आहे. राजाने देखील वशिष्ठ ऋषिंना श्राप दीला कि तुझा सुद्धा मृत्यू होईल. दोघांचाही मृत्यू झाला. वशिष्ठ मुनींचे लिंग शरीर मित्रावरुण च्या विर्यात प्रविष्ट झाले. एका उर्वशीस बघितल्यावर मित्रावरुणचे वीर्य स्खलित झाले. जे एका घडयामध्ये पडले त्या घड्यातुन वशिष्ठ जींच्या आत्म्याला पुन्हा शरीर प्राप्त झाले.

अशा प्रकारे वशिष्ठ जींना पुन्हा शरीर प्राप्त झाले. विष्णु पुराण च्या चतुर्थ अंश अध्याय ४ श्लोक ३८ ते ७२ पर्यत पान नं. २४७ ते २४९ वर वरील वर्णन लिहिलेले आहे. एका इक्ष्वाकू वंशात मित्रसह नावाचा राजा होता. त्याने वशिष्ठजी जे त्याचे कुलगुरू सुद्धा होते, त्यांच्याकडून यज्ञ केला. एका मृग रूपधारी राक्षसास राजाने जंगलात मारले होते. तो राक्षस रूप धारण करून मृत्यूस प्राप्त झाला होता. त्या राक्षसाचा एक सोबती सुद्धा तेथे मृग रूप धारण करुन होता. त्याने आपल्या सोबत्याचा बदला घेण्याची शपथ घेतली तसेच अंर्न्तध्यान झाला. यज्ञ

संपुर्ण झाल्यावर वशिष्ठ जीं फिरण्यासाठी बाहेर गेले. पाठी मागून तो मृग राक्षस वशिष्ठ ऋषीचे रूप धारण करून आला तसेच मित्रसह राजास (सौदास) म्हणाला कि माझ्या खाण्यासाठी नरमांस तयार करा मी लगेच येतो. राजाने आज्ञेचे पालन केले. वशिष्ठ जी आल्यावर राजाने त्यांना नरमांस सोन्याच्या ताटात वाढले. ऋषि वशिष्ठ ज़ींना वाटले कि या राजाला गर्व झाला आहे यामुळे याने मला जाणुन बुजुन नरमांस खाण्यास दिले. त्यावेळी वशिष्ठ जींनी क्रोधयमान होऊन राजास श्राप दिला कि तू राक्षस होशील व नरमांस खात जाशील. राजा म्हणाला कि गुरुजी आपणच सांगितले होते कि नरमांस तयार करा. तेव्हा वशिष्ठ जींनी ध्यानस्थ होऊन सर्व कारण समजून घेतले व राजास म्हटले कि तुला केवळ १२ वर्षे मांस खावे लागेल म्हणजे केवळ १२ वर्षापर्यंत राक्षस म्हणून रहाशील. त्यानंतर ठीक होशील. तोपर्यंत राजाने आपल्या गुरुस प्रतिशाप देण्याचे ठरवले परंतु त्याच्या पत्नीच्या समजवण्याने शाप दिला नाही. एक दिवस एक ब्राह्मण ऋषि आपल्या पत्नी सोबत भोग विलास करत होता. त्या राजापासून राक्षस बनलेल्या मित्रसह राक्षसाने त्या ब्राह्मणास खाऊन टाकले. त्या ब्राह्मणीने विनवणी केल्यावर सुद्धा नाही सोडले. तेव्हा ब्राह्मणीने राजास शाप दिला कि तू जेव्हा तुझ्या पत्नीसोबत संभोग करशील त्यावेळेस तुझा मृत्यू होईल. बारा वर्षांनंतर राजा शापमुक्त झाला. आपल्या पत्नीसोबत त्याला संभोग करण्याची इच्छा झाली. तेव्हा राणीने त्यास ब्राह्मणीने दिलेल्या शापाची आठवण करून दिली. त्या दिवसापासून राजाने स्त्री–संभोगाचा त्याग केला. राजाला पुत्र नव्हता. कुलगुरु वशिष्ठ ऋषिंनी राजाच्या पत्नीचे गर्भधान केले. त्यापासून तीने अश्मक नावाचा पुत्राला जन्म दिला. त्याच वशिष्ठ मुनीच्या वीर्यापासून उत्पन्न अश्मक पासून पुढे त्याच कुळात राजा दशरथ, श्री रामचन्द्र, लक्ष्मण, भरत इत्यादि उत्पन्न झाले. श्री विष्णु पुराण श्लोक ७३ ते ९४ पान न. २४९ ते २५० वर.

समीक्षा :– परमेश्वर कबीर बन्दी छोडजी म्हणतात –

पंडित और मसालची, दोनों सूझें नाय। औरन को करें चानना, रहें आप अंधेरे माय।।

अनुवाद :– स्वसम वेद च्या वाणीचा :– परमेश्वर कबीर जी म्हणतात मसालचीने (जुन्या काळी नाटक मंडळी रात्री उजेडासाठी एका ३ फुट लांब काठीला कपडा गुंडाळून त्यावरती रॉकेल टाकून प्रज्वलित करत असत. त्याला एक व्यक्ति हातात उंच धरून धरत असत. जेणेकरून त्याचा प्रकाश दूरवर जाईल. त्या कारणामुळे त्या मशाल पकडलेल्या व्यक्ती अर्थात मशालचिवर अंधार राहत असे. पण इतर लोकावर प्रकाश राहत असे. याची तुलना पंडित अर्थात विद्वानाशी केली आहे म्हणत कि पंडित इतरांना सदुपदेश देतो पण स्वत: मात्र त्याचे अनुसरण करत नाही.)

वरील विष्णु पुराणातील लेखामध्ये श्री वशिष्ठ जी पंडित आपला नातू पराशर ला सांगत आहेत कि पंडितांनी क्रोध केला नाही पाहिजे. क्रोध तर मूर्खांनाच येत असतो. विचारवंताना (पंडितांना) भले कसा होऊ शकतो. क्रोध तर मनुष्याचे यश आणि तपास नष्ट करून टाकतो. स्वत: वशिष्ठजींनी आपल्या उपदेशाचे अनुसरण केले नाही. पान नं.२५२ वरील लेखामध्ये ''राजा निमिला गौतम ऋषिकडून यज्ञ करून घेताना पाहून अतिक्रोधीत होऊन वशिष्ठजींनी राजा निमिस मृत्युचा शाप देऊन टाकला. ज्यामुळे राजाचा मृत्यू झाला. अशाच प्रकारे पान न.२४७ ते २४९ वर राजा मित्रसह (सौदास) ला क्रोधाने शाप दिला कि तु राक्षस होशील. मनुष्याचे मांस खाशील.

वरील विवरणावरून असा निष्कर्ष निघाला कि :–

कबीर, कहते हैं करते नहीं, मुह से बड़े लबार। जमपुर धक्के खाऐंगे, धर्मराय दरबार।।
कबीर, करनी तज कथनी कथें, अज्ञानी दिन रात। कुकर ज्यूं भौंकत फिरें, सुनि-सुनाई बात।।

**वरील दोन्ही दोहयांचा भावार्थ आहे कि एकमेकापासून ज्ञान ग्रहण करून ज्ञानी (पंडित) बनून इतरांना उपदेश देत फिरतात आणि स्वत: त्याचे अनुसरण करत नाहीत. जसा कुत्रा भुंकत फिरत असतो. अशी त्या पंडिताची स्थिती आहे जो स्वत: ज्ञानाचे अनुशरण करत नाही. नंतर तो जमपुर म्हणजे यमलोकामध्ये नरकामध्ये पडत असतो. अशीच स्थिति महर्षि वशिष्ठ जी व पराशर जी इत्यादि ऋषिजींची आहे.**

**वरील विवरणात हे सुद्धा लिहिले आहे कि वशिष्ठ जींचा मृत्यू राजा निमीच्या शापाने झाला होता. वशिष्ठजींचे लिंग शरीर मित्रावरूनच्या विर्यामध्ये प्रविष्ट झाले. उर्वशीला बघितल्यावर मित्रावरूनचे वीर्य स्खलित झाले. त्यापासून वशिष्ठ जींना पुन्हा नवे शरीर प्राप्त झाले. कबीर परमेश्वराद्वारे सांगितलेल्या तत्वज्ञानाच्या आधारे संत गरीबदास जींनी म्हटले आहे.**

लिंग शरीर मोक्ष नहीं भाई। आगे जा कर देह उठाई।

**भावार्थ :- हा आहे कि ज्या साधकाचे सूक्ष्म शरीर साधनेने चार्ज (शक्ति युक्त) होवून जाते ते लिंग शरीर बनून जाते. ज्या कारणाने त्यांचा मानव शरीराचा काळ (वय) वाढतो. काही कारणाने त्यांचा मृत्यू जरी झाला तरी त्याला परत नवीन मानव शरीर प्राप्त होते. त्यांच्या भक्तीची संचितशक्ति सुद्धा विद्यमान असते. तो व्यक्ति परत एखादयास शाप देवून किवा आशीर्वाद देवून आपले पूर्व संचित भक्तिधन नष्ट करून टाकतो. आपल्या अनुयायांना शास्त्रविरुद्ध साधना सांगून पापाचा भागी होतो. ज्या कारणाने त्याची बॅटरी डिस्चार्ज (भक्ति-शक्ति रहित शरीर) होऊन जाते. त्यामुळे तो ८४ लाख प्राण्याचे शरीर प्राप्त (योंनीतून) करून कष्ट भोगतो. त्यानंतर नरकात फेकला जातो. कारण लिंग शरीर प्राप्त केल्याने देखील मोक्ष मिळत नाही. तो मोक्षमार्ग तर तत्वज्ञानाद्वारे पूर्ण संताकडून (तत्वदर्शी संत) सारनाम प्राप्त करूनच शक्य आहे अन्यथा नाही. जो ऋषिंना व देवांना, ब्रह्मा, विष्णु, शिव जींना सुद्धा मिळाला नाही. ते तत्वज्ञान व वास्तविक मोक्षप्राप्तीचा मार्ग परमेश्वर कबीरजी व पूज्य गुरुजीच्या आशीर्वादाने माझ्याजवळ (रामपाल दास) आहे. विनामूल्य प्राप्त करा. म्हणून परम पूज्य कबीर परमेश्वरजी सांगतात कि :-**

सुर नर मुनि जन तैतीस करोड़ी, बन्धे सभी निरंजन डोरी।

**भावार्थ :- तेहतीस करोड देवता, ब्रह्मा, विष्णु तसेच शिवजी सहित सर्व तत्वज्ञानाच्या अभावाने फक्त ब्रह्म पर्यंतची भक्ति करून त्यापासून मिळणाऱ्या तात्पुरता लाभ प्राप्त करून याच नीरंजनच्या (काल) दोरीत अर्थात परंपरेत बांधलेले आहेत. त्यांनाही पूर्ण परमात्म्याच्या भक्तीचे पूर्ण मोक्ष मार्गाचे ज्ञान नाही.**

**निष्कर्ष :- सूक्ष्म वेदाच्या ज्ञानाच्या अभावाने त्यांनाही परमात्मप्राप्ती झाली नाही. ज्यामुळे ऋषिमुनींना रिद्धि-सिद्धी तर प्राप्त झाल्या. ते काहींना सिद्धी पासून लाभ देवून, तर काहींना हानी करून, धन अर्जित करू लागले. त्याचेच बिघडलेले स्वरूप म्हणजे जादूटोणा होय. जसे सध्या वर्तमानात लोक, तांत्रिक व भुतप्रेत विध्या जाणाऱ्याकडे जातात. लोक सांगतात कि माझ्या दुश्मनाची हानी करशील तर मागेल ते देईल. काही भूतपीश्याच्यापासून सुटका करून घेण्यासाठी शाहण्याकडे (भूतप्रेत विध्य जानकाराकडे) जावून धन संपत्ति लुटवतात. एखाद्याने पिंपळाची पूजा सांगितल्यास ते करतात. कोणी वडाची पूजा केल्यास लाभ होतो सांगतात. एखादा तुळशीच्या पूजनाचे विधान दृढ करतो. कोणी एखादा तांत्रिक**

वैष्णव देवीच्या मंदिरात जान्याचे सांगतो. कुणी केदारनाथ, पशुपति नाथ इत्यादि धामाची पूजा करण्यास सांगतात. दु:खी व्यक्ति मात्र हे सर्व करू लागले.

अशा प्रकारे अंध श्रद्धा भक्तिचा जन्म झाला, ज्याच्या मुळया वर्तमानात खोल वर रुजल्या आहेत. अंधश्रद्धाभक्ति ही षड्यंत्राने कालब्रह्मने प्रारंभ केली. तो मात्र गुप्तपणे हे कार्य करत असतो. जसे शिवलिंग पूजा करण्यासाठी, श्री ब्रह्मा व श्री विष्णुजिना भ्रमित करून टाकले. ब्रह्मा-विष्णु सुद्धा लिंगाची पूजा करायला लागले. अशाच प्रकारे भ्रमित होवून सर्व ऋषिजन तसेच श्रद्धाळूजन करायला लागले.

आता जाणा कालब्रह्म चे हे षड्यंत्र:-

## ''कबीर परमेश्वरांचा कालाशी संवाद''

आता आपण कालब्रह्माच्या लोकात राहत आहोत. आत्म्यावर स्थूल, सूक्ष्म इत्यादी, इत्यादी शरीरे चढवून जिवाची निर्मिती कालाने केली. याने सर्व जीवांना भ्रमित केले आहे. पूर्ण परमात्मा, जो आत्म्याचा जनक आहे, त्याला विसरून टाकले. स्वत: ला त्याने परमात्मा सिद्ध केले. हा परमात्म्याचा अंश जीवत्म्यांना त्रास देतो जेणेकरून परमात्मा दुखी झाले पाहिजेत. हा मन रूपात प्रत्येक आत्म्यासोबत राहत असतो. तो आपल्या कडून अपराध करवतो दंड मात्र जीवात्मा भोगतो. जसे दारू, अफीम, भांग इत्यादि नशा करवतो. बलात्कार (Rape) करवतो आणि इतर पापे करवतो. हे सर्व मन कालाच्या प्रेरणेने करतो. जेव्हा आपण लेखक (संत रामपालजी) यांच्या कडून दीक्षा घेऊ तेव्हा हा सरळ वागेल कारण कि जीवात्म्यासोबत परमात्म्याची शक्ति राहायला लागते. आत्म्याला तत्वज्ञानाने विवेक उत्पन्न होतो. परमात्म्याच्या शक्तीने आत्मा दृढ होवून जातो. हा काल ब्रह्म केवळ कबीर परमात्म्यालाच घाबरतो. संत गरीबदास जींनी म्हटले आहे कि :-

काल डरै करतार से, जय-जय-जय जगदीश। जौरा जोड़ी झाड़ता, पग रज डारे शीश।।
काल जो पीसे पीसना, जौरा है पनिहार। ये दो असल मजदूर हैं, सतगुरू कबीर के दरबार।।

भावार्थ स्पष्ट आहे. परमात्मा कबीरजी आमच्या आत्म्यास काल जाळातून सोडवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. काल ब्रह्म हा फसवण्याचे काम करत असतो. पुढील प्रकरणात प्रत्यक्ष प्रमाण आहे.

सर्वप्रथम परमेश्वराने सर्व ब्रह्मंडे तसेच प्राण्याची रचना केली आणि आपल्या लोकात विश्रांती करू लागले. त्यानंतर आपण सर्व कालाच्या ब्रह्मांडात राहून आपल्या केलेल्या कर्माचे दंड भोगायला लागलो आणि खूप दुखी राहायला लागलो. सुख व शांतिच्या शोधात भटकायला लागलो. आणि आपल्याला आपल्या नीजघराची सतलोकाची सतत आठवण येऊ लागली. त्यामुळे तिथे जाण्यासाठी भक्ति प्रारंभ केली. काहींनी चारही वेद तोंडपाठ केले. त्यांना चतुर्वेदी म्हटले जाऊ लागले. एखाद्या ऋषीने तीन वेद पाठ केले त्यांना त्रीवेदी म्हटले जावू लागले, तर कोण्या ऋषीने दोन वेद पाठ केले. त्याला द्विवेदी म्हटले गेले. त्यामुळे त्यांची महिमा झाली. कोणी घोर तप केले आणि हवन यज्ञ, ज्ञान, समाधीस्त होणे इत्यादि क्रिया प्रारंभ केल्या. परंतु निजघर (स्वगृही) सतलोकात जाऊ शकले नाहीत. कारण वरील सर्व क्रिया करून त्यांना त्या बदल्यात समृद्ध जीवन प्राप्त झाले (जसे राजा-महाराजा, मोठा व्यापारी, अधिकारी, देव-महादेव, स्वर्ग-महास्वर्ग इत्यादि). परत चौरांशी लाख योनि भोगायला लागले. खूप दुखी राहायला लागले आणि परमपिता परमात्म्यास प्रार्थना करायला लागले कि हे दयाळू आम्हाला नीजघराचा रस्ता दाखवा. आम्ही ह्दयापासून आपली भक्ति करतो, आपण

आम्हाला दर्शन का देत नाहीत?

हा वृतांत कबीर साहेबांनी धर्मदासजींना सांगताना म्हटले कि हे धर्मदास! या जीवांची आर्त हाक ऐकून मी आपल्या सतलोकातून जोगजीतचे रूप धारण करून काललोकात प्रकट झालो. तेव्हा २१ व्या ब्रह्मांडात जिथे कालाचे घर आहे, तेथे तप्तशिलेवर जीवांना भाजून त्यांच्या सूक्ष्म शरीरातून काल ब्रह्मसाठी खाद्य पदार्थ काढला जात होता (जसे वर्तमानात एक असे यंत्र बनवलेले आहे ज्यात माश्यांना टाकून त्यावर विशेष दाब देवून त्यापासून तेल काढले जाते. मासे मरत नाही पण त्यांना खूप त्रास होतो) कबीर साहेब म्हणाले कि मी तेथे गेल्यावर त्यांचा भाजण्याचा त्रास बंद झाला. त्यांनी मला बघितल्यावर म्हटले कि हे प्रभू! आपण कोण आहात? आपल्या केवळ दर्शनाने आम्हाला सुख व शांतीचा आभास होत आहे. तेव्हा मी म्हटले कि मी पारब्रह्म परमेश्वर कबीर आहे. तुम्ही सर्व जिव माझ्या लोकातून येवून काल ब्रह्मच्या लोकात फसले आहात. हा काल ब्रह्म रोज एक लाख शरीरधारी प्राण्याच्या सुक्ष्म शरीरातून सूक्ष्म पदार्थ काढून खातो आणि नंतर ८४ लाख योनीत कर्मदंड भोगण्यासाठी सोडून देतो. आता ते जिवात्मे म्हणू लागले कि हे दयाळू परमेश्वर! आम्हाला कालाच्या जाळातून सोडवा. मी म्हटले कि, हे २१ ब्रह्मंडे काल ब्रह्माने तीन वेळेस तप करून माझ्याकडून प्राप्त करून घेतले आहेत. त्या वस्तु तुम्ही येथे उपभोगत आहात त्या सर्व कालाच्या आहेत. तुम्ही येथे तुमच्या इच्छेने आला आहात. त्यामुळे तुमच्यावर आता काल ब्रह्म चे मोठे कर्ज झालेले आहे आणि ते कर्ज माझ्या खऱ्या नामाच्या जपाशिवाय संपणार नाही.

जो पर्यत तुम्ही ऋणमुक्त होत नाहीत तो पर्यत तुम्ही काल ब्रह्मच्या कैदेतून बाहेर जावू शकत नाहीत. त्यासाठी तुम्हाला ज्यावेळेस पृथ्वीवर मानवशरीर मिळेल त्यावेळेस तुम्हाला माझ्याकडून उपदेश घेऊन भक्ति करावी लागेल. तेव्हा मी तुम्हाला येथून सोडवून घेवून जाईल. आम्ही हा संवाद करत होतो, त्याचवेळी काल ब्रह्म तेथे प्रकट झाला आणि क्रोधाने त्याने माझ्यावर हल्ला केला आणि म्हणाला कि जोगजीत! तू माझ्या लोकात कश्यासाठी आलास? सतलोकातून तूने मला मारून हाणुन हाकलून लावलेस. आता मी त्याचा प्रतिशोध घेणार तुला मारून टाकणार. हे धर्मदास! तेव्हा मी त्याला शब्दशक्तीने मूर्च्छित केले. काही वेळानंतर तो शुद्धीवर आला. माझ्या पायात पडून माफी मागू लागला. म्हणाला कि तुम्ही माझ्या पेक्षा मोठे आहात. माझ्यावर दया करा आणि मला सांगा कि आपण माझ्या लोकात का आले आहात? तेव्हा मी काल ब्रह्मास म्हटले कि काही जीवात्मे भक्ति करून आपल्या नीजघरी सतलोकी वापस येण्यास उत्सुक आहेत. त्यांना सदभक्ति मार्ग मिळत नाही. त्यामुळे ते भक्ति करून देखील याच लोकात राहतात. मी त्यांना सदभक्ति मार्ग सांगायला व तुझा खरा चेहरा दाखवण्यासाठी आलो आहे कि तू काल आहेस एक लाख जीवाचा आहार करतोस आणि सव्वा लाख जीवांना उत्पन्न करतोस तसेच भगवान बनुन बसला आहेस. मि यांना सांगेल कि तुम्ही ज्यांची भक्ती करत आहात तो भगवान नाही, काल आहे. इतके ऐकल्यावर काल बोलला कि जर सर्व जीव परत गेले तर माझ्या भोजनाचे काय होईल. मी उपाशी मरेल. तुम्हाला माझी प्रार्थना आहे कि १. तीन युगात जीव कमी संख्येत न्यावे आणि सर्वांना माझा भेद सांगू नका कि, मी काल आहे व सर्वांना खाणारा आहे. जेव्हा कलियुग येईल तेव्हा तुम्ही हवे तेव्हडे जीव घेउन जावा. २. आपले ज्ञान समजून सांगून जीवांना घेउन जावा. बळजबरीने नेऊ नका. जो मनुष्य प्राणी आपले ज्ञान स्वीकारेल, तो तुमचा. जो माझे ज्ञान स्वीकारून साधना करेल तो माझा. अश्या प्रकारे अनेक वचन त्याने माझ्याकडून घेतले. (ज्याचे वर्णन पुढील पानांवर दिलेले आहे).

हे वचन कालाने माझ्याकडून प्राप्त केले. कबीर साहेबांनी पुढे धर्मदास जींना म्हटले कि सतयुग, त्रेतायुग, द्वापरयुगात सुद्धा मी आलो होतो आणि खूप जीवांना मी सतलोकी घेवून गेलो होतो. परंतु याचा भेद मी त्यांना सांगितला नाही. आता मी कलियुगात आलो आहे आणि कालाशी माझा संवाद झालेला आहे. कालब्रह्म त्या वेळी म्हणाला होता कि आता तुम्ही कितीही जोर लावला तरीही आपले म्हणणे कुणीही ऐकून घेणार नाही. प्रथम तर मी या जीवांना, भक्तीच्या लायकीचा होऊ देणार नाही. त्यांना बिडी, सिगरेट, दारू, मांस इत्यादि दुर्व्यसनाच्या सवयी लावून त्यांची प्रवृती बिघडुन टाकले आहे. विविध प्रकारच्या पाखंड पुजा मध्ये जिवात्मांना लावले आहे. दुसरी गोष्ट अशी कि आपण आपले ज्ञान देवून पुन्हा आपल्या लोकामध्ये निघुन जाल तेव्हा मी (काल) माझे दूत पाठवून आपल्या नावाने (कबीर पंथ) बारा पंथ चालवून जीवांना भ्रमित करून टाकेन. अजुन देखिल अनेक नकली पंथ काल दूतां कडून चालवेन. ज्या कारणामुळे ते महिमा तर सतलोकाचीच सांगतील, आपलेच सांगितलेले ज्ञान कथन करतील परंतु नाम–जाप माझा करतील, ज्याच्या परिणामस्वरूप माझेच भोजन बनतील. हे गोष्ट ऐकून कबीर साहेबांनी म्हटले कि आपण आपला प्रयत्न करा, मी सतमार्ग सांगूनच जीवांना परत घेवून जाईल आणि जो माझे ज्ञान ऐकेल, तो तुझ्या भुलवण्यामध्ये येणार नाही.

सतगुरू कबीर साहेब म्हणाले कि निरंजन! जर मी ठरवले तर तुझा सारा खेळ एका क्षणात संपवून टाकेन परंतु असे केल्याने माझे वचन भंग होईल. हा विचार करून मी माझ्या हंस आत्म्याना यथार्थ ज्ञान देवून शब्द शक्तीचे बळ देवून सतलोकी घेवून जाईल आणि म्हणाले कि :–

कह कबीर सुनो धर्मराया, हम शंखों हंसा पद परसाया।
जिन लीन्हा हमरा प्रवाना, सो हंसा हम किए अमाना।।

भावार्थ :– परमेश्वर कबीर जींनी म्हटले आहे कि हे धर्मराय म्हणजे काल ब्रह्म! ज्या प्राण्यांनी माझे ज्ञान ऐकुन दीक्षा घेतली, त्या असंख्य भक्तांना आम्ही (मी तसेच माझ्या द्वारे पाठवलेल्या संतांनी) त्या परम पदास प्राप्त करवले जेथे गेल्यावर पुन्हा कधीच या संसारा मध्ये फिरुन येत नाहीत. त्यांना (अमान) अमन–चैन म्हणजे परम शांति प्रदान केले गेले. काल ने परत म्हटले कि :–

(पवित्र कबीर सागर मध्ये जीवांना धोक्यात ठेवण्यासाठी तसेच स्वत: ची भूक मिटवण्यासाठी वेगवेगळ्या तरह–तरह चे वर्णन):–

द्वादस पंथ करूं मैं साजा, नाम तुम्हारा ले करूं अवाजा।
द्वादस यम संसार पठहो, नाम तुम्हारे पंथ चलैहो।।
प्रथम दूत मम प्रगटे जाई, पीछे अंश तुम्हारा आई।।
यही विधि जीवनको भ्रमाऊं, पुरुष नाम जीवन समझाऊं।।
द्वादस पंथ नाम जो लैहे, सो हमरे मुख आन समै है।।
कहा तुम्हारा जीव नहीं माने, हमारी ओर होय बाद बखानै।।
मैं दृढ़ फंदा रची बनाई, जामें जीव रहे उरझाई।।
देवल देव पाषान पूजाई, तीर्थ व्रत जप–तप मन लाई।।
यज्ञ होम अरू नेम अचारा, और अनेक फंद में डारा।।
जो ज्ञानी जाओ संसारा, जीव न मानै कहा तुम्हारा।।

**(सतगुरु वचन)**

ज्ञानी कहे सुनो अन्याई, काटों फंद जीव ले जाई।।

जेतिक फंद तुम रचे विचारी, सत्य शबद तै सबै बिंडारी।।
जौन जीव हम शब्द दृढावै, फंद तुम्हारा सकल मुकावै।।
चौका कर प्रवाना पाई, पुरुष नाम तिहि देऊं चिन्हाई।।
ताके निकट काल नहीं आवै, संधि देखी ताकहं सिर नावै।।

वरील वर्णनावरून हे सिद्ध होते कि जे अनेक पंथ चाललेले आहेत. ज्यांच्याजवळ कबीर साहेबांनी सांगितलेला भक्ति मार्ग नाही, ते सर्व काल प्रेरित आहेत. त्यामुळे बुद्धिजीवी प्राण्यांनी समजून विचार करून भक्ति मार्ग प्राप्त केला पाहिजे कारण कि मनुष्य जीवन अनमोल आहे, ते वारंवार प्राप्त होत नाही. कबीर साहेब म्हणतात कि:-

कबीर मानुष जन्म दुर्लभ है, मिले न बारम्बार। तरूवर से पत्ता टूट गिरे, बहुर न लगता डारि।।

## काल ब्रह्मद्वारा कबीरजींकडून तीन युगांमध्ये कमी जीव घेऊन जाण्याचे वचन घेणे.

(विस्तृत व सम्पूर्ण वर्णन)

प्रश्न :- कबीरजींच्या नावाने चालू असलेल्या १२ पंथांचे खरे प्रमुख कोण आहेत? आणि तेरावा पंथ कोण चालविणार?

उत्तर :- परमेश्वर कबीरजीचा जोगजीतच्या रूपात काल ब्रह्म सोबत विवाद झाला होता. तो ''स्वसमवेद बोध'' पृष्ठ ११७ ते १२२ पर्यंत आणि ''अनुराग सागर'' ६० ते ६७ पर्यंत आहे.

परमेश्वर कबीरजी आपल्या पुत्राच्या जोगजीतच्या रूपात काळाच्या प्रथम ब्रह्माण्डात प्रकट झाले. ते एकविसावे ब्रह्माण्ड आहे. तिथे तप्त शिळा बनली आहे. काळ ब्रह्मने जोगजीतशी भांडण केले. मग पश्चात्ताप होऊन लोटांगण घालून क्षमा याचना केली आणि प्रतिज्ञा करवून काही सवलती मागितल्या.

१. तिन्ही युगात (सत्ययुग, त्रेतायुग, द्वापरयुग) थोड़े जीव भवसागराच्या पार करणे.

२. जोर-जबरदस्ती करून जीव माझ्या लोकातून नेणार नाही.

३. तुम्ही तुमचे ज्ञान समजवा. जो तुमचे ज्ञान मान्य करील, तो तुमचा आणि जो माझे ज्ञान मान्य करेल, तो माझा.

४. कलियुगात आधी माझा दूत प्रकट होईल नंतर तुमचा दूत जाईल.

५. त्रेतायुगात समुद्रावर सेतू बांधावा. त्यावेळी माझा पुत्र विष्णु रामचंद्राच्या रूपात लंकेचा राजा रावण याच्याशी युद्ध करेल, समुद्र रस्ता देणार नाहीं.

६. द्वापर युगात बौद्ध शरीर त्याग करून जाईन. राजा इन्द्रदमन माझ्या नावाने (जगन्नाथ नावाने) समुद्र कीनारी माझ्या आज्ञेने मंदिर बनवेल. त्यात समुद्र बाधा आणेल. आपण ते मंदिर सुरक्षित ठेवा. भगवंताने सर्व मागण्या मान्य केल्या आणि वचनबद्ध झाले. तेव्हा काल ब्रह्म हसला आणि त्याने म्हटले की हे जोगजीत! आपण जगतात जावे. ज्या वेळेस कलियुग येईल, त्या वेळेस मी आपल्या १२ दूतांना (नकली सद्गुरु) संसारात पाठवीन. जेव्हा कलियुगाची ५५०५ वर्ष पूर्ण होतील, तोपर्यंत माझे दूत तुमच्या नावावर (कबीरजींच्या नावावर) १२ कबीर पंथ चालवतील. कबीरजींनी जोगजीत रूपात काल ब्रह्माला म्हटले होते की कलियुगात माझे नाव कबीर होईल आणि मी कबीर नावाने पंथ चालविन त्यामुळे काल ज्योति

निरंजनाने म्हटले होते की तुम्ही कबीर नावाने एक पंथ चालवल्यास मी (काल) कबीराच्या नावाने १२ पंथ चालवीन. सर्व मानवजातीला भ्रमित करून आपल्या जाळ्यात अडकवून ठेवीन. त्या व्यतिरिक्त सतलोक, सच्चखण्ड यांच्या गोष्टी करणारे अनेक पंथ चालविन आणि सत्य साधना त्यांच्या जवळ असणार नाही. त्यामुळे ते सत्यलोकीच्या आशेने चुकीच्या नावांचे जप करतील आणि माझ्याच जाळ्यात अडकून राहतील.

{राधस्वामी पंथ जो सेठ शिवदयाल सिंह, पन्नी गल्ली, आगरा (उत्तर प्रदेश) यांनी चालवला आहे, हा पूर्ण काळाचा पंथ आहे. त्यांच्या अन्य शाखा या प्रकारे आहेत :-

१. राधा स्वामी डेरा ब्यास (पंजाब). २. डेरा सच्चा सौदा सिरसा तसेच जगमाल वाली, तहसील कालांवाल जिल्हा-सिरसा (हरियाणा). ३. जय गुरुदेव (श्री तुलसीदास यांचा) पंथ, मथुरा (उत्तर प्रदेश). ४. डेरा दिनौद, जिल्हा-भिवानी (हरियाणा). ५. सावन कृपाल पंथ, दिल्ली. ६. ठाकुर सिंह, राधास्वामी पंथ.

हे सर्व पंथ तसेच त्यांचे अनुयायी कालाच्या जाळ्यातच राहतील कारण कि या सर्व पंथाचे प्रमुखच श्री शिवदयालजी सिंग सेठ मृत्यू नंतर प्रेत बनले आणि आपली प्रिय शिष्या बुक्कीच्या अंगात प्रवेश करून हुक्का पित असायचे. जेवण करायचे तसेच आपला लहान भाऊ प्रताप सिंह व सालिगराम भक्तांशी बुक्कीच्या आतुन संवाद करायचे. जो पर्यन्त भक्तमती बुक्की जीवंत होती, तोपर्यंत शिवदयालजी तिच्या शरीरात यायचे. प्रमाण :- जीवन चरित्र स्वामी जी महाराज (श्री शिवदयाल सिंह) लेखक :- सेठ प्रताप सिंह (स्वामीजींचे लहान बंधु) आगरा (उत्तर प्रदेश).

विचार करा :- ज्या पंथाचा प्रमुखच प्रेतात्मा बनला, जी साधना तो करत होता, तीच साधना वरील त्यांच्या शाखेचे अनुयायी तसेच संत करत होते. त्यांची देखील हीच दशा होणार. परमात्मा कबीर जींनी सांगितलेली काल वार्ता सत्य आहे. त्याचे हे प्रत्यक्ष प्रमाण आहे कारण हे सर्व सतलोकाच्या (सच्चखण्डाच्या) गोष्टी करतात. जाप नकली नामाचा करतात. यामुळे कालाच्या जाळ्यातच राहणार.

काल ब्रह्मने विचारले होते की आपण कोणत्या वर्षी कलियुगात आपला सत्य कबीर पंथ चालविणार आहात? कबीरजींनी म्हटले होते की ज्या वेळेस कलियुगाची ५५०५ (पाच हजार पाचशे पाच) वर्ष पूर्ण होतील, तेव्हा मी आपला तेरावा यथार्थ कबीर पंथ चालविन.

कालाने म्हटले की त्या वेळेच्या आधीच मी संपूर्ण पृथ्वीवर शास्त्रविधिचा त्याग करून मनाला वाटेल तसे आचरण करवून शास्त्राविरूद्ध ज्ञान सांगून खोट्या नामस्मरण आणि चुकीच्या साधनेचा अभ्यास होत राहील याची काळजी घेईन. जेव्हा तुमचा तेरावा अवतार येऊन सत्य कबीर पंथ चालवेल, त्या वेळेस त्यावर कोणीही विश्वास ठेवणार नाही. उलट त्यांच्याशी भांडण करतील. कबीरजींना माहित होते की जेंव्हा कलियुगाची ५५०५ वर्ष पूर्ण होतील, तेव्हा (सन् १९९७ मध्ये) शिक्षणात क्रांति केली जाईल. मानव अक्षर ज्ञानयुक्त करण्यात येईल. त्यावेळी माझा सेवक सर्व धार्मिक ग्रन्थ नीट समजून घेऊन मानव समाजाला प्रमाणासहीत समजावून सांगेल समाजाशी चर्चा करेल. सर्व प्रमाणे डोळ्याने बघून शिक्षित झालेला मानव सत्याची ओळख होऊन त्वरित माझ्या तेराव्या पंथाची दीक्षा घेईल आणि संपूर्ण विश्वात माझ्याकडून सांगितलेले भक्ति विधि आणि तत्त्वज्ञानाचा हृदयापासून स्वीकार करून भक्ति करतील. त्यावेळी पुनःसत्ययुगाससारखे वातावरण होईल. आपसातील रागद्वेष, चोरी-चापटी लूट-मार कोणी करणार नाही. कोणीहि धन साठवून ठेवणार नाहीत. भक्तिला

**अधिक महत्त्व दिले जाईल. ज्या प्रमाणे त्या वेळेस ज्या माणसाकडे अधिक धन असेल, मोठा व्यवसाय असेल, मोठमोठ्या हवेल्या बांधणाऱ्या लोकांना मोठे समजण्याची पद्धत होती. त्याऐवजी १३व्या पंथाचा प्रारम्भ झाल्यानंतर त्यांना मुर्ख मानले जाईल. जे भक्ति करतील साधे घर बांधून राहतील त्यांना मोठे व महान सन्माननीय व्यक्ती समजले जाईल.**

**{विस्तृत माहिती याच पुस्तकाच्या पान १३० वर ''तप्त शिलेवर जळत असलेल्या प्राण्यांसंगे वार्ता'' वाल्या प्रकरणामध्ये वाचुयात.}**

**प्रमाणासाठी जवळपास ६०० वर्ष अगोदर लिहिलेल्या पवित्र कबीर सागर मधील वेग-वेगळ्या अध्यायांमधील अमृत वचने :-**

## ''कबीरजी आणि ज्योति निरंजन यांची चर्चा''

**अनुराग सागरच्या पृष्ठ ६२ वरून :-**

### ''धर्मराय (ज्योति निरंजन) वचन''

धर्मराय अस विनती ठानी। मैं सेवक द्वितीया न जानी।।१
ज्ञानी बिनती एक हमारा। सो न करहू जिह से हो मोर बिगारा।।२
पुरूष दीन्ह जस मोकहं राजु। तुम भी देहु तो होवे मम काजु।।३
अब मैं वचन तुम्हरो मानी। लीजो हंसा हम सो ज्ञानी।।४

**पृष्ठ ६३ ची अनुराग सागरातील वचने :-**

दयावन्त तुम साहेब दाता। ऐतिक कृपा करो हो ताता।।५
पुरूष शाप मोकहं दीन्हा। लख जीव नित ग्रासन कीन्हा।।६

**पृष्ठ ६४ वरील अनुराग सागर मधील वचने :-**

जो जीव सकल लोक तव आवै। कैसे क्षुधा मोर मिटावै।।७
जैसे पुरूष कृपा मोपे कीन्हा। भौसागर का राज मोहे दीन्हा।।८
तुम भी कृपा मोपर करहु। जो माँगे सो मोहे देहो बरहु।।९
सतयुग, त्रेता, द्वापर मांहीं। तीनों युग जीव थोड़े जाहीं।।१०
चौथा युग जब कलयुग आवै। तब तव शण जीव बहु जावै।।११

**पृष्ठ ६५ वरील अनुराग सागरची वचने, वरील वचन पंक्ति नं ३ से :-**

प्रथम दूत मम प्रकटै जाई। पीछे अंश तुम्हारा आई।।१२

**पृष्ठ ६४ वरील अनुराग सागरची वचने, वरील वचने पंक्ति नं ६ :-**

ऐसा वचन हरि मोहे दीजै। तब संसार गवन तव कीजै।।१३

### ''जोगजीत वचन=ज्ञानी बचन''

**पृष्ठ ६४ वरील अनुराग सागरची वचने, वरील वचने पंक्ति नं ७ :-**

अरे काल तुम परपंच पसारा। तीनों युग जीवन दुख डारा।।१४
बीनती तोरी लीन्ह मैं जानि। मोकहं ठगा काल अभिमानी।।१५
जस बीनती तू मोसन कीन्ही। सो अब बख्स तोहे दीन्ही।।१६
चौथा युग जब कलयुग आवै। तब हम अपना अंश पठावैं।।१७

### ''धर्मराय (काल) वचन''

**पृष्ठ ६४ वरील अनुराग सागर मधील वचन, वरील वचन पंक्ति नं १७ :–**

हे साहिब तुम पंथ चलाऊ। जीव उबार लोक लै जाऊ।।१८

**पृष्ठ ६६ वरील अनुराग सागराची वाणी, वरील वचन पंक्ति नं ८, ९, १६ ते २१ :–**

सन्धि छाप (सार शब्द) मोहे दिजे ज्ञानी। जैसे देवोंगे हंस सहदानी।।१९
जो जन मोकूं संधि (सार शब्द) बतावै। ताके निकट काल नहीं आवै।।२०
कहै धर्मराय जाओ संसारा। आनहु जीव नाम आधारा।।२१
जो हंसा तुम्हरे गुण गावै। ताहि निकट हम नहीं जावैं।।२२
जो कोई लेहै शरण तुम्हारी। मम सिर पग दै होवै पारी।।२३
हम तो तुम संग कीन्ह ढ़िठाई। तात जान किन्ही लडकाइ।।२४
कोटिन अवगुन बालक करही। पिता एक चित नहीं धरही।।२५
जो पिता बालक कूं देहै निकारी। तब को रक्षा करै हमारी।।२६
सारनाम देखो जेहि साथा। ताहि हंस मैं नीवाऊँ माथा।।२७

**''ज्ञानी (कबीर) वचन''**

**अनुराग सागर पृष्ठ ६६ :–**

जो तोहि देहुं संधि बताई। तो तूं जीवन को हइहो दुखदाई।।२८
तुम परपंच जान हम पावा। काल चलै नहीं तुम्हरा दावा।।२९
धर्मराय तोहि प्रकट भाखा। गुप्त अंक बीरा हम राखा।।३०
जो कोई लेई नाम हमारा। ताहि छोड़ तुम हो जाना नियारा।।३१
जो तुम मोर हंस को रोको भाई। तो तुम काल रहन नहीं पाई।।३२

**''धर्मराय (काल निरंजन) बचन''**

**पृष्ठ ६२ आणि ६३ मधील अनुराग सागरतील वचने :–**

बेसक जाओ ज्ञानी संसारा। जीव न मानै कहा तुम्हारा।।३३
कहा तुम्हारा जीव ना मानै। हमरी और होय बाद बखानै।।३४
दृढ़ फंदा मैं रचा बनाई। जामें सकल जीव उरझाई।।३५
वेद–शास्त्र समर्ति गुणगाना। पुत्र मेरे तीन प्रधाना।।३६
तीनहू बहु बाजी रचि राखा। हमरी महिमा ज्ञान मुख भाखा।।३७
देवल देव पाषाण पुजाई। तीर्थ व्रत जप तप मन लाई।।३८
पूजा विश्व देव अराधी। यह मति जीवों को राखा बाँधि।।३९
जग (यज्ञ) होम और नेम आचारा। और अनेक फंद मैं डारा।।४०

**''ज्ञानी (कबीर) वचन''**

हमने कहा सुनो अन्याई। काटों फंद जीव ले जांई।।४१
जेते फंद तुम रचे विचारी। सत्य शब्द ते सबै विडारी।।४२
जौन जीव हम शब्द दृढ़ावैं। फंद तुम्हारा सकल मुक्तावैं।।४३
जबही जीव चिन्ही ज्ञान हमारा। तजही भ्रम सब तोर पसारा।।४४
सत्यनाम जीवन समझावैं। हंस उभार लोक लै जावै।।४५
पुरूष सुमिरन सार बीरा, नाम अविचल जनावहूँ।
शीश तुम्हारे पाँव देके, हंस लोक पठावहूँ।।४६

ताके निकट काल नहीं आवै। संधि देख ताको सिर नावै।।४८
(संधि = सत्यनाम+सारनाम)

**''धर्मराय (काल) वचन''**

पंथ एक तुम आप चलऊ। जीवन को सतलोक लै जाऊ।।४९
द्वादश पंथ करूँ मैं साजा। नाम तुम्हारा ले करों आवाजा।।५०
द्वादश यम संसार पठाऊँ। नाम कबीर ले पंथ चलाऊँ।।५१
प्रथम दूत मेरे प्रगटै जाई। पीछे अंश तुम्हारा आई।।५२
यहि विधि जीवन को भ्रमाऊँ। आपन नाम पुरूष का बताऊँ।।५३
द्वादश पंथ नाम जो लैहि। हमरे मुख में आन समैहि।।५४

**''ज्ञानी (कबीर) वचन'' चैपाई**

**अध्याय ''स्वसमवेद बोध'' पृष्ठ १२१ :-**

अरे काल परपंच पसारा। तीनों युग जीवन दुख आधारा।।५५
बीनती तोरी लीन मैं मानी। मोकहं ठगे काल अभिमानी।।५६
चौथा युग जब कलयुग आई। तब हम अपना अंश पठाई।।५७
काल फंद छूटै नर लोई। सकल सृष्टि परवानिक (दीक्षित) होई।।५८
घर-घर देखो बोध (ज्ञान) बिचारा (चर्चा)। सत्यनाम सब ठोर उचारा।।५९
पाँच हजार पाँच सौ पाँचा। तब यह वचन होयगा साचा।।६०
कलयुग बीत जाए जब ऐता। सब जीव परम पुरूष पद चेता।।६१

**भावार्थ :- (वाणी सँख्या ५५ से ६१ तक) परमेश्वर कबीरजींनी म्हटले की हे काल! तू विशाल प्रपंच रचला आहेस. तिन्ही युगात (सतयुग, त्रेता, द्वापर) तू जीवाना अपार यातना देशील. जसे तू म्हणत होतास. तू मला केलेली विनंती मान्य केली. तू मला फसवले आहेस. परतुं जेव्हा चौथे युग म्हणजेच कलियुग येईल, तेव्हा मी माझा अंश म्हणजे कृपा पात्र आत्मा पाठवील. हे काल! तुझ्या नावाने तयार झालेले सर्व फंद म्हणजे अज्ञानाधारीत चुकीचे ज्ञान व साधनेला सत्य शब्द आणि सत्य ज्ञानाने समाप्त करेल. त्या वेळेस सारे विश्व प्रवानिक म्हणजेच त्या माझ्या संताकडून दीक्षा घेईल. त्या वेळ पर्यंत म्हणजे जोपर्यंत कलियुग पाच हजार पाचशे पाच पूर्ण होत नाही, तोवर सत्यनाम, मूलनाम (सार शब्द) आणि मूल ज्ञान (तत्त्वज्ञान) प्रकट करायचे नाहीं. परंतु कलियुगाची पाच हजार पाचशे पाच वर्ष पूर्ण झाल्यावर घराघरात माझ्या अध्यात्मिक ज्ञानाची चर्चाच होत राहील आणि सत्यनाम, सार शब्द सर्व अनुग्रहीतांना देण्यात येतील. हे जे मी सांगतो आहे, ते माझे शब्द कलियुगाची ५५०५ (पाच हजार पाचशे पाच वर्ष) पूर्ण झाल्यावर सिद्ध होतील. जेव्हा कलियुगाची इतकी वर्ष पूर्ण होतील, तेव्हा सर्व मानव प्राणी परम पुरूष म्हणजेच सत्य पुरूषाच्या पदाला म्हणजेच त्या परम पदा विषयी जाणकार होतील. ह्याविषयी गीता अध्याय १५ श्लोक ४ मध्ये म्हटले आहे की तत्त्वदर्शी संत प्राप्त झाल्यानंतर साधक फिरून मृत्युलोकात परत जाणार नाही. ज्या भगवंताने संसार रूपी वृक्षाचा विस्तार केला आहे म्हणजेच ज्या भगवंताने सृष्टिची रचना केली आहे, त्याच भगवंताची भक्ति करा.**

**उपरोक्त वचनाचा भावार्थ आहे असा की त्यावेळेस त्या भगवंताच्या पदाविषयी (सत्यलोक) सर्वांना पूर्ण ज्ञान होईल.**

**स्वसमवेद बोध पृष्ठ १७० :-**

**अथ स्वसम वेद स्फुटवार्ता-चैपाई**

एक लाख और असि हजारा। पीर पैगंबर और अवतारा।।६२
सो सब आही निरंजन वंशा। तन धरी-धरी करैं निज पिता प्रशंसा।।६३
दश अवतार निरंजन के रे। राम कृष्ण सब आहीं बडेरे।।६४
इनसे बड़ा ज्योति निरंजन सोई। यामें फेर बदल नहीं कोई।।६५

**भावार्थ :- परमेश्वर कबीर जी सांगतात की बाबा आदम पासून हजरत मुहम्मदा पर्यंत एक लाख ऐंशी हजार (१,८०,०००) पैगंबर आणि दहा अवतार हिन्दू मानत आहेत, हे सर्व कालाने पाठविले आहेत. ह्या दहा अवतारात राम आणि कृष्ण प्रमुख आहेत. हे सगळे कालाचा महिमा सांगून सर्व जीवंना भ्रमित करून कालाची साधना दृढ़ केले गले. या सर्वांना मुखिया ज्योति निरंजन काल (ब्रह्म) आहे.**

**स्वसमवेद बोध पृष्ठ १७१(१५१५) :-**

**सत्य कबीर वचन**

**दोहे:-** पाँच हजार अरू पाँच सौ पाँच जब कलयुग बीत जाय।
महापुरूष फरमान तब, जग तारन कूं आय।।६६
हिन्दु तुर्क आदि सबै, जेते जीव जहान।
सत्य नाम की साख गही, पावैं पद निर्वान।।६७
यथा सरितगण आप ही, मिलैं सिन्धु मैं धाय।
सत्य सुकृत के मध्य तिमि, सब ही पंथ समाय।।६८
जब लग पूर्ण होय नहीं, ठीक का तिथि बार।
कपट-चातुरी तबहि लौं, स्वसम बेद निरधार।।६९
सबही नारी-नर शुद्ध तब, जब ठीक का दिन आवंत।
कपट चातुरी छोड़ि के, शरण कबीर गहंत।।७०
एक अनेक ह्वै गए, पुन: अनेक हों एक।
हंस चलै सतलोक सब, सत्यनाम की टेक।।७१
घर घर बोध विचार हो, दुर्मति दूर बहाय।
कलयुग में सब एक होई, बरतें सहज सुभाय।।७२
कहाँ उग्र कहाँ शुद्र हो, हरै सबकी भव पीर(पीड़)।।७३
सो समान समदृष्टि है, समर्थ सत्य कबीर।।७४

**भावार्थ :- परमेश्वर कबीरजी सांगतात की हे धर्मदास! मी ज्योति निरंजन म्हणजेच काल ब्रह्माला सुद्धा म्हटले होते आता तुम्हाला सुध्दा सांगतो आहे.**

**कबीर सागरच्या अध्याय ''स्वसमबेद बोध'' च्या वाणी संख्या ६६ से ७४ चा सरलार्थ :- ज्या वेळेस कलियुगाची पाच हजार पाचशे पाच वर्ष संपतील, तेव्हा एक महापुरूष विश्वाला पैलतीरी नेण्यासाठी येईल. हिन्दु, मुसलमान इत्यादी जितके पंथ तोपर्यंत असतील, आणि जेव्हढे जीव जगामध्ये असतील ते सर्व मानव शरीर प्राप्त करून त्या महापुरूषाकडून सत्यनाम घेऊन सत्यनामाच्या शक्तिने मोक्ष प्राप्त करतील. तो महापुरूष जो सत्य कबीर पंथ चालवेल, त्या (तेराव्या) पंथात सर्व पंथ (बारा कबीर नावावाल्या तसेच अन्य सर्व पंथांचे अनुयायी) स्वतःहून अशा तीव्र गतिने सामावून जातील, जणू निरनिराळ्या नद्या आपोआप अनिर्बंध वाहत समुद्राला येऊन मिळाव्यात. त्यांना कोणीही थांबवू शकत नाही. असे त्या तेराव्या पंथात सगळे पंथ सत्वर विलीन होऊन एक पंथ तयार होईल. परंतु जोपर्यंत योग्य वेळ येत**

नाही, तोवर म्हणजेच कलियुगाची पाच हजार पाचशे पाच वर्ष पूर्ण होत नाहीत तोपर्यंत मी जो हा ज्ञान स्वसमवेद बोध अध्याय मध्ये सांगत आहे, आणि आपण लिहित आहात, तो निराधार वाटेल.

ज्या वेळेस ती ठरलेली योग्य वेळ येईल, त्या वेळेस स्त्री–पुरूष माझ्या (कबीरजींच्या) पाठवलेल्या सतगुरु द्वारा माझ्या वाणी चे विचार ऐकुन उच्च विचारावाले तसेच शुद्ध आचरण करून कपट, फुकटच्या हुशारीचा त्याग करून माझ्या (कबीरजींच्या) शरण येतील. परमात्म्याकडून लाभ घेण्यासाठी एका ''मानव'' धर्मापासून अनेक पंथ(धार्मिक समुदाय) बनले आहेत. ते सर्व पुनः एकत्रित होतील. सगळे हंस (निर्विकार भक्त) आत्मे सत्यनामाचा जाप करुन भक्तिच्या शक्तिने सतलोकी जातील. माझ्या अध्यात्म ज्ञानाची चर्चा घरो–घरी होईल. त्यामुळे सगळ्यांची दुर्बुद्धी संपून जाईल. कलियुगामध्ये पुन्हा एक होऊन सहज वर्तणूक करतील म्हणजेच शांततापूर्वक जीवन जगतील. कलयुगामध्ये पुन्हा सत्ययुगासारखे वातावरण होईल. सर्वजण प्रेमाने राहतील. अधिक धनाची ईच्छा सोडून साधारण जीवन जगतील. त्या सत्य साधनाने सर्व प्रकारचे कष्ट समाप्त होतील. कोठे उग्र अर्थात दरोडेखोर डाकू, लुटारू, कसाई असो, शुद्र अन्य हीन गोष्टी करणारा नीच असला तरी समजला जाईल. परमात्मा सत्य भक्ति करणाऱ्याचे भवपीर म्हणजेच सांसारीक कष्ट हरण म्हणजेच दूर करेल. सत्य साधनेने सर्वांचे भवपीर म्हणजेच सांसारीक कष्ट संपतील आणि त्या १३व्या (तेराव्या) पंथाचा प्रवर्तक सर्वांना समान दृष्टिने पाहिल. म्हणजेच लहान मोठा असा भेदभाव करणार नाहीं. तो समर्थ सत्य कबीरच असेल. (मम् संत मुझे जान मेरा ही स्वरूपम्)

प्रश्न :– तो तेरावा पंथ कोणता आहे, त्याचा प्रवर्तक कोण आहे?

उत्तर :– तो तेरावा पंथ ''यथार्थ सत कबीर पंथ'' आहे. त्याचे प्रवर्तक स्वतः परमेश्वर कबीरजी आहेत. वर्तमानात त्याचा संचालक त्यांचा सेवक स्वामी रामदेवानंदजी महाराजांचा पुत्र रामपाल दास आहे. (अध्यात्मिक दृष्टिने गुरूजींना पिता म्हटले जाते ते आत्म्याचे पोषण करत असतात.)

प्रमाण :– तसे तर संत धर्मदासजींच्या वंश परंपरेतील महंतांशी संबंधित श्रद्धाळूंनी अज्ञानामुळे तेरावा पंथ आणि संचालक धर्मदासजींच्या परिवारातील धारकांना सिद्ध करण्याची कुचेष्टा केली आहे. परंतु हत्तीचे वस्त्र रेड्यावर टाकून कोणी म्हटले की बघा हे रेड्याचे वस्त्र आहे. बुद्धिमान असलेल्यांना त्वरित समजते की हे रेड्याचे वस्त्र नाही आहे. हे तर रेड्यापेक्षाही विशाल अशा प्राण्याचे आहे. भले ही ते हे सांगू शकणार नाहीत की हे हत्तीचे आहेत.

## ''तप्त–शिळेवर जळणाऱ्या जीवांशी संवाद''

धर्मदासजीनी प्रश्न केला कि हे परमेश्वर! आम्ही तुमच्या सोबत विश्वास घात करून येथे आलो होतो. तुम्हाला तरीदेखील आम्हा नीच आत्म्यावर दया आली. तुमचे या कालब्रह्मच्या भयानक लोकात कसे व केव्हा आगमन झाले.

उत्तर (कबीर देवांचे) :– ज्या वेळेस सृष्टिची रचना केली व काल ब्रह्मने या आत्म्याना आकर्षित केले. हे याच्यासोबत स्व:इच्छेने येथे आले. काही काळानंतर काल ब्रह्माने यांना तप्तशिलेवर गरम करून तडफडवले नंतर इतर कष्टदायक प्राण्यांच्या शरीरात टाकून कष्ट भोगण्यास विवश केले तेव्हा सर्व आत्मे परमेश्वराची आठवण करून सुखाची ईच्छा करू लागले. तेव्हा माझ्या आत्म्याचे दू:ख माझ्याकडून बघवले नाही. मी प्रथम सतयुगात या काल ब्रह्मच्या लोकात अन्य रूप धारण करून आलो.

**सर्व प्रथम त्या स्थानावर पोहचलो जेथे प्रत्येक दिवशी एक लाख मनुष्यधारी प्राण्यांच्या सूक्ष्मशरीरास तप्तशिलेवर गरम करून त्यातून निघालेल्या गंधास हा काल ब्रह्म खातो. तप्तशिला म्हणजे दगडाचा एक मोठा तुकडा असतो. तो तव्यासारख्या आकाराचा असतो जो स्वत: गरम असतो. त्यावेळी त्या तप्तशिळेवर एक लाख प्राणी तडफडत होते. सर्वत्र हाहा:कार माजला होता. ते हृदय द्रवणारा आक्रोश करत होते. जसे तांदळापासून खीर बनवताना चटकमटक आवाज येतो. असे सर्व प्राणी त्या तप्तशिलेवर चटकत होते. मी त्या तप्तशिलेजवळ जावून उभा राहिलो. माझ्या प्रभावाने त्या तप्तशिलेच्या अग्निने त्या प्राण्यांना प्रभावित करणे बंद केले. तप्तशिला तसिच जळत होती परंतु माझ्या उपस्थितीने अग्नीची आच त्या प्राण्यांना जाळत नव्हती. सर्व प्राणी कष्टरहित होऊन शांतपणे तप्तशिलेवर बसून माझ्याकडे बघू लागले. मला विचारले हे परमेश्वर! येथे आम्ही कोणत्या कर्माचे दंड भोगत आहोत? हे प्रभु! आपल्या उपस्थितिने आम्हाला कोणतेही कष्ट होत नाहीत. आम्ही अग्नीत बसून देखील स्वत:ला सामन्याहून अति सुखी अनुभवत आहोत. तुम्ही कोण आहात? का तुम्हीच काल ब्रह्म आहात? का कोणी त्याचे सेवक आहात? कृपा करून आम्हाला सर्व भेद समजावून सांगा.**

**उत्तर :-(कवीर्देव यांचे) :- मी त्या दु:खी प्राण्यांना बोललो. हे जिव्यात्म्यांनो! मी काल ब्रह्म नाही. मी तत् ब्रह्म अर्थात तो परमात्मा आहे. ज्यांच्याविषयी वेद सुद्धा सांगतात की त्या पूर्ण परमात्म्याचे ज्ञान आम्हाला नाही. त्यांच्याविषयी तर तत्वदर्शी संतच वास्तविक ज्ञान देऊ शकतात. त्यांनाच विचारा.** {यजुर्वेद अध्याय ४० श्लोक १० व १३ मध्ये म्हंटले आहे कि परमात्मा कसा आहे? तसेच विद्वान कोण आहे? हे ज्ञान धिरानाम् अर्थात तत्वदर्शी संतच सांगतात त्यांच्याकडून ऐका. याचे प्रमाण गीता अध्याय ४ श्लोक ३४ मध्ये लिहिले आहे कि त्या तत्वज्ञानाला तत्वदर्शी संताकडे जावून समजून घ्या जो परम्यातम्या विषयी पूर्ण परिचित असेल. तत्वदर्शी संताची ओळख गीता अध्याय १५ श्लोक १ मध्ये सांगितली आहे. जे श्लोक १ ते ४ च्या विवरणातुन स्पष्ट रुपाने समजु शकतो. गीता अध्याय १३ श्लोक २ व ११ मध्ये गीता ज्ञान दाता कालब्रह्म म्हणतो कि जे तत्वज्ञान आहे तेच वास्तविक ज्ञान आहे. असे माझे मत आहे.

विचार करण्याचा विषय हा कि वेद व गीतेचा ज्ञानदाता काल ब्रह्म म्हणतो कि माझ्याद्वारे दिलेले ज्ञान (वेद व गीताचे ज्ञान) हे पूर्ण ज्ञान नाही. त्या तत्वज्ञानास तर तत्वदर्शी संतच जाणतात. त्यांचा शोध घेऊन स्वत:चे कल्याण कर.} **वेद व गीतेच्या ज्ञानास आधार बनवणारे व भक्ति करणारे यांच्या जन्म-मृत्यू, स्वर्ग-नरकाचे चक्र व तप्तशिलेचे कष्ट सदा बनून राहील. तुम्ही ज्या कालब्रह्म विषयी जाणता तो लोकवेदाच्या आधारे पुरुषोत्तम म्हणून प्रसिद्ध आहे. परंतु वास्तविक पुरुषोत्तम तर कुणी अन्य आहे. प्रमाण गीता अध्याय १५ श्लोक १६ ते १८ मध्ये गीता ज्ञानदाता स्वत: म्हणत आहे कि उत्तम पुरुष: अर्थात पुरुषोत्तम् तर कुणी अन्य आहे. ज्याला परमात्मा म्हणतात. जो तिन्ही लोकात प्रवेश करून सर्वाचे धारण पोषण करतो. वास्तवात तेच अविनाशी प्रभू आहेत. (गीता अध्याय १५ श्लोक १७ मध्ये) तसेच गीता अध्याय १५ श्लोक १८ मध्ये आपल्या विषयी गीता ज्ञानदाता म्हणतो कि मला तर लोकवेदाच्या आधारे पुरुषोत्तम म्हणतात. मी वास्तविक पुरुषोत्तम नाही. जो गीता अध्याय ११ श्लोक ३२ मध्ये म्हणतो कि मी काल आहे. सर्वांना खाण्यास प्रकट झालो आहे. गीता अध्याय ११ श्लोक २१ मध्ये अर्जुनाने स्वत: बघितलेले वर्णन सांगितले कि हे भगवान तुम्ही तर या ऋषिनाही खात आहात जे वेदमंत्राद्वारे तुमची स्तुति करत आहेत. तुम्ही देवतांना व सिद्धाच्या समूहालाही खाण्यास तयार आहात. जे तुमच्याकडे जीवन रक्षणाची मंगल याचना करत आहेत. काल भगवान म्हणाला कि मी सर्वांना खाण्यास प्रवृत झालो आहे.**

हे धर्मदास! त्या तप्तशिलेवर ऋषि महर्षि व अन्य वेदपाठ करणारे व वाचणारे विद्वान देखील कष्ट भोगत होते जे वेदमंत्राशी परिचित होते. ते सर्व एका स्वरात म्हणाले कि हे पूर्ण परमात्मा! आपण सत्य सांगत आहात. हे ज्ञान वेदात लिहिलेले आहे (वेदाचे सारज्ञान हे गीताजी मध्ये लिपीबद्ध आहे). सतयुगात सर्व मनुष्य आत्मे साधना करत असत. कोणी श्री विष्णुजी व शिवजीची तर कोणी अन्य देवींची जी त्या काळी अशा गुरूंनी प्रचलित करून ठेवली होती ज्यांना वेद ठीक प्रकारे उमजत नव्हते. काही ऋषिजन गुरुजन सुद्धा त्या तप्तशिलेवर कष्ट भोगत होते जे आपआपल्या साधनेस श्रेष्ठ समजून स्वत: करत होते. तसेच आपल्या अनुयायनाही करायला सांगत व करवत असत. ते सुद्धा म्हणू लागले, हे परमेश्वर! आमची साधना शास्त्रविरूद्ध होती. आता आम्हाला आपल्या कृपेने ज्ञान झाले आहे. आमची शास्त्रविरूद्ध साधना काही कामाची नाही. आम्ही येथे तप्तशिलेवर कष्ट भोगत आहोत. {याचे प्रमाण गीता अध्याय १६ श्लोक २३ मध्ये म्हटले आहे कि जो शास्त्रविधीचा त्याग करून मनमाने आचरण (पूजा) करतो त्यांना ना कोणते सुख प्राप्त होते ना त्यांची गती होते अर्थात मोक्ष प्राप्त होतो. म्हणेजे त्यांची शास्त्रविरूद्ध भक्ति व्यर्थ आहे.}

तेव्हा मी (कबीरदेव) त्या तप्तशिलेवर बसलेल्या प्राण्यांना सृष्टिरचना सांगितली. (कृपया वाचकांनी याच पुस्तकाच्या पान न.१९२ वर पहावे.) त्यामुळे त्यांना ज्ञान झाले कि ते कसे स्वत:च्या पायावर कुऱ्हाड मारून या कालाच्या जाळ्यात फसलेले आहेत. त्या प्राण्यांनी सांगितले कि हे परमेश्वर! आम्हाला या महादु:खदायक, भयानक कालाच्या लोकातून सोडवा. आम्हाला आपल्या सतलोकत घेऊन चला. तेव्हा मी या प्राण्यांना म्हणालो कि, मी तुम्हाला सतलोकत घेऊन जाऊ शकत नाही कारण कि तुम्ही स्वेच्छेने या कालब्रह्म सोबत येथे आला आहात. तुमचे पुण्य येथे समाप्त झालेले आहे. तुमच्यावर या कालब्रह्मचे ऋण झालेले आहे. त्या ऋणातून मुक्त होवूनच तुम्ही सतलोकत जाऊ शकता. याची विधी आहे कि ''जेव्हा तुम्हाला पृथ्वीवर मानव जन्म प्राप्त होईल तसेच मी कोणत्याही रूपात प्रगत होवून हे तत्वज्ञान सांगण्यास येणार किंवा माझ्या एखाद्या अंश आत्म्याला पाठवेल. तेव्हा तुम्ही माझ्या सत्यशब्दाला (सारशब्दाला) तसेच सारनामाला तत्वज्ञानाला ग्रहण करून मर्यादेमध्ये राहून भक्ति कराल तेव्हाच तुम्हाला सतलोकात जाणे शक्य होईल.''

हे धर्मदास! मी (कबीर परमेश्वर) त्या ऋषिंना प्रश्न केला जे तप्तशिलेवर उपस्थित होते तसेच ते पृथ्वी लोकात वेदाचे पाखंड विद्वान प्रसिद्ध होते. प्रश्न:- (कबीरजीचा):- तुम्ही वेदाचे वाचन केले आहे? कृपया सांगावे कि वेदामध्ये प्रभूंना साकार लिहिले आहे कि निराकार? त्या ऋषिंनी एका सूरात उत्तर दिले कि परमात्मा निराकार आहे. समाधीद्वारे शरीरात केवळ त्याचा प्रकाश बघितला जाऊ शकतो. समाधीमध्ये परमात्मा प्रत्यक्ष असतो. मी (कबीरजी) त्या मतिहिनाना विचारले कि प्रत्यक्ष म्हणजे काय? त्यांनी उत्तर दिले कि ''प्रत्यक्ष चे तात्पर्य'' आहे समाधीमध्ये परमेश्वराचा साक्षात्कार होणे. मी त्यांना म्हटले कि ''प्रत्यक्ष'' तर साकार वस्तूच असते. जसे एखाद्याने म्हटले कि पाणी आणा. त्याने पाणी आणून दाखवले. तो आणलेला पदार्थ म्हणजे पाणी हे साक्षात वस्तु आहे. ''पाणी'' शब्द नाही. एखाद्या माठाला बघितले नंतर समाधीमध्ये माठाचा साक्षात्कार झाला. अश्याच प्रकारे जी साकार वस्तु बाहेर आहे त्याचाच साक्षात्कार समाधीमध्ये होतो. ज्या वस्तूचा आकार नाही त्या वस्तूचा साक्षात्कार होणे अशक्य आहे. हे तुमचे खोटे ज्ञान आहे. तुम्हाला परमात्म्याचा साक्षात्कार कधीही झाला नाही. तुम्ही व्यर्थची महिमा बनवून अनुयायांना भ्रमित करून महापापाचे भागी बनून येथे कालब्रह्म च्या लोकात महाकष्ट भोगत आहात.

(परमेश्वर कबीरजी म्हणतात) हे ऋषिजन! तुम्ही सांगितले कि परमेश्वर निराकार आहे. केवळ त्याचा प्रकाशच बघितला जाऊ शकतो. हे भोळ्या प्राण्यांनो! विचार करा. जसे एखादा आंधळा व्यक्ति, दुसऱ्या अंध व्यक्तिला सूर्याविषयी खोटे ज्ञान प्राप्त करून प्रचार करतो आहे. त्याला सांगतो कि,'' सूर्य'' निराकार आहे. त्याचा केवळ प्रकाशच बघितला जाऊ शकतो. त्या अंध व्यक्तिला विचारा कि सूर्याशिवाय कसला प्रकाश. तुम्ही सूर्याला निराकार सांगत आहात. त्याचा प्रकाश बघितल्याचा प्रचार करत आहात का खोटे भाषण करत आहात? ठीक अश्याच प्रकारे वेदज्ञानाला तत्वांनिशी समजण्याचा खोटा दावा करणारे वेदज्ञानहीन ऋषि व महर्षि यांची दशा आहे. तुम्हाला ना वेदांचे पूर्ण ज्ञान आहे ना तुमची भक्ति-विधी शास्त्रानुकूल आहे. तुम्ही महादोषास पात्र आहात. तुम्हाला घोर नरकात टाकले जाईल. पृथ्वी लोकात तुम्हाला एक परमज्ञानी मानून तुमचे शेकडो शिष्य तुमच्याकडून घेतलेल्या खोट्या ज्ञांनाचा प्रचार करून लाखो भोळ्या आत्म्याणा काल जाळ्यात फसवत आहेत. तुम्हाला ऋषि व महर्षि मानून तुमच्या मुर्ती स्थापन केल्या जातील. काही धूर्त व्यक्ति तेथे मंदिर वगैरे बनवून स्वत:चा स्वार्थ सिद्ध करतील. हा सर्व दोष सुद्धा बरेच वर्षापर्यंत तुम्हाला प्राप्त होईल. भोळी जनता तुमच्या सारख्या अज्ञानिना महर्षि समजून तुमच्या नावाने बऱ्याच संस्था चालवतील तसेच तुम्ही रचना केलेल्या स्वत:च्या अनुभवाना पुस्तक रूपात बनवून लोकामध्ये विकून, धन कमवून स्वत:चा परिवाराचे पोषण करतील व मौज-मजेत त्या धनाचा खर्च करतील. तुमच्या द्वारे रचलेले वेद ज्ञान विरुद्ध पुस्तकामुळे लाखो व्यक्ति व्यर्थ ज्ञानास ग्रहण करून नरकात पडतील. तो दोष देखील तुमच्याच माथी लागेल. पृथ्वीवर तुमची जय जयकार करत असतील व स्वत: तुम्ही ह्या घोर नरकात पडून आक्रोश करत राहणार. भयानक कष्टामुळे आक्रोश करत रडत राहणार. पृथ्वीवर झालेली तुमची महिमा तुमच्या काय कामाची?

हे धर्मदास! माझ्या या तत्वज्ञानरूपी कडू सत्याशी परिचित होवून ते नकली गुरु ऋषि महर्षि आपले कर्म आठवून भीतीने थरथर कापू लागले. कारण कि तेथे त्यांना प्रत्यक्ष प्रमाण मिळाले. मी त्यांना म्हणालो कि हे सत्य मी अथवा मी पाठवलेला माझा अंश याने तुम्हाला पृथ्वीवर तुमच्या शिष्यासमोर सांगितले असते तर तुम्ही व तुमचे शिष्य मला व माझ्या अंश संतास मारण्यास तयार झाले असते. आम्हाला संत व ऋषिचे निंदक म्हणून जनतेमध्ये बदनाम करून आमची एक गोष्ट ऐकली नसती. सर्व नकली ऋषि-महर्षि तसेच गुरु व त्यांच्या सोबत तेथे उपस्थित असलेले त्यांचे अनुयायी यांनी एका स्वरात म्हटले! आपण सत्य बोलत आहात. तेथे तर आम्ही आमच्या ज्ञानास सर्वोच्च समजत होतो. हे परमेश्वर तुम्ही आमचे डोळे उघडलेत!

परमेश्वर कबीरदेव म्हणाले हे धर्मदास! मी त्या नकली महर्षिना म्हटले तुम्ही सांगितले आहे कि वेदामध्ये परमेश्वरला निराकार म्हटले आहे. तुमची ही गोष्ट सुद्धा खोटी आहे. कारण कि वेदामध्ये माझ्याविषयी म्हटले आहे कि परमेश्वर सशरीर आहे. तोच परमात्मा अन्य शरीर धारण करून अतिथि सारखा काही वेळ या कालब्रह्म च्या लोकात येत असतो. त्यावेळी अज्ञान निद्रेत झोपलेल्या प्राण्यांना तत्वज्ञान प्रदान करतात. प्रमाण :- यजुर्वेद अध्याय ५ श्लोक १ मध्ये अध्याय १ श्लोक १५ मध्ये तसेच ऋग्वेद मंडल न.९ सूक्त ९६ मंत्र १७-२० मध्ये आहे.

{परमेश्वर कबीरजी तप्त-शिलेवर झालेला संवादद्वारे आपली प्रिय आत्मा भक्त धर्मदास यांनाही तत्वज्ञानाशी परिचित करत होते. हीच तत्वज्ञानाची अमृतवाणी धर्मदासजीनी लिपीबद्ध केली जी पाचवा वेद अर्थात कबीर सागर नावाने प्रसिद्ध आहे.}

**परमेश्वर कबीरजी म्हणाले हे धर्मदास! माझ्याद्वारे सांगितलेले वेदाचे मंत्र ऐकल्याबरोबर त्या नकली ऋषिंना आठवण झाली आणि म्हणाले कि तुम्ही सत्य सांगत आहात मालीक! वेदात असेच लिहिले आहे. आम्ही वाचत होतो परंतु आमची बुद्धि कालब्रह्म ने बांधून ठेवली होती. आम्ही समजू शकलो नाही. केवळ लोकवेद (बोलले ऐकलेले ज्ञान जे वेदाविरुद्ध होते त्यालाच) ऐकवत होते.** {गीता अध्याय १० श्लोक ९ ते ११ मध्ये प्रमाण आहे ज्यात म्हटले आहे कि जो माझ्यावर काल ब्रह्म वर आश्रित आहे त्यांना मी असेच ज्ञान देतो. ते आपसात विचार करून माझ्याच गुणाचे ज्ञान करतात आणि करवतात ज्यामुळे ते माझ्यातच रममान होतात. त्या माझ्यामध्ये आश्रित श्रधाळूंना मी (कालब्रह्म) असे ज्ञान देतो कि ज्यामुळे ते मलाच प्राप्त होतात. अर्थात काल जाळात फसून राहतात. त्यांच्यावर अनुग्रह करण्यासाठी मी स्वत: त्यांना ते ज्ञान देत असतो. ज्यामुळे ते मलाच प्राप्त होतात.}

**(कबीर सागर वाणी) कबीरजीचा जीवांशी संवाद :-**

बहु विधि जीवन कीन्ह पुकारा, काल देत है कष्ट अपारा।।
यम का कष्ट सहा नहीं जाई, हे सतगुरु होहुँ सहाई।।
आए जहाँ यम जीव सतावै, काल निरंजन जीव नचावै।।
चटक-पटक करे जीव तहँ भाई, ठाढे भया पुनि तहाँ मैं जाई।।
मोहि देख जीव कीन्ह पुकारा, हे साहिब हमों लेहु उबारा।।
तब हम सत्य शब्द गुहरावा, पुरुष शबद से जीव तपत बुझावा।।
यम ते छुड़ाव लेव तुम स्वामी, दया करो प्रभु अन्तर यामि।।

**भावार्थ :- वरील वाणीमध्ये तप्तशिलेवर कष्ट भोगणाऱ्या प्राण्यांनी परम शक्तीला कष्ट निवारण करण्याची प्रार्थना केली तेव्हा मी (कबीर परमेश्वर) त्या तप्तशिलेजवळ प्रकट झालो. आपल्या शक्तीने तप्तशिलेच्या गर्मीला शांत केले. सर्व प्राण्यांनी तत्वज्ञान समजल्यावर मला (कबीर परमेश्वरास) प्रार्थना केली कि कालाच्या जाळातून सोडवावे.**

तब मै कहा जीवन समझाई, जोर करूं तो वचन नसाई।।

**भावार्थ :- कबीर परमेश्वर सांगत आहेत कि तेव्हा मी त्या प्राण्यांना म्हणालो कि मी बळपुर्वक तुम्हाला कालापासून सोडवू शकतो. परंतु मी त्यास वचन दिले आहे कि बळपूर्वक जीवांना घेऊन जाणार नाही कारण कि मीच तुम्हाला तुमच्या इच्छेने काललोकात येण्याची आज्ञा देऊन ठेवली होती. तसेच म्हटले होते कि तुम्ही येथे (सतलोकात) स्वइच्छेने येण्याची प्रार्थना कराल तेव्हाच तुम्हाला पुन्हा भक्तिशक्तीने युक्त करून सतलोकी घेऊन जाणार.**

जब तुम जाय धरो जग देहा, तब तुम करिहौ शब्द स्नेहा।।
पुरुष नाम सुमिरन सहिदाना, बीरा सार गहो प्रवाना।।
देह धरो सत्य शब्द समाई, तब हम सतलोक ले जाई।।
जहाँ आशा तहाँ बासा होई, मन कर्म वचन सुमिरै जोई।।

**भावार्थ :- परमेश्वर कबीर जी म्हणतात कि हे मनुष्य प्राण्यानो! जेव्हा तुम्ही संसारात मानव शरीर प्राप्त कराल तेव्हा माझ्या पूर्ण संताकडून संपूर्ण मंत्र (सतनाम व सारशब्द) प्राप्त करून मनापासून भक्ति करा. तेव्हा तुम्ही मानव शरीर प्राप्त करून, सत्य भक्ति साधना (तिन्ही मंत्राचा ओम्, तत्, सत्) चा जाप कराल ती सुद्धा अंतिम श्वासापर्यत तेव्हा मी तुम्हाला सतलोकात घेऊन जाईल. आपण जेव्हा अनन्य मन वचन कर्म भावाने माझ्यात (कबीर परमेश्वर) ऋदयापासून आसक्त होणार जेव्हा खरी आकांशा सतलोकात जाण्याची होईल त्या तळमळीच्या आधाराने आपण सतलोकी निवास करणार. कारण कि जिथे जाण्याची खरी**

तळमळ होते. साधक अंतिम समयी त्याच परमेश्वरास प्राप्त करतो.

।।चौपाई।।

कहे जीव सुन पुरुष पुराना, देह धरी बिसरो नहीं ज्ञाना।।
पुरुष जानि सुमिरा जमराई, बेद पुरान कहे समुझाई।।
बेद पुरान कहे मति येहा, निराकार से किजै नेहा।।
सुर नर मुनिजन तैंतीस करोड़ि, बंधे सब निरंजन डोरि।।
ताके मते कीन्ह हम आशा, अब मोहि चीन्ह परा यम फांसा।।

भावार्थ :– सर्व प्राण्यांनी म्हटले कि हे आदि पुरुष परमेश्वर! जेव्हा केव्हा आम्हाला मानव शरीर प्राप्त होईल आपल्या या तत्वज्ञानास आम्ही नाही विसरणार. आम्ही तर कालब्रह्म (क्षर पुरुष) यालाच परमेश्वर मानून पूजा करत होतो. आम्ही वेदांना ज्याप्रकारे समजत होतो त्या लोक वेदाच्या आधारे तसेच पुराणाच्या ज्ञानाच्या आधारे कालाची पुजा पूर्ण परमात्मा समजून करत होतो. आम्हीच नाही तर तेतीस करोड देवता ८८ हजार ऋषि इत्यादि व अन्य साधक हे देखील काल ब्रह्मास पूर्ण परमात्मा समजून साधना करून काल ब्रह्मच्या दोरीत बांधलेले आहेत म्हणजेच ते सुद्धा कालाच्या जाळ्यात फसलेले आहेत. जन्म मृत्युचे कुचक्र त्यांचेवरही चालू राहील.

सुनो जीव यह छल यम केरा, यह यम फंदा किन्ह घणेरा।।

।।छन्द।।

काल कला अनेक कीन्हो, जीव कारण ठाट हो।
बेद शास्त्रा पुरान स्मृति, अन्त रोकै बाट हो।।
सोरठा – जीव पड़े बस कालके, काल कराल प्रचण्ड।
सतनाम चिन्हे बिना, जन्म जन्म भव दण्ड।।

भावार्थ :– कबीर परमेश्वरानी म्हटले कि हे प्राण्यानो! ऐका. हा सर्व छळ कालब्रह्मने तुम्हा सर्व प्राण्यांना आपल्या जाळ्यात फसवण्यासाठी केला आहे. हे चारही वेदाचे (ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद अथर्व वेद) ज्ञान अपूर्ण आहे. कारण कि पूर्ण ज्ञान फक्त तत्वदर्शी संतच सांगू शकतात जे पूर्ण मोक्ष दायक आहे. पुराणे तसेच इतर स्मृति सहा शास्त्राचे ज्ञान हे त्या देवता ऋषिचे अनुभव आहेत जे स्वत: वेद ज्ञानाशी परिचित नाहीत. त्यामुळे तत्वज्ञानाच्या आधारे सतनामाच्या जपानेच (स्मरण) पूर्ण मोक्ष संभव आहे. नाही तर सदा जन्म मरणाचे कष्ट भोगावेच लागणार.

## ''परमेश्वर कबीरजींचे कालब्रह्म बरोबर विवाद करणे.''

हे धर्मदास! कालब्रह्म आपला आहार करण्यासाठी जेव्हा तप्तशिलेकडे निघाला. तेव्हा मी या सर्व प्राण्यांना म्हटले बघा! तो येतो आहे कालब्रह्म साकार आहे, त्याला तुम्ही निराकार म्हणत होते तेजोमय शरीर छोटा माथा लांब दात भीतीदायक चेहरा आहे. हे प्राण्यांनो! आता तुम्ही जा. एव्हडे म्हणताच सर्व प्राणी जे तप्तशिलेवर उपस्थित होते आकाशात उडाले व धर्मराजाच्या दरबारात आले. तिथून त्यांना कर्म आधारावर स्वर्ग नरक किंवा एखाद्या प्राण्याच्या शरीरात पाठवले जाते.

हे धर्मदास! जेव्हा कालब्रह्म (ज्योति निरंजन) तप्त शिलेजवळ आला यावेळेस त्याला माझे स्वरूप माझा एक पुत्र योग संतायन उर्फ योगजीत सारखे दिसू लागले. त्याच्या रूपात मी

त्याला सतलोकातून हाकलून लावले होते व मला योगजीत समजून रागाने म्हणाला, हे योगजीत! येथे माझ्या लोकात माझ्या समंती शिवाय कशासाठी आला आहेस. आज मी तुला मारून तुझी जीवन लिला समाप्त करतो. तू मला त्यावेळेस सतलोकातून धक्के मारून हाकलून लावले होते. मी तुझी त्या वेळेस खूप विनवणी केली होती कि सतलोकातून मला काढू नकोस. परंतु त्यावेळेस माझे एक ऐकले नाहीस. तू पिताजीचा (सत्यपुरुषाचा) एखादा आदेश घेऊन आला आहेस का? तो मला सांग. त्यानंतर तू युद्धास तयार हो. (मी ओळखले होते कि, हे धर्मदास! तो मला योगजीत समजत होता. त्यामुळे मी योगजितच्या भूमिकेतच त्याला हे शब्द बोललो) मी म्हटले, हे काल निरंजन! मला पिताजींनी म्हणजेच सत्पुरुषांनी पाठवले आहे. तुझ्या लोकात सर्व आत्मे महाकष्ट भोगत आहेत. त्यांची हाक त्या परमेश्वरांनी ऐकली आहे. आता मी तुझ्या खालच्या ब्रह्मांडात जाईल. तुझ्याद्वारे सांगितलेला लोकवेद (व्यर्थ ज्ञान) उघडकीस आणेल व तत्वज्ञानाद्वारे सर्व प्राण्यांना पूर्ण परमात्म्याचे ज्ञान करून त्यांना सत्य साधना प्राप्त करवेल ज्यामुळे सर्व मानव प्राणी सत्य साधना करून आपल्या आधीच्या स्थानी सतलोकात जातील.

हे धर्मदास! माझे बोलणे ऐकून कालब्रह्म अत्यंत क्रोधित झाला व मला मारण्याच्या उद्देशाने माझ्यावर हल्ला केला. मी त्यावेळी सतनामाचे स्मरण (जप) केले. त्याच्या प्रभावाने हा कालब्रह्म खाली पाताळलोकात जाऊन पडला. भीतीने थरथर कापू लागला. त्याची अवस्था अशी झाली कि एखाद्या पक्ष्याचे पंख तुटल्यामुळे जमिनीवर पडून फडफडतो परंतु उडू शकत नाही. मी देखील त्याच्या सोबत पाताळ लोकात जाऊन पोहचलो. कालब्रह्म ने ओळखले कि योगजीत जवळ शक्तीशाली सिद्धी आहे. याला माझ्या कडून मारले जाऊ शकत नाही. त्यावेळेस त्याने (कालब्रह्म) स्वत:चा स्वार्थ साधण्यासाठी युक्ति केली. तो म्हणाला कि हे योगजीत! तुम्ही माझे मोठे भाऊ आहात. मी तुमचा लहान भाऊ आहे. लहान तर खोड्या करतच असतात. परंतु मोठ्याचे मोठेपण माफ करण्यातच असते. मला माफी करावे. हे म्हणतच काल ब्रह्म घसरत घसरत माझ्याजवळ आला व माझे पाय पकडून कळवळून माफी मागू लागला. मी त्याला घेऊन २१ व्या ब्रह्मांडात तप्त शिलेजवळ आलो. मी म्हटले हे काल निरंजन! मी तुला माफ केले आहे. माझे पाय सोड. मला खालच्या लोकात जायचे आहे व सर्व आत्म्याना तुझ्या जाळ्यातून मुक्त करायचे आहे.

काल ब्रह्म (ज्योति निरंजन) म्हणाला हे मोठे बंधु! मी आपल्याला वडिलांच्या समान मानतो. तुम्ही मला काही वरदान दयावेत. ज्यामुळे माझ्या लोकातील काही कमतरता दूर करता येतील. नंतर अवश्य तुम्ही खालच्या लोकात जावे. मी म्हटले माग! काय मागायचे आहे. कालब्रह्म म्हणाला आपण वचनबद्ध व्हावे तेव्हा मागेल. मी म्हटले मी वचनबद्ध झालो. माग काय मागायचे ते?

काल ब्रह्म म्हणाला १. तीन युगात (सतयुग, त्रेतायुग आणि द्वापरयुग) थोडे जीव घेऊन जावेत. चौथ्या युगात (कलियुगात) तुम्ही अधिक जीव मुक्त करावेत. एक लाख मानव प्राणी नित्य खायचा शाप मला पिताजीने दिलेला आहे. जर तुम्ही सर्व जीव एकदाच नेले तर मी उपाशी मरेल. २. मी तुमचे रूप धारण करू शकावे. ३. जे आत्मे तुमचे ज्ञान समजून तुमचा भक्ति मार्ग स्वीकार करतील व आजीवन साधना करतील ते तुमच्या लोकात जातील. ज्या आत्म्याचे नाम खंडित होऊन म्हणजे तुमच्या भक्ति मार्ग त्यागून माझी भक्ति करेल, व तसेच जे तुमचा मार्ग स्वीकारणार नाहीत, ते सर्व प्राणी माझ्या लोकात रहावेत. ४. त्रेतायुगात माझा अंश विष्णु अवतार रामचंद्राची समुद्रावर पूल बनवण्यास मदत करावी. ५. द्वापरयुगात माझा

अंश अवतार कृष्ण रूपात जाईल. तो एक जगन्नाथ नावाने मंदिर बनवेल. परंतु समुद्र त्याला तोडून टाकणार. तुम्ही त्या मंदिराचे समुद्रापासून रक्षण करावे. हे सर्व वर मला प्रदान करावेत व नंतर खालच्या लोकात जावे व वडिलांच्या आज्ञाचे पालन करावे. मी काल ब्रह्म यास म्हणालो हे ज्योति निरंजन! जे सर्व वर तू मागितलेस ते सर्व वर मी तुला दिले (तथा अस्तु).

हे धर्मदास! या स्वार्थीने लगेच माझे पाय सोडले व म्हणाला हे जोगजीत! आपण कोणत्या नामजपाने भक्ति करून घेणार? ते मला सांगावे. कारण कि मी या आत्म्याना सतलोकात जाऊ देईल. ज्यांच्या जवळ तुमचा मंत्र जप असेल मी त्यांना सोडून देईल. हे धर्मदास! काळाने माझ्याशी कपट करण्याची ईच्छा ठेवली कि सतनाम व सारनाम जाणून ते स्वत:च्या दुताना (संदेश वाहक गुरुंना) दयावे. त्यांच्या द्वारे सांगीतलेल्या या सारनामाने साधकास कसला ही लाभ मिळाला नसता. तसेच जेव्हा मी व माझा अंश आत्म्याने हेच मंत्र जप दिल्याने सर्व मनुष्य प्राणी म्हणाले असते कि हा मंत्र तर आमच्या गुरुदेवांनी दिलेला आहे. तुम्ही काय नवीन सांगत आहात. हे धर्मदास! हा तर महा धोका झाला असता. त्यामुळे मी काल ब्रह्म यास म्हणालो कि मी तुझी चालबाजी समजून गेलो आहे. मी तुला ते सारनाम व सारज्ञान (तत्वज्ञान) सांगणार नाही. ज्या मनुष्य प्राण्याजवळ माझ्या द्वारे सांगितलेले सारनाम असेल त्यांच्या जवळ तू जाऊ शकणार नाहीस. त्याला तू रोकू शकणार नाहीस. तो तुझ्या डोक्यावर पाय ठेवून त्या सारनामाच्या भक्तीच्या शक्तीने सतलोकात चालला जाईल.

हे धर्मदास! तेव्हा काल ब्रह्म हसत म्हणाला हे सहजदास! (हे धर्मदास! काल ब्रह्म यास मी माझ्या पूत्राचे वेगवेगळे रूप दाखवत होतो. तो कधी मला योगजीत समजत होता. तर कधी त्याला वाटे कि हा सहजदास आहे. कधी त्याला वाटे कि ज्ञानी आहे. हे सर्व नावे त्या १६ पुत्रांचे आहेत जे सतलोकात आहेत जे सृष्टिच्या आधी आपल्या वचन शक्तीने उत्पन्न केले होते. कृपया हे सृष्टि रचना प्रकरणात वाचावे.) आपण खालील संसारात जाऊ शकता. मी सर्व जीवांना लोकवेदावर आधारित करून ठेवले आहे. मी आपल्या ऋषिना व महर्षिना शास्त्राच्या विपरीत ज्ञान प्रदान करून ठेवले आहे आणि ते सांगतात कि आम्ही वेदाच्या अनुसार ज्ञान देतो. परंतु त्याचे लोकवेद ज्ञान शास्त्रावर आधारित नाही. त्या ऋषिना परमज्ञानी समजून त्यांच्या ज्ञानावर अतिदृढतेने साधना करू लागले. ते म्हणतात कि पूर्ण परमात्म्याची भक्ति करा. तीच मोक्ष दायक आहे. परंतु साधना विधी मात्र माझ्या (कालब्रह्म) जाळ्यात फसून राहण्याचीच सांगतात. ज्यामुळे सर्व साधक व ऋषिजन माझ्या फासात उलझुन राहतात. कलियुगात मी अनेक धर्म बनवून त्यांना आपसात भांडवेल. त्यातच ते मरत राहतील. दुसऱ्या कोणत्याही संताच्या किंवा गुरुच्या ज्ञानाचा ते स्वीकार करणार नाहीत. कलियुगात भूतांची, प्रेतांची पूजा, भैरव, काली देवी व इतर देवांची पूजा तसेच तीर्थ, व्रत, इत्यादि करण्यातच ही सर्व प्रजा, यालाच मोक्ष समजतील. मंदिर पूजा, समाधी पूजा, मूर्ति पूजा अथवा मृत्युला प्राप्त झालेल्या गुरुच्या धामाची पूजा तसेच पित्राची पूजा(श्राद्ध करणे, पिंडदान करणे) इत्यादि करण्यावरच या साधकांना दृढ करून टाकीन. श्री विष्णु अवतार, राम व कृष्ण तसेच शिवजी यांना पूर्ण परमात्मा समजून, आणि तिन्ही गुण (रजोगुण ब्रह्मा, सतोगून विष्णु, तमोगुण शिव जी) पूजण्यातच ते स्वत:चे कल्याण मानतील. या तिन्ही गुणात विशेषत: विष्णु व शिव यांना सर्वेश्वर, महेश्वर, अजर, अमर समजतात. त्यांचे कुणी माता–पिता नाहीत. हेच पूजेच्या योग्य आहेत. यांच्या व्यतिरिक्त कोणताही देव पूजनीय नाही. सर्व हिन्दू समाजाला कलयुगात अश्या ज्ञानावर दृढ करण्यात येईल.

ज्यावेळेस आपण किंवा आपला कोणी संदेशवाहक कलियुगात सारज्ञान म्हणजेच

**तत्वज्ञान देण्याची ईच्छा करेल व वरील साधनांना व्यर्थ सांगेल तसेच विष्णुजी व शिवजी यांच्यावर कोणी दुसऱ्याच परमेश्वराचे ज्ञान सांगेल तेव्हा आपण अथवा आपला अंश (संत) बोलण्यावर कोणीही विश्वास ठेवणार नाही. याउलट त्यांची निंदा होईल व तुमच्या सोबत माझे संत (दूत) भांडण करतील. तसेच लोकांना तुमचे विरोधक व शत्रू बनवतील. तुम्ही माझ्याद्वारे रचलेल्या चक्रव्यूहाला तोडू शकणार नाहीत. रिकाम्या हाताने मागे येणार आणि ऐकून घे सहजदास! तू परमेश्वराच्या नावाने एक पंथ चालवशील तर मी तुझ्या पंथासारखे बारा पंथ चालवेल. त्या बारा पंथात माझ्या दुताद्वारे नाम उपदेश दिला जाईल. ते महिमा तर तुमच्या ज्ञानानुसार (कबीर सागर व इतर संताच्या मिळत्याजुळत्या वाणींनुसार) सांगतील पण नाम चुकीचे देतील. त्यामुळे ते सर्व माझ्याच जाळ्यात फसून राहतील. अशा प्रकारे मी सर्व जीवांना भ्रमीत करून मुक्त होऊ देणार नाही.**

**वरील उल्लेख खालील वाणीचा सारांश आहे:-**

**।।कबीर वचन।।**

**चौपाई =** धर्मदास जो पूछो मोहि, युग-२ कथा कहो मैं तोहि।
जबही पुरुष आज्ञा कीन्हा, जीवन काज पृथ्वी पग दीन्हा।।
करि प्रणाम तबही पगुधारा, पहुंचे जाय धर्म दरबारा।
प्रथम चले जीव के काजा, पुरुष प्रताप शीश पर छाजा।।
आवत मिले धर्म अन्याई, तिन पुनि हम से रार बढ़ाई।
मो कुँ देख धर्म ठीग आवा, महा क्रोध बोले अतुरावा।।

**।।काल ब्रह्म वचन ।।**

योग जीत इहवां कस आवो, सो तुम हमसो वचन सुनाओ।
कै तुम हमको मारन आओ, पुरुष वचन सो मोहि सुनाओ।।

**।।कबीर वचन।।**

तासो कहयो सुनो धर्मराई, जीव काज संसार सिंधाई।
जीवन कह तुम बहुत भुलावा, बार-बार जीवन सतावा।।
पुरुष भेद तुम गुप्त राखा, अपनी महिमा प्रकट भाखा।
तपत शिला पर जीव जरावहु, जारि वारि निजस्वाद करावहु।।
तुम अस कष्ट जीवन कहै दीन्हा, ताते पुरुष मोहि आज्ञा दीन्हा।
जीव चिताय लोक ले जाऊँ, काल कष्ट से जीव बचाऊँ।।
ताते हम संसार ही जायब, दे प्रवाना लोक पठायब।
यह सुनी काल भयंकर भयऊ, हम कह त्रास दिखान लयऊ।।

**।।धर्मराय (काल ब्रह्म) वचन।।**

सत्तर-२ युग हम सेवा कीन्ही, राज बड़ाई पुरुष मोहि दीन्ही।
फिर चौसठ युग सेवा ठयऊ, अष्ट खंड पुरुष महि दयऊ।।
तब तुम मारि निकारे मोहि, जोगजीत नहीं छोडु तोहि।

**।।सतगुरू कबीर वचन।।**

तब हम कहयो सुनो धर्मराया, हम तुम्हरे डर नहीं डराया।
हम कंह तेज पुरुष बल आही, अरे काल तव डर मोहि नाहि।।

पुरुष प्रताप सुमिरा तिहि बारा, शब्द अंगते कालहि सारा।
ततक्षण दृष्टि ताहि पर हेरा, श्याम ललाट भयो तिहि केरा।।
पंख घात जस होय पखेरु, ऐसे काल महि पर हेरु।
करे क्रोध कछु नाहीं बसाई, तब पुनि परेऊ चरणन तर आई।।

**।।निरंजन (काल ब्रह्म) वचन।।**

कह निरंजन सुनो ज्ञानी, करो विनती तोहि सो।
जान बंधु विरोध किन्हो, घाट भई अब मोहि सो।।
पुरुष सम अब तोहि जानो, नहीं दूजी भावना।
तुम बड़े सर्वज्ञ साहिब, क्षमा छत्रा तनावना।।
तुम हुँ करो बखसीश, पुरुष दीन्ह जस राज हम।
षोढ़स में तुम ईश, ज्ञानी पुरुष सो एक सम।।

**।।चौपाई।।**

धर्मराय अस विनती ठानी, मैं सेवक द्वितिय नहीं जानी।
दयावंत तुम साहिब दाता, एतिक कृपा करो हे ताता।
पुरुष शाप मो कंह अस दीन्हा, लख जीव नित ग्रासन कीनहा।।
जो जीव सकल लोक तुम आवे, तो कैसे क्षुद्या मोरि बुतावे।
ज्ञानी विनती एक हमारा, सो न करहुँ जिहि मोर बिगाड़ा।।
पुरुष दीन्ह जस मो कहँ राजू, तुम भी देहु तो होय काजु।
अब हम वचन तुम्हारा मानी, लीजो हंसा हम सो ज्ञानी।।
विनती एक करो तो सो ताता, वचन बंध मानो हमरी बाता।
सतयुग त्रोता द्वापर माही, तीनों युग जीव थोड़े जाही।।
चौथा युग जब कलियुग आवै, तब-त्व शरण जीव बहु जावै।
ऐसा वचन हरि मोहि दीजै, तब संसार गमन तुम कीजै।।

**।।कबीर वचन।।**

विनती तोर लीन्ह मैं जानी, मोकह ठगे काल अभिमानी।
जस विनती तू मो संग कीन्ही, सो अब बकस तोहि मैं दीन्ही।।
चौथा युग जब कलियुग आवै, तब हम अपना अंश पठावैं।
जिहि परवाना देह है, सत्यशब्द दे हाथ।
सो जीव यम नहिं पाय है, सदा ताहि हम साथ।।

**।। निरंजन (काल) वचन।।**

संधि छाप मोहि दीजे ज्ञानी, जस देहो हंस हि सहिदानी।।
जो जीव मोकहु संधि बतावे, ताके निकट काल नहीं आवै।।
नाम निशानी मो कह दीजे, हे साहिब यह दाया कीजै।।

**।।सतगुरू कबीर वचन।।**

जो तोहि देहुं संधि लखाई, जीवन काज होई हो दुख दाई।
तव परपंच ज्ञान हम पावा, काल चलै नहीं तुम्हारा दावा।
धर्मराय तोहि प्रकट भाखा, गुप्त अंक बीड़ा हम राखा।

जो कोई लैह नाम हमारा, ताहि छोड़ तुम होहु नियारा।
जो तुम हंस ही रोको जाई, तो तुम काल रहन नहीं पाई।।

**।।धर्मराय (काल ब्रह्म) वचन।।**

हे साहिब तुम पंथ चलाओ, जीव उबार लोक ले जाऊँ।
पंथ एक तुम आप चलओ, जीवन लै सतलोक पठाओ।।
द्वादस पंथ करो मैं साजा, नाम तुम्हारा ले करो अवाजा।
द्वादस यम संसार पठहो, नाम तुम्हारे पंथ चलैहो।।
प्रथम दूत मम प्रगटे जाई, पीछे अंश तुम्हारा आई।।
यही विधि जीवनको भ्रमाऊं, पुरुष नाम जीवन समझाऊं।।
द्वादस पंथ नाम जो लैहे, सो हमरे मुख आन समै है।।
कहा तुम्हारा जीव नहीं माने, हमारी ओर होय बाद बखानै।।
और अनेक पंथ चलाऊं, वासे भ्रमित ज्ञान फैलाऊं।।
मैं दृढ़ फंदा रची बनाई, जामें जीव रहे उरझाई।।
देवल देव पाषान पूजाई, तीर्थ व्रत जप-तप मन लाई।।
यज्ञ होम अरू नेम अचारा, और अनेक फंद में डारा।।
जो ज्ञानी जेहो संसारा, जीव न मानै कहा तुम्हारा।।

**(सतगुरू कबीर वचन)**

ज्ञानी कहे सुनो अन्याई, काटों फंद जीव ले जाई।।
जेतिक फंद तुम रचे विचारी, तत्व ज्ञान तै सबै बिंडारी।।
जौन जीव हम शब्द दृढावै, फंद तुम्हारा सकल मुकावै।।
निश्चय कर प्रवाना पाई, पुरुष नाम तिहि देऊ चिन्हाई।।
ताके निकट काल नही आवै, संधि देखी ताकहं सिर नावै।।

**।।छन्द।।**

जो मेटि डारों तोहि को, अब पलटि कला दिखलाऊँ।
लै जीव बंद छोड़ाय यम सो, अमर लोक सिधावऊँ।।
यह सोच चित्त कीन्हेऊं, पुरुष वचन अस नाही।
सत्य शब्द दृढ़ जो गहे, ले पहुचाऊँ ताहि।।

**।।धर्मराय (काल ब्रह्म) वचन।।**

कह धर्मराय जाओ संसारा, आनहु जीव नाम आधारा।
जो हंसा तुमरो गुण गाई, ताहि निकट तो हम नहीं आई।
जो कोई जै है शरण तुम्हारा, हम सिर पग दै होवे पारा।
हमतो तुम संग किन्ही ढिठाई, पिता जान कीन्ही लरिकाई।
कोटिन अवगुन बालक करई, पिता एक हृदय नहीं धरई।
जो पितु बालक देही निकारी, तब को रक्षा करै हमारी।

**।।ज्ञानी वचन (कबीर वचन)।।**

धर्मराय उठ शीश निवायो, तब हम संसार सिधायो।
जब हम देखा धर्म सकाना, तब तहवां से कीन्ह पयाना।

कह कबीर सुनि धर्मनिनागर, तब मैं चली आयऊ भौसागर।
आये चतुरानन के पासा, तासो कीन्हा शब्द प्रकाशा।
वाको मैं अपना नाम जनाया, अग्नि ऋषि नाम बताया।
ब्रह्मा चित्त दै सुनवे लीन्हा, पूछो बहुत पुरुष का चिन्हा।
ब्रह्मा मोहे सतगुरू कह टेरा, अग्नि ज्ञान अद्वित है तेरा।
प्रथम मन्त्रा ब्रह्मा लीन्हा, तब वहां ते गवन मैं किन्हा।
तब ही निरंजन कीन्ही उपाई, ज्येष्ठ पुत्र ब्रह्मा मोर जाई।
निरंजन मन घट आन विराजै, ब्रह्मा बुद्धि फेरि उपराजै।।

**हे धर्मदास! काल ब्रह्म चे वरील व्यक्त वचन ऐकून मी म्हणालो हे ज्योति निरंजन! तू महा पापी आहेस म्हणून तू भोळ्या आत्म्याशी महाविश्वासघात करत आहेस. मी तुझे सर्व डावपेच निष्क्रिय करून टाकेल. मी कलियुगात जेव्हा प्रकट होईल त्यावेळेस ज्ञानाचा प्रचार करून येईल परंतु सारनाम व सारज्ञान गुप्तच ठेविल. ते सारनाम व सारज्ञान माझ्या द्वारे दिलेल्या ज्ञानात (पाचवा वेद) असेल परंतु ते बारा पंथ (जे कबीर नावाचे पंथ म्हटले जातील व तुझ्याकडून प्रेरित अन्य पंथ असतील) ह्या गुप्त ज्ञानास व सारनामास समजू शकणार नाहीत. बाराव्या पंथात (गरीबदास पंथात) माझ्या महिमेची वाणी प्रकट होईल. परंतु बाराव्या पंथासहित (गरीबदास पंथ) सर्व पंथाच्या अनुयायाकडे सारनाम व सारज्ञान नसेल. त्यामुळे त्या बारा पंथाचे अनुयायी असंख्य जन्मापर्यंत सतलोकी जाऊ शकणार नाहीत. कारण ते खूप अभिमानी असतील. मी पाठवलेल्या वंशाचे (अंशाचे) म्हणणे ते मान्य करणार नाहीत. त्यामुळे नंतर बाराव्या पंथात (गरीबदास पंथ) पुढे चालून मीच येणार. तो तेरावा अंश माझाच असेल. तो सर्व पंथाना समाप्त करून एकच पंथ चालवणार.**

**विशेष विचार :– बारा पंथांची नावे – कबीर परमेश्वर जींच्या पंथामध्ये काल द्वारा कबीर नावाने चालवलेल्या बारा पंथांचा उल्लेख पुस्तक=कबीर सागर अध्याय=कबीर चरित्र बोध (बोध सागर) पान संख्य १८७० पासुन**

**(१) नारायण दास पंथ (२) यागौदास (जागू) पंथ (३) सूरत गोपाल पंथ (४) मूल निरंजन पाठ (५) टकसार पंथ (६) भगवान दास (ब्रह्म) पंथ (७) सत्यनामी पंथ (८) कमालीय (कमाल चा) पंथ (९) राम कबीर पंथ (१0) प्रेम धाम (परम धाम) ची वाणी पंथ (११) जीवा पंथ (१२) गरीबदास पंथ.**

**इतर प्रमाण पुस्तक ''कबीर सागर'' अध्याय=कबीर वाणी पान न. १३६–१३७ वर :**

**द्वादश पंथ चलो सो भेद**

द्वादश पंथ काल फुरमाना। भुले जीव न जाय ठिकाना।।
ताते आगम कहि हम राखा। वंश हमार चूरामणि शाखा।।
प्रथम जगमें जागू भ्रमावै। बिना भेद ओ ग्रन्थ चुरावै।।
दुसरि सुरति गोपालहि होई। अक्षर जो जोग दृढ़ावे सोई।।
तिसरा मूल निरंजन बानी। लोकवेद की निर्णय ठानी।।
चौथे पंथ टकसार भेद लै आवै। नीर पवन को सन्धि बतावै।
सो ब्रह्म अभिमानी जानी। सो बहुत जीवन की करी है हानी।।
पांचौ पंथ बीज को लेखा। लोक प्रलोक कहें हममें देखा।।
पांच तत्व का मर्म दृढ़ावै। सो बीजक शुक्ल ले आवै।।

छठवां पंथ सत्यनामि प्रकाशा। घटके माहीं मार्ग निवासा।।
सातवां जीव पंथले बोले बानी। भयो प्रतीत मर्म नहिं जानी।।
आठवे राम कबीर कहावै। सतगुरु भ्रमलै जीव दृढावै।।
नौमे ज्ञानकी काल दिखावै। भई प्रतीत जीव सुख पावै।।
दसवें भेद परमधाम की बानी। साख हमारी निर्णय ठानी।।
साखी भाव प्रेम उपजावै। ब्रह्मज्ञान की राह चलावै।।
तिनमें वंश अंश अधिकारा। तिनमेंसो शब्द होय निरधारा।।
सम्वत् सत्रासै पचहतर होई, ता दिन प्रेम प्रकटै जग सोई।
साखी हमारी ले जीव समझावै, असंख्य जन्म ठोर नही पावै।
बारहवें पथ प्रकट ह्वै बानी, शब्द हमारे की निर्णय ठानी।।
अस्थिर घर का मरम न पावैं, ये बारा पंथ हमही को ध्यावैं।
बारहवें पथ हम ही चलि आवैं, सब पंथ मेटि एक ही पंथ चलावैं।

**तेराव्या वंशाकडून (अंश) सर्व पंथाना मिटवून एक पंथ चालवण्याचे प्रमाण :-**
**पुस्तक = कबीर सागर = अध्याय = कबीर वाणी पान न.= १३४**

बारहवै वंश प्रकट होय उजियारा, तेरहवें वंश मिटे सकल अंन्धियारा

**याच अध्यायात पान न.१३६ वर सुद्धा प्रमाण आहे.:-**

''द्वादश पंथ काल फरमाना, भुले जीव न जाऐं ठिकाना''

**कबीर सागर=अध्याय=कबीर बाणी (बोध सागर) मध्ये पान न. १३६-१३७ वर प्रमाण:-**

धर्म दास मेरी लाख दोहाई, मूल (सार) शब्द बाहर न जाई।।
सार शब्द बाहर जो परही, बिचली पीढ़ी हंस नहीं तरही।
तेतीस अर्ब ज्ञान हम भाखा, मूल ज्ञान गुप्त हम राखा।
मूल ज्ञान तब तक छुपाई, जब लग द्वादश पंथ मिट जाई।।

**पुस्तक=कबीर सागर=अध्याय जीव धर्म बोध (बोध सागर) पान न. १९३७ वर प्रमाण:-**

धर्मदास तोहि लाख दोहाई। सार शब्द बाहर नहिं जाई।।
सार शब्द बाहर जो परि है। बिचलै पीढी हंस नहीं तरि है।।
युगन-युगन तुम सेवा किन्ही। ता पीछे हम इहां पग दीनी।।
कोटिन जन्म भक्ति जब कीन्हा। सार शब्द तब ही पै चीन्हा।।
अंकूरी जीव होय जो कोई। सार शब्द अधिकारी सोई।।
सत्यकबीर प्रमाण बखाना। ऐसो कठिन है पद निर्वाना।।

**विशेष :- कबीर सागर पुस्तकात अध्याय ''कबीर बाणी'' पान १३४ वर प्रथम पंथाचा संचालक ''नारायण दास'' (धर्मदासजीचा मोठा पुत्र लिहिले आहे. याच अध्यायात पान न. १३६ वर मात्र प्रथम पंथाचा संचालक ''चूरामणी'' लिहिले आहे. जो धर्मादासजिचा छोटा पुत्र कबीर परमेश्वरांच्या कृपेने झाला होता). वास्तविक बारा पंथात प्रथम पंथाचा संचालक हा ''चूरामणी'' हाच आहे. कारण कि नारायण दास याने तर परमेश्वर कबीरजीचे ज्ञान स्वीकारलेच नव्हते उलट तो चूरामणीची ईर्षा करत होता. त्यामुळे ''चूरामणी'' बान्धव गढ सोडून ''कुदरमाल'' या ठिकाणी निघून गेला होता. त्यानंतर काही दिवसानंतर बांधवगढ शहर हे संपूर्ण नष्ट झाले होते. म्हणून पान न. १३४ (कबीर सागर=अध्याय=कबीर बाणी) वर लिहिलेले**

नारायणदास नाव योग्य नाही. तर त्याठिकाणी ''चूरामणी'' असणेच योग्य आहे. कारण कबीर सागर अध्याय ''कबीर बाणी'', पान न. १८७० वर लिहीलेल्या बारा पंथाच्या वर्णनात चूरामणी मिळून बारा पंथ बनतात. हा फेरबदल दामाखेडावाल्यांनी करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु सत्य मिटवू शकले नाहीत.

कबीर सागर ''कबीर बाणी'' नामक अध्याय (बोध सागर) पान न.१३४–१३८ वर लिहीलेल्या वर्णनानुसार भावार्थ आहे :–

पान न. १३४ वर बारा वंशाचे (अंशाचे) नंतर १३ वा वंश (अंश) मध्ये सर्व अज्ञान अंधार मिटेल. बारा वंश कालब्रह्म चे वंश होऊन आपली–२ चतुरता दाखवणारच. पान न. १३६–१३७ वर ''बारा पंथाचे'' वर्णन केलेले आहे व लिहिलेले आहे कि सवंत् १७७५ मध्ये प्रभूचे प्रेम प्रकट होईल व माझी वाणी प्रकट होईल. (संत गरीबदासजी महाराज छुडाणी हरियाणा यांचा जन्म सवंत् १७७४ मध्ये झाला आहे. त्यांना परमेश्वर कबीरजी १७८४ मध्ये भेटले होते. येथे यांचेच वर्णन आहे व सवंत १७७५ च्या स्थानी १७७४ असायला हवे परंतु चुकीने १७७५ लिहिलेले आहे.) भावार्थ हाच आहे कि बारावा पंथ जो गरीबदास जींचा चालेल जो माझी (कबीर जीची) महिमा जीवांना समजवणार. परंतु वास्तविक मंत्र व सार ज्ञानापासून अपरिचित असल्या कारणाने त्या बारा पंथाचे ते साधक असंख्य जन्म सतलोकात जाऊ शकणार नाहीत. वरील व्यक्त १२ पंथ मलाच प्रमाण समजून भक्ति करतील परंतु शाश्वत स्थानी (सतलोक) म्हणजे मोक्ष प्राप्त करू शकणार नाहीत. या बाराव्या पंथात (गरीबदास जीचा पंथ) पुढे चालून मीच (कबीर जी) स्वत: येणार व सर्व बारा पंथाना मिटवून एकच पंथ चालवेल. त्या वेळे पर्यंत सार ज्ञान व सारशब्द गुप्तच ठेवायचा आहे. हेच प्रमाण संत गरीबदास जी महाराजांनी आपली अमृतवाणी ''असुर निकंन्दन रमैणी'' मध्ये दिली आहे, कि ''सदगुरु दिल्ली मंडल आयसी, सूती धरती सूम जगायसी'' जुना रोहतक जिल्हा हा दिल्ली मंडल म्हणून ओळखला जातो जो आधी इंग्रजाच्या शासन काळात केंद्राच्या अधीन होता.

## संत गरीबदासजी म्हणजे बाराव्या पंथात भक्तीची झलक

संत गरीबदास जी महाराज (छुडानी वाले) यांना जे तत्वज्ञान परमेश्वर कबीर जीनी सांगितले होते तसेच वरील सर्व ब्रह्मांडांना डोळ्यांनी दाखवले होते, त्यांच्या विषया मध्ये संत गरीबदास जींनी जवळपास दोन हजार चारशे (२४००) अमृतवाण्या बोलल्या ज्या लिहीलेल्या गेलेल्या होत्या. त्यांना वर्तमाना मध्ये ग्रंथ रुपात प्रिंट केले गेले आहे. अगोदर हातांनी लिहलेल्या होत्या. ह्या अमृत ज्ञानास योग्य प्रकारे न समजून संत गरीबदास जींच्या आशयाच्या विरुद्ध ज्ञान सांगण्यास सुरुवात केली होती तसेच साधना देखिल ग्रंथाच्या आदेशाविरुद्ध सुरुवात केली. त्या मागचे कारण हे होते कि संत गरीबदासजी सन १७७८ मध्ये शरीर सोडून गेले होते. त्यावेळेस त्यांचे नाममात्र शिष्य होते. त्यांना प्रथम मंत्र दिला होता. फक्त शीतल दासजींनाच गुप्त रहस्य सांगितले होते. त्यांना ही गुप्त ठेवण्याचा आदेश केला होता. फक्त एकाच आपल्या उत्तराधिकारीस, सांगण्याचा आदेश दिला होता. ही परंपरा माझ्या गुरुजी पर्यंत चालली. ज्यामुळे इतर गरीबदासजीच्या साधकांना यथार्थ भक्ति विधी चे ज्ञान झाले नाही. ते आपली मनमानी साधना करू लागले व ग्रंथाना न समजल्यामुळे एक सोहं नावाचा जप करू लागले. हे मानले जाते कि व सत्य सुद्धा आहे कि संत गरीबदासजीच्या बाराव्या पंथाचा विस्तार संत ब्रह्मसागर जी भुरीवाले (रामपुर धाम पंजाब) द्वारा केला गेलेला आहे. पंजाब प्रांता व्यतिरिक्त हिमाचल प्रदेशात हरिद्वार व ऋषिकेश मध्ये व संपूर्ण भारतात २०० पेक्ष्या

अधिक आश्रम आहेत. एकट्या पंजाब मध्ये जवळपास १२५ गावामध्ये संत गरीबदासजीचे प्रचारक संत भुरीवाले ब्रह्मसागर जींचा कुटीया आश्रम आहे. काही शहरात (लुधीयाना, तलवण्डी, ऊँची, निर्वी, रामपुर, जलूर इत्यादि) मध्ये मोठे आश्रम बनलेले आहेत. हरिद्वार व ऋषिकेश मध्ये २९ आश्रम आहेत.

श्री संत भुरीवाले काय भक्ति साधना करत होते तसेच अनुयायीना काय प्रदान करत होते? त्यांचे वर्णन करत आहे :-

संत ब्रह्मसागर भुरी (लोयी) वालेजी स्वत: सोहं नामाचा जप करायचे. जप करण्याची विधी अशा प्रकारची होती. ''सो'' चा जप श्वासास बाहेर सोडताना व ''हं'' चा जप श्वासास आत घेताना करायचे. त्यांनी सन् १८९६ पासून ते सन् १९१७ पर्यंत (जवळपास २१ वर्षे) मौन राहून गाव-कैलपुर जिल्हा-लुढियाना (पंजाब) मध्ये साधना केली होती. यांनी छुडांनी धामाला (हरियाणा) प्रकाशित केले. त्यांनी संत गरीबदास जीच्या मृत शरीरावर बनवलेल्या छोट्या समाधीचा जीर्णोधार करून तेथे नवीन संत गरीबदास जींची मूर्ति स्थापन करून मोठी आठवण बनवली ज्याला छतरी साहेब म्हटले जाते जेथे सध्याच्या काळात वर्षातून दोन वेळेस मोठे कार्यक्रम आयोजित होतात. तीच भक्ति जी श्री ब्रह्मसागरजी सांगायचे तेथे छुडांनी व सर्व आश्रमात प्रचलित आहे. एक अजून आश्चर्य आहे कि ''सोहं'' नामाचा जप फक्त त्यांनाच भेटतो जो भगवे वस्त्र धारण करतो व घराचा त्याग करून आश्रमात राहून सेवा करतो आणि जे सामान्य लोक अनुयायी बनतात त्यांना फक्त ''ॐ भगवते वासुदेवाय नम:'' नाम जपण्याची दिक्षा दिली जाते. श्री ब्रह्मसागरजी भुरीवाले यांना व संत गरीबदासजी यांना साक्षात श्री विष्णु (श्रीकृष्ण) यांचा अवतार मानले जाते. श्री ब्रह्मसागरजी एक चादर ठेवायचे ज्याला पंजाब मध्ये भूरी (हरियाणात लोयी) म्हटले जाते. ज्या कारणाने श्री ब्रह्मसागर यांना भुरीवाला बाबा म्हटले जाते. यांचा जन्म २२ ऑगस्ट १८६२ मध्ये जन्माष्टमी (कृष्ण जन्माष्टमी) च्या दिवशी झाला होता व त्यांनी २४ डिसेंबर १९४७ ला ८५ वर्षाच्या वयात जलूर साहेब धाम जिल्हा-संगरूर (पंजाब) येथे शरीर सोडले होते. त्यांचे जन्म स्थान गाव-रामपूर, तहशील-आनंदपुर साहेब, जिल्हा-बिलासपुर (पंजाब) होते. संत गरीबदास जीच्या ग्रंथाबरोबरच श्रीमद भगवत (सुधासागर) चा पाठ सुद्धा त्यांचे अनुयायी संत भक्त हे करतात. वर्तमान काळात श्री दर्शनसिंह हे महंत आहेत.

वाचकांनो! आता समजले असेल कि संत गरीबदासजी यांच्या बाराव्या पंथात कोणती भक्ति साधना चालू आहे? त्यांना संत गरीबदासजी यांच्या अमृतवाणीचे वास्तविक यथार्थ ज्ञान नाही झाले ज्या मुळे गुरुदेवचे अंग मधून ''सोहं'' नाम घेऊन दोन भाग करून भक्ति करू लागले. भोळ्या श्रधाळूंना श्रीकृष्णाच्या पूजेचा मंत्र देऊ लागले जो ग्रंथात नाही. गुरुदेवजीचे अंग प्रकरणात लिहिले आहे. ''सतगुरू सोहं नाम दे, गुज बिरज बिस्तार। बिन सोहं सूझै नहीं, मूल मंत्र निज सार।।'' या वाणीमध्ये स्पष्ट केले आहे कि सद्गुरु ''सोहं'' नाम देऊन त्याचा गुप्त भेद विस्तारपूर्वक सांगतील. या नाम (सोहं) च्या वरती सुद्धा एक नाम आहे ज्यापासून मोक्ष संभव आहे. सुमिरण चे अंग या प्रकरणात ग्रंथात लिहिले आहे कि ''सोहं ऊपर और है, सत सुकृत एक नाम। सब हंसों का वंश है, बस्ती है बिन ठाम।।'' त्या सोहं च्या वरती असलेल्या मंत्राने म्हणजे सार शब्दा शिवाय मोक्ष संभव नाही. ज्या कारणाने परमेश्वर कबीरजींनी कबीर सागर अध्याय ''कबीर बानी'' मध्ये पान न. १३६-१३७ वरती स्पष्ट केले आहे कि

बारहवें पंथ प्रकट हवै बानी। शब्द हमारे की निर्णय ठानी।।

साखी हमारी ले जीव समझावैं। असंख जन्म ठौर नहीं पावैं।।
अस्थिर घर का मर्म नहीं पावैं। ये बारह पंथ हमहीं को ध्यावैं।।
बारहवें पंथ हम ही चलि आवैं। सब पंथ मिटा एक पंथ चलावैं।।
धर्मदास मेरी लाख दोहाई। सार शब्द कहीं बाहर नहीं जाई।।
सार शब्द बाहर जो परही। बिचली पीढ़ी हंस नहीं तरहीं।।

**भावार्थ :-** परमेश्वर कबीर जींनी आपला परम शिष्य धर्मदास जींना सांगितले कि हे धर्मदास! ज्यावेळी कलियुगाचे पाच हजार पांचसे पांच (५५०५) वर्षे पुर्ण होतील, त्यावेळीपासून मधल्या पिढीच्या उद्धारासाठी यथार्थ भक्ति पंथ चालवला जाईल. तोपर्यंत काल ब्रह्म धोका देऊन माझ्या (कबीर) नावाने नकली पंथ चालंवेल. तुझ्या सहाव्या पिढीला देखील काल भ्रमित करून माझ्या द्वारे सांगितलेली सत्य साधना सोडवून चुकीच्या साधनेची सुरुवात करून देईल. या प्रकारे काल माझ्या म्हणजे कबीर नावाने बारा नकली पंथांची सुरुवात करेल. इतर पंथ सुद्धा चालवले जातील जे सतलोकाच्या गोष्टी करतील. साधना सर्व व्यर्थच्याच सांगतील व साधंकांना कालाच्या जाळ्यात ठेवतील. हे धर्मदास! मी तुला संपूर्ण भक्ति साधनेचे मंत्र सांगितले आहेत. याच्यात सारनाम (सारशब्द) देखील सांगितले आहे. या सार शब्दाला त्या वेळेपर्यंत कोणालाही काहीही सांगायचे नाही जोपर्यंत कलियुग पाच हजार पाचशे पाच वर्षे पूर्ण करणार नाही. माझ्या नावाने चालणाऱ्या पंथामध्ये बारावा पंथ गरीबदास जींचा पंथ होईल. त्या पंथाच्या प्रवर्तकाचा जन्म विक्रम सवंत् सतराशे चौऱ्याहत्तर (१७७४) मध्ये होईल. त्याच्यापासून यथार्थ आध्यात्मिक ज्ञान व भक्ति साधनेची वाणी प्रकट करून घेईल. त्यांच्याकडून माझी महिमा ऐकून माझ्या प्रती भक्त समाजाचे प्रेम वाढेल. हे बारा पंथाचे अनुयायी माझी वाणी वाचून निर्णय करतील. परंतु योग्य प्रकारे न समजल्याने सत्यभक्ति पासून वंचित राहतील. ज्यामुळे असंख्य जन्मा पर्यत शाश्वत स्थानी म्हणजे अमरलोकास (सतलोक) प्राप्त होणार नाहीत. जो बारावा पंथ (संत गरीबदास यांचा) चालेल त्या पंथाच्या नंतर त्याच बाराव्या पंथात मी (कबीर) जाईल व यथार्थ तेरावा पंथ चालवून सर्व पंथाना (धर्मांना) तत्वज्ञानाच्या आधारे समजाऊन एकच कबीरपंथ चालवेल. मधल्या पिढीला यथार्थ ज्ञान व भक्ति विधी देवून भक्तीची प्रेरणा करून भक्ति करवून सत्यलोकास घेऊन जाणार.

❖ तो तेरावा पंथ आता लेखक (संत रामपाल दास) द्वारा चालवला गेला आहे. हे सर्व परमेश्वर कबीर जीची कृपा व गुरुदेवजीच्या आशीर्वादाने होत आहे.

❖ संत ब्रह्मसागर भुरीवाले त्याच बारा पंथामधील बाराव्या पंथाचे (गरीबदास पंथाचे) अनुयायी होते. त्यांच्या द्वारे केली गेलेली साधना व जपाच्या मंत्रावरून स्पष्ट आहे कि यांची मुक्ती का झाली नाही?

सारनामा शिवाय सतलोकाची प्राप्ती होऊ शकत नाही. ते माझ्या अतिरिक्त (रामपाल दास शिवाय) विश्वात कोणाजवळही नाही.

## प्रत्येक देव व परमेश्वराची स्थिति

सूक्ष्मवेदाचे ज्ञान परमेश्वर कबीरजीनी सांगितले आहे:-

कबीर, अक्षर पुरूष एक पेड़ है, निरंजन वाकी डार। त्रिदेवा शाखा भए, पात रूप संसार।।१
कबीर, एकै साधे सब सधै, सब साधे सब जाय। माली सींचै मूल को, फलै-फूलै अघाय।।२

**शब्दार्थ :-** वाणी संख्या १-२ मध्ये परमेश्वर कबीर जीनी गीतेच्या अध्याय १५ श्लोक १-४ व १६-१७ चे ज्ञान सांगितले आहे.

## ❖ ''भक्ति कोणत्या प्रभुची केली पाहिजे'' गीता अनुसार ❖

सूक्ष्मवेदात म्हटले आहे की :-

''भजन करो उस रब का, जो दाता है कुल सब का''

श्रीमद्भगवत् गीता अध्याय १५ श्लोक १ ते ४ आणि १६-१७ मध्ये म्हटले आहे की हा प्रपंच म्हणजे एखाद्या पिंपळाच्या वृक्षासारखा आहे. जो संत ह्या प्रपंचरूपी पिंपळ वृक्षाच्या मूळापासून तीनों गुण रूपी फांद्यांपर्यंतचे सर्वांग वेगवेगळे सांगू शकतो, (सः वेद वित्) तो वेदाचे तात्पर्य जाणतो. म्हणजेच तो तत्वदर्शी संत आहे.

आपल्या द्वारे रचित सृष्टिचे ज्ञान तसेच वास्तविक आध्यात्म ज्ञान परमात्मा स्वतः पृथ्वीवर प्रकट होऊन आपल्या मुख कमलातून सांगत आहेत. परमात्मा आपल्या अमर धामातून चालून पृथ्वीवर प्रकट होत असतात. ते पुण्यात्म्यांना भेटतात. ते तत्वदर्शी संताची भूमिका निभावून तत्वज्ञान दोहे, चौपाई, वाणी द्वारे सांगतात. त्या परमात्म्याने सन् १३९८ ते १५१८ पर्यंत १२० वर्ष पृथ्वीवर भारत वर्षा मधील पवित्र धरती वर काशी शहरामध्ये विणकराचे (धाणक) रुप धारण करून तत्वज्ञान सांगितले होते.

कबीर, अक्षर पुरूष एक पेड़ है, क्षर पुरूष वाकी डार। तीनों देवा शाखा हैं, पात रूप संसार।।
कबीर, अक्षर पुरूष वृक्ष का तना है, क्षर पुरूष है डार। त्रयदेव शाखा भए, पात जानों संसार।।
कबीर, हम ही अलख अल्लाह हैं, मूल रुप करतात। अनन्त कोटि ब्रह्मण्ड का, मैं ही सृजनहार।।

सरलार्थ :- वृक्षाचा जो भाग पृथ्वीवर बाहेर दिसतो, त्याची माहिती देताना सांगितले आहे की वृक्षाच्या खोडाला ''अक्षर पुरुष'' समजावे. त्या खोडातून वरच्या बाजूला एक जाडसर फांदी फुटते, त्यामधून एका फांदीला ''क्षर पुरूष'' समजावे. मग त्या फांदीतून मग तीन फांद्या निघतात. त्या तीन देवता :- (रजोगुण-ब्रह्मजी, सत्वगुण-विष्णुजी आणि तमोगुण-शंकरजी) समजावे आणि त्या फांद्यांवर असलेली पाने म्हणजे जीव-जन्तु समजावे.

परमेश्वर कबीरजींनी तत्वज्ञानात सगळे ज्ञान सांगितले आहे. म्हटले आहे कि संसार वृक्षाचे मूळ म्हणजे जडे रुप जे परम अक्षर ब्रह्म आहे, ते आम्ही म्हणजे कबीर जी आहेत. गीता अध्याय ४ श्लोक ३२ मध्ये सुद्धा म्हटले आहे की यज्ञ म्हणजेच धार्मिक अनुष्ठानांची माहिती (ब्रह्मणःमुखे) सच्चिदानंद घन ब्रह्म म्हणजेच परम अक्षर ब्रह्मने आपल्या मुख कमलातून बोललेली वाणी विस्तार पूर्वक सांगितली आहे, तेच तत्वज्ञान आहे.

गीता अध्याय ४ श्लोक ३४ मध्ये म्हटले आहे की जे तत्वज्ञान परमात्मा स्वतः सांगत आहेत. त्यांना त्यांचे कृपापात्र संतच समजू शकतात. ते तत्वज्ञान तू तत्वदर्शी संतांकडे जाऊन समजून घे. त्यांना दंडवत् प्रणाम (पृथ्वीवर पोटावर पडून प्रणाम) करून, नम्रतापूर्वक प्रश्न करण्याने ते तत्वदर्शी संत तत्वज्ञानाचा उपदेश करतील.

परमात्म्याने हे तत्वज्ञान स्वतः पृथ्वीवर प्रकट होऊन सांगितले होते. गीता अध्याय १५ श्लोक १ मध्ये तत्वदर्शी संताची ओळख सांगितली आहे की जो संत संसाररूपी वृक्षाच्या मूळापासून सर्व अंगांने जाणतो, तो तत्वदर्शी संत आहे.

❖ आता संसाररूपी वृक्षाचे सर्वांग जाणून घेऊया :-

१. मूळे (जड़) :- हे परम अक्षर ब्रह्म आहे जो सर्वांचे मालक आहेत. सगळ्यांना उत्पन्न करतो, सर्वांचे भरण-पोषण करतो व त्याची माहिती गीता अध्याय ८ श्लोक १ चे प्रश्नाचे उत्तर गीता अध्याय ८ च्याच श्लोक ३, ८, ९, व १० आणि २०, २१, २२ मध्ये दिले

आहे. त्याचेच वर्णन गीता अध्याय १५ श्लोक १७ मध्ये आहे. ज्याप्रमाणे गीता अध्याय १५ श्लोक १६ मध्ये दोन पुरूष सांगितले आहेत. :- एक ''क्षर पुरूष'' दूसरा ''अक्षर पुरूष'', हे दोघेही आणि त्यांच्या अन्तर्गत जितके शरीरधारी प्राणीआहेत, ते सर्व नश्वर आहेत. कोणाचाच जीव आत्मा मरत नाहीं.

गीता अध्याय १५ च्याच श्लोक १७ मध्ये म्हटले आहे की (उत्तम पुरूषः) म्हणजेच पुरूषोत्तम तर (अन्यः) दुसराच आहे. ज्याला (परमात्मा इति उदाहृतः) परमात्मा म्हटले जाते. (यः लोकत्रयम्) तो तिन्ही लोकात (अविश्य विभर्ती) प्रवेश करून सर्वांचे धारण-पोषण करतो आहे. (अव्ययः ईश्वरः) तो अविनाशी परमेश्वर आहे, तो परम अक्षर ब्रह्म संसाररूपी वृक्षाचा मूल (जड़) रूप परमात्मा आहे. हा तोच परमात्मा आहे. ज्याच्या विषयी संत गरीबदासजींनी म्हटले आहे :-

''भजन करो उस रब का, जो दाता है कुल सब का''

तो असँख्य ब्रह्माण्डांचा स्वामी आहे. तो क्षर पुरूष आणि अक्षर पुरूष यांचासुद्धा स्वामी व उत्पत्तिकर्ता आहे.

२. अक्षर पुरूष :- हे संसार रूपीवृक्षाचे खोड समजावे. तो सात (७) शंख ब्रह्माण्डांचा स्वामी आहे, नश्वर आहे.

३. क्षर पुरूष :- हा गीता ज्ञान दाता आहे, त्याला ''क्षर ब्रह्म'' सुद्धा म्हणतात. हा केवळ २१ ब्रह्माण्डांचा स्वामी, नाशवान आहे.


४. तीन देवता (रजोगुण ब्रह्मा, सत्वगुण विष्णु आणि तमोगुण शिव) तीन शाखा :- हे एका ब्रह्माण्डापासून बनलेल्या तीन लोकांचे (पृथ्वी लोक, पाताल लोक आणि स्वर्ग लोक) एक-एक विभागाचे मंत्री आहेत, स्वामी आहेत.

जसे = रजोगुण विभागाचे श्री ब्रह्माजी स्वामी आहेत, ज्याच्या प्रभावाने सर्व प्राणी सन्तानोत्पत्ति करत आहेत. सत्वगुण विभागाचे श्री विष्णुजी स्वामी आहेत ज्यामुळे एकेमेकांवरील ममत्व टिकून राहते, कर्मानुसार सर्वांना फळ देत आहेत. तमोगुण विभागाचे श्री शंकरजी स्वामी आहेत, ज्यामुळे सर्वांचा अंत होतो. आहे आणि पातरूपात विश्वातले प्राणी समजावे. हे आहे विश्वरूपी वृक्षाच्या सर्वांगाची वेगवेगळी माहिती. हे ज्ञान स्वतः परमेश्वर कबीरजींनी आपल्या मुख कमला मधून सांगितली आहे. हे सर्व कबीर वाणी, कबीर बीजक, कबीर शब्दावली आणि कबीर सागर मध्ये श्री धनी धर्मदास (बाँधवगढ़ वाले) यांच्याकडून लिहिली गेली आहे. त्या भगवंताने असेही सांगितले आहे की वर्तमानात हे फक्त ह्या सेवकाला (संत रामपाल दास) समजले आहे. ही कृपा परमेश्वर कबीरजीचीच आहे की सम्पूर्ण आध्यात्म ज्ञान मला प्राप्त आहे.

गीता अध्याय १५ श्लोक १ नुसार तत्वदर्शी संताची ओळखीवरून सुद्धा सिद्ध झाले की हा सेवक (संत रामपाल दास) तो तत्वदर्शी संत आहे.

पुन : विषयाचा विचार करू की ''भजन करो उस रब का,जो दाता है कुल सब का।''

आतापर्यंत हेच सांगितले कि भक्ति केली पाहिजे, पण आता कोणाची करावी? हे स्पष्ट करत आहेत. १. श्री ब्रह्माजी-रजोगुणाची किंवा, २. श्री विष्णुजी-सत्वगुणाची किंवा, ३. श्री शंकरजी रूपी तमोगुणाची ह्या तीन शाखांची किंवा ४. क्षर पुरुष गीता ज्ञान दातांच्या फांदीची किंवा, ५. अक्षर पुरुष खोडाची की, ६. परम अक्षर पुरुष = मूळाची.




**वरती मूळ (जड) खाली शाखा (फांद्या) वाला उलटा लटकलेला संसार रुपी झाडाचे चित्र**

**गीता अध्याय १५ श्लोक १ ते ४ तसेच १६ ते १७ चा सारांशा रुप चित्र.**

उदाहरण :– आपण रोपवाटिकेतून आंब्याचे रोप आणतो. ते आपल्या शेतात किंवा घराच्या अंगणात लावतो. ते कसे लावतो?

जमीनीत खड्डा खोदतो. रोपाचे मूळ खड्ड्यात ठेऊन ते मातीने झाकतो. मग रोपाच्या मुळाला (जड़ों) पाण्याने सिंचतो.खत टाकतो. म्हणजेच रोपाच्या मुळांची पूजा करतो. मुळामधून खाद्य खोडाकडे नेते आणि खोड आपले खाद्य ठेऊन घेते आणि उर्वरित खाद्य पुढे फांदीकडे पाठविते. फांदी आपले खाद्य ठेऊन घेते आणि उर्वरित खाद्य पुढे शाखांकडे पाठविते. अशा प्रकारे फांद्या उर्वरित खाद्य पानांपर्यंत पोहोचवतात. अशा प्रकारे ते रोप झाड होऊन फळे देते.

वाचक खुप बुद्धिमान आहेत. समजले असतील कि आपल्याला कोणत्या परमात्म्याची पूजा केली पाहिजे?

सुक्ष्मवेदात परमेश्वर कबीरजी सांगतात की :–

कबीर, एकै साधै सब सधै, सब साधै सब जाय। माली सींचै मूल कूँ, फूलै फलै अघाय।।

एका मूळ स्वामीची पूजा केल्यास सर्व देवतांची पूजा केल्यासारखेच असून ते शास्त्रानुकूल आहे. जे तिन्ही देवतांपैकी एक किंवा दोन (श्री विष्णु–सत्वगुण आणि श्री शंकर तमोगुण) देवतांची पूजा करतात. या तिघांचीही पूजा ईष्ट रूपात करतात. तर गीता अध्याय १३ श्लोक १० मध्ये वर्णन केल्यानुसार अव्यभिचारिणी भक्ति नस्ल्यामुळे व्यर्थ आहे. ज्याप्रमाणे जी कोणतीही स्त्री आपल्या पति व्यतिरिक्त अन्य पुरूषांशी शारीरिक सम्बन्ध करत नाहीं, ती अव्यभिचारिणी स्त्री आहे व जी अनेक पुरूषांशी शारीरिक संबंध करते, ती व्यभिचारिणी असल्यामुळे समाजात निन्दनीय असते. तिच्या पतीच्या मनातून ती उतरते.

शास्त्रानुकूल साधना म्हणजेच सरळ थेट लावलले बीजाचीच भक्तिरूप असलेल्या रोपाचे चित्र याच पुस्तकाच्या पृष्ठ १३४ वर व शास्त्राविरूद्ध साधना म्हणजेच उलट्या लावलल्या भक्तिरूपी रोपाचे चित्र पृष्ठ १३५ वर पाहावे.


एका मूळ परमात्म्याची भक्ति करण्याने साधकाचे आत्म–कल्याण शक्य आहे. हे उपरोक्त प्रमाणांवरून स्पष्ट झाले.

अन्य प्रमाण :– गीता अध्याय ३ श्लोक १० ते १५ मध्ये याच उपरोक्त भक्तिचा पुरस्कार केला आहे.

❖ गीता अध्याय ३ श्लोक १० = प्रजापतिने म्हणजेच कुळाच्या स्वामीने सृष्टिच्या सुरवातीला यज्ञासहित म्हणजेच धार्मिक अनुष्ठानांच्या ज्ञानासहित प्रजेची उत्पत्ती करून आदेश दिला होता की आपण सर्व धार्मिक अनुष्ठानांद्वारे वृद्धि प्राप्त करून घ्यावी. हे यज्ञ म्हणजेच धार्मिक अनुष्ठान आपल्याला इच्छित प्रसाद प्रदान करणार आहेत. (गीता अध्याय ३ श्लोक १०)

❖ ह्या शास्त्रानुकूल धार्मिक अनुष्ठानांच्या द्वारे देवतांना (संसार रूपी रोपाच्या फांद्या) उन्नत करा. म्हणजेच पूर्ण परमात्म्याला (मूल मालिक) ईष्ट समजून साधना करण्याने शाखा आपोआप प्रगती करत राहतात. हे आधीच स्पष्ट झाले आहे. मग त्या देवता (फांद्या मोठ्या होऊन फळे देतील) तुम्हा लोकांना उन्नत करतील. म्हणजेच जेंव्हा आम्ही शास्त्रानुकूल साधना करू तेव्हा आमच्या भक्तिने जी कर्मे बनंतिल कर्मांचे फळ ह्या तिन्ही देवता (श्री ब्रह्माजी, श्री विष्णुजी आणि श्री शंकरजी रूपी फांद्या च) देतील. अशा प्रकारे एकमेकांना उन्नत करत तुमचे कल्याण होईल आणि ह्यामुळे दूसऱ्या परमात्म्याला प्राप्त व्हाल. (हे ज्ञान गीता ज्ञान दाता सांगत आहेत) (गीता अध्याय ३ श्लोक ११)


ब्रह्मा
शिव
विष्णु
गीता अध्याय नं. 15
श्लोक नं. १ ते ४ तसेच
श्लोक नं. १६ व १७
चा आशय
फांदी (डार) ब्रह्म
(क्षर पुरुष)
कबीर-अक्षर पुरुष एक पेड़ है,
निरंजन वाकी डार।
तीनों देवा शाखा हैं,
पात रूप संसार।।
खोड (तना)
(अक्षर पुरुष परब्रह्म)
कबीर साहेब
मूळ (जड)
शास्त्रानुकूल साधना
अर्थात सरळ पेरलेले भक्ती रुपी रोपटे


गीता अध्याय नं. 15
श्लोक नं. १ ते ४ तसेच
श्लोक नं. १६ व १७
चा आशय
पूर्ण ब्रह्म कबीर साहेब
मूळ (जड़)
कबीर - अक्षर पुरुष एक पेड़ है,
निरंजन वाकी डार।
तीनों देवा शाखा हैं,
पात रूप संसार।।
खोड (तना)
(अक्षर पुरुष परब्रह्म)
फांदी (डार) ब्रह्म
(क्षर पुरुष)
विष्णु (शाखा)
ब्रह्मा
शिव
शास्त्रविरुद्ध साधना
अर्थात उलटे पेरलेले भक्ती रुपी रोपटे

❖ शास्त्रानुकुल केलेले यज्ञ म्हणजेच अनुष्ठानांद्वारे पुरस्कृत झालेल्या देवता म्हणजेच संसाररूपी रोपाच्या फांद्या तुम्हा लोकांना न मागताच इच्छित प्रसाद निश्चितच देत राहतील. ज्याप्रमाणे रोपाच्या मुळाला सिंचून रोपाचे झाड होते व फांद्या फळांनी लगडतात मग त्या वृक्षाच्या शाखा आपल्याला दरवर्षी फळे देतील म्हणजे आपण केलेल्या शास्त्रानुकूल भक्ति कर्माची फळे साठत जातात, ते ह्याच देवता आपल्याला देत राहतील, मग आपण मागा किंवा मागू नका. जर त्या देवतांकडून दिलेल्या आपल्या कर्माचे संस्काराचे पुण्य पुनःधर्मार्थ वापरले गेले नाही, तर तो साधक भक्तीचा चोर असतो. भविष्यात पुण्यहिन होऊन त्याला हानि सहन करावी लागते.(गीता अध्याय ३ श्लोक १२)

❖ यज्ञातून उरलेले अन्न खाणारे संतजन सर्व पापांपासून मुक्त होतात. भावार्थ हाच आहे की तत्वदर्शी संत सर्वप्रथम परम अक्षर ब्रह्मला प्रसाद नैवेद्य दाखवून मग उरलेले भोजन सर्व भक्तांमध्ये वितरित करतात. ते संत सर्व भक्ति मंत्रसुद्धा शास्त्रानुकूल देतात हीच सत्य साधनेची खुण आहे. त्यामुळे साधक सर्व पापांमधून मुक्त होऊन सत्यलोकात जातो आणि जे पापी लोक शास्त्राविधिनुसार धार्मिक क्रिया करत नाहींत किंवा धर्म करत नाहींत, केवळ आपल्या शरीराचे पोषण करण्यासाठीच अन्न शिजवतात, ते तर पापच सेवन करत आहेत. (गीता अध्याय ३ श्लोक १३)

❖ सगळे प्राणी अन्नापासूनच उत्पन्न होतात. म्हणजेच अन्न सेवन केल्यानेच शरीरात संतानोत्पत्तिचा पदार्थ तयार होतो.ज्यायोगे सर्व प्राण्यांची उत्पत्ति होत असते. अन्नाची उत्पत्ति वृष्टितून होत असते. पाउस शास्त्रविधिनुसार केलेल्या यज्ञ म्हणजेच धार्मिक अनुष्ठानानेच होत असतो. यज्ञ म्हणजेच धार्मिक अनुष्ठान शास्त्रात वर्णन केल्यानुसार विधि केले जातात. कर्म ब्रह्म म्हणजेच क्षर पुरूषापासून उत्पन्न झाल्याचे जाणा कारण आपण ब्रह्म (काल) लोकात आलो आहोत. तेव्हा आपल्याला कर्म करूनच सर प्राप्त होत असते. जेव्हा आपण सत्यलोकात होतो, तेव्हा काहीही कर्म न करता सर्व प्राप्त होते. त्यामुळेच म्हटले आहे की कर्म हे ब्रह्मपासून (काल) उत्पन्न झाल्याचे जाणा आणि ब्रह्मची (काल) उत्पत्ति अविनाशी परमात्म्यापासून झाली. (ह्याचे वर्णन गीता अध्याय १५ श्लोक १७ मध्ये आहे आणि सृष्टि रचना अध्यायात वाचावे.) ह्यावरून सिद्ध होते आहे की (सर्वगतम् ब्रह्म) सर्वव्यापी परम अक्षर परमात्मा म्हणजेच परम अक्षर ब्रह्म हे नेहमीच यज्ञात म्हणजेच धार्मिक अनुष्ठानात (प्रतिष्ठितम्) प्रतिष्ठित आहे. म्हणजेच सर्व धार्मिक क्रियांमध्ये परम अक्षर ब्रह्म ईष्ट रूपात पूज्य आहे. (गीता अध्याय ३ श्लोक १४-१५)

परम अक्षर ब्रह्म गीता ज्ञान दात्याहून अन्य आहे. गीता ज्ञान दात्याने स्वतःगीता अध्याय १८ श्लोक ६२ मध्ये म्हटले आहे की हे भारत! तू सर्वभावाने त्या परमात्म्याला म्हणजेच परम अक्षर ब्रह्मला शरण जा, त्या परमात्म्याच्या कृपेनेच तू परम शान्ति आणि शाश्वत स्थान म्हणजेच सनातन परम धामाला प्राप्त होशील.

❖ गीता अध्याय १५ श्लोक ४ मध्ये गीता ज्ञान दाता सांगतात की तत्वदर्शी संत भेटल्यानंतर तत्वज्ञान रूपी शस्त्राद्वारे अज्ञान दूर करून परमात्म्याचं त्या परम पदाचा शोध घेतला पाहिजे जिथे गेल्यावर साधक फिरून परत कधीही मृत्युलोकात जन्म घेत नाहीं. म्हणजेच त्यांना सनातन परम धाम प्राप्त होते, जिथे परमशान्ति आहे,काहीही कष्ट नाहीं आहे, तिथे मृत्यु नसतो, तिथे वृद्धावस्था नसते, कोणत्याही पदार्थाचा अभाव नसतो. ज्या परमात्म्यापासून संसाररूपी वृक्षाचा प्रवृति विस्तार झाला आहे त्याच परमात्म्याची भक्ति केली पाहिजे.

❖ गीता अध्याय १३ श्लोक १७ मध्ये गीता ज्ञान दाता सांगतात की ते परब्रह्म म्हणजेच माझ्याहून वेगळा परमात्मा, वेगळ्या शब्दात सांगायचे तर परम अक्षर ब्रह्म (जे ज्योतीची ज्योती व मायेच्या पासून अत्यंत दूर व्यापून असल्याचे सांगितले जाते. गीता अध्याय ८ श्लोक ३ मध्ये सांगितले आहे.) बोधरूप (जानने योग्य) परमात्मा तत्वज्ञानाने प्राप्त करण्यायोग्य आहे आणि सर्वांच्या हृदयात विशेष रूपाने स्थित आहे. (गीता अध्याय १३ श्लोक १७)

विचार करा :– ज्या तत्वज्ञानाने परम अक्षर ब्रह्म प्राप्त होत आहे, त्याला सूक्ष्म वेद सुद्धा म्हणतात. त्याचे ज्ञान गीता ज्ञान दात्याकडे नाहीं. त्यामुळे गीता ज्ञान दात्याने गीता अध्याय ४ श्लोक ३२ आणि ३४ मध्ये सांगितले आहे की यज्ञ म्हणजेच धार्मिक अनुष्ठानांचे विस्तारपूर्वक ज्ञान स्वतः(ब्रह्मणः मुखे) सच्चिदानन्द घन ब्रह्म परमात्मा म्हणजेच परम अक्षर ब्रह्म आपल्या मुख कमलाने सांगत आहेत, ज्याला सच्चिदानन्द घन ब्रह्माची वाणी असे म्हटले जाते. त्यालाच तत्वज्ञान म्हणतात. ते जाणून साधक सर्व पापातून मुक्त होतात. (गीता अध्याय ४ श्लोक ३२)

❖ साधकांना विनंती आहे की गीता अध्याय ४ श्लोक ३२ च्या मूळ पाठात ''ब्रह्मणः'' शब्द आहे. गीता प्रैस गोरखपुर द्वारा प्रकाशित गीता किंवा अन्य ठिकाणांहून प्रकाशित गीतेत अनुवादकानी ब्रह्मणः शब्दाचा अर्थ ''वेद'' असा केला आहे, तो चुकीचा आहे.

गीता अध्याय १७ श्लोक २३ मध्ये सुद्धा ''ब्रह्मणः'' शब्द आहे, त्याचा अर्थ अनुवादकांनी ''सच्चिदानन्द घन ब्रह्म'' असा ठीक केला आहे. त्यामुळे गीता अध्याय ४ श्लोक ३२ मध्ये ''ब्रह्मणः मुखे'' याचा अर्थ सच्चिदानन्द घन ब्रह्मच्या मुख कमलाने उच्चरित वाणी असा करणे उचित आहे.

गीता अध्याय ४ श्लोक ३४ मध्ये गीता ज्ञान दात्याने म्हटले आहे की जे तत्वज्ञान परमात्म्याने आपल्या मुख कमलाने सांगितले आहे, ते तू तत्वदर्शी संतांकडून समजून घे, त्यांना साष्टांग दण्डवत् प्रणाम करून, नम्रतापूर्वक प्रश्न केल्यास ते परमात्म तत्वाला चांगल्या प्रकारे जाणणारे तत्वदर्शी महात्मा तुला तत्वज्ञानाचा उपदेश करतील.

प्रभु प्रेमी वाचकांनो! ह्यावरून सिद्ध झाले की ज्या तत्वज्ञानामुळे परम अक्षर परमात्मा प्राप्त होतो, ते गीता ग्रन्थांत नाहीं आहे. गीता चार वेदांचे (ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद) संक्षिप्त रूप आहे, त्यांचा सारांश आहे. त्यावरून सिद्ध झाले की सूक्ष्मवेदातील तत्वज्ञान कोणत्याही प्रचलित सद्ग्रन्थांत नाहीं. ते ज्ञान माझ्या (संत रामपाल दास) जवळ आहे , विश्वात कोणाकडेही नाहीं.

प्रश्न :– श्री ब्रह्माजी रजोगुण, श्री विष्णुजी सतगुण आणि श्री शंकरजी तमोगुण सुद्धा ईष्टरूपात पूज्य नाहीत काय? हिन्दू धर्मात ह्याच देवतांची पूजा केली जात आहे. हिन्दू धर्मगुरू, शंकराचार्य आणि अन्य यांचीच पूजा म्हणजे ईष्टरूपाची पूजा समजून करण्यास सांगत आहेत. ते स्वतःसुद्धा तसेच करीत आहेत. आपण सांगता ते अविश्वसनीय वाटते. आपण गीतेतून प्रमाणित करू शकता काय?

उत्तर :– हिंन्दू धर्माच्या धर्मगुरूना आपल्या सद्ग्रन्थांचे ही ज्ञान नाहीं. ज्याप्रमाणे अक्षर ज्ञान देणाऱ्या अध्यापकाला आपल्या पाठ्यक्रमातील पुस्तकांच्या उल्लेखाचे ज्ञान नाहीं तो अध्यापक विद्यार्थ्यांसाठी हानिकारक असतो. तो शिक्षकच व्यवस्थित नाही. हिंन्दू धर्माच्या धर्मगुरूंची तशी स्थिती आहे.

प्रमाण :- श्रीमद्भगवत गीता अध्याय ७ श्लोक १२ ते १५ मध्ये गीता ज्ञान दात्याने म्हटले आहे की तिन्ही गुणांनी (रजगुण श्री ब्रह्माजी कडून उत्पत्ति, सतगुण श्री विष्णुजी कडून स्थिति आणि तमोगुणी श्री शंकरजीकडून संहार) जे होत असते, त्याचे निमित्त मी आहे, परंतु त्यांच्यात मी आणि ते माझ्यात नाहीत. (गीता अध्याय ७ श्लोक १२)

आधी हे प्रमाणित करतात की रजोगुण ब्रह्मा, सतगुण विष्णु आणि तमोगुण शिव शंकर आहेत :-

१. मार्कण्डेय पुराण (गीता प्रैस गोरखपुर द्वारा प्रकाशित केवल हिन्दी सचित्र मोटा टाईप) च्या पृष्ठ १२३ वर लिहिले आहे की ब्रह्मा, विष्णु आणि महेश हे ब्रह्मच्या प्रधान शक्ति आहेत. हेच तीन गुण आहेत, तेच ह्या तीन देवता आहेत.

२. श्री देवी पुराणाच्या (श्री खेमचन्द श्री कृष्णचन्द वैंकेटेश्वर प्रैस मुम्बई द्वारा प्रकाशित) तिसऱ्या स्कंदाच्या अध्याय ५ श्लोक ८ मध्ये म्हटले आहे :-

यदा दयादर्मना सदा अम्बिके कथम् अहमं विहित: तमोगुण:

कमलज: रजगुण: कथम् विहित: च श्री हरि: सतगुण: (देवी पुराण३/५/८)

अनुवाद :- परमेश्वर शिव आपल्या दुर्गामातेला प्रश्न विचारत आहेत की हे माते! जर आपण आमच्यावर दयायुक्त आहात तर मला म्हणजेच तमोगुणाला का उत्पन्न केले? कमळापासून उत्पन्न ब्रह्माजींना रजोगुण आणि श्री विष्णुजींना सत्वगुण का केले?

❖ ह्यावरून प्रमाणित झाले की १. पाहिजे तर रजोगुण म्हणा किंवा ब्रह्माजी म्हणा २. पाहिजे तर सतगुण म्हणा किंवा विष्णुजी म्हणा, ३. पाहिजे तर तमोगुण किंवा शंकरजी म्हणा.

गीता अध्याय ७ श्लोक १२ चा भावार्थ :-गीता ज्ञान दाता काल ब्रह्म आहे. प्रमाण गीता अध्याय ११ श्लोक ३१-३२, अध्याय ११ श्लोक ३१ मध्ये अर्जुनाने विचारले-हे महानुभाव! आपण कोण आहात? श्री कृष्णजी व अर्जुन एकमेकांचे नात्याने मेव्हणे होते. श्री कृष्णजीची बहिण सुभद्रेचा विवाह अर्जुनाशी झाला होता. विचार करा की जर गीता ज्ञान दाता श्री कृष्ण असते, तर अर्जुनाला हे विचारण्याची वेळच आली नसती की आपण कोण आहात? मेव्हणे एकमेकांना ओळखणार नाहीत काय? वास्तवात श्री कृष्णजींच्या शरीरात प्रेतवत् प्रवेश करून काल ब्रह्म गीता ज्ञान सांगत होता. (अधिक प्रमाणासाठी ''गीता तुझे ज्ञान अमृत'', ''गहरी नजर गीता में'', ''ज्ञान गंगा'', ''आध्यात्मिक ज्ञान गंगा'' ही पुस्तके वाचावीत आणि सत्संगाची **D.V.D.** बघावी की श्रीमद्भगवत गीतेचे ज्ञान कोणी सांगितले होते. हे सर्व आमचे **Website - www.jagatgururampalji.org** वर निशुल्क उपलब्ध आहे. ते निःशुल्क डाउनलोड करता येते. **Youtube** वर सुद्धा आपण शोधू शकता. (**Satsang Barwala Ashram** किंवा **Sant Rampal Ji**) गीता ज्ञान दाता काल ब्रह्म आहे. हे गीता अध्याय ११ श्लोक ३२ मध्ये स्वतः म्हणत आहे की मी काल आहे. आता प्रवृत झालो आहे म्हणजेच आता प्रकट झालो आहे. जर श्री कृष्णजी गीता ज्ञान सांगत असते, तर मी आता आलो आहे. असे म्हणाले नसते कारण श्री कृष्णजी तर आधीपासूनच तिथे विराजमान होते. श्री कृष्णजींनी ह्यापूर्वी कधीही म्हटलेले नाहीं की मी काल आहे, किंवा नंतर सुद्धा सर्वांचा नाश करणारा काल आहे.असे नंतरही म्हटलेले नाही. कौरवांच्या सभेत आपले विराट रूपसुद्धा दाखवले होते. विराट रूप भक्ति युक्त प्रत्येक आत्माचा असतो. त्याचे प्रकटन कोणीतरी एखादाच करू शकतो. हे भक्तिच्या शक्तिनुसार होत असते.

गीता ज्ञान दात्याने गीता अध्याय ११ श्लोक ४७ मध्ये म्हटले आहे की अर्जुन! माझे

विराट रूप तुझ्या व्यतिरिक्त आधी कोणीही पाहिलेले नाही. साधकांना विनंती आहे की श्री कृष्णजींनी तर आपले विराट रूप आधीच कौरवांच्या सभेतच दाखविले होते. व तिथे उपस्थित शेकडो कौरवांच्या सहित हजारोनी पहिले होते. जर श्री कृष्णजी गीता ज्ञान सांगत असते, तर माझे विराट रूप तुझ्या व्यतिरिक्त आधी कोणीही पाहिलेले नाहीच असे कदापि म्हटले नसते. ह्यावरून स्पष्ट आहे की गीता ज्ञान दाता ''काल ब्रह्म'' आहे. गीता अध्याय १५ श्लोक १६ मध्ये त्यालाच क्षर पुरूष म्हटले आहे. ज्याने गीता अध्याय ८ श्लोक १३ मध्ये म्हटले आहे की

ओम् इति एकाक्षरम् ब्रह्म व्यवहारन् माम् अनुस्मरन् य: प्रयाति त्यजन् देहम् स: याति परमाम् गतिम्

सरलार्थ :- गीता ज्ञान दात्याने म्हटले आहे की (माम् ब्रह्म) मज ब्रह्मचे (ओम् इति एकाक्षरम्) हे एक ॐ अक्षर आहे. (व्यवहारन्) उच्चारण करून (अनुस्मरन्) स्मरण करत (यः प्रयाति त्यजन् देहम्) जो साधक शरीर त्यागून जात आहे, (सः याति परमाम् गतिम्) तो ॐ नामाने असणाऱ्या परम गतिला प्राप्त होतो. हेच आणखी स्पष्ट करतो.

श्री देवी पुराणाच्या (सचित्र मोटा टाईप केवळ हिन्दी, गीता प्रैस गोरखपुर से प्रकाशित) सातव्या स्कंदात पृष्ठ ५६२-५६३ वर प्रकरण अशा प्रकारे आहे :-

श्री देवीजी राजा हिमालयाला ब्रह्म ज्ञानोपदेश देत आहे. म्हटले की हे राजन्! तू ओम् (ॐ) नामाचा जप कर ज्यायोगे ब्रह्मची प्राप्ति होते. हा ॐ नाम ब्रह्म जप मंत्र आहे आणि सर्व पूजा सोडून केवळ एक ॐ नामाचा जप कर, ब्रह्म प्राप्तिचे उद्दिष्ट ठेव. तुझे कल्याण होवो. याने ब्रह्मला प्राप्त होशील. ते ब्रह्म दिव्य आकाश रूपी ब्रह्म लोकात रहातात. ह्या देवी महापुराणावरून स्पष्ट झाले की ओम् (ॐ) ब्रह्मचा नाम जप आहे.

अन्य प्रमाण :- श्री शिव महापुराणाच्या (गीता प्रैस गोरखपुर द्वारा प्रकाशित सचित्र मोटा टाईप) विध्वेश्वर संहितेच्या पृष्ठ २३ ते २५ वर प्रकरण अशा प्रकारे आहे.

एकदा श्री ब्रह्माजी रजोगुण आणि विष्णुजी सतगुण यांच्या मध्ये युद्ध झाले. कारण असे झाले की श्री ब्रह्माजींनी श्री विष्णुजींच्या निवासी जाऊन असे म्हटले की अरे अभिमानी! मी आल्यावर तू उठून माझा सत्कार सुध्दा केला नाही. मुलगा असून पित्याचा आदर करत नाहीस. मी सर्व जगताची उत्पत्ति करणारा सर्वांचा पिता आहे. हे शब्द ऐकून श्री विष्णुजींना मनातून खूप राग आला, परंतु वरवर हसून म्हटले की ये पुत्रा,मी तुझा पिता आहे. माझ्या नाभि कमलातून तुझी उत्पत्ती झाली आहे. ह्या गोष्टीवर दोघेही शस्त्र उचलून एकमेकांशी युद्ध करू लागले. त्याच वेळेस काल ब्रह्मने त्या दोघांमध्ये एक तेजोमय स्तंभ उभा केला. त्यामुळे दोघांनी युद्ध करणे थांबविले. त्याच वेळेस काल ब्रह्मने आपल्या पुत्राचे शिवाचे रूप बनविले आणि आपली पत्नी दुर्गा हिला पार्वती बनवून त्यांचेजवळ प्रकट झाले. त्या दोघांना म्हणाले की इथला ईश्वर कोण आहे, याचे तुम्हाला दोघांनाही ज्ञान नाही आहे. मी ब्रह्म आहे. हे विश्व माझे आहे, हे विष्णु आणि ब्रह्मा! तुम्ही दोघांनी तप करून माझ्याकडून एक-एक कृत्य प्राप्त केले आहेत. ब्रह्माला सृष्टिच्या उत्पत्तिचे आणि विष्णुला स्थितिचे. मुलांनो ऐका! अशाच प्रकारे महेश आणि रूद्राला सुद्धा मी एक-एक कृत्य संहार आणि तिरोभाव दिले आहेत. पुढे म्हटले आहे की ओम् (ॐ) हा माझा एक अक्षरी मंत्र जप आहे. हा पाच अवयवांचा (अ, उ, य, नाद आणि बिन्दु) मिळून एक ''ॐ'' अक्षर मंत्र बनला आहे. साधकांना हे स्पष्ट झाले की ''ॐ'' हा ब्रह्मचा एक अक्षर जप मंत्र आहे. हे ही स्पष्ट झाले की काल ब्रह्म श्री ब्रह्मा,श्री विष्णु आणि श्री महेश यांच्यापेक्षा अन्य आहे आणि ब्रह्माजी, विष्णुजी आणि शंकरजी हे तिघेही काल ब्रह्मचे पुत्र आहेत.

अन्य प्रमाण :– श्री शिव महापुराणमध्ये (गीता प्रैस गोरखपुर द्वारा प्रकाशित, सचित्र मोटा टाईप) मध्ये रूद्र संहितेच्या पृष्ठ ११० वर लिहिले आहे की रजोगुण ब्रह्मा, सतगुण विष्णु आणि तमोगुण शिव तिन्ही देवतांचे गुण आहेत. मी ह्या सर्वांच्या पेक्षा भिन्न आहे.

ह्या सर्व प्रमाणांवरून स्पष्ट झाले की गीता ज्ञान दाता काल ब्रह्म आहे, त्याला शाप आहे की दररोज एक लाख मानव शरीरधारी प्राणी खाईल व सवा लाख रोज उत्पन्न करेल.

ह्यामुळे त्याने आपल्या तिन्ही पुत्रांना एक–एक गुणयुक्त करून ठेवले आहे. यांच्या शरीरातून निघणाऱ्या गुणांच्या सूक्ष्म प्रभावाने प्रत्येक प्राण्याला विवश करून कार्य करवून घेतो. ज्याप्रमाणे स्वयंपाकघरात मिरच्यांमुळे ठसका लागतो, शिंक येते. त्या शिन्कांना आपण थांबवू शकत नाही. स्थूल रूपाने मिरची स्वयंपाकघरात असते. परंतु तिच्यातून निघणाऱ्या गुणांमुळे लांबवर खोलीत बसलेले लोक प्रभावित होतात.

त्याच प्रकारे तिन्ही देवता (श्री ब्रह्माजी,श्री विष्णुजी आणि श्री शंकरजी) आपल्या आपल्या लोकी राहत आहेत. परन्तु त्यांच्या शरीरातून निघणाऱ्या गुणांचा सूक्ष्म प्रभाव तिन्ही लोकातील (स्वर्ग लोक, पाताल लोक, पृथ्वी लोक) प्राण्यांना प्रभावित करत आहे. त्यामुळे काल ब्रह्मासाठी एक लाख माणसांचा आहार तयार होतो आहे. त्यामुळे गीता अध्याय ७ श्लोक १२ मध्ये गीता ज्ञान दाता ब्रह्मने म्हटले आहे की :–

❖ तिन्ही गुणांमुळे जे काही होत आहे, त्याचे निमित कारण मीच आहे. जसे रजोगुण ब्रह्माजी पासून उत्पत्ति, सत्वगुण विष्णुजी पासून स्थिति आणि तमोगुण शिवजी पासून संहार होतो आहे. हे सर्व माझ्यासाठीच यांच्याकडून होत आहे असे जाणा, परन्तु ते माझ्यात आणि मी त्यांच्यात नाहीं कारण काल ब्रह्म ह्या तिन्ही देवतांपेक्षा भिन्न आहे. (गीता अध्याय ७ श्लोक १२)

❖ सारे विश्व याच तीन गुणांवर (रजोगुण ब्रह्मा, सतगुण विष्णु आणि तमोगुण शिव) मोहित आहे. तिथपर्यंतच त्या विश्वाचे ज्ञान आहे. ह्या तिन्ही देवतांच्या पलीकडे मला आणि (अव्ययम्) या अविनाशी परमात्म्याला जाणत नाहीं. (गीता अध्याय ७ श्लोक १३)

❖ कारण ही अलौकीक त्रिगुणमयी असलेले माझी माया (म्हणजेच माझ्या पुत्रांकडून पसरविण्यात आलेले मायाजाल) मोठी कठीण आहे, निक्कमी आहे. जे साधक केवळ माझेच (काल ब्रह्म)भजन करतात, ते ह्या मायेचे (ब्रह्मा, विष्णु, महेश यांच्या भक्तिने होणाऱ्या लाभापेक्षा अधिक लाभ ब्रह्म भक्तित आहे. म्हणून म्हटले आहे की जे ह्या तिघांकडून मिळणाऱ्या लाभांचा त्याग करून काल ब्रह्मची साधना करत आहेत, ते यांचे उल्लंघन करून म्हणजेच यांच्या साधनेचा त्याग करतात) उल्लंघन करून जात आहेत. (गीता अध्याय ७ श्लोक १४)

❖ गीता अध्याय ७ श्लोक १५ मध्ये म्हटले आहे की :– तिन्ही गुणरूपी (रजोगुण ब्रह्मा, सतगुण विष्णु आणि तमोगुण शिव) मायाजाला कडून ज्यांचे ज्ञान हरण झाले आहे, म्हणजेच जे साधक ह्या तिन्ही देवतांच्या पेक्षा भिन्न देव जाणतच नाहीत. त्यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या नाममात्र लाभालाच मोक्ष मानून तिथेच अडकून पडतात. त्यांचीच उपासना करत राहतात. अशा व्यक्ति असुर स्वभाव धारण करून असलेले मनुष्यांमध्ये नीच, दूषित कर्म करणारे मूर्ख जन मज काल ब्रह्मची भक्ती करत नाहीत. (गीता अध्याय ७ श्लोक १५)

गीता अध्याय १४ श्लोक १९ मध्ये गीता ज्ञान दात्याने म्हटले आहे. की ज्यावेळेस द्रष्टा म्हणजेच तत्वज्ञान श्रवण करणारा आणि तिन्ही गुणांची (रजोगुण ब्रह्मा, सतगुण विष्णु आणि तमोगुण शिव) ईष्ट रूपात पूजा करणारा आपली जुनी धारणा बदलत नाही म्हणजेच ह्या

तिघांच्या व्यतिरिक्त कोणालाच कर्ता मानत नाहीं आणि ह्या तिघांच्याही पलीकडील पूर्ण परमात्म्याचे ज्ञानसुद्धा प्राप्त करून घेतो, तो माझ्या जाळ्यात राहतो आहे. (गीता अध्याय १४ श्लोक १९)

गीता अध्याय १४ श्लोक २० मध्ये गीता ज्ञान दात्याने म्हटले आहे की देहधारी मनुष्य ह्या तिघांचेही उल्लंघन करून म्हणजेच ह्या तिघांच्याही पूजेचा त्याग करून जन्म-मरण आणि वृद्धावस्था आणि अन्य सर्व दुःखांपासून मुक्त होउन परमानन्द म्हणजेच गीता अध्याय १८ श्लोक ६२ आणि अध्याय १५ श्लोक ४ मध्ये वर्णन केल्यानुसार परम शान्ति आणि सनातन परम धामी प्राप्त होतो.

सारांश :- तिन्ही देवतांची (रजोगुण ब्रह्मा, सतगुण विष्णु आणि तमोगुण शिव) पूजा करणाऱ्या राक्षस स्वभाव धारण केलेल्या माणसांना नीच, दूषित कर्म करणारे मूर्ख म्हटले आहे. भावार्थ असा की यांची पूजा केली नाही पाहिजे.

कारण :- १. हिरण्यकश्यपूने श्री ब्रह्माजी म्हणजेच रजोगुणाची पूजा केली होती, आपल्या मुलाचा प्रल्हादाचा शत्रु बनला, राक्षस म्हणवून कुत्र्याचे मरण मेला.

२. रावणाने श्री शंकरजी म्हणजेच तमोगुणाची पूजा केली होती, जगतजननी सीतेला पळवून पत्नी बनविण्याचा प्रयत्न केला, राक्षस म्हणवून कुत्र्याचे मरण मेला. भस्मासुराने सुद्धा शंकरजीची म्हणजेच तमोगुणाची पूजा केली होती, राक्षस म्हणवून कुत्र्याचे मरण मेला.

३. श्री विष्णुजीची पूजा करणाऱ्यांना वैष्णव म्हणतात. एकदा हरिद्वार येथे एक कुम्भ पर्व सुरु होते. त्या पर्वात स्नान करण्यासाठी सर्व संत (गिरी, पुरी, नाथ, नागा) आले होते. नागा श्री शंकरजी म्हणजेच तमोगुणाचे पुजारी असतात. आणि वैष्णव श्री विष्णुजींचे म्हणजे सतगुणाचे पुजारी असतात. सगळे हरिद्वार मध्ये हर की पैड़ी वर स्नान करण्याची तयारी करू लागले व संख्या जवळपास २० हजारहोती. काही वेळानंतर तितक्याच संख्येने वैष्णव साधु हर की पैड़िवर आले. वैष्णव साधुंनी नागा साधूंना म्हटले की आम्ही श्रेष्ठ आहोत. आम्ही आधी स्नान करणार. ह्याच गोष्टीवरून भांडण झाले. तलवार, कटारी, सुऱ्या घेऊन लढू लागले. दोन्हीकडील जवळपास तिन्ही गुणांचे उपासक २५ हजार साधु मरण पावले.

म्हणूनच गीता अध्याय ७ श्लोक १२ ते १५ मध्ये तिन्ही गुणांच्या (रजोगुण ब्रह्मा, सत्वगुण विष्णु आणि तमोगुण शिवजी) उपासकांना राक्षस स्वभाव धारण केलेले मनुष्यातील नीच व दूषित कर्म करणारे मूर्ख म्हटले आहे.

ह्यावरून सिद्ध झाले की रजोगुण ब्रह्मा, सतगुण विष्णु आणि तमोगुण शिवजीची भक्ति करणारे मूर्ख, राक्षस, मनुष्यातील नीच व दूषित कर्म करणारे मूर्ख आहेत. म्हणजेच ह्यांची पूजा करण्यास श्रीमद्भगवत गीतेत मनाई केली आहे, म्हणून ह्यांची ईष्ट रूपात पूजा करणे व्यर्थ आहे.

## ''पूजा आणि साधना मधील फरक''

प्रश्न :- काल ब्रह्मची पूजा केली पाहिजे की नाहीं? गीतेतील प्रमाण सांगावे.

उत्तर :- नाहीं केली पाहिजे. आधी आपल्याला पूजा आणि साधना यामधील भेद सांगतो.

भक्ति म्हणजेच पूजा :- जसे आम्हाला हे माहिती आहे की पृथ्वीच्या आतमध्ये गोड थंड पाणी आहे. त्यास प्राप्त कसे केले जाऊ शकते? त्यासाठी कुपनलिकेद्वारा जमिनी मध्ये होल केले जाते, त्या होल मध्ये (Bore) लोखंडाचा पाईप टाकला जातो, मग हातपंपची मशिन लावली जाते, तेंव्हा ते थंड जीवनदाता पाणी प्राप्त होते.

आपले पूज्य पाणी आहे, ते प्राप्त करण्यासाठी वापरायची उपकरणे आणि प्रयत्न म्हणजे साधना जाणावी. जर आपण उपकरणांची पूजा करत बसलो, तर पाणी मिळणार नाहीं, उपकरणे वापरून पूज्य वस्तु प्राप्त होते.

अन्य उदाहरण :- जशी पतिव्रता स्त्री कुटुंबातील सर्वांचा सन्मान करते, सासू-सासऱ्याना आईवडिलांसारखे, नणदेला छोट्या-मोठय बहिणीप्रमाणे, मोठ्या-छोट्या दिराला भावाप्रमाणे, मोठ्या-छोट्या जावांना बहिणीप्रमाणे वागवते, परंतु ती पूजा आपल्या पतिचीच करते. जेव्हा ते वेगळे होतात, तेव्हा आपल्या वाट्याच्या सर्व वस्तु उचलुन आपल्या पतिच्या घरी घेऊन जाते.

अन्य उदाहरण :- जशी आपली आंबे खाण्याची इच्छा होते, आपल्यासाठी आंबा पूज्य आहे. ते प्राप्त करण्यासाठी पैसे लागतात. पैसे साठविण्यासाठी मजूरी/नोकरी/शेती-बाड़ी करावी लागते, तेव्हा आंब्याचे फळ प्राप्त होते. त्यामुळे आंबा पूज्य आहे आणि अन्य क्रिया ही साधना आहे. साध्य वस्तु प्राप्त करण्यासाठी साधना करावी लागते. साधना भिन्न आहे, पूजा म्हणजेच भक्ति भिन्न आहे, हे स्पष्ट झाले.

प्रश्न चालला आहे की ब्रह्मची पूजा करावी की नाही. उत्तरात म्हटले आहे की केली नाही पाहिजे. आता श्रीमद् भगवत गीतेतील प्रमाण दाखवतो.

गीता अध्याय ७ श्लोक १२ ते १५ मध्ये तर गीता ज्ञान दात्याने सांगितले आहे की तिन्ही गुणांची (रजोगुण श्री ब्रह्माजी, सत्वगुण श्री विष्णुजी आणि तमोगुण श्री शंकरजी) भक्ति व्यर्थ आहे. नंतर गीता अध्याय ७ के श्लोक १६-१७-१८ मध्ये गीता ज्ञान दाता ब्रह्मने आपल्या भक्तिने प्राप्त होणाऱ्या गतिला म्हणजेच मोक्षाला अनुत्तम म्हणजेच निकृष्ट म्हटले आहे. असे सांगितले आहे की माझी भक्ति चार प्रकारच्या व्यक्ति करतात.

१. अर्थार्थी :- धन लाभासाठी वेदानुसार अनुष्ठान करणारे.

२. आर्त :- संकट निवारणासाठी वेदानुसार अनुष्ठान करणारे.

३. जिज्ञासु :- परमात्म्या विषयी जाणून घेण्यासाठी इच्छुक.
(ज्ञान ग्रहण करून स्वतः वक्ता बनणारे)

ह्या तिन्ही प्रकारच्या ब्रह्म पुजारींना व्यर्थ असल्याचे म्हटले आहे.

४. ज्ञानी :- ज्ञानी जाणून असतो की मनुष्य जन्म अतिशय दुर्लभ आहे. मनुष्य जीवन प्राप्त करून आत्म-कल्याण करवून घेतले पाहिजे. त्यांना हेही ज्ञान होऊन जाते की अन्य देवतांची पूजा करून मोक्ष लाभ होणार नाहीं. त्यासाठी एका परमात्म्याची अनन्य भक्ति मनापासून केल्यास पूर्ण मोक्ष संभव आहे. त्यांना तत्वदर्शी संत न भेटल्यामुळे त्यांनी जसे वेद जाणले, त्याच आधारे ब्रह्मला एक समर्थ परमात्मा मानून यजुर्वेद अध्याय ४० मंत्र १५ मधून ओम् नाम घेऊन भक्ति केली, परन्तु पूर्ण मोक्ष नाहीं झाला. ओम् (ॐ) हे नाम ब्रह्म साधनेचे आहे, त्याने ब्रह्मलोक प्राप्त होतो. जे की आधीच प्रमाणित केले आहे. गीता अध्याय ८ श्लोक १६ मध्ये म्हटले आहे की ब्रह्मलोक प्रर्यंत सगळे लोक पुनरावर्ती आहेत. म्हणजेच ब्रह्मलोकी गेलेले साधक सुद्धा पुनः फिरून विश्वातील जन्म-मृत्युच्या चक्रात पडून फिरत राहतात.

काल ब्रह्मची साधना केल्याने गीता अध्याय १५ श्लोक ४ मध्ये सांगितलेला ''तत्वज्ञानाने अज्ञान दूर करून परमात्म्याच्या त्या परम पदाचा शोध घेतला पाहिजे जिथे गेल्यानंतर साधक फिरून संसारात कधी परत येत नाहीं.''

❖ गीता अध्याय ७ श्लोक १८ मध्ये गीता ज्ञान दात्याने म्हटले आहे की हे ज्ञानी आत्मा (जे चौथ्या क्रमांकाचे ब्रह्म साधक म्हटले जातात ते) उदार म्हणजेच प्रामाणिक आहे ते परंतु तत्वज्ञानाच्या अभावाने माझ्या अनुत्तम् गतितच स्थित राहिले. गीता ज्ञान दात्याने त्याच्या साधनाने प्राप्त होणाऱ्या गतिला सुद्धा अनुत्तम म्हणजेच निकृष्ट म्हटले आहे, म्हणून ब्रह्म पूजा करणे सुद्धा उचित नाहीं.

कारण :- एक चुणक नामक ऋषि ज्ञानी आत्मा होते. त्यांनी ओम् (ॐ) नाम जप आणि हठयोग हजारों वर्ष केला. त्यामुळे त्यांना सिद्धि प्राप्त झाल्या. ब्रह्मची साधना करण्याने जन्म-मृत्यु, स्वर्ग-नरक हे चक्र सदा सुरूच राहील कारण गीता अध्याय २ श्लोक १२ व गीता अध्याय ४ श्लोक ५ व गीता अध्याय १० श्लोक २ मध्ये गीता ज्ञान दाता ब्रह्मने म्हटले आहे की अर्जुन! तुझे आणि माझे अनेक जन्म झाले आहेत. तुला माहित नाहीत, मी जाणतो. तू आणि मी आणि हे सर्व राजे लोक आधीही जन्मले होते, पुढेही जन्मतील. आपण आताच जन्मलो आहोत असे अजिबात समजू नकोस. माझी उत्पत्ति महर्षिजन आणि ह्या देवता जाणत नाहींत कारण हे सर्व माझ्यापासूनच उत्पन्न झाले आहेत.

ह्यावरून स्वसिद्ध आहे की जर गीता ज्ञान दाता ब्रह्म सुद्धा जन्म-मरणाच्या अधीन आहे, तर मग ह्याचे पुजारी अमर कसे असू शकतील? त्यावरून हे सिद्ध झाले की ब्रह्मची उपासना करून कोणीही साधक मोक्ष होत नाही, गीता अध्याय १८ श्लोक ६२ मध्ये आणि अध्याय १५ श्लोक ४ मध्ये सांगितलेला तो मोक्ष प्राप्त होणार नाही. ह्या श्लोकांमध्ये गीता ज्ञान दात्याने असा स्पष्ट निर्देश दिला आहे की हे भारत! तू सर्वभावाने त्या परम अक्षर ब्रह्मला शरण जा. त्या परमात्म्याच्या कृपेनेच तू परमशान्ति आणि सनातन परमधाम म्हणजेच सत्यलोक प्राप्त होशील. तत्वज्ञान समजून त्यानंतर अज्ञान दूर करून परमात्म्याच्या त्या परमपदाचा शोध घेतला पाहिजे जिथे गेल्यानंतर साधक फिरून संसारात कधी परत येत नाहीं. विचार करा की गीता ज्ञानदाता स्व:ता जन्मतो आणि मरतो म्हणून त्याच्या साधनाने प्राप्त होणाऱ्या गतिला सुद्धा अनुत्तम म्हणजेच निकृष्ट म्हटले आहे.

आता चुणक ऋषिचा कथा प्रसंग पुढे सांगतात :- चुणक ऋषिनी ॐ (ओम्) नाम जप आणि हठ योग केला. वेदात (ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद) सांगितलेल्या भक्तिने परमात्म्याची प्राप्ति होत नाहीं. याचे प्रमाण गीता अध्याय ११ श्लोक ४७-४८ मध्ये आहे. गीता ज्ञान दाता ब्रह्म सांगतात की हे अर्जुन! मज काल ब्रह्मचे हे विराट रूप आहे. माझ्या ह्या रूपाचे दर्शन तुझ्या व्यतिरिक्त आधी कोणालाच झालेले नाही. मी तुझ्यावर अनुग्रह करून हे रूप दाखविले आहे. माझ्या ह्या रूपाचे दर्शन म्हणजेच ब्रह्म प्राप्ति ही न वेदात वर्णन केल्यानुसार विधिवत म्हणजेच ॐ नाम जपाने, ना तपाने, न हवन इत्यादी यज्ञांनी होते म्हणजेच वेदात वर्णन केल्यानुसार विधिने ब्रह्म प्राप्ति होत नाही. चुणकांसारखे ऋषिसुद्धा ब्रह्मला निराकार म्हणत राहिल्याचे हेच कारण होते. चुणक ऋषिना सिद्धि प्राप्त झाल्या. त्यामुळे त्यांना जगामध्ये कीर्ती प्राप्त झाली. सिद्धि प्राप्त साधक कोणाला श्राप देउन, तर कोणाला आशीर्वाद देऊन तर कोणावर सिद्धितून प्राप्त मंत्रांचा प्रयोग करून आपल्या वर्षानुवर्षांच्या साधनेचा व भक्तीचा नाश करतात. आणि जगात त्यांची स्तुती व प्रशंसा होऊन स्वतः परमात्मा होऊन राहतात.

एक मानधाता चक्रवर्ती राजा होता. त्याचे संपूर्ण पृथ्वीवर राज्य होते. सर्व राजे आपल्या अधीन आहेत की कोणाला स्वतंत्र होण्याची इच्छा आहे, हे त्याने एकदा तपासण्याचे ठरविले. म्हणून राजाने आपल्या खाजगी घोड़याच्या गळ्यात एक चिठ्ठी बांधली की ज्या राजाला मानधाता राजाचे मांडलिकत्व मान्य नसेल, त्याने ह्या घोड्याला पकडून युद्धासाठी

तयार राहावे. राजाकडे ७२ अक्षौणी सेना आहे. त्या घोडयासोबत शेकडो सैनिकसुद्धा गेले. सगळी पृथ्वी पालथी घातली. कोणत्याही राजाने त्या घोड़याला पकड़ले नाहीं. ह्यावरून स्पष्ट झाले की सगळ्या पृथ्वीवरील छोटया राजानी चक्रवर्ती शासक म्हणून मानधाता राजाच्या आधीन असल्याचे मान्य केले. घोड़या सोबत असलेले सर्व सैनिक आनंदाने परतत होते. रस्त्यात ऋषि चुणकांची कुटि होती. चुणक ऋषिनी घोड्यांवर स्वार सैनिकांना विचरले की हे सैनिकांनो! कुठे गेला होतात? ह्या घोड़यावरील स्वार कुठे गेला? सैनिकांनी ऋषिजींना सर्व गोष्ट सांगितली. ऋषिनी म्हटले कोणत्याच राजाने मानधाता राजाचे युद्धाचे आव्हान स्वीकारले नाहीं? सैनिक म्हणाले की आमच्या राजाशी युद्ध करू शकेल असा कोणी आहे का ज्याच्या बाहुमध्ये एवढी शक्ती आहे किंवा असा कोणी आईचे दुध प्यायलेला लाल आहे? राजा जवळ ७२ अक्षौणी म्हणजेच ७२ करोड़ सैन्य आहे. युद्ध करण्याची कोणी हिम्मत केलीच, तर त्याला मुळापासून उखडून फेकू. काल ब्रह्माचे पुजारी असलेल्या ऋषि चुणकांनी म्हटले की हे सैनिकहो! आपल्या राजाचे युद्धाचे आव्हान मी स्वीकारले आहे. हा घोड़ा बांधा माझ्या कुटिमधील वृक्षाला. सैनिक म्हणाले की हे कंगाल माणसा! खाण्यासाठी तुझ्याकडे दाणा नाही. राजा मानधाताशी तू काय युद्ध करणार? गुपचूप आपली भक्ति कर, कशाला नको ती शहामत ओढवून घेतो आहेस? ऋषिनी म्हटले, जे काय होईल ते बघू. जा, सांगा तुमच्या राजाला की तुमचे युद्धाचे आव्हान चुणक ऋषिने स्वीकारले आहे. राजाला समजले तेव्हा त्याने विचार केला की आज एका कंगाल माथेफिरू ऋषिला हिम्मत झाली आहे, उद्या अन्य कोणाची हिम्मत होईल. वाईट गोष्ट सुरवातीलाच संपवली पाहिजे. जनतेला भयभीत करण्यासाठी एका व्यक्तिला मारण्यासाठी राजाचे ७२ करोड़ सैन्य चार तुकड्यांमध्ये विभागले गेले. एक १८ करोड़ सैनिकांची पहिली तुकडी ऋषिशी युद्ध करण्यास पाठविली गेली. काल ब्रह्मचे पुजारी चुणक ऋषिनी सिद्धि शक्तिने चार पुतळ्या बनविलया म्हणजेच चार परमाणु बॉम्ब तयार केले. एक पुतळी सोडली, तिने १८ करोड़ सेनेचा वध केला. राजा ने दूसरी तूकड़ी पाठविली. ऋषिजींनी दूसरी पुतळी सोडली. अशा प्रकारे राजा मानधाताच्या ७२ अक्षौणी सेनेचा नाश काल ब्रह्मचे पुजारी चुणकांनी केला.

विचार करा :- ऋषि-महर्षिनी राजाच्या मध्ये टांग टाकून त्याची अडवणूक करून नये. कारण असे आहे की ऋषिजनांनी हजारों वर्ष ॐ नामाचा जप परमात्मा प्राप्त करण्यासाठी केला. परमात्मा प्राप्त झाला नाहीं कारण गीता अध्याय ११ श्लोक ४७-४८ मध्ये लिहिले आहे की वेदांत (चारों वेदों ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद) वर्णन केल्यानुसार भक्ति केल्याने ब्रह्म प्राप्ति होत नाहीं. म्हणूनच ह्या ऋषिंना सिद्धि प्राप्त होतात. अज्ञानामुळे त्याच भूल-भूलैय्याला हे भक्तिचे फळ समजून बसले. त्यामुळे भक्ति करून सुद्धा जिथे गेल्यानंतर पुनः जन्म होत नाहीं असे पद प्राप्त करू शकले नाहीत कारण त्यांना कोणी तत्वदर्शी संत भेटलेच नाहींत. सूक्ष्म वेदात म्हटले आहे की :-

कबीर, गुरू बिन काहू न पाया ज्ञाना, ज्यों थोथा भुस छड़े मूढ़ किसाना।
गुरू बिन वेद पढ़े जो प्राणी, समझे न सार रहे अज्ञानी।।
गरीब, बहतर क्षौणी खा गया, चुणक ऋषिश्वर एक। देह धारें जौरा फिरें, सबही काल के भेष।।

भावार्थ :- तत्वदर्शी संत गुरू न भेटल्यामुळे साधक जी साधना करतात, ती शास्त्र विधिनुसार न होता. मनमानी आचरण होते ज्याचा साधकाला काहीच लाभ होत नाहीं. गीता अध्याय १६ श्लोक २३-२४ मध्ये प्रमाण आहे की हे भारत! जो साधक शास्त्र विधिला सोडून मनमानी आचरण करतो आहे, त्याला ना सुख, ना सिद्धि आणि ना त्याची गति प्राप्त होते

म्हणजेच मोक्ष प्राप्त होत नाही. त्यामुळे कोणती साधना करावी आणि करू नये यासाठी तुझ्यासमोर शास्त्रेच प्रमाण आहे.

गुरूशिवाय म्हणजेच तत्वदर्शी संतांच्या शिवाय तुम्ही चारही वेद वाचा किंवा पाठ केले ज्याप्रमाणे पूर्वीचे ब्राम्हण वेद मंत्र लक्षात ठेवत असत. चारही वेदांचे मंत्र पाठ करणाऱ्यांना चतुर्वेदी म्हणत असत. तीन वेदांचे मंत्र पाठ करणाऱ्यांना त्रिवेदी म्हणत असत. परंतु त्यांना वेदांमधील गूढ़ रहस्यांचे ज्ञान नस्ल्यामुळे ते ऋषिजन वेदांचे पाठांतर करूनही अज्ञानीच राहिले. सूक्ष्मवेदात म्हटले आहे की :-

''पीठ मनुखा दाख लदी है, ऊँट खात बबूल।''

भावार्थ असा की पूर्वी वाळवंटातून मनुका व द्राक्षे ऊँटाच्या पाठीवर लादून नेल्या जात असत. ऊँटाच्या पाठीवर तर इतक्या स्वादिष्ट मनुका व द्राक्षे लादलेल्या असायच्या आणि स्वतः मात्र बाभळीच्या झाडाच्या काटयामधून तोंड घालून बाभळीची पाने खात असे. ज्ञानाशिवाय सर्व ऋषि चारही वेद रूपी मनुका व द्राक्षे लादून फिरत असत आणि पूजा करत काल ब्रह्मरूपी बाभळीची; त्यामुळे त्यांना ना सनातन परम धाम ना परम शांति, काहीच प्राप्त झाले नाही. मग सूक्ष्मवेदात म्हटले आहे की :-

बनजारे के बैल ज्यों, फिरा देश-विदेश। खाण्ड छोड़ भुष खात है, बिन सतगुरू उपदेश।।

भावार्थ आहे की पूर्वी व्यापारी लोक बैलांवर गाढवासारखी पोती ठेऊन त्यात गुळ भरून घेऊन गावोगाव जायचे. बैलाच्या पाठीवर गुळाची पोती आहेत, ते स्वतः बैल भूस खात असे. त्याप्रमाणे गुरू कडून तत्वज्ञान न मिळाल्याने ऋषिजन वेदरूपी गुळ (साखर) कण्ठस्थ तर करत असत, परंतु त्यांना समजून न घेता साधना मात्र वेदाच्या विरूद्ध करत असत,

उदाहरण म्हणून :-

श्री देवी पुराणाच्या (सचित्र मोटा टाईप केवल हिन्दी गीता प्रैस गोरखपुर से प्रकाशित) ५व्या स्कंदात पृष्ठ ४१४ वर लिहिले आहे :- वेद व्यासजींनी म्हटले की सत्ययुगात वेदांचे पूर्ण ज्ञान असलेले विद्धान ब्राह्मण होते. ते देवी म्हणजेच श्री दुर्गाजीची पूजा करत असत. प्रत्येक गावात श्री देवीजींचे मंदिर बांधण्याची त्यांची प्रबल इच्छा होती.

साधकांनी विचार करावा :-

चारही वेदांमध्ये आणि याच वेदांच्या सारांश श्रीमद् भगवत गीतेत कुठेही देवीची पूजा करण्याचा निर्देश नाहीं आहे तर सत्ययुगातील ब्राह्मण कसले वेदांचे विद्वान असणार आहेत? याच श्री देवी पुराणाच्या ७ व्या स्कंदात पृष्ठ ५६२-५६३ वर श्री देवीजींनी राजा हिमालयास म्हटले होते की तू माझी पूजा सुद्धा सोडून दे. जर ब्रह्म प्राप्तिची इच्छा असेल, तर सगळयाचा त्याग करून फक्त ओम् (ॐ) मंत्राचा जप कर. हा ब्रह्मचा मंत्र आहे. त्यायोगे ब्रह्मला प्राप्त होशील. ते ब्रह्म ब्रह्मलोक रूपी दिव्य आकाशात स्थित आहे. साधकांना सहजच समजले असेल की जर सत्ययुगातील ब्राह्मणांचे हे ज्ञान आणि साधना असेल तर वर्तमानातील ब्राह्मणांचे ज्ञान काय असेल? याच श्री देवी पुराणाच्या ५व्या स्कन्दातील पृष्ठ ४१४ वर हेही लिहिले आहे की सत्ययुगात जे राक्षस समजले जात, ते कलियुगात ब्राह्मण समजले जात आहेत. ब्राह्मण म्हणजे कोणती विशेष जाति नाहीं आहे. जो परमात्मा म्हणजेच ब्रह्मच्या प्राप्तीसाठी प्रयत्नशील आहे, त्यालाच ब्राह्मण म्हणतात, मग तो कुठल्याही जातिचा का असेना. वर्तमानात परंपरागत ब्राह्मण कमी आहेत. संतरूपाने ब्रह्मज्ञान देणारे अधिक आहेत. जे ब्राह्मण म्हणजेच मार्गदर्शक गुरू म्हणवतात ते तत्वज्ञानहीन आहेत. त्यामुळेच म्हटले आहे

की तत्वदर्शी गुरू शिवाय कोणालाच वेदांच्या गूढ़ रहस्यांचे ज्ञान झाले नाहीं. त्यामुळे वेद कंठस्थ करत असत परंतु साधना मात्र वेदांच्या विरूद्ध करत असत. वेद व गीतेत तिन्ही देवतांची (श्री ब्रह्माजी, श्री विष्णुजी आणि श्री शंकरजी) पूजा निषिद्ध आहे. सर्व ज्ञानहीन संतांनी याच तिन्ही तीनों देवतांवर हिन्दू समाजला केन्द्रित करून ठेवले आहे. आणि हिंदूसुद्धा श्री देवी दुर्गा आणि विष्णुजी, शंकरजी यांची भक्ति करत आहेत. हे लोकवेदातील (दंत कथा) ज्ञान आधीपासूनच चालत आलेले आहे व तेच आज माझ्या समोर भिंत म्हणून उभे आहे. मी शास्त्रोक्त ज्ञान सांगतो, प्रोजैक्टरवर दाखवतो. परंतु आधीच्याच अज्ञानाला सत्य समजणाऱ्याना डोळ्याने सत्य पाहूनसुद्धा विश्वास बसत नाहीं. विरोध करतात तुरुंगात पाठवितात.

सूक्ष्मवेदात म्हटले आहे की:-

गरीब, वेद पढ़ैं पर भेद न जानें, बाँचैं पुराण अठारह। पत्थर की पूजा करें, बिसरे सिरजनहारा।।

भावार्थ असा की वेद आणि अठरा पुराणे वाचतात आणि मूर्तिची पूजा करतात. वेदोक्त असलेल्या सर्वसृजनहार परम अक्षर ब्रह्मला विसरले आहेत. अन्य देवांची पूजा करून त्या परम शक्ति आणि सनातन परम धाम म्हणजेच परमात्म्याच्या त्या परमपदा पासून वंचित रहात आहेत. हे गीता अध्याय १८ श्लोक ६२ आणि अध्याय १५ श्लोक ४ मध्ये म्हटले आहे. सूक्ष्मवेदात लिहिले आहे की :-

गुरूवां गाम बिगाड़े संतो, गुरूवां गाम बिगाड़े। ऐसे कर्म जीव के ला दिए, फिर झड़ैं नहीं झाड़े।।

भावार्थ आहे की वेद ज्ञानहीन व तत्वज्ञानाचा परीचय नसलेल्या गुरुंनी गावोगावी शास्त्राविरूद्ध ज्ञान व भक्तिचे अज्ञान सांगून त्यांना इतके भ्रमित केले की आता ते समजावून सुद्धा शास्त्राविरूद्ध असलेल्या साधनेचा त्याग करण्यास तयार होत नाहीत.

गीता अध्याय १६ श्लोक २३ मध्ये लिहिले आहे की शास्त्र विधि त्यागून मनमानी आचरण करण्याने ना सिद्धि ना सुख ना गति काहीच प्राप्त होत नाही म्हणजेच व्यर्थ साधना आहे.

दूसरीकडे आपण चुणक ऋषिंच्या कथेत पहिले की ऋषि चुणकांना सिद्धि प्राप्त होत्या. साधकांनी हे समजून घेतले पाहिजे की सिद्धि हे भक्तिचे भुस्याप्रमाणे आहे, ज्याप्रमाणे घवाचा भूसा (तूड़ा) असतो, ज्यात अनेक तुसे असतात. पशुने खाल्ल्यावर तोंडात जखमा होतात. चुणक ऋषिना ह्या सिद्धि काल ब्रह्मच्या भक्तिमुळे प्राप्त झाल्या होत्या.

ज्या सिद्धी शास्त्रविधिनुसार भक्ति करण्याने प्राप्त होतात, त्याना गव्हाची तुसे (भूसा) समजून पशुंच्या खाण्यासाठी सुगम आणि उपयोगी असल्याचे समजावे. भावार्थ असा आहे की शास्त्रविधिनुसार साधना न केल्याने ज्या सिद्धि प्राप्त होतात त्या साधकाला नष्ट करतात. कारण अज्ञानातून ऋषिजन त्यांचा प्रयोग करून कोणाचे तरी नुकसान करतात. कोणाला आशीर्वाद देऊन आपल्या भक्तिची शक्ति जी ओम (ॐ) नामाच्या जपामुळे होते ते संपवून पुन्हा खाक होतात.

जसे चुणक यांनी मानधाता चक्रवर्ती राजाच्या ७२ करोड़ सेनेचा नाश करून आपल्या भक्तिच्या सिद्धिसुद्धा घालवून बसले. सूक्ष्मवेदात म्हटले आहे की :-

गरीब, बहतर क्षौणी क्षय करी, चुणक ऋषिश्वर एक। देह धारें जौरा (मृत्यु) फिरैं, सब ही काल के भेष।।

भावार्थ :- ऋषिमध्ये सर्वश्रेष्ठ ऋषि चुणकांनी ७२ करोड़ सेनेचा नाश केला. दिसायला हे महात्मा दिसतात, पण जरा ह्यांच्या जवळ गेले की हे सापासारखे निघतात. थोड्याच्या गोष्टीवर शाप द्यायचा, कुणाशी विनाकारण वाद करायचा हे यांच्यासाठी नेहमीचे गोष्ट असते.

## ''ऋषि दुर्वासांची कारगुजारी''

❖ एक दुर्वास नामक काल ब्रह्मचे पुजारी (ब्रह्म साधक) होते. ते रस्त्याने चालले होते. रस्त्यामध्ये एक अप्सरा (स्वर्गातील स्त्री) सुंदर मोत्यांची माळ घालून उभी होती. दुर्वासा ऋषिनी म्हटले की ही माळ मला दे. देवपरीला माहित होते की हे ऋषि तर सर्पासारखे आहेत, जर नाही म्हटले, तर शाप देतात. त्या अप्सरेने लगेच ती माळ गळ्यातून काढली आणि आदरपूर्वक ऋषिना सोपविली. दुर्वासा ऋषिनी ती माळ डोक्यावरील केसांच्या बांधलेल्या खोप्यावर लावली व चालले होते. समोरून स्वर्गाचा राजा इन्द्र आपल्या ऐरावत हत्तीवर बसून येत होता. त्याच्या पुढे अप्सरा आणि गंधर्वजन वाजत गाजत चालले होते, आणि करोड़ो देवी–देवता सुद्धा सोबत सन्मानाने चालले होते. दुर्वासा ऋषिनी माळ आपल्या डोक्यावरुन उचलून इन्द्राकडे फेकली इंन्द्राने ती माळ हत्तीच्या मस्तकावर ठेवली. हत्तीने ती माळ आपल्या सोंडेने उचलून जमीनीवर फेकली. जर इन्द्राच्या एखाद्या भक्ताने किंवा देवाने फुलांची माळ भेंट दिली तर इंन्द्र हत्तीवर बसला असेल तर ती हत्तीच्या मस्तकावर ठेवत असे. हत्ती ती उचलून खाली फेकत असे. त्याच पद्धतीला अनुसरून हत्तीने ती माळ जमिनीवर फेकली.

ह्या गोष्टीचा दुर्वासा ऋषिना अतिशय राग आला आणि ते म्हणाले की हे इन्द्र! तुला तुझ्या राज्याचा अहंकार झाला आहे. मी दिलेल्या माळेचा तू अनादर केला आहेस. मी तुला शाप देतो की तुझे राज्य नष्ट होईल. देवराज इन्द्र एकदम घाबरले आणि म्हणाले हे विप्र! मी आपल्या माळेचे आदरपूर्वक ग्रहण करून हत्तीवर ठेवली होती. हत्तीने त्याच्या औपचारिकतेनुसार खाली फेकली. मला क्षमा करा. वारंवार हात जोडून आणि हत्तीवरून खाली उतरून साष्टांग नमस्कार घालून इन्द्राने क्षमायाचना केली परंतु दुर्वासा ऋषी माणले नाही आणि म्हटले की जे मी म्हटले ते होणारच. ते परत फिरवता येणार नाही. काही वेळातच इन्द्राचा सर्वनाश झाला आणि स्वर्ग उजाड़ झाला.

❖ एकदा ऋषि दुर्वासाजी द्वारका नगरीजवळील वनात काही वेळासाठी थांबले होते. द्वारकावासियांना दुर्वासाजी आपल्या नगरी जवळ असल्याचे समजले. ते त्रिकाळदर्शी महात्मा आहेत, सिद्धियुक्त ऋषि आहेत. द्वारकावासी श्री कृष्णापेक्षा कोणालाही अधिक शक्तिशाली मानत नसत. श्री कृष्णाचा पुत्र श्री प्रद्यूमन याच्यासहित अनेक यादवांनी विचार केला दुर्वासजी त्रिकाळदर्शी आहेत, आपल्या मनात आहे, ते सांगतात, अन्तर्यामी आहेत, असे ऐकले आहे, तर आपण त्यांची परीक्षा घेऊया. असा विचार करून प्रद्यूमनाला गर्भवती स्त्रीचे सोंग बनवून दहा–बारा व्यक्ति सोबत निघाल्या. एका माणसाला पति बनवले. दुर्वासजी कडे जाऊन म्हटले की हे ऋषिवर! ह्या स्त्रीवर परमात्म्याने अनेक दिवसांनी कृपा केली आहे. ती गरोदर राहिली आहे आणि हा हिचा पती आहे. त्यांना अतिशय उत्सुकता लागली आहे की गर्भ मुलाचा आहे की कन्येचा? आपण तर अन्तर्यामी आहात. कृपया सांगा? त्यांनी प्रद्यूमनाच्या पोटवर एक छोटी कढ़ई बांधून ठेवली होती, त्यावर कापूस आणि जुनी वस्त्रे बांधून गर्भ बनविला होता आणि वर स्त्री वस्त्र परिधान केले होते. दुर्वासा ऋषिजींनी दिव्य दृष्टिने पाहून जाणले की हे आपली खिल्ली उडवत आहेत. दुर्वासजींनी म्हटले की ह्या गर्भाने यादव कुलाचा नाश होईल, असे म्हणून ते क्रोधित झाले. सर्वजण तिथून निघून गेले.

नगरात ही गोष्ट वाऱ्यासारखी पसरली की दुर्वासा ऋषिजींनी यादवांचा नाश होईल असा शाप दिला आहे. त्यांना खात्री होती की सर्वशक्तिमान परमेश्वर अखिल ब्रह्मांण्डाचे नायक श्री कृष्ण आपल्या पाठीशी आहेत. दुर्वासांच्या शापाचा आपल्यावर काहीच प्रभाव पडणार

नाही. तरीसुद्धा काही सुज्ञ यादव एकत्रीत श्री कृष्णजीकडे गेले आणि दुर्वासा ऋषिची मुलांनी केलेली गम्मत आणि दुर्वासा ऋषिकडून मिळालेल्या शापाचा वृत्तांत सांगितला. सर्व ऐकून श्री कृष्णजींनी थोडा वेळ विचार करून म्हटले की त्या मुलांना घेऊन दुर्वासजी कडे जा आणि क्षमायाचना करा. दुर्वासजींकडे गेले, क्षमा याचना केली, परंतु दुर्वासानी म्हटले की मी जे बोललो ते परत घेतायेत नाही.

सर्वजण परत श्री कृष्णजीकडे आले आणि सर्व काय घडले ते सांगितले. द्वारकेत कोणी स्वयंपाकपण केला नाही. सर्व नगर चिन्ताक्रांत झाले. श्री कृष्णजींनी म्हटले की काळजी कशाला करता? जो वस्तु गर्भरूपात प्रयोग केली होती, त्यानेच तर आपला विनाश होणार असल्याचे सांगितले आहे. असे करा, कपड़े आणि कापूस जाळून आणि लोखंडाच्या कढ़ई दगडावर घासून प्रभास क्षेत्रात (यमुना नदीच्या कीनाऱ्यावर असलेल्या एका जागेचे नाव आहे. यमुना नदीत टाकून द्या. तिथेच बसून घासा आणि तोच चुरा आणि कपड्याची राख नदीत विसर्जन करा. न रहेगा बाँस, न बजेगी बाँसुरी. जर गर्भाच्या वस्तुच राहणार नाहींत तर आपला विनाश कसा होईल? ही गोष्ट द्वारिकावासियांना पटली आणि ते स्वतःला संकटमुक्त झाल्याचे समजू लागले. श्री कृष्णजींच्या आदेशा प्रमाणे सर्व केले गेले. कढ़ईची एक कडा संपूर्ण घासली गेली नाही. ती तशीच यमुना नदीत फेकली. एका मासोळीने तो चमकीला खाद्य पदार्थ समजून खाऊन घेतला. त्या मासोळीला बालीया नावाचा एका भिल्लाने पकड़ले. जेंव्हा मासा चिरला तेव्हा त्यातून निघालेल्या धातूची तपासणी केली, आणि आपल्या बाणांच्या पुढल्या भागात विषयुक्त करून लावले व ते काळजीपूर्वक ठेऊन दिले. कढ़ईच्या लोखंडाचा चूरा पाण्यात टाकला होता, ते लांब कटेरी गवताच्या स्वरुपात यमुना नदीच्या कीनारी उगवले.

काही कालावधीनंतर द्वारका नगरीत गोंधळ माजला. छोटया-छोट्या बाबींवरून एक दुसऱ्याला ठार मारू लागला. आपसातील वैर-विरोध वाढले. नगरातील लोकांची ही दशा पाहून नगरातील मान्यवर व्यक्ति परमेश्वर श्री कृष्णजीकडे गेल्या आणि नगरात जे काही होत होते, ते सांगितले आणि त्याचे कारण आणि त्यावरील उपाय श्री कृष्णजींना विचारला. कारण श्री कृष्णजी यादव आणि पाण्डवांचे आध्यात्मिक गुरू होते. संकटाचे निवारण गुरूदेवांकडूनच करविले जाते. श्री कृष्णजींनी कारण सांगितले की दुर्वास ऋषिच्या शापाचे हे फळ आहे. उपाय एवढाच आहे की सर्व यादव पुरुषांनी मग भलेही तो आज जन्मलेला मुलगा का असेना, सर्वांनी प्रभास क्षेत्रात जिथे त्या कढ़ईचा चुरा टाकला होता, तिथे जाऊन यमुना नदीत स्नान केल्यास सर्व श्रापमुक्त व्हाल. सर्व द्वारिकावासियांनी श्री कृष्णजींच्या आदेशाचे पालन केले. सर्व यादव पुरुष प्रभास क्षेत्रात श्रापमुक्त होण्यासाठी स्नान करण्यास गेले. दुर्वासा ऋषिच्या श्रापामुळे सर्व यादव आपला समूह बनवून एकत्र झाले. आधी स्नान केल्यास श्रापमुक्त झाल्यानंतर आपसातील मतभेद दूर होण्याची शक्यता आहे. परंतु असे काहीच झाले नाही. आधी सर्वांनी स्नान केले, मग आपसात शिव्यागाळी सुरू झाली. मग तेच गवत काढून एकमेकांना मारायला लागले. जे गवत लोखंडाच्या कढ़ईच्या चूर्णापसून उगवले होते, ते तलवारीसारखे काम करू लागले. गवत फेकून मारताच शीर धड़ापासून वेगळी झाली. अशा प्रकारे सर्व यादव आपसात लढून मृत्यु पावले. दोन-चारशे वाचले होते. त्याच वेळी श्री कृष्णजीसुद्धा तिथे पोहोचले. त्यांनी सुद्धा ते गवत उपटले. त्याचे लोखंडी मुसळ झाले. वाचलेल्या आपल्या कुलातील व्यक्तींचा स्वतः श्री कृष्णजींनी वध केला.

त्यानंतर श्री कृष्णजी एका वृक्षाखाली विश्रांती घेत होते. तेवढ्यात दैवयोगाने ज्या बालीया नावाचा भिल्लाने त्या लोखंडाच्या कढ़ईचे विषयुक्त बाण (**Arrow**) बनवले होते, ते

घेऊन बालिया शिकारीच्या शोधार्थ श्रीकृष्ण विश्रांती घेत असलेल्या त्या जागी आला. श्री कृष्णजीचा उजव्या पायाचा तळपायावर पदम चिन्ह होते आणि तो चम चमकत होता. वृक्षाच्या फांद्या खालपर्यंत आल्या होत्या. त्यांच्या जंजाळात पद्मासनातील तळव्याची चमक स्पष्ट दिसत नव्हती. बालीया भिल्लाला वाटले की हे चमकणारे हरणाचे डोळे वाटत आहेत. म्हणून त्याने हरणाला मारण्याच्या उद्देशाने बाण चालवला. जेंव्हा बाण श्री कृष्णजींना लागला, तेव्हा श्रीकृष्णजींच्या तोंडून म्हटले मेलो मेलो! असे उद्गार निघाले. बालीया भिल्लाला लक्षात आले की बाण कोणत्यातरी व्यक्तिला लागला आहे. तिथे धावत गेला आणि पाहिले तर द्वारिकाधीश तिथे दुखत असल्यामुळे तड़फडत होते. बालीयाने म्हटले की हे महाराज! माझ्याकडून चुकून बाण चालवला गेला. आपल्या पायांमधील चमकिला मी हरणाचा डोळा समजून बाण मारला माझ्याकडून चूक झाली आहे, मला क्षमा करा महाराज! श्री कृष्णजींनी म्हटले की तुझ्याकडून कोणतीही चूक झालेली नाही. हा तर तुझा आणि माझा मागल्या जन्मातील हिशोब आहे. तो मी चुकता केला आहे. तू त्रोतायुगात सुग्रीवाचा भाऊ बाली होतास, मी दशरथ पुत्र रामचंन्द्र होतो. मीसुद्धा तुला वृक्षाआडून कपटाने बाण मारला होता. ती अदला-बदल (**Tit for tat**) पूर्ण झाली आहे.

अशा प्रकारे दुर्वासा ऋषिच्या श्रापामुळे सर्व यादव कुलाचा नाश झाला. वर्तमानात जे यादव आहेत ते त्यावेळेस मातांच्या गर्भात होते व नंतर उत्पन्न झाले, त्यांचे वंशज आहेत.

सूक्ष्मवेदात लिहिले आहे :-

गरीब, दुर्वासा कोपे तहाँ, समझ न आई नीच। छप्पन करोड़ यादव कटे, मची रूधिर की कीच।।

सरलार्थ :- दुर्वासानी मुलांची गम्मत इतक्या गांभीर्याने घेतली की त्यांच्या कुलाचा नाश करण्याचा श्राप दिला. त्या नीच दुर्वासाने याचाही विचार केला नाही की ह्यामुळे काय अनर्थ होणार आहे? खास असे काहीच नव्हते, नीच दुर्वासा ऋषिनी इतके अत्याचार केले की छप्पन करोड़ यादव मृत्युमुखी पडले आणि तिथे रक्त वाहिल्याने चिखल झाला.

त्याच प्रकारे चुणक ऋषिनी उगाच भांडण उकरून काढून मानधाता राजाच्या ७२ करोड़ सेनेचा नाश केला.

❖ एक कपिल नामक ऋषि होते. त्यांना भगवान विष्णुच्या २४ अवतारांपैकी एक अवतार समजले जाते. ते तपस्या करत होते.

एक सगड़ नामक राजा होता. त्याला ६० हजार पुत्र होते. कोण्या ऋषिनी सांगितले की जर एक तलाव, एक विहीर, एक बगीचा बनविला, तर त्याचे फळ एक अश्वमेघ यज्ञापेक्षा सरस असते. राजा सगड़च्या मुलांनी हे काम सुरु केले. सुज्ञ लोकांनी त्यांना म्हटले की आपण जरा असे जागोजागी तलाव, विहिरी, बगीचे बनवू लागलात, तर पृथ्वीवर अन्न उत्पन्न करण्यासाठी जागाच उरणार नाही. कोण्या राजाने विरोध केला, तेव्हा त्याच्याशी युद्ध करून तो मोडून काढला. त्या राजा सगड़ाच्या मुलांनी आपल्यासोबत एक घोडा घेतला. त्याच्या गळ्यात एक चिट्ठी लिहून बांधली की जर कोणाचा आमच्या कामाला विरोध असेल तर त्याने ह्या घोड्याला पकडावे आणि आमच्याशी युद्ध करायला तयार राहावे. त्या माथेफिरूंना कोण थांबवणार? पृथ्वी देवी भगवान विष्णुजी जवळ गेल्या एका गाईचे रूप धारण करून म्हटले की हे भगवान! पृथ्वीवर एक सगड़ राजा आहे. त्याचे ६० हजार पुत्र आहेत. त्यांना अशी सनक सुटली आहे की ते मलाच खंदत सुटले आहेत. तिथे लोकांना खायला अन्नसुद्धा उगवू शकत नाही आहे. परमेश्वर विष्णुनी सांगितले, तुम्ही जा.आता ते काही करणार नाहीत. भगवान विष्णुनी देवराज

इन्द्राला बोलावले आणि समजावले की राजा सघड़ाचे ६0 हजार पुत्र यज्ञ करताहेत. जर त्यांचे १00 यज्ञ पूर्ण झाले, तर तुझे सिंहासन त्यांना द्यावे लागेल. काही करता येणे शक्य असेल तर वेळेतच कर. इंन्द्राने हलकारे म्हणजेच आपले नौकर पाठविले आणि त्यांना सगळे समजावले. रात्रीच्या वेळी राजा सगडाचे पुत्र झोपले होते. घोड़ा वृक्षाला बांधलेला होता. त्या देवराज इद्राच्या दूतांनी घोडा सोडून कपिल तपस्वी मुनींच्या मांडीवर बांधला. कपिल ऋषि अनेक वर्ष तपस्या करत होते. त्यामुळे त्यांचे शरीर अस्थिपिंजर झाले होते. त्यांनी पद्मासन घातले होते. पाय बारीक होते. ज्याप्रमाणे वृक्षाच्या मुळाची माती पावसांच्या पाण्याने वाहून जाते आणि मुळांमध्ये ६-७ इच अन्तर (Gap) पडते, तसे कपिल ऋषिजीचे पाय झाले होते. इंन्द्राच्या दूतांनी घोड्याला ऋषीच्या पायाच्या मांडीजवळ दोरीने बांधले होते.

राजाच्या मुलांनी सकाळी उठून पाहिले, तर घोड़ा नव्हता. त्याला शोधण्याच्या तयारीने ६0 हजार मुलांचे कळपच्या कळप बाहेर पडले. घोड़याच्या पावलांच्या चिन्हांच्या मागावरून कपिल मुनिंच्या आश्रमात पोहोचले. घोड़याला बांधलेले पाहून सगड़ राजाच्या मुलांनी ऋषिच्या पोटात भाले खुपसले. कपिल ऋषिच्या पापण्या इतक्या वाढून जमिनीला टेकल्या होत्या. ऋषिना त्रास झाला तसे रागाने पापण्या उचलल्या तसे डोळ्यातून अग्नि बाण सुटले. ६0 हजार सगड़ पुत्रांच्या सेनेची जणू गादी तयार झाली. म्हणजेच ६0 हजार सगड़पुत्र मृत्यू पावले.

सूक्ष्मवेदात म्हटले आहे की :-

६० हजार सगड़ के होते, कपिल मुनिश्वर खाए। जै परमेश्वर की करें भक्ति, तो अजर-अमर हो जाए।।
७२ क्षौणी खा गया, चुणक ऋषिश्वर एक। देह धारें जौरा फिरैं, सभी काल के भेष।।
दुर्वासा कोपे तहाँ, समझ न आई नीच। ५६ करोड़ यादव कटे, मची रूधिर की कीच।।

भावार्थ :- कपिल मुनिजी, चुणक मुनिजी आणि दुर्वासा मुनिजी जगात किती प्रसिद्ध आहेत. हे सगळे काल ब्रह्मची भक्ति करणारे वेषधारी ऋषि आहेत. हे चालते-फिरते मृत्यू होते. मनुष्य रूपातील चालती-फिरती घाल आहेत. (घाल = एक मातीचे छोटे मडके जे तांत्रिक विद्येने आकाशात उड़वून शत्रूवर सोडले जाते. त्याने अतिशय हानी होते.) भोळे लोक चुकीने यांना महात्मा मानतात.

हे सर्व ज्ञानी आत्मे उदार हृदयी होते.यांनी परमात्म्याच्या प्राप्तिसाठी व आपले कल्याण करवून घेण्यासाठी तन-मन-धन अर्पित केले होते. परंतु तत्वदर्शी संत न भेटल्याने त्यांनी काल ब्रह्मला एक समर्थ प्रभु समजून चूक केली होती आणि ओम् (ॐ) नाम जप करून आणि अधिक हठयोग समाधि द्वारे त्याचीच साधना केली. त्यामुळे परमात्म्याची प्राप्ति झाली नाहीच, उलट हानिच होते कारण ही साधनाच शास्त्राविरूद्ध आहे.

गीता अध्याय १६ श्लोक २३-२४ मध्ये म्हटले आहे की शास्त्रविधिचा त्याग करून जे मनमानी आचरण करत आहेत, त्यांची साधना व्यर्थ आहे. ते उदार हृदयी आत्मे ह्याच कारणाने काल ब्रह्मच्या अनुत्तम गतित राहिले.

गीता अध्याय १७ श्लोक ५-६ म्हटले आहे की :-

❖ जो मनुष्य शास्त्र विधि शिवाय केवळ मनाने कल्पित घोर तप करतात आणि दंभ अहंकार युक्त, कामना आसक्ति अभिमान युक्त आहेत. (गीता अध्याय १७ श्लोक ५)

❖ शरीरात स्थित सर्व कमलांमध्ये देव शक्ति आणि पूर्ण परमात्मा आणि मला सुद्धा कृश करणाऱ्या म्हणजेच कष्ट देणाऱ्या अज्ञानि लोकांना तू असुर स्वभावाचे जाण. (गीता अध्याय १७ श्लोक ६)

❖ हेच प्रमाण गीता अध्याय १६ श्लोक १७ ते २० मध्ये आहे.

❖ ते स्वतःला श्रेष्ठ समजणारे गर्विष्ठ पुरूष धन आणि सन्मानाच्या गर्वाने केवळ नाममात्र यज्ञांच्याद्वारे पाखण्ड करून शास्त्रविधि नसलेले पूजन करतात. (गीता अध्याय १६ श्लोक १७)

❖ अहंकार, ताकद, गर्व, कामना, क्रोध इत्यादीच्या अधीन असलेले व दूसऱ्यांची निन्दा करणारे पुरूष आपल्या आणि दूसऱ्यांच्या शरीरात स्थित माझा द्वेष करणारे असतात. (गीता अध्याय १६ श्लोक १८)

❖ त्या द्वेष करणाऱ्या पापाचारी क्रूरकर्मी शब्दाने ''ज्या वचनाने करोंडो व्यक्तिंची हत्या करणाऱ्या'' नराधमांची म्हणजेच नीच मनुष्यांना मी मृत्यूलोकात वारंवार आसुरी म्हणजेच राक्षसी योनितच टाकतो. (गीता अध्याय १६ श्लोक १९) सूक्ष्मवेदात यांना नीच म्हटले आहे

दुर्वासा कोपे तहाँ, समझ न आई नीच। ५६ करोड़ यादव कटे, मची रूधीर की कीच।।

❖ हे अर्जुना! ते मूर्ख मला प्राप्त न करून घेता जन्मोजन्मी आसुरी योनित प्राप्त होत आहेत. त्यामुळे त्यांना अति नीच गति प्राप्त होते आहे. म्हणजेच घोर नरकात जाऊन पडतात. (गीता अध्याय १७ श्लोक २०)

उपरोक्त प्रमाणांवरून सिद्ध झाले की गीता अध्याय ७ श्लोक १८ मध्ये गीता ज्ञान दात्याने आपल्या साधनेने प्राप्त होणाऱ्या गतिला सुद्धा म्हणूनच अनुत्तम म्हणजेच निकृष्ट सांगितले आहे. म्हटले आहे की :-

❖ गीता अध्याय ७ श्लोक १८ = गीता ज्ञान दात्याने म्हटले आहे की जे चवथ्या प्रकारचे ज्ञानी साधक आहेत, ते सगळे उदार अवश्य आहेत कारण परमात्म्याला प्राप्त करण्यासाठी आपले शरीर नष्ट होण्याची सुद्धा काळजी केली नाही आणि हजारों वर्ष भूकेल्या-तहानलेल्या अवस्थेत साधनारत राहिले, परंतु तत्वदर्शी संत न भेटल्यामुळे ते सगळे माझ्या अनुत्तम म्हणजेच निकृष्ट गतिला म्हणजेच ब्रह्म साधनेने न होणाऱ्या मोक्षस्थितीत जे वरील ऋषिंचे झाले, त्याच स्थितीत राहिले म्हणजेच जन्म-मरण, चौरयांशी लाख योनिंच्या चक्रात फिरत राहिले. (गीता अध्याय ७ श्लोक १८)

❖ निष्कर्ष :- चुणक ऋषि, दुर्वासा ऋषि आणि कपिल ऋषिनी जो ओम् (ॐ) नाम जप केला, त्या भक्तिचे फलस्वरूप ते काही कालासाठी ब्रह्म लोकात जातील. तिथे भक्ति संपवून परत पृथ्वीवर राजा होतील कारण सूक्ष्मवेदात लिहिले आहे :-

तप से राज, राज मध मानम्, जन्म तीसरे शुकर स्वानम्।

मग कुत्रा, गाढव होतील, नरकात जातील. जेव्हा कुत्रा होतील, तेव्हा ह्यांच्या डोक्यात किडे पडतील. ज्या व्यक्ति यांच्या श्रापाने मरण पावल्या होत्या, त्याचे पाप यांना भोगावे लागेल. कीड़े यांचे मास तुकड्या तुकड्याने खातील. त्यामुळे गीतेतसुद्धा अशा साधकां विषयी जे सांगितले आहे, ते आपण वर वाचले आहे.

❖ **उपरोक्त कथांचा सारांश :-**

१. ब्रह्म साधना अनुत्तम (निकृष्ट) आहे.

२. तीन तापांना श्री कृष्णजी सुद्धा संपवू शकले नाहीत. श्राप देणे हे त्या तीन तापांमध्येच (दैविक ताप) येतो. दुर्वासांच्या श्रापाचे स्वतः श्री कृष्णासहित सर्व यादव सुद्धा बळी ठरले.

३. श्री कृष्णजींनी श्रापमुक्त होण्यासाठी यमुनेत स्नान करण्यास सांगितले. परंतु

त्याने श्राप नष्ट झाला नाही. यादवांचा नाश व्ह्याचा तो झालाच. विचार करा :– जे अन्य संत किंवा ब्राह्मण अशा स्नान किंवा तीर्थाची वारी करण्याने संकटमुक्त करण्याचे आश्वासन देतात, ते कितपत उपयोगी आहे? अर्थातच व्यर्थ आहेत कारण जर भगवान त्रिलोकीनाथांनी सांगितलेल्या यमुना स्नानाच्या उपायाचा काही उपयोग होत नसेल, तर अन्य अर्धवट ब्राह्मण व गुरूनी सांगितलेल्या स्नान आदि उपायांचा काहीही उपयोग होणार नाही.

४. आधी श्री कृष्णजींनी दुर्वासांच्या श्रापा पासून बचाव करण्याचा उपाय सांगितला होता. ती कढ़ई घासून तिचे चूर्ण बनवून प्रभास क्षेत्री यमुना नदीत टाकण्यास सांगितले. न रहेगा बाँस, न बजेगी बाँसुरी. बांबू तर राहिलाच, ५६ करोड़ यादवांची सुद्धा बासरी वाजली?

सज्ञनहो! वर्तमानात मानव बुद्धिमान आहे, शिक्षित आहे. माझ्या कडून (संत रामपाल दास) सांगितलेल्या ज्ञानाचा शास्त्राशी मेळ घाला मग भक्ति करून पहा, काय चमत्कार होतो!

❖ विवेचन पुढे नेऊया :–

१. तिन्ही गुणांची (रजोगुण ब्रह्माजी, सतगुण विष्णुजी आणि तमोगुण शंकरजी) भक्ति करने व्यर्थ आहे हे सिद्ध झाले.

२. गीता ज्ञान दाता ब्रह्मची भक्ति स्वतः गीता ज्ञान दात्याने गीता अध्याय ७ श्लोक १८ मध्ये अनुत्तम सांगितली आहे. त्यांनी गीता अध्याय १८ श्लोक ६२ मध्ये त्या परमात्म्याला म्हणजेच परम अक्षर ब्रह्मला शरण जाण्यास सांगितले आहे. असेही सांगितले आहे की त्या परमात्म्याच्या कृपेनेच तू परम शान्ति आणि सनातन परम धामी प्राप्त होशील.

३. गीता अध्याय १५ श्लोक १ ते ४ मध्ये संसाररूपी वृक्षाचे वर्णन आहे आणि तत्वदर्शी संताची ओळख सुद्धा सांगितली आहे. संसार रूपी वृक्षाचे सर्व हिस्से, मुळे, कोण परमेश्वर आहे? खोड कोण प्रभु, फांद्यांचा प्रभु कोण आहे, फांद्या म्हणजे कोणत्या देवात आहेत, पात रूप संसार सांगितले आहे.

त्याच अध्याय १५ श्लोक १६ मध्ये स्पष्ट केले आहे की :–

१. क्षर पुरूष (हा २१ ब्रह्माण्डांचा स्वामी आहे) :– याला ब्रह्म,काल ब्रह्म,ज्योति निरंजन सुद्धा म्हटले जाते. हा नश्वर आहे. आपण ह्याच्या लोकात वास्तव्यास आहोत. ह्या लोकातून मुक्तता करून घेऊन आपल्याला परमात्मा कबीरजींच्या जवळ सत्यलोकात जायचे आहे.

२. अक्षर पुरूष :– हा ७ संख ब्रह्माण्डांचा स्वामी आहे, तो सुद्धा नश्वर आहे. आपण ह्याच्या ७ संख ब्रह्माण्डां मधून सत्यलोकात जायचे आहे. त्यामुळे याचा टोल टैक्स द्यायचाच आहे. आपला ह्याच्याशी एवढाच संबंध आहे.

❖ गीता अध्याय १५ श्लोक १७ में म्हटले आहे की :–

उत्तम: पुरूष: तू अन्य: परमात्मा इति उदाहृत:। य: लोक त्रायम् आविश्य विभर्ति अव्यय: ईश्वर:।।

सरलार्थ :– गीता अध्याय १५ श्लोक १६ मध्ये सांगितलेले दोन पुरूष, एक क्षर पुरूष व दूसरा अक्षर पुरूष आहेत. ह्या दोघांपेक्षा अन्य आहे तो उत्तम पुरूष म्हणजेच पुरूषोत्तम, त्यालाच परमात्मा म्हणतात. जो तिन्ही लोकात प्रवेश करून सर्वांचे धारण–पोषण करतो. तो खरे तर अविनाशी परमात्मा आहे. (गीता अध्याय १५ श्लोक १७) गीता अध्याय ३ श्लोक १४–१५ मध्ये सुद्धा स्पष्ट केले आहे की सर्वगतम् ब्रह्म म्हणजेच सर्वव्यापी परमात्मा, जो सचिदानन्द घन ब्रह्म आहे, त्याला वासुदेव सुद्धा म्हणतात. ज्या विषयी गीता अध्याय ७ श्लोक १९ मध्ये म्हटले आहे तोच सदा यज्ञ म्हणजेच धार्मिक अनुष्ठानांमध्ये प्रतिष्ठित आहे.

म्हणजेच ईष्ट रूपात पूज्य आहे.

पूर्ण गुरूकडून दीक्षा घेऊन मर्यादेत राहून भक्ति करा. अशा प्रकारे जगण्याच्या मार्गावर वाटचाल करून प्रपंचात सुखी जीवन जगावे आणि मोक्ष रूपी मार्ग प्राप्त करा.

## भक्ति अवश्य करा.

❖ कबीर परमेश्वरांनी सांगितले आहे कि:-

बिन उपदेश अचम्भ है, क्यों जिवत हैं प्राण। भक्ति बिना कहाँ ठौर है, ये नर नाहीं पाषाण।।

भावार्थ :- परमात्मा कबीरजी सांगत आहेत कि हे भोळ्या मानवा! मला आश्चर्य आहे कि गुरु दीक्षा न घेता कोणत्या आशेला धरून जीवंत आहेस. ना हे शरीर तुझे आहे, हे सुद्धा त्यागून जाईल. मग संपत्ती तुमची कशी होईल?.

कबीर, काया तेरी है नहीं, माया कहाँ से होय। भक्ति कर दिल पाक से, जीवन है दिन दोय।।

ज्यांना हा विवेक नाही कि भक्ति शिवाय जीवाचा कोठेही ठिकाणा नाही. तर ते नर म्हणजे मानव नाहीत, ते तर दगड आहेत. त्यांच्या बुद्धीवर दगड पडले आहेत. कबीर जीनी पुन्हा म्हटले आहे कि :-

बेगार ची व्याख्या :-

अगम निगम को खोज ले, बुद्धि विवेक विचार। उदय-अस्त का राज मिले, तो बिन नाम बेगार।।

भावार्थ :- पूर्वीच्या काळामध्ये पोलिस ठाण्यामध्ये जीप-कार इत्यादी गाड्या नव्हत्या. जेव्हा पोलिस वाल्यांना कुठे छापा (रैड) मारायचा असेल तर ते कोणत्याही खाजगी तीनचाकी किंवा चारचाकी गाडीवाल्यांना जबरदस्तीने पकडत असत आणि त्याच्या गाडी (तीन चाकी किंवा चार चाकी) मध्ये बसून जिकडे जायचे होते, तिकडे घेऊन जात. ड्रायव्हर देखिल तीन चाकीवालाच असे तसेच पेट्रोल-डिझेल देखिल तोच आपल्या खिशातून टाकत असे. त्या दिवशीची मजुरी देखिल करु शकत नव्हता. पोलीसवाले सगळा दिवस त्याला इकडून-तिकडे फिरवत असत. सामान्य व्यक्ति तर असा विचार करत असे कि हा तीन चाकी गाडीवाला आज खूप कमाई करेल. संपुर्ण दिवस चालला आहे, परंतु त्याचे मनच जाणत होते. त्या दिवशी त्याचा सोबत काय घडले होते. असेच राजा लोक त्या जन्मात भक्ति न करता केवळ राज्य व्यवस्था बनवून ठेवण्यामध्ये जीवन समाप्त करत आहेत तर ते बेगार करून जात आहेत. पूर्व जन्माच्या धर्म-कर्माने राजा बनतो. वर्तमान जन्मामध्ये त्याच पुण्याला खर्च करत खात राहत असतो. जनतेला वाटत असते कि राजा फार खुप मौज करत आहे. आध्यात्मिक दृष्टिने तो तर बेगार करत आहे. भक्ति कमाई करत नाही. जर व्यक्ती पूर्ण गुरुकडून दीक्षा घेऊन भक्ति करत नाही तर त्याला जरी उदय-अस्तचे म्हणजे पूर्ण पृथ्वीचे राज्य देखिल मिळाले तरी देखिल तो तीन चाकी गाडी वाल्या प्रमाणे व्यर्थची मारा-मार म्हणजे उठा-ठेव करत आहे. त्याला काहीच लाभ होणार नाही. त्यासाठी राजा असो वा प्रजा, धनी असो वा निर्धन, सर्वांना नव्याने भक्ति केली पाहिजे. त्यानेच त्यांचे भविष्य उज्ज्वल होईल.

❖ परमात्मा कबीर जीनी आपले शिष्य संत गरीबदासजीना तत्वज्ञान समजावले. ते अशा प्रकारे आहे :- (राग आसावरी शब्द न. १)

मन तू चलि रे सुख के सागर, जहाँ शब्द सिंधु रत्नागर।। (टेक)

कोटि जन्म तोहे मरतां होगे, कुछ नहीं हाथ लगा रे। कुकर-सुकर खर भया बौरे, कौआ हँस बुगा रे।।१।।

कोटि जन्म तू राजा किन्हा, मिटि न मन की आशा। भिक्षुक होकर दर-दर हांड्या, मिल्या न निर्गुण रासा।।२।।
इन्द्र कुबेर ईश की पद्वी, ब्रह्मा, वरूण धर्मराया। विष्णुनाथ के पुर कूं जाकर, बहुर अपूठा आया।।३।।
असँख्य जन्म तोहे मरते होगे, जीवित क्यूं ना मरै रे। द्वादश मध्य महल मठ बौरे, बहुर न देह धरै रे।।४।।
दोजख बहिश्त सभी तै देखे, राज-पाट के रसिया। तीन लोक से तृप्त नाहीं, यह मन भोगी खसिया।।५।।
सतगुरू मिलै तो इच्छा मेटैं, पद मिल पदै समाना। चल हँसा उस लोक पठाऊँ, जो आदि अमर अस्थाना।।६।।
चार मुक्ति जहाँ चम्पी करती, माया हो रही दासी। दास गरीब अभय पद परसै, मिलै राम अविनाशी।।७।।

**सूक्ष्मवेद च्या वाणी चा भावार्थ :-**

**वाणीचा सरलार्थ :- आत्मा आणि मनाला पात्र बनवून संत गरीबदास जीनी संसारातील मानवाला समजावले आहे. म्हटले आहे कि ''हा संसार दु:खाचे घर आहे. त्यापेक्ष्या भिन्न एक अजून संसार आहे. जिथे कोणतेच दुख नाही. ते स्थान (सनातन परम धाम = सत्यलोक) आहे तसेच तिथला प्रभु (अविनाशी परमेश्वर) सुखाचा सागर आहे.**

**सुख सागर अर्थात अमर परमात्मा तसेच त्याची राजधानी अमर लोकांची संक्षिप्त परिभाषा सांगितली आहे. :-**

शंखों लहर मेहर की ऊपजैं, कहर नहीं जहाँ कोई। दास गरीब अचल अविनाशी, सुख का सागर सोई।।

**भावार्थ :- ज्या वेळी मी (लेखक) एकटा असतो, तेव्हा कधी-कधी अशी लहर आतमधुन उठते आहे, त्यावेळी सगळे आपलेच वाटतात. जरी मला कुणीही कितीही कष्ट दिले असो, त्यांच्याप्रती द्वेष भावना राहत नाही. सगळ्यावर दया भाव बनतो आहे. ही स्थिति काही मिनिटेच राहते. यालाच मेहेरची लहर म्हटले आहे. सतलोक अर्थात सनातन परम धाम मध्ये गेल्यानंतर प्रत्येक प्राण्याला इतका आनंद होतो आहे. तिथे अशा असंख्य लहरी आत्म्यामध्ये उठत राहतात. जेव्हा ती लहर माझ्या आत्म्यावरून बाजुला होते तेव्हा ती दु:खमय स्थिति प्रारंभ होते. त्याने असे का म्हटले? तो व्यक्ति चांगला नाही! ती हानी झाली, हे झाले ते झाले, इत्यादि-इत्यादि. यालाच कहर (दुखाची लहर) म्हटले जाते.**

**त्या सतलोकात असंख्य लहरी मेहरच्या (दया) उठतात, तेथे कोणताच कहर (भयंकर दुख) नाही. तसेही सतलोकामध्ये कोणतेच दु:ख नसते. कहर चा अर्थ भयंकर कष्ट असा आहे. जसे एका गावात आपापसातल्या भाडंणामध्ये विरोधकानी दुसऱ्या पक्ष्यातील एका परिवारातील तीन सदस्यांची हत्या केली. कुठे भूकंपामध्ये हजारो मरून जातात. याला म्हणतात कहर झाला अथवा कहर केला गेला. वर लिहलेल्या वाणीमध्ये सुखसागराची परिभाषा संक्षिप्त मध्ये सांगितली आहे. सांगितले आहे कि मी अमरलोक अचल अविनाशी अर्थात कधी चलायमान अर्थात नाश होत नाही तथा तिथे राहणारा परमेश्वर अविनाशी आहे. ते स्थान व परमेश्वर सुखाचा सागर आहे. जसे समुद्री जहाज बंदराच्या किनाऱ्यापासून १०० किंवा २०० कि. मी. दूर जाते तेव्हा जहाजातील यात्रेकरूंना जल अर्थात समुद्राशिवाय काहीच दिसत नाही. सगळीकडे पाणीच पाणी नजरेस दिसते. याच प्रकारे सतलोक (सत्यलोक) मध्ये सुखाअतिरिक्त काहीच दिसत नाही. अर्थात तिथे कोणतेच दु:ख नाही.**

**आता पूर्वी लिहीलेल्या वाणीचा सरलार्थ केला आहे.**

मन तू चल रे सुख के सागर, जहाँ शब्द सिंधु रत्नागर।।(टेक)
कोटि जन्म तोहे भ्रमत होगे, कुछ नहीं हाथ लगा रे।
कुकर शुकर खर भया बौरे, कौआ हँस बुगा रे।।

**परमेश्वर कबीरजीनी आपली चांगली आत्मा गरीबदास जींना सूक्ष्मवेद सांगितला.**

त्याला संत गरीबदास जींनी (गाव-छुडांनी, जिल्हा-झजर, हरियाणा प्रांत) आत्मा आणि मनाला पात्र बनवून विश्वातील मानवाला काल लोकाचे (ब्रह्म) कष्ट व सतलोकातील सुख सांगून त्या परमधामाला जाण्यासाठी सत्य साधना जी शास्त्रयुक्त आहे, करण्याची प्रेरणा केली आहे. मन तू चल रे सुख के सागर अर्थात सनातन परम धामास चल जिथे शब्द नष्ट होत नाहीत. यामुळे शब्दाचा अर्थ अविनाशी पणाशी आहे कि ते स्थान अमरत्व सिंधु अर्थात सागर आहे आणि मोक्ष रूपी रत्नाचे सागर अर्थात खाण आहे. या काल लोकात तुम्ही भक्ति सुद्धा केली परंतु शास्त्रानुकूल साधना सांगणारे तत्वदर्शी संत न भेटल्याने आपण करोडो जन्मामध्ये भटकत आहात. करोडो-अरबो रुपये संग्रह करण्यामध्ये पूर्ण जीवन लावतात, आणि मग मृत्यू होते. ते कमविलेले धन जे तुम्हाला पूर्वीच्या संस्कारातून प्राप्त झाले होते, त्याला सोडून संसारातून निघून जाता. त्या धनाचा संग्रह करण्यात जे पाप केले ते तुमच्या सोबत जातात. तुम्ही त्या मानव जीवनात तत्वदर्शी संताकडून दीक्षा घेऊन शास्त्रविधी अनुसार भक्ति साधना नाही केली ज्यामुळे तुमच्या हाती काहीच आले नाही. पूर्वीच्या पुण्याच्या बदल्यात, धन घेतले. ते धन इथेच राहिले. तुम्हाला कांहीच नाही मिळाले. तुम्हाला मिळाले धनसंग्रह तथा शास्त्रानुकूल भक्ति न केल्याचे पाप.

ज्या कारणामुळे आपण कुकर = कुत्रा, खर = गाढव, सुकर = डुक्कर, कौआ = कावळा, हँस = एक पक्षी जो केवळ सरोवरात मोती खातो आहे, बुगा = बगला पक्षी इत्यादि इत्यादि योनिंना प्राप्त करून कष्ट उठावतात.

कोटि जन्म तू राजा कीन्हा, मिटि न मन की आशा। भिक्षुक होकर दर-दर हांड्या, मिला न निर्गुण रासा।।

सरलार्थ :- हे मानव! आपण काल (ब्रह्म) ची कठिणात-कठीण साधना केली. घर त्यागून जंगलात निवास केला, मग गाव आणि नगरात घरो-घरी दारा-दारावर हांड्या म्हणजे फिरलात. भिक्षा प्राप्त करण्यासाठी जंगलातील साधनारत साधक जवळच्या गावात वा शहरात जात असे. एका घरुन भिक्षा पुर्ण नाही मिळत तर अन्य घरांमधुन जेवण घेऊन जंगलात जात असे. कधी-कधी तर साधक एका दिवस भिक्षा मागुन आणत असे, त्यावर दोन-तीन दिवस निर्वाह करत असत. भाकरींना (रोटीला) पातळ रूमाला सारख्या कपड्याला छालना म्हणतात. कापडात गुंडाळून झाडाच्या फांदीला बांधून ठेवत होते. त्या भाकरी वाळून जात. त्यांना पाण्यात भिजवून नरम करून खात होते. ते प्रतिदिन भिक्षा मागण्यासाठी जाण्यात जो वेळ व्यर्थ होत असे, त्याची बचत करून तो वेळ काल ब्रह्मची साधना करण्यात लावत असे. भावार्थ आहे कि जन्म-मरणातून सुटका करून घेण्यासाठी अर्थात पूर्ण मोक्ष प्राप्तीसाठी वेदामध्ये वर्णित विधी तसेच लोकवेदा प्रमाणे घोर तप करत होते. त्यांना तत्वदर्शी संत न मिळाल्याने निर्गुण रासा अर्थात गुप्त ज्ञान ज्यास तत्वज्ञान म्हटले आहे. ते नाही मिळाले कारण यजुर्वेद अध्याय ४० मंत्र १० मध्ये तथा चार वेदांचे सारांश रूप श्रीमद् भागवत् गीता अध्याय ४ श्लोक ३२ व ३४ मध्ये सांगितले आहे कि यज्ञ अर्थात धार्मिक अनुष्ठांनाचे विस्तृत ज्ञान स्वयम सच्चिदानंद घन ब्रह्म अर्थात परम अक्षर ब्रह्म आपल्या मुख कमलाने बोलून सांगतो ते तत्वज्ञान अर्थात सूक्ष्मवेद आहे. गीता ज्ञानदाता ब्रह्मने म्हटले आहे कि त्या तत्वज्ञानाला तू तत्वज्ञानीकडे जावून समजून घे. त्यांना दंडवत प्रणाम करून नम्रतापूर्वक प्रश्न केल्याने ते परमात्म तत्वाला चांगल्याप्रकारे सांगणारे तत्वदर्शी संत तुला तत्वज्ञानाचा उपदेश करतील. यावरून सिद्ध झाले कि तत्वज्ञान ना वेदात आहे ना ही गीताशास्त्रात आहे. गीताशास्त्रात जर असते तर एक अध्याय अजून सांगितला असता. सांगितले असते कि तत्वज्ञान त्या अध्यायात वाचा. संत गरीबदासजींनी मनाच्या बहाण्याने मानव शरीरधारी प्राण्यांना समजावले आहे कि

तू निर्गुण रासा अर्थात तत्वज्ञान न मिळाल्याने कालब्रह्मची साधना करून तू करोडो जन्म राजा बनलास तरी सुद्धा मनाची इच्छा समाप्त झाली नाही. कारण राजाला वाटले स्वर्गात सुख आहे. इथे राज्यात काही सुख-चैन नाही, शांति नाही.

निर्गुण रासाचा भावार्थ :- निर्गुण चा अर्थ आहे कि वस्तु तर आहे परंतु त्याचा लाभ मिळत नाही. वृक्षाच्या बिजात फळ तथा वृक्ष निर्गुण रूपात आहे. त्या बिजाला मातीमध्ये रोपून सिंचन करून ती सगुण वस्तु (वृक्ष, वृक्षाचे फळ) प्राप्त होते. हे ज्ञान न झाल्याने आंब्याचे फळ व सावलीपासून आपण वंचित झालो. रासा=झंझट अर्थात विस्कळीत झालेले कार्य. सूक्ष्मवेदामध्ये परमेश्वर कबीरजीनी सांगितले आहे कि :-

नौ मन (३६० कि. ग्रा.) सूत=कच्चा धागा

कबीर, नौ मन सूत उलझिया, ऋषि रहे झख मार। सतगुरू ऐसा सुलझा दे, उलझे न दूजी बार।।

सरलार्थ :- परमेश्वर कबीरजीनी सांगितले आहे कि अध्यात्म ज्ञान रूपी नौ मन सुत गुंतलेले आहे. एका किलोग्राम गुंतलेल्या सुताला सरळ करण्यासाठी धानकाला (जुलाहा) एक दिवसापेक्ष्या अधिक वेळ लागतो. जर गुंता सोडवताना धागा तुटला तर कपड्याला गाठ पडते. गाठ पडलेल्या कपड्याची किंमत मिळत नसे व कुणी विकत घेत नसे. त्यामुळे परमेश्वर कबीर धांनकाने, धांनकाचेच सटीक उदाहरण देवून समजावले आहे कि जास्त गुंतागुंतीचे सुत कुणीही सोडवत नसत. अध्यात्म ज्ञान सुद्धा त्याच नौ मन गुतलेल्या सुतासारखे आहे. त्याला सतगुरु अर्थात तत्वदर्शी संत असे सोडवतो तो पुन्हा गुंतत नाही. गुंता गुंतीच्या अध्यात्म ज्ञानाच्या आधारामुळे अर्थात लोकवेदाप्रमाणे साधना करून स्वर्ग नरक ८४ लाख प्रकारचे प्राण्याचे जीवन, पृथ्वीवर कोणत्यातरी तुकड्याचे राज्य, स्वर्गाचे राज्य प्राप्त केले, पण मग जन्म-मरणाच्या चक्रात पडून अनेक कष्टा वर कष्ट सोसले. परंतु काल ब्रह्मची वेदामद्धे वर्णीत विधिनुसार साधना करून ती परमशांति तथा सनातन परम धाम प्राप्त झाले नाही जे गीता अध्याय १८ श्लोक ६२ मध्ये सांगितले आहे आणि नंतर परमेश्वराचे ते परम पद प्राप्त झाले जेथे गेल्यानंतर साधक पुन्हा संसारात कधिही येत नाहीत. जे गीता अध्याय १५ श्लोक ४ मध्ये सांगीतलेले आहे. काल ब्रह्मच्या साधनेने निम्न लाभ होत राहतो.

वाणी न.३ :- इन्द्र-कुबेर, ईश की पदवी, ब्रह्मा वरूण धर्मराया।
विष्णुनाथ के पुर कूं जाकर, बहुर अपूठा आया।।

सरलार्थ :- काल ब्रह्म ची साधना करून साधक इंद्राचे पद सुद्धा प्राप्त करतो. इंद्र स्वर्गाच्या राजाचे पद आहे. त्याला देवराज अर्थात देवतांचा राजा तसेच सुरपति सुद्धा म्हणतात. तो सिंचाई विभाग अर्थात वर्षा मंत्रालय देखिल आपल्या अधीन ठेवतो.

प्रश्न :- इंद्राची पदवी कशी प्राप्त होते?

उत्तर :- अधिक तप करून तसेच शंभर मन (४ हजार की. ग्राम.) गाय अथवा म्हैसीच्या तुपाचा प्रयोग करून धर्मयज्ञ केल्याने एक धर्मयज्ञ संपन्न होतो. असे शंभर धर्मयज्ञ केल्याने साधकाला इंद्राची पदवी प्राप्त होते. तप किंवा यज्ञ करताना त्याची मर्यादा भंग झाली तर पुन्हा नव्याने तप किंवा यज्ञ करावे लागतात. अशाप्रकारे इंद्राची पदवी प्राप्त होते.

प्रश्न :- इंद्राचा शासन काळ किती आहे? मृत्यूनंतर इंद्राचे पद सोडून प्राणी कोणती योनीला प्राप्त करत असतो?

उत्तर :- इंद्र स्वर्गाच्या राजाच्या पदावर ७२ चौकडी अर्थात ७२ चतुर्युग पर्यंत राहतो.

एका चतुर्युगात सतयुग+त्रेतायुग+द्वापरयुग+कलियुगचा काळ समाविष्ट असतो. जो १७२८000+१२९६000+८६४000+४३२000 क्रमश: सतयुग + त्रेतायुग + द्वापरयुग + कलियुग चा समय अर्थात ४३ लाख २० हजार वर्षाचा काळ एका चतुर्युगात असतो. अशा ७२ चतुर्युगापर्यंत तो साधक इंद्राच्या पदावर स्वर्गाच्या राजाचे सुख भोगतो. एक कल्प अर्थात ब्रह्मजीच्या एका दिवसात (जे १00८ चतुर्युगाचे असते) १४ जीव इंद्राच्या पदावर राहून आपण केलेले पुण्य कर्म भोगतात. इंद्राच्या पदाला भोगून प्राणी गाढवाचे जीवन प्राप्त करतो.

## कथा :– ''मार्कण्डेय ऋषि आणि अप्सरा यांचा संवाद''

एकदा बंगालच्या खाड़ीमध्ये मार्कण्डेय ऋषि तप करत होता. इन्द्र पद पर विराजमान आत्म्याला अशी अट असते की जर त्याच्या राज्य करण्याच्या कालावधीत ७२ चातूर्युगाच्यामध्ये कोण्या व्यक्तीने इन्द्र पद प्राप्त करण्यासाठी योग्य तप अथवा धर्मयज्ञ केल्यास आणि त्याच्या क्रियेत कोणतीही बाधा न आल्यास त्या साधकाला इन्द्र पद दिले जाते व वर्तमान इन्द्राकडून ते पद हिस्कावून घेतले जाते. त्यामुळेच शक्यतोवर इन्द्र आपल्या कारकीर्दीत कोणत्याही साधकाचे तप अथवा धर्मयज्ञ पूर्ण होऊ देत नाही. काय वाट्टेल ते करावे लागले तरी ते करून त्याची साधना भंग करतो.

जेव्हा दूतांनी इन्द्राला सांगितले की बंगालच्या खाड़ीत मार्कण्डेय नामक ऋषि तप करीत आहेत तेव्हा इन्द्राने मार्कण्डेय ऋषि च्या तपाचा भंग करण्यासाठी आपली पत्नी उर्वशीला पाठविले. सर्व शृंगार करुन देवपरी मार्कण्डेय ऋषि समक्ष नाचू–गाऊ लागली. आपल्याला प्राप्त सिद्धिने त्या स्थानी बसंत ऋतु सारखे वातावरण निर्माण केले. मार्कण्डेय ऋषिनी कोणतेही स्वारस्य दाखविले नाही. उर्वशीने कमरेचे नाडा सोड़्न निःवस्त्र झाली. तेव्हा मार्कण्डेय ऋषि तिला म्हणाले हे मुली! हे भगिनी! हे माते! आपण इथे काय करीत आहात? आपण इथे घोर अरण्यात एकट्या का आल्या आहात? उर्वशीने त्यांना म्हटले, ऋषिजी माझे रूप पाहून ह्या अरण्यातील सर्व साधक आपले संतुलन गमावून बसले आहेत, परंतु आपण डगमगला नाहीत, कोणास ठाऊक आपली समाधि कुठे लागली होती? कृपया आपण माझ्यासोबत इन्द्रलोकात चला, नाहींतर मी हार पत्करल्यामुळे मला शिक्षा मिळेल. मार्कण्डेय ऋषि म्हणाले की माझी समाधि ब्रह्मलोकात गेली होती, जिथे मी अतिशय सुंदर उर्वश्या नाचताना पाहत होतो. तुझ्यासारख्या तर त्यांच्या ७–७ दासी आहेत. त्यामुळे मी तुझ्याकडे काय पाहणार, तुझ्यावर काय आसक्त होणार? जर तुझ्यापेक्षा कोणी अधिक सुंदर असेल, तर तिलाही घेऊन ये. तेव्हा देवपरी ने म्हटले की ती इन्द्राची पट्टराणी म्हणजेच मुख्य राणी मी आहे आणि माझ्याहून सुंदर स्त्री तिथे कोणीच नाही.

तेव्हा मार्कण्डेय ऋषिनी विचारले इन्द्राचा मृत्यु झाल्यावर तू काय करशील? उर्वशीने उत्तर दिले की ती १४ इन्द्र भोगेल. मतितार्थ असा की श्री ब्रह्मदेवाच्या एक दिवसात १00८ चतुर्युग असतात ज्यामध्ये ७२–७२ चतुर्युगांची कारकीर्द पूर्ण करून १४ इन्द्र मृत्यु पावतात. इन्द्राच्या राणीच्या आत्म्याने कोणत्यातरी मानव जन्मात इतके अत्यधिक पुण्य केले होते ज्यामुळे ती १४ इन्द्रांची पट्टराणी होऊन स्वर्ग सुख आणि पुरूष सुख भोगत होती.

मार्कण्डेय ऋषिनी विचारले १४ इन्द्रसुद्धा मेल्यानंतर तुम्ही काय कराल? उर्वशीने सांगितले की ती पुन्हा मृत्य लोकी (पृथ्वीलोकाला म्हणजेच मनुष्य लोक म्हणजेच मृत्यूलोक म्हणतात) गाढवीण होईन व जितके इन्द्र माझे पति झाले असतील ते सुद्धा पृथ्वीवर गाढवाची योनी प्राप्त करतील.

मार्कण्डेय ऋषि म्हणाले मग जिथे राजा गाढव होईल आणि राणीला गाढवीची योनी प्राप्त करणार आहे अशा लोकात तुम्ही मला कशासाठी घेऊन जात आहात? उर्वशी म्हणाली की माझी प्रतिष्ठा (अब्रू) वाचविण्यासाठी असे करत आहे नाहीतर मी हार पत्करली असे ते म्हणतील.

मार्कण्डेय ऋषि म्हणाले गाढवीची कसली आली आहे प्रतिष्ठा? तू वर्तमानात सुद्धा गाढवीच आहेत कारण तु १४ इद्र संपवशील आणि मृत्युनंतर मी गाढवी होणार आहे, हे तू स्वतःच मान्य करीत आहेस. गाढवीची कसली आली आहे अब्रू? तेवढ्यात इन्द्र तिथे आले. नियमानुसार आपले इन्द्राचे राज्य मार्कण्डेय ऋषींना देण्यासाठी ते आले होते. म्हणाले ऋषिजी मी हारलो आणि तुम्ही जिंकलात. तुम्ही इन्द्र पदवीचा स्वीकार करावा. मार्कण्डेय ऋषि म्हणाले अरे-अरे इन्द्र! इन्द्र ही पदवी मला काहीही उपयोगाची नाही. माझ्यासाठी ते कावळ्याच्या विष्ठे सारखे आहे. मार्कण्डेय ऋषिनी इन्द्राला पुन्हा म्हणाले मी त्यांनी सांगीतल्यानुसार साधना करण्यास सांगितले आणि हे इन्द्रलोकाचे राज्य सोडून दे, तुला मी ब्रह्मलोकात घेउन जाईन असे आशवासन दिले. इन्द्र म्हणाला हे ऋषि जी! आता तर मला मौजमजा करु दे, नंतर कधीतरी विचार करीन.

श्रोतेहो! विचार करा :- इन्द्राला हे माहित आहे की मृत्यू झाल्यावर गाढवाची योनी प्राप्त होणार आहे, हे ज्ञात असून सुद्धा तो क्षणिक सुखाचा त्याग करण्यास तयार नाही. नंतर कधीतरी पाहीन म्हणतो, नंतर कधी पाहणार? गाढव झाल्यावर कुंभार तुझ्याकडे पाहिल कीती वजन गाढवाच्या पाठीवर द्यायचे ते? कुठे त्याला काठी मारायची? त्याच प्रकारे ह्या पृथ्वीवर कोणी छोटया तूकड़याचा पंतप्रधान, मंत्री, किंवा राज्याचा मुख्यमंत्री किंवा मंत्री बनतो किंवा कोणत्यातरी पदावर सरकारी अधिकारी किंवा कर्मचारी होतो किंवा मालक होतो. त्यांना सांगितले जाते की तुम्ही भक्ती करा नाहीतर तुम्ही गाढव व्हाल. ते एक तर नाराज होतात, नाहीतर म्हणतात आम्ही का गाढव व्हायचे? पुन्हा असे म्हणू नका. काही शहाणे असतात, ते म्हणतात कोणी पाहिलंय, गाढव होतो का? त्यांना सांगतील, संत आणि ग्रंथ तसे सांगतात. बहुतांशी म्हणतात बघू काय होईल ते.

त्यांना नम्र विनंती आहे की मृत्युनंतर गाढव झाल्यावर तुम्ही काय बघणार, नंतर तर तुमच्याशी कसे वागायचे हे कुंभार पाहिल. पाहायचाच असेल तर वर्तमान पहा. निंदा सोडून शास्त्रानुकूल साधना करा जी वर्तमान काळी फक्त माझ्याजवळच (रामपाल दास) आहे ती ग्रहण करून आपल्या जीवाचे कल्याण करा.

वर लिहिलेल्या वाणी नं. ३ मध्ये असे सांगितले आहे की इन्द्र-कुबेर आणि ईश ही पदवी प्राप्त करणाऱ्या आणि ब्रह्मदेव आणि वरूण, धर्मराज ही पदे प्राप्त करून विष्णु लोक प्राप्त करून देवपद प्राप्त करणार्यांना सुद्धा जन्म-मरणाच्या फेऱ्यात अडकून पडावे लागते.

स्वर्ग लोकात ३३ करोड़ देव पद असतात. जसे भारताच्या संसदेत ५४० खासदारांची पदे आहेत. व्यक्ति बदलत राहते. त्याच खासदारांमधून पंतप्रधान व अन्य केन्द्रीय मंत्री होत असतात.

त्याच प्रकारे त्याच ३३ करोड़ देवतामधूनच कुबेराचे म्हणजेच धनाच्या देवतेचे पद प्राप्त होते. कुबेर म्हणजे देवांचे अर्थमंत्री असतात. ईश्वर पदवीचा अर्थ आहे परमात्मा पद आणि लोकपरंपरेप्रमाणे मृत्युलोकात ते एकूण तीन मानले गेले आहेत :- १. श्री ब्रह्मदेव, २. श्री विष्णु आणि ३. श्री शंकर.

वरूणदेव जल देवता आहे. धर्मराज मुख्य न्यायधीश आहेत व ते सर्व जीवाना त्यांच्या कर्माचे फळ देतात त्याला धर्मराजा सुध्दा म्हणतात हे सर्व काल ब्रह्मची साधना करून पद प्राप्त करतात. पुण्य समाप्त होताच सर्व देवता पदमुक्त होऊन पशु-पक्षी आदि ८४ लाख प्रकारच्या योनित टाकले जातात. पुन्हा नवीन ब्रह्मदेव, नवीन विष्णुजी आणि नवीन शंकर ह्या पदांवर विराजमान होतात.

ह्या सर्व उपरोक्त देवता जन्मतात-मरतात. ह्या अविनाशी नसतात. ह्यांची ही स्थिति आपणास ''सृष्टि रचना'' प्रकरणात याच पुस्तकात स्पष्ट होईल की हे कीती परमात्मा आहेत? कोणाचे पुत्र आहेत आणि यांची माता कोण आहे?

अन्य प्रमाण :- श्री देवी पुराणाच्या (सचित्र मोठा टाईप फक्त हिन्दीमध्ये गीता प्रैस गोरखपुर यांचेकडून प्रकाशित) तिसऱ्या स्कंदात पान क्रमांक १२३ वर लिहिले आहे की तुम्ही शुद्ध स्वरूपा आहात, ह्या सर्व जगताचा उद्गम तुमच्यापासून आहे. मी (विष्णु), ब्रह्मा व शंकर आपल्या कृपेने विद्यमान आहोत. आमचा तर अविर्भाव म्हणजे जन्म व तिरोभव म्हणजे मृत्यु होत असतो. आपण प्रकृति देवी आहात.

भगवान शंकर बोलले हे देवी! जर विष्णुच्या नंतर उत्पन्न होणारे ब्रह्मदेव आपल्या पासून उत्पन्न झाले असतील, तर मी तमोगुणी लीला करणारा शंकर आपले लेकरू नाही काय? म्हणजेच मला उत्पन्न करणाऱ्या आपणच आहात. आम्ही तर फक्त नियमित कार्यच करू शकतो. म्हणजेच ज्याच्या प्रारब्धात जे लिहिले आहे, तेच फक्त आम्ही त्याला प्रदान करू शकतो. ना कमी ना जास्त करु शकत नाहीत.

साधकहो! ह्या श्री देवी पुराणातील उल्लेखावरून हे स्पष्ट झाले की श्री ब्रह्मदेव, श्री विष्णुजी आणि श्री शंकरजी नाश पावणारे आहेत. ह्यांच्या मातेचे नाव श्री देवी दुर्गा आहे. अधिक माहितीसाठी आपण ''सृष्टि रचना'' प्रकरण पाहावे. ते ह्या पुस्तकाच्या पाठीमागे पान क्रमांक १९२ वर लिहिलेले आहे. ह्या मुख्य देवता आहेत. अन्य देवता यांच्यापेक्षा निम्न स्तरावरील देव आहेत. हे सर्व जन्मतात-मृत्यू पावतात, हे अविनाशी राम नाहीत, हे अविनाशी परमात्मा नाहींत.

श्रीमद् भगवत गीता अध्याय 10 श्लोक २ मध्ये लिहिले आहे की गीता ज्ञान दाता काल ब्रह्म ने म्हटले आहे की ''माझ्या उत्पत्ति बाबत देवता आणि महर्षिजन काहीच जाणत नाहीत कारण ह्यांचे सर्वांचे आदि कारण मीच आहे. म्हणजेच हे सर्व माझ्यापासूनचा उत्पन्न झाले आहेत.''

गीता अध्याय ४ श्लोक ५ मध्ये गीता ज्ञान सांगणाऱ्याने असे म्हटले आहे की हे अर्जुना! तुझे आणि माझे पुष्कळ जन्म झाले हे तू जाणत नाहीस, मी जाणतो. गीता अध्याय २ श्लोक १२ मध्ये सुद्धा स्पष्ट आहे की तू-मी आणि सर्व राजे-सैन्य आधी सुद्धा जन्माला आले होते आणि पुढे सुद्धा जन्म घेणार आहेत.

गीता अध्याय १४ श्लोक ३ गीता ज्ञान सांगणाऱ्याने असे म्हटले आहे की हे अर्जुना! माझी प्रकृति म्हणजेच दुर्गा तर गर्भ धारण करते, मी तिच्या गर्भात बीज स्थापित करतो, ज्यापासून सर्व प्राण्याची उत्पत्ति होते.

गीता अध्याय १४ श्लोक ४ गीता ज्ञान सांगणाऱ्याने असे म्हटले आहे की हे अर्जुना! नाना प्रकारच्या सर्व योनिमध्ये जितक्या शरीरधारी मूर्ति उत्पन्न होत असतात, (महत्) प्रकृति तर त्यांच्या सर्वांचा गर्भ धारण करणारी माता आहे. (अहम् ब्रह्म) मी ब्रह्म बीज स्थापित

करणारा पिता आहे.

गीता अध्याय १४ श्लोक ५ :- गीता ज्ञान सांगणाऱ्याने असे स्पष्ठ म्हटले आहे की हे अर्जुना! सत्वगुण श्री विष्णुजी, रजगुण श्रीब्रह्मदेव आणि तमगुण श्री शंकरजी, हे प्रकृति म्हणजेच दुर्गा देवी पासून उत्पन्न तिन्ही देवता म्हणजेच तिन्ही गुण अविनाशी जीवात्म्याला कर्मानुसार शरीरात बांधून ठेवतात.

उपरोलेखित प्रमाणां वरून हे स्पष्ट झाले की उपरोक्त देवता नाशवान आहेत आणि काल ब्रह्मचेच अपत्य आहेत.

संदर्भ सुरु आहे वाणी सँख्या ३ चा सरलार्थ :-

इन्द्र, कुबेर, ईश म्हणजेच ब्रह्मा, विष्णु, शिव पर्यंत पदवी प्राप्त करून आणि वरूण, धर्मराय ही पदवी आणि श्री विष्णुनाथ लोक प्राप्त करून सुद्धा जन्म-मरणाच्या फेऱ्यात फिरत राहतात.

❖ मार्कण्डेय ऋषि ब्रह्मची साधना करत होते आणि तिलाच सर्वोत्तम समजत होते. त्यामुळेच ते इन्द्राला ब्रह्मच्या साधनेचे ज्ञान करवून देतो म्हणत होते. ब्रह्मलोकच्या तुलनेत स्वर्गाचे राज्य म्हणजे हलव्याच्या तुलनेत जणू कावळ्याची विष्ठा आहे.

साधकहो! आपण ब्रह्मसाधना करणाऱ्या श्री चुणक ऋषि, श्री दुर्वासा ऋषि आणि कपिल मुनि यांच्या ब्रह्मसाधनेचे वर्णन करताना गीता ज्ञान दात्याने अध्याय ७ श्लोक १८ मध्ये तिला निकृष्ट दर्जाची असल्याचे वर्णन केले आहे. मार्कण्डेय ऋषिची साधना त्याच दर्जाची होती आणि ते तिला उत्तम समजत होते. आणि इन्द्राने सुद्धा ही ब्रम्ह साधना करावी असे मत व्यक्त करीत होते.

सूक्ष्मवेदात म्हटले आहे की :-

औरों पंथ बतावहीं, आप न जाने राह।।१

मोती मुक्ता दर्शत नाहीं, यह जग है सब अन्ध रे। दिखत के तो नैन चिसम हैं, फिरा मोतिया बिन्द रे।।२

वेद पढ़ें पर भेद ना जानें, बांचे पुराण अठारा। पत्थर की पूजा करें, भूले सिरजनहारा।।३

वाणी नं. १ चा भावार्थ :- दुसऱ्यांना मार्गदर्शन करतात पण, स्वत:ला भक्ति मार्गाचे ज्ञान नसते.

वाणी नं. २ का भावार्थ :- तत्वदर्शी संतांच्या अभावामुळे मोती मुक्ता म्हणजेच मोक्ष रूपी मोती म्हणजेच मोक्ष मंत्र दिसत नाही. हे सर्व संसार अध्यात्म ज्ञान डोळे नसलेल्या आंधळ्यासारखे आहे. ज्याला मोतीबिंदू झालेला असतो, त्याचे डोळे अगदी उत्तम भासत असतात, पण त्या रोगाने ग्रस्त असलेल्या व्यक्तीला काहीही दिसत नाही. हे उदाहरण देऊन पुढे म्हणतात, संस्कृत भाषा फराटेदार बोलत असल्यामुळे मोठे विद्वान भासतात, पण सदग्रथांमधील गुह्य रहस्य जाणत नाहीत. ह्यांना अज्ञान रूपी मोतिबिंदू झाला आहे.

वाणी नं. ३ चा भावार्थ :- वेदांचा अभ्यास करून तोंडपाठ करणारे वेदांमधील गुह्य रहस्ये समजून न घेता त्यांच्या विपरीत साधना करतात-करवून घेतात. वेदांमध्ये दगडाच्या मूर्तीची पूजा करण्याबाबत उल्लेख नाही आहे, पण वेदांचे विद्वान म्हणवून घेणारे दगडाच्या मूर्तीची पूजा करतात आणि करवून घेतात. वेदांत वर्णन केल्यानुसार निर्मात्याचा विसर पाडला.

श्रीमद् भगवत गीता अध्याय ४ श्लोक २५ ते २९ मध्ये सुद्धा हेच सांगितले आहे की जो साधक जशी साधना करीत असतो, तिला उत्तमच समजत असतो आणि सर्व साधक आपली

भक्ती पाप नाश करणारी असल्याचेच मानतात.

गीता अध्याय ४ श्लोक ३२ मध्ये स्पष्ट केले आहे की यज्ञों. म्हणजेच धार्मिक अनुष्ठानाचे सर्व विधींचे ज्ञान स्वतः सच्चिदानन्द घन ब्रह्मने आपल्या मुखातून बोललेल्या वचनाने विस्तारपूर्वक सांगितले व ते तत्वज्ञान आहे. त्याचे ज्ञान करवून घेऊन साधक सर्व पापांपासून मुक्त होतो.

गीता अध्याय ४ श्लोक ३४ मध्ये स्पष्ट केले आहे की तत्वदर्शी संत ते तत्वज्ञान जाणतात त्यांना दंण्डवत प्रणाम करुन आणि त्यांना नम्रपणे शरण जाऊन प्रश्न केल्यास ते तत्वज्ञान जाणणारे ज्ञानी महात्मे तुला त्या तत्वज्ञानाचा उपदेश करतील.

वरील वाणीमध्ये ज्या तत्वज्ञानाला निर्गुण रासा म्हटले आहे, ते न मिळाल्याने सर्व साधक जन्म-मरणाच्या फेऱ्यात अडकले आहेत.

मार्कण्डेय ऋषि ब्रह्म साधना करत होते. श्रीमद् भगवत गीता अध्याय ८ श्लोक १६ मध्ये म्हटले आहे की ब्रह्मलोकात गेलेले साधक सुद्धा पुनरावर्ती म्हणजेच वारंवार जन्म-मरणाच्या फेऱ्यात अडकले आहेत.

**पूर्व शब्दाची वाणी संख्या ४ :-** असंख जन्म तोहे मरतां होगे, जीवित क्यों न मरै रे।
द्वादश मध्य महल मठ बोरे, बहुर न देह धरै रे।।

सरलार्थ :- हे मानवा! तू अनेकवेळा जन्मला आणि मृत्यू पावला आहेस. सत्य साधना करून जिवंतपणी मर. जीवंत मरण्याचा भावार्थ असा की साधकाला ह्या जगातील प्रत्येक वस्तू नश्वर असल्याचे ज्ञान होते. हे शरीर सुद्धा शाश्वत नाही आहे. जन्म-मृत्युचा भयंकर रोग आहे. ह्या जगात दुःखाच्या व्यतिरिक्त काहीही नाही. मानव शरीर प्राप्त करून मोक्ष प्राप्त केला नाही तर पशु सारखेच जीवन जगलास. जसे गीता अध्याय ७ श्लोक २९ मध्ये म्हटले आहे की जो साधक केवळ जरा म्हणजेच वृद्धावस्थेत कष्ट आणि मरण यांच्या दुःखाचे मुक्तिसाठी साधनारत राहतात, ते तत् ब्रह्म आणि सम्पूर्ण परमार्थ व कर्म जाणत असतात.

अशा प्रकारे तत्वज्ञान प्राप्त झाल्यानंतर मानवाला अनावश्यक वस्तुंची इच्छा होत नाहीं. तम्बांखु, दारू-मांसाहार सेवन करत नाही. नाच-गाणे हे मूर्ख लोकांचे काम वाटू लागते. जसे भोजन मिळेल, त्यातच संतुष्ट रहतात.

❖ आत्म कल्याण होण्यासाठी साधक विचार करतो की जर मी सत्संगात आलो नाही तर गुरूजीचे दर्शन घेऊ शकणार नाही आणि सत्संगातील विचार न ऐकल्याने मन पुन्हा विकारात अडकेल. तो साधक सर्व कामे सोडून सत्संग ऐकण्यास येतो. तो विचार करतो की आम्ही रोज ऐकतो आणि पाहतो की लहान कच्च्या बलकांना सोडून बाप जग सोडून जातो आणि मृत्यू पावतो. मोठमोठे भांडवलदार अपघातात मरण पावतात. आयुष्यभर जी संपत्ती प्राप्त केली होती, ती सोडून जावे लागते आणि त्या संपत्तीचा संभाळ करण्यासाठी परत येऊ शकत नाहीत. मृत्यु पूर्वी एक दिवस सुद्धा काम सोड़ण्यास मन तयार व्हायचे नाही, आता कामापासून कायमची सुटका झाली.

## ''आज बंधू निवांत आहे''

एक साधक सत्संगात जाऊ लागला, अनुग्रह घेतला आणि ज्ञान ऐकून भक्ति करू लागला. आपल्या मित्राला सुद्धा त्याने सत्संगात येण्याची आणि भक्ती करण्याची विनंती केली. परंतु मित्राने ऐकले नाही. म्हणाला कामामुळे फुरसत नाही आहे. छोटी-छोटी मुले आहेत. त्यांचे पालन-पोषण सुद्धा करायचे आहे. काम सोडून सत्संगात जाऊ लागलो तर सारा धंदा मार खाईल.

हा सत्संगात जाणारा भक्त जेंव्हा जेंव्हा सत्संगात येण्यासाठी आपल्या मित्राला म्हणायचा, तेव्हा तो हेच सांगायचा आता कामामुळे फुरसत नाही आहे. एक वर्षानंतर त्या मित्राचा मृत्यु झाला. त्याचे पार्थिव उचलून कुटुंबातील लोक आणि नगरवासी गेले. सोबत गावाच्या गल्ल्यांमधील शेकड़ों व्यक्ति सुद्धा बरोबर चालत होते. सर्व जण राम नाम सत् आहे, सत् बोले गत् आहे असे म्हणत होते.

भक्त म्हणत होता राम नाम तो सत् आहे परंतु आज बंधूला फुर्सत आहे. नगरवासी म्हणत होते सत् बोले गत् आहे, भक्त म्हणत होता आज बंधूला फुर्सत आहे. अन्य लोक त्या भक्ताला सांगू लागले असे म्हणू नको, त्याच्या घरातील लोकांना वाईट वाटेल. भक्त म्हटला मी तर असेच म्हणणार. मी ह्या मूर्खाला हात जोड़ून विनंती करीत होतो की सत्संगात चल, काही भक्ति कर. हा म्हणायचा आता फुर्सत म्हणजेच रिकामा वेळ नाही आहे. आज ह्याला कायमची फुर्सत आहे. ज्यांच्या पालन-पोषणाचा बहाणा करून परमात्म्यापासून लांब राहिला त्या छोट्या-छोट्या मुलांना सुद्धा सोड़ून चालला आहे. भक्ति करत असता तर रिकाम्या हाताने तरी गेला नसता.काही भक्ति धन घेऊन गेला असता, तर मुलांचे पालन-पोषण परमात्मा करत असतो. भक्ति करण्याने साधकाचे आयुष्य सुद्धा परमात्मा वाढवतो. भक्तजन असा विचार करूनच भक्ति करतात आणि काम सोडून सत्संगात श्रवण करायला जातात.

भक्त विचार करतात की परमात्मा आमचा मृत्यु लवकर न आणो. मग आमची कामे कोण करणार? आम्ही असे समजून चालतो की आमचा मृत्यू झाला. आम्ही तीन दिवस मृत्यू पावलो असा विचार करून सत्संगात जातो. स्वत:ला मृत मानून सत्संगात जाणे तसे तर त्या परमात्म्याच्या भक्तांचे काम कधीच बिघड़त नाही, तरीही प्रत्यक्षात आम्ही असे समजून चालतो की आमच्या गैर-हजेरीत काही काम खराब झाल्यास तीन दिवसांनी जाऊन ते ठीकठाक करू. पण प्रत्यक्षात जर वरचे टिकीट कटले असल्यास म्हणजेच मृत्यु झाल्यास काम कायमस्वरूपी बिघडते. मग पुन्हा ते ठीक करण्यासाठी आपण येउच शकत नाही. अशा स्थितीला जिवंतपणी मरणे म्हणतात.

**वाणीचा उर्वरित सरलार्थ :-** द्वादश मध्य महल मठ बौरे, बहुर न देहि धरै रे।

**सरलार्थ :- श्रीमद् भगवत गीता अध्याय १५ श्लोक ४ मध्ये म्हटले आहे की तत्वज्ञानाच्या** प्राप्ति नंतर परमेश्वराच्या त्या परमपदाचा शोध घेतला पाहिजे, जिथे एकदा पोहोचल्यानंतर साधक ह्या मृत्युलोकात परत येत नाहीत म्हणजेच त्यांचा पुनर्जन्म होत नाही. ते पुन्हा देह धारण करीत नाहीत. सूक्ष्मवेदाची ही वाणी हेच स्पष्ट करीत आहे की द्वादश म्हणजेच १२वें द्वार पार करूनच त्या परम धाममध्ये पोहोचवायचे असते. आजपर्यंत सर्व ऋषि-महर्षि, संत, मंडलेश्वर केवळ १० द्वारचा सांगत होते. परंतु परमेश्वर कबीरजी यांनी आपले स्थान प्राप्त करण्यासाठीचा सत्यमार्ग, सत्य स्थान स्वतःच सांगितले आहे. त्यांनी १२वे द्वार सांगितले आहे. ह्यावरून हेच स्पष्ट होते की आज पर्यंत (सन् २०१२ पर्यंत) पूर्वीचे सर्व ऋषि, संत, पंथ यांची भक्ति काल ब्रह्म पर्यंतच होती. त्यामुळेच जन्म-मृत्युचे चक्र सुरु राहिले.

**वाणी सँख्या ५ :-** दोजख बहिश्त सभी तै देखे, राजपाट के रसिया।
तीन लोक से तृप्त नाहीं, यह मन भोगी खसिया।।

**सरलार्थ :-** तत्वज्ञानाचा अभाव असल्याने पूर्णमोक्षाचा मार्ग न मिळाल्याने कधी कधी दोजख म्हणजेच नरकात गेले, कधी बहिश्त म्हणजेच स्वर्गात गेले कधी राजा होऊन आनन्द घेतला. ह्या मनुष्याला तीनही लोकाचे राज्य जरी दिले तरीही त्याची कधीही तृप्ति होणार नाहीं.

**उदाहरण :-** जर कोणी गावचा सरपंच बनला तर त्याची इच्छा असते की आमदार

होऊन मजा करता येईल. आमदार इच्छा करतो की मन्त्री बनलो तर काही वेगळी गोष्ट होईल. मंत्री बनून इच्छा होते की मुख्यमंत्री बनलो तर पूर्ण चैन करता येईल. होणारा आनन्द सुद्धा न्याराच असेल. साऱ्या प्रान्तावर हुकुमत चालेल. मुख्यमंत्री बनून प्रबल इच्छा होते की पंतप्रधान बनलो तर जीवन सार्थकी लागेल. पण तोपर्यंत जीवन लीला समाप्त होऊन जाते. मग गाढव होऊन कुंभाराच्या लाठ्या खात असेल. त्यासाठीच तत्वज्ञानात असे सांगितले आहे की काल ब्रह्म द्वारा बनविलेली स्वर्ग–नरक आणि राज्यप्राप्तिच्या भूल–भुलैया मध्ये सारे जीवन व्यर्थ घालवले. कुठेही समाधान मिळाले नाही, हे मन म्हणजे असा खुसरा (हिजड़ा) आहे.

एक अब्राहिम सुल्तान अधम नावाचा बलख शहराचा राजा होता. तो पूर्व जन्मी अतिशय चांगला भक्त होता. परंतु वर्तमानात ऐश्वर्याची मस्ती चढल्यामुळे परमात्म्याला विसरला होता. राजथाट आणि महालांच्या आनंदात मग्न होऊन बसला होता. एक दिवस परमात्मा सत्यलोकातून येऊन एका यात्रेकारुचे रूप घेऊन राजाच्या महालात गेले आणि म्हणाले हे धर्मशाळावाल्या! एक खोली भाड्याने दे, पैसे कीती ते सांग, रात्र काढायची आहे. राजा म्हणाला हे भल्या गृहस्था! आपणास ही धर्मशाळा दिसते आहे काय मी राजा आहे आणि हा माझा महाल आहे. यात्रेकरूच्या रूपातील परमात्म्याने विचारले आपणा पूर्वी ह्या महालात कोण राहत होते राजाने सांगितले की माझे पिता, आजोबा पणजोबा राहत होते. यात्रेकरूच्या रूपातील परमात्म्याने विचारले आपण अजून कीती दिवस ह्या महालात रहाल? राजाने सांगितले एक दिवस मी पण हे सोडून निघून जाणार. परमेश्वराने म्हटले की मग ही धर्मशाळा नाही तर काय आहे? ही धर्मशाळाच आहे. जसे तुझे बाप–आजोबा गेले तसेच तू सुद्धा जाणार आहेस. त्यामुळेच मी महालाचे वर्णन धर्मशाळा असे केले आहे. राजाला वास्तवाचे ज्ञान झाले. जगताची इच्छा त्यागून आत्म–कल्याण करवून घेतले. सदा राहणारा आनंद व सुख व अमर जीवन प्राप्त करण्यासाठी अनुग्रह घेतला व आजीवन भक्ति करून आपल्या मानव जीवनाचे सार्थक केले.

**वाणी सँख्या ६:–** सतगुरू मिलैं तो इच्छा मेटैं, पद मिल पदे समाना।
चल हंसा उस लोक पठाऊँ, जो आदि अमर अस्थाना।।

सरलार्थ :– जर तत्वदर्शी संत सद्गुरु मिळाले तर उपरोक्त ज्ञान सांगून काल ब्रह्म लोकातील सर्व वस्तु व पदांची इच्छा समाप्त करून ''पद मिल पदे समाना'' यामध्ये एका ''पदाचा'' अर्थ आहे पद्धति म्हणजेच शास्त्राविधिनुसार साधना. दूसऱ्या ''पदाचा'' अर्थ आहे ''परम पद'' म्हणजेच ''पदवी.'' सद्गुरु शास्त्राविधि नुसार पद्धति सांगून परमेश्वराच्या त्या परम पदाची प्राप्ति करून देतात जिथे पोहोचल्यावर साधकाला पुन्हा फिरून मृत्युलोकात यावे लागत नाही. हे भक्त! चल तुला अशा लोकात पाठवतो, जिथे सनातन अमर शाश्वतस्थान असते म्हणजेच गीता अध्याय १८ श्लोक ६२ मध्ये वर्णन केलेले सनातन परम धाम आहे आणि तिथे परम शांति आहे.

**वाणी सँख्या ७ :–** चार मुक्ति जहाँ चम्पी करती, माया हो रही दासी।
दास गरीब अभय पद परसै, मिले राम अविनाशी।।

सरलार्थ :– त्या सनातन परम धामी परम शान्ति आणि अत्यधिक सुख आहे. काल ब्रह्म लोकात चार मुक्ति मानल्या जातात व त्या प्राप्त करून साधक स्वतःला धन्य समजतो. परंतु त्या शाश्वत नसतात. काही कालावधी नंतर पुण्य समाप्त होते आणि पुन्हा ८४ लाख प्रकारच्या योनिंमध्ये कष्ट उपसतात. परंतु त्या सत्यलोकात चारही मुक्तिचे सुख सदासर्वदा असते. माया आपल्या पायाची दासी होऊन राहते.

संत गरीबदासजी नि सांगितले आहे की अमर लोकात गेल्यानंतर प्राणी निर्भय होऊन जातो आणि त्या सनातन परम धामी तो अविनाशी राम म्हणजेच परमेश्वर प्राप्त होईल. त्यासाठी शास्त्रानुकूल भक्ति केल्यास पूर्ण मोक्ष मिळतो. ज्यायोगे त्या परमात्म्यापर्यंत पोहोचता येते.

उपरोक्त वाणी आणि पूर्वोक्त विवरणावरून हे स्पष्ट झाले की श्री ब्रह्मदेव, श्री विष्णुजी आणि श्रीशंकर आणि याचे पिता काल ब्रह्म म्हणजेच क्षर पुरूष व अक्षर पुरूष सर्व राम म्हणजेच प्रभु नश्वर आहेत. केवल परम अक्षर ब्रह्म हेच अविनाशी राम म्हणजेच परमात्मा आहेत. ह्या परमेश्वराची भक्ति करुनच परमशांति आणि सनातन परम धाम म्हणजेच पूर्ण मोक्ष प्राप्त होइल जिथे चारही मुक्तिचे सुख सदासर्वदा असेल माया म्हणजेच सर्व सुख-सुविधांसह साधकाच्या नोकरासारखी हात जोडून हजर असते. सूक्ष्मवेदात लिहिले आहे की :-

कबीर, माया दासी संत की, उभय दे आशीष।
विलसी और लातों छड़ी, सुमर-सुमर जगदीश।।

भावार्थ :- सर्व सुख-सुविधा धनाने प्राप्त होत असतात. शास्त्राविधि नुसार भक्ति करणाऱ्या संत-भक्तांचा धन प्राप्त करण्याचा उद्देश नसतो पण तरीसुद्धा एक **By Product** म्हणून ते मिळतेच. जसे एखाद्याने गहू पेरण्याचा उद्ददेश हा गव्हाचे अन्न प्राप्त करण्याचा असतो. परंतु भुसा म्हणजेच चारा सुद्धा अवश्य प्राप्त होतो. चारा, हा भुसा गव्हाचे **By Product** आहे. त्याच प्रकारे सत्य साधना करणारयाला धन मायारूपात मिळत असते. साधक ती भोगतो, त्याच्या चरणी ती पड़लेली असते म्हणजेच धनाचा अभाव नसतो पण दुसरीकडे ते आवश्यकते पेक्षा अधिक प्राप्त होत राहते. परमेश्वराची भक्ति करून मायेचा आनन्द सुद्धा भक्त, संत प्राप्त करतात व पूर्ण मोक्ष सुद्धा प्राप्त करतात.

❖ त्याच प्रसंगाचा विचार पुढे नेऊ. मानव शरीर प्राप्त प्राण्याने आपले उद्दिष्ट लक्षात ठेवले पाहिजे. भक्ति करुन आपले कल्याण करून घेतले पाहिजे. सूक्ष्म वेदात लिहिले आहे की :- (राग आसावरी शब्द नं. ७१)

यह सौदा फिर नाहीं सन्तो, यह सौदा फिर नाहीं। लोहे जैसा ताव जात है, काया देह सराही।।
तीन लोक और भुवन चतुर्दश, सब जग सौदे आहीं। दुगने-तिगुने किए चौगुने, किन्हूँ मूल गवाहीं।।

भावार्थ :- जसे दोन व्यापारी (**Businessmen**) दूर कोणत्यातरी एका शहरात सौदा करण्यास गेले आणि ५-५ लाख रूपये भांडवल घेऊन गेले. एकाने आपल्या धनाचा सदुपयोग केला. धर्मशाळा किंवा होटेलात खोली भाड्याने घेऊन सामान खरेदी केले आणि जास्त भावात विकले. त्यामुळे त्याने २० लाख रूपये जास्त कमावले. दोन वर्षात परत आपल्या घरी आला. सगळीकडे प्रसंशा झाली आणि श्रीमंत झाला.

दूसऱ्याने सुद्धा होटेलात खोली भाड्याने घेऊन दारू पिऊ लागला, वारांगानांचे नृत्य बघणे, खाणे, पिणे आणि झोपा काढणे हाच त्याचा उद्योग झाला. त्याने आपले मूळ भांडवलाचे ५ लाख रूपये खर्चून टाकले आणि कर्जबाजारी होऊन घरी आला. ज्याच्याकडून ५ लाख रूपये उसने घेऊन गेला होता त्याने त्याची रक्कम परत मागीतली. पण देऊ न शकल्यामुळे, त्याला स्वतःच्या घरी मजूर म्हणून ठेऊन आपले ५ लाख रक्कम वसूल केली. उपरोक्त वाणीचे तात्पर्य एवढेच की तीन लोकांमध्ये (स्वर्ग लोक, पाताल लोक आणि पृथ्वी लोक) जितके प्राणी आहेत, ते सर्व आपल्या राम-नामाचा सौदा करण्यासाठी आले आहेत. कोणी दुप्पट, तर कोणी तिप्पट, चौपट असे कमाविले म्हणजेच संतांकडून अनुग्रह घेऊन मनुष्य जीवनाचे मुळचे भांडवल असलेले श्वांसांचे मूळ धन भक्ति करून वाढविले. ज्या अन्य व्यक्तिनी भक्ति

केली नाही या शास्त्राविधिचा त्याग करून मनाला वाटेल तसे आचरण करतात किंवा अधिकार नसलेल्या गुरू कडून अनुग्रह घेऊन भक्ति करतात, त्यांना कोणताही लाभ मिळत नाही. हे पवित्र गीता अध्याय १६ श्लोक २३-२४ मध्ये सप्रमाण सांगितले आहे. ह्याच कारणामुळे त्याने सुद्धा आपल्या मनुष्य जीवनाचे श्वांस रूपी भांडवल सत्य भक्ति शिवाय नष्ट करून टाकले.

## ❖ भक्ती न केल्याने होणाऱ्या नुकसानाचे वर्णन :

यह दम टूटै पिण्डा फूटै, हो लेखा दरगाह मांही। उस दरगाह में मार पड़ैगी, जम पकड़ेंगे बांही।।
नर-नारायण देहि पाय कर, फेर चौरासी जांही। उस दिन की मोहे डरनी लागे, लज्जा रह के नांही।।
जा सतगुरू की मैं बलिहारी, जो जामण मरण मिटाहीं।
कुल परिवार तेरा कुटम्ब कबीला, मसलित एक ठहराहीं। बाँध पींजरी आगै धर लिया, मरघट कूँ ले जाहीं।।
अग्नि लगा दिया जब लम्बा, फूंक दिया उस ठाहीं। पुराण उठा फिर पण्डित आए, पीछे गरूड पढाहीं।।

भावार्थ :- हा दम म्हणजेच श्वास ज्या दिवशी संपेल, त्याच दिवशी हे शरीर रुपी पिंड सुटेल. मग परमात्म्याच्या दरबारात पाप-पुण्याचा हिशोब होईल. भक्ति न करणाऱ्या किंवा शास्त्राविरूद्ध भक्ति करणाऱ्याला यमाचे दूत दंडांना पकडून घेऊन जातील, मग भले तो कोण्या देशाचा राजा का असेना, मग त्याची पिटाई होईल. संत गरीबदासांना परमेश्वराची प्राप्ती परमेश्वर कबीरांकडून झाली होती. त्यांच्या आत्म्याला ते वर घेऊन गेले होते. सर्व ब्रह्माण्डांचे दर्शन घडवून व सम्पूर्ण अध्यात्म ज्ञान समजावून परत शरीरात सोडले होते. संत गरीब दासजी हे आँखों देखा हाल सांगत आहेत की :- हे मानवा! तुला जे नर शरीर मिळाले आहे ते नारायण म्हणजेच परमात्म्याच्या शरीरा सारखेच आहे म्हणजेच त्यांचेच स्वरूप आहे. अन्य प्राण्याना हे सुन्दर शरीर मिळलेले नाहीं. हे प्राप्त झाल्यानंतर मानवाने जन्मभर भगवंताची भक्ति केली पाहिजे. असे परमात्मा स्वरूप शरीर प्राप्त करूनही सत्य भक्ति न केल्यामुळे पुनःपुन्हा चौऱ्याशी लाख योनीच्या चक्रात फिरत राहतोस. धिक्कार असो तुझ्या मानव जीवनाचा! मला तर त्या दिवसांची चिन्ता लागली आहे आणि भीती याची वाटते की कुठे भक्ति कमी पडून त्या परमात्म्याच्या दरबारात आपली काही अब्रू राहील की नाही. मला तर भक्ति करता-करता सुद्धा भीती वाटते की माझी भक्ती कुठे कमी तर पडणार नाही. आपण तर भक्तिच करीत नाही. जरी करत असलात, तरी ती शास्त्राविरूद्ध करीत आहात. तुमची अतिशय वाईट अवस्था होईल आणि मला तर असे वाटते की तुम्ही असा सद्गुरू शोधा जो तुमचे जन्म मरणाचे जुनाट रोगापासून तुम्हाला मुक्ती देईल. जे खरी भक्ति करीत नाहींत, त्यांचे मृत्यु पश्चात् काय हाल होतात. आस-पास चे कुटुंबातील लोक एकत्र होतात आणि मग सगळ्यांचा एकाच मसलत म्हणजे विचार ठरतो-ह्याला उचला. (उचलून स्मशान घाटावर नेऊन जाळून टाका. लाठीने किंवा काठीने मारून मारून छाती फोडतात. सम्पूर्ण शरीर जाळून टाकतात. खिशात जे काही कीडूक मिडूक असते, ते काढून घेतात. मग शास्त्राविधिचा त्याग करून मनाला येईल तसे आचरण करणाऱ्या त्या जगातून निघून गेलेल्या जीवाच्या कल्याणासाठी गुरू गरूड पुराणाचे पारायण करतात.)

तत्वज्ञान (सूक्ष्मवेद) असे सांगते की आपले मानवी जीवन पूर्ण करून तो जीव निघून गेला. परमात्म्याच्या दरबारात त्याचा हिशोब होईल. तो कर्मानुसार कुठे गाढव किंवा कुत्रा होणाऱ्या रांगेत उभा राहील. मृत्यु पश्चात् केलेल्या गरूड पुराणाच्या पारायणाचा त्याला काय लाभ होणार? हे शास्त्राविरूद्ध होत असलेले व्यर्थ क्रियाक्रम आहे. त्या प्राण्याने मनुष्य शरीर धारण केले असताना त्याला भगवंताच्या भक्तीचे ज्ञान करून द्यायला पाहिजे होते. त्यायोगे भले-बुरे समजून घेऊन त्याने आपले मानव जीवन सफल केले असते.

प्रेत शिला पर जाय विराजे, फिर पितरों पिण्ड भराहीं। बहुर श्राद्ध खान कूं आया, काग भये कलि माहीं।।

**भावार्थ :-** असा की मृत्यु नंतर त्या जीवाच्या कल्याणासाठी म्हणजेच त्याला सद्गती प्राप्त होण्यासाठी शास्त्राविरूद्ध केलेली सर्व क्रियाकर्मे व्यर्थ आहेत. म्हणजेच त्याला सद्गती प्राप्त होण्यासाठी गरूड पुराणाचे पारायण करविले, त्या मरणाराची गती म्हणजेच मोक्ष होण्यासाठी त्याच्या अस्थी गंगेमध्ये सोडून दिल्या. त्याची गती (मोक्ष) होण्यासाठी मग तेराव्या आणि सतराव्या दिवशी होमहवन आणि भण्डारा केला, आधी मासिक श्राद्ध आणि नंतर सहा महिन्यांनी छःमाही क्रिया करायची, मग वार्षिक श्राद्ध करायचे, श्राद्धाच्या दिवशी पुरोहित भोजन स्वतः बनवून सांगतात की भोजनाचा काही भाग घराच्या छतावर ठेवा म्हणजे जर आपले वडिलांना कावळ्याची गती प्राप्त झाली असल्यास तो भोजन करून जाईल. कावळ्याने भोजन खाल्ल्यावर म्हणतात तुमचे जे आई किंवा वडिलांचा मृत्यू झाला, त्यांच्यासाठी ही सर्व क्रिया आणि श्राद्धे केली गेली. जो कावळा झाला त्याचे श्राद्ध सफळ झाले. उपरोक्त विवरणावरून हे स्पष्ट होते की ज्या व्यक्तिचे उपरोक्त क्रियाकर्म केले होते, तो कावळा झाला आहे.

श्राद्ध करणारे पुरोहित म्हणतात की श्राद्ध करण्यामुळे तो जीव एक वर्ष पर्यंत तृप्त होतो. मग एक वर्षानंतर परत श्राद्ध केले पाहिजे.

**विचार करा :-** जीवित असलेली कोणतीही व्यक्ति दिवसभरात तीन वेळा भोजन करतात. आता एक दिवस भोजन करून एक वर्षभर कशी काय तृप्त होउ शकेल? जरी दररोज छतावर भोजन ठेवले तरी तो कावळा रोजच भोजन करून जाणार.

**दूसरी गोष्ट :-** मृत्यु नंतर केलेल्या सर्व क्रिया मोक्ष मिळण्याच्या उद्देशाने केलेल्या होत्या. त्या ज्ञानहीन गुरूने शेवटी कावळा करूनच सोडले. ते प्रेत दगडावर प्रेत योनि भोगते आहे. मागून गुरू आणि कावळा मजेत जेवण करत आहेत. पिण्डदानाचा असा लाभ सांगितला आहे की प्रेत योनिमधून सुटका होते. एक वेळ समजून चालू, प्रेत योनि सुटली. तरीसुद्धा तो गाढव किंवा बैल झालाच ना, मग त्याला कोणती गती मिळाली?

नर से फिर पशुवा कीजै, गधा, बैल बनाई। छप्पन भोग कहाँ मन बौरे, कहीं कुरड़ी चरने जाई।।

**भावार्थ :-** मनुष्य जीवनात आम्ही कीती उत्तमोत्तम म्हणजेच ५६ प्रकारची जेवणे जेवत असतो. भक्ति न केल्यामुळे किंवा शास्त्राविरूद्ध साधना केल्यामुळे गाढव बनेल, मग हे छप्पन प्रकारची भोजने कशी त्याला प्राप्त होणार? कुठे कुरणावर गवत खाऊन पोट भरेल. अशा प्रकारे बैल आदि पशुच्या योनित त्याला कष्टमय जीवन जगावे लागणार.

जै सतगुरू की संगत करते, सकल कर्म कटि जाईं। अमर पुरि पर आसन होते, जहाँ धूप न छाँइ।।

**भावार्थ :-** संत गरीब दास हे परमेश्वर कबीरजी कडून प्राप्त सूक्ष्मवेदात पुढे म्हणतात की जरी सद्गुरुना (तत्वदर्शी संत) शरण जाउन अनुग्रह घेतला असता तरीही उपरोक्त सर्व कर्मांचे कष्ट झाले नसते. म्हणजेच न प्रेत, न गाढव, न बैल काहीच बनले नसते. अमरपुरी मध्ये आसन मिळाले असते. म्हणजेच गीता अध्याय १८ श्लोक ६२ आणि अध्याय १५ श्लोक ४ में वर्णन केल्यानुसार सनातन परम धाम प्राप्त झाले असते, परम शान्ति प्राप्त झाली असती. पुन्हा कधीही प्रपंचात परतून आले नसते. म्हणजेच जन्म-मरणाचे कष्टदायक चक्र कायमचे संपले असते. त्या अमरलोकात (सत्यलोक) ऊन सावली नाहीच आहे. म्हणजेच जसे ऊन दुःखदायक असल्यामुळे सावली ची गरज भासते. त्या सत्यलोकात केवल सुखच आहे, दुःख नाहीच.

सुरत निरत मन पवन पयाना, शब्दै शब्द समाई। गरीब दास गलतान महल में, मिले कबीर गोसांई।।

**भावार्थ :-** संत गरीबदासजी पुढे म्हणतात की मला परमेश्वर कबीर भेटले आहेत. मला

सुरत-निरत, मन आणि श्वांस यावर लक्ष ठेवून नामस्मरण करण्याची प्रक्रिया सांगितली. ह्या साधनेमुळे सतलोकामधून येणारी शब्द धुनि धरून सतलोकात गेलो. त्यामुळे सत्यलोकातील (शाश्वत स्थान) आपल्या महालात आनंदाने राहतो कारण परमेश्वर कबीरजींनी संत गरीब दासांना जी सत्य साधना सांगितली होती ते स्थान (सत्यलोक) गरीबदासजी परमेश्वरा सोबत जाऊन पाहून आले होते. त्यामुळेच की मी जी शास्त्रानुकूल साधना करतो आहे, ती भगवंताने सांगितली असल्याचे ते आत्मविश्वासपूर्वक म्हणू शकले. ज्या शब्द म्हणजेच नामाचा मी जप करतो, त्यामुळे मी अवश्य पूर्ण मोक्ष प्राप्त करीन. याबाबत कोणताच संशय राहिलेला नाही. त्यामुळेच मी (गरीब दास) सत्यलोकामधील आपल्या महालात (विशाल घरात) जाईन, ह्यामुळेच निश्चिन्त आणि निवांत महल प्राप्तीच्या खुशीत मस्त होईन. कारण मला पूर्ण गुरू स्वतः परमात्मा कबीरजी आपल्या लोकातून येऊन भेटले आहेत.

गरीब, अजब नगर में ले गए, हमको सतगुरू आन। झिलके बिम्ब अगाध गति, सूते चादर तान।।

भावार्थ :- गरीबदास जी सांगतात की सद्गुरु म्हणजेच स्वतः परमेश्वर कबीरजी आपल्या निज धाम असलेल्या सत्यलोकातून येऊन मला बरोबर घेऊन अद्भुत नगरात म्हणजेच सत्यलोकात असलेल्या शहरात घेऊन गेले. ते स्थान आपल्या डोळ्यांनी पाहून मी परमात्म्याने विहित केलेल्या मार्गावर चालत आहे. सत्यनाम, सारनाम यांची साधना करतो आहे. त्यामुळे निश्चिंत होऊन चादर ओढून निवांत झोपलो आहे. म्हणजेच माझ्या मोक्षाबाबत कोणताही संदेह राहिलेला नाही.

चादर ओढून ताणून देणे = निश्चिंत होणे. ज्याचे कोणतेही काम राहिलेले नाही, आणि तो चादर ओढून निवांतपणे पडलेला असेल तर खेडेगावात म्हणतात याने चादर ताणून झोपला आहे. कोणतेच काम नाही असे आहे काय? त्याच प्रकारे गरीबदासजी म्हणतात की आता मोठमोठे महाल बांधणे व्यर्थ वाटू लागले आहे. आता तर त्या सत्यलोकात जायचे आहे. तिथे मोठमोठ्या इमारती अगोदरच बांधलेल्या आहेत. ज्या सोडून आम्ही ह्या मृत्युलोकात आलो आणि मोठी चूक केली. आता डाव टाकला आहे. सत्य भक्ति आणि तत्वज्ञान प्राप्त झाले आहे.

साधकहो! ते सत्य भक्ति वर्तमानात माझ्या (रामपाल दासजी) जवळ आहे. ज्यामुळे ह्या दुःखाच्या भवसागरातून पार होऊन ते परम शान्ति आणि शाश्वत स्थान (सनातन परम धाम) आपल्याला प्राप्त होते. ह्या विषयी गीता अध्याय १८ श्लोक ६२ आणि गीता अध्याय १५ श्लोक ४ मध्ये म्हटले आहे की तत्वदर्शी संतांकडून तत्वज्ञान प्राप्त करून त्या तत्वज्ञानाच्या आधारे अज्ञानाचा नाश करून, त्यानंतर भगवंताच्या त्या परमपदाचा शोध घेतला पाहिजे. तिथे पोहोचल्यावर साधक परत फिरून ह्या जगात येत नाही.

## ''भक्ति न केल्याने अती दुःख होईल''

सूक्ष्मवेदात म्हटले आहे की :-

यह संसार समझदा नाहीं, कहंदा शाम दुपहरे नूँ। गरीबदास यह वक्त जात है, रोवोगे इस पहरे नूँ।।

भावार्थ :- अध्यात्मिक ज्ञानाच्या अभावी परमात्म्याच्या करणीची जाणीव नसल्यामुळे हा प्राणी ह्या दुःखाने भरलेल्या घर संसारात अतिशय कष्टात जीवन जगतो आहे आणि त्यालाच सुखाचे स्थान मानतो आहे.

जसे एक व्यक्ति जून महीन्यामध्ये दिवसा १२ किंवा १ वाजता हरियाणा राज्यात दारू प्राशन करून तळपत्या उन्हात पडला आहे, घामाघूम झाला आहे आणि शरीर वाळूने माखले आहे. एका व्यक्ति ने म्हटले मित्रा! उठ, तुला झाडाखाली बसवतो, इथे तू उन्हात भाजून

निघतो आहेस. दारुड्या म्हटला नाही मी बिल्कुल ठीक आहे, मजा येते आहे, काहीच कष्ट नाहीयेत.

❖ एक माणूस काही कारणाने कोर्टात गेला. तिथे त्याला एक त्याचा नातेवाईक भेटला. एकमेकांचे क्षेमकुशल विचारून दोघांनी हि म्हटले सर्व ठीक आहे, मजा आहे.

❖ एका माणसाचा एकुलता एक मुलगा अतिशय आजारी होता. त्याला रुग्णालयात **P.G.I.** दाखल केले होते. तो वाचण्याची शक्यता जवळपास नव्हतीच. अशा स्थितीत माता-पित्यांची काय स्थिती होत असेल, हे सहज समजून येते. नातलग भेटायला आले, आणि विचारले कशी काय आहे मुलाची तब्बेत? वडिलांनी सांगितले वाचण्याची शक्यता कमीच आहे. नंतर क्षेमकुशल विचारले तर वडील म्हणाले की सगळे मजेत आहे.

आपण विचार करा :- दारूच्या नशेत धुंद असलेला भर उन्हात इकडून निघत होता. तरी सुद्धा म्हणत होता, मजा करतोय.

❖ कोर्ट दरबारी जे नातलग भेटले, दोघेही हेच म्हणत होते सर्व मजा आहे. विचार करा, जो माणूस कोर्टाच्या शुक्लाकाष्ठात अडकला आहे, त्याला स्वपनात सुद्धा सुख दिसणार नाही. तरी सुद्धा दोघेही म्हणत होते की मजा आहे. म्हणजेच आनन्द आहे.

❖ ज्या माणसाचा एकुलता एक मुलगा मृत्यु शैय्येवर असेल, त्याला कसली मजा आली आहे? म्हणूनच सूक्ष्मवेदात म्हटले आहे की ह्या दुःखमय जगातील हे प्राणी ह्या महाकष्टालाच सुख समजत आहेत.

यह संसार समंझदा नाहीं, कहंदा शाम दोपहरे नूं। गरीब दास यह वक्त जात है, रोवोगे उस पहरे नूँ।।

भावार्थ :- संत गरीबदासजी सांगतात की मनुष्य जन्म प्राप्त करून जी व्यक्ति भक्ति करत नाही, ती कुत्रा गाढव इत्यादी योनिमध्ये दुःख भोगतो. कुत्रा रात्रि आकाशाकडे तोंड करून रडतो. म्हणूच गरीबदासजी असे सांगतात की हे मानवी शरीर एकदा हातातून निसटले आणि भक्ति केलेली नसेल, तर त्यावेळी ही वेळ आठवून रडण्याची वेळ येईल.

## ''भक्ति मार्गावरील प्रवास''

जोपर्यंत आध्यात्मिक ज्ञान होत नाही तोपर्यंत जीव मायेच्या प्रभावाने आपला उद्देश्य विसरला होता आणि वर म्हटल्यानुसार दारुडा मनुळष्य दारूच्या नशेत ज्येष्ठ महीन्यातील दुपारच्या कडक उन्हात घामाघूम झालेल्या आणि वाळूने माखलेल्या अवस्थेत म्हणतो मजा करतोय. परंतु नशा उतरल्या नंतर त्याला कळते की तो तर जंगलात पड़ला आहे, घर तर अजून खूपच दूर आहे.

कबीरजींनी म्हटले आहे की :-

कबीर, यह माया अटपटी, सब घट आन अड़ी। किस-किस को समझाऊँ, या कूऐ भांग पड़ी।।

भावार्थ :- अध्यात्म ज्ञान रूपी औषधि सेवन केल्यानंतर जीव धुंदीतून बाहेर येतो. मग तो भक्तिचा मार्गावर चालू लागतो कारण त्याला परमात्म्यापाशी पोहोचायचे आहे. तो आपला पिता आहे आणि तो सतलोक जीवाचे स्वतःचे घर आहे.

यात्रा करणारी व्यक्ती सगळे सामान घेऊन नाही चालू शकत. केवळ आवश्यक ते सामान घेऊनच लेकर यात्रा करायला बाहेर पडतो. त्याच प्रमाणे भक्ति यात्रेत सर्व भार हल्का होउन चालणे होईल तेव्हाच आपला मार्ग प्राप्त करता येईल. भक्ति रूपी मार्गावर वाटचाल कारण्यासाठी आपल्याला मानसिक शांति असणे अनिवार्य आहे. मानसिक त्रासाचे कारण

आहे आपल्या परंपरा आणि मान-अपमान, मोठेपणा, लोकदेखावा, नशा, इत्यादी भार घेऊन आपण व्यर्थ उभे आहोत. जशी मोठी हवेली, मोठी महागडी चारचाकी, नटणे मुरडणे, महागडे सोन्यामोत्याचे दागिने घालणे, लग्नात हुंडा देणे-घेणे, बँड-बाजा, डीजेचा धिंगाणा करणे, घोड्यावर चढताना सगळ्या कुटुंबाने निर्लज्जपणे नाचणे, श्राद्धाचे जेवणावळी घालणे, मुलाचा जन्म झाला म्हणून उत्सव साजरे करणे, त्याप्रसंगी फटाके वाजवणे, फालतू खर्च करणे इत्यादी बाबी भक्ती मार्गाला बाधक असल्याने त्यांचा त्याग करावा लागेल.

## ''गुरू विना मोक्ष नाहीं''

प्रश्न :- गुरूशिवाय भक्ति करता येत नाहीं काय?

उत्तर :- भक्ति करता येते, परन्तु प्रयत्न व्यर्थ असतो.

प्रश्न :- कारण सांगावे?

उत्तर :- परमात्म्याचा नियम आहे, सूक्ष्मवेदात म्हटले आहे :-

कबीर, गुरू बिन माला फेरते, गुरू बिन देते दान। गुरू बिन दोंनो निष्फल है, पूछो वेद पुराण।।
कबीर, राम कृष्ण से कौन बड़ा, उन्हों भी गुरू कीन्ह। तीन लोक के वे धनी, गुरू आगे आधीन।।
कबीर, राम कृष्ण बड़े तिन्हूं पुर राजा। तिन गुरू बन्द कीन्ह निज काजा।।

भावार्थ :- गुरु दिक्षा घेतल्याशिवाय आपण नामजपाच्या कितीही माळा ओढल्या, आणि दानधर्म केला तरी दोन्ही व्यर्थ आहेत. जर आपल्याला शंका असेल तर आपल्या वेद आणि पुराणांमध्ये असलेली प्रमाणे पहावीत.

श्रीमद् भगवत गीता हे चारही वेदांचा सारांश आहे. गीता अध्याय २ श्लोक ७ मध्ये अर्जुनाने म्हटले की हे श्रीकृष्ण! मी आपला शिष्य आहे, आपल्याला शरण आलो आहे. गीता अध्याय ४ श्लोक ३ मध्ये श्री कृष्णजी मध्ये प्रवेश करून काल ब्रह्मने अर्जुनाला म्हटले की तू माझा भक्त आहेस. पुराणांमध्ये प्रमाण आहे की श्री रामचन्द्रजींनी ऋषि वशिष्ठजी कडून नामदीक्षा घेतली होती आणि आपले घरातील व राजकारभारातील-कामकाज गुरू वशिष्ठांकडून मार्गदर्शन घेऊन करत असत. श्री कृष्णजींनी संदीपनि ऋषिजी कडून अक्षर ज्ञान प्राप्त केले आणि श्री कृष्णजीचे आध्यात्मिक गुरू श्री दुर्वासा ऋषिजी होते.

परमेश्वर कबीरजी आम्हाला समजावत आहेत की आपण श्री राम आणि श्री कृष्णजी पेक्षा कोणालाच महान म्हणजेच समर्थ समजत नाहीं. ते तिन्ही लोकांचे स्वामी होते तरीही त्यांनी सुद्धा गुरू करून आपली भक्ति केली, व मानव जीवन सार्थक केले. त्यावरून सहज हे ज्ञान झाले पाहिजे की इतर लोक जरी गुरूशिवाय भक्ति करीत असली, तरी ते कितपत बरोबर आहे? म्हणजेच व्यर्थ आहे.

❖ गुरूशिवाय लोकवेदानुसार पाहून ऐकून केलेल्या भक्तिला भक्ति म्हणतात. लोकवेद म्हणजे कुठल्याही क्षेत्रातील तत्वज्ञानाच्या विपरीत प्रचलित असलेले भक्तिचे ज्ञान. लोकवेदाच्या आधारे हा सेवक (संत रामपाल दास) श्री हनुमानजी, बाबाश्यामजी, श्री राम, श्री कृष्ण, श्री शंकरजी इत्यादी देव-देवतांची भक्ति करत होता. मंगळवारी हनुमानजीची भक्ति व उपास, बुन्दीचा प्रसाद वाटणे, स्वतः साजूक तुपातील गव्हाचा चुरमा खात असे, श्री हनुमानजींना डालडा वनस्पति घीपासून बनविलेल्या बुन्दीचा प्रसाद चढवत होता. हरे राम, हरे कृष्ण,कृष्ण-कृष्ण हरे-हरे मंत्रजप करत होता. कोणीतरी सांगितले:-

ओम् नाम सबसे बड़ा, इससे बड़ा न कोय। ॐ नाम का जाप करे, तो शुद्ध आत्मा होय।।

या कारणाने ओम् नामाचा जप सुरू केला ओम् नमो शिवायः, ह्या शिवनामाच्या मंत्रचा जप करत होतो. ओम् भगवते वासुदेवायःनमः, हा विष्णुजींच्या मंत्रचा जप करत होतो. तीर्थक्षेत्री जाणे, दानधर्म करणे, तिथे स्नान करणे, हे सुद्धा लोकवेदाच्या आधारे करायला जात होतो.

जसे घरात प्राप्त होणाऱ्या सुखांना मी माझ्या उपरोक्त भक्तीचे फलित मनात यतो. तसेच वर्गात उत्तीर्ण होणे, विवाह होणे, मुलामुलींचा जन्म होणे, नोकरी लागणे ही सर्व सुखे उपरोक्त साधनेचे फलित समजत होतो. परमेश्वर कबीरजींनी सूक्ष्म वेदात म्हटले आहे :-

कबीर, पीछे लाग्या जाऊं था, मैं लोक वेद के साथ। रास्ते में सतगुरू मिले, दीपक दीन्हा हाथ।।

भावार्थ आहे की साधक लोकवेद म्हणजेच दन्तकथेच्या आधारावर भक्ति करत होता. शास्त्राविरूद्ध असलेल्या साधना मार्गावर तो वाटचाल करीत होता. त्या मार्गावरच म्हणजेच भक्ति मार्गावर एक दिवस तत्वदर्शी संत भेटले. त्यांनी शास्त्राविधिनुसार व शास्त्राने प्रमाणित केलेला साधना रूपी दीपक त्याला दिला. म्हणजेच सत्य व शास्त्रानुकूल साधनेचे ज्ञान झाल्यास त्याचे जीवन नष्ट होण्यापासून बचावले. सद्गुरुंच्या द्वारे सांगितलेल्या तत्वज्ञानाच्या प्रकाशात कळले की मी चुकीची भक्ति करत होतो. श्रीमद्भगवत गीता अध्याय १६ श्लोक २३-२४ मध्ये म्हटले आहे की शास्त्रविधिचा त्याग करून जो साधक मनाला वाटेल त्याप्रमाणे मनमाणी आचरण करतात. त्यामुळे त्यांना ना सुख ना सिद्धि ना गति, काहीच प्राप्त होत नाही आहे. म्हणजेच मोक्षाची प्राप्ति होत नाही आहे. म्हणजेच त्यांची साधना व्यर्थ आहे. पुढे गीता अध्याय १६ श्लोक २४ मध्ये म्हटले आहे, हे अर्जुन! ह्यामधून तुझ्यासाठी कर्तव्य आणि अकर्तव्य ह्यांची कोणती व्यवस्था आहे, याची शास्त्रातच प्रमाणे आहेत.

जी उपरोक्त साधना हा सेवक (संत रामपाल दास) करीत होता आणि पूर्ण हिन्दू समाज करत आहे, ती सगळी गीता-वेदांमध्ये वर्णन केल्यानुसार नसल्यामुळे शास्त्राच्या विरूद्ध असलेली साधना आहे आणि म्हणून व्यर्थ आहे.

कबीर, गुरू बिन काहु न पाया ज्ञाना, ज्यों थोथा भुस छडे.मूढ़ किसाना।
कबीर, गुरू बिन वेद पढै.जो प्राणी, समझै न सार रहे अज्ञानी।।

म्हणून गुरूजींकडून वेद शास्त्रांचे ज्ञान करून घेतले पाहिजे, ज्यायोगे खऱ्या भक्तिला शास्त्रानुकूल साधना करून मानव जीवन सफल होईल.

## ''पूर्ण गुरूच्या शब्दांच्या शक्तिने भक्ति होत असते''

उदाहरण:- गुरूजीकडून अनुग्रह घेऊन भक्ति करणे लाभदायक आहे. गुरू बिना भक्ति करण्याने काहीही लाभ होणार नाहीं.

उदाहरण :-

❖ एका राजाची राणी अतिशय धार्मिक होती. तिने परमेश्वर कबीरजी कडून गुरू दीक्षा घेतली होती. ती दररोज गुरूचे दर्शन घेण्यास जात असे. राजाला काही ते आवडत नव्हते. परंतु तो आपल्या पत्नीला तिथे जाण्यापासून थांबवू शकत नव्हता. कारण, एक तर ती त्या मोठ्या शक्तिशाली राजाची मुलगी होती आणि दूसरे म्हणजे तो आपल्या पत्नीला प्रसन्न पाहू इच्छित होता.

एक दिवस राजाने आपल्या पत्नीला म्हटले की तुम्ही नाराज होणार नसाल तर एक गोष्ट सांगू? राणीने म्हटले सांगा. राजाने म्हटले की तुम्ही आपल्या गुरूकडे जाता, भक्ति तर

गुरूशिवाय सुद्धा होऊ शकते. राणीने म्हटले की गुरूजी सांगतात की गुरूशिवाय भक्ति करणे व्यर्थ आहे. राजाने म्हटले की मी तुझ्यासोबत येऊन उद्या तुझ्या गुरूजींना भेटतो, आणि त्यांना ही गोष्ट स्पष्टपणे विचारील.

राजाने संतजींना प्रश्न केला की आपण लोकांना मूर्ख बनवत आहात की गुरूशिवाय भक्ति होत नाहीं, का भक्ति सफल होत नाही? नाममंत्र जप केल्याने भक्ती सफल होते आहे. एकमेकांना विचारून जप केला तरी पुरेसे आहे. संतांनी म्हटले राजन्! आपले म्हणणे बरोबर आहे. मी आपल्या राज दरबारात येऊन तिथेच आपल्या प्रश्नाचे उत्तर देईन. एका निश्चित दिवशी संतजी राजाच्या दरबारात गेले. राजा सिंहासनावर विराजमान झाला होता, आस-पास सर्व शिपाई उभे होते. संतांना बसण्यासाठी वेगळी खुर्ची ठेवली होती. संतांनी जाताच राजाकडे बोट दाखवून आजूबाजूला उभ्या शिपायांना राजाला अटक करण्यास सांगितले. शिपाई जागचे हलले सुद्धा नाहीत. संतांनी लागोपाठ तीन वेळा त्याला अटक करा असे पुन्हापुन्हा आदेश दिले, परन्तु राजाच्या शिपायांनी त्याला अटक केली नाही.

राजाला संतांचा राग आला, की त्याचे राज्य बळकावण्यासाठी ते दृष्ट त्यांच्या पत्नीला त्यांच्या विरुध्द भडकवून देत होता. राजाने एकदा शिपायांना म्हटले की ह्यांना अटक करा. त्या वेळेस त्याचा संकेत संतजींकडे होता. जसा आदेश दिला, तसे शिपायांनी संतजींना अटक केली.

संतजींनी म्हटले की, हे राजन्! आपण घरी बोलाविलेल्या संताचा अनादर करत आहात, हे योग्य नाही. राजाने म्हटले आपण इथे काय बकवास करत होतात? मला अटक करण्याचे आदेश देत होतात. संतजींनी म्हटले गुरूची दीक्षा घेऊन भक्ति करणे कसे लाभदायक आहे ह्या आपल्या प्रश्नाचे मी उत्तर देत होतो. मला सोडा, तर मी आपल्याला उत्तर देतो. राजाने शिपायांना त्यांना सोडायला सांगितले. शिपायांनी संतजींना सोडले. संतजींनी म्हटले की हे राजाजी! मी हेच वाक्य म्हटले होते, ह्याला अटक करा. शिपाई जागचे हलले सुद्धा नाहीत. आपणसुद्धा तेच वाक्य म्हटलेत, तेव्हा शिपायांनी मला त्वरित अटक केली. आपल्या शब्दात राज्याची ताकद आहे. माझ्या शब्दात आध्यात्मिक शक्ति आहे. आपण तोच नामजप म्हणून कोणाला भक्ति करण्यास सांगाल, तर तो मंत्र काहीच कामाचा नाही. पण मी तोच नाममंत्र जप करण्यास सांगितला,तर त्वरित प्रभाव पडून तो क्रियाशील होईल. त्यामुळे पूर्ण संतांकडून दीक्षा घेतल्यास साधकामध्ये आध्यात्मिक प्रक्रिया त्वरित प्रारम्भ होत असते. त्याच्या आत्म्यातून भक्तिचा अंकुर उमलतो. सूक्ष्म वेदात म्हटले आहे की :-

सतगुरू पशु मानुष करि डारै, सिद्धि देय कर ब्रह्म बिचारें।

भावार्थ :- सद्गुरु आधी मनुष्याला सत्संग ऐकवून प्रामाणिक माणूस करतात. सर्व दोषांपासून मुक्त करतात. मग आपल्या भक्तिच्या सिद्धी म्हणजेच शक्तिने शिष्याच्या अन्तःकरणात शब्दाने प्रवेश करून ब्रह्म म्हणजेच परमात्म्याची साधना करण्याचा विचार प्रबळ करतात. त्यामुळे साधकाची भक्तिची आवड दिवसंदिवस वाढत जाते. मग तो देवता होतो. कबीरजींनी म्हटले आहे की :-

कबीर, बलिहारी गुरू आपना, घड़ी-घड़ी सौ-सौ बार। मानुष से देवता किया, करत ना लाई बार।।

म्हणूनच म्हटले आहे की :-

कबीर, गुरू बिन माला फेरते, गुरू बिन देते दान। गुरू बिन दोनों निष्फल हैं, चाहे पूछो बेद पुराण।।

योग, यज्ञ तप दान करावै, गुरू विमुख फल कभी नहीं पावै।।

भावार्थ :- गुरूशिवाय नामजपाच्या माळा फिरवतात किंवा दान देतात, पण ते व्यर्थ

**आहे. याचे वेदात आणि पुराणांमध्ये सुद्धा प्रमाण आहे. नंतर अन्तिम चरणाचा भावार्थ असा आहे की जरी दीक्षा घेऊन नंतर गुरूना सोडून त्याच मंत्राचा जप केल्यास आणि यज्ञ, हवन, दानसुद्धा करत असल्यास ते सुद्धा व्यर्थ आहे. त्याने काहीही लाभ होणार नाहीं.**

कबीर, तांते सतगुरू शरणा लीजै, कपट भाव सब दूर करिजै।

**अन्य प्रमाण:-**

कबीर, गर्भयोगेश्वर गुरू बिना, करते हरि की सेव। कहैं कबीर बैंकुठ से, फेर दिया सुखदेव।।
राजा जनक गुरू किया, फिर किन्ही हर की सेव। कहैं कबीर बैंकुठ में, चले गए सुखदेव।।

**भावार्थ :- ऋषि वेदव्यासजीचे पुत्र सुखदेवजी आपल्या पूर्वजन्मातील भक्तिच्या जोरावर उड़त स्वर्गात जात असत. एक दिवस ते श्री विष्णुजींच्या लोकात असलेल्या स्वर्गात प्रवेश करू लागले. तेथील कर्मचाऱ्याने ऋषि सुखदेवजींना स्वर्गाच्या द्वारावर विचारले की ऋषिजी आपल्या पुज्य गुरूजीचे नाव सांगा. सुखदेवजी म्हणाले की गुरूची काय आवश्यकता आहे? अन्य गुरू धारण करून इथे आले आहेत. माझ्या स्वतःमध्ये इतकी शक्ति आहे की मी गुरूशिवायचं आलो आहे. द्वारपालाने सांगितले ऋषिजी हे आपल्या पूर्व जन्मीच्या साठलेल्या भक्तिची शक्ति आहे. जर पुन्हा गुरु धारण करूनभक्ति केली नाहीं तर पूर्वीची भक्ति काही दिवसच चालेल. आपले मानव जीवन नष्ट होईल.**

**उदाहरण म्हणून :- वर्तमानात इन्वर्टरच्या बैट्रीला चार्जर लावून चार्ज करून ठेवले आहे. जरी चार्जर बाजूला केला तरी सुद्धा इन्वर्टर आपले कार्य करत राहील कारण त्यामध्ये ऊर्जा साठली आहे. काही वेळानंतर ते सगळे काम करायचे थांबवतात. न ट्यूब लागते, न पँखा चालतो. त्याला पुन्हा चार्ज करणे अनिवार्य आहे. त्यासाठी चार्जर पाहिजे. चार्जरला गुरू समजा, विजेला परमेश्वर समजा.**

**ऋषि सुखदेवांना आपल्या सिद्धिचा अहंकार होता. त्यांनी ऐकले नाही. ही गोष्ट भगवान विष्णुजी पर्यंत गेली. श्री विष्णुजींनी सुद्धा तेच सांगितले की ऋषिजी पहिले आपण गुरूना शरण जा. मग इथे या. सुखदेवजींनी म्हटले, भगवान! पृथ्वीलोका वर माझ्या सारखे कोणीच नाहीं आहे, न कोणी रीतीने वागणारा गुरू आहे. कृपया आपणच सांगा की मी कोणाला गुरू करू? श्री विष्णुजींनी सांगितले की आपण राजा जनकाना गुरू करावे. असे म्हणून श्री विष्णुजी आपल्या महालात निघून गेले. सुखदेव ऋषि परत पृथ्वीवर आले. राजा जनकांची दीक्षा घेऊन त्यांनी सांगितलेल्या भक्ति मंत्रांचा जप केला, तेव्हा ऋषि सुखदेवजींना स्वर्गात राहण्याची परवानगी मिळाली. म्हणूनच गुरू करून भक्ति करण्यानेच सफलता शक्य आहे. गुरूशिवाय भक्ति, दान, इत्यादी करणे व्यर्थ आहे.**

❖ **गुरू पूर्ण असावा, नकली गुरू पासून काहीही लाभ होत नाहीं.**

**प्रश्न :- पूर्ण गुरू कसा ओळखावा? आम्ही ज्या कोणत्या संतांचे ज्ञान श्रवण करतो, ते पूर्ण सद्गुरु आहेत असे वाटते.**

**उत्तर :- सूक्ष्मवेदात गुरूची लक्षण सांगितली आहेत :-**

गरीब, सतगुरू के लक्षण कहूँ, मधुरे बैन विनोद। चार वेद छः शास्त्रा, कह अठारह बोध।।

**संत गरीबदासजी (गाव-छुड़ानी जिल्हा-झज्जर, हरियाणा) यांना परमेश्वर कबीरजी भेटले होते. त्यांच्या आत्म्याला आपल्या सत्यलोकी (सनातन परम धाम) घेऊन गेले होते. सर्व लोकांचे अवलोकन करवून परत पृथ्वी वर सोडले होते. त्यांना सम्पूर्ण आध्यात्म ज्ञान सांगितले होते. त्यांचा ज्ञानयोग परमेश्वर कबीरजींनी खुला केला होता. त्याच्याच आधारे संत**

गरीबदासजींनी गुरूची लक्षणे सांगितली आहेत. ती म्हणजे जो पूर्ण गुरू म्हणजेच सद्गुरु होईल, तो असे ज्ञान सांगतो की त्याच्या वचनांनी आत्मा आनंदित होतो. व ऐकायला अतिशय मधुर वाटतात. कारण ते सत्यावर आधारित असतात. कारण सद्गुरु चारही वेद आणि सर्व शास्त्रांचे ज्ञान विस्तारपूर्वक सांगत असतात.

हेच प्रमाण परमेश्वर कबीरजीनी सूक्ष्मवेदा मध्ये कबीर सागराच्या ''जीव धर्म बोध'' अध्यायात पृष्ठ १९६० वर दिले आहे :-

गुरू के लक्षण चार बखाना, प्रथम वेद शास्त्रा को ज्ञाना।।
दुजे हरि भक्ति मन कर्म बानि, तीजे समदृष्टि करि जानी।।
चौथे वेद विधि सब कर्मा, ये चार गुरू गुण जानों मर्मा।।

सरलार्थ :- परमेश्वर कबीरजनी म्हटले आहे की जो सच्चा गुरु होईल, त्याची चार मुख्य लक्षणे आहेत :-

१. प्रथम म्हणजे सर्व वेद आणि शास्त्रांची त्यांना उत्तम जाण असते.

२. दूसरे म्हणजे ते स्वतःसुद्धा मन-कर्म-वचनाने भक्ति करतात म्हणजेच त्यांच्या कथनी आणि करणीमध्ये काहीही फरक नसतो.

३. तीसरे लक्षण असे आहे की ते सर्व अनुयायांशी समान भावाने वागतात, भेदभाव करीत नाहीत.

४. चौथे लक्षण असे आहे की ते सर्व भक्ति कर्म वेद (चार वेद आहेत ते तर सर्व जाणतात १. ऋग्वेद, २. यजुर्वेद, ३. सामवेद, ४. अथर्ववेद आणि पाचवां वेद सूक्ष्मवेद आहे) तर अशा सर्व वेदांच्या नुसार करतात आणि करवतात.

❖ वेदांमध्ये (चारही वेद ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद) केवळ ॐ हे एकच नाम जप करण्याचे आहे.

प्रमाण = यजुर्वेद अध्याय ४० मंत्र १५ आणि १७ मध्ये आहे.

मंत्र १५ मध्ये म्हटले आहे की ओम् (ॐ) नामाचे स्मरण काम करता-करता करा, विशेष तळमळीने करा, मनुष्य जीवनाचे परम कर्तव्य समजून स्मरण करा, ॐ मंत्राचा जप मृत्युपर्यन्त केल्याने इतके अमरत्व प्राप्त होते,जेवढे ॐ जपाने प्राप्त होईल.(यजुर्वेद ४०/१५)

❖ यजुर्वेद अध्याय ४० मंत्र १७ मध्ये वेद ज्ञानाचा दाता ब्रह्मच आहे. म्हटले आहे की जो पूर्ण परमात्मा आहे, तो तर परोक्ष (अदृश्य लपून बसलेला म्हणजेच अव्यक्त आहे) आह. तो सर्वांच्या दृष्टिला दिसत नाही. (त्याची माहिती यजुर्वेद अध्याय ४० मंत्र १० मध्ये अशी सांगितली आहे की त्याचे यथार्थ ज्ञान फक्त तत्वदर्शी संतच जाणतात व त्यांच्याकडूनच ते श्रवण करावे). नंतर यजुर्वेद अध्याय ४० मंत्र १७ मध्ये पुढे म्हटले आहे की (अहम् खम् ब्रह्म) मी ब्रह्म आहे. माझे ओम् (ॐ) हेच नामस्मरण आहे. मी वर दिव्य आकाश रूपी ब्रह्म लोकात राहतो. (यजुर्वेद ४०/१७)

हेच प्रमाण श्री देवी महापुराण :- (गीता प्रैस गोरखपुर से प्रकाशित, सचित्र मोठा टाईप केवल हिन्दी) सातव्या स्कंदात पृष्ठ ५६२-५६३ वर श्री देवीजींनी राजा हिमालयाला सांगितले की राजन्! आपण जर आत्म-कल्याण करून घेऊ इच्छित असाल, तर माझ्या भक्तिसहित सर्व गोष्टी सोडा फक्त ॐ नामाचा जप करा, ब्रह्म प्राप्तिचे उद्दिष्ट ठेवा. त्यामुळे आपण ब्रह्मास प्राप्त व्हाल, ते ब्रह्म ब्रह्मलोक रूपी दिव्य आकाशात राहते. ह्यावरून स्पष्ट झाले

की वेदात केवळ एकच ओम (ॐ) नाम जपच आहे. वेदांचा सारांश असलेल्या श्रीमद् भगवत गीतेत अध्याय ८ श्लोक १३ मध्ये म्हटले आहे :-

ओम् इति एकाक्षरम् ब्रह्म व्याहरन् माम् अनुस्मरन्। यः प्रयाति त्वजन् देहम् सः याति परमाम् गतिम्।।

अनुवाद :- गीता ज्ञान दाता ब्रह्मने म्हटले आहे की माझे ब्रह्माचे केवळ ओम् = (ॐ) हेच एक अक्षर आहे , ह्याचे उच्चारण-स्मरण करत जो साधक शरीर त्यागतो, तो मृत्यु पश्चात त्या (ॐ) नामाच्या स्मरणाने मिळणाऱ्या परम गतिला म्हणजेच ब्रह्म लोकास प्राप्त होतो.

श्रीमद्भगवतगीता आणि वेदांमध्ये ह्याच्या शिवाय म्हणजेच ''ओम'' = ॐ च्या व्यतिरिक्त कोणतेच नाम ब्रह्म साधना म्हणून नाहीं आहे.

ह्यावरून हे प्रमाणित झाले ॐ = ओम् नामाचा जप शास्त्रानुसार आहे.

❖ गीता ज्ञान दात्याने स्पष्ट केले आहे की अर्जुन! तुझे आणि माझे अनेक जन्म झाले आहेत. पुढेही होतील. माझी उत्पत्ति ऋषि आणि देवतागण जाणत नाहींत.

(गीता अध्याय/श्लोक-२/१२, ४/५, १०/२)

ह्यावरून हे सिद्ध झाले की गीता ज्ञान दाता ब्रह्म नश्वर आहे आणि जन्मतो आणि मरतो त्याची पुजा करणारे सुध्दा जन्म-मरणाच्या चक्रात फिरत राहतील. म्हणूनच गीता अध्याय ८ श्लोक १६ मध्ये म्हटले आहे की ब्रह्म लोकी गेलेले साधकसुद्धा पुनर्जन्मात राहत आहेत. म्हणूनच गीता ज्ञान दात्याने गीता अध्याय १८ श्लोक ६२ मध्ये म्हटले आहे की हे भारत! तू सर्वभावाने त्या भगवंताला शरण जा, त्या भगवंताच्या कृपेनेच तू परमशान्ति आणि सनातन परम धाम म्हणजेच सत्यलोकास प्राप्त होशील.

❖ नंतर गीता अध्याय १५ श्लोक ४ मध्ये गीता ज्ञान दात्याने म्हटले आहे की जेव्हा तत्वदर्शी संतांकडून तत्वज्ञान प्राप्त होईल, तेव्हा त्यांच्या सांगण्यानुसार साधना करून तत पश्चात् भगवंताच्या त्या परम पदाचा शोध घेतला पाहिजे, जिथे पोहोचल्यानंतर साधक परत फिरून ह्या मृत्युलोकात येत नाहीत. फक्त त्याच भगवंताची पूजा करा.

गीता अध्याय ७ श्लोक २९ में गीता ज्ञान दात्याने म्हटले आहे :-

जरा मरण मोक्षाय माम् आश्रित्य यतन्ति ये। ते तत् ब्रह्म विदुः कृतस्नम् अध्यात्मम् कर्म च अधिलम्।।

भावार्थ :- गीता ज्ञान दाता सांगतात की जो माझ्या सांगितलेल्या ज्ञानावर आश्रीत होऊन आश्रयाने म्हणजेच मी सांगितल्यानुसार तत्वदर्शी संतांकडून तत्वज्ञान जाणून घेत आहेत, जे जरा म्हणजेच वृद्धावस्था आणि मृत्युच्या यातनापासून मोक्ष प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. जगातील कोणत्याही कीमती वस्तुची इच्छा भक्तिचे प्रतिफळ म्हणून करीत नाहीत तेच (तत् ब्रह्म विदुः) त्या ब्रह्माला व संपूर्ण आध्यात्माला आणि सर्व कर्मांना जाणतात.

❖ अर्जुनाने गीता अध्याय ८ श्लोक १ मध्ये विचारले की तत् ब्रह्म म्हणजे काय आहे? त्याचे उत्तर गीता ज्ञान दात्याने गीता अध्याय ८ च्याच श्लोक ३ मध्ये दिले आहे. म्हटले आहे की ते परम अक्षर ब्रह्म आहे.

❖ गीता अध्याय ८ श्लोक ५ आणि ७ मध्ये तर गीता ज्ञान दात्याने आपली भक्ति करण्यास सांगितले आहे आणि असे विश्वास दिले आहे की माझ्या भक्तिने मला प्राप्त होईल, माझ्या भक्तिने जन्म-मरण, कर्म चक्र सुरूच राहील, युद्धसुद्धा करावे लागेल, परमशान्ति नाहीं होउ शकणार.

❖ नंतर गीता ज्ञान दात्याने लगेच गीता अध्याय ८ श्लोक ८, ९, १० मध्ये म्हटले आहे की ''तत् ब्रह्म'' म्हणजेच ''परम अक्षर ब्रह्म'' ची भक्ति करणारा त्याच सच्चिदानंद घन ब्रह्म म्हणजेच माझ्या दूसऱ्या दिव्य परमात्म्याला प्राप्त होईल.

❖ अशा प्रकारे परम अक्षर ब्रह्मचा महिमा गीता अध्याय १५ श्लोक १७ मध्ये सांगितला आहे. गीता अध्याय १५ श्लोक १६ मध्ये दोन पुरूष सांगितले आहेत, एक क्षर पुरूष जो गीता ज्ञान दाता आहे व ज्याची २१ ब्रह्मण्ड क्षेत्र आहेत. हा गीता ज्ञान दाता ब्रह्म आहे.

दूसरा अक्षर पुरूष सांगितला आहे ज्याचे ७ (सात) शंख ब्रह्माण्डाचे क्षेत्र आहे. हे दोघेही नश्वर सांगितले आहेत. ह्यांच्या लोकातील सर्व जीव सुद्धा नश्वर असल्याचे सांगितले आहे.

गीता अध्याय १५ श्लोक १७ मध्ये सांगितले आहे की :-

उत्तम पुरूषः तू अन्यः परमात्मा इति उदाहृतः यः लोक त्रयम् आविश्य विभर्ति अव्ययः ईश्वरः

अनुवाद :- उत्तम पुरुष = पुरूषोत्तम म्हणजेच परम अक्षर ब्रह्म हे वर वर्णन केल्यानुसार क्षर पुरूष आणि अक्षर पुरूषापासून अन्य म्हणजेच जो परमात्मा म्हटला जातो तो आहे. तो तिन्ही लोक {क्षर पुरूषाचे २१ ब्रह्माण्डांच्या क्षेत्राचे लोक, दूसऱ्या अक्षर पुरूषाच्या सात (७) शंख ब्रह्माण्डांचा लोक, तीसरा वरचे चार लोक (सत्यलोक, अलख लोक, अगम लोक आणि अनामी लोक) अशा प्रकारे बनलेल्या तिन्ही लोकात} प्रवेश करून सर्वांचे धारण-पोषण करतो आहे, आणि तोच वास्तविक अविनाशी परमेश्वर आहे.

❖ गीता अध्याय १७ श्लोक २३ मध्ये ह्या परम अक्षर ब्रह्मची प्राप्ति करण्याचे मंत्र सांगितले आहेत :-

ॐ तत् सत् इति निर्देशः ब्रह्मणः त्रिविधः स्मृतः। ब्राह्मणाः तेन वेदाः यज्ञाः च विहिता पुरा।।

ब्रह्मणः = सच्चिदानंद घन ब्रह्म म्हणजेच परम अक्षर ब्रह्मच्या भक्तिची साधनेचे म्हणजेच परमात्म्याच्या त्या परमपदाला प्राप्त होण्याचे मंत्र सांगितले आहेत, व तिथे गेल्यावर साधक पुन्हा फिरून मृत्युलोकात कधीच येत नाहीत. जिथे ते परम शान्तिला प्राप्त होतात.जे सनातन परम धाम आहे.

ॐ = ''ब्रह्म'' म्हणजेच ''क्षर पुरूषाचा'' मंत्र आहे जो प्रत्यक्ष आहे.

तत् = हा ''अक्षर पुरुषा'' चा जप मंत्र आहे. हा मंत्र सांकेतिक आहे, वास्तविक मंत्र सूक्ष्मवेदात सांगितला आहे. हा मंत्र दीक्षा देण्याच्या वेळेस दीक्षार्थीला उघड करून सांगितला जातो. अन्य कोणालाही सांगितला जात नाही.

सत् = हा ''परम अक्षर पुरुषा'' च्या साधनेचा मंत्र आहे. हा मंत्र सुद्धा सांकेतिक आहे. हा मंत्र दीक्षा देण्याच्या वेळेस दीक्षार्थीला उघड करून सांगितला जातो. यथार्थ मंत्र सूक्ष्मवेदात लिहिला आहे. हेच प्रमाण सामवेदाच्या मंत्र संख्या ८२२ मध्ये सुद्ध आहे. तीन नामांचा जप करण्याने पूर्ण मोक्ष प्राप्त होतो. :-

संख्या नं. ८२२ सामवेद उतार्चिक अध्याय ३ खण्ड नं. ५ श्लोक नं. ८ (संत रामपालदास यांचेकडून भाषा-भाष्य) :-

मनीषिभिः पवते पूर्व्यः कविर्नृभिर्यतः परि कोशां असिष्यदत्।
त्रितस्य नाम जनयन्मधु क्षरन्निन्द्रस्य वायुं सख्याय वर्धयन्।।८।।
मनीषिभिः-पवते-पूर्व्यः-कविर्-नृभिः-यतः-परि-कोशान्-असिष्यदत्घत्रि-तस्य-

नाम-जनयन्-मधु-क्षरन:-न-इन्द्रस्य-वायुम्-सख्याय-वर्धयन्।

शब्दार्थ-(पूर्व्यः) सनातन म्हणजेच सर्वात प्रथम प्रकट (कविर नृभिः) परमेश्वर कबीर मानव रूप धारण करून म्हणजेच गुरु रूपात प्रकट होऊन (मनीषिभिः) बुद्धिमान भक्तांना (त्रि) तीन (नाम) मंत्रांचा म्हणजेच नाम उपदेश देऊन (पवते) पापरहित म्हणजेच पवित्र करून (जनयन्) जन्म व (क्षरनः) मृत्यु (न) रहित करत आहेत आणि (तस्य) त्यांचे (वायुम्) प्राण म्हणजेच जीवन-श्वास जे संस्कारामुळे मोजलेले असतात, त्यांना (कोशान्) आपल्या साठ्यातील (सख्याय) मित्रत्वाच्या आधाराने (परि) पूर्ण रूपात (वर्धयन्) वाढवत आहेत. (यतः) त्यामुळेच (इन्द्रस्य) भगवंताच्या (मधु) वास्तविक आनंदाला (असिष्यदत्) आपल्या आशीर्वाद प्रसादाने प्राप्त करवतो आहे.

**भावार्थ :- ह्या मंत्रात स्पष्ट केले आहे की पूर्ण परमात्मा कविर म्हणजेच कबीर मानव शरीरात गुरु रूपात प्रकट होऊन प्रभु प्रेमीयांना तीन नाम जप देऊन खरी भक्ति करवतो आहे आणि त्या मित्र भक्तांना पवित्र करून आपल्या आशीर्वादाने पूर्ण परमात्मा म्हणजेच आपल्या प्राप्तिचा मार्ग सांगून पूर्ण सुख प्राप्त करवतो आहे. साधकाचे आयुष्य वाढवतो आहे. हेच प्रमाण गीता अध्याय १७ श्लोक २३ मध्ये आहे की ओम्-तत्-सत् इति निर्देशः ब्रह्मणः त्रिविद्य स्मृतः भावार्थ आहे की पूर्ण परमात्म्याला प्राप्त करण्यासाठी ॐ (१) तत् (२)सत् (३) हा मंत्र जप स्मरण करण्याची आज्ञा आहे. हे नाम तत्वदर्शी संतांकडून प्राप्त करूनघ्या. तत्वदर्शी संताविषयी गीता अध्याय ४ श्लोक नं. ३४ मध्ये म्हटले आहे आणि गीता अध्याय नं. १५ श्लोक नं. १ व ४ मध्ये तत्वदर्शी संतांची ओळख सांगून म्हटले आहे की तत्वदर्शी संताकडून तत्वज्ञान जाणून त्यानंतर त्या परमपद परमात्म्याचा शोध घेतला पाहिजे. जिथे गेल्यानंतर साधक फिरून परत मृत्युलोकात येत नाही. म्हणजेच पूर्ण मुक्त होऊन जातात. त्याच पूर्ण परमात्म्याने संसाराची रचना केली आहे.**

**विशेष :- उपरोक्त विवरणामुळे हे स्पष्ट झाले की पवित्र चार वेदही साक्षी आहेत की पूर्ण परमात्माच पूजा करण्यायोग्य आहेत व त्यांचे वास्तविक नाव कविर्देव (कबीर परमेश्वर) आहे आणि तीन मंत्रांचा नाम जप केल्यानेच पूर्ण मोक्ष होत असतो.**

**ह्या तीन मंत्रांचा जप करण्याचे प्रमाण चारही वेदांचा सारांश असलेल्या श्रीमद्भगवत गीतेत आहे की त्याने असे स्थान प्राप्त होते आहे, जिथे पोहोचल्यावर साधक कधीही मृत्युलोकात परत येत नाही. जे सनातन परम धाम आहे, तिथे गेल्यानंतर परम शान्ति प्राप्त होते आहे.**

**वेद व गीतेत ह्या तीन अमूल्य नाममंत्रांचा अस्पष्ट म्हणजेच सांकेतिक आहे. त्यामुळे चारही वेद व गीतानुसार साधना करण्याने ते स्थान व परमात्मा प्राप्त होऊ शकणार नाही. त्यामुळे गीता अध्याय ४ श्लोक ३२ आणि ३४ मध्ये गीता ज्ञान दात्याने स्पष्ट केले आहे की यज्ञ म्हणजेच धार्मिक अनुष्ठानाचे यथार्थ ज्ञान (ब्रह्मणः मुखे) सच्चिदानन्द घन ब्रह्म म्हणजेच परम अक्षर ब्रह्म आपल्या मुख-कमलाच्या वाणीने बोलून सांगितले आहे. त्याला सच्चिदानन्द घन ब्रह्मची वाणी म्हटले जाते, त्याला तत्वज्ञान आणि सूक्ष्म वेद सुद्धा म्हटले जाते. त्यांना जाणल्यावर सर्व पापांपासून मुक्ती मिळते. ज्यामध्ये सम्पूर्ण भक्ति मंत्र आणि विधि सांगितला आहे. (गीता अध्याय ४ श्लोक ३२)**

**❖ गीता अध्याय ४ श्लोक ३४ = ते तत्वज्ञान तू तत्वदर्शी संतांपाशी जाऊन समजून घे. त्यांना साष्टांग दण्डवत् प्रणाम करून, कपट सोडून नम्रतापूर्वक प्रश्न केल्यास ते परमात्मा तत्वाला पूर्णपणे जाणणारे ज्ञानी महात्मा तुला तत्वज्ञानाचा उपदेश करतील. (गीता अध्याय ४ श्लोक ३४)**

साधकहो! तत्वदर्शी संत हा सेवक (संत रामपाल दास) आहे ते तत्वज्ञान माझ्याजवळ आहे माझ्या व्यतिरिक्त वर्तमानात कोणाकडेच नाहीं. जगाची लोकसंख्या जवळपास ७ अब्ज आहे. ह्या अब्जावधीमध्ये माझ्या व्यतिरिक्त कोणीहि हे ज्ञान जाणत नाही.

गीता अध्याय ७ श्लोक १२ ते १५ पर्यंत गीता ज्ञान दात्याने तिन्ही गुणांची (रजगुण ब्रह्माजी, सतगुण विष्णुजी आणि तमगुण शंकरजी) भक्ति करणारे १. राक्षस स्वभाव धारण केलेले, २. मनुष्यांमधील नीच, ३. दूषित कर्म करणारे, ४. मूर्ख माझी भक्ति सुद्धा करत नाहींत.

पुढे गीता ज्ञान दात्याने गीता अध्याय ७ श्लोक १६ ते १८ पर्यंत आपली साधना करणाऱ्यांची स्थिति सांगितली आहे की माझी भक्ति चार प्रकारची माणसे करतात (१. आर्त, २. अथार्थी, ३. जिज्ञासु, ४. ज्ञानी) ह्यामध्ये केवळ ज्ञानी साधक श्रेष्ठ सांगितला आहे, परंतु तोसुद्धा तत्वज्ञान नसल्याने माझ्या म्हणजेच ब्रह्मच्या अनुत्तम् म्हणजेच नीच गतित राहिला आहे.

❖ गीता अध्याय ७ श्लाके १९ मध्ये गीता ज्ञान दात्याने म्हटले आहे की माझी पूजा सुद्धा जन्म–जन्मान्तराच्या शेवटच्या जन्मात कोणी ज्ञानी आत्मा व्यवस्थित करतो. अन्यथा बाकी उपासना मध्ये लोक अडकून असतात. हे सांगणारा महात्मा तर खूपच दुर्लभ आहे. की केवळ वासुदेव. म्हणजेच सर्वगतम् ब्रह्मच सर्व काही आहे. त्याच्याच भक्तिने परम शान्ति प्राप्त होते. त्याच्याच भक्तिने सनातन परम धाम प्राप्त होते. त्याच्याच भक्तिने ते परमपद प्राप्त होते जिथे गेल्यावर साधक फिरून मृत्युलोकात येत नाही. तेच परम अक्षर ब्रह्म सर्वांचा उत्पत्तिकर्ता आहे, तेच प्रपंच रूपी वृक्षाचे मूळ आहे व तोच तिन्ही लोकात प्रवेश करून सर्वांचे धारण–पोषण करतो. तोच पापनाशक आहे. तोच पूर्ण मोक्षदायक आहे, त्याचीच भक्ति केली पाहिजे.

प्रिय साधकहो! तो तत्वदर्शी संत वर्तमानात हा सेवक (संत रामपाल दास) आहे. माझ्याजवळ संपूर्ण वेद–शास्त्रांचे ज्ञान आहे. भगवान वासुदेवांच्या भक्तिचे सम्पूर्ण मंत्र आहेत.

आता ''वासुदेवाची'' परिभाषा सांगत आहेत. :–

## ''वासुदेवाची परिभाषा''

गीता अध्याय ३ श्लोक १४–१५ मध्ये म्हटले आहे की सगळे प्राणी अन्नापासून उत्पन्न होतात. अधिक माहिती आपणास आधी दिली आहे, तिथून वाचावी. इथे फक्त याच विषयाचा विचार करू.

पुढे म्हटले आहे की ब्रह्म म्हणजेच क्षर पुरूषाची उत्पत्ति अविनाशी परमात्म्यापासून झाली आहे. ज्याविषय गीता अध्याय १५ श्लोक १७ मध्ये सांगितले आहे. त्यावरून सिद्ध होते की ''सर्वगतम् ब्रह्म'' = सर्वव्यापी परम अक्षर ब्रह्म. म्हणजेच वासुदेव सदैवच यज्ञांमध्ये प्रतिष्ठित आहेत.

विचार करा :– सर्वगतम् ब्रह्म चा अर्थ आहे सर्वव्यापी परम अक्षर परमात्मा.

(गीता अध्याय ३ श्लोक १५)

१. श्री ब्रह्माजी, श्री विष्णुजी आणि श्री शंकरजी ह्या तिन्ही देवता एका ब्रह्माण्डात बनलेल्या तिन्ही लोकांमध्ये (स्वर्ग लोक, पृथ्वी लोक, पाताल लोक) फक्त एकेका विभागाच्या म्हणजेच गुणाच्या मुख्य आहेत. त्या सर्वगतम् ब्रह्म म्हणजेच सर्वव्यापी परमात्मा=वासुदेव नाहीत.

२. ब्रह्म म्हणजेच क्षर पुरूष :– हे केवळ २१ ब्रह्माण्डांचे देव आहेत. हे सुद्धा सर्वव्यापी म्हणजेच वासुदेव नाहीत

३. अक्षर पुरूष :– हे केवळ ७ शंख ब्रह्माण्डांचे देव आहेत. हे सुद्धा सर्वव्यापी

म्हणजेच वासुदेव नाहीत

४. परम अक्षर ब्रह्म :- हे सर्व ब्रह्माण्डांचे स्वामी आहेत. सर्वांचे धारण-पोषण करणारे आहेत. ते वासुदेव आहेत.

विशेष :- अधिक माहितीसाठी याच पुस्तकातील ''सृष्टि रचना'' अध्याय वाचावा.

❖ जसे आपल्याला आधीच सांगितले आहे की परम अक्षर बह्म स्वत: पृथ्वीवर प्रकट होऊन पुण्यात्म्यांना भेटून तत्वज्ञान सांगत असतात. त्याच नियमानुसार तेच परमात्मा संत गरीबदासजींना (गाव=छुड़ानी, जिल्हा-झज्जर, प्रांत-हरियाणा) येथे सन् १७२७ मध्ये भेटले होते. एका जिवंत महात्म्याच्या वेशभूषेत होते. गरीबदासजींच्या आत्म्याला त्या सनातन परम धामी घेऊन गेले होते. मग वरील सर्व ब्रह्माण्ड आणि देवांची स्थिति दाखवून तत्वज्ञाशी परीचित करून परत शरीरात स्थित केले होते. त्यावेळेस संत गरीबदासजीचे वय १० वर्ष होते. त्या दिवशी संत गरीबदासजींना मृत समजून चितेवर ठेऊन अन्तिम संस्कारांची तयारी करत होते. त्याच वेळेस त्यांच्या आत्म्याने शरीरात प्रवेश केला होता. जीवित झाल्यावर सर्व कुटुंबातील लोकांच्या आनंदाला उधाण आले होते. त्यानंतर संत गरीबदासजींनी एका अमूल्य ग्रंथाची रचना केली. त्यामध्ये स्वताच्या डोळ्यांनी अनुभवलेले व स्वतः परमात्म्याने सांगितलेले ज्ञान सांगितले. ते गोपाल दास नामक दादू पंथी साधुने लिहून घेतले होते. ते वर्तमानात छापून घेतले आहे.

❖ पंजाब प्रान्ताच्या लुधियाना शहराजवळ एक वासीयर गाव आहे. तिथे एक देवभक्त व्यक्ति रामराय उर्फ झूमकरा राहत होता. त्याने संत गरीबदासजीचा महिमा ऐकला, तर दर्शनार्थ छुड़ानी गावी आला. संत गरीबदासजींनी हे ज्ञान ऐकवले व ते ह्या सेवकाला (संत रामपाल दास) संत गरीबदास ह्यांच्याकडून प्राप्त झाले आहे. ते आपल्याला ह्या व अन्य पुस्तकांमधून ऐकवले आहे.

त्या रामरायाने प्रश्न केला की हे महात्माजी! हे ज्ञान तर आजपर्यंत कोणीच सांगितले नाही. संत गरीबदासजींनी त्यांच्या वाणीद्वारे सांगितले.

कोट्यों मध्य कोई नहीं राई झूमकरा, अरबों में कोई गरक सुनो राई झूमकरा।।

अनुवाद व भावार्थ :- संत गरीबदासजींनी सांगितले की हे ज्ञान करोड़ोंमध्येच नव्हे, तर अब्जावधीमध्ये एखाद्याला प्राप्त आहे. ते संत सर्व ज्ञानसंम्पन्न सम्पूर्ण साधनामंत्रांनी युक्त म्हणजेच परिपूर्ण असतात. प्रिय साधकहो! वर्तमानात ते संत, बरवाला जिल्हा हिसार मध्ये आहेत. ज्ञान समजून लाभ करून घ्या.

प्रश्न :- प्राचीन काळापासून चालत आलेली भक्ति साधना आपण चूक कशी काय म्हणता? ज्याप्रमाणे तप सर्व ऋषिजन करत असत, आम्ही सर्व हिन्दू समाजात पाहत आहोत -सगळे हरे कृष्णा, हरे राम, राधे-राधे श्याम मिला दे, ओम नमः शिवाय, ओम नमो भगवते वासुदेवायः नमः, जय सियाराम, राधे श्याम, ओम तत् सत्, ह्यामधून कोणत्याही एक मंत्राचा जप करत आहेत. वर्तमानात सुद्धा करत आहेत. श्री रामचंन्द्रजी, श्री कृष्णजी यांना आम्ही पूर्ण परमात्मा मानतो. म्हणून यांचे नामस्मरण जपतो आहोत. आपण हे नामजपाचे मंत्र व्यर्थ असल्याचे सांगता याचे स्पष्टीकरण द्या.

उत्तर :- प्राचीन काळी जरी ही साधना होती आणि हे मंत्र होते तर श्रीमद्भगवत गीतेच्या अध्याय ४ श्लोक १-२ मध्ये गीता ज्ञान दात्याने असे म्हटले नसते की हा योग म्हणजेच भक्ति विधि मी गीता ज्ञानात सांगतो आहे, ते आता जवळपास लुप्त झाले आहे, नष्ट

झाले आहे. हे ज्ञान आणि भक्ति मी सूर्यदेवाला सांगितली होती, मग सूर्यदेवाने मनुला, मनुने आपल्या पुत्राला म्हणजे इक्ष्वाकुला सांगितली आणि मग काही राज ऋषिंनी ती जाणली. ही द्वापाराच्या बरीच आधी लुप्त झाली होती आणि मनु, इक्ष्वाकु इत्यादी सर्व सत्ययुगाच्या प्रथम चरणात होऊन गेले होते. जरी आपण राजा दशरथाचे पुत्र श्री रामचन्द्रजी आणि श्री वासुदेवपुत्र श्री कृष्ण यांन पूर्ण परमात्मा मानत असलात, व त्यामुळेच त्यांच्या नामाचा हरे राम, हरे कृष्ण, जप करत आहात आणि त्यालाच मोक्ष मानत आहात,तर श्रीमद्भगवत गीतेत वर्णन केल्यानुसार यथार्थ प्राचीन योग म्हणजेच भक्तिच्या विधिच्या विपरीत असल्यामुळे व्यर्थ आहेत. शास्त्राविधिचा त्याग करून मनमानीने आचरण झाले. त्यामुळेच उपरोक्त प्रश्नात लिहिलेले मंत्रसुद्धा शास्त्रप्रमाणित नसल्यामुळे व्यर्थ आहेत. गीता अध्याय १६ श्लोक २३-२४ मध्ये म्हटले आहे की जे पुरूष शास्त्राविधि त्यागून मनमानी आचरण करत आहेत त्यांना न सुख न सिद्धि न सदगति प्राप्त होत नाही. म्हणजेच साधना व्यर्थ झाली. (गीता अध्याय १६ श्लोक २३)

❖ गीता अध्याय १६ श्लोक २४ मध्ये म्हटले आहे. की त्यामुळे अर्जुना तुझ्यासाठीच्या कर्तव्य आणि अकर्तव्याच्या व्यवस्थेत शास्त्रेच प्रमाण आहेत. भावार्थ आहे की जी भक्ति विधि प्रमाणित शास्त्रात (चार वेद = ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद आणि त्या चारही वेदांचा सारांश श्री मद्भगवत गीता आणि परमात्म्याने स्वतःच्या मुखाने सांगितलेला सूक्ष्मवेद हेच भक्तिचे ज्ञान आणि समाधान करण्याची प्रमाणित शास्त्रे आहेत) वर्णन केल्यानुसार नसेल, तर ती शास्त्राविरूद्ध साधना आहे. म्हणूनच भक्तिची कोणती कर्मे करावीत व करू नयेत यासाठी शास्त्राचाच आधार घ्या. शास्त्रात वर्णन केल्यानुसार भक्ति विधि स्वीकारा आणि बाकी सर्व सोडा.

❖ श्री रामजीचा जन्म त्रोतायुगाच्या अन्तिम चरणात झाला होता. श्री कृष्णजीचा जन्म द्वापरयुगाच्या अन्तिम चरणात झाला होता. सत्ययुगापासूनच मानव भक्ति करतो आहे. त्यावेळा कुठे कोण राम होते? तुम्ही म्हणाल की श्री विष्णुजी तर सत्ययुगाच्या आधीपासून आहेत. आणि श्री राम, श्री कृष्णसुद्धा स्वतः विष्णुजीच होते. सत्ययुगामधील प्रमाण आहे की महर्षि बाल्मिकीजी राम-राम नाम जपत असत,त्यांनी कधी विष्णु-विष्णु नाहीं जपले. ह्यावरून सिद्ध होते की श्री विष्णुजी, श्री राम, श्री कृष्णजी ह्यांच्या पेक्षा कोणी वेगळाच ''राम'' म्हणजेच ''परमात्मा'' आहे, त्याच म्हणजेच गीता अध्याय ७ श्लोक २९ मधील रामाचा जप केला पाहिजे. ज्याविषयीम्हटले आहे की तत् ब्रह्म जाणणारे केवळ जरा म्हणजेच वृद्धावस्था आणि मृत्यु पासून सुटका करून घेण्यासाठीच भक्ति करत आहेत. अर्जुनाने गीता अध्याय ८ श्लोक १ मध्ये प्रश्न केला आहे की ते तत् ब्रह्म काय आहे?

गीता ज्ञान दात्याने गीता अध्याय ८ श्लोक ३ मध्ये उत्तर दिले की तोच ''परम अक्षर ब्रह्म''आहे. गीता अध्याय ८ च्याच श्लोक ५, ७ मध्ये गीता ज्ञान दात्याने आपली भक्ति करण्यास सांगितले आहे व त्याचा जपमंत्र गीता अध्याय ८ च्याच श्लोक १३ मध्ये सांगितला आहे. (ओम् इति एकाक्षरम् ब्रह्म व्यवहारन् माम् अनुस्मरन्.......)

❖ गीता अध्याय ८ श्लोक ८,९,१०, मध्ये गीता ज्ञान दात्याने आपल्याला अन्य तत् ब्रह्म म्हणजेच परम अक्षर ब्रह्माची भक्ति करण्याससांगितले आहे, त्याच्या भक्तिचा नामजप मंत्र गीता अध्याय १७ श्लोक २३ मध्ये सांगितला आहे.

ॐ तत् सत् इति निर्देश: ब्रह्मण: त्रिविध: स्मरत:।
ब्राह्मणा: तेन वेदा: च यज्ञा: च विहिता: पुरा।।

सरलार्थ :– ब्रह्मणः = सच्चिदानन्द घन ब्रह्म म्हणजेच परम अक्षर ब्रह्माच्या भक्तीचा ॐ, तत्, सत् मंत्राच्या स्मरणाचा (निर्देशः) आदेश आहे. जो (त्रिविधः) तीन प्रकारांनी (स्मतः) स्मरण करण्यास सांगितले आहे (ब्राह्मणाः) विद्वान् म्हणजेच तत्वदर्शी संत (तेन)त्याच (वेदाः) ज्ञानाच्या आधारे भक्ति करत होते. (च) आणि (यज्ञाः) धार्मिक यज्ञांचे अनुष्ठान (च) आणि अन्य भक्ति कर्म (पुरा) सृष्टिच्या आदि म्हणजेच प्रारम्भी (विहिता) केले जात असत.

श्रीमद् भगवत गीतेवरून सिद्ध झाले की गीता ज्ञान दात्यापेक्षा कोणी पूर्ण परमात्मा आहे व तो श्री विष्णुजी, श्री ब्रह्माजी आणि श्रीशंकरजी यांच्यापेक्षा सुद्धा भिन्न आहे. ज्याविषयी गीता अध्याय १५ श्लोक १,४,१७ मध्ये आणि गीता अध्याय १८ श्लोक ६२ मध्ये आणि अनेक ठिकाणी गीतेत म्हटले आहे, ते पूर्ण परमात्मा आहेत. गीता अध्याय १५ श्लोक १६ मध्ये दोन पुरूष सांगितले आहेत. दोघेही नश्वर सांगितले आहेत. त्यांचे अन्तर्गत जितके प्राणीआहेत, तेसुद्धा नश्वर आहेत. (१) (क्षर पुरूष आहे, तो केवळ एकवीस ब्रह्माण्डांचा प्रभु आहे, (२) अक्षर पुरूष हा ७ शंख ब्रह्माण्डांचा प्रभु आहे. हे दोघेही पूर्ण परमात्मा नाहीत. (गीता अध्याय १५ श्लोक १६)

❖ गीता अध्याय १५ श्लोक १७ मध्ये गीता ज्ञान दात्याने म्हटले आहे की उत्तमः पुरूषः तूः अन्यः म्हणजेच पुरूषोतम तर कोणी वर वर्णन केल्यानुसार दोन्ही पुरूषांपेक्षा (क्षर पुरूष आणि अक्षर पुरूष) भिन्न आहे व त्यालाच (परमात्मा इति उदाहृतः) परमात्मा म्हटले गेले आहे. (यः लोकत्रयम्) तो तिन्ही लोकांमध्ये (आविश्य विभर्ति)प्रवेश करून धारण–पोषण करतो आहे, (अव्ययः ईश्वरः) अविनाशी परमेश्वर आहे. (गीता अध्याय १५ श्लोक १७)

❖ पूर्ण परमात्मा परम अक्षर बह्म् आहे हे सिद्ध झाले. त्याच्या भक्तिचा मंत्र ॐ, तत्,सत् आहे. हेही सिद्ध झाले. ओम, तत्, सत्, हे जे तीन मन्त्र आहेत, ते उपरोक्त तिन्ही प्रभुंचे (ॐ = क्षर पुरूष म्हणजेच क्षर ब्रह्म गीता ज्ञान दात्याचा, तत् = हा सांकेतिक आहे. याचे याच पुस्तकात पूर्वी विवरण केले आहे, ते वाचवे. हा तत् नाम जाप = अक्षर पुरूषाचा आहे) सत् = हा सुद्धा सांकेतिक आहे, अधिक खुलासा ह्याच पुस्तकातील आधीच्या प्रकरणात केला आहे, तो वाचावा. हा सत् मंत्र परम अक्षर ब्रह्मचा आहे. श्रीमद्भगवत गीतेत पूर्ण मोक्षप्राप्तिसाठी सांकेतिक मंत्र आहेत. जे आजपर्यंत (सन् २०१२ पर्यंत) कोणीही हे स्पष्ट केलेले नाही. आपण जो हरि ओम, तत् सत् जप करत आहात, तोसुद्धा व्यर्थ आहे कारण आपणास तत् आणि सत् च्या वास्तविक मंत्रांचे ज्ञानच नाहीं आहे.

उदाहरण :– एका धनीक व्यक्तिनेआपले धन आपल्या घरात एक खड्डा खोदून त्यात गाडून टाकले. ती जागा केवळ त्या धनीक व्यक्तिलाच माहित होती. त्या धनीक व्यक्तिने एक वहीत सांकेतिक भाषेत ते स्थान लिहिले होते. धनीक व्यक्तिचा अचानक मृत्यु झाला. पित्याचे संस्कार करून ज्या वहीत धन कुठे आहे ते लिहिल्याचे सांगितले होते, ती वही मुलांनी उचलली. ती वही वडिलांनी कधीच कोणाला दाखवली नव्हती.

धनीक व्यक्तिच्या घरासमोर अंगण होते, त्या अंगणाच्या कोपऱ्यात एक मन्दिर बांधले होते. वहीत (पैड) लिहिले होते की पौर्णिमेच्या चांदण्या रात्री २ वाजता सगळे धन मंदिराच्या कळसात गाडून ठेवले आहे. मुलांनी मन्दिराचा कळस रात्रि २ वाजता फोडून धन शोधले, परंतु काहीच मिळाले नाही. मुलांना अतिशय दुःख झाले. एक दिवस त्यांच्या वडिलांचे मित्र दूसऱ्या गावाहून त्यांच्या समाचारासाठी आले होते. मुलांनी सांगितलेल्या जागेवर धन न मिळाल्यामुळे काळजी व्यक्त केली. त्या धनीकाच्या मित्राने ती वही मागितली आणि व्याख्या वाचली व सांगितले की मन्दिराचा कळस पुनः जसा होता तसाच बांधून काढा. मग एखाद्या दिवशी मी

येईन तेव्हा धन ठेवण्याचे स्थान सांगीन. तो मित्र पौर्णिमेच्या आदल्या दिवशी आला. रात्रिच्या दोन वाजण्याच्या सुमारास ज्या जागी मन्दिराच्या कळसांच्या खाली चंद्राच्या प्रकाशाची सावली पडली होती, तिथे खोदले असता, सगळे वहीत लिहिलेले धन मिळाले. मुले खुश होऊन श्रीमंत झाली.

आपण जो हरि ॐ तत् सत् चा जप करत आहात, आपण मंदिराचा कळस खोदत आहात, पण हाती काहीच लागणार नाही. ते सर्व मंत्र माझ्याजवळ (संत रामपाल दास) आहेत. ते ग्रहण करून भक्तिने धनी आणि सुखी व्हा.

प्रश्न :- राधाजी गांव बरसाना (उत्तर प्रदेश) गावाजवळ वृन्दावनमध्ये राहणारी होती. तिथली माणसे ''राधे-राधे'' नाम जपत आहेत. सकाळी सकाळी किंवा कधीही आपसात भेटले, तर ते राम-राम नाहीं म्हणत, तर म्हणतात, काका राधे-राधे. काका म्हणतात की बेटा राधे-राधे. ते काय मूर्ख आहेत काय?

उत्तर :- तत्वज्ञानाच्या अभावी लोकवेदाला सत्य ज्ञान समजून हा शास्त्राविरूद्ध मंत्रांचा जप सुरु आहे. तसे आपल्याला आधीच स्पष्ट केले आहे की गीता अध्याय १६ श्लोक २३-२४ मध्ये म्हटले आहे की जे शास्त्राविधि त्यागुन मनमानी आचरण करत आहेत. म्हणजेच जे नाम जप शास्त्रामध्ये नाहीत, त्यांचा जप करत आहेत, त्यांना न सुख न सिद्धि प्राप्त होते न त्यांना गती मिळते. म्हणजेच त्याची जप साधना व्यर्थ आहे. त्यामुळे ए अर्जुना तुझ्यासाठी कर्तव्य आणि अकर्तव्य यांची व्यवस्था मध्ये शास्त्रासाठी प्रमाण आहे. हे आधीच सांगितले आहे. आता प्रश्न आहे की काका पुतणे राधे-राधे शब्दाचा का उच्चार करत आहेत? तुम्हाला माहित आहे की राधाजी कोण होत्या? राधा भगवान श्री कृष्णजीची प्रेमिका होती. त्यावेळेस बरसाना गावातील लोक राधाजींना कुलटा, बदचलन, निर्लज आदि-विशेषणे लावत असत. म्हणत की ही दूसऱ्या गावातील नंद बाबाच्या मुलाला भेटण्यासाठी लपूनछपून जात असते. तिला आपल्या घरी येऊ देऊ नका. मुलींवर विपरीत परिणाम होईल. श्रीमान् जी! आता त्याच बरसाना मधील लोक राधेसाठी स्वतः (स्त्री-पुरूष, युवति) म्हणत आहेत की राधे-राधे श्याम मिला दे आमची भेट घडव. ज्याप्रमाणे आपल्याला आधीच्या प्रश्नात सांगितले होते की आम्ही ह्या नामाचा सुद्धा जप करत आहोत. आता न राधाजी आहेत आणि न श्री कृष्णजी. तापात भ्रम झालेल्या रोग्याप्रमाणे राधे-राधे श्याम मिला दे असे आता बड़बड़त आहेत. अशीच स्थिती अन्य मंत्रांची आहे. जे आपण आधीच्या प्रश्नात सांगितले होते ते जाणा. तेसुद्धा शास्त्र प्रमाणित नसल्यामुळे व्यर्थ आहेत.

❖ आता ह्या प्रश्नाचे उत्तर सांगतो, की काकाही म्हणतो आहे राधे-राधे, पुतण्या सुद्धा म्हणतो आहे राधे-राधे. तुम्हालाही माहित आहे की राधाजी श्री कृष्णजीची प्रेमिका होती. तुम्हाला हेही माहित आहे की जेव्हा रुक्मिणीला श्रीकृष्णजी रथात पळवून घेऊन जायला लागले, तेव्हा तिचा भाऊ आपल्या बहिणीला सोडविण्यासाठी घोड्यावर स्वार होऊन त्यांच्या मागे धावला होता. श्री कृष्णजींनी आधी त्याला मस्त पिटले. मग रथाच्या मागे बांधून फरफटत नेले होते. रूकमणीजी सुद्धा श्री कृष्णजीच्याच प्रेमिका होत्या. त्यांचे मध्ये रुक्मिणीजीचा भाऊ आला होता. त्याची काय दशा केली होती. श्री कृष्णजींनी रुक्मिणीच्या विनंतीवरून त्यांच्या भावाला जीवदान दिले. जर आज भगवान श्रीकृष्ण वर्तमानात असते, राधाजि सुद्धा असत्या, आणि बरसाना गावातले काका पुतणे आपसात 'राधे-राधे' असे बोलले असते, तर श्रीकृष्णजींना ते आवडले असते काय? कधीच नाही. काका पुतण्यांना दोघांनाही रथाला बांधून फरफटत नेले असते. जर आपण कोणाच्या प्रेमिकेचे नाव घेऊन बडबड केलीत तर त्या

प्रेमिकाला काय वाटेल? जर बलदंड असेल तर तोंड फोडेल, किरकोळ असेल तर रडत बसेल. तिच्या जिवाला लागेल. ती खुश होईल काय? नाहीं त्यामुळे ही नामे शास्त्र प्रमाणित नाहीत. त्यांचा जप व्यर्थ आहे. शास्त्र प्रमाणित नाम माझ्याजवळ आहे. या आणि आपले कल्याण करवून घ्या.

प्रश्न :- आपण (पूर्ण गुरूची ओळख काय आहे?) ह्या प्रश्नाच्या उत्तरात एके ठिकाणी लिहिले आहे. की प्रमाणित झाले की ओम् (ॐ) नामाचा जप शास्त्र प्रमाणित आहे. (काळ ब्रह्मची पूजा केली पाहिजे की नाही?) ह्या प्रश्नांच्या उत्तरात बहुतांशी ऋषिची पूजा ही शास्त्राविधिच्या विपरीत मनमानी आचरण असल्याचे म्हटले आहे, जे ॐ (ओम्) मंत्राचा जप करत होते.

उत्तर :- ते ऋषिजी ओम् (ॐ) नामाच्या जपासोबत हठयोगाने घोर तपसुद्धा करत असत. त्यामुळे त्यांची साधना शास्त्राविरूद्ध असल्याचे म्हटले आहे. ओम् (ॐ) नामाचा जप शास्त्र प्रमाणित तर आहे, परंतु मोक्षदायक नाही. त्यामुळे अनुत्तम गति (मुक्ति मिळत नाही) प्राप्त होते आहे. त्यामुळे त्या ऋषिंचा पूजा विधि शास्त्राविरूद्ध आहे. वेद आणि गीतेत त्या परम परमात्म्याची भक्ति करण्यास सांगितले आहे. त्याची भक्ति न करतां मनमानी पूजा करणे शास्त्राविरूद्ध आहे.

प्रश्न :- महर्षि बाल्मिकीजी तर सत्ययुगात होऊन गेले, तेही राम-राम जपत असत. हा मंत्रसुद्धा शास्त्र प्रमाणित नाही काय?

उत्तर :- आधीच सांगितले आहे की गीता अध्याय ४ श्लोक १-२ मध्ये गीता ज्ञान दाता सांगतात की हे ज्ञान मी सूर्याला ऐकवले होते. त्याने ते आपल्या पुत्राला म्हणजेच मनुजींना सांगितले. नंतर काही राजऋषिना सुद्धा प्राप्त झाले. सत्ययुगाच्या प्रारम्भीच हे सर्व सूर्य, मनु व राजर्षि झाले आहेत. त्यांच्यानंतर हे ज्ञान नष्ट झाले होते. महर्षि बाल्मिकीजींना सप्त ऋषि भेटले होते. त्यांनी तप करून काही सिद्धि प्राप्त केल्या होत्या. तोच हठयोग करण्याचा तपविधि महर्षि बाल्मिकीजींना त्यांनी सांगितला. त्या हठ योगाचे तप महर्षि बाल्मिकीजींनी तन-मनाने श्रद्धापूर्वक केले होते. काही कालावधीनंतर शरीराच्या वरच्या भागातून (डोके) आवाज ऐकू आला, तो राम-राम असा होता. त्याच शब्दाचे उच्चारण महर्षि बाल्मिकीजी तपाच्या दरम्यान करू लागले. ऐकणाऱ्याला ते मरा, मरा म्हणताहेत असे वाटले. वास्तविक ते राम-रामच उच्चारण करत होते. त्यांना तपस्येचे फळ मिळाले व त्यांच्यामध्ये सिद्धि प्रविष्ट झाल्या. त्यांना दिव्य दृष्टी प्राप्त झाली. त्यामुळे त्यांनी श्री रामचन्द्रजींच्या जन्मापूर्वी हजारों वर्षे अगोदरच रामायण म्हणजेच श्री रामचन्द्रजींच्या जीवनातील सर्व घटना लिहिल्या होत्या ग्रंथाचे नाव आहे बाल्मिकी रामायण व तो संस्कृत भाषेत लिहिला गेला. राम-राम असा जप करून कोणताही आध्यात्मिक लाभ होत नाहीं. परंतु परमात्मा बोधक शब्द असल्याने उच्चारण करण्याने परमात्म्याचा विसर पडत नाही. म्हणूनच राम-नामाचे उच्चारण करण्याची पद्धत प्राचीन काळापासून हिन्दू धर्मात प्रचलित आहे. जसे स्वामी रामानन्दजी राम-राम शब्दानेच सम्बोधित करत असत. त्यांचे शिष्यसुद्धा एकमेकांना राम-राम म्हणूच सम्बोधित असत. परंतु जप मंत्र ''ॐ'' हाच होता. त्याचप्रमाणे आम्ही कबीर पंथी ''सत साहेब'' म्हणतो. आमचा जप मंत्र वेगळा आहे. त्याच्याच आधाराने परमात्म्यापर्यंत पोहोचता येते. सूक्ष्म वेदात म्हटले आहे :-

सतगुरू मिले तो इच्छा मेटै, पद मिल पदै समाना। चल हंसा उस लोक पठाऊँ, जो अजर अमर अस्थाना।
चार मुक्ति जहाँ चम्पी करती, माया हो रही दासी। दास गरीब अभय पद परसै, मिलै राम अविनाशी।।

## ''संक्षिप्त सृष्टि रचना''

**श्री देवी भागवत पुराणाच्या पहिल्या स्कंधात अध्याय १ ते ८, पान २१-४३ वर, प्रमाण आहे की महर्षि व्यासजीचा परम शिष्य श्री सूतजिना शौनकादि ऋषिंनि प्रश्न केला, हे सूतजी! कृपया तुम्ही देवी पुराणाची पावन कथा सांगा. श्री सूतजी म्हणाले की** (पान न. २३) पौराणिकाचे आणि वैदिकाचे कथन आहे तथा हे सर्वश्रूत विदित आहे कि ब्रह्माजी ह्या सर्व सृष्टिचे सृष्टा आहेत. सोबत ते हे सुद्धा सांगतात कि ब्रह्माजीचा जन्म विष्णुजीच्या नाभीकमलातून झाला. मग अशा स्थितीत ब्रंह्माजी स्वतंत्र सृष्टा कसे झाले? भगवान विष्णुना स्वतंत्र सृष्टा म्हणू शकत नाहीत कारण ते तर शेषनागाच्या शय्येवर झोपले होते. नाभीतुन कमळं निघाले आणि त्यातून ब्रंह्माजी प्रकट झाले. परंतु ते श्री विष्णु सुद्धा, कुण्यातरी आधारावर अवलंबित होते. त्यांचे आधारभूत असलेल्या क्षीर समुद्राला देखील स्वतंत्र सृष्टा मानू शकत नाही कारण तो तर रस आहे. रस बिना पात्र थांबू शकत नाही कुणी न कुणी त्याचा आधार असला पाहिजे. अतएव चराचर जगताची आधारभुता भगवती जगदम्बिका हीच सृष्टा रूपात निश्चित झाली. (देवी पूराणाच्या पान ४१ वर लिहिले आहे :-) ऋषिनि विचारले:- महाभाग सूतजी! या कथेला जाणून आम्हाला खूप आश्चर्य होत आहे कारण वेद, शास्त्रं, पुराण आणि विज्ञ जणांनी सदा हा निर्णय केला कि, बह्मा, विष्णु आणि शंकर-हेच तीन सनातन देवता आहेत. त्यांच्या पेक्षा मोठे ह्या ब्रंह्मांडात कुणी दूसरा देव नाही. तुम्ही ह्या सर्व सृष्टिस कारणीभूत ज्या जगदम्बिका (दुर्गा) विषयी सांगितले, ती कोण शक्ति आहे? त्याची सृष्टि (उत्पत्ति) कशी झाली? हे सगळे सांगण्याची कृपा करा.

**सूतजी म्हणतात :-** मुनीवर! चराचरासहित ह्या त्रिलोकात कोण असा आहे जो या संदेहाला दूर करेल. ब्रह्मजीचे पुत्र नारद, कपिल आदि दिव्य महापुरुष सुद्धा ह्या प्रश्नाचे समाधान करण्यात निरुपाय होऊन जातात. महानुभावो! हे फार गहन आणि विचारणीय आहे. या सबन्धि मी काय सांगू शकतो?

(श्री देवी पुराण, तिसरा स्कंध अध्याय १३ पृष्ट ११५ वर) नारदजींनी आपले पिता श्री ब्रह्माजिला विचारले, ''पिताजी! हे सर्व ब्रह्माण्ड कोठून उत्पन्न झाले? विभो! तुम्ही सम्यक प्रकारे याची रचना केली आहे? अथवा विष्णुजी ह्या विश्वाचे रचयिता आहेत? अथवा श्री शंकरजीनी सृष्टि उत्पन्न केली? जगत प्रभो! तुम्ही विश्वाची आत्मा आहात. सत्य गोष्ट सांगायची कृपा करा. कोणत्या देवताची पूजा केली पाहिजे? तथा कोण देवता (प्रभु) सर्वात मोठा आणि सर्व-समर्थ आहे? ह्या सगळ्या प्रश्नाचे समाधान करून माझ्या हृदयाच्या शंकांना दूर करण्याची कृपा करा. ब्रह्माजी म्हणाले, बेटा! मी या प्रश्नाचे काय उत्तर देऊ? हा प्रश्न फार जटिल आहे. ह्या संसारात कुणीही असा रागी पुरुष नाही, ज्याला हे रहस्य विदित आहे.'' (श्री देवी पूराणावरून लेख समाप्त).

**प्रिय पाठक हो! ज्या सृष्टि रचना विषयी तथा सर्व समर्थ प्रभु विषयी ना व्यास जाणत होत, न ब्रह्माजी त्या रहस्याला या सृष्टि रचनेत वाचा :-**

**प्रभु-प्रेमी आत्मा प्रथम वेळेस निम्न सृष्टि रचना वाचतील, तर असे वाटेल जसे एखादी दंतकथा आहे. परंतु सर्व पवित्र सद्ग्रंथातील प्रमानांना वाचून तुम्ही आश्चर्यचकीत व्हाल, की हे वास्तविक आध्यात्मिक अमृतज्ञान कुठे लपले होते? कृपया संयमाने व धैर्याने वाचत रहा तथा या अमृतज्ञानाला सुरक्षित ठेवा. तुमच्या १०१ पिढीच्या कामाला येईल. पवित्रात्म्यानो! सत्यांनारायणाद्वारे (अविनाशी प्रभू अर्थात सत्पुरुष) रचित सृष्टि रचना अर्थात त्यांच्या द्वारे निर्मित सर्व लोक-रचनेचे वास्तविक ज्ञान वाचा.**

सगळ्यात आधी सतपुरुष एकटे होते. कोणतीच रचना नव्हती. सर्वप्रथम परमेश्वराने चार अविनाशी लोकांची रचना वचनाने (शब्द) केली.

१. अनामी लोक ज्याला अकह लोक देखील म्हणतात.

२. अगम लोक ३. अलख लोक ४. सत लोक.

मग परमात्म्याने चारी लोकामध्ये चार रूप धारण केले. चार उपमात्मक नावाने चारी लोकात प्रसिद्ध झाले.

१. अनामी लोकात अनामी पुरुष अथवा अकह पुरुष.

२. अगम लोकात अगम पुरुष.

३. अलख लोकात अलख पुरुष.

४. सत लोकात सतपुरुष हे उपमात्मक नाव ठेवले.

मग चारी लोकात, परमात्म्याने वचनाने एक-एक सिहांसन (तख्त) बनविले. प्रत्येक सिंहासनावर सम्राटासमान मुकुट आदि धारण करून विराजमान झाले. मग सतलोकामध्ये परमेश्वराने अन्य रचना केल्या. एका शब्दाने (वचन) १६ द्वीप तथा एका मानसरोवराची रचना केली. पुन्हा १६ वचनांनी १६ पुत्रांची उत्पत्ति केली. त्यामध्ये मुख्य भूमिका अचिन्त, तेज, सहजदास, जोगजीत, कूर्म, इच्छा, धैर्य आणि ज्ञानीची आहे.

आपल्या पुत्रांना धडा शिकवण्यासाठी कि समर्थाशिवाय कोणतेच कार्य सफल होऊ शकत नाही. ज्याचे काम त्यालाच शोभते दुसऱ्या ने केले तर मूर्खपणा ठरतो.

सतपुरुषाने आपला पुत्र अचिन्त ला सांगितले कि तुम्ही सतलोकात अन्य रचना करा. मी काही शक्ति तुला प्रदान केली आहे. अचिन्त ने आपल्या वचनाने अक्षर पुरुषाची उत्पत्ति केली. अक्षर पुरुष युवा उत्पन्न झाला. मानसरोवरात स्नान करण्यासाठी गेला. त्याच पाण्यावर पोहत होता. काही वेळाने त्याला झोप आली. सरोवरात खोल खाली गेला (सतलोकात अमर शरीर आहे, तेथे शरीर श्वासावर निर्भर नाही). बराच वेळ झाला तरीही तो (अक्षर पुरुष) पाण्यातून बाहेर आला नाही. अचिन्त पुढे सृष्टि करू शकला नाही. तेव्हा सतपुरुष (परम अक्षर पुरुष) ने मानसरोवर जाऊन थोडे जल आपल्या हातात घेवून त्याचे एक विशाल अंडे बनवले व त्यात आपल्या वचनाने एक आत्मा प्रवेशीत केला आणि त्या अंड्याला पाण्यात सोडले. पाण्यात अंडे खाली जाऊ लागले व त्याच्या गडगडाट होऊ लागला. त्या गडगडाटाच्या आवाजाने अक्षर पुरुषाची निंद्रा भंग झाली. अक्षर पुरुषाने क्रोधाने पाहिले कि कुणी मला जागे केले. क्रोध त्या अंड्यावर पडला तर ते अंडे फुटून गेले व त्यातून एक युवा तेजोमय व्यक्ति निघाला. त्याचे नाव क्षर पुरुष (पुढे चालून हाच काल म्हणवला गेला). सतपुरुषाने दोघांना आवाज दिला कि तुम्ही पाण्याच्या बाहेर या. अक्षर पुरुष तुला निंद्रेतून जागे करण्यासाठी हे सगळे केले. त्यानंतर सतपुरुष म्हणाले कि तुम्ही दोघे अक्षर पुरुष व क्षर पुरुष या अचिन्त च्या लोकामध्ये रहा.

काही काळानंतर क्षर पुरुषाने (ज्याला ज्योति निरंजन काल देखील म्हणतात) मनामध्ये विचार केला कि, आम्ही तिघे एका लोकात राहत आहोत. माझे अन्य भाऊ एका एका द्वीपावर एकच याप्रमाणे राहत आहेत. हा विचार करून त्याने वेगळे स्वतंत्र द्वीप प्राप्त करण्यासाठी तप प्रारंभ केले. याआधी सतपुरुषजींनी अचिन्तला म्हटले कि तू सृष्टि रचना करू शकत नाहीस. ही शिकवण देण्यासाठी, तुला म्हटले होते कि, अन्य रचना कर. परंतु अचिन्त, तू तर, अक्षर पुरुषाला देखील उठवू शकला नाहीस. आता पुढे कुणीही हा प्रयत्न करू नका.

माझ्या वचन शक्तीने मी सर्व रचना करेल.

सतपुरुषाने सतलोकात असंख्य लोक रचले तथा प्रत्येकात आपल्या वचनाद्वारे (शब्द) अन्य आत्म्याची उत्पत्ति केली. हे सर्व लोक सतपुरुषाच्या सिंहासनाच्या आजूबाजूला होते. यामध्ये केवळ नरहंसच (सतलोकत मनुष्याला हंस म्हणतात) राहतात, आणि त्यांना परमात्म्याने शक्ति दिली आहे कि ते (नरहंस) आपला परिवार, वचनाने उत्पन्न करू शकतात. ते केवळ दोन पुत्र उत्पन्न करू शकतात.

क्षर पुरुष (ज्योति निरंजन) ने, तप करणे चालू ठेवले. त्याने ७० युगापर्यंत तप केले. सतपुरुषजीने क्षर पुरुषास विचारले कि तुम्ही तप कश्यासाठी करत आहात? क्षर पुरुष म्हणाला कि हे स्थान माझ्यासाठी अपुरे आहे, मला वेगळे स्थान पाहिजे. परमेश्वराने (सतपुरुष) त्याला ७० युगाच्या तपाच्या प्रतिफळात २१ ब्रह्माण्डे दिली, जी सतलोकाच्या बाहेरच्या क्षेत्रात होती, जसे २१ प्लॉट समझा. ज्योति निरंजन याने विचार केला कि या ब्रह्मांडात काही रचना केली पाहिजे. त्यासाठी परत ७० युग तप केले. मग सतपुरुषाने विचारले कि आता काय ईछा आहे? क्षर पुरुष (ज्याति निरंजन) ने म्हटले कि सृष्टि रचना करण्याची सामग्री देण्याची कृपा करावी. सतपुरुषांनी त्याला पाच तत्व (जल, पृथ्वी, अग्नि, वायु आणि आकाश) तथा तीन गुण (रजोगुण, सतोगुण तसेच तमोगुण) दिले तथा सांगितले कि यापासून आपली रचना कर.

क्षर पुरुषाने तिसऱ्या वेळेस पुन्हा तप प्रारंभ केले. जेव्हा ६४ युग तप झाले, तेव्हा परत सतपुरुषाने विचारले कि आता काय ईच्छा आहे? क्षर पुरुष म्हणाला कि मला काही आत्मे दया. माझे एकट्याचे मन लागत नाही. क्षर पुरुषाला आत्मे कसे भेटले ते पुढे वाचा :–

## ''आपण काल लोकात कसे आलो?''

ज्यावेळेस क्षर पुरुष (ज्योति निरंजन) एका पायावर उभा राहून तप करत होता तेव्हा आपण सगळे आत्मे त्या क्षर पुरुषावर मोहित झालो. जसे तरुण मुले–मुली आजकालच्या अभिनेत्यावर अथवा अभिनेत्रीवर मोहित होतात त्याप्रमाणे. घेणे ना देणे, व्यर्थ प्रेमात पडतात. ते आपली कमाई करण्यासाठी नाचतात गातात. तरुण मंडळी त्यांना बघुन आपले धन नष्ट करतात. ठीक याचप्रकारे आम्ही आपल्या परमपिता सत पुरुषाला सोडून, (क्षर पुरुष) काल पुरुषावर मनापासून प्रेम करू लागलो. जो परमेश्वर आम्हाला सर्व सुख सुविधा देत होता, त्याच्याशी विमुख होवून या नकली ड्रामा करणाऱ्या काल ब्रह्म वर आसक्त झालो. सतपुरुषाने मध्ये–मध्ये बऱ्याच वेळा आकाशवाणी केली कि मुलांनो! तुम्ही ह्या कालाच्या क्रियेला बघू नका, मस्त रहा. आम्ही वरुन तर सावधान झालो, पण आतून आसक्त होतो. परमेश्वर तर अंतर्यामी आहेत, त्यांनी जाणून घेतले कि हे इथे राहण्यालायक नाही राहिले. काल पुरुषाने (क्षर पुरुष = ज्योति निरंजन) जेव्हा दोन वेळा तप करून फळ प्राप्त केले, तेव्हा त्याने विचार केला कि आता काही जीवात्मा सुद्धा माझ्यासोबत राहिले पाहिजे. माझे एकट्याचे मन लागणार नाही. यामुळे जिवात्म्याच्या प्राप्तीसाठी तप चालू केला. ६४ युगापर्यंत तप केल्यानंतर परमेश्वराने विचारले कि ज्योति निरंजन! आता कश्यासाठी तप करत आहेस? क्षर पुरुषाने म्हटले कि काही आत्मे प्रदान करा. माझे एकट्याचे मन लागत नाही. सतपुरुष म्हणाले कि मी तुझ्या तपाच्या बदल्यात अजून ब्रह्माण्डे देऊ शकतो, परंतु माझे आत्मे देऊ शकत नाही. ते माझ्या शरीरापासून उत्पन्न झाले आहेत. परंतु, ते जर स्वत: जाण्यासाठी इछुक असतील, तर ते जाऊ शकतात. युवा कविराचे (समर्थ कबीर) वचन ऐकून ज्योति निरंजन आपल्याकडे

आला. आपण सर्व हंसआत्मे आधीच त्याच्यावर आसक्त होतो. आपण त्याला चारही बाजूने घेरून उभे राहिलो. ज्योति निरंजन म्हणाला कि मी पिताजीकडून वेगळे २१ ब्रह्माण्डे प्राप्त केले आहेत. तिथे नाना प्रकारचे रमणीय स्थळ बनवले आहेत. काय तुम्ही माझ्यासोबत याल? आम्ही सर्व आत्मे जे आता या २१ ब्रह्मांडात परेशान आहोत म्हणालोत कि होय आम्ही तयार आहोत, पण पिताजींनी सम्मती दिली पाहिजे. तेव्हा क्षर पुरुष (काल) हा पूर्ण ब्रह्म महान् कविर् (समर्थ कबीर प्रभु) कडे आला आणि सर्व वार्ता सांगितली. तेव्हा कविरग्नि (कबीर परमेश्वर) ने सांगितले कि माझ्या समोर स्वीकृति देणाऱ्यातला मी आज्ञा देईल. क्षर पुरुष आणि परम अक्षर पुरुष (कविर्मितौजा) दोघेही आम्हा सर्व हंस आत्म्याजवळ आले. सत् कविर्देव म्हणाले कि जे हंसात्मे ब्रह्म सोबत जाण्यास तयार आहेत त्यांनी आपआपले हात वर करून स्वीकृति ध्यावी. आपल्या पित्यासमोर कुणाचीही हिम्मत झाली नाही. फार वेळेपर्यंत शांतता पसरली. तत्पश्चात एका हंसात्म्याने साहस केले आणि म्हटले कि पिताजी माझी जायची ईच्छा आहे. मग तर त्याचे बघून आम्ही सर्व आत्म्यानी (जे आज ह्या काल (ब्रह्म) च्या २१ ब्रह्मांडात फसलो आहोत) स्वीकृति दिली. परमेश्वर कबीरजी म्हणाले कि ज्योति निरंजन तुम्ही तुमच्या स्थानी जावे. ज्यांनी तुझ्यासोबत जाण्याची स्वीकृति दिली, मी त्या सर्व आत्म्याना तुझ्याकडे पाठवून देतो. ज्योति निरंजन आपल्या २१ ब्रह्मांडात चालल्या गेला. त्यावेळी हे २१ ब्रह्मांडे सतलोकातच होते.

तत्पच्यात, पूर्ण ब्रह्मने, सर्वप्रथम स्वीकृति देणाऱ्या हंसाला मुलीचे रूप दिले पण स्त्रीइंद्रिय रचले नाही आणि सर्व आत्म्याना (ज्यांनी ज्योति निरंजन (ब्रह्म) सोबत जाण्याची सहमति दिली होती) त्या मुलीच्या शरीरात प्रवेश करून दिला तथा तिचे नाव आष्ट्रा (आदि माया/प्रकृति देवी/दुर्गा) पडले. सत्यपुरुष म्हणाले कि हे पुत्रि! मी तुला शब्द शक्ति प्रदान केली आहे. जितके जीव ब्रह्म म्हणेल तू उत्पन्न कर. पूर्ण ब्रह्म कर्विदेवाने (कबीर साहेब) आपला पुत्र सहजदासासोबत प्रकृतिला क्षर पुरुषाकडे पाठवले. सहजदासजीने ज्योति निरंजनाला सांगितले कि या बहिणीच्या शरीरात त्या सर्व आत्म्याना प्रवेशीत केले आहे, ज्यांनी तुमच्यासोबत येण्याची सहमति दिली होती. हिला वचन शक्ति प्रदान केली आहे. तुम्हाला जितके जीव पाहिजे प्रकृति आपल्या शब्द शक्तीने उत्पन्न करून देईल. हे सांगून सहजदास वापस आपल्या दिवपामद्धे आला.

युवा असल्याकारणाने मुलीचे रंगरूप खुलले होते. ब्रह्म मध्ये विषय-वासना उत्पन्न झाली आणि त्याने प्रकृति देवी सोबत अभद्र गतिविधि सुरू केली. तेव्हा ती (दुर्गा) म्हणाली कि ज्योति निरंजन माझ्याकडे पिताजींनी प्रदान केलेली शब्द शक्ति आहे. तुम्ही जेव्हडे प्राणी म्हणाल तेव्हडे मी वचनाने उत्पन्न करेन. तुम्ही ही मैथुन परंपरा सुरू करू नका. तुम्ही सुद्धा त्या पित्याच्या शब्दाने अंड्यातून उत्पन्न झाला आहात आणि मी सुद्धा त्याच परमात्म्याच्या वचनाने उत्पन्न झाली आहे. या नात्याने तुम्ही माझे मोठे भाऊ आहात. बहीण-भावाचा हा योग महापापाचे कारण बनेल. परंतु ज्योति निरंजनाने प्रकृति देवीची एक सुद्धा प्रार्थना ऐकली नाही. आपल्या शब्दशक्तीद्वारे नखाने स्त्रीइंद्रिय (भग) प्रकृतिदेवीला लावले तथा बलात्कार करायचे ठरवले. त्यावेळी दुर्गाने आपल्या इज्जतीच्या रक्षणासाठी अन्य कोणताही उपाय दिसत नसल्याने आपले सूक्ष्म रूप बनवले आणि ज्योति निरंजनच्या उघड्या तोंडातून प्रवेश करून त्याच्या पोटात प्रवेश करुन पूर्ण ब्रह्म कवीर् देव आपल्या रक्षणासाठी याचना केली. त्याचवेळी कर्विदेव (कविर् देव) आपला पुत्र योग संतायन अर्थात जोगजीतचे रूप बनवून तेथे प्रकट झाले आणि कन्याला ब्रह्मच्या पोटातून बाहेर काढले तथा म्हणाले कि ज्योति निरंजन आजपासून

तुझे नाव 'काल' होईल. तुझे जन्म-मृत्यु होत राहतील. यामुळे तुझे नाव क्षर पुरुष असेल. तू एक लाख मानव शरीधारी प्राण्यांना प्रतिदिन खाशील व सव्वा लाख उत्पन्न करशील. तुम्हा दोघांना २१ ब्रह्मांडासहित निष्काषित केले जात आहे. एव्हडे म्हटल्यावर लगेच २१ ब्रह्मांडे विमानासारखी उडू लागली. सहजदासच्या द्वीपापासून जात सतलोकापासून १६ संख कोस दूर (एक कोस अंदाजे ३ कि. मी. चा असतो) अंतरावर जावून थांबले.

विशेष विवरण :- आतापर्यंत ३ शक्तीचे विवरण आले आहे.

१. पूर्ण ब्रह्म ज्याला अन्य उपमात्मक नावाने सुद्धा ओळखल्या जाते. जसेकी सतपुरुष, अकाल पुरुष, शब्द स्वरूपी राम, परम अक्षर ब्रह्म/पुरुष इत्यादि. हा पूर्ण ब्रह्म असंख्य ब्रह्मांडाचा स्वामी आहे तथा वास्तविक अविनाशी आहे.

२. परब्रह्म :- ज्याला अक्षर पुरुष सुद्धा म्हटले जाते. हा वास्तविक अविनाशी नाही. हा ७ संख ब्रह्मांडाचा स्वामी आहे.

३. ब्रह्म :- ज्याला ज्योति निरंजन, काल, कैल, क्षर पुरुष तथा धर्मराय इत्यादि नावाने ओळखल्या जाते. जो केवळ २१ ब्रह्मांडाचा स्वामी आहे. आता पुढे ह्याच ब्रह्म (काल) च्या सृष्टिच्या एका ब्रह्मांडाचा परिचय दिला जाईल ज्यामधे अजून ३ नावे तुमच्या वाचनात येतील :- ब्रह्मा, विष्णु तथा शिव.

ब्रह्म आणि ब्रह्मा मधील फरक :- एका ब्रह्मांडात बनलेल्या सर्वोपरी स्थांनामध्ये ब्रह्म (क्षर पुरुष) स्वत: तीन गुप्त स्थानाची रचना करून ब्रह्मा, विष्णु तथा शिवाच्या रूपात राहतो, आणि आपली पत्नी प्रकृति (दुर्गा) च्या सहयोगातून, तीन पुत्राची उत्पत्ति करतो. त्यांची नावे सुद्धा ब्रह्मा, विष्णु तथा शिव ठेवतो. जो ब्रह्मचा पुत्र ब्रह्मा आहे तो केवळ एका ब्रह्मांडात केवळ तीन लोक (पृथ्वीलोक, स्वर्गलोक आणि पाताळलोक) मध्ये एका रजोगुण विभागाचा मंत्री (स्वामी) आहे. यालाच त्रिलोकीय ब्रह्मा म्हटले आहे. तथा ब्रह्म जो ब्रह्मलोकात ब्रह्मा रूपात राहतो, त्याला महाब्रह्मा व ब्रह्मलोकीय ब्रह्मा म्हटले आहे. याच ब्रह्म (काल) ला सदाशिव, महाशिव, महाविष्णु सुद्धा म्हटले आहे.

श्री विष्णु पुराणात प्रमाण :- चतुर्थ अंश, अध्याय १, पान २३०-२३१ वर श्री ब्रह्माजिनि म्हटले :- त्या अजन्मा, सर्वमय विधाता परमेश्वराचे आदि, मध्य, अन्त स्वरूप, स्वभाव आणि सार आम्ही जाणू शकत नाही. (श्लोक ८३).

जो माझे रूप धारण करून संसाराची रचना करतो, स्थितीच्या वेळी जो पुरुष-रूपात आहे तथा जो रुद्ररूपाने विश्वाचे ग्रहन करतो. अनंत रूपाने संपूर्ण जगताला धारण करतो (श्लोक ८६).


## ''श्री ब्रह्माजी, श्री विष्णुजी तथा श्री शंकराजींची उत्पत्ति''

काल (ब्रह्म) ने प्रकृति (दुर्गा) ला म्हटले कि आता माझे कोण काय वाकडे करणार? मी मनमानी करेल. प्रकृतिने पुन्हा प्रार्थना केली. तुम्ही थोडी लाज बाळगा. प्रथम तर तुम्ही माझे मोठे भाऊ आहात. कारण कि त्या पूर्ण परमात्मा (कविर्देव) च्या वचनशक्तीने आपली (ब्रह्म) अंड्यातून उत्पत्ति झाली आणि नंतर माझी उत्पत्ति त्याच परमेश्वरानी वचनांनी केली. दुसरे असे कि मी तुमच्या पोटातून बाहेर आले. मी तुमची मुलगी झाले व तुम्ही माझे पिता झाले. या पवित्र नात्यात बिघाड करणे महा-पाप आहे. माझ्याकडे पित्याने प्रदान केलेली शक्ति आहे. जेव्हडे प्राणी तुम्ही म्हणाल, तेव्हडे वचनाने उत्पन्न करून देईल. ज्योति निरंजन


याने दुर्गाची एक सुद्धा विनंती ऐकली नाही, तथा म्हंटले कि, मला जी सजा मिळायची ती मिळाली. मला सतलोकातून काढून दिले. आता मी मनमानी करेल. असे म्हणून काल पुरुष (क्षर पुरुष) ने प्रकृति सोबत जबरदस्ती लग्न केले. तथा तीन पुत्र (रजोगुणयुक्त ब्रह्माजी, सतोगुणयुक्त विष्णुजी आणि तमोगुण युक्त शिव-शंकरजी) ची उत्पत्ति केली. जवान होईपर्यंत तिन्ही पुत्राना दूरगाद्वारे अचेत करून ठेवतो. मग युवा झाल्यावर श्री ब्रह्माजीला कमळाच्या फुलावर, श्री विष्णुजीला शेषनागाच्या शय्येवर आणि श्री शिवजिला कैलास पर्वतावर सचेत करून एकत्र करतो. तत्पश्चात प्रकृति (दुर्गा) द्वारे या तिघांचा विवाह करून देतो आणि एका ब्रह्मांडातील तीन लोक (स्वर्गलोक, पृथ्वीलोक व पाताळलोक) मध्ये एका-एका विभागाचा मंत्रीपद सांभाळण्यासाठी देतो. एका ब्रह्मांडात एका ब्रह्मलोकाची रचना केली आहे. तेथे तीन गुप्त स्थान बनवले. एक रजोगुण प्रधान स्थान आहे. तिथे हा ब्रह्म (काल) स्वत: महाब्रह्मा (मुख्यमंत्री) रूपात राहत आहे आणि आपली पत्नी दुर्गा हिला महासावित्री रूपात ठेवतो. या दोघांचा सहयोगातून जो पुत्र उत्पन्न होतो, तो स्वत: रजोगुणी बनतो. दुसरे स्थान सतोगुणी प्रधान स्थान बनवले. तेथे हा क्षरपुरुष स्वत: महाविष्णु रूप बनवून राहतो आणि आपली पत्नी दुर्गा हिला महालक्ष्मी रूपात ठेवून जो पुत्र उत्पन्न करतो त्याचे नाव विष्णु ठेवतो. तो बालक सतोगुणयुक्त असतो. तसेच तिसरे स्थान त्याच कालाने तिथेच एक तमोगुण प्रधान क्षेत्र बनविले आहे. त्यामध्ये तो स्वत: सदाशिव रूप बनवून राहतो व आपली पत्नी दुर्गा हिला महापार्वती रूपात ठेवतो. या दोघांच्या पति-पत्नी व्यवहारातून जो पुत्र उत्पन्न होतो त्याचे नाव शिव ठेवतात व त्याला तमोगुण युक्त करतात. (प्रमाणसाठी बघा पवित्र शिव महापुराण विध्वेश्वर संहिता पृष्ट २४-२६ वर ज्यामधे ब्रह्मा, विष्णु, रुद्र तथा महेश्वर पेक्षा अन्य सदाशिव आहे तथा रुद्र संहिता अध्याय ६ तथा ७, ९ पृष्ठ नं. १०० ते १०५ तथा ११० वर अनुवाद्कर्ता श्री हनुमान प्रसाद पोद्दार गीता प्रेस गोरखपुर वरुन प्रकाशित तथा पवित्र श्रीमद् देवी महापुराण तीसरा स्कंद पृष्ट नं. ११४ ते १२३ पर्यन्त, गीता प्रेस गोरखपुर वरुन प्रकाशित, ज्याचे अनुवादकर्ता आहेत श्री हनुमान प्रसाद पोद्दार चिमन लाल गोस्वामी) मग यांनाच धोक्यात ठेवून आपल्या खाण्याकरिता जीवांची उत्पत्ति श्री ब्रह्माजी द्वारा तथा स्थिति (एकदुसऱ्याला मोह-ममता मध्ये ठेवून काव जालात ठेवणे) श्री विष्णुजी कडून आणि संहार श्री शिवजीदवारा (कारण कालपुरुषाला शापवश एक लाख मानव शरीरधारी प्राण्याच्या सूक्ष्म शरीरातून मळ काढून खायचे असते, यामुळे एकवीस ब्रह्मांडात एक तप्तशिला आहे ती स्वत: गरम असते त्यावर गरम करून मळ काढला जातो. जीव मरत नाही पण कष्ट असहणीय असते. मग त्या प्राण्यांना कर्माधारे अन्य शरीर प्रदान करतो आहे) श्री शिवजी द्वारा करवतो आहे. जसे एखाद्या घरात तीन खोल्या बनवलेल्या असतात. एका खोलीत अश्लील चित्र लागलेले आहेत. त्या खोलीत गेले की मनात तसेच मलीन विचार उत्पन्न होतात. दुसऱ्या खोलीत साधूसंत व भक्ताचे चित्र लावलेले असतील तर मनात चांगले विचार, प्रभुचे चिंतन उत्पन्न होते. तिसऱ्या खोलीत देशभक्त व शहीदांचे चित्र लागले असेल तर मनात तसेच जोशाचे विचार उत्पन्न होतात. ठीक अश्याच प्रकारे ब्रह्म (काल) ने आपल्या विचाराने उपरोक्त तीन गुण प्रधान स्थानाची रचना केली आहे.

(बघा ब्रह्मलोकाचे लघुचित्र व ज्योति निरंजन (काल) ब्रह्मचे लोक २१ ब्रह्मांडाचे लघुचित्र त्याच पुस्तकात पान १९० व १९१ वर)


# एक ब्रह्मण्ड चे लघु चित्र



# ब्रह्म लोकाचे लघु चित्र



# ज्योति निरंजन (काल) ब्रह्म चे लोक (२१ ब्रह्मण्ड) चे लघु चित्र



# ''संपुर्ण सृष्टि रचना''

## (सुक्ष्म वेदानुसार संक्षिप्त रुपात सृष्टिरचनेचे वर्णन)

सर्व प्रभुप्रेमी आत्म्यांना हे सृष्टिरचनेचे सत्यज्ञान पहिल्यांदा वाचताना असे वाटेल,की जणू काही ही दंतकथाच आहे; परंतु सर्वधर्मांतील पवित्र सद्ग्रंथांमधील प्रमाणासहित पुरावे वाचनात येतील, तेव्हा तुम्हाला आश्चर्याचा धक्काच बसेल आणि म्हणाल, की हे वास्तव सत्य अमृतज्ञान आजतागायत कोठे लपलेले होते? कृपया धैर्य व गांभीर्याने हे वाचा आणि या अमृतज्ञानाचे जतन करा. याचा आपल्या पुढील पिढ्यांन् पिढ्यांना लाभ होईल. हे पवित्र आत्म्यांनो, कृपया सत्यनारायणाने (अविनाशी प्रभू /सत्पुरुष) रचलेल्या सृष्टिचे वास्तविक ज्ञान वाचा–

१. **पूर्ण ब्रह्म :–** या सृष्टिरचनेतील सत्पुरुष–सत्लोकीचा स्वामी (प्रभू) अलखपुरुष–अलखलोकीचा स्वामी (प्रभू), अगमपुरुष–अगमलोकीचा स्वामी (प्रभू) तसेच अनामीपुरुष–अनामीलोकीचा स्वामी (प्रभू) हे सर्व एकच असून हेच पूर्ण ब्रह्म आहेत, जे वास्तविक अविनाशी प्रभू आहेत. ते भिन्नभिन्न रूपे धारण करून आपल्या चारही लोकांमध्ये नित्य वास्तव्य करतात. त्यांच्या अंतर्गत असंख्य ब्रह्मांडे येतात.

२. परब्रह्म :– हे केवळ 'सात संख' ब्रह्मांडांचे स्वामी आहेत. यांना अक्षरब्रह्म असेही संबोधले जाते; परंतु हे आणि त्यांची सात संख ब्रह्मांडे वास्तविक अविनाशी नाहीत.

३. ब्रह्म :– हे केवळ २१ ब्रह्मांडांचे स्वामी (प्रभू) आहेत. यांना क्षर पुरुष, ज्योति निरंजन, काल आदी उपमांद्वारे ओळखले जाते. यांची २१ ब्रह्मांडे व ते स्वत: (बह्म, काल भगवान) नाशवान आहेत.

(वरील तिन्ही प्रभूंचे प्रमाण याचे प्रमाण पवित्र गीतेच्या १५ व्या अध्यायातील १६ व १७ व्या श्लोकांमध्ये आहे)

४. ब्रह्मा :– ब्रह्मा हे वर उल्लेख आलेल्या ब्रह्मचा (काल) ज्येष्ठ पुत्र असून, मधला पुत्र विष्णू व अंतिम पुत्र शंकर (शिव) आहेत. हे तिघेही ब्रह्मचे (काल) पुत्र असून, प्रत्येक जण एकेक विभागाचे (गुणाचे) स्वामी (प्रभु) आहेत. तसेच तेसुद्धा नाशवान आहेत. अधिक माहितीसाठी खाली दिलेली सृष्टिरचना कृपया वाचावी.

{कविर्देवांनी (कबीर परमेश्वर) ने सुक्ष्म वेद अर्थात कबिर्बाणी मध्ये आपल्या द्वारा रचलेल्या सृष्टिचे ज्ञान स्वतःच सांगितले आहे जे खाली लिहले आहे.}

सर्वप्रथम 'अनामी' (अनामय) लोक होते. हे केवळ एकच स्थान होते. त्याला 'अकह लोक' असेही म्हटले जाते. पूर्ण परमात्मा या अनामी लोकामध्ये एकटेच वास्तव्य करत होते. त्या परमात्याचे नाव कविर्देव अर्थात कबीर परमेश्वर असे आहे. समस्त विश्वातील सर्व जीवात्मे त्या पूर्ण ब्रह्मच्या (पूर्णधनी) तेजःपुंज शरीरामध्येच सामावलेले होते. याच कविर्देवांचे उपमात्मक (पदवीसंबंधीचे नाव) अनामी पुरुष असे आहे. (पुरुष या शब्दाचा अर्थ 'प्रभू' असा होतो. त्या प्रभूने स्वत:च्याच स्वरूपाप्रमाणे मनुष्याची निर्मिती केली आहे. त्यामुळे मानवालाही पुरुष असे संबोधले जाते.) या अनामी पुरुषाच्या एक रोम कूपाचा प्रकाश संख सूर्यांच्या प्रकाशापेक्षाही अधिक आहे.


विशेष :– देशाच्या आदरणीय प्रधानमंत्र्यांचे (देहाचे) नाव काही अन्य असते आणि पदवीच्या (पदाचे उपमात्मक) नावावरून त्यांना 'प्रधानमंत्री' असे संबोधले जाते. कित्येक वेळा प्रधानमंत्री आपल्याजवळ काही प्रमुख खातीसुद्धा ठेवतात. ते ज्या खात्याच्या दस्तऐवजांवर

# परमेश्वर कबीर साहेबांचे असंख्य ब्रह्मण्डाचे लघु चित्र

अनामी लोक : या लोकामध्ये कबीर साहेब अनामी पुरुष रुपामध्ये राहतात. येथे एकटे आहेत.

अगम लोक : या लोकामध्ये देखिल कबीर साहेब अगम पुरुष रुपामध्ये राहतात.

अलख लोक : या लोकामध्ये देखिल कबीर साहेब अलख पुरुष रुपामध्ये राहतात.



स्वाक्षरी करतात, तेव्हा ते त्याच खात्याचे पद लिहतात. गृहमंत्रालयाच्या कागदपत्रांवर सही करताना ते गृहमंत्री असेच लिहितात. त्या त्या पदानुसार एकाच व्यक्तीच्या स्वाक्षरीची शक्ती कमी-अधिक होत जाते, त्याप्रमाणे कबीर परमेश्वरांच्या (कविर्देव) तेजामध्येही (प्रकाशामध्ये) अंतर पडत जाते.

अगदी अशाच प्रकारे पूर्ण परमात्मा कविर्देव (कबीर परमेश्वर) यांनी आणखी तीन लोकांची (अगमलोक, अलखलोक, सत्लोक) रचना शब्दाद्वारे (वचन) केलेली आहे. हेच पूर्ण ब्रह्म परमात्मा कविर्देव (कबीर परमेश्वर) अगमलोकी प्रगट झाले. तेथे हेच कविर्देव (कबीर परमेश्वर) अगमलोकीचेही स्वामी आहेत. तेथे त्यांचे उपमात्मक (पदवीचे) नाव अगमपुरुष अर्थात अगमप्रभू असे आहे. याच प्रभूंचे मानवसदृश शरीर अत्यंत तेजोमय आहे, ज्यांच्या एक रोम (शरीरातील केस) कूपाचा (रंध्र) प्रकाश 'खरब' (अब्ज/अरबापेक्षाही अधिक) सूर्यांच्या प्रकाशापेक्षाही अधिक आहे.

हेच पूर्ण परमात्मा कविर्देव (कविर्देव = कबीर परमेश्वर) अलखलोकी प्रकट झाले. तेथे उपमात्मक नाव (पदवीचे नाम) अलखपुरुष असे याच परमेश्वरांचे आहे. या पूर्ण प्रभूंचे मानवसदृश शरीर तेजोमय (स्वज्योंति) स्वयंप्रकाशित आहे. त्यांच्या एक रोम (शरीरातील केस) कूपाचा प्रकाश 'अरब' सूर्यांच्या प्रकाशापेक्षाही अधिक आहे.

हेच पूर्ण प्रभू सत्लोकी प्रकट झाले. तसेच सत्लोकीचेही तेच अधिपती आहेत. त्यामुळेच त्यांचे उपमात्मक (पदवीचे) नाव-सत्पुरुष (अविनाशी प्रभू) असे आहे. अकालमूर्ती, शब्दस्वरूपी राम, पूर्ण ब्रह्म, परम अक्षरब्रह्म आदी त्यांची नावे आहेत. याच सत्पुरुष कविर्देवांचे (कबीर प्रभू) मानवसदृश शरीर तेजोमय आहे. यांच्या एक रोम (शरीरातील केस) कूपाचा (रंध्र) प्रकाश कोटी सूर्य, तसेच तितक्याच चंद्रांच्या प्रकाशापेक्षाही अधिक आहे.

हेच कविर्देव (कबीर प्रभू) सत्पुरुष रूपामध्ये प्रगट झाले आणि सत्लोकी विराजमान होऊन प्रथम तेथे अन्य रचना केल्या.

त्यांनी एका शब्दापासून (वचनाने) सोळा द्वीपांची रचना केली. नंतर सोळा शब्दांपासून सोळा पुत्रांची उत्पत्ती केली. अमृताने भरलेल्या एका मानसरोवराची रचना केली. सोळा पुत्रांची नावे अशी :- (१) ''कुर्म'', (२) ''ज्ञानी'', (३) ''विवेक'', (४) ''तेज'', (५) ''सहज'', (६) ''संतोष'', (७) ''सुरति'', (८) ''आनंद'', (९) ''क्षमा'', (१०) ''निष्काम'', (११) ''जलरंगी'', (१२) ''अचिंत'', (१३) ''प्रेम'', (१४) ''दयाल'', (१५) ''धैर्य'', (१६) ''योग संतायन अर्थात योगजित''.

सत्पुरुष कविर्देव यांनी आपला पुत्र अचिंत याच्याकडे सत्यलोकीच्या अन्य रचनांचा भार सोपवला आणि शक्ती प्रदान केली. अचिंतने शब्दापासून अक्षर पुरुषाची (परब्रह्म) उत्पत्ती केली आणि आपणास मदत करण्यास सांगितले. अक्षरपुरुष मानसरोवरावर स्नान करण्यासाठी गेला असता तेथील दिव्य अनुभूतीच्या आनंदात झोपी गेला. बराच वेळ तो बाहेर आला नाही. हे पाहून अचिंताने कविर्देवांकडे त्यासंबंधी प्रार्थना केली. अक्षर पुरुषाला निद्रेतून जागवण्यासाठी कविर्देवांनी (कबीर परमेश्वर) त्याच मानसरोवरामधील थोडे अमृतजल घेऊन एक अंडे निर्माण केले आणि त्या अंड्यामध्ये एक आत्मा प्रवेशित करून ते अंडे मानसरोवराच्या अमृतजलामध्ये सोडले. अंड्याच्या गडगडाटाने अक्षर पुरुषाचा निद्राभंग झाला. जागे होऊन त्याने अंड्याकडे क्रोधाने पाहिले असता त्या अंड्याचे तडकून दोन भाग झाले.त्यामधून ज्योति निरंजन (क्षर पुरुष) बाहेर पडला, जो पुढे 'काल' असा संबोधला गेला आहे. याचे वास्तविक नाव 'कैल' असे

आहे. त्यावेळी सत्पुरुषांनी (कविर्देव) आकाशवाणी केली, की तुम्ही दोघे अचिंताच्या द्वीपामध्ये वास्तव्य करा. ही आज्ञा झाल्यानंतर अक्षर पुरुष आणि क्षरपुरुष (कैल) दोघेही अचिंतच्या द्वीपामध्ये वास्तव्य करू लागले. (पुत्रांमध्ये पुन्हा प्रभुतेची लालसा उत्पन्न होऊ नये म्हणून पुत्रांची मूर्खता त्यांनाच दर्शवून दिली. कारण समर्थांशिवाय कार्य सफल होत नाही.) नंतर पूर्ण धनी कविर्देवांनी सर्व रचना स्वत: केली. आपल्या शब्दशक्तीने एक 'राजेश्वरी' (राष्ट्री) शक्ती उत्पन्न केली. तिच्याद्वारे सर्व ब्रह्मांडांची स्थापना केली. या शक्तीलाच पराशक्ती परानंदनी असेसुद्धा म्हटले जाते. कविर्देवांनी सर्व आत्म्यांना आपल्यामधूनच आपल्या वचनशक्तीद्वारे आपल्याच मानव शरीरसारखे उत्पन्न केले. प्रत्येक हंस आत्म्याची परमात्म्याच्या शरीरासारखी रचना केली, ज्याचे तेज सोळा सूर्यांइतके प्रकाशित मानवसदृशच आहे; परंतु परमेश्वराच्या शरीराच्या एक रोम (शरीरातील केस) कूपाचा (रंध्र) प्रकाश कोटी सूर्यापेक्षाही अधिक आहे. बऱ्याच कालावधीनंतर क्षर पुरुषाने (ज्योति निरंजन) विचार केला, की आपण तिघेही (अचिंत, अक्षर पुरुष व क्षर पुरुष) एकाच द्वीपामध्ये वास्तव्य करतो, तर दुसरे प्रत्येकी वेगवेगळ्या स्वतंत्र द्वीपामध्ये वास्तव्य करत आहेत. मीसुद्धा साधना करून स्वतंत्र द्वीप प्राप्त करून घेईन. हा विचार करून क्षर पुरुषाने एका पायावर उभे राहून सत्तर युगे तप केले.

## ''जीवात्मे कालच्या महाभयंकर जाळ्यात कसे फसले?''

विशेष :- जेव्हा ब्रह्म (ज्योति निरंजन) ७० युगे एका पायावर उभे राहून तप करत होता, तेव्हा ज्योति निरंजनच्या एकवीस ब्रम्ह्मांडांमध्ये वास्तव्य करणारे सर्व आत्मे काल ब्रह्मच्या साधनेवर (तप) आसक्त झाले आणि हृदयापासुन त्याला पसंत करू लागले. यामुळे मूळ सुखदायी प्रभू कबीर साहेबांपासून (कविर्देव) ते विमुख होत गेले. त्यामुळे सर्व आत्मे पतिव्रता पदापासून (एकनिष्ठतेपासून) परावृत्त झाले. त्यावेळी पूर्ण प्रभू कविर्देवांनी (कबीर साहेब) वारंवार सावध करूनही आपली क्षर पुरुषावरील (काल ब्रह्म) आसक्ती ढळली नाही. {आजही हाच प्रभाव या कालसृष्टित दिसून येत आहे. अभिनेता किंवा अभिनेत्री रोजगाराच्या दृष्टीने चित्रपटात अभिनय करत असतात आणि तरुणवर्ग त्यांच्या खोट्या अभिनयामुळे त्यांच्याकडे आकृष्ट होतो. कितीही प्रयत्न केला तरी ते त्यापासून परावृत्त होत नाहीत. एखादा अभिनेता किंवा अभिनेत्री जवळच्या एखाद्या शहरामध्ये आले, तर त्यांना निव्वळ बघण्यासाठी हा तरुणवर्ग गर्दी करतो. त्याच्याशी अभिनेत्याचे काहीही देणे-घेणे नसते. केवळ पैसा कमावणे हाच त्याचा उद्देश असतो. तो अभिनेता काम करून आपला उद्देश साध्य करतो आणि इकडे हे तरुण त्यांना फक्त बघण्यासाठी आपला वेळ आणि पैसा वाया घालवत बसतात. आई-वडिलांनी कितीही समजावून सांगितले, तरी त्यांना काहीही फरक पडत नाही. माता-पित्यांना काहीही कळू न देता गुपचूप ते तिकडे जातात, हे कळूनसुद्धा येत नाही. अगदी अशाच प्रकारे सर्व आत्मे काल ब्रह्मवर आसक्त झाले आहेत. त्यामुळे आपण परमात्म्याच्या (कविर्देव) प्रेमाला पारखे झालो आहोत.}

तुला काय पाहिजे आहे सांग, असे पूर्ण ब्रह्म कविर्देवांनी (कबीर प्रभू) क्षर पुरुषाला (काल ब्रह्म) विचारले, तेव्हा तो म्हणाला, की पिताजी, हे स्थान माझ्यासाठी कमी पडत आहे. कृपया मला स्वतंत्र द्वीप प्रदान करावे. त्यावेळी हक्का कबीरांनी (सत्कबीर) त्याला २१ ब्रह्मांडे प्रदान केली. काही कालावधीनंतर ज्योति निरंजनाला (काल) असे वाटायला लागले, की या रिक्त २१ ब्रह्मांडांत काही तरी रचना करायला पाहिजे. ही रिकामी बह्मांडे (प्लॉट) काय कामाची? यासाठी त्याने पुन्हा ७० युगे एका पायावर उभे राहून तप केले आणि परमात्मा कविर्देवांकडे (कबीर प्रभू) रचना सामग्रीची याचना केली. सत्पुरुष कविर्देवांनी त्याला त्रिगुण आणि पंचतत्त्वे प्रदान केली. त्यांच्या सहाय्याने ब्रह्मने (ज्योति निरंजन) आपल्या २१

ब्रह्मांडांमध्ये काही रचना केल्या. नंतर त्याला वाटले, की या विशाल ब्रह्मांडांमध्ये काही जीव असणे गरजेचे आहे. आपले एकट्याचे मन येथे रमत नाही. याचा विचार करून ब्रह्मने (ज्योति निरंजन) पुन्हा ६४ युगे तप केले. पूर्ण परमात्मा कबीरदेवांनी विचारल्यावर म्हणाला, की पिताजी, मला काही जीवात्मे पाहिजे आहेत. माझ्या एकट्याचे येथे मन लागत नाही. तेव्हा सत्पुरुष कविरग्नी (कबीर परमेश्वर) म्हणाले, की हे ब्रह्मा, तुझ्या तपाचे फळ म्हणून मी तुला आणखी ब्रह्मांडे देऊ शकतो; परंतु कोणत्याही जप–तपाच्या साधनेचे फळ म्हणून माझे आत्मे कदापि देणार नाहीत. पण जर कोणास (आत्म्यास) स्वेच्छेने तुझ्याबरोबर जायचे असेल, ते जाऊ शकतील. युवा कविरांचे (समर्थ कबीर साहेब) शब्द ऐकताच ज्योति निरंजन आपल्याजवळ (आत्म्यांच्या समीप) आला. आपण सर्व आत्मे पहिल्यापासून त्याच्यावर आसक्त झालेलो होतो. तो जवळ येताच, त्याला चारी बाजूंनी घेरून उभे राहिलो. ज्योति निरंजनाने सांगितले, की, मी पित्याकडून तपबळावर दुसरी स्वतंत्र २१ ब्रह्मांडे प्राप्त केलेली आहेत. तेथे नाना प्रकारची रमणीय स्थळे निर्माण केली आहेत. तुम्ही माझ्याबरोबर येणार काय? आज २१ ब्रह्मांडांतील आपण दुःखी, कष्टी आत्मे आहोत ते सर्व त्यावेळी म्हणाले, की जर पिताजींची आज्ञा असेल, तर आम्ही तयार आहोत. क्षर ब्रह्म (काल निरंजन) लगेच पूर्ण ब्रह्म महान–कविर् (समर्थ कबीर प्रभू) यांच्याकडे गेला आणि सर्व वार्ता ऐकवली. कविर्देव (कबीर परमेश्वर) म्हणाले, की माझ्या समक्ष स्वीकृती देणाऱ्यांनाच (हंस आत्म्यांना) मी आज्ञा देईन. क्षर पुरुष व परम अक्षर पुरुष (कविरमितौजा=कविर अमित औजा म्हणजे ज्याची शक्ती चा कोणताही अंत नाही, ते कबीर) दोघेही आम्हा सर्व हंसात्म्यांजवळ आले. सत्कविर्देव म्हणाले, की जे हंसात्मे ब्रह्मसोबत (काल निरंजन) जाऊ इच्छितात, त्यांनी हात वर करून स्वीकृती द्यावी. आपल्या परमपित्यासमोर एकाही हंसात्म्याची तसे करण्याची हिंमत झाली नाही. कोणीही जाण्याची स्वीकृती दिली नाही. बराच वेळ एकदम शांतता पसरली. त्यानंतर एक हंसात्मा धाडस करून म्हणाला, की पिताजी, मी ब्रह्मसोबत जाऊ इच्छितो. त्याची स्वीकृती पाहून एक–एक करत आपण सर्व आत्म्यांनी (जे आज काल ब्रह्मच्या २१ ब्रह्मांडांमध्ये कैद आहेत.) स्वीकृती दिली. परमेश्वर कबीर साहेब ज्योति निरंजनाला म्हणाले, की तू तुझ्या स्थानी जा. ज्यांनी तुझ्याबरोबर येण्याची स्वीकृती दिली आहे, त्या सर्व हंसाम्यांना मी तुझ्याकडे पाठवून देईन. ज्योति निरंजन २१ ब्रह्मांडांत निघून गेला. या वेळेपर्यंत ही सर्व २१ ब्रह्मांडे सत्लोकामध्येच समाविष्ट होती. तेथे आपणा सर्वांना जन्म–मरण, रोग, परिश्रम इत्यादी काहीही नव्हते. सर्वकाही विनासायास मूळ मालक पूर्ण ब्रह्म कविर्देव पुरवत होते. येथे या २१ ब्रह्मांडांत येऊन मूळ मालक सत्पुरुष कविर्देवांनी वेळोवेळी सावध करूनही आपल्या चुकीने क्षरपुरुषावर (ज्योति निरंजनावर) मोहित होऊन शाश्वत कविर्देवांच्या (कबीर साहेबांच्या) पवित्र पतिव्रता धर्माचा आपणाला विसर पडला आणि त्यात आपले पतन झाले आहे. (जे या ब्रह्मांडातील देव, यक्ष, गंधर्व, मानव, पित्र, भूत, पशुपक्षी या सर्व ८४ लक्ष योनींतील आत्मे) त्या सत्लोक धामापासून दूर गेल्याने कालच्या कैदेत कष्टी झालेले आहेत. हेच सत्य ज्ञान आपणाला समजले नसल्यामुळे आपण भावनेच्या भवसागरात करोडो युगांपासून गटांगळ्या खात आहोत.

त्यानंतर पूर्ण ब्रह्मनी (कबीर साहेब) सर्वप्रथम स्वीकृती देणाऱ्या हंस आत्म्याला मुलगीचे (स्त्री) रूप दिले; परंतु तिच्यात स्त्री इद्रियाची रचना केली नाही. तिला शब्दशक्ती व तीन गुण प्रदान केले. सर्व आत्म्यांना (ज्यांनी ज्योति निरंजनसोबत जाण्यास सहमती दिली होती) त्या कन्येच्या शरीरात प्रवेशित केले. त्या कन्येचे नाव 'आष्ट्रा' (आदिमाया/प्रकृतिदेवी/दुर्गा) असे पडले. परमात्मा कबीरदेव तिला म्हणाले, की पुत्री, मी तुला शब्दशक्ती प्रदान केली आहे. ब्रह्म

(काल) जेवढे जीव मागेल, तेवढे तू मी तुला दिलेल्या शब्दशक्तीद्वारे उत्पन्न करून देत जा. पूर्ण ब्रह्म कविर्देवांनी (कबीरसाहेब) आपला पुत्र सहजदास याच्यासोबत प्रकृतीला क्षरपुरुषाकडे पोहोचवले. सहजदासजींनी ज्योति निरंजनाला सांगितले, की हे निरंजन, परमपित्याने या तुझ्या भगिनीच्या (बहिणीच्या) देहातून तुझ्याबरोबर येण्यास स्वीकृती दिलेले सर्व हंस आत्मे समाविष्ट केले आहेत आणि तिला दिलेल्या शब्दशक्तीद्वारे ती तुला जितके जीव पाहिजे असतील, तितके उत्पन्न करून देईल. हे सर्व सांगितल्यावर सहजदास परत आपल्या द्वीपामध्ये गेला.

तरुण असल्यामुळे त्या कन्येचे रंगरूप खुलून आले होते. त्यामुळे ब्रह्ममध्ये (निरंजन) विषय वासना उत्पन्न झाली. तेव्हा दुर्गादेवी (प्रकृति) त्याला म्हणाली, की हे ज्योति निरंजन, मला परमपित्यांनी (कविर्देव) शब्दशक्ती प्रदान केलेली आहे. तू जेवढे प्राणी मागशील, तेवढे मी शब्दशक्तीने उत्पन्न करून देईन. तूसुद्धा त्याच पित्याच्या शब्दशक्तीने अंड्यातून उत्पन्न झालेला आहेस आणि मी तुझ्यानंतर उत्पन्न जरी झाले असले, तरी मीसुद्धा त्याच परमपित्याच्या वचन (शब्द) शक्तीनेच उत्पन्न झालेली आहे. त्यामुळे तू माझा मोठा भाऊ आहेस. भाऊ-बहिणीच्या नात्याच्या मर्यादेविरुद्धचा हा योग (कर्म) महापापाचे कारण बनेल; परंतु ज्योति निरंजनाने प्रकृतिदेवीची एकही प्रार्थना ऐकली नाही. त्याने तिची विनंती ऐकली नाही. त्यावेळी प्रकृतिदेवीने अब्रुरक्षणासाठी दुसरा कोणताही पर्याय नसल्यामुळे सूक्ष्मरूप धारण केले आणि निरंजनाच्या उघड्या तोंडातून त्याच्या पोटात प्रवेश केला आणि पूर्ण ब्रह्म कविर्देवांना आपल्या रक्षेसाठी अंतर्साद घालून याचना केली. त्याच वेळी कविर्देव आपला पुत्र योगजित अर्थात योगसंतायन याचे रूप धारण करून प्रकट झाले आणि आपल्या कन्येला ब्रह्मच्या उदरातून बाहेर काढले. त्यावेळी त्यांनी ज्योति निरंजनाला सांगितले, की हे ज्योति निरंजना, आजपासून तुला 'काल' या नावाने संबोधले जाईल आणि तू क्षर पुरुष होशील म्हणजेच तुझे जन्म-मृत्यू होत राहतील. तसेच या तुझ्या दुष्टपणाचे फळ म्हणून तू दररोज एक लाख मानव देहधारी प्राण्यांचा आहार करशील व सव्वा लक्ष नव्याने उत्पन्न करशील. तुम्हा दोघांनाही या २१ ब्रह्मांडांसह सत्लोकामधून बाहेर काढून टाकले जाईल. त्यांनी एवढे सांगितल्यावर ती २१ ब्रह्मांडे विमानासारख्या गतीने सहजदासाच्या द्वीपाजवळून जात बाजूला गेली. सत्लोकापासून (सत्धाम) १६ संख कोस (एक कोस म्हणजे सुमारे तीन किलोमीटर) अंतरावर येऊन स्थिर झाली.


विशेष विवरण :- आतापर्यंत या सृष्टिरचनेमध्ये तीन शक्तींचे विवरण आलेले आहे.

१. पूर्ण ब्रह्म :- यांना इतर उपमात्मक नावांनीही ओळखले जाते. सत्पुरुष, अकालपुरुष, शब्दस्वरूपी राम, परम अक्षर ब्रह्म किंवा परम अक्षर पुरुष आदी नावांनी यांना संबोधले जाते. हे पूर्ण ब्रह्म असंख्य ब्रह्मांडांचे स्वामी आहेत, तसेच ते वास्तवामध्ये अविनाशी आहेत.

२. परब्रह्म :- यांना अक्षरपुरुष नावानेही संबोधले जाते. वास्तवात हे अविनाशी नाहीत. केवळ सात संख बह्मांडांचे ते स्वामी आहेत.

३. ब्रह्म :- हा केवळ २१ ब्रह्मांडाचा मालक असून, याला ज्योतिनिरंजन, काल, कैल, क्षर पुरुष, धर्मराय आदी नावांनी संबोधले जाते. तो २१ ब्रह्मांडामध्ये अव्यक्त रूपात राहतो. आता यापुढे याच ब्रह्मच्या सृष्टितील एका ब्रह्मांडाची ओळख करून दिली जाईल ज्यामध्ये ब्रह्मा, विष्णू आणि शिवशंकर ही आणखी नावे तुमच्या वाचनात येतील.

# एक ब्रह्मण्ड चे लघु चित्र



## ''ब्रह्म आणि ब्रह्मा यांच्यातील फरक''

एका ब्रह्मांडातील सर्वोपरी (सर्वात वरच्या) स्थानावर ब्रह्म (क्षर पुरुष, ज्योति निरंजन) स्वत: तीन गुप्त स्थानांची रचना करून तेथे तो ब्रह्मा, विष्णू व शिव या रूपांत वास्तव्य करतो. तसेच आपली पत्नी प्रकृती (दुर्गा) हिच्या सहयोगाने तीन पुत्रांची उत्पत्ती करत असतो. त्यांची नावे ब्रह्मा, विष्णू व शिव अशीच ठेवतो. त्यातील ब्रह्मचा (काल) मुलगा 'ब्रह्मा' केवळ एकाच ब्रह्मांडातील तीन लोकांमधील (पृथ्वीलोक, स्वर्गलोक, पाताळलोक) रजोगुण विभागाचा मंत्री (स्वामी) आहे. त्यांना त्रिलोकीचे ब्रह्मा म्हटले जाते. तसेच ज्योति निरंजन (काल) जो ब्रह्मलोकी 'ब्रह्मा' रूपामध्ये वास्तव्य करतो, त्यालाच महाब्रह्मा आणि ब्रह्मलोकीचा ब्रह्मा म्हटले जाते.

त्याच बह्मला (काल) सदाशिव, महाशिव, महाविष्णू अशा नावांनी सुद्धा संबोधले जाते.

श्री विष्णु पुराणात प्रमाण : चौथा अंश अध्याय १ पान संख्या २३०–२३१ वर श्री ब्रह्मा म्हणतात की, ज्या अमर सर्वांचा विधाता परमेश्वराविषयी सुरुवात, शेवट, मध्य, स्वरुप, स्वभाव व सार आम्ही समजु शकत नाही. (श्लोक ८३)

परिस्थिनुसार जो पुरुष माझे रुप धारण करुन संसाराची रचना करतात. रुद्राचे रुप धारण करुन संपुर्ण विश्वाचा नाश करतो व संपुर्ण जगतात अनंत रुप धारण करुन राहतात. (श्लोक ८६)

## ''श्री ब्रह्माजी, श्री विष्णूजी, श्री शिवजी यांची उत्पत्ती''

एकवीस ब्रह्मांडांसह आल्यानंतर काल (ब्रह्म) प्रकृतिदेवीला (दुर्गा) म्हणाला, की आता माझे कोण व काय वाकडे करणार आहे? माझ्या जे मनात येईल ते मी करू शकतो. यावर देवीने (दुर्गा) प्रार्थना केली, की तुम्ही जरा तरी लाजलज्जा बाळगा. पूर्ण परमात्मा कविर्देवांच्या शब्दशक्तीने तुमची व माझीही उत्पत्ती झाली आहे. त्यामुळे तुम्ही माझे मोठे भाऊ आहात. त्यानंतर आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे दुसऱ्या वेळेला त्याच पूर्ण परमात्याने मला तुमच्या उदरातून (पोटातून) निष्कासित केले (बाहेर काढले). त्यामुळे मी तुमची मुलगी आहे आणि तुम्ही माझे पिता आहात. या पवित्र नात्यांना छेद दिल्यामुळे महापाप घडेल. कविर्देवांनी प्रदान केलेल्या शब्दशक्तीने (वचनशक्ती) जेवढे जीव तुम्ही मागाल, तेवढे मी उत्पन्न करून देईन; पण ज्योतिनिरंजनाने तिची एकही विनंती ऐकली नाही. मला जी शिक्षा मिळणार होती, ती मिळाली आहे. त्यामुळे मला सत्लोकातून हद्दपारही केलेले आहे. आता मी येथे मनमानी करणार, असे म्हणून प्रकृतिदेवीशी (दुर्गा, माया, आष्ट्रा.) जबरदस्तीने विवाह केला आणि तीन पुत्रांची (रजोगुणयुक्त – ब्रह्मा, सत्गुणयुक्त–विष्णू आणि तमोगुणयुक्त–शिवशंकर) उत्पत्ती केली; परंतु या तिन्ही पुत्रांना तरुण होईपर्यंत दुर्गामातेद्वारे अचेत (बेशुद्ध) करून ठेवले. तरुणावस्थेत आल्यानंतर श्री ब्रह्मांना कमळाच्या कोमल पुष्पावर, श्री विष्णूंना शेषनागाच्या शय्येवर आणि श्री शिवांना कैलास पर्वतावर सचेत करून एकत्र आणले. त्यानंतर प्रकृतीद्वारे (दुर्गा) या तिघांचा विवाह करून एकाच ब्रह्मांडातील तीन लोकांमधील (स्वर्ग, मृत्यू, पाताळ) एक–एक विभागाचे मंत्री म्हणून नियुक्त केले. श्री ब्रह्मा रजोगुण विभागाचे, विष्णू सत्गुण विभागाचे आणि शिवशंकर तमोगुण विभागाचे मंत्री (प्रभू) करून स्वत: मात्र (काल) गुप्त रूपात (महाब्रह्मा, महाविष्णू आणि महाशिव) मुख्यमंत्रिपदाचे समायोजन करतो. तसेच ब्रह्मने (काल) एका ब्रह्मांडामध्ये बह्मलोकाची रचना करून त्यामध्ये तीन गुप्तस्थानांची निर्मिती केली आहे. त्यापैकी एक रजोगुणप्रधान आहे. तेथे हा ब्रह्म (काल) स्वतः महाब्रह्मा (मुख्यमंत्री) रूपामध्ये

वास्तव्य करतो आणि आपली पत्नी दुर्गा हिला महासावित्री रूपामध्ये ठेवतो. या स्थानावर या दोघांपासून जो पुत्र उत्पन्न होतो, तोही रजोगुणी प्रभावयुक्त असतो. दुसरे स्थान सत्गुणप्रधान बनविलेले आहे. या स्थानावर ब्रह्म (क्षर पुरुष) स्वतः महाविष्णू रूप धारण करून वास्तव्य करतो आणि तेथेही आपली पत्नी दुर्गा हिला महालक्ष्मी रूपात ठेवतो. त्यांच्यापासून ज्या पुत्राची उत्पत्ती होते, त्याचे विष्णू असे नाव ठेवले जाते. हा विष्णू सत्गणप्रधान स्थानी उत्पन्न झाल्यामुळे तोही सत्गुणयुक्त असतो. तिसऱ्या स्थानी कालने (बह्म) तमोगुणप्रधान क्षेत्राची रचना केली आहे. तेथे तो स्वत: सदाशिव रूप धारण करून पत्नी दुर्गा हिला महापार्वती रूपामध्ये ठेवतो. यांच्यापासून जो पुत्र निर्माण होतो, तो तमोगुणी असतो आणि त्याचे नाव शिव असे ठेवले जाते. (याच्या प्रमाणासाठी गीता प्रेस, गोरखपूर येथून प्रकाशित हिंदी अनुवादकर्ता श्री. हनुमान प्रसाद पोद्दार यांच्या पवित्र श्री शिव महापुराण, रुद्रसंहितेच्या सहाव्या, सातव्या व नवव्या अध्यायातील पान नं.१०० व अनुवादकर्ता श्री. हनुमानप्रसाद पोद्दार–चिमणलाल गोस्वामी यांच्या पवित्र श्रीमद् देवी भागवत महापुराणातील तिसऱ्या स्कंदामधील पान नं. ११४ ते १२३ पर्यंत पाहा.) पुढे या तिन्ही पुत्रांना गाफिल (धोक्यात) ठेवून कालाला मिळालेल्या शापाप्रमाणे दररोज एक लाख जीवांचा आहार करण्यासाठी आणि सव्वा लाख जीव नव्याने उत्पन्न करण्यासाठी श्री ब्रह्माद्वारे जीवांची उत्पत्ती, श्री विष्णूद्वारे मायाममतेच्या जाळ्यात ठेवून काल जाळ्यामध्ये फसवून ठेवतो आणि श्री शिवाद्वारे संहार करतो. कारण काल ब्रह्मला शापामुळे एक लाख मानव देहधारी प्राण्यांच्या सूक्ष्मशरीरापासून मळ काढून आहार करायचा असतो. त्यासाठी २१ व्या ब्रह्मांडामध्ये जेथे काल पुरुष राहतो, तेथे धगधगणारी तप्त शिला (जसा चुलीवर मोठा तवा) असून त्यावर मानव सूक्ष्मदेहधारी जीव भाजून, वितळवून त्यावरील गंध, मळ याचा काल (ज्योति निरंजन) आहार करतो. त्यावेळी जीव मरत नाही; परंतु त्याला अत्यंत असहाय कष्ट, यातना सहन कराव्या लागतात. त्यानंतर पुढे ज्या–त्या जीवाच्या कर्माधारावर काल ब्रह्म आत्म्याला दुसरे शरीर (८४ लक्ष योनी) प्रदान करतो. एखाद्या घरात तीन खोल्या असतील आणि पहिल्या खोलीत अश्लील चित्रे लावलेली असतील, तर तेथे मलिन, अपवित्र विचार मनात येतील. दुसऱ्या खोलीत साधुसंतांची चित्रे लावलेली असतील, तर तेथे मनामध्ये सद्विचार उमटतील आणि प्रभुचिंतनही होत राहील. तिसऱ्या दालनात देशभक्त आणि शहीद हुतात्म्यांच्या प्रतिमा लावलेल्या असतील, तर तेथे जहाल, रक्त गरम करणारे विचार उत्पन्न होतील. अगदी अशाचप्रकारे ब्रह्मने (काल) जाणूनबुजून विचार करून या तीन गुणांनीयुक्त स्थानांची रचना केलेली आहे.

## ''काय आहेत त्रिगुण? प्रमाणासहित''

त्रिगुण :– रजोगुण (ब्रह्माजी), सत्गुण (विष्णूजी), तमोगुण (शिवजी) हे त्रिगुण आहेत. हे तिन्ही गुण ब्रह्म (काल) आणि प्रकृती (दुर्गा) यांच्यापासून उत्पन्न झालेले आहेत. तसेच हे तिन्ही नाशवान आहेत.

१) प्रमाण :– श्री. हनुमान प्रसाद पोद्दार यांनी संपादित केलेल्या व गीता प्रेस, गोरखपूर येथून प्रकाशित झालेल्या 'श्री शिवमहापुराण'मधील पान नं.११०, ९ वा अध्याय, रुद्रसंहिता : अशाप्रकारे ब्रह्मा, विष्णू आणि शिव या तीन देवांमध्ये गुण आहेत; परंतु शिव (ब्रह्म–काल) सांबसदाशिव गुणातीत म्हटला गेला आहे.

२) प्रमाण :– श्री. हनुमान प्रसाद पोद्दार चिमनलाल गोस्वामी यांनी संपादित केलेल्या व गीता प्रेस, गोरखपूर येथून प्रकाशित झालेल्या 'श्रीमद देवी भागवतपुराण'मधील ३ ऱ्या

स्कंदातील ५ व्या अध्यायातील पान नं.१२३ वर भगवान विष्णूंनी दुर्गादेवीची स्तुती केली, की मी (विष्णू), ब्रह्मा, तसेच शंकर तुमच्याच कृपेने विद्यमान आहे. आम्हा तिघांचा अविर्भाव (जन्म), तसेच तिरोभाव (मृत्यु) होतो. आम्ही तिघे नित्य (अविनाशी) नाही. तूच नित्य आहेस, जगज्ञननी प्रकृती आणि सनातनदेवी आहेस. भगवान शंकर म्हणतात, की जर भगवान ब्रह्मा, तसेच भगवान विष्णू तुझ्यापासून उत्पन्न झाले आहेत तर त्यांच्यानंतर उत्पन्न झालेला मी, तमोगुणी लीला करणारा शंकर काय, तुझी संतान (पुत्र) नाही का झालो? अर्थात, मलाही उत्पन्न करणारी तूच आहेस. या संसाराच्या सृष्टि-स्थिती-संहारामध्ये तुझेच गुण सदासर्वदा आहेत. याच तिन्ही गुणांपासून उत्पन्न मी (शंकर), ब्रह्मा, विष्णु नियमानुसार कार्यतत्पर असतो.

हे विवरण केवळ हिंदीमध्ये अनुवादित आहे ज्यामध्ये काही तथ्ये लपवलेली आहेत, त्या 'श्री देवी श्रीमदेवीभागवत महापुराणा'मधील आहे. त्यासाठी हेच प्रमाण (गोपनीय) श्रीमद देवी भागवत महापुराण सभाषाटिकम् समहात्यम्, खेमराज श्री कृष्णदास प्रकाशन, मुंबई यामध्ये संस्कृतसहित हिंदी अनुवाद केलेल्या पुस्तकात आहे. ३ ऱ्या स्कंदातील ४ थ्या अध्यायातील ४२ वा श्लोक, पृष्ठ नं. १0.

ब्रह्मा : अहम् ईश्वर : फिल ते प्रभावात्सर्वे वयं जनि युता न यदा तू नित्या:,
के अन्ये,सुरा: शतमुख प्रमुखा: च नित्या नित्या त्वमेव जननी प्रकृति: पुराणा (४२)।

अनुवाद : हे माते! ब्रह्मा, मी (विष्णू), तसेच शिव तुझ्याच प्रभावाने जन्मवान आहोत; पण आम्ही नित्य नाही. अर्थात, आम्ही अविनाशी नाही. मग अन्य इंद्रादी व दुसऱ्या देवता कशा काय नित्य असतील? तूच अविनाशी आहेस, प्रकृती तसेच सनातनी देवी आहेस. (४२)

५ व्या अध्यायातील ८ वा श्लोक,पृष्ठ नं. ११-१२

यदि दयार्द्रमना न सदांऽबिके कथमहं विहित:च तमोगुण:
कमलजश्च रजोगुण संभव: सुविहित: किमु सत्वगुणों हरि:। (८)

अनुवाद :- भगवान शंकर म्हणाले, की हे माते! जर आमच्यावर तुम्ही दयायुक्त अहात, तर मला तमोगुणी का बनविले? कमळातून उत्पन्न झालेल्या ब्रह्मास रजोगुणी का बनविले आणि विष्णूस सत्‌गुणी का बनविले? अर्थात, आमच्या त्रिगुणमयी प्रभावामुळे जीवांना जन्म-मरणरूपी दुष्कर्मांमध्ये का अडकवलेस? (८)

श्लोक १२ :- रमयसे स्वपतिं पुरुषं सदा तव गतिं न हि विह विद्म शिवे (१२)

अनुवाद :- ''आपला पतिपुरुष अर्थात काल भगवानसोबत सदा तू भोगविलास करत असतेस. तुझी गती कोणीही जाणू शकत नाही. (१२)

निष्कर्ष :- या प्रमाणांवरून हे सिद्ध होते, की रजोगुण-ब्रह्मा, सत्‌गुण-विष्णू, तसेच तमोगुण-शिव हे तिघेही नाशवान आहेत. दुर्गेचा पती ब्रह्म (काल) हा तिच्याशी भोगविलास करतो.

## ''ब्रह्मची (काल) अव्यक्त राहण्याची प्रतिज्ञा''

### सुक्ष्म वेदानुसार उर्वरीत सृष्टीरचना........

रजोगुण-ब्रह्मा, सत्‌गुण-विष्णू व तमोगुण-शंकर या तिन्ही पुत्रांच्या उत्पत्तीनंतर पत्नी दुर्गा (प्रकृती) हिला ब्रह्म (काल) म्हणाला, की भविष्यामध्ये मी कोणालाही माझ्या वास्तविक रूपामध्ये दर्शन देणार नाही. त्यामुळे मी अव्यक्त मानला जाईन. तू माझे हे रहस्य कोणालाही सांगू नकोस. मी गुप्त राहणार आहे. यावर दुर्गा म्हणाली, की आपण आपल्या पुत्रांनाही दर्शन

देणार नाही का? ब्रह्म म्हणाला, की मी आपल्या पुत्रांना, तसेच इतर कोणालाही कोणतीही साधना केली तरी दर्शन देणार नाही आणि हा माझा अटळ निर्णय आहे. तेव्हा दुर्गा म्हणाली, की ज्यामुळे आपल्या पुत्रांपासूनसुद्धा लपून राहावे लागेल, तो तुमचा निर्णय योग्य नाही. यावर काळ (ब्रह्म) म्हणाला, की दुर्गा, ही माझी विवशता आहे. मला एक लाख मानव शरीरधारी प्राण्यांचा आहार करण्याचा शाप लागलेला आहे. जर माझ्या पुत्रांना (ब्रह्मा, विष्णू, महेश) हे समजले, तर ते उत्पत्ती, स्थिती आणि संहार ही कार्ये करणार नाहीत. यासाठीच या माझ्या अनुत्तम निर्णयात कोणताही बदल होणार नाही. जेव्हा हे तिघेही बाल्यावस्थेत थोडे मोठे होतील, तेव्हा त्यांना अचेत (चेतनाहीन) कर. त्यांना माझ्याविषयी काहीच सांगू नकोस, नाहीतर मी तुलाही दंड देईन. कालच्या या भीतीने दुर्गा वास्तविकता सांगत नाही. म्हणूनच गीतेच्या सातव्या अध्यायातील २४ व्या श्लोकामध्ये म्हटले आहे, की हा बुद्धिहीन जनसमुदाय मला, अव्यक्त मनुष्य रूपामध्ये आलेला अर्थात 'कृष्ण' असे मानतात.

(अबुद्धय:) बुद्धि हीन (मम्) माझ्या अनुत्तम अर्थात अश्रेष्ठ नीच (अव्ययम्) अविनाशी (परमभावम्) विशेष भावास (अजानन्त:) न जानता (माम् अव्यक्तम्) मला अव्यक्ताला (व्यक्तिम्) मनुष्य रूपामध्ये (आपन्नम्) आलेला (मन्यन्ते) मानतात अर्थात मी कृष्ण नाही. **(गीतेच्या ७ व्या अध्यायातील २४ वा श्लोक)**

गीतेच्या ११ व्या अध्यायातील ४७ व ४८ व्या श्लोकांमध्ये म्हटले आहे, की है माझे वास्तविक 'काल' रूप आहे. याचे दर्शन अर्थात ब्रह्मप्राप्ती वेदांमध्ये वर्णन केलेल्या विधीने, जपाने, तपाने अथवा अन्य कोणत्याही क्रियेने होऊ शकणार नाही.

जेव्हा तिन्ही बालक युवाअवस्थेत आले, त्यावेळी, माता भवानी (प्रकृती, अष्टांगी) म्हणाली, की तुम्ही सागरमंथन करा. पहिल्या वेळी सागरमंथन केले, तेव्हा चारही वेद निर्माण झाले. (ज्योति निरंजनाने आपल्या श्वासाद्वारे चार वेद उत्पन्न केले आणि त्यांना गुप्तवाणीद्वारे सागरात राहण्याची आज्ञा दिली होती.) ते वेद ब्रह्माने घेतले. सागरमंथनातून ज्या वस्तू बाहेर पडल्या, त्या घेऊन तिघे जेव्हा माता दुर्गाकडे आले, तेव्हा ते म्हणाले, की हे चारही वेद ब्रह्मा स्वतःकडे ठेवू दे व वाचू दे.

टीप :– वास्तविक पूर्ण ब्रह्मंनी (कबीर साहेबांनी) ब्रह्मला अर्थात काळला पाच वेद प्रदान केले होते; परंतु ब्रह्मने केवळ चार वेदच प्रकट केले. पाचवा वेद लपवून ठेवला (गुप्त राखला). हा पाचवा वेद (सूक्ष्मवेद) स्वत: परमेश्वरांनी प्रगट होऊन 'कविर्गिभीः' म्हणजेच कर्विवाणीद्वारे (कबीर वाणी) लोकोक्ती व दोहे या माध्यमांतून प्रगट केलेला आहे.

दुसऱ्या वेळी जेव्हा सागरमंथन केले, तेव्हा त्यातून तीन कन्या प्राप्त झाल्या. मातेने त्या कन्या तिघांमध्ये (ब्रह्मा, विष्णू, महेश) वाटून दिल्या. प्रकृतिने (दुर्गाने) आपलीच अन्य तीन रूपे (सावित्री, लक्ष्मी आणि पार्वती) धारण करून समुद्रात लपवलेली होती. तीच रूपे सागर मंथनावेळी बाहेर आली. तीच प्रकृती तीन रूपांत प्रगट झाली, तसेच भगवान ब्रह्मांना सावित्री, भगवान विष्णूंना लक्ष्मी आणि भगवान शंकरांना पार्वती अशा पत्नी रूपात प्रदान केली. तिघांनी भोगविलास करून सुर आणि आसुर दोघांनाही उत्पन्न केले.

{जेव्हा तिसऱ्या वेळी सागरमंथन केले, तेव्हा चौदा रत्ने ब्रह्माला, अमृत विष्णू आणि देवतांना, मद्य (दारू) आसुरांना दिले, तसेच विष परमार्थ शिवने आपल्या कंठामध्ये स्थिर केले. ही तर फार नंतरची गोष्ट आहे.} जेव्हा ब्रह्मा वेदांचे वाचन करू लागले, तेव्हा त्यांना समजले, की सर्व ब्रह्मांडांचा रचनाकार, सृजनहार, कुळाचा स्वामी, मालक पुरुष (प्रभू) हा तर कोणी

**वेगळाच आहे. तेव्हा ब्रह्माने विष्णू व शंकरांना सांगितले, की वेदांमध्ये वर्णन आले आहे, की सृष्टीचा सृजनहार (रचनाकार) कोणी वेगळाच आहे; परंतु वेद म्हणतात, की याचे रहस्य आपणालासुद्धा माहीत नाही. यासाठी संकेत दिला आहे, की फक्त कोणत्या तरी तत्त्वदर्शी संताला विचारा. तेव्हा ब्रह्मा आपली माता प्रकृतिकडे आले आणि सर्व वृत्तांत सांगितला. माता प्रकृती नेहमी म्हणत असे, की माझ्याशिवाय आणखी कोणीही नाही. मीच कर्ता धरता आहे. मीच सर्वशक्तिमान आहे. त्यावेळी ब्रह्मा प्रकृतिदेवीस म्हणाले, की हे वेद ईश्वरकृत आहेत, हे असत्य असूच शकणार नाहीत. यावर दुर्गादेवीने सांगितले, की तुझे पिता तुला कधीच दर्शन देणार नाहीत. त्यांनी तशी शपथ घेतली आहे. हे ऐकून ब्रह्मा म्हणाले, की माते, आता आपल्या बोलण्यावर माझा विश्वासच बसत नाही. मी त्या पुरुषाचा (प्रभू) ठावठिकाणा शोधूनच काढेन. दुर्गा म्हणाली, की जर त्याने तुला दर्शन दिले नाही, तर तू काय करशील? ब्रह्मा म्हणाले, की असे झाले तर मी माझे तोंडसुद्धा तुला दाखविणार नाही. दुसरीकडे ज्योति निरंजनाने शपथ घेतली आहे, की मी कोणालाही दर्शन देणार नाही म्हणजेच एकवीस ब्रह्मांडांमध्ये कधीही आपल्या वास्तविक रूपामध्ये, आकारामध्ये येणार नाही.**

**गीतेच्या ७ व्या अध्यायातील २४ वा श्लोक**

अव्यक्तम्, व्यक्तिम, आपन्नम्, मन्यन्ते, माम्, अबुद्धय:।
परम्, भावम्, अजानन्त:, मम, अव्ययम्, अनुत्तमम् ।।२४।।

अनुवाद : (अबुद्धय:) बुद्धिहीन लोक (मम्) माझ्या (अनुत्तमम्) अश्रेष्ठ (अव्ययम्) अटळ (परम्) परम (भावम्) भावास (अजानन्त:) न जाणता (अव्यक्तम्) अदृश्यमान (माम्) मला काळला (व्यक्तिम्) आकार रूपामध्ये कृष्णावतार (आपन्नम्) झालेला आहे (मन्यन्ते) असे मानतात.

**गीतेच्या ७ व्या अध्यायातील २५ वा श्लोक**

न अहम्, प्रकाश: सर्वस्य, योगमायासमावृत:।
मूढ: अयम्, न अभिजानाति, लोक:, माम, अजम्, अव्ययम् ।।२५।।

अनुवाद : ''(अहम्) मी (योगमाया समावृत्त:) योगमायेने लपलेला (सर्वस्य) सर्वांच्या (प्रकाश:) प्रत्यक्ष (न) येत नाही. अर्थात, अदृश्य राहतो. यामुळे (अजम्) जन्म न घेणाऱ्या (अव्ययम्) अविनाशी अटळ भावास (अयम्) हे (मूढ:) अज्ञानी (लोक:) जनसमुदाय संसार (माम्) मला (न्) न (अभिजानाति) जाणता म्हणजेच मला अवतार रूपामध्ये आलो आहे असे समजतात; कारण ब्रह्म आपल्या शब्दशक्तीने आपली नाना रूपे धारण करत असतो. तो दुर्गादेवीचा पती असल्यामुळेच या मंत्रामध्ये म्हटले आहे, की मी श्रीकृष्ण, राम आदींसारखा दुर्गेपासून जन्म घेत नाही.

## ''आपला पिता (काल/ब्रह्मच्या) प्राप्तीसाठी ब्रह्माचे प्रयत्न''

**त्यावेळी माया (त्रिदेवजननी दुर्गा) ब्रह्माला म्हणाली, की अलखनिरंजन तुझे पिता आहेत; परंतु ते तुला दर्शन देणार नाहीत. ब्रह्मा म्हणाला, की मी त्यांचे दर्शन घेऊनच परत येईन. माता म्हणाली, की जर तुला त्यांचे दर्शन झाले नाही तर तू काय करशील? ब्रह्मा म्हणाला मी शपथ घेतो की, असे झाले तर मी तुझ्यासमोर येणार नाही. (तोंड दाखविणार नाही.) हे बोलुन ब्रह्मा व्याकुळ होऊन उत्तर दिशेला चालु लागला जेथे भयानक अंधार आहे. तेथे ब्रह्माने चार युगे ध्यान लावले परंतु त्याला काहीच प्राप्त झाले नाही. त्यावेळी कालने आकाशवाणी केली, की जिवांची उत्पती का नाही केली? भवानी म्हणाली, की आपला ज्येष्ठ पुत्र ब्रह्मा हट्ट धरून आपल्या शोधार्थ गेलेला आहे. ब्रह्माशिवाय सर्व कार्य अशक्यच आहे. ब्रह्मने**

(काळ) सांगितले, की त्याला परत बोलवून घे. मी त्याला दर्शन देणार नाही. तेव्हा दुर्गादेवीने (प्रकृती) आपल्या शब्द शक्तीने 'गायत्री' नावाची कन्या उत्पन्न केली आणि तिला ब्रह्माला परत घेऊन येण्यास सांगितले. गायत्री ब्रह्माजवळ गेली; परंतु ब्रह्मा समाधी अवस्थेत होते. येथे कोणीतरी आलेले आहे, याचा त्यांना कोणताही आभास झाला नाही. तेव्हा आदिमायेने (प्रकृती) ध्यानाद्वारे गायत्रीस सांगितले, की ब्रह्माच्या चरणांना स्पर्श कर. त्याप्रमाणे गायत्रीने आचरण केले. चरणांना स्पर्श होताच ब्रह्मांचा ध्यान भंग झाला आणि क्रोधित होऊन ते म्हणाले, की माझा ध्यानभंग करणारी तू कोण पापीणी आहेस? मी तुला शाप देतो. यावर गायत्री म्हणाली, की यात माझा काही दोष नाही. शाप देण्यापूर्वी माझी बाजू ऐकून घ्या. तुमच्याशिवाय जीवांची उत्पत्ती होऊ शकत नसल्यामुळे मला तुमच्या मातेने तुम्हाला परत घेऊन येण्यास पाठविले आहे. ब्रह्मा म्हणाले, की मला अजूनही पित्याचे दर्शन झालेले नाही; मग मी परत कसा जाऊ? मी जर असाच परत गेलो तर माझी नाचक्की होईल. जर मला माझ्या पित्याचे (ज्योति निरंजन) दर्शन झालेले आहे आणि ते मी माझ्या डोळ्यांनी बघितले आहे, असे तू माझ्या मातेला सांगणार असशील, तरच मी तुझ्यासमवेत येईन. तेव्हा गायत्री ब्रह्मांना म्हणाली, की जर तुम्ही माझ्याबरोबर शारिरीकसंबंध बनवीण्यास तयार असाल तरच मी तुमची खोटी साक्ष देईन. ब्रह्माने विचार केला, की आपल्याला पित्याचे दर्शन तर झालेलेच नाही. आपण जर असेच मातेसमोर गेलो, तर आपण कोणतीही प्रतिक्रिया देऊ शकणार नाही. त्यामुळे दुसरा कोणताही पर्याय नाही हे पाहून ब्रह्माने गायत्रीच्या विनंतीस मान्यता दिली.

गायत्री म्हणाली, की आपण आणखी एक साक्षीदार तयार केला तर? ब्रह्मालाही तिचा विचार पटला. तेव्हा गायत्रीने आपल्या शब्द शक्तीद्वारे एक कन्या (पुहपवती) उत्पन्न केली. ते दोघे तिला म्हणाले, की ब्रह्माला पित्याचे दर्शन झालेले आहे, अशी तूसुद्धा खोटी साक्ष दे. पुहपवती म्हणाली, की मी का खोटी साक्ष देऊ? जर ब्रह्मा माझ्याबरोबर शारिरीकसंबंध बनवीण्यास तयार असेल तरच मी खोटी साक्ष देईन. ब्रह्मा याला तयार होईना, तेव्हा गायत्रीने याशिवाय दुसरा कोणताच मार्ग नाही, अशी त्याची समजूत घातली आणि ब्रह्माने त्याला मान्यता दिली. नंतर तिघे मिळून माता आदिमायेजवळ (प्रकृती) आले. दोन्ही देवींनी या अटी एवढ्यासाठीच घातल्या होत्या, की जर ब्रह्माने मातेसमक्ष आपण खोटी साक्ष देत आहे असे सांगितले तर माता आपणाला शाप देईल. यासाठीच त्यालाही दोषी बनविले होते.

(येथे गरीबदासजी महाराज म्हणतात, की ''दास गरीब यह चूक धुरों धुर'')

## ''माता (दुर्गा) कडून ब्रह्माला शाप''

ब्रह्मा, गायत्री व पुहपवती माता प्रकृती/दुर्गाकडे आले. मातेने ब्रह्माला विचारले, की तुला तुझ्या पित्याचे दर्शन झाले? त्यावेळी ते तिघेही म्हणाले, की होय, आम्ही आमच्या डोळ्यांनी पित्यांचे दर्शन घेतले. याचा माता भवानीला (प्रकृती) संशय आला. ब्रह्मने (काल) तर तिला सांगितले होते, की तो कोणालाही दर्शन देणार नाही आणि हे म्हणत आहेत, की दर्शन झाले.याचा ती विचार करू लागली. शेवटी अष्टांगीने ध्यान लावले आणि ज्योति निरंजनाला (काल) विचारले, की हे तिघे बोलतात ते खरे आहे काय? ज्योति निरंजन म्हणाला, की ते तिघे जण खोटे बोलत आहेत. तेव्हा माता भवानी म्हणाली, की तुम्ही तिघेही खोटे बोलत आहात. त्यावेळी यांना कोणतेही दर्शन झालेले नाही, अशी आकाशवाणी झाली. ते ऐकून ब्रह्मा व्याकुळतेने म्हणाला, की माते, मी शपथ घेऊन पित्याच्या शोधार्थ गेलो होतो; परंतु मला पित्याचे दर्शन झाले नाही. त्यामुळे मला तुझ्यासमोर यायची लाज वाटत होती म्हणून आम्ही

खोटे बोललो. तेव्हा माता दुर्गा म्हणाली, की आता मी तुम्हास शाप देते.

**ब्रह्माला दिलेला शाप :** ''तुझी या जगात पूजा होणार नाही. पुढे तुझे वंशज पाखंड करतील. खोट्या गोष्टींची रचना करून जगाला फसवतील. तुझे वंशज वरून कर्मकांड करताना दिसतील; पण त्यांच्या मनामध्ये अनेक विकार असतील. कथा, पुराणे वाचून दाखवतील. स्वत:ला सद्ग्रंथांमध्ये वास्तविकता काय आहे, याचे ज्ञान नसताना मानसन्मान आणि धनप्राप्तीसाठी गुरू बनून अनुयायांना (शिष्यांना) लोकवेद (शास्त्रविरुद्धच्या दंतकथा) ऐकवतील. देवदेवतांची पूजा करून आणि करवून घेऊन, दुसऱ्यांची निंदा करून स्वत: कष्टावर कष्ट झेलत बसतील. जे त्यांचे अनुयायी-शिष्य होतील, त्यांना ते परमार्थ सांगणार नाहीत. दक्षिणेसाठी जगाला चुकीच्या मार्गाने फिरवतील. स्वत:ला सर्वश्रेष्ठ मानतील आणि दुसऱ्यांना कमी लेखतील. जेव्हा मातेच्या मुखातून हे सर्व ऐकले, तेव्हा ब्रह्मा मूर्च्छित होऊन जमिनीवर कोसळला आणि दीर्घ काळानंतर शुद्धीवर आला.

**गायत्रीला दिलेला शाप :** अनेक सांड (बैल) तुझे पती होतील. तू मृत्युलोकी गाय बनून जन्म घेशील.

**पुहपवतीला दिलेला शाप :** गलिच्छ, उकिरड्याच्या ठिकाणी तुझी जागा असेल. तुझ्या फुलांचा कोणत्याही पूजेसाठी वापर केला जाणार नाही. तुझ्या या खोट्या साक्षीमुळे तुला नरक भोगावा लागेल. तुझे नाव केवडा केतकी असेल. (केवडयांच्या फुलांचे वृक्ष महाराष्ट्रात आहेत. हरियाणामध्ये त्याला 'कुसोंधी' असे म्हटले जाते. ते गलिच्छ जागी, उकिरड्यावर उगवते.)

त्या तिघांना असे शाप दिल्यानंतर माता भवानीला अत्यंत पश्चात्ताप झाला. {अशाप्रकारे जीवात्मा कोणताही विचार करता मनाच्या (काल निरंजन) प्रभावाने चुकीचे कार्य करतो, परंतु जेव्हा आत्म्याच्या (सतपुरुषाचा अंश) प्रभावाने सत्यज्ञान होते, तेव्हा मग पश्चात्ताप सहन करावा लागतो. माता-पिता आपल्या मुलाच्या लहानशा चुकीसाठी त्याला रागाने बोलतात आणि नंतर मात्र त्यांना अत्यंत पश्चात्ताप होतो. हीच प्रक्रिया मनाच्या (काल निरंजन) प्रभावाने सर्व जीवांमध्ये कार्यरत आहे.} येथे आणखी एक बाब विशेष आहे, की निरंजनानेसुद्धा (काल, ब्रह्म) कायदा केला आहे, की जर कोणी जीवाने दुर्बल जीवाला त्रास दिला, तर त्याला त्याची परतफेड नक्कीच करावी लागते. जेव्हा आदिभवानीने (प्रकृती, अष्टांगी) ब्रह्मा, गायत्री व पुहपवती यांना शाप दिला, तेव्हा अलख निरंजनही (ब्रह्म-काल) म्हणाला, की हे भवानी (प्रकृती/अष्टांगी), तू हे उचित, बरोबर केले नाहीस. यासाठी आता मी (निरंजन) तुलाही शाप देतो, की द्वापार युगामध्ये तुझे पाच पती होतील. (द्रौपदी ही आदिमायेचा अवतार झालेली आहे.) जेव्हा अशी आकाशवाणी ऐकली, तेव्हा आदिमाया म्हणाली, की हे ज्योति निरंजना, काहीही झाले तरी मी तुलाच वश आहे. त्यामुळे तुला जे वाटेल ते तू कर.

{सृष्टिरचने मध्ये दुर्गाचे अन्य नावांना वारंवार लिहण्याचा उद्देश आहे कि, पुराण, गिता तसेच वेदांमध्ये प्रमाण पाहते वेळेस भ्रम उत्पन्न होउ नये. जसे गिता अध्याय १४ श्लोक ३-४ मध्ये काल ब्रह्म ने म्हटले आहे कि प्रकृति तर गर्भ धारण करणारी सर्व जिवांची माता आहे. मि तीच्या गर्भात बिज स्थापन करणारा पिता आहे. श्लोक ४ मध्ये म्हटले आहे कि प्रकृती पासुन तिन्ही गुणातील जिवात्मांना कर्माच्या बंधनात बांधले जाते. (लेख समाप्त).

ह्या प्रकरणात प्रकृती तर दुर्गा आहे तसेच तिन्ही गुणांचे तिन्ही देवता म्हणजेच रजगुण ब्रह्मा, सतगुण विष्णु तसेच तमगुण शिव चे सांकेतीक नाव आहे.}

## ''विष्णूचे आपले पिता (काल/ब्रह्मच्या) प्राप्तीसाठी प्रस्थान आणि मातेचा आशीर्वाद प्राप्त करणे''

त्यानंतर दुर्गेने (प्रकृती) विष्णूला सांगितले, की पुत्रा, तूसुद्धा आपल्या पित्याचा शोध घे. तेव्हा विष्णू आपले पिता ब्रह्मचा (काल) शोध घेत पाताळ लोकी पोहोचला, जेथे शेषनाग होता. विष्णू आपल्या हद्दीत आल्याचे पाहून शेषनागाने क्रोधित होऊन विष्णूच्या शरीरावर विषाचा फुत्कार मारला. त्याच्या प्रभावाने विष्णूजींचा रंग (वर्ण) सावळा झाला. तेव्हा या नागाला चांगलाच धडा शिकवायला पाहिजे, असे विष्णूच्या मनात आले. हे जेव्हा ज्योति निरंजनाने पाहिले, तेव्हा त्याला वाटले, की आता विष्णूला शांत करायला पाहिजे आणि आकाशवाणी झाली, की हे विष्णू, आता तू तुझ्या मातेकडे जा आणि जे काही घडले आहे, त्याचे सत्यकथन कर, तसेच जो त्रास तुला शेष नागा पासून झालेला आहे, त्याचा प्रतिशोध तू द्वापार युगामध्ये घे. द्वापार युगामध्ये तू कृष्ण अवतार धारण करशील आणि कालिदहात (काली डोहात) कालिंद्री (कालिया) नावाने शेषनागाचा अवतार होईल.

ऊँच होई के नीच सतावै, ताकर ओएल (बदला) मोही सों पावे।
जो जीव देई पीर पुनी काँहु, हम पुनि ओएल दिवावें ताहूँ।।

तेव्हा विष्णू मातेकडे (दुर्गामाता) आले आणि त्यांनी मला पित्याचे दर्शन झालेले नाही, असे सत्य सांगितले. यावर आदिमाता (प्रकृती) अत्यंत प्रसन्न झाली आणि म्हणाली, की पुत्रा, तू सत्यवादी आहेस. आता मी आपल्या शक्तीने तुला तुझ्या पित्याशी भेट घालून देते. तसेच तूझ्या मनातील संशय नष्ट करते.

''कबीर, देख पुत्र तो हि पिता भीटाऊँ तौरे मन का धोखा मिटाऊँ।
मन स्वरूप कर्ता कह जानों, मन ते दुजा और न मानो।
स्वर्ग पाताल दौर मन केरा, मन अस्थीर मन अहै अनेरा।
निरंकार मनही को कहिए, मन की आस निश दिन रहिए।
देख हूँ पलटि सुन्य मह ज्योति, जहाँ पर झिलमिल झालर होती।।''

अशा प्रकारे मातेने (अष्टांगी, प्रकृती) विष्णूला सांगितले, की 'मन' हाच जगाचा कर्ता आहे. हाच ज्योति निरंजन आहे. ध्यानामध्ये ज्या हजार ज्योती नजरेस पडतात, तेच त्याचे रूप आहे. जो शंख, घंटा इत्यादींचा आवाज ऐकू येतो, तो महास्वर्गामध्ये निरंजनाचाच वाजत आहे. मातेने (अष्टांगी, प्रकृती) पुढे सांगितले, की पुत्रा, तू सर्व देवतांचा शिरोमणी आहेस. तुझी प्रत्येक कामना आणि कार्य मी पूर्ण करेन. सर्व जगतामध्ये तुझी पूजा होईल. याचे कारण तू जे काय आहे, ते सर्व सत्य सांगितले आहेस. कालच्या (ज्योति निरंजन) या ब्रह्मांडातील प्राण्यांना एक विशेष सवय आहे, की ते फक्त आपली व्यर्थ महिमा गातात. जसे दुर्गा विष्णूला म्हणत आहे, की तुझी जगामध्ये पूजा होईल. मी तुला तुझ्या पित्याचे दर्शन घडवेन. दुर्गा मातेने केवळ प्रकाश दाखवून विष्णूवर कृपा केले. श्री विष्णूही परमात्म्याचा केवळ प्रकाश दिसतो. परमात्मा निराकार आहे, अशी प्रभुची स्थिती आपल्या अनुयायांना समजावून सांगू लागले. त्यानंतर आदिभवानी रुद्राकडे (महेश) जाऊन म्हणाली, की महेश, तू सुद्धा आपल्या पित्याचा शोध घे. तुझ्या दोन्ही बंधूंना तुझ्या पित्याचे दर्शन झालेले नाही. त्यांना जे काही द्यायचे ते मी दिले आहे, तेव्हा आता तुला काय पाहिजे असेल ते माग. यावर महेश (शंकर) म्हणाले, की हे जननी, माझ्या दोन्ही ज्येष्ठ बंधूंना पित्याचे दर्शन झालेले नाही. त्यामुळे मी माझा प्रयत्न करणे व्यर्थ आहे. कृपया मला असा वर प्रदान कर, की मी अमर (मृत्युंजय) होईन. माता प्रकृती

म्हणाली, की पुत्रा, हे मी करू शकत नाही, परंतु मी एक युक्ती सांगू शकते, ज्यामुळे तुझे आयुष्य सर्वांपेक्षा जास्त होईल. ती युक्ती म्हणजे विधियोग आहे. (त्यामुळेच महादेव अधिकाधिक काल समाधी मध्ये राहतात.) अशाप्रकारे आदिमाया प्रकृतीने तिन्ही पुत्रांना सृष्टि रचनेच्या विभागांची वाटणी केली.

भगवान ब्रह्मांना काल लोकी ८४ लक्ष वस्त्रांची (शरीरे) रचना करण्याचे म्हणजेच रजोगुणाने प्रभावित करून संतान उत्पत्तीसाठी विवश करून जीव उत्पन्न करण्याचा विभाग प्रदान केला गेला. भगवान विष्णूंकडे उत्पन्न झालेल्या जीवांचे पालनपोषण करणे व मोह-ममता उत्पन्न करण्याची स्थिती कायम ठेवण्याचा विभाग प्रदान केला गेला.

भगवान शिव शंकरांकडे (महादेव) पिता ज्योति निरंजनास एक लक्ष मानव देहधारी जीव प्रतिदिन आहार करण्याचा शाप लागलेला असल्यामुळे संहार करण्याचा विभाग प्रदान केला.

येथे मनामध्ये एक प्रश्न उत्पन्न होतो, की ब्रह्मा, विष्णू आणि शंकर यांच्यापासून उत्पत्ती, स्थिती आणि संहार कशाप्रकारे होतो? ते तिघेही आपापल्या लोकामध्ये वास्तव्य करत असतात. जसे आजकाल संचारप्रणाली चालवण्यासाठी अवकाशात उपग्रह सोडले जातात आणि त्याद्वारे खाली पृथ्वीवर दूरदर्शन, इतर सेवा आदी संचारप्रणाली चालविली जाते, अगदी त्याचप्रकारे हे तिन्ही देव जेथे वास्तव्य करत असतील, तेथून त्यांच्या शरीरातून निघणारे सूक्ष्म गुणांचे तरंग तिन्ही लोकांमध्ये आपोआप प्रत्येक प्राण्यावर कायम प्रभाव ठेवतात.

हे विवरण एका ब्रह्मांडामधील ब्रह्मच्या (काल) रचनेचे आहे. क्षर पुरुषाची (काल) अशी एकवीस ब्रह्मांडे आहेत.

परंतु, क्षर पुरुष (काल) स्वतः व्यक्त म्हणजेच वास्तविक शरीर रूपामध्ये सर्वांसमक्ष येत नाही. त्याच्या प्राप्तीसाठी तीन देवांनाही (ब्रह्मा, विष्णू, शिव) वेदांमध्ये वर्णन आलेल्या विधीनुसार खडतर साधना करूनही ब्रह्मचे (काल) दर्शन झालेले नाही. तत्पश्चात ऋषींनी वेदांचे पठन केले. त्यात लिहिले आहे, की 'अग्नेः तनूर् असि' (पवित्र यजुर्वेदाच्या पहिल्या अध्यातील १५ वा मंत्र). परमेश्वर सशरीर आहे, तसेच पवित्र यजुर्वेदाच्या ५ व्या अध्यायातील पहिल्या मंत्रामध्ये वर्णन आहे, की 'अग्ने: तनुर् असि विष्णवे त्वा सोमस्य तनूर् असि.' या मंत्रांमध्ये वेद दोन वेळा साक्ष देत आहे, की सर्वव्यापक, सर्वांचा पालनकर्ता, सत्पुरुष सशरीर आहे. पवित्र यजुर्वेदाच्या ४० व्या अध्यायातील ८ व्या मंत्रामध्ये म्हटले आहे, की (कविर् मनिषी) ज्या परमेश्वराची सर्व प्राण्यांना अतिआस्था (इच्छा) आहे, ते 'कविर्' अर्थात कबीर आहेत. त्यांचे शरीर नाडीविना- नाडीरहित (अस्नाविरम्) आहे, ते (शुक्रम्) वीर्यापासून उत्पन्न झालेल्या, पंचतत्त्वांनी बनलेल्या भौतिक कायारहित (अकायम्) आहेत. ते सर्वांचे स्वामी 'सर्वोपरि' (सर्वांत वर) सत्यलोकामध्ये विराजमान आहेत. त्या परमेश्वराचे शरीर तेजःपुंज व (स्वज्योति) स्वयंप्रकाशित आहे, जे शब्दरूप अर्थात अविनाशी आहे. तेच कविर्देव (कबीर परमेश्वर) जे सर्व ब्रह्मांडांची रचना करणारे (व्यदधाता) सर्व बह्मांडांचे रचनाहार (स्वयम्भू:) स्वयं प्रगट होणारे (यथा तश्य अर्थान्) वास्तवामध्ये (शाश्वत्) अविनाशी आहेत (गीता अध्याय १५ श्लोक १७ मध्येही प्रमाण आहे.) भावार्थ असा, की पूर्ण ब्रह्मच्या शरीराचे नाव 'कबीर' (कविर्देव) आहे. त्या परमेश्वराचे शरीर नूर (तेज) तत्त्वाने बनलेले आहे. परमात्म्याचे शरीर अतिसूक्ष्म आहे आणि ते त्याच साधकाला दिसते, ज्याची दिव्य दृष्टी उघडलेली आहे. अशाप्रकारे जीवाचेही सूक्ष्म शरीर आहे, ज्यावर पाच तत्त्वांचे वेष्टन (आवरण) आहे म्हणजेच पंचतत्त्वांची काया चढलेली आहे आणि ते माता-पिता यांच्या संयोगाने (शुक्रम्) वीर्याने बनलेले आहे. शरीराचा त्याग केल्यानंतरही जीवाचे सूक्ष्म शरीर सोबतच राहते. ते शरीर त्याच साधकाला दृष्टीस पडते, ज्याची

दिव्यदृष्टी उघडलेली आहे. परमात्मा व जीव यांची स्थिती अशाप्रकारेच समजून घ्यावी. वेदामध्ये 'ओऽम' नामाच्या स्मरणाचे प्रमाण आहे, ते केवळ ब्रह्म साधना आहे. या उद्देशाने 'ओऽम' नामाच्या जपास पूर्ण ब्रह्मचे मानून ऋषींनी हजारो वर्षे हठयोग (समाधी लावून) करून प्रभूच्या प्राप्तीची चेष्टा (प्रयत्न) केली. त्यांना सिद्धी प्राप्त झाल्या, परंतु प्रभूचे दर्शन झाले नाही. याच सिद्धिरूपी खेळण्याने खेळून ऋषीसुद्धा जन्म–मृत्यूच्या चक्रामध्ये (८४ लक्ष योनींमध्ये) अडकले. त्यांना जे अनुभव आले, त्यानुसार त्यांनी आपल्या शास्त्रामध्ये परमात्याचे निराकार असे वर्णन केले आहे. ब्रह्मने (काळ) शपथ घेतली आहे, की मी आपल्या वास्तविक रूपामध्ये कोणालाही दर्शन देणार नाही. मला सर्व जण अव्यक्त समजतील. (अव्यक्तचा भावार्थ आहे, की कोणी आकार स्वरूपात आहे, परंतु व्यक्तिगत रूपाने स्थूल रूपामध्ये दर्शन देत नाही. आकाशामध्ये ढग जमा झाल्यावर दिवसाही सूर्य अदृश्य होतो म्हणजेच आपणाला तो दिसत नाही, परंतु वास्तवामध्ये तो ढगांच्या पलीकडे जसा आहे तसाच आहे. या अवस्थेला अव्यक्त असे म्हणतात). (प्रमाणासाठी गीतेच्या ७ व्या अध्यायातील २४ व २५ वा श्लोक आणि ११ व्या अध्यायातील ४८ व ३२ वा श्लोक)


पवित्र गीतेचे ज्ञान देणारा ब्रह्म (काल) श्रीकृष्णाच्या शरीरात प्रेतवत प्रवेश करून म्हणत आहे, की हे अर्जुना, मी मोठा झालेला काल आहे आणि सर्वांना खाण्यासाठी आलो आहे. (गीतेच्या अकराव्या अध्यायातील ३२ वा श्लोक). हे माझे वास्तविक रूप आहे. हे रूप तुझ्याव्यतिरिक्त पूर्वी कोणी पाहिलेले नाही आणि तुझ्यानंतर इथून पुढे कोणी पाहू सुद्धा शकणार नाही. अर्थात वेदांमध्ये वर्णन असलेल्या यज्ञ–तप–जप, तसेच ओऽम नाम आदी विधींनीही माझ्या या वास्तविक स्वरूपाचे दर्शन होऊ शकणार नाही. (गीतेच्या अकराव्या अध्यायातील ४८ वा श्लोक). मी कृष्ण नाही. हे मूर्ख लोक मला अव्यक्तास कृष्ण रूपामध्ये व्यक्त (मनुष्यरूप) मानत आहेत, कारण ते माझ्या नीच (अनुचित) नियमांपासून अपरिचित आहेत. मी कधीही माझ्या या वास्तविक काल रूपामध्ये सर्वांसमक्ष येत नाही. मी आपल्या योगमायेद्वारे गुप्त (लपून) राहतो. (गीता अध्याय ११ चा श्लोक २४–२५) विचार करा :– आपण लपून राहणाऱ्या विधानाला स्वतः अश्रेष्ठ (अनुत्तम) का म्हणत आहेत?

जर पिता आपल्या मुलांना दर्शन देत नसेल, तर त्याच्यात कोणती तरी कमतरता आहे. तो सुविधाही प्रदान करतो पण गुप्तही राहतो. कालला (ब्रह्म) शापामुळे एक लाख मानव शरीरधारी प्राण्यांचा आहार करावा लागतो, तसेच प्रतिदिन २५ टक्के जे अधिक उत्पन्न होतात, त्यांची स्थिती सुरळीत राखण्यासाठी, तसेच कर्मभोगाचा दंड देण्यासाठी ८४ लक्ष योनींची रचना केलेली आहे. जर सर्वांसमक्ष येऊन एखाद्याची मुलगी, मुलगा, पत्नी, आई–वडील यांना तो भक्षण करू लागला, तर सर्वांना ब्रह्मची घृणा वाटू लागेल. तसेच जेव्हा कधी पूर्ण परमात्मा कविर्देव (कविरग्नि, कबीर परमेश्वर) स्वतः येतील किंवा आपला कोणी संदेशवाहक (दूत) पाठवतील, तेव्हा सर्व प्राणी सत्यभक्ती करून कालच्या जाळ्यातून निघून जातील. त्यामुळे हे आत्मे सत्लोकी जाऊ नयेत म्हणून कालब्रह्म फसवून, धोका देऊन येथे मृत्युलोकात ठेवतो.


त्यामुळे गीतेच्या ७ व्या अध्यायातील १८, २४ व २५ व्या श्लोकांमध्ये त्याने आपल्या साधनेपासून मिळणारी मुक्ती (गती) ही (अनुत्तमाम्) 'अति अश्रेष्ठ' अगदी हीन दर्जाची आहे असे म्हटले आहे. तसेच त्याने आपल्या विधानालाही (नियम) अश्रेष्ठ (अनुत्तम) म्हटले आहे.

प्रत्येक बह्मांडामध्ये कालने एका महास्वर्गाची निर्मिती केली आहे. त्या महास्वर्गामध्ये एका स्थानी प्रकृतीद्वारे (दुर्गा/आदिमाया) प्राण्यांना धोक्यामध्ये ठेवण्यासाठी नकली सत्लोक, नकली अलखलोक, नकली अगमलोक आणि नकली अनामीलोक यांची रचना केलेली आहे.

# ब्रह्म लोकाचे लघु चित्र



# ज्योति निरंजन (काल) ब्रह्म चे लोक (२१ ब्रह्मण्ड) चे लघु चित्र



**कबीर साहेबांचा एक शब्द आहे, की 'कर नैनों दीदार महल में प्यारा है' मध्ये वाणी आहे, की** 'काया भेद किया निरवारा, यह सब रचना पिण्ड मंझारा है। माया अविगत जाल पसारा, सो कारीगार भारा है। आदिमाया किन्ही चतुराई, झुठी बाजी पिण्ड दिखाई, अविगत रचना रचि अण्ड माहि वाका प्रतिबिम्ब डारा है।'

**एका ब्रह्मांडामध्ये श्री ब्रह्माजींचा लोक, श्री विष्णूजींचा लोक आणि श्री शिवजींचा लोक अशी अन्य लोकांचीही रचना आहे. तेथे विराजित होऊन हे तिन्ही प्रभू खालील तीन लोकांत (स्वर्गलोक म्हणजेच इंद्रलोक, पृथ्वीलोक आणि पाताळलोक) प्रत्येकी एकेक विभागाचे स्वामी बनून प्रभुत्व करतात आणि आपल्या पित्याच्या (काल) आहारासाठी मानव प्राण्यांची उत्पत्ती, स्थिती आणि संहार यांचा कार्यभार सांभाळतात. या तिन्ही प्रभूंचाही जन्म व मृत्यू होत असतो. जेव्हा त्यांचा मृत्यू होतो, तेव्हा काल त्यांनाही भक्षण करतो. याच ब्रह्मांडमध्ये (यालाच 'अंडे' असेसुद्धा म्हटले जाते. कारण ब्रह्मांडाची रचना अंडाकार आहे. याला 'पिंड' असेही संबोधले जाते; कारण शरीरामध्ये (पिंड) एका ब्रह्मांडाची रचना कमळांमध्ये टीव्हीसारखी (संदेश लहरी) पाहिली जाते.) एक मानसरोवर आणि धर्मरायाचाही (न्यायाधीश) लोक आहे, तसेच जसे प्रत्येक देशाचे राजदूत भवन असते, अशा एका गुप्त स्थानी पूर्ण परमात्मा अन्य रूप धारण करून वास्तव्य करतात. तेथे कोणीही जाऊ शकत नाही. ज्यांची सत्लोकीची भक्ती अपूर्ण राहिलेली आहे, ते आत्मे तेथे राहतात. जेव्हा भक्तियुग येतो त्यावेळी कबीर परमेश्वर आपल्याकडुन आपला प्रतिनिधी म्हणजे पूर्ण संत सद्गुरू या पृथ्वीवर पाठवितात या पुण्यात्म्यांना पृथ्वीवर मानव शरीर प्राप्त होते आणि ते शीघ्रतेने सत्यभक्तीस लागतात व त्यांना पूर्ण मोक्ष प्राप्त होतो. या स्थानावरून ते परत मृत्युलोकी येत नाहीत. या स्थानी वास्तव्य करणाऱ्या हंस आत्म्यांची निजभक्तीची कमाई खर्च होत नाही. परमात्म्याच्या भंडारातून त्यांना सर्व सुविधा उपलब्ध होत असतात. ब्रह्मच्या (काल) उपासकांची मात्र भक्तीची कमाई स्वर्ग-महास्वर्ग यांमध्ये समाप्त होते; कारण या काल लोकामध्ये (ब्रह्मलोक), तसेच परब्रह्म लोकामध्ये प्राण्यांना आपण केलेल्या कर्मांचे फळ तेवढेच मिळते.**

**क्षर पुरुषाने (ब्रह्म) आपल्या वीस ब्रह्मांडांचे चार महाब्रह्मांडांमध्ये विभाजन केलेले आहे. प्रत्येक महाब्रह्मांडामध्ये पाच ब्रह्मांडांचा एक समूह बनविला आहे. तसेच ते चारी बाजूंनी अंडाकार वर्तुळात (परिघ) स्थिर केले आहे. याप्रमाणे चारही महाब्रह्मांडांनाही अंडाकार वर्तुळात (परिघ) स्थिर केले आहे. राहिलेल्या एकविसाव्या ब्रह्मांडाची रचना एका महाब्रह्मांडाएवढे क्षेत्र घेऊन केलेली आहे. या एकविसाव्या ब्रह्मांडामध्ये प्रवेश होताच, पुढे तीन रस्ते बनविले आहेत. या ब्रह्मांडामध्येही डाव्या बाजूला नकली सत्लोक, नकली अलखलोक, नकली अगमलोक आणि नकली अनामीलोक यांची रचना आदिमायेद्वारे (दुर्गा) प्राण्यांना धोक्यामध्ये ठेवण्यासाठी निर्माण केली आहे. उजव्या बाजूला बारा सर्वश्रेष्ठ ब्रह्म साधकांना (भक्तांना) हा ब्रह्म ठेवतो. नंतर प्रत्येक युगामध्ये त्यांना आपला संदेश वाहक (संत, सद्गुरू) बनवून पृथ्वीवर पाठवितो. ते पृथ्वीवर शास्त्रविधिरहित साधना व ज्ञान सांगतात आणि स्वत:ही भक्तिहीन होतात आणि आपल्याबरोबर ते अनुयायांनाही कालच्या जाळ्यामध्ये फसवतात. त्यानंतर ते गुरू व त्यांचे शिष्य दोघेही नरकामध्ये जातात. त्यानंतर पुढे एक मोठे कुलूप आहे. तो रस्ता कालच्या (ब्रह्म) निजलोकी जातो. तेथे हा ब्रह्म (काल) आपल्या वास्तविक मानवसदृश कालरूपामध्ये वास्तव्य करत असतो. या स्थानावर एका दगडापासून बनलेला तवा (तप्तशिला) असतो, जो नेहमी लोहारा सारखा रसरसलेला असतो. ज्यावर एक लाख मानव शरीरधारी प्राण्यांचे सूक्ष्म शरीर भाजून त्यातून विकारी घाण काढुन तो प्रतिदिन खातो. त्यावेळी सर्व प्राण्यांना अत्यंत पीडा**

सहन कराव्या लागतात आणि तेथे हाहाकार माजतो. काही कालावधीनंतर ते जीव बेशुद्ध होतात; परंतु त्यांचा मृत्यू होत नाही. नंतर धर्मरायाच्या लोकामध्ये गेल्यावर कर्माधारावर त्यांना अन्य जन्म प्राप्त होतो. त्यांचा जन्म–मृत्यूचा फेरा सतत चालू राहतो. समोर लावलेले कुलूप ब्रह्म (काल) केवळ ज्यांचा आहार करायचा आहे, त्या प्राण्यांसाठी काही क्षण उघडतो. असे जरी असले, तरी पूर्ण परमात्म्याच्या सत्यनाम व सारनामाने हे कुलूप आपोआप उघडले जाते. असे हे काळचे जाळे (महाभयंकर चक्रव्यूह) स्वतः पूर्ण परमात्मा कबीर साहेबांनी आपला भक्त धर्मदासजी यांना समजावून सांगितले.

## ''परब्रह्मच्या सात संख ब्रह्मांडांची स्थापना''

कबीर परमेश्वरांनी (कविर्देव) पुढे सांगितले आहे, की परब्रह्मने (अक्षर पुरुष) कार्यात चूक केली आहे व तो मानसरोवरामध्ये झोपला, तसेच जेव्हा परमेश्वराने (मी अर्थात कबीर साहेबांनी) या सरोवरामध्ये अंड सोडले, तेव्हा अक्षर पुरुषाने (परब्रह्म) त्या अंड्याकडे क्रोधाने बघितले. या दोन्ही अपराधांमुळे त्यालाही सात संख ब्रह्मांडांसह सत्लोकातून बाहेर निष्कासित केले. दुसरे कारण म्हणजे अक्षर पुरुष (परब्रह्म) आपला साक्षीदार, सोबती ब्रह्मपासून (क्षरपुरुष) वेगळा झाल्यामुळे व्याकुळ होऊन परमपिता कविर्देवांना (कबीर परमेश्वर) विसरला आणि केवळ ब्रह्मच्याच आठवणीत गुंतला. तसेच त्याला असेही वाटले, की क्षर पुरुष (ब्रह्म) तर तिकडे आनंदात राहत असणार आणि आपणच पाठीमागे राहिलो. तसेच परब्रह्मसोबत जे सात संख ब्रह्मांडांमध्ये अन्य काही आत्मे जन्म–मृत्यूचा कर्मदंड भोगत आहेत, जे ब्रह्मबरोबर (काळ) एकवीस ब्रह्मांडांमध्ये फसलेले आहेत आणि पूर्ण परमात्म्याचे त्यांना विस्मरण झाले आहे, त्या हंसात्म्यापासून वेगळे (ताटातूट) झाल्याच्या दु:खात (आठवणीत) तो बुडाला. परमेश्वर कविर्देवांनी वारंवार समजावून सांगूनही त्यांच्याबद्दलची त्याची आस्था कमी झाली नाही. परब्रह्मने (अक्षर पुरुष) स्वतंत्र स्थान प्राप्त करणेच योग्य होईल, असा विचार करून राज्यप्राप्तीच्या इच्छेने सारनामाचा जप सुरू केला. अशाप्रकारे अन्य आत्म्यांनी (जे परब्रह्मच्या सात संख्य ब्रह्मांडांमध्ये फसलेले आहेत.) विचार केला, की जे आत्मे ब्रह्मसोबत गेले आहेत ते तेथे मौजमजा करणार आणि आपण मात्र येथे मागे राहिलो. परब्रह्मच्या मनाची अशी धारणा झाली, की क्षर पुरुष स्वतंत्र होऊन अत्यंत सुखी असेल. हा विचार करून त्याने अंतरात्म्यापासून भिन्न स्थान प्राप्त करण्याचे ठरविले. परब्रह्मने (अक्षर पुरुष) हठयोग केला नाही; परंतु स्वतंत्र राज्यप्राप्तीसाठी सहजतेने ध्यानयोग विशेष तळमळतेने करू लागला. स्वतंत्र स्थान प्राप्त करण्यासाठी तो वेड्यासारखा विचार करू लागला. त्याने अन्नपाण्याचा त्याग केला. अन्य काही आत्मे त्याच्या वैराग्यावर आसक्त झाले आणि तो त्यांना आवडू लागला. पूर्ण प्रभूंनी (कबीर साहेब) विचारल्यावर परब्रह्मने स्वतंत्र स्थानाची मागणी केली, तसेच काही हंसात्म्यांना आपल्याबरोबर नेण्याची इच्छा व्यक्त केली. ज्या आत्म्यांची तुझ्याबरोबर जाण्याची इच्छा असेल, त्यांना पाठवून देतो, असे कविर्देवांनी सांगितले. जे कोण आत्मे परब्रह्मसोबत जाऊ इच्छितात, त्यांनी आपली सहमती व्यक्त करावी, असे पूर्ण प्रभूंनी विचारले. बऱ्याच कालावधीनंतर एका हंसाने स्वीकृती दिली. नंतर त्याच्यापाठोपाठ एकेक करत त्या सर्वच आत्म्यांनी सहमती व्यक्त केली. सर्वप्रथम स्वीकृती देणाऱ्या हंसात्म्याला परमात्म्याने स्त्री रूप दिले आणि तिचे नाव 'ईश्वरी माया' (प्रकृति सुरती) असे ठेवले. बाकीच्या आत्म्यांना त्या ईश्वरी मायेमध्ये प्रवेशित केले आणि अचिंत्यद्वारे अक्षर पुरुषाकडे (परब्रह्म) पाठविले. (पतिव्रता पदापासून (निष्ठा) ढळल्याची त्यांना शिक्षा मिळाली.)

अनेक युगे ईश्वरी माया व परब्रह्म दोघेही सात संख ब्रह्मांडांमध्ये एकत्र राहिले. त्या

काळात परब्रह्मने कोणतेही गैरवर्तन केले नाही. त्याने ईश्वरी मायेच्या स्वच्छेने तिचा अंगीकार केला आणि आपल्या शब्दशक्तीने नखांनी स्त्री इन्द्रीय (योनी) बनवली व ईश्वरी देवीच्या सहमतीने संतान उत्पत्ती केली. यामुळेच परब्रह्मच्या लोकातील (सात संख ब्रह्मांडांतील) प्राण्यांना तप्तशिलेवरील भयंकर कष्ट नाहीत. तसेच तेथे ब्रह्मलोकीच्या देवांपेक्षाही पशुपक्षीसुद्धा अधिक चारित्र्यसंपन्न आहेत. तेथील प्राण्यांचे आयुष्यसुद्धा दीर्घ आहे; परंतु जन्म-मृत्यूच्या कर्मधारावर कर्मदंड आणि परिश्रम करूनच उदरपूर्ती होते. स्वर्ग आणि नरकही असेच बनलेले आहेत. परब्रह्मला (अक्षर पुरुष) सात संख ब्रह्मांडे त्याच्या सारनामाच्या इच्छारूपी भक्तिध्यान अर्थात सहज समाधी विधीद्वारे मिळवलेल्या कमाईचे प्रतिफल म्हणून प्रदान केलेली आहेत आणि सत्यलोकापेक्षा भिन्न स्थानावर गोलाकार परिघामध्ये (वर्तुळाकार अदृश्य कवचामध्ये) कविर्देवांनी बंदिस्त करून सात संख ब्रह्मांडांसह अक्षर ब्रह्म व ईश्वरी माया यांना सत्यलोकातून निष्कासित केले आहे.

सत्यलोक आदीमध्ये जी असंख्य ब्रह्मांडे आहेत त्यांचे, ब्रह्मची २१ ब्रह्मांडे आणि परब्रह्मची सात संख ब्रह्मांडे या सर्वांचे प्रभू (स्वामी, मालक) पूर्ण ब्रह्म (सत्पुरुष) आहेत. अर्थात, परमेश्वर कविर्देव (कबीरसाहेब) हे सर्व कुळाचे स्वामी (प्रभू) आहेत.

श्री ब्रह्मा, श्री विष्णू आणि श्री शिव यांच्याकडे चार-चार भुजा (हात) आणि सोळा कला आहेत, तर प्रकृतिदेवीकडे (दुर्गा) आठ भुजा (हात) आणि ६४ कला आहेत. ब्रह्मकडे (क्षरपुरुष) एक हजार भुजा आणि एक हजार कला आहेत. तसेच तो २१ ब्रह्मांडांचा प्रभू आहे. परब्रह्मकडे (अक्षरपुरुष) दहा हजार भुजा आणि दहा हजार कला आहेत. तसेच तो सात संख ब्रह्मांडांचा प्रभू आहे; पूर्ण ब्रह्म (कविर्देव, परम अक्षर पुरुष म्हणजेच सत्पुरुष) यांच्याकडे असंख्य भुजा व असंख्य कला आहेत आणि ते ब्रह्मची २१ ब्रह्मांडे, परब्रह्मची सात संख ब्रह्मांडे यांच्यासह असंख्य ब्रह्मांडांचे प्रभू (स्वामी) आहेत. प्रत्येक प्रभू आपल्या सर्व भुजा एकत्र घेऊन (गुप्त ठेवून) केवळ दोन भुजासुद्धा ठेवू शकतात किंवा जेव्हा वाटेल तेव्हा सर्व भुजा प्रगट करू शकतात. जसे फिरता कॅमेरा बाहेर लावला आणि टीव्ही आत ठेवल्यावर बाहेरचे सर्व दृश्य टीव्हीवर दिसते, तसेच दुसरा टीव्ही बाहेर ठेवला आणि आतमध्ये कॅमेरा स्थिर करून ठेवल्यावर टीव्हीवर केवळ आत चाललेल्या घडामोडीच दिसतात. त्यामुळे सर्व कर्मचारी खबरदारी घेत असतात, तसे पूर्ण परमात्मा परब्रह्मच्या प्रत्येक ब्रह्मांडामध्ये वेगळे स्थान निर्माण करून अन्य रूपामध्ये गुप्त वास्तव्य करतात.

अशाप्रकारे पूर्ण परमात्म्याने आपल्या सत्लोकी विराजमान होऊन सर्वांवर नियंत्रण ठेवले आहे. जसा सूर्य दूर असूनही अन्य लोकांवर त्याचा प्रभाव आहे, तसे प्रत्येक ब्रह्मांडामध्ये सद्गुरू कविर्देव हजर असतात.

## ''पवित्र अथर्ववेदामधील सृष्टिरचनेचे प्रमाण''

**४ थ्या खंडातील पहिल्या अनुवाकमधील पहिला मंत्र :-**

ब्रह्म जज्ञानं प्रथमं पुरस्ताद वि सीमत: सुरुचो वेन आव:।
स बुध्न्या उपमा अस्य विष्ठा: सतश्च योनिमसतश्च वि व: ।।१।।

ब्रह्म-ज-ज्ञानम्-प्रथमम्-पुरस्तात्-विसिमत:-सुरुच:-वेन:-आव:- स:-बुध्न्या:- उपमा-अस्य-विष्ठा:- सत:-च- योनिम्-असत:- च-वि व:

अनुवाद : (प्रथमम्) प्राचीन अर्थात् सनातन (ब्रह्म) परमात्म्याने (ज) प्रगट होऊन (ज्ञानम्) आपल्या ज्ञानाने पूर्ण विचारपूर्वक (पुरस्तात्) शिखरामधील अर्थात सत्लोक आदींना (सुरुच:)

स्वेच्छेने अत्यंत तत्परतेने स्वयंप्रकाशित (विसिमत:) सीमारहित म्हणजेच विशाल सीमा असणाऱ्या भिन्न लोकांना/खंडांना त्या (वेन:) विणकाराने (निर्माता) धाग्यांनी म्हणजेच वस्त्रासारखे विणून (आव:) सुरक्षित केले आहे (च) आणि (स:) तो पूर्ण ब्रह्मच सर्व रचना करतो. (अस्य) यासाठी त्या (बुध्न्या:) मूळ स्वामीने (योनिम्) मूळस्थान सत्यलोकाची रचना केली आहे. (अस्य) त्याच्या/सत्लोकांच्या (उपमा) सदृश अर्थात मिळतेजुळते (सत:) अक्षरपुरुष म्हणजेच परब्रह्मचा लोक/खंड काही प्रमाणात स्थायी (च) आणि (असत:) क्षरपुरुषाचे अस्थायी लोक इत्यादी (वि व:) वेगवेगळे आवास स्थान (विष्ठा:) स्थापित केले.

**भावार्थ : पवित्र वेद सांगणारा ब्रह्म (काल) म्हणत आहे, की सनातन परमेश्वराने स्वतः अनामय (अनामी) लोकातून सत्यलोकी प्रगट होऊन आपल्या ज्ञानाने पूर्ण विचाराअंती वस्त्रासारखी रचना करून वरील सत्लोक इत्यादींना सीमारहित स्वयंप्रकाशित अजर-अमर म्हणजेच अविनाशी स्थिर केले आणि खालील परब्रह्मची सात संख ब्रह्मांडे व ब्रह्मची (ज्योतिनिरंजन) २१ ब्रह्मांडे व त्यामधील लहानातील लहान (सूक्ष्मातील सूक्ष्म) रचना त्या परमात्म्याने अस्थायी स्वरूपात केली आहे.**

**४ थ्या खंडातील पहिल्या अनुवाकमधील दुसरा मंत्र :-**

इयं पित्र्या राष्ट्रयेत्वग्रे प्रथमाय जनुषे भुवनेष्ठा:।
तस्मा एतं सुरुचं ह्वारमह्यं घर्मं श्रीणन्तु प्रथमाय धास्यवे ।।२।।

इयम्-पित्र्या-राष्ट्रि-एतु-अग्रे-प्रथमाय-जनुषे-भुवनेष्ठा:-तस्मा-एतम्-सुरुचम्-हवारमह्यम्-धर्मम्-श्रीणान्तु-प्रथमाय-धास्यवे

अनुवाद : (इयम्) याच (पित्र्या) जगत्पित्या परमेश्वराने (एतु) या (अग्रे) सर्वोत्तम (प्रथमाय) सर्वांत पहिली माया परानंदनी (राष्ट्रि) राजेश्वरी शक्ती म्हणजेच पराशक्ती, जिला आकर्षण शक्ती असेही संबोधले जाते (जनुषे ) उत्पन्न करून (भुवनेष्ठा:) लोक/स्थान/खंड स्थापन केले (तस्मा) त्याच परमेश्वराने (सुरुचम्) मोठ्या प्रसंतेने, आनंदाने स्वइच्छेने (एतम्) या (प्रथमाय) प्रथम उत्पत्ती झालेल्या शक्ती म्हणजेच पराशक्तीद्वारे (हवारमह्यम्) एक दुसऱ्यांच्या वियोगाला/एकापासून दुसऱ्याच्या वियोगास थांबविण्याचा म्हणजेच आकर्षण शक्तीच्या (श्रीणान्तु) गुरुत्वाकर्षणाला परमात्म्याने नित्य राहण्याचा आदेश दिला, जो कधीही समाप्त न होणाऱ्या (धर्मम्) स्वभावाला (धास्यवे) धारण करून धाग्यांनी वस्त्रासारखे विणून स्थिर केले आहे.

**भावार्थ :- जगत्पित्या परमेश्वराने आपल्या शब्दशक्तीने राष्ट्री म्हणजेच सर्वांत प्रथम माया राजेश्वरी उत्पन्न केली आणि त्या पराशक्तीद्वारे एक दुसऱ्यांना आकर्षण शक्तीने (गुरुत्वाकर्षण) एकत्र ठेवणाऱ्या (थांबविणाऱ्या) व कधीही समाप्त न होणाऱ्या गुणाने या सर्व ब्रह्मांडांची स्थापना केली.**

**४ थ्या खंडातील पहिल्या अनुवाकमधील ३ रा मंत्र :-**

प्र यो जज्ञे विद्वानस्य बन्धुर्विश्वा देवानां जनिमा विवक्ति।
ब्रह्म ब्रह्मण उज्जभार मध्यान्नीचैरुच्चै: स्वधा अभि प्र तस्थौ ।।३।।

प्र-य:-जज्ञे-विद्वानस्य-बन्धु:-विश्वा-देवानाम्- जनिमा- विवक्ति-बह्म:- ब्रह्मण:-उज्जभार-मध्यात्-निचै:-उच्चै:-स्वधा-अभि:-प्रतस्थौ।

अनुवाद : (प्र) सर्वप्रथम (देवानाम्) देवता व ब्रह्मांडे यांच्या (जज्ञे) उत्पत्तीच्या ज्ञानाला (विद्वानस्य) जिज्ञासू भक्ताचा (य:) जो (बन्धु:) वास्तविक साथी/सोबती म्हणजेच पूर्ण परमात्माच आपल्या निजसेवकाला (जनिमा) आपल्याद्वारे सृजन/उत्पन्न केलेल्या (विवक्ति) स्वतःच योग्यप्रकारे

विस्तारपूर्वक सांगतात, की (ब्रह्मण:) पूर्ण परमात्म्याने (मध्यात्) आपल्या माध्यमातून म्हणजेच शब्दशक्तीने (ब्रह्म:) ब्रह्म-क्षरपुरुष म्हणजेच कालला (उज्जभार) उत्पन्न करून (विश्वा) सर्व संसारास म्हणजेच सर्व लोकांस/धामांस (उच्चै:) वरील सत्यलोक इत्यादी (निचै:) खालील परब्रह्म व ब्रह्म यांची सर्व ब्रह्मांडे (स्वधा) आपल्या धारण केलेल्या (अभि:) आकर्षण शक्तीने (प्रतस्थौ) दोन्हींना चांगल्या प्रकारे स्थिर केले.

**भावार्थ :- पूर्ण परमात्मा आपण रचलेल्या सृष्टीचे ज्ञान आणि सर्व आत्म्यांच्या उत्पत्तीचे ज्ञान आपल्या निजदासाला स्वतः योग्य आणि विस्तारपूर्वक सांगत आहेत, की पूर्ण परमात्म्याने आपल्या माध्यमातून म्हणजेच शरीरातून आपल्या शब्द शक्तीद्वारे ब्रह्मची (क्षर पुरुष/काल) उत्पत्ती केली आणि सर्व ब्रह्मांडांच्या वर सत्लोक, अलखलोक, अगमलोक, अनामीलोक आदी व खाली परब्रह्मची सात संख ब्रह्मांडे आणि ब्रह्मची २१ ब्रह्मांडे यांना आपण धारण केलेल्या आकर्षण शक्तीद्वारे स्थिर केलेले आहे.**

**ज्या प्रकारे पूर्ण परमात्मा कबीर परमेश्वर (कविर्देव) यांनी आपल्या निजसेवक अर्थात सखा श्री धर्मदासजी, आदरणीय गरीबदासजी आदींना आपल्याद्वारे रचल्या गेलेल्या सृष्टीचे ज्ञान स्वतःच सांगितले आहे, तसे हा वेदमंत्रसुद्धा त्याचेच समर्थन करत आहे.**

**४ थ्या खंडातील पहिल्या अनुवाकमधील ४ था मंत्र :-**

स हि दिव: स पृथिव्या ऋतस्था मही क्षेमं रोदसी अस्कभायत्।
महान् मही अस्कभायद् वि जातो द्यां सद्म पार्थिवं च रज: ।।४।।

हि-दिव:-स-पृथिव्या-ऋतस्था-मही-क्षेमम्-रोदसी-अकस्भायत्-महान्-मही-अस्कभायद्-विजात:-धाम्-सदम्-पार्थिवम्-च-रज:।

भाषांतर :- (स) त्याच सर्वशक्तिमान परमात्म्याने (हि) नि:संदेह (दिव:) वरील चारही दिव्य लोकांस-सत्यलोक, अलखलोक, अगमलोक तथा अनामी अर्थत अकहलोक या दिव्य गुणांनी युक्त लोकांस (ऋतस्था) सत्य, स्थिर म्हणजेच अजर-अमर रूपाद्वारे स्थिर केले, (स) त्यांच्यासारखे (पृथिव्या) खाली पृथ्वीवरील सर्व लोक- परब्रह्मची सात संख आणि ब्रह्म/कालची २१ ब्रह्मांडे (मही) पृथ्वी तत्त्वाने (क्षेमम्) सुरक्षितपणे (अस्कभायत्) स्थिर केले. (रोदसी) आकाश तत्त्व व पृथ्वी तत्त्व या दोन्ही तत्त्वांच्या वरील आणि खालील ब्रह्मांडांना (जसे आकाश एक सूक्ष्म तत्त्व आहे, आकाशाचा गुण 'शब्द' आहे. पूर्ण परमात्म्याने वरील लोक (खंड) शब्दरूपाने रचले जे तेजःपुंजाने बनलेले आहेत, तर खालील परब्रह्मचे (अक्षर पुरुष) सात संख ब्रह्मांडे व ब्रह्मच्या (क्षर पुरुष) २१ ब्रह्मांडांची रचना पृथ्वी तत्त्वाने अस्थायी केली आहे.) (महान्) पूर्ण परमात्म्याने (पार्थिवम्) पृथ्वीचे (वि) वेगवेगळे (धाम्) लोक (च) आणि (सदम्) आवासस्थान (मही) पृथ्वी तत्त्वाने (रज:) प्रत्येक ब्रह्मांडामध्ये लहान-लहान लोकांची/धामांची (जात:) रचना करून (अस्कभायत्) स्थिर केले.

**भावार्थ :- वरील चारही लोक-सत्यलोक, अलखलोक, अगमलोक, अनामी म्हणजेच अकहलोक हे तर अजर-अमर स्थायी म्हणजेच अविनाशी रचलेले आहेत आणि खालील ब्रह्म व परब्रह्मच्या लोकांची (धामांची) अस्थायी रचना करून, तसेच अन्य लहान-लहान लोकही त्या परमेश्वराने रचून स्थिर केले.**

**४ थ्या खंडातील पहिल्या अनुवाकमधील ५ वा मंत्र :-**

स बुध्न्यादाष्ट्र जनुषो भ्यग्रं बृहस्पतिर्देवता तस्य सम्राट।
अहर्यच्छुक्रं ज्योतिषो जनिष्टाथ द्युमन्तो वि वसन्तु विप्रा:।।५।।

स-बुध्न्यात्-आष्ट्र-जुनषेः-अभि-अग्रम्-बृहस्पतिः-देवता-तस्य-सम्राट-अहः-यत्-शुक्रम्-ज्योतिषः-जनिष्ट-अथ-द्युमन्तः-वि-वसन्तु-विप्राः।

अनुवाद : (सः) त्या (बुध्न्यात्) मूळ मालक/स्वामीपासून (अभि-अग्रम) सर्वप्रथम स्थानावर (आष्ट्र) अष्टांगी माया-दुर्गा म्हणजेच प्रकृतिदेवी (जनुषेः) उत्पन्न झाली. कारण खालील परब्रह्म व ब्रह्मच्या लोकांचे प्रथमस्थान सत्‌लोक आहे. याला तिसरे धाम असेसुद्धा संबोधले जाते. (तस्य) या दुर्गादेवीचेही स्वामी हेच (सम्राट) राजाधिराज (बृहस्पतिः) सर्वश्रेष्ठ पती व जगद्‌गुरू (देवता) परमेश्वर आहेत. (यत्) ज्यांच्यापासून (अहः) सर्वांचा वियोग झाला (अथ) त्यानंतर (ज्योतिषः) ज्योतिरूप निरंजन म्हणजेच काळच्या (शुक्रम्) वीर्य अर्थात बीजशक्तीने (जनिष्ट) दुर्गेच्या उदरातून उत्पन्न होऊन (विप्राः) भक्त आत्मे (वि) वेगळे/स्वतंत्रपणे (द्युमन्तः) मनुष्यलोक आणि स्वर्गलोकामध्ये ज्योतिनिरंजनाच्या आदेशानुसार (वसन्तु) दुर्गा म्हणाली, की 'निवास करा.' अर्थात, ते निवास करू लागले.

**भावार्थ :- पूर्ण परमात्म्याने वरील चारही लोकांमधील जे खालील सर्वप्रथम म्हणजेच सत्यलोकामध्ये आष्ट्रा म्हणजेच अष्टांगीची (प्रकृतिदेवी/दुर्गा) उत्पत्ती केली. हे परमात्मा, राजाधिराज, जगद्‌गुरू, पूर्ण परमेश्वर (सत्‌पुरुष) आहेत, ज्यांपासून सर्वांचा वियोग झालेला आहे. नंतर सर्व प्राणी ज्योति निरंजनाच्या (काल) बीजापासून (वीर्य) दुर्गादेवीच्या (आष्ट्रा) गर्भातून उत्पन्न होऊन स्वर्गलोक व पृथ्वीलोकावर निवास करू लागले.**

**४ थ्या खंडातील पहिल्या अनुवाकमधील ६ वा मंत्र :-**

नूनं तदस्य काव्यो हिनोति महो देवस्य पूर्व्यस्य धाम।
एष जज्ञे बहुभिः साकमित्था पूर्वे अर्धे विषिते ससन् नु।।६।।

नूनम्-तत्-अस्य-काव्यः-महः-देवस्य-पूर्व्यस्य-धाम-हितोनि-पूर्वे-विषिते-एष-जज्ञे-बहुभिः-साकम्-इत्था-अर्धे-ससन्-नु।

अनुवाद : (नूनम्) निःसंदेह (तत्) ते पूर्ण परमेश्वर म्हणजेच तत् ब्रह्मच (अस्य) या (काव्यः) भक्त आत्म्यास, जो पूर्ण परमेश्वराची भक्ती विधिवत करतो परत (महः) सर्वशक्तिमान (देवस्य) परमेश्वराच्या (पूर्व्यस्य) पूर्वीच्या (धाम) लोकामध्ये म्हणजेच सत्यलोकी (हिनोति) पाठवितो.

(पूर्वे) पूर्वीचे (विषिते) विशेष प्रेमी भक्ताने (एष) या परमेश्वराला व (जज्ञे) सृष्टी उत्पत्तीच्या ज्ञानाला जाणून घेऊन (बहुभिः) अत्यंत आनंद (साकम्) सहित (अर्धे) अर्धी (ससत्) निद्रा घेत (इत्था) विधिवत अशाप्रकारे (नु) खऱ्या आत्म्याने/हृदयाने स्तृती करतो.

**भावार्थ :- तेच पूर्ण परमेश्वर सत्यसाधना करणाऱ्या साधकाला त्या पूर्वीच्या स्थानी (सत्यलोक/सत्‌लोक) घेऊन जातात, ज्या स्थानावरून वियोग होऊन ते आलेले होते. तेथे त्या वास्तविक सुखदायी प्रभूला प्राप्त केल्यानंतर साधक आनंदाने आत्मविभोर होऊन सद्‌गदित होऊन अंतःकरणाने स्तुती करतो, की हे परमात्म्या, असंख्य जन्म भरकटलेल्यांना हे वास्तविक स्थान प्राप्त झाले. याचे प्रमाण ऋग्वेदाच्या १० व्या मंडलातील ९० व्या सुक्तामधील १६ व्या मंत्रामध्येही आहे.**

**आदरणीय गरीबदासजींना अशाप्रकारे पूर्ण परमात्मा कविर्देव (कबीर परमेश्वर) स्वतः सत्यभक्ती प्रदान करून सत्यलोकी घेऊन गेले होते, तेव्हा आपल्या अमृतवाणीमध्ये आदरणीय गरीबदासजी महाराज म्हणतात, की :-**

'गरीब, अजब नगर में ले गए, हमकुँ सतगुरू आन। झिलके बिम्ब अगाध गति, सुते चादर तान।।'

**४ थ्या खंडातील पहिल्या अनुवाकमधील ७ वा मंत्र :-**

यो थर्वाणं पित्तरं देवबन्धुं बृहस्पतिं नमसाव च गच्छात्।
त्वं विश्वेषां जनिता यथासः कविर्देवो न दभायत् स्वधावान्।।७।।

यः-अथर्वाणम्-पित्तरम्-देवबन्धुम्-बृहस्पतिम्-नमसा-अव-च-गच्छात्-त्वम्-विश्वेषाम्-जनिता-यथा-सः-कविर्देवः-न-दभायत्-स्वधावान्

अनुवाद :- (यः) जे (अथर्वाणम्) अचल अर्थात अविनाशी (पित्तरम्) जगत्पिता (देवबन्धुम्) भक्तांचे वास्तविक सोबती म्हणजेच आत्म्याचे आधार (बृहस्पतिम्) जगद्गुरू (च) आणि (नमसा) विनम्र पुजारी म्हणजेच विधिवत साधकाला (अव) सुरक्षेसह (गच्छात) सत्लोकी जाणाऱ्यांना सत्लोकी घेऊन जाणारे (विश्वेषाम्) सर्व ब्रह्मांडांची (जनिता) रचना करणारे जगदंबा म्हणजेच मातेच्या गुणांनीही युक्त (न दभायत्) काल सारखा धोका न देणाऱ्या (स्वधावान्) स्वभावाचे म्हणजेच गुणांचे (यथा) त्याच प्रकारचे/जसेच्या जसे (त्वम्) तुम्ही (कविर्देवः/कविर् देवः) कविर्देव आहात. भाषाभिन्नत्वामुळे यांनाच कबीर परमेश्वर असेही संबोधले जाते.

**भावार्थ :- या मंत्राने हेसुद्धा स्पष्ट केले आहे, की त्या परमेश्वराचे नाव कविर्देव म्हणजेच कबीर परमेश्वर आहे, ज्यांनी सर्व रचना केलेली आहे.**

**जे परमेश्वर अचल म्हणजेच वास्तवामध्ये अविनाशी (गीतेच्या पंधराव्या अध्यायातील १६ व १७ व्या श्लोकांमध्येही प्रमाण आहे.) जगद्गुरू, आत्माधार, जे पूर्ण मुक्त होऊन सत्यलोकी गेलेले आहेत, त्यांना सत्लोकी घेऊन जाणारे, सर्व ब्रह्मांडांचे रचनाकार, काल सारखा (ब्रह्म) धोका न देणारे, जसे आहेत तसे, तेच स्वतः कविर्देव अर्थात कबीर प्रभु आहेत. हेच परमेश्वर सर्व ब्रह्मांडांना व प्राण्यांना आपल्या शब्दशक्तीद्वारे उत्पन्न करतात म्हणूनच त्यांना (जनिता) मातासुद्धा संबोधले जाते. (पित्तरम) पिता आणि (बन्धु) भाऊसुद्धा वास्तवामध्ये हेच आहेत. तसेच (देव) परमेश्वरही हेच आहेत. त्यामुळे याच कविर्देवांची (कबीर परमेश्वर) स्तुती केली जाते.** 'त्वमेव माता च पिता त्वमेव, त्वमेव बंधु च सखा त्वमेव, त्वमेव विद्या च द्रविणम् त्वमेव, त्वमेव सर्व मम् देव देव।' **या परमेश्वराच्या महिमेचे पवित्र ऋग्वेदाच्या पहिल्या मंडलातील २४ व्या सुक्तामध्ये विस्तृत विवरण आहे.**

## ''पवित्र ऋग्वेदामधील सृष्टिरचनेचे प्रमाण''


**१० व्या मंडलातील ९० व्या सुक्तामधील पहिला मंत्र :-**

सहस्रशीर्षा पुरुषः सहस्राक्षः सहस्रपात्। स भूमिं विश्वतों वृत्वात्यतिष्ठद्दशाङ्गुलम्।।१।।

सहस्रशिर्षा-पुरुषः-सहस्राक्षः-सहस्रपात्-स-भूमिम्-विश्वतः-वृत्वा- अत्यातिष्ठत्-दशंगुलम्।

अनुवाद :- (पुरुषः) विराटरूपी काल भगवान म्हणजेच क्षर पुरुष (सहस्रशिर्षा) हजार शिरे/मस्तके असणारा, (सहस्राक्षः) हजार डोळे असणारा (सहस्रपात्) हजार पाय असणारा, (स) तो काल (भूमिम्) पृथ्वीसारख्या २१ ब्रह्मांडांना (विश्वतः) सर्व दिशांनी/बाजूंनी (दशंगुलम्) दहाही अगुंष्टांनी/बोटांनी म्हणजेच पूर्ण रूपाने ताब्यात घेऊन (वृत्वा) वर्तुळाकार परिघात घेरून (अत्यातिष्ठत) यापेक्षा श्रेष्ठ म्हणजे आपल्या काल लोकामधील सर्वांत वेगळ्या अनोख्या २१ व्या ब्रह्मांडामध्ये वास्तव्य करतो, राहतो.

**भावार्थ :- या मंत्रामध्ये विराटचे (काल ब्रह्म) वर्णन आले आहे (गीतेच्या दहाव्या व अकराव्या अध्यायांमध्येही याच काल-ब्रह्मचे असेच वर्णन आहे. ११ व्या अध्यायातील ४६ व्या श्लोकामध्ये अर्जुनाने म्हटले आहे, की हे सहस्रबाहू म्हणजेच हजार भुजा असणारे तुम्ही आपल्या चतुर्भुज रूपामध्ये दर्शन द्या.)**




वरती मूळ (जड) खाली शाखा (फांद्या) वाला उलटा लटकलेला
संसार रुपी झाडाचे चित्र

**ज्याचे हजार हात-पाय, हजार डोळे. कान आदी आहेत, तो विराटरूप काल प्रभु आपल्या आधीन सर्व प्राण्यांना पूर्णपणे वश करून म्हणजे वीस ब्रह्मांडांना गोलाकार परिघामध्ये (वर्तुळाकार कवचामध्ये) थांबवून स्वत: यांच्यापेक्षा वरील (वेगळ्या) २१ व्या ब्रह्मांडामध्ये बसलेला आहे.**

**१० व्या मंडलातील ९० व्या सुक्तामधील २ रा मंत्र :-**

पुरुष एवेंद सर्वं यद्भूतं यच्च भाव्यम्। उजामृतत्वस्येशानो यदन्नेनातिरोहति।।२।।

पुरुष-एव-इदम्-सर्वम्-यत्-भूतम्-यत्-च-भाव्यम्-उत्-अमृतत्वस्य-इशान:-यत्-अन्नेन-अतिरोहति।

अनुवाद : (एव) अशाप्रकारे काही योग्यप्रकारचा (पुरुष) भगवान आहे, तो अक्षर पुरुष म्हणजेच परब्रह्म आहे. (च) आणि (इदम्) हा (यत) जो (भूतम्) उत्पन्न झालेला आहे, (यत्) जो (भूतम्) भविष्यामध्ये उत्पन्न होईल (सर्वम्) सर्व (यत्) प्रयत्नांनी म्हणजेच कष्टाद्वारे (अन्नेन) अन्नातून (अतिरोहति) विकसित होतो. हा अक्षर पुरुषसुद्धा (उत) संदेहयुक्त (अमृतत्वस्य) मोक्षाचा (इशान:) स्वामी आहे. अर्थात, भगवान म्हणून अक्षर पुरुषही काहीअंशी योग्य आहे; परंतु पूर्ण मोक्षदायक नाही.

**भावार्थ :- या मंत्रामध्ये परब्रह्मचे (अक्षर पुरुष) विवरण आले आहे, ज्याच्यात भगवानांची काही अंशी लक्षणे आहेत; परंतु याच्या भक्तीने पूर्ण मोक्ष मिळत नाही. यामुळे त्याला संदेहयुक्त मुक्तिदाता संबोधले जाते. याला काही प्रभुचे गुणयुक्त असल्याचे यासाठी म्हटले आहे, कारण हा काल सारखा तप्तशिलेवर सूक्ष्मदेह भाजून खात नाही; परंतु या परब्रह्मच्या लोकीही प्राण्यांना परिश्रम करून कर्माधारावरच फळ प्राप्त होते आणि अन्नापासूनच सर्व प्राण्यांचे शरीर विकसित होते. जन्म व मृत्यूचा कालावधी जरी काल पेक्षा (क्षर पुरुष) अधिक असला तरीही उत्पत्ती, प्रलय आणि चौऱ्याऐंशी लक्ष योनींमधील यातना भोगाव्याच लागतात.**

**१० व्या मंडलातील ९० व्या सुक्तामधील ३ रा मंत्र :**

एतावानस्य महिमातो ज्यायाँश्च पुरुष:। पादो स्य विश्वा भूतनि त्रिपादस्यामृतं दिवि ।।३।।

एतावान्-अस्य-महिमा-अत:-ज्यायान्-च-पुरुष:-पाद:-अस्य-विश्वा-भूतानि-त्रि-पाद्-अस्य-अमृतम्-दिवि ।

अनुवाद :- (अस्य) या अक्षर पुरुष म्हणजेच परब्रह्मची तर (एतावान्) एवढीच (महिमा) प्रभुता आहे (च) आणि (पुरुष:) तो परम अक्षर ब्रह्म म्हणजेच पूर्णब्रह्म परमेश्वर तर (अत:) याच्यापेक्षाही (ज्यायान्) कितीतरी मोठा/श्रेष्ठ आहे. (विश्वा) समस्त (भूतानि) क्षर पुरुष आणि अक्षर पुरुष, तसेच यांच्या लोकांमधील/सत्यधामांमधील जेवढेही प्राणी आहेत, ते (अस्य) या पूर्ण परमात्मा परम अक्षर पुरुषाचा (पाद:) एकच पाय आहे. अर्थात, ते एक अंशमात्र आहेत. (अस्य) या पूर्ण परमेश्वराचे (त्रि) तीन (दिवि) दिव्यलोक जसे सत्यलोक, अलखलोक, अगम लोक (अमृतम्) अविनाशी (पाद्) दुसरा पाय आहे. अर्थात, जे काही सर्व ब्रह्मांडांमध्ये उत्पन्न होते, ते सत्यपुरुष पूर्ण परमात्म्याचाच अंश किंवा अंग आहे.

**भावार्थ :- या दुसऱ्या मंत्रामध्ये वर्णन आलेल्या अक्षर पुरुषाची (परब्रह्म) एवढीच महिमा आहे आणि ते पूर्णपुरुष कविर्देव तर याच्यापेक्षा कितीतरी पटीने विशाल/श्रेष्ठ आहेत म्हणजेच सर्व शक्तिमान आहेत. सर्व ब्रह्मांडे त्यांच्याच अंशावर तग धरून आहेत. या मंत्रामध्ये तीन लोकांचे (धामांचे) वर्णन एवढ्यासाठीच आले आहे, की चौथे अनामी (अनामय) लोक अन्य**

**रचनेच्या पूर्वीचे आहे. याच तीन प्रभूंचे (क्षर पुरुष, अक्षर पुरुष आणि या दोघांपेक्षा वेगळा परम अक्षर पुरुष) विवरण (गीतेच्या १५ व्या अध्यायातील १६ व १७ वा श्लोक) मध्ये आले आहे. {याचे प्रमाण आदरणीय गरीब दास साहेबजी सांगतात की :-**

'गरीब जाके अर्ध रुम पर सकल पसारा, ऐसा पूर्ण ब्रह्म हमारा ।।'

'गरीब, अनंत कोटि ब्रह्मांड का, एक रति नहीं भार। सतगुरु पुरुष कबीर है कुल के सृजनहार ।।'

**याचेच प्रमाण आदरणीय दादू साहेबजी सांगत आहेत, की :-**

''जिन मोकुं निज नाम दिया, सोई सतगुरु हमार। दादू दूसरा कोए नही, कबीर सृजनहार।।''

**याचेच प्रमाण आदरणीय नानक साहेबजी देत आहेत, की :-**

''यक अर्ज गुएतम पेश पेरा तो दर कून करतार। हक्का कबीर करीम तू, बेएब परवरदिगार।।'

**(श्री गुरु ग्रंथ साहेब मधील पान नं. ७२१, महला १, राग तिलंग)**

**कून करतार याचा अर्थ असा आहे, की सगळ्याचे रचनकार म्हणजेच शब्दशक्तीद्वारे रचना करणारे शब्दस्वरूपी प्रभू, हक्का कबीरचा अर्थ आहे सत् कबीर, करीमचा अर्थ दयाळू, आणि परवरदिगारचा अर्थ परमात्मा असा आहे.}**

**१० व्या मंडलातील ९० व्या सुक्तामधील ४ था मंत्र :**

त्रिपादूर्ध्व उदैत्पुरुषः पादो स्येहाभवत्पुनः। ततो विष्व ङ्व्यक्रामत्साशनानशने अभि ।।४।।

त्रि-पाद-ऊर्ध्वः-उदैत्-पुरुषः-पादः-अस्य-इह-अभवत्-पूनः-ततः-विश्वङ्-व्यक्रामत्-सः-अशनानशने-अभि।

अनुवाद :- (पुरुषः) हा परम अक्षर ब्रह्म अर्थात अविनाशी परमात्मा (ऊर्ध्वः) वर (त्रि) तीन लोक-सत्यलोक, अलखलोक, अगमलोक रूपी (पाद) पाय म्हणजेच वरील भागामध्ये (उदैत्) प्रगट होतो म्हणजे विराजमान आहे. (अस्य) याच परमेश्वर पूर्ण ब्रह्मचा (पादः) एक पाय म्हणजे एक हिस्सा जगत्रूप (पुनर्) पुन्हा (इह) येथे (अभवत्) प्रगट होतो. (ततः) त्यामुळे (सः) तो अविनाशी पूर्ण परमात्मा (अशानानशने) जीवात्म्यांचे सूक्ष्म शरीर खाणाऱ्या काल च्या म्हणजेच क्षर पुरुषाच्या आणि न खाणाऱ्या पर ब्रह्म म्हणजेच अक्षर पुरुषाच्याही (अभि) वर (विश्वङ्) सर्वत्र (व्यक्रामत्) व्याप्त आहे म्हणजेच त्यांची प्रभुता सर्व ब्रह्मांडांवर आणि सर्व प्रभूंवर आहे. ते कुळाचे/सर्वांचे स्वामी, मालक आहेत, जे आपल्या शक्तीने सर्वांच्या वर विस्तारलेले आहेत.

**भावार्थ :- हेच सर्व सृष्टीचे रचनाकार प्रभू आपल्या रचनेच्या वरील भागामध्ये तीन स्थानांमध्ये (सत्लोक, अलखलोक, अगमलोक) तीन रूपांमध्ये स्वतः प्रगट होतात म्हणजेच स्वतः विराजमान आहेत. येथे अनामीलोकाचे वर्णन एवढ्यासाठीच आलेले नाही, कारण अनामीलोकांमध्ये कोणतीही रचना नाही आणि अलख लोक (अनामय) शेष रचनेच्या पूर्वीचे आहे. नंतर म्हटले आहे, की त्या परमात्म्याच्या सत्लोकापासून विलग होऊन खालील ब्रह्म तथा परब्रह्मचे लोक उत्पन्न होतात आणि तोच पूर्ण परमात्मा खाणारा ब्रह्म अर्थात काल पेक्षा (कारण ब्रह्म/काल विराट शापामुळे एक लक्ष मानव शरीरधारी प्राण्यांचा आहार करतो.) आणि भक्षण न करणाऱ्या परब्रह्म अर्थात अक्षर पुरुष (परब्रह्म प्राण्यांचा आहार करत नाही, परंतु जन्म-मृत्यू, कर्मदंड जसे आहे तसेच राहते.) यांच्याही वर सर्वत्र विस्तारलेला आहे. या पूर्ण परमात्म्याची प्रभुता सर्वांच्यापेक्षा वर प्रस्थापित आहे. कबीर परमेश्वरच कुळाचे/सर्वांचे स्वामी आहेत. त्यांनी आपल्या शक्तीद्वारे सर्वांच्यापेक्षा वर विस्तार केला आहे. जसा सूर्य आपला प्रकाश सर्वांवर पसरवून प्रभावित करतो, तशी पूर्ण परमात्म्याने आपल्या शक्तिरूपी क्षमता (रेंज) सर्व ब्रह्मांडांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रस्थापित केलेली आहे. मोबाईल फोनचा टॉवर**

**एका स्थानी असूनही आपली शक्ती अर्थात मोबाईल फोनची रेंज (क्षमता) चारही दिशांना पसरवून प्रस्थापित करतो, तशी पूर्ण प्रभूंनी आपली निराकार शक्ती सर्वव्यापक केलेली आहे. त्याद्वारे पूर्ण परमात्मा सर्व ब्रह्मांडांवर एक स्थानावर विराजित होऊन नियंत्रण ठेवतो.**

**याचे प्रमाण आदरणीय गरीबदासजी महाराज (अमृतवाणी राग कल्याण) देतात.**

'तीन चरण चिन्तामणी साहेब, शेष बदन पर छाए।
माता, पिता, कुलन न बंधु, ना किन्हें जननी जाये।।'

**१० व्या मंडलातील ९० व्या सुक्तामधील ५ वा मंत्र :**

तस्माद्विराळजायत विराजो अधि पुरुष:। स जातो अत्यरिच्यत पश्चाद्भूमिमथो पुर:।।५।।

तस्मात्-विराट्-अजायत-विराज:-अधि-पुरुष:-स-जात:-अत्यरिच्यत-पश्चात्-भूमिम्-अथ:- पूर:।

अनुवाद :- (तस्मात्) त्यानंतर त्या परमेश्वर सत्यपुरुषाच्या शब्दशक्तीने (विराट्) विराट म्हणजे ब्रह्म/क्षर पुरुष /काल (अजायत) उत्पन्न झालेला आहे. (पश्चात्) त्यानंतर (विराज:) विराट पुरुष अर्थात काल भगवानहून (अधि) अधिक विशाल (पुरुष:) परमेश्वराने (भूमिम्) पृथ्वीवरील लोक, काल ब्रह्म आणि परब्रह्म यांच्या लोकांची (अत्यरिच्यत) चांगल्या/योग्यप्रकारे रचना केली. (अथ:) नंतर (पुर:) अन्य लहान-लहान लोक (स) त्या पूर्ण परमेश्वरानेच (जात:) उत्पन्न केले म्हणजेच स्थापित केले.

**भावार्थ :- या ४ थ्या मंत्रामध्ये वर्णन आलेल्या तीन लोकांची (अगमलोक, अलखलोक आणि सत्लोक) रचना केल्यानंतर पूर्ण परमात्म्याने ज्योति निरंजनची (ब्रह्म/काल) उत्पत्ती केली. अर्थात, त्याच सर्वशक्तिमान परमात्मा पूर्णब्रह्म कविर्देवांपासून (कबीर प्रभू) विराट म्हणजेच ब्रह्मची (काल) उत्पत्ती झाली. याचे प्रमाण गीतेच्या तिसऱ्या अध्यायातील पंधराव्या श्लोकामध्येही आहे, की अक्षर पुरुष म्हणजेच अविनाशी प्रभूंपासून ब्रह्म उत्पन्न झाला आहे. अथर्ववेदाच्या ४ थ्या कांडातील पहिल्या अनुवाकमधील ३ ऱ्या सुक्तामध्येही याचे प्रमाण आहे, की पूर्ण ब्रह्मपासून ब्रह्मची उत्पत्ती झाली आणि त्याच पूर्ण ब्रह्मने इतर (भूमिम्) लहान-मोठ्या सर्व लोकांची रचना केली आहे. ते पूर्ण ब्रह्म या विराट भगवान अर्थात ब्रह्म/काल पेक्षाही विशाल आहेत. अर्थात, कालचेही स्वामी, मालक तेच आहेत.**

**१० व्या मंडलातील ९० व्या सुक्तामधील १५ वा मंत्र :**

सप्तास्यासन्परिधयस्त्रि: सप्त समिध: कृता:। देवा यद्यज्ञं तन्वाना अबध्नन्पुरुषं पशुम् ।।१५।।

सप्त-अस्य-आसन्-परिधय:-त्रिसप्त-समिध:-
कृता:-देवा-यत्-यज्ञम्-तन्वाना:-अबध्नन्-पुरुषम्-पशुम्।

अनुवाद :- (सप्त) परब्रह्मची सात संख ब्रह्मांडे आणि (त्रिसप्त) काल ब्रह्मची २१ ब्रह्मांडे (समिध:) कर्मदंड दु:खरूपी अग्नीने दु:खी (कृता:) करणाऱ्या (परिधय:) वर्तृळाकार परीघरूपी सीमेमध्ये (आसन) विद्यमान आहेत. (यत्) जो (पुरुषम्) पूर्ण परमात्म्याची (यज्ञम्) विधिवत धार्मिक कर्म म्हणजेच पूजा करतो (पशुम) बळी द्यायच्या पशुरूपी कालच्या जाळ्यामधील कर्मबंधनामध्ये बांधलेल्या (देवा) त्या भक्तात्म्यांना (तन्वांना:) कालद्वारे रचलेल्या, फेकलेल्या पापकर्मबंधन जाळ्यातून (अबध्नन) मुक्त करतात. येथे अर्थातच बंधनातून सुटका करणारे म्हणजेच बंदी छोड आहेत.

**भावार्थ :- परब्रह्मची सात संख ब्रह्मांडे आणि ब्रह्मची (काल) २१ ब्रह्मांडे वर्तुळाकार सीमेमध्ये बंद असून, पापकर्माच्या अग्नीमध्ये जळत राहणाऱ्या प्राण्यांना पूर्ण परमात्मा वास्तविक पूजाविधी सांगून योग्य उपासना करवून घेतो. त्यामुळे बळी दिल्या जाणाऱ्या पशुसारख्या जन्म-**

**मृत्यूच्या जाळ्यामध्ये अडकलेल्या, कालच्या (ब्रह्म) आहारासाठी तप्तशिलेच्या कष्टांनी पीडित भक्तात्म्यांना कालचे कर्मबंधनाचे फेकलेले जाळे तोडून बंधनरहित करतात म्हणजेच बंध सोडणारे (बंधनातून मुक्त करणारे) बंदी छोड आहेत. याचे प्रमाण पवित्र यजुर्वेदाच्या पाचव्या अध्यायातील ३२ व्या मंत्रामध्ये आहे, की** कविरंघारिसि (कविर्) कबीर परमेश्वर (अंध) पापाचे (अरि) शत्रू (असि) आहेत म्हणजेच पापविनाशक कबीर परमात्मा आहेत. बम्भारिसि (बम्भारि) बंधनाचा शत्रू म्हणजे बंदी छोड कबीर परमेश्वर (असि) आहेत.

**१० व्या मंडलातील ९० व्या सुक्तामधील १६ वा मंत्र :**

यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन्।
ते ह नाकं महिमानः सचन्त यत्र पूर्वे साध्याः सन्ति देवा ।।१६।।

यज्ञेन-यज्ञम्-अ-यजन्त-देवाः-तानि-धर्माणि-प्रथमानि-आसन्-ते-ह-नाकम्-महिमानः-सचन्त-यत्र-पूर्वे-साध्याः-सन्ति देवाः।

अनुवाद :- जे (देवाः) निर्विकार, देवस्वरूप भक्तात्मे (अयज्ञम्) अपुऱ्या/अपूर्ण, अयोग्य धार्मिक पूजेच्या स्थानी/बदल्यात (यज्ञेन) सत्यभक्ती धार्मिक कर्माधारावर (यजन्त) पूजा करतात (तानि) ते (धर्माणि) धार्मिक शक्तिसंपन्न (प्रथमानि) मुख्य म्हणजेच उत्तम (आसन्) आहेत. (ते ह) तेच वास्तविक (महिमानः) महान भक्ती-शक्तियुक्त होऊन (साध्याः) सफल भक्तजन (नाकम्) पूर्ण सूखदायक परमेश्वराला (सचन्त) भक्तीमुळे म्हणजे सत्भक्तीच्या कमाईने प्राप्त होतात. ते तेथे जातात, (यत्र) जेथे (पूर्वे) पूर्वीच्या सृष्टीतील (देवाः) पापरहित, देवस्वरूप भक्त आत्मे (सन्ति) वास्तव्य करत आहेत.

**भावार्थ :- जे निर्विकार (ज्यांनी मांस, तंबाखू, मद्य यांचा त्याग केलेला आहे आणि इतरही दुष्कर्मे करत नाहीत ते) देवस्वरूप भक्त आत्मे शास्त्रविधिरहित पूजेचा त्याग करून शास्त्रानुकूल साधना करतात, ते भक्तीच्या कमाईने धनी होऊन कालच्या ऋणातून मुक्त होऊन आपल्या सत्यभक्तीच्या कमाईमुळे त्या सर्वसुखदायी परमात्म्याला प्राप्त करतात म्हणजेच सत्यलोकामध्ये जातात, जेथे सर्वप्रथम रचलेल्या सृष्टीतील देवस्वरूप अर्थात पापरहित हंसात्मे वास्तव्य करतात.**

**ज्याप्रमाणे काही आत्मे कालच्या (ब्रह्म) जाळ्यामध्ये फसून येथे आले, काही परब्रह्मसोबत सात संख ब्रह्मांडांमध्ये आले. तरीही ज्या असंख्य आत्म्यांचा आपल्या पूर्ण परमात्म्यावर अटळ विश्वास राहिला, जे पतिव्रता पदापासून (निष्ठेपासून) दूर झाले नाहीत, ते सर्व पुण्यात्मे तेथेच राहिले. त्यामुळेच पवित्र वेदांमध्येही सत्य सांगितल्याचे येथे वर्णन आले आहे. याच प्रमाणाचे गीतेच्या ८ व्या अध्यायातील ८ व्या ते १० व्या श्लोकांमध्ये वर्णन आले आहे, की जे साधक पूर्ण परमात्याची सत्साधना शास्त्रविधीनुसार करतात, ते भक्तीच्या कमाईच्या बळावर त्या पूर्ण परमात्म्यास प्राप्त होतात म्हणजेच त्यांच्याजवळ (सत्लोकी) जातात. यावरून हे सिद्ध होते, की तीन प्रभू आहेत-ब्रह्म, परब्रह्म, आणि पूर्ण ब्रह्म. यांनाच १) ब्रह्म-ईश- क्षर पुरुष २) परब्रह्म-अक्षर पुरुष/अक्षर ब्रह्म ३) पूर्ण ब्रह्म-परम अक्षर ब्रह्म-परमेश्वर-सतपुरुष आदी पर्यायी शब्दांनी ओळखले जाते.**

**हे प्रमाण ऋग्वेदाच्या ९ व्या मंडलातील ९६ व्या सुक्तामधील १७ ते २० या मंत्रांमध्ये स्पष्ट केले आहे, की परमात्मा कविर्देव (कबीर परमेश्वर) शिशुरूप (लहान बालकाचे) धारण करून प्रगट होतात आणि आपले निर्मळ पवित्र ज्ञान म्हणजेच तत्त्वज्ञान (कविगीर्भिः) कबीरवाणीद्वारे आपल्या अनुयायांना वर्णन करून सांगतात. तेच कविर्देव (कबीर परमेश्वर)**

ब्रह्मच्या (क्षर पुरुष) धामापेक्षा आणि परब्रह्मच्या (अक्षर पुरुष) धामापेक्षा भिन्न जे तिसरे ऋतधाम (सत्लोक) आहे, तेथे आकारामध्ये विराजमान आहेत. तसेच सत्लोकापेक्षा चौथा अनामीलोक आहे, तेथे हेच कविर्देव (कबीर परमेश्वर) अनामी पुरुष रूपामध्ये मनुष्यसदृश आकारामध्ये विराजमान आहेत.

## ''पवित्र श्रीमददेवी महापुराणामध्ये सृष्टिरचनेचे प्रमाण''

''ब्रह्मा, विष्णू आणि शिव यांचे आई व वडिल''

**(दुर्गा और ब्रह्म (काल) यांच्या योगातून ब्रह्मा, विष्णू आणि शिव यांचा जन्म)**

**पवित्र श्रीमद देवी महापुराणाचा ३ रा स्कंद (गीता प्रेस, गोरखपूर येथून प्रकाशित, अनुवादकर्ता : श्री. हनुमानप्रसाद पोद्दार तथा चिमनलाल गोस्वामीजी पान नं.११४ पासून)**

पान नं. ११४ ते ११८ पर्यंत विवरण आले आहे, की कित्येक आचार्यांनी (ऋषींनी) भवानीदेवीस संपूर्ण मनोरथ पूर्ण करणारी असे संबोधले आहे. तिला 'प्रकृति' असे म्हटले जाते. तसेच ब्रह्मसोबत (काल) तिचे अभेद संबंध आहेत, (ज्याप्रमाणे पत्नीस अर्धांगिनीही म्हटले जाते. अर्थात, दुर्गा ब्रह्मची (काल) पत्नी आहे.) एका ब्रह्मांडाच्या सृष्टिरचनेविषयी राजा परीक्षिताने श्री व्यासजींना विचारले, त्यावेळी व्यासजी म्हणाले, की राजन, मी श्री नारदजींना या प्रश्नाचे उत्तर स्वत:च विचारले होते, तेव्हा श्री नारदजी म्हटले होते, की मी आपले (माझे) पिता श्री ब्रह्माजींना हाच प्रश्न विचारला होता, की या ब्रह्मांडाची रचना आपण केली, श्री विष्णूजींनी अथवा शिवजींनी केली? याबाबत जे काही सत्य असेल ते सांगण्याची कृपा करावी. तेव्हा माझे पूज्य पिता श्री ब्रह्माजी म्हणाले होते, की बाळ नारद, मी स्वत: कमळावर बसलेलो होतो. मला ज्ञान नाही, या अथांग जलामध्ये मी कसा उत्पन्न झालो, हे मलासुद्धा माहीत नाही. एक हजार वर्षापर्यंत मी पृथ्वीचे निरीक्षण करत राहिलो; पण मला या पाण्याचा अंत सापडला नाही. त्यानंतर 'तप करा' अशी आकाशवाणी झाली. मी एक हजार वर्षे तप केले. तत्पश्चात सृष्टिरचनेची आकाशवाणी झाली. इतक्यात मधू आणि कैटभ नावाचे दोन राक्षस आले आणि त्यांना घाबरून मी कमळाच्या देठाला पकडून खाली उतरलो. तेथे भगवान विष्णूजी शेषशय्येवर चेतनाहीन होऊन पडलेले होते. त्यांच्यामधून एक स्त्री (प्रेतवत प्रविष्ट झालेली दुर्गा) बाहेर पडली. ती आकाशामध्ये आभूषणे परिधान केलेली दिसू लागली. त्यावेळी भगवान विष्णू शुद्धीवर आले. तेथे मी आणि विष्णूजी दोघे होतो. एवढ्यात शंकरजीही तेथे आले. देवीने आम्हाला विमानामध्ये बसविले आणि ब्रह्मलोकी घेऊन गेली. तेथे आणखी एकेक ब्रह्मा, विष्णू आणि शिव दिसले. त्यानंतर आणखी एक देवी दिसली. तिला पाहून विष्णूजींनी विवेकपूर्वक खालीलप्रमाणे वर्णन केले. (ब्रह्मने (काल) भगवान विष्णूंना चेतना प्रदान केली आणि त्यांना आपल्या बाल्यावस्थेतील आठवणी जागृत झाल्या. त्यांनी आम्हाला बाल्यावस्थेतील कहाणी (वस्तुस्थिती) ऐकवली.)

पान नं. ११९-१२० वर :- भगवान विष्णूजी हे श्री ब्रह्माजी आणि श्री शिवजींना म्हणाले, की ही आम्हा तिघांचीही माता आहे. हीच जगज्ञननी प्रकृतिदेवी आहे. मी या देवीला जेव्हा मी एक लहान बालक होतो, तेव्हा पाहिले होते. हीच मला पाळण्यामध्ये झोके देत होती.

३ रा स्कंद पान नं. १२३ वर :- श्री विष्णूजी श्री दुर्गादेवीची स्तुती करून म्हणाले, की तू शुद्धस्वरूप आहेस. हा सर्व संसार तुझ्यापासूनच उद्भासित (निर्माण) होत आहे. मी (विष्णू), ब्रह्मा आणि शंकर आम्ही सर्व तुझ्या कृपेनेच विद्यमान आहोत. आमचा अविर्भाव (जन्म) आणि तिरोभाव (मृत्यू) होत असतो. अर्थात, आम्ही तिन्ही देव नाशवान आहोत. केवळ तूच एक

नित्य (अविनाशी) आहेस, जगज्जननी आहेस, प्रकृतिदेवी आहेस.

भगवान शंकर म्हणाले, की देवी, जर महाभाग विष्णू तुझ्यापासून प्रगट (उत्पन्न) झाले आहेत, तर त्यांच्यानंतर उत्पन्न झालेले ब्रह्माही तुझेच बालक आहे आणि या दोघांनंतर उत्पन्न झालेला मी तमोगुणी लीला करणारा शंकर काय तुझी संतान (पुत्र) नाही झालो? अर्थात, मलाही उत्पन्न करणारी तूच आहेस.

विचार करा :- या विवरणावरून असे सिद्ध होते, की श्री ब्रह्माजी, श्री विष्णूजी, श्री शिवजी नाशवान आहेत. मृत्युंजय (अजर-अमर) व सर्वेश्वर नाहीत आणि ते दुर्गादेवीचे (प्रकृती) पुत्र आहेत व ब्रह्म (काल-सदाशिव) यांचा पिता आहे.

३ ऱ्या स्कंदातील पान नं. १२५ वर ब्रह्माजींनी हे माते, वेदांमध्ये जे ब्रह्म म्हटले आहे ते आपणच आहात की अन्य कोणी प्रभू आहेत, असे विचारल्यावर दुर्गा म्हणाली, की मी आणि ब्रह्म एकच आहे. नंतर याच स्कंदाच्या पान नं. १२९ वर म्हटले आहे, की आता माझे कार्य सिद्ध करण्यासाठी तुम्ही तिघे विमानात बसून लगेच या. कोणतेही कठीण कार्य उपस्थित झाले आणि तुम्ही माझे स्मरण केले, तर मी तुमच्यासमोर प्रगट होईन. हे देवतांनो, तुम्ही माझे (दुर्गादेवीचे) आणि ब्रह्मचे ध्यान सदोदित केले पाहिजे. आमच्या दोघांचे स्मरण करत राहिलात तर तुमचे कोणतेही कार्य सिद्ध होण्यात किंचितही संदेह नाही.

या व्याख्यांवरून असे स्वसिद्ध होते, की दुर्गा (प्रकृती) आणि ब्रह्म (काल) हे तिन्ही देवतांचे माता-पिता आहेत. तसेच ब्रह्मा, विष्णू व शिव हे नाशवान आहेत व पूर्ण शक्तियुक्त नाहीत.

तिन्ही देवतांचा (श्री ब्रह्मा, श्री विष्णू, श्री शिव) विवाह दुर्गादेवीने (प्रकृतिदेवी) केला. (तिसऱ्या स्कंदातील पान नं. १२८ व १२९).

गीतेच्या ७ व्या अध्यायातील १२ वा श्लोक :

ये, च, एव, सात्विका: भावा:, राजसा:, तामसा:, च, ये,
मत:, एव, इति, तान्, विद्धि, न, तु, अहम्, तेषु, ते मयि।।

**अनुवाद :-** (च)आणि (एव) सुद्धा (ये) जो (सात्विका:) सत्त्वगुण विष्णूजींचा स्थिती (भावा:) भाव आहे आणि (ये) जो (राजसा:) रजोगुण ब्रह्माजींचा उत्पत्ती (च) आणि (तामसा:) तमोगुण शिवचा संहार हा आहे. (तान्) ते सर्व तू (मत:, एव) माझ्याद्वारे सुनियोजित नियमानुसार होणारे आहेत. (इति) असे (विद्धि) जाण, (तु) परंतु वास्तविक (तेषु) त्यांच्यामध्ये (अहम्) मी आणि (ते) ते (मयि) माझ्यामध्ये (न) नाहीत.

## ‘‘पवित्र शिव महापुराणामधील सृष्टिरचनेचे प्रमाण‘‘

### (काल ब्रह्म व दुर्गा यांच्यापासून विष्णू, ब्रह्मा, व शिव यांची उत्पत्ती)

याचे प्रमाण ‘पवित्र श्री शिवपुराण’ गीता प्रेस, गोरखपूर येथून प्रकाशित, अनुवादकर्ता श्री. हनुमान प्रसाद पोद्दार, यातील ६ वा अध्याय- ‘रुद्रसंहिता’मधील पान नं. १00 वर म्हटले आहे, की जो मूर्तिरहित परब्रह्म आहे, त्याचीच मूर्ती भगवान सदाशिव आहे. त्यांच्या शरीरातून एक शक्ती प्रकट झाली ती शक्ती अंबिका, दुर्गा (प्रकृती), त्रिदेवजननी (श्री ब्रह्माजी, श्री विष्णूजी आणि श्री शिवजी यांना उत्पन्न करणारी माता) संबोधली गेली. तिला आठ भुजा आहेत. सदाशिव जे आहेत, त्यांना शिव, शंभू आणि महेश्वरसुद्धा म्हटले जाते. (पान नं. १0१ वर) ते आपल्या सर्व देहभर भस्म लावतात. त्या कालरूपी ब्रह्मने एक शिवलोक नामक क्षेत्राची

निर्मिती केली. नंतर दोघांपासून एक पुत्र उत्पन्न झाला. त्याचे नाव विष्णू ठेवले. (पान नं. १०२)

पुढे रुद्रसंहितेच्या ७ व्या अध्यायातील पान नं. १०३ वर ब्रह्माजींनी म्हटले आहे, की माझी उत्पत्तीसुद्धा भगवान सदाशिव (ब्रह्म काल) आणि प्रकृति (दुर्गा) यांच्यापासून झाली. त्यानंतर मला बेशुद्ध केले गेले.

त्यानंतर रुद्रसंहितेच्या ९ व्या अध्यायातील पान नं. ११० वर म्हटले आहे, की अशाप्रकारे ब्रह्मा, विष्णू आणि रुद्र या तीन देवतांमध्ये गुण आहेत, परंतु शिव (काल ब्रह्म) गुणातित मानला गेला आहे.

येथे चार बाबी सिद्ध होतात- (१) सदाशिव (काल ब्रह्म) व प्रकृति (दुर्गा) यांच्यापासून तीन देवांची (ब्रह्मा, विष्णू, महेश) उत्पत्ती झालेली आहे. (२) तिन्ही भगवानांची (श्री ब्रह्माजी, श्री विष्णूजी आणि श्री शिवजी) माता दुर्गाजी आहे. (३) या तिघांचा पिता ज्योति निरंजन (काल ब्रह्म) आहे. (४) हेच तिन्ही प्रभू रजोगुणी-ब्रह्माजी, सत्गुणी-विष्णूजी आणि तमोगुणी-शिवजी आहेत.

## ''पवित्र श्रीमद्भगवत गीतेमधील सृष्टिरचनेचे प्रमाण''

याचे प्रमाण पवित्र गीतेच्या १४ व्या अध्यायातील ३ ऱ्या ते ५ व्या श्लोकांमध्ये आहे. ब्रह्म (काल) म्हणत आहे, की, प्रकृति (दुर्गा) तर माझी पत्नी आहे. मी ब्रह्म (काल) तिचा (दुर्गा) पती आहे. आम्हा दोघांपासून सर्व प्राण्यांसहित तीन गुणांची (रजोगुण-ब्रह्माजी, सत्गुण-विष्णूजी, तमोगुण-शिवजी) उत्पत्ती झाली. मी (ब्रह्म) सर्व प्राण्यांचा पिता आहे आणि प्रकृति (दुर्गा) त्यांची माता आहे. मी तिच्या (दुर्गा) उदरामध्ये बीज स्थापन करतो, ज्यामुळे सर्व प्राण्यांची उत्पत्ती होते. प्रक्रुती (दुर्गा) मातेपासुन उत्पन्न झालेले तिन गुण (रजगुण ब्रह्मा, सतगुण विष्णु व तमगुण शिव) हे सर्वांना कर्माच्या आधारावर शरिरात बांधुन ठेवतात. याचे प्रमाण अध्याय १५ श्लोक १ ते ४ तसेच १६, १७ मध्ये देखिल आहे.

**गीता अध्याय नं. १५ श्लोक नं. १**

उर्ध्वमूलम्, अध:शाखम्, अश्वत्थम्, प्राहु:, अव्ययम्,
छन्दांसि, यस्य, पर्णानि, य:, तम्, वेद, स:, वेदवित्।।

अनुवाद :- (उर्ध्वमूलम्) वरती मूळवाले पूर्ण परमात्मा आदिपुरुष (अध: शाखम्) खालच्या बाजूला शाखा असणारा (अव्ययम्) अविनाशी (अश्वत्थम्) अमर असा पिंपळाचा मजबूत असा वृक्ष आहे. (यस्य) या वृक्षाच्या (छन्दांसि) लहान-लहान भागांना फांद्या (पर्णानि) पाने (प्राहु:) म्हटले आहे. (तम्) त्या संसाररूपी वृक्षाला (य:) जे (वेद) सर्वांगांसहित जाणतात, (स:) ते ( वेदवित्) पूर्ण ज्ञानी म्हणजेच तत्त्वदर्शी आहेत.

**गीता अध्याय नं. १५ श्लोक नं. २**

अध:, च, ऊर्ध्वम्, प्रसृता:, तस्य, शाखा:, गुणप्रवृद्धा:,
विषयप्रवाला:, अध:,च, मूलानि, अनुसन्ततानि, कर्मानुबन्धीनि, मनुष्यलोके।।

अनुवाद :- (तस्य) त्या वृक्षाच्या (अध:) खाली (च) आणि (ऊर्ध्वम्) वर (गुणप्रवृद्धा:) तिन्ही गुण ब्रह्मा-रजोगुण, विष्णू-सत्गुण, शिव-तमोगुण रूपी (प्रसृता) पसरलेल्या (विषयप्रवाला:) विकार-काम, क्रोध, मोह, लोभ, अहंकार रूपी (शाखा:) शाखा/फांद्या ब्रह्मा, विष्णू, शिव (कर्मानुबन्धीनि) जीवांना कर्मामध्ये बांधणारी (अपि) सुद्धा (मूलानि) मुळे मुख्य कारण आहे (च) आणि (मनुष्यलोके) मनुष्यलोक-स्वर्ग-नरकलोक, पृथ्वीलोक यामध्ये (अध:) खाली नरक,

चौऱ्याऐंशी लाख योनींमध्ये (ऊर्ध्वम्) वर स्वर्गलोक आदीमध्ये (अनुसन्ततानि) व्यवस्थित केलेले आहेत.

**गीतेच्या १५ व्या अध्यायातील ३ रा श्लोक**

न, रूपम, अस्य, इह, तथा, उपलभ्यते, न अन्त:, न, च, आदि:, न, च,
सम्प्रतिष्ठा, अश्वत्थम्, एनम्, सुविरूढमूलम्, असंगशस्त्रेण, दृढेन, छित्वा।।

अनुवाद : (अस्य) या रचनेची (न) नाही (आदि) सुरवात (च) आणि (न) नाही (अन्त:) शेवट आहे (न) नाही (तथा) तसे (रूपम) स्वरूप (उपलभ्यते) प्राप्त होते (च) आणि (इह) येथे विचार काळद्वारे म्हणजेच माझ्याद्वारे दिल्या जाणाऱ्या गीताज्ञानाची पूर्ण माहिती (ज्ञान) मलाही (न) नाही. (सम्प्रतिष्ठा) कारण सर्व ब्रह्मांडांची रचना चांगल्या/योग्यप्रकारे स्थित आहे का, याचे मलाही ज्ञान नाही. (एतम्) या (सुविरुढमलूम्) चांगल्याप्रकारे स्थायी/नित्य स्थिती असणारा (अश्वत्थम्) मजबूत स्वरूपाचा (असंड्गशस्त्रेण) पूर्ण ज्ञानरूपी (दृढेन) दृढ सूक्ष्म वेद म्हणजेच तत्त्वज्ञानाद्वारे जाणून (छित्वा) छाटून/कापून म्हणजेच निरंजनाच्या भक्तीला क्षणिक अर्थात क्षणभंगूर जाणून ब्रह्मा, विष्णू, शिव, ब्रह्म आणि परब्रह्मच्या पुढे/वरील पूर्ण ब्रह्मचा शोध घेतला पाहिजे.

**गीतेच्या १५ व्या अध्यायातील ४ था श्लोक**

ततः पदम्, तत्, परिर्मार्गितयम्, यस्मिन्, गता:, न, निवर्तन्ति, भूय:,
तम्, एव्, च, आद्यम्, पुरुषम्, प्रपद्ये, यत:, प्रवृति:, प्रसृता, पुराणी।।

अनुवाद :- जेव्हा तत्त्वदर्शी संत भेटतील, (तत:) त्यानंतर (तत्) त्या परमात्याच्या (पदम्) पदस्थानाचा म्हणजेच सत्लोकाचा (परिर्मार्गितव्यम्) पूर्णपणे समजून शुद्ध अंत:करणाने शोध घेतला पाहिजे. (यस्मिन) जेथे (गता:) गेलेले साधक (भूय:) पुन्हा (न निवर्तन्ति) परतून या संसारामध्ये येत नाहीत. (च) आणि (यत:) ज्या परमात्म्या-परम अक्षर ब्रह्मपासून (पुराणी) आदि/सुरवातीची (प्रवृति:) रचना-सृष्टी (प्रसृता) उत्पन्न झालेली आहे. (तम्) अज्ञात (आद्यम्) आदियम म्हणजेच मी काळनिरंजन (पुरुषम्) पूर्ण परमात्म्याला (एव) च (प्रपद्ये) मी शरण आहे आणि त्याचीच पूजा करतो.

**गीतेच्या १५ व्या अध्यायातील १६ वा श्लोक**

द्वौ, इमौ, पुरुषौ, लोके, क्षर:, च, अक्षर:, एव, च, क्षर:, सर्वाणि, भूतानि, कूटस्थ:, अक्षर:, उच्यते।।

अनुवाद :- (लोके) या संसारामध्ये (द्वौ) दोन प्रकारचे (क्षर:) नाशवान (च) आणि (अक्षर:) अविनाशी (पुरुषौ) भगवान आहेत. (एव) अशाप्रकारे (इमौ) या दोन्ही प्रभूंच्या लोकी (सर्वाणि) संपूर्ण (भूतानि) प्राण्यांचे शरीर तर (क्षर:) नाशवान (च) आणि (कूटस्थ:) जीवात्मा (अक्षर:) अविनाशी (उच्यते) आहे असे म्हटले जाते.

**गीतेच्या १५ व्या अध्यायातील १७ वा श्लोक**

उत्तम; पुरुष:, तु, अन्य; परमात्मा, इति, उदाहृत:,
य:, लोकत्रयम्, आविश्य, बिभर्ति, अव्यय:, ईश्वर:।।

अनुवाद : (उत्तम:) उत्तम (पुरुष:) प्रभू (तु) तर (अन्य:) या दोन प्रभूंपेक्षा (क्षरपुरुष आणि अक्षरपुरुष) अन्यच आहे. (इति) वास्तवामध्ये ते (परमात्मा) परमात्मा (उदाहृत:) म्हटले जातात, (य:) जे (लोकत्रयम्) तीनही लोकांमध्ये (आविश्य) प्रवेश करून (बिभर्ति) सर्वांचे पालनपोषण करतात आणि (अव्यय:) अविनाशी, (ईश्वर:) प्रभूंमध्ये श्रेष्ठ म्हणजेच समर्थ प्रभू आहेत.

भावार्थ :- गीता ज्ञानदात्या प्रभूने केवळ एवढेच सांगितले आहे, की हा संसार उलट्या लटकलेल्या वृक्षासारखा आहे. वर जे मूळ आहे, ते पूर्ण परमात्मा आहे. खालील फांद्या (शाखा) आणि इतर विभाग आहेत. या संसाररूपी वृक्षाच्या प्रत्येक भागाचे भिन्न-भिन्न विवरण जो संत जाणतो, त्यांना तत्त्वदर्शी संत म्हणतात. यांच्याविषयी गीतेच्या ४ थ्या अध्यायातील ३४ व्या श्लोकामध्ये वर्णन आलेले आहे. गीतेच्या १५ व्या अध्यायातील २ऱ्या व ३ऱ्या श्लोकांमध्ये केवळ एवढेच सांगितले आहे, की त्रिगुणरूपी शाखा आहेत. येथे विचारकाळात म्हणजेच गीतेमध्ये गीता ज्ञानदात्याने म्हटले आहे, की मी तुला पूर्ण माहिती (ज्ञान) देऊ शकत नाही; कारण मलाही या संसाराच्या रचनेचा आदि (सुरुवात) व अंत यांचे ज्ञान नाही. त्यासाठी गीतेच्या चौथ्या अध्यायातील ३४ व्या श्लोकामध्ये म्हटले आहे, की कोणी तत्त्वदर्शी संताकडून त्या पूर्ण परमात्म्याचे ज्ञान जाणा. गीतेच्या पंधराव्या अध्यायातील पहिल्या श्लोकामध्ये त्या तत्त्वदर्शी संताची ओळख सांगितली आहे, की ते या संसाररूपी वृक्षाच्या प्रत्येक भागाचे ज्ञान देतील. याबाबत त्यांनाच विचारा. गीतेच्या पंधराव्या अध्यायातील चौथ्या श्लोकामध्ये म्हटले आहे, की त्या तत्त्वदर्शी संताच्या प्राप्ती नंतर त्या परमपद परमेश्वराचा शोध घेतला पाहिजे म्हणजेच त्या तत्त्वदर्शी संतांच्या सांगण्यानुसारच साधना केली पाहिजे, ज्यामुळे पूर्ण मोक्ष (अनादि मोक्ष) प्राप्त होतो. गीतेच्या १५ व्या अध्यायातील १६ व १७ व्या श्लोकांमध्ये स्पष्ट केले आहे, की तीन प्रभू आहेत-एक क्षरपुरुष (ब्रह्म/काल), दुसरा अक्षर पुरुष (परब्रह्म) आणि तिसरा परम अक्षर पुरुष (पूर्ण ब्रह्म). क्षर पुरुष आणि अक्षर पुरुष वास्तविक अविनाशी नाहीत. ते अविनाशी परमात्मा तर या दोघांपेक्षा वेगळेच आहेत. तेच परमात्मा तिन्ही लोकांमध्ये प्रवेश करून सर्वांचे पालनपोषण करतात.

गीतेच्या १५ व्या अध्यायातील पहिल्या ते ४थ्या आणि १६ व १७ व्या श्लोकांमध्ये हे प्रमाणित होते, की उलटे लटकलेल्या संसाररूपी वृक्षाचे मूळ म्हणजेच ते परम अक्षर ब्रह्म म्हणजेच पूर्ण ब्रह्म आहेत, ज्यांद्वारे संपूर्ण वृक्षाचे पालनपोषण होते आणि वृक्षाचा जो भाग (पृथ्वीच्या बाहेर) जमिनीलगत दिसतो म्हणजेच खोड जे आहे, त्याला अक्षर पुरुष म्हणजेच परब्रह्म समजावे. त्या खोडापासून पुढे आणखी एक मोठी फांदी निघते तिला ब्रह्म म्हणजेच क्षर पुरुष समजावे. त्या फांदीपासून अन्य तीन लहान शाखा निघतात, त्यांना ब्रह्मा, विष्णू आणि शिव असे समजावे. तसेच त्या लहान शाखांपासून पुढे जी पाने दिसतात, त्यांना सांसारिक प्राणी असे समजावे. गीतेच्या १५ व्या अध्यायातील १६ व १७ व्या श्लोकांमध्ये स्पष्ट झाले आहे, की क्षर पुरुष (ब्रह्म) आणि अक्षर पुरुष (परब्रह्म), तसेच या दोघांच्या लोकी जितके प्राणी आहेत, त्यांचे स्थूल शरीर नाशवान आहे आणि जीवात्मा अविनाशी आहे म्हणजेच हे दोन्ही प्रभू व त्यांच्या अंतर्गत असणारे प्राणी नाशवान आहेत. जरी अक्षर पुरुषाला (परब्रह्म) अविनाशी म्हटले आहे, तरी वास्तवामध्ये अविनाशी परमात्मा या दोघांपेक्षा वेगळाच आहे. ते वास्तविक परमात्मा तिन्ही लोकांमध्ये प्रवेश करून सर्वांचे पालनपोषण करतात. या विवरणामध्ये तीन प्रभूंचे भिन्न-भिन्न विवरण दिलेले आहे.

## ''पवित्र बायबल आणि पवित्र कुर्आन शरीफमधील सृष्टिरचनेचे प्रमाण''

सृष्टिरचनेचे प्रमाण पवित्र बायबल आणि पवित्र कुर्आन शरीफमध्ये आहे.

कुर्आन शरीफमध्ये पवित्र बायबलमधीलही ज्ञान आहे. त्यामुळे या दोन्ही पवित्र सद्ग्रंथांमध्ये सृष्टीचा रचनाकार कोण आणि कसा आहे आणि त्यांचे वास्तविक नाव काय आहे, याचे मिळतेजुळते प्रमाण आलेले आहे.

**पवित्र बायबल ( उत्पत्ती ग्रंथाच्या पान नं. २ वर, अ. १:२०–२:५ वर)**

सहावा दिवस :– प्राणी आणि मनुष्य :

अन्य प्राण्यांची रचना केल्यानंतर (२६) परमेश्वराने म्हटले आहे, की मी मानवाला आपल्या स्वरूपाप्रमाणे, आपल्यासारखे बनविले आहे. तो सर्व प्राण्यांना नियंत्रणाखाली (ताब्यात) ठेवेल २७). तेव्हा परमेश्वराने मानवाला आपल्या स्वरूपाप्रमाणे उत्पन्न केले आणि नर आणि नारी बनवून मनुष्यांची सृष्टी निर्माण केली.

२९. प्रभूने मनुष्याला आहारासाठी, जितकी बीज असणारी लहान रोपे आणि बीज असणारी फळे आहेत, ते सर्व प्रदान केले. (मांस खाण्यास सांगितलेले नाही.)

सातवा दिवस :– विश्रामाचा दिवस :–

परमेश्वराने सहा दिवसांमध्ये सर्व सृष्टीची उत्पत्ती केली आणि सातव्या दिवशी विश्रांती घेतली.

**पवित्र बायबलनेही सिद्ध केले आहे, की परमात्मा मानवसदृश शरीरामध्ये आहे आणि त्याने सहा दिवसांत सर्व सृष्टीची रचना केली आणि नंतर विश्रांती घेतली.**

**पवित्र कुर्आन शरीफ (सुरत फुर्कानि २५, आयत नं. ५२, ५८, ५९)**

आयत ५२ **:–** फला तुतिअल्–काफिरन्– व जहिद्हुम बिही जिहादन् कबीरा (कबीरन्)।।५२।।

याचा भावार्थ असा आहे, की हजरत मुहम्मदजींचा खुदा (प्रभू) म्हणत आहे, की हे पैगंबर! तुम्ही काफिरांचे (जे एका प्रभूच्या भक्तीचा त्याग करून अन्य देवी–देवतांची आणि मूर्ती आदींची पूजा करतात) म्हणणे मानू नका, कारण ते लोक कबीरांना पूर्ण परमात्मा मानत नाहीत. तुम्ही मी दिलेल्या या कुर्आनाच्या ज्ञानाच्या आधारावर कबीरच पूर्ण प्रभू आहेत यावर निश्चयी राहा आणि त्या कबीर अल्लाहसाठी संघर्ष करावा (मारामारी/युद्ध नाही) म्हणजेच ठाम राहा.

आयत ५८ **:–** व तवक्कल् अलल्–हरूिल्लजी ला यमूतु व सब्बिह् बिहम्दिही व कफा बिही बिजुनूबि अिबादिही खबीरा (कबीरा) ।।५८।।

**भावार्थ :– हजरत मुहम्मदजी ज्यांना आपले प्रभू मानत आहेत, ते अल्लाह (प्रभू) दुसऱ्या कोणत्या तरी पूर्ण प्रभुंकडे संकेत करत आहे, की हे पैगंबर, त्या कबीर परमात्म्यावर विश्वास ठेव, जे तुला जिवंत महात्म्याच्या रूपामध्ये येऊन भेटले होते. त्यांचा कधीही मृत्यू होत नाही म्हणजेच वास्तवामध्ये ते अविनाशी आहेत. स्तुतीसह त्यांच्या पाकी (पवित्र महिमेचे) गुणगान कर. ते कबीर अल्लाह (कविर्देव) पूजनीय आहेत आणि आपल्या उपासकांच्या (साधक) सर्व पापांचा विनाश करणारे आहेत.**

आयत ५९ :– अल्ल्जी खलकस्समावाति वल्अर्ज व मा बैनहुमा फी सित्तति अय्यामिन् सुम्मस्तवा अलल्अर्शि अर्रह्मानु फस्अल् बिही खबीरन् (कबीरन्) ।।५९।।

**भावार्थ :– हजरत मुहम्मदजी यांना कुर्आन शरीफ सांगणारा प्रभू (अल्लाह) म्हणत आहे, की ते कबीरप्रभूच आहेत, ज्यांनी जमीन आणि आकाश यांच्यामध्ये जे विद्यमान आहे, अशा सर्व सृष्टीची रचना सहा दिवसांमध्ये केली आणि सातव्या दिवशी आपल्या सत्यलोकामधील सिंहासनावर जाऊन विराजमान झाले. त्यांच्याविषयीची माहिती कोण्या (बाखबर) तत्त्वदर्शी संताला विचारा.**

**त्या पूर्ण परमात्म्याची प्राप्ती कशी होईल आणि त्यासंबंधीचे वास्तविक ज्ञान कोण्या तत्त्वदर्शी संताला (बाखबर) विचारा, याबाबत मला काहीही माहिती नाही.**

या दोन्ही पवित्र धर्मांच्या (ईसाई आणि मुस्लिम) पवित्र शास्त्रांनी एकच प्रमाणित केले आहे, की, सर्व सृष्टीचा रचनाकार, सर्व पापविनाशक, सर्वशक्तिमान, अविनाशी परमात्मा मानवसदृश शरीराच्या आकारामध्ये असून ते सत्यलोकी वास्तव्य करतात. त्यांचे नाव कबीर आहे आणि त्यांनाच अल्लाहु अकबिरूसुद्धा म्हटले जाते.

आदरणीय धर्मदासजींनी पूज्य कबीर प्रभुंना विचारले, की हे सर्वशक्तिमान, आजपर्यंत हे तत्त्वज्ञान कोणीही सांगितले नाही. वेदांचे मर्म जाणणाऱ्या ज्ञानींनीही हे सांगितले नाही. यावरून हे सिद्ध झाले आहे, की चारही पवित्र वेद आणि चारही पवित्र कतेब (कुर्आन शरीफ आदी) असत्य आहेत. त्यावेळी पूर्ण परमात्मा म्हणाले, की :-

'कबीर, बेद कतेब झूठे नहीं भाई, झूठे है जो समझे नाहिं।'

याचा भावार्थ असा आहे, की चारही पवित्र वेद (ऋग्वेद-अथर्ववेद-यजुर्वेद-सामवेद) आणि चारही पवित्र कतेब (कुर्आन शरीफ-जबूर-तौरात-इंजिल) असत्य/अयोग्य नाहीत; परंतु ज्यांना ते समजलेले नाहीत, ते अज्ञानी/खोटे आहेत.

## ''पूज्य कबीर परमेश्वर (कविर् देव) यांच्या अमृतवाणीमधील सृष्टि रचना''

विशेष :- ही अमृतवाणी १४०३ पासून (जेव्हा पूज्य कविर्देव (कबीर परमेश्वर) लीला करत पाच वर्षांचे झाले) ते १५१८ च्या (जेव्हा कविर्देव (कबीर परमेश्वर 'मगहर' स्थानातून सशरीर सत्लोकी गेले.) दरम्यान सुमारे सहाशे वर्षांपूर्वी परमूज्य कबीर परमेश्वरजींनी (कविर्देव) आपले निजसेवक (दास, भक्त) आदरणीय धर्मदास साहेबजींना ऐकवली होती आणि धनी धर्मदास साहेबजींनी लिपीबद्ध केली होती, परंतु त्यावेळीच्या पवित्र हिंदू आणि पवित्र मुस्लिम धर्मातील अज्ञानी गुरू (नीम-हकीम) म्हणाले, की हा धाणक (विणकर) कबीर खोटारडा आहे. कोणत्याही सद्ग्रंथामध्ये श्री ब्रह्माजी, श्री विष्णूजी आणि श्री शिवजी यांच्या माता-पित्यांचे नाव नाही. हे तिन्ही प्रभू अविनाशी आहेत. त्यांचा जन्म-मृत्यू होत नाही. पवित्र वेद, पवित्र कुर्आन शरीफ आदींमध्ये कबीर परमेश्वरांचे प्रमाण आहे आणि परमात्म्याचे निराकार असे वर्णन केलेले आहे. आम्ही दररोज या सदग्रंथांचे वाचन करतो. भोळ्या आत्म्यांनी त्या विलक्षणी (चतुर) अज्ञानी गुरूंवर विश्वास ठेवला, की खरोखरच हा कबीर धाणक (विणकर) अशिक्षित आहे आणि आपले गुरुजी ज्ञानी आहेत. ते सांगतात ते सत्यच असणार. आज कबीर साहेबांनी सांगितलेली तीच वस्तुस्थिती, सत्य प्रकाशामध्ये येत आहे आणि याला आपले सर्व पवित्र धर्मांचे पवित्र सद्ग्रंथ साक्षी आहेत. यावरून असे सिद्ध होते, की पूर्ण परमात्मा, सृष्टीचे रचनाकार, कुलस्वामी आणि सर्वज्ञ कविर्देव (कबीर परमेश्वर) हेच आहेत, जे काशीमध्ये (बनारस) कमळाच्या फुलावर प्रगट झाले आणि १२० वर्षांपर्यंत वास्तविक तेजोमय शरीरावर मानवसदृश कमी तेजाचे शरीर धारण करून राहिले. आपण रचलेल्या सृष्टीचे यथायोग्य (वास्तविक ज्ञान) देऊन सशरीर सत्लोकी निघुन गेले. कृपया प्रेमी वाचकांनी खालील अमृतवाणी परमेश्वर कबीर साहेब जी द्वारा उच्चारित वाचावी :-

धर्मदास यह जग बौराना। कोई न जाने पद निरवाना ।।
यहि कारन मैं कथा पसारा । जगसे कहियो राम नियारा ।।
यही ज्ञान जग जीव सुनाओ । सब जीवों का भरम नशाओ ।।
अब मैं तुमसे कहों चिताई । त्रियदेवन की उत्पत्ति भाई ।।
कुछ संक्षेप कहों गुहराई । सब संशय तुम्हरे मिट जाई।।

भरम गये जग वेद पुराना । आदि रामका का भेद न जाना ।।
राम राम सब जगत बखाने । आदि राम कोइ बिरला जाने ।।
ज्ञानी सुने सो हिरदै लगाई । मूर्ख सुने सो गम्य ना पाई ।।
माँ अष्टंगी पिता निरंजन । वे जम दारुण वंशन अंजन ।।
पहिले कीन्ह निरंजन राई । पीछेसे माया उपजाई ।।
माया रूप देख अति शोभा । देव निरंजन तन मन लोभा ।।
कामदेव धर्मराय सत्ताये । देवी को तुरतही धर खाये ।।
पेट से देवी करी पुकारा । साहब मेरा करो उबारा ।।
टेर सुनी तब हम तहाँ आये । अष्टंगी को बंद छुडाये ।।
सतलोक में कीन्हा दुराचारि, काल निरंजन दिन्हा निकारि ।।
माया समेत दिया भगाई, सोलह संख कोस दूरी पर आई ।।
अष्टंगी और काल अब दोई, मंद कर्म से गए बिगोई ।।
धर्मराय को हिकमत कीन्हा । नख रेखा से भगकर लीन्हा ।।
धर्मराय किन्हाँ भोग विलासा । माया को रही तब आसा ।।
तीन पुत्र अष्टंगी जाये । ब्रह्मा, विष्णु शिव नाम धराये ।।
तीन देव विस्तार चलाये । इनमें यह जग धोखा खाये।।
पुरुष गम्य कैसे को पावै । काल निरंजन जग भरमावै ।।
तीन लोक अपने सुत दीन्हा । सुन्न निरंजन बासा लीन्हा ।।
अलख निरंजन सुन्न ठिकाना । ब्रह्मा विष्णु शिव भेद न जाना ।।
तीन देव सो उनको धावें । निरंजन का वे पार ना पावें ।।
अलख निरंजन बडा बटपारा । तीन लोक जिव कीन्ह अहारा ।।
ब्रह्मा विष्णु शिव नहीं बचायें । सकल खाय पुन धूर उडाये ।।
तिनके सुत हैं तीनों देवा । आंधर जीव करत हैं सेवा ।।
अकाल पुरुष काहू नहिं चीन्हां । काल पाय सबही गह लीन्हां ।।
ब्रह्म काल सकल जग जाने । आदि ब्रह्मको ना पहिचाने ।।
तीनों देव और औतारा । ताको भजे सकल संसारा ।।
तीनों गुणका यह विस्तारा । धर्मदास मैं कहों पुकारा ।।
गुण तीनों की भक्ति में, भूल परो संसार।
कहै कबीर निज नाम बिन, कैसे उतरैं पार ।।

**या अमृतवाणीमध्ये परमेश्वर कबीर साहेबजी आपले निजसेवक श्री धर्मदास साहेबजींना सांगत आहेत, की धर्मदास, हा सर्व संसार तत्त्वज्ञानाच्या अभावाने विचलित (भटकत/भ्रमित) झालेला आहे. कोणालाही पूर्ण मोक्षाचा मार्ग आणि पूर्ण सृष्टिरचनेचे ज्ञान नाही. यासाठी मी स्वतः रचलेल्या सृष्टिची कथा ऐकवत आहे. बुद्धिमान व्यक्तींना तर हे ज्ञान लगेच समजेल; परंतु जे सर्व निष्कर्ष पाहूनही मानणार नाहीत, विश्वास ठेवणार नाहीत, ते अज्ञानी प्राणी कालाच्या प्रभावाखाली आलेले आहेत. ते भक्तियोग्य नाहीत. आता मी सांगतो, की, या तिन्ही भगवानांची (ब्रह्माजी, विष्णूजी आणि शिवजी) उत्पत्ती कशी झाली? त्यांची माता तर अष्टांगी (दुर्गा) आहे आणि पिता ज्योति निरंजन (ब्रह्म, काल) आहे. प्रथम अंड्यातून ब्रह्मची उत्पत्ती झाली. त्यानंतर दुर्गादेवीची उत्पत्ती झाली. दुर्गाच्या रूपावर आसक्त होऊन काल (ब्रह्म) गैरवर्तन करू लागला, तेव्हा दुर्गादेवीने (प्रकृति) त्याच्या उदरामध्ये आसरा घेतला. त्यावेळी जेथे ज्योति**

निरंजन (काल) होता, तेथे मी गेलो आणि भवानीला ब्रह्मच्या (काल) उदरातून बाहेर काढून २१ ब्रह्मांडांसह १६ संख कोस दूर पाठवले. ज्योति निरंजनाने (धर्मराय) प्रकृति देवीशी (दुर्गा) भोगविलास केला. या दोघांच्या संयोगातून तिन्ही गुणांची (श्री ब्रह्माजी, श्री विष्णूजी आणि श्री शिवजी) उत्पत्ती झाली. याच तीन गुणांची (रजोगुण-ब्रह्माजी, सत्गुण-विष्णूजी, तमोगुण-शिवजी) साधना करून सर्व प्राणी कालच्या जाळ्यामध्ये फसलेले आहेत. जोपर्यंत वास्तविक मंत्र मिळत नाही, तोपर्यंत त्यांना पूर्ण मोक्ष कसा मिळेल?

विशेष :- वाचकहो, विचार करा श्री ब्रह्माजी, श्री विष्णूजी आणि श्री शिवजी यांची स्थिती अविनाशी सांगितली होती. सर्व हिंदू समाज आजतागायत या तिन्ही परमात्म्यांना अजर, अमर व जन्म-मृत्यूरहित मानत राहिला आहे; परंतु वास्तविक हे तीनही भगवान नाशवान आहेत. यांचा पिता काल रूपी ब्रह्म आणि माता व दुर्गा (प्रकृति/अष्टांगी) आहे. आपण पूर्व प्रमाणांमध्ये वाचलेले आहे, तेच ज्ञान आपल्या शास्त्रांमध्येही विद्यमान आहे; परंतु हिंदू समाजातील कलियुगी गुरू, ऋषि आणि संतांना याचे ज्ञान नाही. ज्या अध्यापकाला पाठ्यक्रम माहीत नाही, तो अध्यापक योग्य नाही (विद्वान नाही). तो विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा शत्रू आहे. त्याप्रमाणे ज्या गुरुंना अजूनही श्री ब्रह्माजी, श्री विष्णूजी आणि श्री शिवजी यांचे माता-पिता कोण आहेत, हे माहीत नाही, ते गुरू, ऋषी, संत ज्ञानहीन आहेत. त्यांनी सर्व भक्त समाजाला शास्त्राविरुद्ध ज्ञान (लोकवेद अर्थात दंतकथा) ऐकवून अज्ञानाने परिपूर्ण करून टाकले. शास्त्रविधीविरुद्ध भक्तिसाधना करवून घेऊन त्यांना परमात्म्याच्या वास्तविक लाभापासून (पूर्ण मोक्ष) वंचित ठेवले. सर्वांचे मानव जीवन व्यर्थ घालविले आहे. जो शास्त्रविधीचा त्याग करून मनमानी आचरण, पूजा करतो त्याला कोणताही लाभ प्राप्त होत नाही, याचे प्रमाण श्रीमद् भगवत् गीतेच्या १६ व्या अध्यायामध्ये २३ व २४ व्या श्लोकांमध्ये आले आहे. पूर्ण परमात्मा कबीरजींनी पाच वर्षांच्या लिलामय आयुष्यात सन १४०३ पासूनच सर्व शास्त्रयुक्त ज्ञान आपल्या अमृतवाणीमध्ये (कबीर वाणी) सांगण्यास प्रारंभ केला होता; परंतु त्या वेळच्या अज्ञानी गुरुंनी हे ज्ञान भक्त समाजापर्यंत जाऊ दिले नाही.जे वर्तमानात सर्व सदग्रंथामध्ये स्पष्ट होत आहे की कर्विरदेव (कबीर प्रभू) तत्वदर्शी संताच्या रुपात स्वतः पूर्ण परमात्मा आले होते.

## ''आदरणीय गरीबदास साहेबजींच्या अमृतवाणीमध्ये सृष्टि रचनेचे प्रमाण''

### आदि रमैणी (सदग्रन्थ पृष्ठ नं. ६९० ते ६९२ पर्यंत)

आदि रमैणी अदली सारा। जा दिन होते धुंधुकारा।।१।।
सत् पुरुष कीन्हा प्रकाशा। हम होते तखत कबीर खवासा ।।२।।
मन मोहिनी सिरजी माया। सत्पुरुष एक ख्याल बनाया।।३।।
धर्मराय सिरजे दरबानी। चौसठ जुगतप सेवा ठांनी।।४।।
पुरुष पृथिवी जाकूं दीन्ही। राज करो देवा आधीनी ।।५।।
ब्रह्मण्ड इकीस राज तुम्ह दीन्हा। मन की इच्छा सब जुग लीन्हा।।६।।
माया मूल रूप एक छाजा। मोहि लिये जिनहूँ धर्मराजा।।७।।
धर्म का मन चंचल चित धार्‍या। मन माया का रूप बिचारा ।।८।।
चंचल चेरी चपल चिरागा। या के परसे सरबस जागा ।।९।।
धर्मराय कीया मन का भागी। विषय वासना संग से जागी।।१०।।
आदि पुरुष अदली अनरागी। धर्मराय दिया दिल सें त्यागी ।।११।।
पुरुष लोक सें दीया ढहाही। अगम दीप चलि आये भाई।।१२।।

सहस दास जिस दीप रहंता। कारण कौंन कौंन कुल पंथा।।१३।।
धर्मराय बोले दरबानी । सुनो सहज दास ब्रह्मज्ञानी।।१४।।
चौसठ जुग हम सेवा कीन्ही। पुरुष पृथिवी हम कूं दीन्ही ।।१५।।
चंचल रूप भया मन बौरा। मनमोहिनी ठगिया भौंरा ।।१६।।
सत्पुरुष के ना मन भाये। पुरुष लोक से हम चलि आये ।।१७।।
अगर दीप सुनत बड़भागी। सहज दास मेटो मन पागी ।।१८।।
बोले सहजदास दिल दानी। हम तो चाकर सत सहदानी।।१९।।
सत्पुरुष सें अरज गुजारूं। जब तुम्हारा बिवाण उतारूं।।२०।।
सहज दास को कीया पीयाना। सत्यलोक लीया प्रवाना।।२१।।
सत्पुरुष साहिब सरबंगी। अविगत अदली अचल अभंगी।।२२।।
धर्मराय तुम्हरा दरबानी। अगर दीप चलि गये प्रानी।।२३।।
कौंन हुकम करी अरज अवाजा। कहां पठावौ उस धर्मराजा।।२४।।
भई आवाज अदली एक साचा। विषय लोक जा तीन्यूं बाचा ।।२५।।
सहज विमाँन चले अधिकाई। छिन में अगर दीप चलि आई ।।२६।।
हमतो अरज करी अनरागी। तुम्ह विषय लोक जावो बडभागी ।।२७।।
धर्मराय के चले विमाना। मानसरोवर आये प्राना।।२८।।
मानसरोवर रहन न पाये। दरै कबीरा थांना लाये।।२९।।
बंकनाल की विषमी बाटी। तहां कबीरा रोकी घाटी।।३०।।
इन पाँचों मिलि जगत बंधाना। लख चौरासी जीव संताना।।३१।।
ब्रह्मा विष्णु महेश्वर माया। धर्मराय का राज पठाया।।३२।।
यौह खोखा पुर झूठी बाजी। भिसती बैकुण्ठ दगासी साजी।।३३।।
कृतिम जीव भुलानें भाई। निज घर की तो खबरि न पाई ।।३४।।
सवा लाख उजपें नित हंसा । एक लाख विनशें नित अंसा।।३५।।
उपति खपति याह प्रलय फेरी । हर्ष शोक जौंरा जम जेरी ।।३६।।
पाँचों तत्त्व हैं प्रलय माँही। सत्त्वगुण रजगुण तमगुण झांई।।३७।।
आठों अंग मिली है माया । पिण्ड ब्रह्मण्ड सकल भरमाया।।३८।।
या में सुरति शब्द की डोरी। पिण्ड ब्रह्मण्ड लगी है खोरी।।३९।।
श्वासा पारस मन गह राखो। खोल्हि कपाट अमीरस चाखो ।।४०।।
सुनाऊं हंस शब्द सुन दासा। अगम दीप है अग है बासा।।४१।।
भवसागर जम दण्ड जमाना। धर्मराय का है तलबांना।।४२।।
पाँचो ऊपर पद की नगरी। बाट बिहंगम बंकी डगरी।।४३।।
हमरा धर्मदाय सों दावा। भवसागर में जीव भरमावा ।।४४।।
हम तो कहैं अगम की बानी। जहाँ अविगत अदली आप बिनानी।।४५।।
बंदी छोड हमारा नामं । अजर अमर है अस्थीर ठामं।।४६।।
जुगन जुगन हम कहते आये। जम जौरा सें हंस छुटाये ।।४७।।
जो कोई मानें शब्द हमारा। भवसागर नहीं भरमें धारा।।४८।।
या में सुरति शब्द का लेखा । तन अंदर मन कहो कीन्ही देखा ।।४९।।
दास गरीब अगम की बानी। खोजा हंसा शब्द सहदानी ।।५०।।

**वरिल अमृतवाणीचा भावार्थ आहे कि आदरणीय गरीब दास साहेब जी म्हणत आहेत की**

**सर्व प्रथम येथे केवळ अंधकार होता तसेच पूर्ण परमात्मा कबीर साहेबजी सत्यलोकामध्ये तख्तावर (सिंहासन) विराजमान होते. आम्ही तेथिल सेवक होतो. परमात्म्याने ज्योति निरंजनास उत्पन्न केले. नंतर त्याच्या तपाचे प्रतिफळ म्हणून २१ ब्रह्मांडे त्याला प्रदान केली. त्यानंतर मायेची (प्रकृति) उत्पत्ती केली. तरुण दुर्गाच्या रूपावर मोहित होऊन ज्योति निरंजनने (ब्रह्म) दुर्गाशी (प्रकृति) बलात्कार करण्याची चेष्ठा केली. ब्रह्माला त्याची शिक्षा मिळाली. त्यास सत्यलोकातून काढुन टाकले तसेच शाप लागला कि एक लाख मानव शरीरधारी प्राण्यांचा प्रतिदिन आहार करेल, सव्वा लाख उत्पन्न करेल. येथील सर्व प्राणी जन्म-मृत्यूचे कष्ट सहन करत आहेत. जर कोणी पूर्ण परमात्म्याचे वास्तविक शब्द (खरा नाम जाप मंत्र) आमच्याकडून प्राप्त करेल, त्यास काल च्या बंधनातून सोडवले जाईल. आमचे बंदी छोड नाव आहे. आदरणीय गरीब दास साहेब जी आपले गुरू व प्रभु कबीर परमात्मा यांच्या आधारावर म्हणत आहेत की खरा मंत्र म्हणजेच सत्यनाम आणि सारशब्दाची प्राप्ती करा, पूर्ण मोक्ष मिळेल. नाही तर खोटा नामोपदेश देणाऱ्या संत आणि महंतांच्या मधाळ बोलण्याला (वक्तव्याला) फसून शास्त्रविधिरहित साधना करून काल च्या जाळ्यामध्येच अडकून पडाल आणि कष्टावर कष्ट सहन करत बसाल.**

।। गरीबदासजी महाराजांची वाणी ।।

**(सत्ग्रंथ साहिब पान नं.६९० वरून साभार)**

माया आदि निरंजन भाई, अपने जाऐ आपै खाई।
ब्रह्मा विष्णु महेश्वर चेला, ॐ सोहं का है खेला।।
सिखर सुन्न में धर्म अन्यायी, जिन शक्ति डायन महल पठाई।
लाख ग्रास नित उठ दूती,माया आदि तख्त की कुती।।
सवा लाख घड़िये नित भांडे, हंसा उतपति परलय डांडे।
ये तीनों चेला बटपारी, सिरजे पुरुषा सिरजी नारी।।
खोखापुर में जीव भुलाये, स्वपना बहिस्त वैकुंठ बनाये।
यो हरहट का कुआ लोई, या गल बंध्या है सब कोई ।।
कीड़ी कुजंर और अवतारा, हरहट डोरी बंधे कई बारा।।
अरब अलील इन्द्र हैं भाई, हरहट डोरी बंधे सब आई ।।
शेष महेश गणेश्वर ताहिं, हरहट डोरी बंधे सब आहिं ।
शुक्रादिक ब्रह्मादिक देवा, हरहट डोरी बंधे सब खेवा।।
कोटिक कर्ता फिरता देख्या, हरहट डोरी कहूँ सुन लेखा।
चतुर्भुजी भगवान कहावैं, हरहट डोरी बंधे सब आवैं।।
यो हैं खोखापुर का कुआ, या में पड़ा सो निश्चय मुवा।

**जशी नागीण आपली कुंडली बनविते आणि त्या कुंडलीमध्ये अंडी घालते (प्रसव करते). त्यानंतर ती त्या अंड्यांवर आपला फणा मारते. त्यामुळे अंडी फुटतात आणि त्यातून पिल्ली बाहेर पडतात. त्यांना नागीण भक्षण करते. अंडी भरपूर असल्यामुळे फणा मारताना कित्येक अंडी फुटतात. जी अंडी फुटतात, त्यातून नागिणीची पिल्ली बाहेर निघतात. जे पिल्लू कुंडलीच्या (नागिणीच्या शेपटीचा घेरा) बाहेर पडते ते वाचते, अन्यथा कुंडलीमधील पिलांना नागीण सोडत नाही. जेवढी पिल्ली कुंडलीत असतील, त्या सर्वांना ती खाते. अगदी असेच ज्योति निरंजनाला (काल) वश होऊन हे तीन देवता (रजोगुण-ब्रह्मा, सत्गुण-विष्णू, तमोगुण-शिव) आपली महिमा दाखवून जीवांना स्वर्ग-नरक म्हणजेच भवसागरामध्ये (८४ लक्ष योनींमध्ये) भटकवत**

**ठेवतात. ज्योति निरंजन आपल्या मायेद्वारे (प्रकृति) नागिणीसारखी जीवांची उत्पत्ती करतो आणि नंतर मारून टाकतो.**

माया काली नागिनी, आपने जाये खात। कुण्डली में छोड़ै नहीं, सौ बातों की बात।।

**अशाप्रकारे हे काल बळीचे (ब्रह्म) महाभयंकर जाळे आहे. ज्योति निरंजन पर्यंतची भक्ती पूर्ण संतांकडून नामोपदेश घेऊन केली, तरीही ज्योति निरंजनाच्या कुंडलीतून (२१ ब्रह्मांडे) बाहेर जाता येत नाही. स्वतः ब्रह्मा, विष्णू, महेश, आदिमाया शेरावाली (दुर्गा) हेसुद्धा निरंजनाच्या कुंडलीतच आहेत. ते बिचारे अवतार धारण करून येतात आणि जन्म-मृत्यूचे फेरे घेत राहतात. म्हणूनच ध्रुव, प्रल्हाद व शुकदेव ऋर्षींनी 'सोहं' मंत्राचा जप करूनही ते मुक्त होऊ शकले नाहीत. ते काल लोकीच राहिले. 'ॐ नमः भगवते वासुदेवाय' या मंत्राचा जप करणारे भक्तसुद्धा कृष्णापर्यंत पोहोचण्याची भक्ती करत आहेत. तेसुद्धा ८४ लक्ष योनींच्या फेऱ्यामधून सुटू शकणार नाहीत, याचा विचार करा. हे सर्व परमपूज्य कबीर साहेब जी व आदरणीय गरीब दास साहेब जी महाराज यांच्या वाणीमध्ये प्रत्यक्ष प्रमाणित आहे.**

अनन्त कोटि अवतार हैं, माया के गोविन्द। कर्ता हो हो अवतरे, बहुर पड़े जग फंध।।

**सत्पुरुष कबीर साहेबजींच्या भक्तीनेच जीव मुक्त होऊ शकतो. जोपर्यंत जीव सत्लोकी परत जाणार नाही, तोपर्यंत काल लोकी असेच कर्म करत राहील आणि नामस्मरण व दानधर्माच्या पूण्याची कमाई स्वर्गरूपी हॉटेलमध्ये उधळून पुन्हा कर्माधारावर ८४ लक्ष प्राण्यांच्या शरीरामध्ये जन्म-मृत्यू रूपी कष्ट सहन कराव्या लागणाऱ्या काल लोकी फेऱ्या मारत बसेल. भगवान विष्णूजींना देवर्षी नारदांनी शाप दिला होता. त्यामुळे भगवान विष्णूंना श्री रामचंद्र रूपामध्ये अयोध्येत अवतार घ्यावा लागला. या अवतारात त्यांनी वालीचा वध केला. या कर्माचा दंड भोगण्यासाठी त्यांचा परत श्री कृष्णजींच्या रूपात जन्म झाला. या अवतारावेळी वालीचा आत्मा शिकारी बनला आणि आपला पूर्वजन्मीचा प्रतिशोध त्याने श्री कृष्णजींच्या पायामध्ये विषयुक्त बाण मारून वध करून घेतला, त्याप्रमाणे मायेपासून (दुर्गा) उत्पत्ती होऊन करोडो गोविंदांना (ब्रह्मा, विष्णू, शिव) मृत्यूला सामोरे जावे लागले आहे. भगवानांच्या अवतार रूपात त्यांनी येथे जन्म घेतला. नंतर ते कर्म बंधनामध्ये अडकले आणि ८४ लक्ष योनींमध्ये कर्माचे भोग भोगू लागले. महाराज गरीब दासजी आपल्या वाणीमध्ये म्हणत आहेत, की**

ब्रम्हा विष्णु महेश्वर माया, और धर्मराय कहिये।
इन पाँचो मिल परपंच बनाया, वाणी हमरी लहिये।।
इन पाँचो मिल जीव अटकाये, जुगन-जुगन हम आन छुटाये।
बन्दी छोड हमारा नामं, अजर अमर है अस्थिर ठामं ।।
पीर पैगम्बर कुतुब औलिया, सुर नर मुनिजन ज्ञानी।
येता को तो राह न पाया, जम के बंधे प्राणी।।
धर्मराय की धूमा-धामी, जम पर जंग चलाऊँ ।
जोरा को तो जान न दूगां, बांध अदल घर ल्याऊँ।।
काल अकाल दोहूँ को मोसूं, महाकाल सिर मूंडू।
मैं तो तख्त हजूरी हुकमी, चोर खोज कूं ढूंढू।।
मूला माया मग में बैठी, हंसा चुन-चुन खाई।
ज्योति स्वरूपी भया निरंजन, मैं ही कर्ता भाई ।।
संहस अठासी दीप मुनीश्वर, बंधे मुला डोरी।
ऐत्यां में जम का तलबाना, चलिए पुरुष कीशोरी।।

मूला का तो माथा दागूं, सतकी मोहर करूंगा ।।
पुरुष दीप कूं हंस चलाऊँ, दरा न रोकन दूंगा।।
हम तो बन्दी छोड कहावां, धर्मराय है चकवै।
सतलोक की सकल सुनावां, वाणी हमरी अखवै।।
नौ लख पट्टन ऊपर खेलूं, साहदरे कूं रोकूं।
द्वादस कोटि कटक सब काटूं, हंस पठाऊँ मोखूं ।।
चौदह भुवन गमन है मेरा, जल थल में सरबंगी।
खालिक खलक खलक में खालिक, अविगत अचल अभंगी।।
अगर अलील चक्र है मेरा, जित से हम चल आए।
पाँचों पर प्रवाना मेरा, बंधि छुटावन धाये।।
जहाँ ओंकार निरंजन नाहीं, ब्रह्मा, विष्णू वेद नहीं जाही।
जहाँ करता नहीं जान भगवाना, काया माया पिण्ड न प्राणा ।।
पाँच तत्त्व तीनों गुण नाहीं, जोरा काल दीप नहीं जाहीं।
अमर करूं सतलोक पठाँऊ, तातैं बन्दी छोड कहाऊँ ।।

**कबीर परमेश्वरांची (कविर्देव) महिमा गात आदरणीय गरीब दास साहेब जी म्हणत आहेत, की आमचे प्रभू कविर् (कविर्देव) बंदी छोड आहेत. बंदी छोड याचा अर्थ काल च्या कारागृहातून सुटका करणारे. काल ब्रह्मच्या २१ ब्रह्मांडांमध्ये सर्व प्राणी हातून पाप घडल्यामुळे काल चे बंदी बनले आहेत. पूर्ण परमात्मा कबीर साहेब (कविर्देव) पापांचा विनाश करतात. ब्रह्म, परब्रह्म, ब्रह्मा, विष्णू, शिव किंवा इतर कोणीही पापांचा विनाश करू शकत नाही. जसे आपले कर्म असेल, त्याप्रमाणे ते आपणाला केवळ फळ देतात. यासाठी यजुर्वेदाच्या ५ व्या अध्यायातील ३२ व्या मंत्रामध्ये म्हटले आहे, की 'कविरंघारिरसि' कविर्देव पापांचे शत्रू आहेत. 'बम्भारिरसि' बंधनांचे शत्रू म्हणजेच 'बंदी छोड' आहेत.**

**ब्रह्मा, विष्णू, महेश, माया आणि धर्मराय या पाच जणांच्या वर जे सत्लोकाचे स्वामी (मालक) आहेत, ते सत्पुरुष परमात्मा (कविर्देव) आहेत. बाकीचे सर्व परब्रह्म, ब्रह्म आणि ब्रह्मा, विष्णू, शिवजी व आदिमाया हे नाशवान परमात्मा आहेत. महाप्रलयामध्ये हे सर्व आणि त्यांचे लोक (धाम) पूर्णपणे नष्ट होतील. सर्वसामान्य जीवांपेक्षा कितीतरी हजार पटीने अधिक यांचे आयुष्य आहे, परंतु जी वेळ ठरलेली आहे, ती एक दिवस नक्कीच पूर्ण होते आणि त्यांना नष्ट व्हावे लागते. याबाबत आदरणीय गरीब दास जी महाराज म्हणतात, की :–**

शिव ब्रह्मा का राज, इन्द्र गिनती कहां। चार मुक्ति वैकुंठ समझ, येता लह्या।।
संख जुगन की जुनी, उम्र बड धारिया। जा जननी कुर्बान, सु कागज पारिया।।
येती उम्र बुलंद मरैगा अंत रे। सतगुरू लगे न कान, न भैंटे संत रे।।

**जरी संख (अब्जावधी) युगांचे दीर्घ आयुष्य प्राप्त झाले, तरी ते एक ना एक दिवस नक्कीच समाप्त होतील. जर सत्पुरुष परमात्मा (कविर्देव) कबीर साहेबांचे अनुयायी (नुमाँयदे) पूर्ण संत (गुरू), जे तीन नामांचा मंत्र (ज्यामध्ये ओ३म् + तत् + सत् हे सांकेतिक आहेत.) प्रदान करतात आणि ज्यांना पूर्ण संतांकडून नामोपदेश करण्याचा आदेश आहे, त्यांच्याकडून उपदेश घेऊन नामस्मरणाची पुण्यकमाई केली, तर आपण सत्यलोकीचे अधिकारी हंस होऊ शकतो. सत्य साधने शिवाय अतिदीर्घ आयुष्य काहीही कामाचे नाही, कारण या ज्योति निरंजनलोकी केवळ दु:ख आणि दु:खच आहे.**

कबीर, जीवना तो थोड़ा ही भला, जै सत सुमरन होय।

लाख वर्ष का जीवना, लेखै धरै ना कोय।।

**कबीर साहेब आपली (पूर्ण ब्रह्म) माहिती स्वतः सांगतात,की या परमात्म्यांच्याही वर असंख्य भुजा असलेला परमात्मा सत्पुरुष आहे, जो सत्यलोकामध्ये (सच्च खण्ड/सत्धाम) वास्तव्य करतो आणि त्यांच्या अखत्यारित सर्व लोक (ब्रह्मची (काल) २१ ब्रह्मांडे व ब्रह्मा, विष्णू, शिव-शक्ती (दुर्गा) यांचे लोक आणि परब्रह्मचे सात संख ब्रह्मांडे व इतर सर्व ब्रह्मांडे) येतात आणि तेथे जे पूर्ण सत्गुरुंकडूनच प्राप्त होते, त्या सत्यनाम-सारनामाचा जप करूनच जाता येते. सच्च खंडामध्ये (सत्लोक) जो आत्मा जातो, त्याचा पुनर्जन्म होत नाही. सत्पुरुष (पूर्ण ब्रह्म) कबीर साहेबच (कविर्देव) इतर लोकांमध्येही विराजमान आहेत. अलखलोकी अलखपुरुष, अगमलोकी अगमपुरुष, तसेच अकहलोकी अनामीपुरुष अशा रूपांमध्ये ते विराजमान आहेत. ही तर त्यांची केवळ उपमात्मक नावे आहेत; परंतु या परमेश्वराचे, पूर्ण पुरुषाचे वास्तविक नाव कविर्देव (भाषा भिन्नते मुळे कबीर साहेबही म्हटले जाते.) असे आहे.**

## ''आदरणीय नानक साहेबजींच्या वाणीमध्ये सृष्टि रचनेचा संकेत''

**श्री नानक साहेबजींची अमृतवाणी, महला १, राग बिलावलू, अंश १ (गुरू ग्रंथ साहेब मधील पान क्र. ८३९)**


आपे सचु कीआ कर जोड़ि। अंडज फोडि जोडि विछोड़ ।।
धरती आकाश कीए बैसण कउ थाउ। राति दिनंतु कीए भउ-भाउ।।
जिन कीए करि वेखणहारा। (३)
त्रितीआ ब्रह्मा-बिसतु-महेसा। देवीदेव उपाए वेसा ।। (४)
पउण पाणी अगनी बिसराउ। ताही निरंजन साचो नाउ।।
तिसु महि मनुआ रहिआ लिव लाई । प्रणवति नानकु कालु न खाई ।।(१०)

**या अमृतवाणीचा भावार्थ असा आहे, की खऱ्या परमात्म्यांनी (सत्पुरुष) स्वतःच आपल्या हातांनी सर्व सृष्टीची रचना केलेली आहे. त्यांनीच अंडे बनविले आणि नंतर ते फोडले व त्यातूनच ज्योतिनिरंजन बाहेर पडला. त्याच पूर्ण परमात्म्याने सर्व प्राण्यांच्या वास्तव्यासाठी धरती, आकाश, पवन, जल, अग्नी ही पंचतत्त्वे निर्माण केली. आपण स्वतः रचलेल्या सृष्टिचे ते स्वतःच साक्षी आहेत. याबाबत दुसरा कोणीही योग्य माहिती देऊ शकत नाही. त्यानंतर अंडे फुटून बाहेर पडलेल्या ज्योति निरंजनानंतर श्री ब्रह्माजी, श्री विष्णूजी आणि श्री शिवजी यांची उत्पत्ती झाली, तसेच अन्य देवी-देवता आणि अगणित (असंख्य) जीवांची उत्पत्ती झाली. त्यानंतर अन्य देवांचे जीवनचरित्र आणि अन्य ऋषींच्या अनुभवांतून सहा शास्त्रे आणि अठरा पुराणे निर्माण झाली. पूर्ण परमात्म्याच्या खऱ्या नामाची (सत्यनामाची) साधना अनन्यभावे केल्यानेच व गुरुमर्यादेमध्ये राहणाऱ्यांना (प्रणवति) काल खात (भक्षण) नाही, असे श्री नानकजी सांगत आहेत.**

**राग मारू (अंश) अमृतवाणी महला १. (गुरू ग्रंथ साहेब मधील पान क्र. १०३७)**

सुनहु ब्रह्मा, बिसनु, महेसु उपाए। सुने वरते जुग सबाए।।
इसु पद बिचारे सो जनु पुरा। तिस मिलिए भरमु चुकाइदा।।(३)
साम वेदु, रुगु जुजरु अथरबणु । ब्रह्ममें मुख माइआ है त्रैगुण।।
ता की कीमत कहि न सकै। को तिउ बोले जिउ बुलाईदा ।।(९)

**या अमृतवाणीचा सारांश असा आहे, की अंड्याचे दोन भाग होऊन कोण निघाले, त्याने नंतर ब्रह्मलोकीच्या सुन्न म्हणजेच गुप्तस्थानी ब्रह्मा, विष्णू आणि शिवजी यांची उत्पत्ती कशी**




योह हरहट का कुआँ लोई, या गल बंध्या है सब कोई।
कीड़ी कुंजर और अवतारा, हरहट डोरी बंधे कई बारा।।

काल लोका मध्ये जन्म–मरण रुपी हरहट (चक्र)

**केली, तसेच ज्याने ब्रह्मच्या (काल) मुखातून चार वेदांचे (पवित्र ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद) यांचे उच्चारण करून घेतले, तो परमात्मा कोण आहे, तो पूर्ण परमात्मा त्याला जसे हवे तसेच प्रत्येक प्राण्याला बोलायला लावतो, या सर्वाबाबत तो संतच पूर्ण सृष्टिरचना ऐकवेल आणि सांगेल. हे सर्व ज्ञान पूर्णपणे सांगणारा संत मिळाला/भेटला, तर त्याच्याजवळ जा. ते सर्व शंकांचे पूर्णपणे निरसन करतात आणि तेच पूर्ण संत म्हणजेच तत्त्वदर्शी आहेत.**

**श्री गुरू ग्रंथसाहेबच्या पान क्र. ९२९ वरील अमृतवाणी श्री नानक साहेबजींची राग रामकली महला १ दखणी ओअंकार.**

ओअंकारि ब्रह्मा उतपति। ओअंकारू कीआ जिनि चित। ओअंकारि सैल जुग भए। ओअंकारि बेद निरमए। ओअंकारि सबदि उधरे। ओंअकारि गुरुमुखि तरे। ओनम अखर सुणहू बीचारु। ओनम अखरु त्रिभवण सारु।

**या अमृतवाणीमध्ये श्री नानक साहेबजी म्हणत आहेत, की ओंकार म्हणजेच ज्योति निरंजनापासून (काल) ब्रह्माजींची उत्पत्ती झाली. कित्येक युगे भक्ती करून ओंकाराने (ब्रह्म/काल) जे ब्रह्माजींना प्राप्त झाले, त्या वेदांची उत्पत्ती केली. त्रिलोकीच्या भक्तीचा केवळ एक 'ओऽम्' या मंत्राचा जप करण्यास सांगितले आहे. या 'ओऽम' शब्दाचा पूर्ण संतांकडूनच उपदेश घेऊन म्हणजेच गुरू करून जप केल्यानेच उद्धार होतो.**

**विशेष :- श्री नानक साहेबजींनी तीन मंत्रांचे (ओ३म् + तत् + सत्) ठिकठिकाणी रहस्यात्मक विश्लेषण केले आहे. ते केवळ पूर्ण संत (तत्त्वदर्शी संतच) समजू शकतात आणि तिन्ही मंत्रांच्या जपाचा उपदेश समजावून सांगू शकतात.**

(पान क्र. १०३८) उत्तम सतिगुरु पुरुष निराले, सबदि रते हरि रस मतवाले।
रिधि, बुधि, सिधि, गिआन गुरु ते पाइए, पुरे भाग मिलाईदा।।१५।।
सतिगुरु ते पाए बीचारा, सुन समाधि सचे घरबारा।
नानक निरमल नादु सबद धुनि, सचु रामैं नामि समाइदा।।१७।।

**या अमृतवाणीचा भावार्थ असा आहे, की वास्तविक ज्ञान देणारे सद्गुरू तर वेगळेच आहेत. ते केवळ नामजप करण्यासच सांगतात. अन्य हठयोग साधना ते सांगत नाहीत. जर आपणाला धन-दौलत, पद, बुद्धी अथवा भक्ती शक्तीसुद्धा हवी असेल, तर त्या भक्तिमार्गाचे सर्व ज्ञान पूर्ण संतच प्रदान करेल. असे पूर्ण संत मोठ्या भाग्यानेच लाभतात. वर आकाशामध्ये (सुन्न) आपले वास्तविक घराची (सत्लोक) परमेश्वराने रचना केलेली आहे, असे विश्लेषण तेच पूर्ण संत करतील.**

**त्यामध्ये एका वास्तविक सारनामाची धून (आवाज) उमटत आहे. त्या आनंदात अविनाशी परमेश्वराचा सारशब्द सामावला जातो म्हणजेच त्या वास्तविक सुखदायी स्थानी आपला अधिवास होऊ शकतो. अन्य नाम जपा पासून आणि अज्ञानी गुरूं पासून होऊ शकत नाही.**

**आंशिक अमृतवाणी महला पहला (गुरू ग्रंथ साहेबमधील पान क्र. ३५९ व ३६०)**

सिव नगरी महि आसणि बैसउ कलप त्यागी वादं।(१)
सिंडी सबद सदा धुनि सोहै अहिनिसि पुरै नादं। (२)
हरि कीरति रह रासि हमारी गुरु मुख पंथ अतीत (३)
सगली जोति हमारी संमिआ नाना वरण अनेकं।
कह नानक सुणि भरथरी जोगी पारब्रह्म लिव एकं।।(४)

**भावार्थ :– या अमृतवाणीमध्ये श्री नानक साहेबजी म्हणत आहेत, की हे भरथरी योगीजी, आपली साधना भगवान शिवापर्यंत आहे. त्यामुळे आपल्याला शिवनगरीमध्ये (लोक) स्थान प्राप्त झालेले आहे आणि शरीरामध्ये जे 'सिंगी' शब्द आदी होत आहे, तो याच कमळांचा आहे आणि टेलिव्हिजनसारखा प्रत्येक देवाच्या लोकी शरीरामध्ये ऐकू येत आहे.**

**आम्ही तर एक परमात्मा पारब्रह्म म्हणजेच सर्वांच्या पलीकडे जो पूर्ण परमात्मा आहे, त्या परमात्म्याशी अनन्यभावे एकरूप होतो.**

**आम्ही बाह्य शरीरावर वरवरचा दिखावा (भस्म लावणे, हातामध्येकाठी घेणे) असे काहीही करत नाही. मी तर सर्व प्राण्यांना त्या एका पूर्ण परमात्म्याची संतान समजतो. सर्व काही त्याच शक्तीने चलायमान आहे. आमचा भाव तर सद्गुरूंकडून खरे नाम (सत्यनाम) प्राप्त करून त्याचा जप करण्याचा आहे आणि क्षमा करणे हा आमचा धर्म (बाणा) आहे. मी तर पूर्ण परमात्म्याचा उपासक आहे आणि पूर्ण सद्गुरूंचा भक्तिमार्ग यापेक्षा वेगळाच आहे.**

**अमृतवाणी राग आसा महला १ (गुरू ग्रंथ साहेबमधील पान क्र. ४२०)**

।। आसा महला १ ।। जिनी नामु विसारिआ दूजै भरमि भुलाई। मुलू छोड़ि डाली लगे किआ पावहि छाई ।।१ ।। साहिबु मेरा एकु है अवरू नहीं भाई। किरपा ते सुखु पाइआ साचे परथाई ।।३ ।। गुर की सेवा सो करे जिसु आपि कराए। नानक सिरु दे छुटीऐ दरगह पति पाए ।।८ ।।१८ ।।

**भावार्थ : श्री नानक साहेबजी म्हणत आहेत, की जे पूर्ण परमात्म्याचे वास्तविक नाम विसरून अन्य भगवानांच्या नामांचा जप करून भ्रमित झालेले आहेत, ते मूळ (पूर्ण परमात्मा) सोडून फांद्यावरच (त्रिगुणरूपी – रजोगुण–ब्रह्मा, सत्गुण–विष्णू, तमोगुण–शिवजी) सिंचन (पूजा) करत आहेत. या साधनेने कोणतेच सुख प्राप्त होऊ शकत नाही म्हणजेच रोपटे सुकले, वाळून गेले तर आपण त्याच्या सावलीमध्ये बसू शकणार नाही. भावार्थ असा आहे, की शास्त्रविधिरहित साधना केल्याने सर्वकाही व्यर्थच आहे. त्यातून कोणताही लाभ मिळणार नाही. याचे प्रमाण पवित्र गीतेच्या १६ व्या अध्यायातील २३ व २४ व्या श्लोकांमध्येही आहे. या पूर्ण परमात्म्याच्या प्राप्तीसाठी मनमानी साधनेचा त्याग करून पूर्ण सद्गुरुदेवांना समर्पण केल्याने आणि खऱ्या नामाचा (सत्यनामाचा) जप केल्यानेच मोक्ष संभव आहे, नाही तर मृत्यूनंतर नरकमध्ये जावे लागेल.**

**(श्री गुरू ग्रंथ साहेब मधील पान क्र. ८४३–८४४)**

।। बिलावलु महला १ ।। मैं मन चाहु घणा साचि विगासी राम। मोही प्रेम पिरे प्रभु अबिनासी राम ।। अविगतो हरि नाथु नाथह तिसै भावै सो थीऐ। किरपालु सदा दइआलु दाता जीआ अंदरि तूं जीए। मैं आधारु तेरा तू खसमु मेरा मै ताणु तकीआ तेरओ। साचि सूचा सदा नानक गुरसबदि झगरु निबेरओ ।।४ ।।२ ।।

**या अमृतवाणीमध्ये श्री नानक साहेबजी म्हणत आहेत, की अविनाशी पूर्ण परमात्मा तर नाथांचेही नाथ आहेत म्हणजेच देवांचेही देव आहेत. (सर्व प्रभूंचे श्री ब्रह्माजी, श्री विष्णूजी, श्री शिवजी आणि ब्रह्म व परब्रह्म यांचेही नाथ आहेत, स्वामी आहेत.) मी तर खरे नाम (सत्यनाम) हृदयामध्ये सामावून घेतले आहे. हे परमात्मा! सर्व प्राणिमात्रांच्या जीवनाचा आधारसुद्धा आपणच आहात. मी आपलाच आश्रित आहे. आपणच माझे स्वामी (मालक) आहात. आपणच गुरु रूपामध्ये येऊन सत्यभक्तीचे निर्णायक ज्ञान देऊन सर्व वादविवाद नष्ट केले आहेत आणि सर्व शंकांचे समाधान केले आहे.**

**(श्री गुरू ग्रंथ साहेबमधील पान क्र. ७२१, राग तिलंग, महला १)**

'यक अर्ज गुफतम् पेश तो दर कून करतार।
हक्का कबीर करीम तू बेअब परवरदिगार।
नानक बुगोयद जन तुरा तेरे चाकरां पाखाक।'

**या अमृतवाणीमधून स्पष्ट केलेले आहे, की हे (हक्का कबीर) आपण सत्कबीर (कून करतार) शब्दशक्तीद्वारे रचना करणारे, शब्दस्वरूपी प्रभू म्हणजेच सर्व सृष्टीचे रचनाकार आहात. आपणच वास्तविक निर्विकार (परवरदिगार), सर्वांचे पालनकर्ता, दयाळू प्रभू आहात. मी आपल्या दासांचाही दास आहे.**

**(श्री गुरू ग्रंथ साहेब मधील पान क्र. २४, राग सीरी महला १)**

तेरा एक नाम तारे संसार, मैं ऐहो आस ऐहो आधार।
नानक नीच कहैं बिचार, धाणक रूप रहा करतार।।

**या अमृतवाणीमध्ये प्रमाणित केले आहे, की जे काशीमध्ये धाणक (विणकर) रूपात आहेत, तेच (करतार) कुळाचे सृजनहार (निर्माता) आहेत. अतिभावूक होऊन श्री नानकसाहेबजी म्हणत आहेत, की मी सत्य सांगत आहे, की धाणक (विणकर) म्हणजेच कबीर जुलाहाच (विणकरच) पूर्ण ब्रह्म (सत्पुरुष) आहेत.**

**विशेष :- या प्रमाणांच्या सांकेतिक ज्ञानावरून सृष्टिरचना कशी झाली, हे स्पष्ट होते. आता मात्र पूर्ण परमात्म्याची प्राप्ती केली पाहिजे आणि हे पूर्ण संतांकडून नामोपदेश घेऊनच शक्य आहे.**

## ''अन्य संतांद्वारे सृष्टिरचनेची दंतकथा''

**अन्य संतांनी जे सृष्टिरचनेचे ज्ञान सांगितले आहे ते कसे आहे, ते कृपया वाचा. सृष्टिरचनेच्या विषयाबाबत राधास्वामी पंथातील संतांचे व धन-धन सद्गुरू पंथाच्या संतांचे विचार :-**

**पवित्र पुस्तक जीवनचरित्र परम संत बाबा जयमल सिंहजी महाराज पान नं. १०२ व १०३ वरून 'सृष्टि की रचना' (सावन कृपाल पब्लिकेशन, दिल्ली)**

''पहले सत्पुरुष निराकार था, फिर इजहार (आकार) में आया तो ऊपर के तीन निर्मल मण्डल (सत्लोक-अलखलोक, अगमलोक) बन गया तथा प्रकाश तथा मंडलों का नाद (धुनि) बन गया।''

**पवित्र पुस्तक सारवचन (नसर) प्रकाशक :- राधास्वामी सत्संग सभा, दयालबाग, आगरा, 'सृष्टि की रचना' पृष्ठ ८ :-**

''प्रथम धूंधूकार था। उसमें पुरुष सुन्न समाध में थे। जब कुछ रचना नहीं हुई थी। फिर जब मौज हुई तब शब्द प्रकट हुआ और उससे सब रचना हुई, पहले सतलोक और फिर सतपुरुष की कला ये तीन लोक और सबविस्तार हुआ।''

**हे ज्ञान तर असे आहे, की कोणी एक तरुण नोकरीच्या मुलाखतीसाठी गेला. त्याला अधिकाऱ्याने विचारले, की आपण महाभारत वाचले आहे का? तरुणाने उत्तर दिले, की ते तोंडपाठ आहे. अधिकारी म्हणाला, की पाच पांडवांची नावे सांग. तरुण म्हणाला, की एक भीम होता, एक त्याचा मोठा बंधू (भाऊ) होता, एक त्याचा छोटा भाऊ होता, आणखी एक होता**

आणि आणखी एकाचे नाव मी विसरलो आहे. या सृष्टिरचनेचे ज्ञान तर असेच आहे.

सत्पुरुष व सत्लोकाची महिमा सांगणारे व पाच नावे (ओंकार-ज्योति निरंजन-रंरकार-सोहं-सत्यनाम) प्रदान करणारे व तीन नावे (अकालमूर्ती-सत्पुरुष-शब्दस्वरूपी राम) देणाऱ्या संतांनी रचलेल्या पुस्तकांमधील काही निष्कर्ष :

संतमत प्रकाश भाग ३ पान ७६ वर लिहिलेले आहे, की सच्चखण्ड किंवा सत्नाम चौथा लोक (धाम) आहे. येथे सत्नामाला स्थान असे संबोधलेले आहे. नंतर या पवित्र पुस्तकाच्या पान नं. ७९ वर लिहिलेले आहे, की एक राम नावाचा दशरथाचा मुलगा, दुसरा राम मन, तिसरा राम ब्रह्म, चौथा राम सत्नाम आणि हाच खरा राम आहे. नंतर पवित्र पुस्तक 'संतमत प्रकाश'च्या पहिल्या भागातील पान नं.१७ वर लिहिलेले आहे, की ते सत्लोक आहे, त्यालाच सत्नाम म्हटले जाते. पवित्र पुस्तक 'सारवचन नसर यानि वार्तिक' च्या पान नं. तीनवर लिहिलेले आहे, की आता असे समजले पाहिजे, की राधा स्वामी पद सर्वांत वरचे (उंच/श्रेष्ठ) स्थान आहे, ज्याला संतांनी सत्लोक आणि सच्चखंड आणि सारशब्द आणि सत्शब्द आणि सत्नाम आणि सत्पुरुष म्हटले जाते. आग्रा येथून प्रकाशित पवित्र पुस्तक सार वचन (नसर) यात वार्तिक पान नं. तीनवर लिहिलेले आहे, की आता समजले पाहिजे, की राधा स्वामी पद सर्वांत उंच मुक्कामी आहे. त्याला संतांनी सत्लोक, सच्चखंड आणि सारशब्द, सत्शब्द आणि सत्नाम आणि सत्पुरुष असे सांगून प्रमाणित केले आहे. ''पवित्र पुस्तक सार वचन (नसर) आग्रा येथून प्रकाशित पान नं. चारवरही हे वर्णन जसेच्या तसे आहे. पवित्र पुस्तक 'सच्चखण्ड की सडक'च्या पान नं. २२६ वर वर्णन आहे, की संतांचा देश सच्चखण्ड किंवा सत्लोक आहे, त्यालाच सत्नाम, सत्शब्द, सारशब्द असे म्हटले जाते.''

विशेष :- या व्याख्या अशा वाटतात, की जसे कोणी जीवनामध्ये शहर पाहिलेले नाही, मोटार, पेट्रोल, ड्रायव्हरचे ज्ञान नाही, की ड्रायव्हर कोणाला म्हणतात आणि ती व्यक्ती अन्य सहकाऱ्यांना सांगत आहे, की मी शहरामध्ये जातो, मोटारीमध्ये बसून फिरण्याचा आनंद घेतो. यावर त्याच्या मित्रांनी त्याला विचारले, की मोटार कशी होती? पेट्रोल कसे होते आणि ड्रायव्हर कसा होता? शहर कसे होते? यावर त्याने उत्तर दिले, की शहर म्हणा नाही तर मोटार म्हणा, सगळ्या गोष्टी एकच. शहर हेच मोटार आहे आणि पेट्रोलसुद्धा मोटारच म्हणतात. ड्रायव्हरसुद्धा मोटारीलाच म्हणतात. रस्त्यालासुद्धा मोटारच म्हणतात.

आता विचार करा :- सत्पुरुष तर पूर्ण परमात्मा आहेत. सत्नाम हे दोन मंत्रांचे नाव आहे, ज्यामध्ये एक ओ३म + तत् सांकेतिक आहे आणि त्यानंतर सारनाम साधकाला पूर्ण गुरूंकडून दिले जाते. हे सत्नाम आणि सारनाम दोन्ही स्मरण करण्याची (जपाची) नावे आहेत. सत्लोक हे असे स्थान आहे, जेथे सत्पुरुष वास्तव्य करतात. पुण्यात्मांनो, आता तुम्ही स्वतःच नर्णय करा, की यातील सत्य काय आणि असत्य काय आहे?

❑❑❑

# ''भक्ती मर्यादा''

## ''नामदीक्षा घेणाऱ्या व्यक्तींसाठी आवश्यक माहिती''

**१. पूर्ण गुरूंची ओळख :-**

आजच्या कलियुगात पूर्ण गुरू कोण, हे ओळखणे हा भक्त समाजापुढे एक कठीण प्रश्न आहे. परंतु याचे थोडक्यात आणि अत्यंत सोपे उत्तर आहे, की जे गुरू शास्त्रांच्या अनुसार भक्ती करतात व आपल्या अनुयायांकडून करवून घेतात, तेच पूर्ण संत आहेत. कारण कबीर साहेबांची वाणी, नानक साहेबांची वाणी, वेद, गीता, पुराण, कुर्आन, पवित्र बायबल आदी भक्तिमार्गाचे संविधान म्हणजेच पवित्र धार्मिक शास्त्रच आहेत. जो संत शास्त्रानुसार भक्तिसाधना सांगतो, त्यानुसारच भक्त समाजाला मार्गदर्शन करतो, तोच पूर्ण संत आहे आणि जो शास्त्रांविरुद्ध साधना करवून घेतो, तो भक्त समाजाचा घोर शत्रू आहे. तो या अनमोल मनुष्य जन्माशी वाईटरीत्या खेळत आहे. अशा गुरू किंवा संताला भगवानाच्या दरबारामध्ये घोर नरकात उलटे लटकवले जाईल.

उदाहरण द्यायचे झाले तर एखाद्या अध्यापकाचे देता येईल. जो अध्यापक विद्यार्थ्यांना पाठ्यक्रमाच्या बाहेरचेच शिक्षण देत असेल, तर तो त्या विद्यार्थ्यांचा शत्रूच म्हणावा लागेल.

भगवत गीतेच्या ७ व्या अध्यायातील १५ वा श्लोक

न, माम्, दुष्कृतिनः, मूढाः, प्रपद्यन्ते, नराधमाः,
मायया, अपहृतज्ञानाः, आसुरम्, भावम्, आश्रिताः ।।

**अनुवाद :-** मायाद्वारे ज्यांचे ज्ञानहरण झालेले आहे, असे आसुर स्वभाव धारण केलेले मनुष्य नीच दूषित कर्म करणारे मूर्ख माझी पूजा करत नाहीत म्हणजेच ते तीन गुणांची (रजोगुणी-ब्रह्मा, सत्गुणी-विष्णू, तमोगुणी-शिव) साधना करत बसतात. यजुर्वेदाच्या ४० व्या अध्यायातील १० वा श्लोक (संत रामपालदासद्वारे भाषा-भाष्य)

अन्यदेवा हुः सम्भवादन्यदाहुरसम्भवात्, इति शुश्रुम धीराणां ये नस्तद्विचचक्षिरे ।।१० ।।

**अनुवाद :** सामान्यतः परमात्म्याविषयी निराकार म्हणजेच कधीही न जन्म घेणारा (अजन्मा) म्हटले जाते. काही जण आकारामध्ये म्हणजेच जन्म घेऊन अवतार रूपामध्ये येणारा म्हणतात. जे नित्य म्हणजेच पूर्णज्ञानी चांगल्याप्रकारे सांगतात, तेच योग्यप्रकारे समरूप अर्थात यथार्थ रूपामध्ये भिन्न भिन्न रूपाने प्रत्यक्ष ज्ञान देतात.

गीतेच्या ४ थ्या अध्यायातील ३४ वा श्लोक

तत्, विद्धि, प्रणिपातेन, परिप्रश्नेन, सेवया,
उपदेक्ष्यन्ति, ते, ज्ञानम्, ज्ञानिनः, तत्वदर्शिनः ।।

**अनुवाद :** त्या पूर्ण परमात्म्याचे ज्ञान व त्यासंबंधीच्या प्रश्नांचे समाधान करू शकणाऱ्या संतांना नतमस्तक होऊन दंडवत घातल्याने, त्यांची सेवा केल्याने आणि निष्कपटपणे सरलतापूर्वक प्रश्न केल्याने परमात्मतत्त्व पूर्णपणे जाणणारे ज्ञानी महात्मा तुला त्या तत्त्वज्ञानाचा उपदेश करतील, हे तू पूर्णपणे समजून घे.

**२. नशिल्या (उत्तेजक, उन्मादक) वस्तूंचे सेवन निषिद्ध :-**

हुक्का, मद्य (दारू), बीअर, तंबाखू, बिडी, सिगारेट, गुटखा, अफू, गांजा, मांस, अंडी आदी नशिल्या वस्तूंचे सेवन तर दूरच, अशा नशिल्या उत्तेजक वस्तू कोणाला आणूनसुद्धा द्यायच्या नाहीत. बंदी छोड गरीबदासजी महाराज या सर्व अमली वस्तूंना अत्यंत वाईट असे

**सांगताना आपल्या वाणीमध्ये म्हणत आहेत की:-**

सुरापान मद्य मांसाहारी, गमन करै भोगैं पर नारी। सतर जन्म कटत है शीशं, साक्षी साहिब है जगदीशं।।
परद्वारा स्त्री का खोलै, सतर जन्म अंधा हावै डोलै। मदिरा पीवै कड़वा पानी, सत्तर जन्म श्वान के जानी।।
गरीब, हुक्का हरदम पिवते, लाल मिलावैं धूर। इसमें संशय है नहीं, जन्म पिछले सूर।।१।।
गरीब, सो नारी जारी करै, सुरा पान सौ बार। एक चिलम हुक्का भरै, डुबै काली धार।।२।।
गरीब, सूर गऊ कुं खात है, भक्ति बिहुनें राड। भांग तम्बाखू खा गए, सो चाबत है हाड।।३।।
गरीब, भांग तम्बाखू पीव हीं, सुरा पान सैं हेत। गौस्त मट्टी खाय कर, जंगली बनें प्रेत।।४।।
गरीब, पान तम्बाखू चाब हीं, नास नाक में देत। सो तो इरानै गए, ज्यूं भड़भूजे का रेत।।५।।
गरीब, भांग तम्बाखू पीव हीं, गोस्त गला कबाब। मोर मृग कूं भखत है, देगें कहां जवाब।।६।।

**३. तीर्थस्थानांना जाणे निषिद्ध :- कोणत्याही प्रकारचे व्रतवैकल्य करायचे नाही. कोणत्याही तीर्थयात्रेस जायचे नाही. गंगास्नान वगैरेसारखे कोणतेही स्नान करायचे नाही. कोणत्याही धार्मिक स्थळावर स्नानासाठी किंवा दर्शनासाठी जायचे नाही, कोणत्याही मंदिरामध्ये देव आहे असे समजून मंदिर व तीर्थस्थानी पूजा व भक्तीच्या भावाने जायचे नाही. पुजाऱ्यांनी मंदिरामध्ये बांधून ठेवावा असा देव कोणतेही जनावर नाही. तो तर कणाकणांत व्यापलेला आहे. या सर्व साधना शास्त्रांविरुद्ध आहेत.**

**जरा विचार करून पाहा, की ही सर्व तीर्थस्थळे (जगन्नाथ मंदिर, बद्रिनाथ, हरिद्वार, मक्का-मदिना, अमरनाथ, वैष्णोदेवी, वृंदावन, मथुरा, बरसाना, अयोध्येचे राम मंदिर, काशीधाम, छुडानीधाम आदी) मंदिर, मशीद, गुरुद्वारा, चर्च व इष्ट धाम आदी स्थळांवर एकेकाळी कोणी संत राहत होते? तेथे त्यांनी भक्तिसाधना केली, आपले भक्तिरूपी धन जमवले आणि शरीराचा त्याग करून आपल्या ईष्ट देवांच्या लोकी निघून गेले. त्यानंतर त्यांच्या स्मृती जपण्यासाठी त्या ठिकाणी कोणी मंदिर, कोणी मशीद, कोणी गुरुद्वार, कोणी चर्च, तर कोणी धर्मशाळा इत्यादींची रचना केली. भक्तिसाधना करणाऱ्यांची कायम स्मृती राहील आणि सर्वसामान्यांना जसे या महान आत्म्यांनी कर्म केलेले आहे, तसे आपणसुद्धा करायला हवे याचे प्रमाण मिळत राहील हाच त्यामागील उद्देश आहे. ही सर्वच धार्मिक स्थळे आपल्या सर्वांना हाच संदेश देतात, की जशी भक्तिसाधना या प्रसिद्ध संतांनी केलेली आहे, तशीच आपणही केली पाहिजे. त्यासाठी आपण अशाप्रकारे साधना करणाऱ्या व सांगणाऱ्या संतांचा शोध घ्या व नंतर ते जसे सांगतील तसेच आचरण करा. नंतर मात्र अशा स्थानांचीच सर्व जण पूजा करू लागले. हे पूर्णपणे व्यर्थ आणि शास्त्रांविरुद्ध आहे.**

**ही सर्व स्थाने तर अशा स्थानासारखी आहेत, जेथे एखाद्या हलवायाने भट्टी बनवून जिलेबी, लाडू, मिठाई आदी पदार्थ बनवून स्वतः, आपल्या नातेवाइकांना, मित्रांना खाऊ घातले आहेत आणि निघून गेला आहे. आता त्या स्थानावर हलवाईही नाही आणि मिठाईसुद्धा नाही. तेथे उरली आहे ती केवळ भट्टी. ती भट्टी आपणाला मिठाई बनवायला शिकवू शकत नाही, की मिठाईने आपले पोटही भरू शकत नाही. आता एखादा म्हणाला, की चला रे, मी तुम्हाला ती भट्टी दाखवून आणतो जेथे एका हलवायाने कधी काळी मिठाई बनवलेली होती. चला जाऊन येऊ या. तेथे जाऊन आपण भट्टी बघितली आणि सात प्रदक्षिणाही घातल्या. काय हो, आपल्याला मिठाई मिळाली का? आपल्याला मिठाई बनविण्याची प्रक्रिया सांगणारा हलवाई तेथे भेटला का? नाही. मग यासाठी आपणाला तसाच हलवाई शोधावा लागेल, जो अगोदर आपणाला मिठाई खाऊ घालेल आणि ती बनविण्याची प्रक्रियाही सांगेल. त्यानंतर मात्र तो हलवाई जे सांगेल, तेच करावे लागेल, अन्य नाही.**

**अगदी अशाचप्रकारे तीर्थस्थानी पूजा करत व्यर्थ वाऱ्या घालण्यापेक्षा जे शास्त्रानुसार पूर्ण परमात्मा कबीर साहेबांची भक्ती करतात व सांगतात, अशा संतांचा शोध घ्यावा. ते जसे सांगतील अगदी तसेच करावे. आपल्या मनाप्रमाणे काहीही करू नये.**

**'सामवेद' संख्या नं. १४०० उतार्चिक अध्याय नं. १२, खंड नं. ३, श्लोक नं. ५ (संत रामपाल दास द्वारे भाषा-भाष्य):-**

भद्रा वस्त्रा समन्या३वसानो महान् कविर्निवचनानि शंसन्।
आ वच्यस्व चम्बोः पूयमानो विचक्षणो जागृविर्देववीतौ ।।५ ।।

**अनुवाद :- चतुर व्यक्तींनी आपल्या वचनाद्वारे पूर्ण परमात्म्यांच्या (पूर्ण ब्रह्म) पूजेचा सत्यमार्ग न बघता, अमृतस्थानी असलेली उपासना सोडून सामान्य उपासना (भूत-पिशाच्च, पूजा, श्राद्ध घालणे, तीन गुणांची पूजा (रजोगुणी-ब्रह्मा, सत्गुणी-विष्णू, तमोगुणी-शंकर), तसेच ब्रह्म-कालची पूजा, मंदिर, मशीद, गुरुद्वारा, चर्च, तीर्थस्थानी जाणे, उपवास आदी उपासना) करणे म्हणजेच जखमेतून किंवा फोडातून निघणाऱ्या पूसमान घाणीचे आदरयुक्त आचमन (ग्रहण) केल्यासारखेच असते. याच कारणास्तव परमसुखदायक पूर्ण ब्रह्म कबीर साहेब सशरीर साधारण वेशभूषेमध्ये ('वस्त्र' याचा अर्थ 'वेशभूषा' असा आहे. संतांच्या भाषेत याला 'चोला'सुद्धा (शरीर) म्हटले जाते. एखाद्या संताने शरीराचा त्याग केला, तर महात्मा चोला (शरीर) सोडून गेले, असे म्हटले जाते.) सत्लोकीच्या शरीरासारखे दुसरे कमी तेजःपुंज असणारे शरीर धारण करून सर्वसामान्य व्यक्तीसारखे जीवन जगून काही दिवस या संसारामध्ये राहून आपल्या शब्द-साखी यांच्या माध्यमातून इतरांना ज्ञात नसलेल्या सत्यज्ञानाचा उलगडा करतात आणि पूर्ण परमात्म्याचे लपलेले वास्तविक सत्यज्ञान आणि भक्ती जागृत करतात.**

**गीतेच्या १६ व्या अध्यायातील २३ वा श्लोक**

यः, शास्त्रविधिम्, उत्सृज्य, वर्तते, कामकारतः, न, सः,
सिध्दिम्, अवाप्नोति, न, सुखम्, न, पराम्, गतिम्।।

**अनुवाद :- जी व्यक्ती शास्त्रविधींचा त्याग करून आपल्या इच्छेने मन मानेल तसे अयोग्य आचरण करते, त्याला कोणतीही सिद्धी प्राप्त होत नाही, परमगती मिळत नाही किंवा सुखही प्राप्त होत नाही.**

**गीतेच्या ६ व्या अध्यायातील १६ वा श्लोक**

न, अति, अश्नतः, तु, योगः, अस्ति, न, च, एकान्तम्,
अनश्नतः, न, च, अति, स्वप्नशीलस्य, जाग्रतः, न, एव, च, अर्जुन।।

**अनुवाद :- हे अर्जुना! हा योग अर्थात भक्ती अतिशय खाणाऱ्यांना किंवा काहीच न खाणाऱ्यांना, तसेच एकाच जागी बसून साधना करणाऱ्याला तथा तसेच खूप झोपणाऱ्याला किंवा नेहमी जागे राहणाऱ्या व्यक्तींनाही सिद्ध होत नाही.**

पूजैं देई धाम को, शीश हलावै जो। गरीबदास साची कहै, हद काफिर है सो ।।
कबीर, गंगा काठै घर करै, पीवै निर्मल नीर। मुक्ति नहीं हरि नाम बिन, सत्गुरु कहैं कबीर।।
कबीर, तीर्थ कर-कर जग मूवा, उडै पानी न्हाय। राम ही नाम ना जपा, काल घसीटे जाय।।
गरीब, पीतल ही का थाल है, पीतल का लोटा। जड़ भूरत को पूजतें, आवैगा टोटा।।
गरीब, पीतल चमच्चा पूजिये, जो थाल परोसै। जड़ मूरत किस काम की, मति रहो भरोसै।।
कबीर, पर्वत पर्वत मैं फिर्या, कारण अपने राम । राम सरीखे जन मिले, जिन सारे सब काम।।

**४. पितरांची पूजा, श्राद्ध निषेध : कोणत्याही प्रकारची पितरपूजा, श्राद्ध घालणे असे कोणतेही विधी करायचे नाहीत. भगवान श्रीकृष्ण जींनीसुद्धा पितरांची व भूत-पिशाच्चांची पूजा करण्यास स्पष्टपणे मनाई केलेली आहे. गीतेच्या ९ व्या अध्यायातील २५ व्या श्लोकामध्ये म्हटले आहे, की :-**

यान्ति, देवव्रता:, देवान्, पितृऋन्, यान्ति, पितृव्रता:। भूतानि, यान्ति, भूतेज्या:, मद्याजिन:, अपि, माम्।

**अनुवाद :- देवी-देवतांची पूजा करणारे देवी-देवतांना प्राप्त होतात, पितरांची पूजा करणारे पितरांना प्राप्त होतात, भूत-पिशाच्चांची पूजा करणारे भूत-पिशाच्चांना प्राप्त होतात आणि माझ्या मतानुसार माझी पूजा करणारे भक्त मलाच प्राप्त होतात.**

**बंदी छोड गरीबदासजी महाराज आणि कबीर साहेबजी महाराज सुद्धा म्हणतात, की :-**

''गरीब, भूत रमै सो भूत है, देव रमै सो देव। राम रमै सो राम है, सुनो सकल सुर भेव।।''

**यासाठी त्याच (पूर्ण परमात्मा) परमेश्वराची भक्ती करा, ज्याच्याकडून पूर्ण मुक्ती मिळते. तो परमात्मा म्हणजे पूर्ण ब्रह्म सत्पुरुष (सत् कबीर) आहेत. याचे प्रमाण गीतेच्या १८ व्या अध्यायातील ४६ व्या श्लोकामध्ये आहे. ।।६३।।**

यत: प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम्।
स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिध्दिं विन्दति मानव: ।।४६।।

**अनुवाद :- ज्या परमेश्वरापासून संपूर्ण प्राण्यांची उत्पत्ती झालेली आहे आणि समस्त विश्व ज्याने व्यापलेले आहे, त्या परमेश्वराची आपल्या स्वाभाविक कर्मांद्वारे पूजा करून मनुष्यास परमसिद्धी प्राप्त होते.**

**गीतेच्या १८ व्या अध्यायातील ६२ वा श्लोक**

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत।
तत्प्रसादात्परां शान्तिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम्।।६२।।

**अनुवाद :- हे भरतवंशोद्भव अर्जुना! तू सर्वस्व भावाने त्या ईश्वराला शरण जा. त्यांच्या कृपेने तुला परमशांती, (संसारापेक्षा सर्वथा वेगळी) आणि अविनाशी परमपद प्राप्त होईल.**

**सर्वस्व भावाचे तात्पर्य असे आहे, की कोणतीही अन्य पूजा न करता मन-कर्म-वचन यांनी एका ईश्वरावर श्रद्धा ठेवणे.**

**गीतेच्या ८ व्या अध्यायातील २२ वा श्लोक**

पुरुष: स पर: पार्थ भक्त्या लभ्यस्त्वनन्यया।
यस्यान्त: स्थानि भूतानि येन सर्वमिदं ततम् ।। २२।।

**अनुवाद :- हे पृथानंदन अर्जुना! सर्व प्राणी ज्याच्या अंतर्गत आहेत आणि ज्याने हा संपूर्ण संसार व्यापलेला आहे, तो परमपुरुष परमात्मा तर अनन्यभावे भक्ती केल्यानेच प्राप्त होणे संभव आहे.**

**अनन्यभावे भक्ती याचे तात्पर्य असे आहे, की एका परमेश्वराची (पूर्ण ब्रह्म) भक्ती करणे. दुसऱ्या देवी-देवता म्हणजेच त्रिगुणांची (रजोगुणी-ब्रह्मा, सत्गुणी-विष्णू, तमोगुणी-शिव) भक्ती करू नये. गीतेच्या पंधराव्या अध्यायातील १ ते ४ श्लोक :-**

**गीतेच्या १५ व्या अध्यायातील १ ला श्लोक**

उर्ध्वमूलम्, अध:शाखम्, अश्वत्थम्, प्राहु:, अव्ययम्,

छन्दांसि, यस्य, पर्णानि, यः, तम्, वेद, सः, वेदवित् ।।

**अनुवाद :- वरील बाजूला मूळ आणि खालील बाजूला फांद्या असलेला अविनाशी जो विस्तृत संसार रुपी पिंपळाचे वृक्ष आहे, जो घोड्यासारखा मजबूत असून ज्याचे छोटे-छोटे भाग म्हणजेच शाखा (फांद्या) व पाने असे विभाग म्हटले आहे, त्या संसाररूपी वृक्षाला जो अशाप्रकारे जाणतो, तो भक्त पूर्ण ज्ञानी आहे.**

**गीतेच्या १५ व्या अध्यायातील २ रा श्लोक**

अधः, च, उर्ध्वम्, प्रसृताः, तस्य, शाखाः, गुणप्रवृध्दाः, विषयप्रवालाः,
अधः, च, मूलानि, अनुसन्ततानि, कर्मानुबन्धीनि, मनुष्यलोके ।।

**अनुवाद :- त्या वृक्षाची खाली आणि वर त्रिगुणरूपी (ब्रह्मा-रजोगुण, विष्णू-सतगुण, शिव-तमोगुण) विस्तारलेल्या विकार-काम, क्रोध, मोह, लोभ, अहंकार रूपी कोवळ्या फांद्या आहेत, ब्रह्मा, विष्णू, शिव जीवांना कर्मामध्ये बांधणारी ही मुळे अर्थात मूळ कारण आहेत. तसेच मनुष्यलोक, स्वर्ग, नरक हे तिन्ही लोक पृथ्वी लोकात खाली (८४ लक्ष योनींमध्ये) आणि वर स्थित केलेले आहेत.**

**गीतेच्या १५ व्या अध्यायातील ३ रा श्लोक**

न, रूपम, अस्य, इह, तथा, उपलभ्यते, न अन्तः, न, च, आदिः, न, च,
सम्प्रतिष्ठा, अश्वत्थम्, एनम्, सुविरूढमूलम्, असंगशस्त्रेण, दृढेन, छित्वा ।।

**अनुवाद :- (अस्य) या रचनेची (न) नाही (आदि) सुरवात (च) आणि (न) नाही (अन्तः) शेवट आहे (न) नाही (तथा) तसे (रूपम) स्वरूप (उपलभ्यते) प्राप्त होते (च) आणि (इह) येथे विचार कालद्वारे म्हणजेच माझ्याद्वारे दिल्या जाणाऱ्या गीताज्ञानाची पूर्ण माहिती (ज्ञान) मलाही (न) नाही. (सम्प्रतिष्ठा) कारण सर्व ब्रह्मांडांची रचना चांगल्या/योग्यप्रकारे स्थित आहे का, याचे मलाही ज्ञान नाही. (एतम्) या (सुविरुढमलूम्) चांगल्याप्रकारे स्थायी/नित्य स्थिती असणारा (अश्वत्थम्) मजबूत स्वरूपाचा (असंङ्गशस्त्रेण) पूर्ण ज्ञानरूपी (दृढेन) दृढ सूक्ष्म वेद म्हणजेच तत्त्वज्ञानाद्वारे जाणून (छित्वा) छाटून/कापून म्हणजेच निरंजनाच्या भक्तीला क्षणिक अर्थात क्षणभंगूर जाणून ब्रह्मा, विष्णू, शिव, ब्रह्म आणि परब्रह्मच्या पुढे/वरील पूर्ण ब्रह्मचा शोध घेतला पाहिजे.**

**गीतेच्या १५ व्या अध्यायातील ४ था श्लोक**

ततः पदं तत्परिमार्गितव्यं यस्मिन्गता न निवर्तन्ति भूयः ।
तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्ये यतः प्रतृत्ति प्रसृता पुराणी ।।४।।

**अनुवाद :- त्यानंतर त्या परमपद परमात्म्याचा शोध घेतला पाहिजे. ज्यांना प्राप्त झालेले मानव परत या नाशवान संसारामध्ये येत नाहीत आणि ज्यांच्यापासून अनादिकाळापासून चालत आलेली ही सृष्टी विस्तारलेली आहे, त्या आदिपुरुष परमात्म्यालाच मी शरण आहे.**

**अशाप्रकारेच स्वतः भगवान श्रीकृष्णाने देवी-देवतांचा राजा इंद्र याच्या पूजेचासुद्धा त्याग करून त्या परमात्म्याची भक्ती करण्याचीच प्रेरणा दिलेली होती, ज्यामुळे त्यांनी गोवर्धन पर्वत उचलून इंद्राच्या कोपापासून व्रजवासीयांचे (गोकुळ) रक्षण केले.**

गरीब, इन्द्र चढ़ा ब्रज डुबोवन, भीगा भीत न लेव।
इन्द्र कढाई होत जगत में, पूजा खा गए देव।।

कबीर, इस संसार को, समझाऊँ कै बार।
पूँछ जो पकड़ै भेढ की, उतरा चाहै पार।।

**५. गुरुआज्ञेचे पालन :- गुरुदेवजींच्या आज्ञेशिवाय घरामध्ये कोणत्याही प्रकारचे धार्मिक अनुष्ठान करू नये. याबाबत बंदी छोड आपल्या वाणीमध्ये म्हणतात, की :-**

''गुरु बिन यज्ञ हवन जो करही, मिथ्या जावे कबहु नहीं फलहीं।''
कबीर, गुरु बिन माला फेरते, गुरु बिन देते दान।
गुरु बिन दोनों निष्फल हैं, पूछो वेद पुराण।।

**६. समाधी पूजन निषिद्ध :- आपल्या शेतामधील समाधी किंवा कोणत्याही खेड्यामधील एखाद्या स्थानांवरील समाधी अथवा अन्य देवतांच्या समाधीची पूजा करू नये. समाधी कोणाचीही असो, अजिबात तिची पूजा करायची नाही. इतर कोणत्याही उपासना करू नये. त्रिगुणांचीदेखील (ब्रह्मा, विष्णू, महेश) पूजा करायची नाही. केवळ सद्गुरुजींनी सांगितल्याप्रमाणेच आचरण करायचे आहे.**

**गीतेच्या ७ व्या अध्यायातील १५ वा श्लोक**

न, माम्, दुष्कृतिनः, मूढाः, प्रपद्यन्ते, नराधमाः,
मायया, अपहृतज्ञानाः, आसुरम्, भावम्, आश्रिताः ।।

**अनुवाद :- मायेद्वारे ज्यांचे ज्ञानहरण झालेले आहे, असे आसुर स्वभाव धारण केलेले मनुष्य, नीच, दूषित कर्म करणारे मूर्ख, माझी पूजा करत नाहीत. ते तिन्ही गुणांचीच (रजोगुण-ब्रह्मा, सत्गुण-विष्णू, तमोगुण-शिव) साधना करत बसतात.**

कबीर, माई मसानी शेढ शीतला, भैरव भूत हनुमंत। परमात्मा उनसे दूर है, जो इनको पूजंत।।
कबीर, सौ वर्ष तो गुरु की सेवा, एक दिन आन उपासी। वो अपराधी आत्मा, परै काल की फांसी।। गुरु को तजै भजै जो आना। ता पसुवा को फोकट ज्ञाना।।

**७. कबीरसाहेब संकटमोचन आहेत :- कर्मभोगाचा त्रास झाल्यास, संकट आल्यानंतर कोणत्याही अन्य इष्ट देवतांची किंवा समाधींची पूजा कधीच करायची नाही. कोणत्याही प्रकारचे अन्य वाचन, पारायणे, व्रत करायचे नाही आणि कोणत्याही मांत्रिकास दाखवायचे नाही. केवळ बंदी छोड कबीरसाहेबांची पूजा करायची आहे, जे सर्व दुःखहरण करणारे संकटमोचन आहेत.**

**'सामवेद' संख्या नं. ८२२ उतार्चिक अध्याय ३ खंड नं. ५, श्लोक नं. ८,(संत रामपालदासद्वारा भाषा-भाष्य)**

मनीषिभिः पवते पूर्व्यः कविर्नृभिर्यतः परि कोशां असिष्यदत्।
त्रितस्य नाम जनयन्मधु क्षरन्निन्द्रस्य वायुं सख्याय वर्धयन्।। ८।।

**अनुवाद :- सनातन अर्थात अविनाशी कबीर परमेश्वर हृदयापासून इच्छिणाऱ्या, श्रद्धेने भक्ती करणाऱ्या भक्तात्म्यास तीन मंत्रांचा उपदेश देऊन पवित्र करतात आणि जन्म-मृत्यूपासून सुटका करतात, तसेच त्याचे प्राण म्हणजेच जीवन श्वासांना संस्कारवश रूपाने वाढवितात. त्या रूपाने परमेश्वरा पासून मिळणारा वास्तविक आनंद आपल्या आशीर्वाद प्रसादाने प्राप्त करतात.**

कबीर, देवी देव ठाढे भये, हमको ठौर बताओ। जो मुझ (कबीर) को पुजैं नहीं, उनको लूटो खाओ।
कबीर, काल जो पीसैं पीसना, जोरा है पनिहार। ये दो असल मजूर हैं, सतगुरु के दरबार।

**८. अनावश्यक दान निषेध :- कोठेही आणि कोणालाही दान रूपामध्ये काहीही द्यायचे नाही. पैसे, कपडे असे काहीही द्यायचे नाही. जर कोणी दान रूपामध्ये काही मागत**

असेल, तर त्याला भोजन (अन्नदान) खाऊ घालावे. चहा, दूध, लस्सी, पाणी प्यायला द्या, परंतु वस्तुरूपात काहीही द्यायचे नाही. कदाचित तो भिक्षुक त्या पैशांचा दुरुपयोगही करेल. एखाद्या व्यक्तीकडे भिकाऱ्याने त्याची लहान बाळे उपचाराविना तडफडत आहेत, असे खोटे सांगून काही पैसे मागितले आणि भिकाऱ्याची कथा ऐकून भावनावश होऊन त्या व्यक्तीने भिकाऱ्याला शंभर रुपये दिले. तो भिकारी पूर्वी बाटलीचा पाव भाग दारू पीत होता आणि पैसे मिळाल्यावर त्या दिवशी अर्धी बाटली दारू प्यायला आणि त्याने आपल्या पत्नीला मारहाण केली. त्याच्या पत्नीने बाळासह आत्महत्या केली. येथे तुम्ही केलेले दान त्या परिवाराच्या विनाशाचे कारण बनले. जर अशा एखाद्या दु:खी व्यक्तीला मदत करण्याची तुमची इच्छा असेल, तर त्याच्या बाळाला डॉक्टरांकडे नेऊन औषधे द्या; पण पैसे कधीही देऊ नका.

कबीर, गुरु बिन माला फेरते, गुरु बिन देते दान।। गुरु बिन दोनों निष्फल हैं, पूछो वेद पुरान।।

**९. उष्टे खाणे निषिद्ध :–** ज्या व्यक्ती मद्य, मांस, तंबाखू, अंडे, बीअर, अफीम, गांजा आदींचे सेवन करतात, त्यांचे उष्टे अन्न कधीही खाऊ नये.

**१०. देहांतानंतरचे (सत्यलोक गमन) क्रियाकर्म निषिद्ध :–** जर परिवारातील कोणाचा मृत्यू झाला तर त्यास अग्नि कोणीही देवु शकतो, अग्नि देते वेळेस मंगलाचरण केले पाहिजे. तेथे फुले वगैरे काही उचलाचे नाही. जर ती जागा साफ' करणे गरजेचे असेल तर आपण स्वत: उचलुन वाहत्या पाण्यामधे टाकु शकता. त्यावेळेस मंगलाचरण करावे. पिंडदान, तेरावा, सहामाही, वर्षश्राध्द असे काहीही करु नये. सर्व नातेवाइक व भाउबंधांसाठी दुख: व्यक्त करण्यासाठी एक दिवस निवडावा. त्या दिवशी दररोज करण्याचा नित्यनियम लावावा. मृत्यु झालेल्या व्यक्तिच्या नावाने काही दान धर्म करायचा असेल तर गुरुजींची आज्ञा घेउन बंदी छोड गरीबदास महाराजांचा अमृत'यी वाणीचा अख़ंड पाठ करावा. जर पाठ करण्याची आज्ञा न मिळाल्यास घरामध्ये चार किंवा सात दिवसाची अखंड देशी तुपामध्ये ज्योत लावावी. दिवसातुन ४ वेळ प्रथम मंत्र जप करावा व त्यातील ३ किंवा १ मंत्राचा दान संकल्प करावा. जसे योग्य समजाल तसे १ ते ३ दिवस मंत्र जाप करावा व मंत्र दान संकल्प करावा दररोज हे लक्षात ठेवुन ज्योती, आरती व मंत्र करावा.

कबीर, साथी हमारे चले गए, हम भी चालन हार। कोए कागज में बाकी रह रही, ताते लाग रही वार।।
कबीर, देह पडी तो क्या हुआ, झूठा सभी पटीट। पक्षी उड्या आकाश कूं, चलता कर गया बीट।।

## ''कर्म काण्डा विषयी सत्य कथा''

माझे (संत रामपाल दास यांचे) पूज्य गुरुदेव स्वामी रामदेवानंदजी महाराज यांना सोळाव्या वर्षी एका महात्म्याचा सत्संग ऐकून वैराग्य प्राप्त झाले. एक दिवस ते शेतामध्ये गेले होते. जवळच एक जंगल होते. त्या जंगलामध्ये जाऊन त्यांनी एका मृत जनावराच्या हाडांजवळ आपले कपडे फाडून फेकले आणि ते महात्माजींसोबत निघून गेले.

घरातील व्यक्तींनी जेव्हा त्यांचा शोध घेतला, तेव्हा त्यांना जंगलामध्ये हाडांजवळ त्यांचे फाटलेले कपडे दिसले. घरच्यांना वाटले, की एखाद्या जंगली प्राण्याने त्यांना खाल्ले असावे. त्यांनी ती कपडे आणि हाडे उचलून घरी आणली आणि अंतिम संस्कार केले. त्यानंतर दहावा, तेरावा, वर्षश्राद्ध घालण्यात आले. त्यानंतर प्रत्येक वर्षी श्राद्ध घालणे सुरूच झाले.

जेव्हा माझे पूज्य गुरुदेव अत्यंत वृद्ध झाले, तेव्हा एकदा त्यांच्या स्वत:च्या घरी गेले. त्यावेळी त्यांच्या घरच्यांना समजले, की ते जिवंत आहेत आणि घर सोडून निघून गेलेले होते. घरच्यांनी सांगितले, की जेव्हा तुम्ही घर सोडून गेला, तेव्हा तुमचा फार शोध घेण्यात आला.

शेवटी जंगलामध्ये तुमचे कपडे मिळाले. त्या कपड्यांजवळ काही हाडेही पडलेली दिसली, तेव्हा आम्हाला वाटले, की एखाद्या हिंस्र प्राण्याने तुम्हाला खाऊन टाकले असेल. आम्ही ते कपडे आणि हाडे घरी आणून अंतिम संस्कार केला.

नंतर मी (संत रामपाल दास) माझ्या पूज्य गुरुदेवांच्या लहान बंधूंच्या पत्नीला विचारले, की जेव्हा आमचे पूज्य गुरुदेव घर सोडून निघून गेले, त्यानंतर तुम्ही त्यांच्या माघारी काय केले? तिने सांगितले, की जेव्हा विवाह होऊन मी या घरी आले, तेव्हा त्यांचे श्राद्ध घातले होते. त्यानंतर मी माझ्या स्वत:च्या हातांनी त्यांचे सुमारे सत्तर वेळा श्राद्ध घातले आहे. तिने पुढे सांगितले, की जेव्हा घरामध्ये एखादे नुकसान व्हायचे, म्हणजे म्हशीने दूध न देणे, म्हशीचे सड खराब होणे किंवा अन्य काही तरी नुकसान, त्यावेळी आम्ही एखाद्या शहाण्या मांत्रिकाकडे जायचो. तो म्हणायचा, की तुमच्या घरी कोणाचा तरी निःसंतान, लग्न न होता मृत्यू झालेला आहे. तेच तुम्हाला दुःखी करत आहे. त्यावेळी आम्ही त्या मांत्रिकाला वस्त्रे, धन इत्यादी द्यायचो.

यावर मी (रामपाल दास) म्हणालो, की हे तर जगाचा उद्धार करत आहेत. हे कुठे कोणाला काय दुःख देत होते? ते तर आता सुखदाता आहेत. आता तर ते आपल्यासमोरच आहेत. आता तर श्राद्ध घालणे इत्यादी व्यर्थ साधना बंद करा. तेव्हा त्या म्हणाल्या, की ही तर आमची जुनी परंपरा आहे. हे कसे काय सोडू? याचा अर्थ असा, की ''आपण आपल्या जुन्या रीती-परंपरांमध्ये इतके लीन झालेलो आहोत'' की प्रत्यक्ष प्रमाण असूनही त्या अयोग्य परंपरा आपण सोडू शकत नाही. यावरून हे सिद्ध होते, की श्राद्ध घालणे, पितरपूजा करणे इत्यादी सर्व व्यर्थ आहे.

११. आपत्य जन्मानंतर शास्त्राविरुद्ध पूजा निषिद्ध :- घरामध्ये बाळाचा जन्म झाल्यानंतर पाचवी, सहावी म्हणजेच त्या त्या दिवशी जो विधी केला जातो, तो करू नये. सुतक पाळून दररोजची पूजा, भक्ती, आरती, गावरान तुपाचा दीवा प्रज्वलन करणे इत्यादी बंद करू नये. ते नेहमीप्रमाणे चालू ठेवावे.

या संदर्भात एक संक्षिप्त कथा सांगतो-एका व्यक्तीला लग्नानंतर दहा वर्षांनी पुत्र झाला. पुत्रजन्माचा त्याने मोठ्या प्रमाणात आनंदोत्सव साजरा केला. आजूबाजूच्या वीस-पंचवीस गावांना भोजनासाठी आमंत्रण दिले गेले. गाणे-बजावणे झाले. अर्थात, त्याने भरपूर पैसा खर्च केला. त्यानंतर वर्षभरातच त्याच्या मुलाचा मृत्यू झाला. त्यामुळे ते कुटुंब डोके आपटून घेत रडत बसले आहे आणि आपल्या दुर्भाग्याला दोष देत आहे. म्हणूनच कबीरसाहेब आपणाला सांगतात, की-

कबीर, बेटा जाया खुशी हुई, बहुत बजाये थाल। आना जाना लग रहा, ज्यों कीडी का नाल।।
कबीर, पतझड़ आवत देख कर, बन रोवै मन माहिं। ऊंची डाली पात थे, अब पीले हो हो जाहिं।।
कबीर, पात झडतां यूं कहै, सुन भई तरुवर राय। अब के बिछुडे नहीं मिला, न जाने कहां गिरेंगे जाय।।
कबीर, तरूवर कहता पात से, सुनों पात एक बात। यहाँ की याहे रीति है, एक आवत एक जात।।

**१२. धार्मिकस्थळी जावळ काढणे निषिद्ध :-** लहान बालकांचे कोणत्याही धार्मिकस्थळी जाऊन जावळ काढू नये. जेव्हा जेव्हा केस वाढतील, तेव्हा ते कापा आणि फेकून द्या. एका मंदिरामध्ये एक प्रसंग पाहिला- श्रद्धाळू भक्त आपल्या मुलाचे किंवा मुलीचे जावळ काढण्यासाठी आले. तेथे हजर असलेल्या न्हाव्याने बाहेरच्यापेक्षा तिप्पट दराने केस कापले आणि त्या माता-पित्यांना दिले. त्यांनी श्रद्धेने ते मंदिरामध्ये अर्पण केले. पुजाऱ्याने ते केस एका पिशवीमध्ये टाकून ठेवले आणि रात्री दूर एकांतस्थानी फेकून दिले. ही केवळ नाटकबाजी आहे. मग जाऊळ काढण्यापेक्षा नेहमीप्रमाणे केस कापून स्वत: बाहेर का फेकून देऊ नयेत? परमात्मा

**नामजपाने प्रसन्न होतो, पाखंडीपणाने नाही.**

**१३. नामजपाने सुखप्राप्ती :– नामोपदेश केवळ दु:खनिवारणाच्या दृष्टिकोनातून घेऊ नये, तर ते आत्मकल्याणासाठी घ्यावे. त्यानंतर नामजपाच्या प्रभावाने एकेक करत सर्व सुख आपोआपच प्राप्त होते.**

कबीर,सुमिरण से सुख होत है, सुमिरण से दु:ख जाए। कहैं कबीर सुमिरण किए, सांई माहिं समाय।।

**१४. व्यभिचार निषिद्ध :– परस्त्रीकडे माता–कन्या–बहीण या दृष्टीने पाहावे. व्यभिचार महापाप आहे. जसे,**

''गरीब, पर द्वारा स्त्री का खोलै। सत्तर जन्म अन्धा हो डोलै।।''
सुरापान मद्य मांसाहारी। गवन करें भोगैं पर नारी।।
सत्तर जन्म कटत हैं शीशं। साक्षी साहिब है जगदीशं।।
पर नारी ना परसियों, मानो वचन हमार।भवन चर्तुदश तास सिर, त्रिलोकी का भार।।
पर नारी ना परसियो, सुनो शब्द सलतंत।धर्मराय के खंभ से, अर्धमुखी लटकंत।।

**१५. निंदा करणे व ऐकणे निषिद्ध :– चुकूनही आपल्या गुरूंची निंदा करू नये व ऐकू नये. ऐकू नये म्हणजे जर कोणी आपल्या गुरूंविषयी मिथ्या, अयोग्य गोष्टी सांगत असतील तर आपण त्यांच्याबरोबर भांडायचे नाही किंवा मारामारी करायची नाही, तर ते कसलाही विचार न करता बोलत आहेत, खोटे (अयोग्य) बोलत आहेत, असे समजायचे.**

'गुरु की निंदा सुनै जो काना। ताको निश्चय नरक निदाना।।
अपने मुख निंदा जो करहीं। शुकर श्वान गर्भ में परहीं।।'

**भले समोरची व्यक्ती कितीही सामान्य असू दे, तुम्ही निंदा तर कोणाचीच करायची नाही आणि ऐकायची देखील नाही. याबाबत कबीरसाहेब म्हणतात, की :–**

''तिनका कबहू न निन्दीये, जो पांव तले हो। कबहु उठ आखिन पड़े, पीर घनेरी हो।।''

**१६. सद्गुरू दर्शनाची महिमा :– वेळ मिळेल तेव्हा सत्संग ऐकायला जायचा प्रयत्न केला पाहिजे. गुरूंचे मार्गदर्शन व सत्संग या दोन गोष्टी भक्तांच्या दृष्टीने जणू पर्वणीच आहेत. सत्संगामध्ये नखरे (मान, प्रतिष्ठा, बढाई, दिखाऊगिरी) करण्यासाठी येऊ नये. स्वत:ला एक आजारी रोगी समजून यावे. आजारी व्यक्ती कितीही श्रीमंत असो, उच्च पदवीधर असो, जेव्हा रुग्णालयात जाते, तेव्हा त्या व्यक्तीचा उद्देश केवळ रोगमुक्त होणे हाच असतो. जेथे डॉक्टर बसायला सांगतील, तेथे ती व्यक्ती बसते, झोपायला सांगितल्यावर झोपते, उठायला सांगितले की उठते, बाहेर जायला सांगितले, तर बाहेर जाते. बाहेर गेल्यानंतर लगेच आत यायला सांगितले, तर ती व्यक्ती लगेच आत येते. आगदी याच भावाने तुम्ही जर सत्संगाला येत असाल, तरच त्याचा लाभ प्राप्त होईल, अन्यथा आपले तेथे जाणे पूर्ण निष्फळ ठरेल. सत्संगामध्ये जेथे बसण्यास मिळेल तेथे बसावे, खायला–प्यायला जे अन्नपाणी मिळेल, ते परमात्मा कबीर साहेबजींच्या कृपेचा प्रसाद समजून प्रसन्न चित्ताने सेवन करावे.**

कबीर, संत मिलन कूं चालिए, तज माया अभिमान। जो जो कदम आगे रखे, वो ही यज्ञ समान।।
कबीर, संत मिलन कूं जाईए, दिन में कई–कई बार। आसोज के मेह ज्यों, घना करे उपकार।।
कबीर, दर्शन साधु का, परमात्मा आवै याद। लेखे में वोहे घड़ी, बाकी के दिन बाद।।
कबीर, दर्शन साधु का, मुख पर बसै सुहाग। दर्श उन्हीं को होत हैं, जिनके पूर्ण भाग।।

**१७. गुरुमहिमा :– जर एकाद्या ठिकाणी पाठ किंवा सत्संग सुरू असेल अथवा तुम्ही गुरूंच्या दर्शनासाठी गेला असाल, तर सर्वप्रथम गुरुजींना साष्टांग दंडवत (आठ अंगांनी, पूर्ण**

**अधोमुखी झोपून) घालावा. त्यानंतर संत ग्रंथसाहेब व प्रतिमा जशा की कबीर साहेबांची प्रतिमा, गरीबदासजी महाराजांची, स्वामी रामदेवानंदजी व गुरुजी (रामपालजी) यांच्या प्रतिमांना (मूर्ती) दंडवत घालावा, ज्यामुळे आपल्या मनात त्या प्रकारचे भावनिर्माण होतील. मूर्तिपूजा करायची नाही. केवळ प्रणाम करणे हा प्रकार कोणत्याही पूजेत मोडत नाही, तर तो भक्तांच्या मनात श्रद्धा दृढ करण्यासाठी सहयोगी ठरतो. पूजा तर केवळ जे मुक्ती देणार आहेत, त्या गुरू व नाममंत्राची करायची आहे.**

कबीर,गुरु गोविन्द दोऊ खड़े,काके लागुं पाय। बलिहारी गुरु आपने, जिन गोविन्द दियो मिलाय।।
कबीर, गुरु बडें है गोविन्द से, मन में देख विचार। हरि सुमरे सो रह गए, गुरु भजे होय पार।।
कबीर, हरि के रुठतां, गुरु की शरण में जाय। कबीर गुरु जै रुठजां, हरि नहीं होत सहाय।।
कबीर, सात समुन्द्र की मसि करुं, लेखनि करुं बनिराय।
धरती का कागज करुं, तो गुरु गुन लिखा न जाय।।'

**१८. मांसभक्षण निषिद्ध :- अंडी व मांस भक्षण आणि जीव हिंसा करायची नाही. ते महापाप आहे. याबाबत कबीरसाहेबजी महाराज व गरीबदासजी महाराज यांनी सांगितले आहे:-**

कबीर, जीव हने हिंसा करे, प्रकट पाप सिर होय। निगम पुनि ऐसे पाप तें, भिस्त गया नहिं कोय।।१।।
कबीर, तिलभर मछली खायके, कोटि गऊ दे दान। काशी करौंत ले मरे, तो भी नरक निदान।।२।।
कबीर, बकरी पाती खात है, ताकी काढी खाल। जो बकरी को खात है, तिनका कौन हवाल।।३।।
कबीर, गला काटि कलमा भरे, कीया कहै हलाल। साहब लेखा मांगसी, तब होसी कौन हवाल।।४।।
कबीर, दिनको रोजा रहत हैं, रात हनत हैं गाय। यह खून वह वंदगी, कहुं क्यों खुशी खुदाय।।५।।
कबीर, कबिरा तेई पीर हैं, जो जानै पर पीर। जो पर पीर न जानि है, सो काफिर बेपीर।।६।।
कबीर, खूब खाना है खीचडी, मांही परी टुक लौन।। मांस पराया खायकै, गला कटावै कौन।।७।।
कबीर, मुसलमान मारैं करदसो, हिंदू मारैं तरवार। कहै कबीर दोनूं मिलि, जैहैं यमके द्वार।।८।।
कबीर, मांस अहारी मानव, प्रत्यक्ष राक्षस जानि। ताकी संगति मति करै, होइ भक्ति में हानि।।९।।
कबीर, मांस खाय ते ढेड सब, मद पीवैं सो नीच। कुलकी दुरमति पर हरै, राम कहै सो ऊँच।।१०।।
कबीर, मांस मछलिया खात है, सुरापान से हेत। ते नर नरकै जाहिंगे, माता पिता समेत।।११।।
गरीब, जीव हिंसा जो करते हैं, या आगे क्या पाप। कंटक जुनी जिहान में, सिंह भेड़िया और सांप।।
झोटे बकरे मुरगे ताई। लेखा सब ही लेत गुसाई।। मृग मोर मारे महमंता। अचरा चर है जीव अनंता।।
जिह्वा स्वाद हिते प्राना। नीमा नाश गया हम जाना।
तीतर लवा बुटेरी चिडिया। खूनी मारे बडे अगड़िया।।
अदले बदले लेखे लेखा। समझ देख सुन ज्ञान विवेका।।
गरीब, शब्द हमारा मानियो, और सुनते हो नर नारि।
जीव दया बिन कुफर है, चले जमाना हारि।।

**अजाणतेपणाने हिंसा घडली, तर त्याचे पाप लागत नाही. याबाबत बंदी छोड कबीरसाहेब म्हणतात, की :-**

''इच्छा कर मारै नहीं, बिन इच्छा मर जाए। कहैं कबीर तास का, पाप नहीं लगाए।।''

**१९. गुरुद्रोह्यांचा संपर्क निषिद्ध :- जर एखाद्या भक्ताने सद्गुरुजींशी द्रोह (गुरुजींशी विमुख होणे) केला, तर तो महापापाचा भागीदार बनतो. जर एखाद्याला तो मार्ग चांगला वाटला नाही, तर तो आपला गुरू बदलू शकतो, पण जर तो पूर्व गुरूंशी वैर धरत असेल किंवा निंदा करत असेल तर तो गुरुद्रोही म्हटला जातो. अशा व्यक्तीशी भक्तीची चर्चा करण्यात जो उपदेशी**

**असेल त्याला दोष लागतो. त्याची भक्ती समाप्त होते.**

गरीब, गुरु द्रोही की पैड़ पर,जे पग आवै बीर। चौरासी निश्चय पड़ै, सतगुरु कहैं कबीर।।
कबीर, जान बुझ साची तजै, करै झूठे से नेह। जाकी संगत हे प्रभु, स्वपन में भी ना देह।।

**अर्थात गुरुद्रोहीजवळ जाणारा भक्तिहीन होऊन नरकात जातो व ८४ लक्ष योनींच्या फेऱ्यामध्ये अडकतो.**

**२०. जुगार,मटका निषिद्ध :- जुगार, पत्ते, मटका हे कधीही खेळू नये. याबाबत कबीरसाहेबजी म्हणतात, की :-**

'कबीर, मांस भखै और मद पिये, धन वेश्या सों खाय। जूआ खेलि चोरी करै, अंत समूला जाय।।'

**२१. नाचगाणे निषिद्ध :- कोणत्याही आनंदाच्या प्रसंगी नाचणे व अश्लील गाणी गाणे आदी भक्तिभावाच्या विरुद्ध आहे. एकदा एक विधवा आनंदाच्या प्रसंगी आपल्या नातेवाइकांच्या घरी गेली होती. सर्व जण आनंदाने नाचत होते, गाणी म्हणत होते, परंतु ती भगिनी मात्र एका बाजूला बसून प्रभु चिंतनात व्यग्र झाली होती. तिचे नातेवाईक तिला विचारू लागले, की तुम्ही असे निराश होऊन का बसला आहात? तुम्हीसुद्धा आमच्याबरोबर नाचा, गाणी म्हणा व आनंद साजरा करा. ती भगिनी म्हणाली, की या विधवेला एकच पुत्र होता आणि आता तोही देवाघरी गेला. आता कसला आनंद उरलाय माझ्यासाठी? अगदी अशीच स्थिती या काळच्या मृत्युलोकामध्ये प्रत्येक व्यक्तीची आहे. गुरुनानक देवजी आपल्या वाणीमध्ये म्हणतात, कीः-**

ना जाने काल की कर डारै, किस विधि ढल पासा वे।
जिन्हादे सिर ते मौत खुड़गदी, उन्हानूं केडा हांसा वे।।
साध मिलें साडी शादी(खुशी) होंदी, बिछड दां दिल गिरि(दुःख) वे।
अखदे नानक सुनो जिहाना, मुश्किल हाल फकीरी वे।।

**तसेच कबीर साहेबजी महाराजसुद्धा म्हणतात, की :-**

कबीर, झूठे सुख को सुख कहै, मान रहा मन मोद। सकल चबीना काल का, कुछ मुख में कुछ गोद।।
कबीर, बेटा जाया खुशी हुई, बहुत बजाये थाल। आवण जाणा लग रहा, ज्यों कीड़ी का नाल।।

**विशेष :- स्त्री आणि पुरुष दोन्हीही परमात्म्याच्या प्राप्तीचे अधिकारी आहेत. स्त्रियांनीही मासिक धर्माच्या (Menses) दिवसांमध्येही आपली दैनंदिन पूजा, ज्योत लावणे इत्यादी बंद करू नये किंवा एखाद्याच्या देहांताच्या अथवा जन्माच्या वेळीही दैनिक पूजाकर्म बंद करू नये.**

**टीप : जे भक्तजन या एकवीस सूत्रीय आदेशांचे पालन करणार नाहीत, त्यांचे नाम समाप्त होऊन जाईल. जरी अजाणते पणाने एखादी चूक झाली असेल, तर तिला माफी मिळते; पण जर जाणूनबुजून चूक केलेली असेल, तर तो भक्त नामरहित होतो. यावर उपाय हाच आहे, की गुरुदेवजींकडे क्षमा मागून पुन्हा नामोपदेश घ्यावा लागेल. कृपया पुढे वाचा त्या भक्तांची आत्म कथा जी शास्त्राविरूद्ध साधना त्यागुन उपरोक्त नियमांचे पालन करून किती सुखी झाले आहेत आणि अगोदरच्या सर्व लोकवेद वाल्या पूजा करून देखील महादुःखी होते.**

**लेखक**
**संत रामपाल दास महाराज**
**सतलोक आश्रम, बरवाला**
**जिला-हिसार, हरियाणा (भारत)**

❑❑❑

## ''जिव वाचला तर लाखो मिळावले''

## ''लग्नाच्या चौदा वर्षांनंतर परमात्म्याने संतान दिले''

मी सुखबिरदास पुत्र श्री जगमाल सिंह, गाव भुरवस, जिल्हा झज्जर येथील स्थायी निवासी आहे. आता मी गाव-मौजूखेडा (तहसील-ऐलनाबाद जिल्हा-सिरसा) येथे राहतो. माझे लग्न सन १९९३ मध्ये झाले. लग्नानंतर मी झज्जरचुंगी रोहतक येथे क्लिनिक थाटले. त्यानंतर माझ्या पत्नीला सन १९९९ मध्ये A.N.M. च्या पदावर नौकरी लागली. त्यानंतर आम्ही ऐलनाबादला राहू लागलो. आम्हाला मूळबाळ नव्हते. काही काळानंतर मुळबाळासाठी एकडे-तिकडे जाऊ लागलो. महाज्योती कार्यालय D.L.F. कॉलनी रोहतक येथे दाखवले. तसेच रोहतक मध्ये कितीतरी जाणकार झाडफुक करणाऱ्यांना दाखवले. डॉक्टरांना देखील दाखवले. परंतु काहीही फायदा झाला नाही. नंतर एकाने आम्हाला रामतीर्थ सिताकुंडात स्नानासाठी पाठवले. तेथे आम्ही अमृतसर येथील गुरुद्वारा आणि दुर्गा मंदिरात देखील गेलो. हरिद्वार, अग्रोंहाधाम, सीतलामाता मंदिर, गुडगाँव देखील गेलो. तसेच प्रत्येक पोर्णिमेला सालासार (राजस्थान) व दो जाटी धामास देखील जात होतो. मी हनुमानाची पूजा तसेच बाबा हरिदासाची पूजा देखील करत होतो तसेच आजीवन मंगळवारचा उपवास करायचो. यामुळे देखील काहीच फायदा न झाल्यामुळे आम्ही सिरसा येथील तलवाड नर्सिंग होम मध्ये ट्यूब तपासणी केली, तिथे आम्हाला कळाले कि अंडाच तयार होत नाही. नंतर एपेक्स हॉस्पिटल मध्ये दाखवले. त्यांनी टेस्ट ट्यूब बेबी साठी पाठवले व सांगितले कि एका वेळेस एकदीड लाखाचा खर्च येईल. एका वेळेस देखील सफल होईल किंवा दोन वेळेस देखील करावे लागेल. आमच्या जवळ एव्हडे पैसे नव्हते.

नंतर आम्ही संत शरणास जाण्याचा विचार केला. मौजुखेडा येथे एका बिट्टू सेठची दुकान होती. ते मागच्या आठ वर्षापासून राधास्वामी व्यास चे सेवक होते. त्यांच्याशी सल्लामसलत केली व नामदान घेण्यास तयार झालो. परंतु पत्नीने तेथून नामदान घेण्यास विरोध केला. तिने सांगितले कि सच्चा सौदा सिरसा येथून नामदान घेऊयात, म्हणजे लवकर जाता येईल. कारण राधास्वामी चा डेरा तर खूपच लांब आहे. परंतु सच्चा सौदा येथून नाम घेण्याची माझी इच्छा नव्हती. आम्ही ३-४ दिवस आपसात चर्चा करत होतो, इतक्यात चार दिवसानंतर दैनिक भास्कर मध्ये संत रामपालजी महाराजानी लिहिले कि हे सच्चा सौदावाले शास्त्रविरोधी ज्ञान देवून भक्तांचे अनमोल जीवन वाया घालवतात. मी माझ्या पत्नीला सांगितले कि शास्त्रविरूद्ध साधना म्हणजे मनमाना आचरण आहे ज्यामुळे कसलाच फायदा होणार नाही आणि हे खरेच लिहिले आहे. नंतर मी सतलोक आश्रम येथे संपर्क साधून पुस्तक मागवले. पुस्तक लक्षपूर्वक वाचले व विचार केला कि आम्ही इतक्या जागी फिरलो पण काहिच फायदा झाला नाही. आम्हाला जर इथून लाभ झाला तर आम्ही सर्व देवीदेवतांना सोडू, कारण आमच्यासाठी तर तोच भगवान आहे जो आम्हाला लाभ देईल. नंतर मी २५-७-२००५ ला करौथा आश्रमात जावून नाम उपदेश घेतला. नाम घेण्याअगोदर मी पायरीया रोगाने ग्रस्त होतो. सर्व दात दाढा हालत होत्या. दुखत होत्या. मी जेव्हा नाम घेण्यासाठी गेलो तेव्हा मी सोबत औषधाची गोळी घेण्याचे विसरलो होतो. नाम घेतल्यानंतर मला कळलच नाही कि माझा दात-दाढाचे दुखणे कुठे गेले? अस वाटल कि दुखणं कधी नव्हतच. नंतर मी आश्रमात जेवण घेतले तरीही दात दुखत नव्हते. दातांना हात लावून बघितले तर ते हालत होते पण पहिल्या पेक्षा कमी. आताही हलतात पण तकलीफ नाही. त्यानंतर दर्शनासाठी गेलो तर सतगुरुदेव चरण फोमच्या रुई पेक्षा

देखिल नरम होते. मी तर असा बेफिकीर झालो कि ना कोणती चिंता ना कसला त्रास. मी खूप आनंदित झालो. आपोआप मनात येत राहिले कि यांच्यापेक्षा वर कोणतीही शक्ति नाही. घरी गेल्यानंतर, मी सर्व देवीदेवतांच्या मुर्त्या/फोटो जलप्रवाहीत करण्याच्या उदेशाने घेतल्या. हे बघून पत्नी नाराज झाली व म्हणाली कि मी मंगळवारची हनुमान जींची ज्योत कुठे लाऊ? बरेच समजाऊन सांगितल्या नंतर पत्नीने तिच्या मनात दोन संकल्प केले व म्हणाली कि ह्या दोन कामापैकी एक काम जरी सफल झाले तर मी तुमच्या गुरुजींना मानेल नाहीतर नाही. त्यानंतर पाचव्या दिवशी एक काम पूर्ण झाले. पण नंतर नाम घेण्यासाठी दोन महीने उलटले. नंतर ११ महिन्यांनंतर आमच्या शेजारची काकू आली. तिच्या समोर आमच्या कुलरला आग लागली. आम्ही विचार केला कि आता तर हिवाळा लागला उन्हाळ्यात ठीक करून घेऊ. मार्च महिन्यात दुकानदारास म्हणालो कि मला कूलरची मोटर पाहिजे. तो म्हणाला कि आता नाही सात दिवसांनंतर या. चौथ्या दिवशी झोपेत असताना काय पाहतो कि, गुरुजी हातात स्क्रू-ड्रायवर व इतर सामान घेवून कुलरची मोटर बसवू लागले. मी उठलो तेवढ्यात गुरुजी मोटर बसवून अंतरध्यान झाले. मी फोटोसमोर दण्डवत् प्रणाम केला व रडू लागलो कि हे गुरुजी असे असे काम देखिल करत आहात. हे परमात्मा! आम्ही आत्तापर्यंत कोठे झोपलो होतो. सकाळी मी पत्नीस ते सांगत असताना त्या काकू देखील औषध घेण्याच्या उद्देशाने आल्या. म्हणु लागल्या की भाऊ काय गोष्ट आहे? मी म्हटले कि काकू आपल्या समोर आमच्या कुलरला आग लागली होती. आता आमच्या कुलरला आमचे गुरुजी ठिक करुन गेले. काकू ने म्हटले कि भाऊ कूलर चालवून दाखव. मग मी कुलरची खिडकी खोलली संपुर्ण कुलर धुळ मातीने भरलेला होता. जेव्हा साफ करुन चालवला तर नव्यापेक्षा देखिल जोरात व थंड हवे बरोबर चालला आणि आत्ता देखिल चालू आहे. मग परम्यातम्याने **TATA AIG Insurance** च्या हप्त्यात सूट दिली. तीन-चार वेळेस आमच्या घरात रुपये आपोआप वाढले.

अगोदर चौदा वर्षांनंतर आम्हाला संतान नव्हती आणि आता बन्दी छोड सतगुरु रामपाल जी महाराजांकडून उपदेश घेतल्यानंतर साडेतीन वर्षातच परमात्म्याने तीन संतान दिल्या. पूर्ण परमात्मा जे पाहिजे ते करू शकतात. आता आम्हाला हे पक्के ज्ञान झाले आहे कि बंन्दी छोड सतगुरु रामपालजी महाराजांच्या रुपामध्ये पुर्ण परमात्मा कबीर साहेब आलेले आहेत.

भक्त सुखबीर दास मोबाइल: ९४६६५९००४४.

## ''परमात्माने जिवन दान दिले''

मी भक्त विषंभर दास गाव गीतौर, जिल्हा भिण्ड, मध्यप्रदेश चा रहिवासी आहे. मी सदगुरू रामपाल जी महाराज यांसकडून दोन वर्षापासून नाम उपदेश (अनुग्रह) घेतला आहे. माझी मुलगी साधना ही एक महिन्यापासून खूपच गंभीर स्वरुपात आजारी होती. तिच्या पोटात गैस (वायू) बनत होता. ज्यामुळे पोट वारंवार फुगत होते तसेच पाय व डोक्यात दुखत असत. कित्येक वेळा तर घसा देखील बंद होत होता. एकदा तर मुलीचा घसा इतका बंद झाला की आठ दिवसापर्यंत तर पाणी देखील पिता नाही आले. मी माझ्या मुलीचा उपचार डॉ महेश्वर यांसकडून केला कि जे ग्वालियर चे सर्वात मोठे डॉक्टर आहेत. पाच दिवसापर्यंत माझी मुलगी दवाखान्यात दाखल राहिली परंतु तिला एक टक्का देखील फरक पडला नाही. परत मी माझ्या मुलीला ग्वालियरचे दुसरे डॉक्टर P.C. Jain यांच्याकडे दाखल केले. तीन दिवस माझी मुलगी तेथे दाखल राहिली. तिला उलट्या-जुलाब, पोट दुखणे, डोके दुखणे खूप जोरात होऊ लागले. तीने तीन दिवसापर्यंत काहीच खाल्ले व पिले नाही. आमचा पूर्ण परिवार मुलीचा हा गंभीर

आजार पाहून रडू लागला. आम्ही रडत रडत आमचे परमेश्वर सदगुरू रामपाल जी महाराज यांची आठवण काढली. नंतर रात्री जवळपास १२ च्या सुमारास सदगुरू रामपाल जी महाराज यांनी माझ्या मुलीला दर्शन दिले व सांगितले की आज पासून तुझ्या शरीरात हा आजार नाही राहणार. एवढे म्हणताच मुलीने गुरुदेवांसमोर दंडवत प्रणाम केला व त्याच वेळी तीने संध्या आरती म्हणण्यास सुरुवात केली व पूर्ण आरती केली. हि लीला पाहून दवाखान्याचा संपूर्ण कर्मचारी वर्ग एकत्र झाला व परमेश्वराची हि लीला पाहू लागले व म्हणाले कि किती मोठी कृपा केली तुमच्या गुरुदेवांनी. दुसऱ्या दिवशी सकाळी ९.३० वाजता डॉक्टरांनी येऊन मुलीचा चेकअप केला व चेकअप झाल्यावर डॉक्टर आश्चर्यचकित झाले व म्हणाले कि मुलीला तर रात्रीच मरून जायला पाहिजे होते. परंतु आत्ता तर तिच्या शरीरात किंचित देखील आजार नाही आहे. हे सर्व पाहून संपूर्ण दवाखान्यात चर्चेचा एकच विषय बनला. आज माझी मुलगी १०० टक्के व्यवस्थित आहे. चांगल्या प्रकारे जेवण खात पीत आहे तिच्या शरीरात कोणताच रोग नाही.

हे सर्व सदगुरू रामपाल जी महाराज यांच्याच कृपेने झाले जे परमेश्वर कबीर साहेब यांचेच रूप आहे. जो पर्यंत ह्या पृथ्वीवर आमचे श्वास चालू राहतील तो पर्यंत आम्ही आमच्या सदगुरू रामपालजी महाराजजींच्या लीलांचे असेच गुणगान करत राहणार.

।। सत साहेब ।।

भक्त विशम्भर दास

गाँव-गीतौर, तहसील-मेहगाँव जिल्हा भिण्ड, (M.P.)

## ''उध्वस्त परिवार एकत्र झाला''

मी भक्त रमेश पित्याचे नांव श्री उमेद सिंह, गाव-पेटवाड़, तालुका हांसी, जिला हिसार येथे कारागृहास्मोरील एम्पलॉईज कॉलोनी, मध्ये कुटुंबासोबत राहतो.

दीक्षा घेण्यापूर्वी आम्ही भूतांची पूजा करत होतो. आमच्या गावात बाबा सरियाला मान्यता होती व तिथे आम्ही दर महिन्याच्या पौर्णिमेला जोती पेटवण्यासाठी जात असू. आम्ही शुक्रवार, जन्माष्टमी, शिवरात्रीचे व्रतसुद्धा करत होतो. पितरांना पिंड दान करून त्यांचे श्राद्धही करत होतो. तरीसुद्धा आमचे घर बिल्कुल ओसाड झाले होते. जेंव्हा मी बारा वर्षांचा होतो, तेव्हा माझ्या वडिलांचा मृत्यू झाला. घरात तीन जण होते, तिघेही आपसात भांडत असत. तिघानाही भूत-प्रेतबाधेने दुःखी केले होते आणि तिघेही अतिशय आजारी असत. आधी डॉंक्टरांना दाखवले पण काहीच आराम मिळाला नाही. मग आम्ही मांत्रिकाकडे गेलो, कोणी म्हणायचा तुम्ही ५००० रूपये द्या, तुम्हाला एकदम बरे करीन. कोणी म्हणायचा तुम्ही १०००० रूपये द्या, तुम्हाला एकदम बरे करीन.

आम्ही बिलकुल उघडे पडलो होतो. परन्तु काहीही समाधान नव्हते. माझे नातेवाईक भक्त रघुबीर सिंह गाव कौंथ कलां, यांनी वारंवार सांगितल्यावर माझ्या आईने सन् १९९६ मध्ये संत रामपालजी महाराजांची दीक्षा घेतली. माझ्या पत्नीला पाच वर्ष होऊन सुद्धा कोणतेही अपत्य झाले नव्हते. माझ्या आईने सांगितल्यावरून माझ्या पत्नीनेसुद्धा संत रामपालजी महाराजांकडून दीक्षा घेतली. दीक्षा घेतल्यावर एका वर्षात माझ्या पत्नीने मुलाला जन्म दिला. माझा देवावरच विश्वास उडाला होता. त्यामुळेच मी दीक्षा घेतली नव्हती आणि आपल्या आई व पत्नीला सुद्धा संतजीकडे जाण्याची परवानगी देत नसे. माझा पंधरा दिवसांचा मुलगा खूप आजारी पडला. डॉक्टरांनी सांगितले की हा मुलगा सकाळ पर्यंतच जगेल, त्याला घेऊन जा.

संध्याकाळी एका भक्ताने बन्दी छोड़ सतगुरु रामपालजी महाराजांच्या विषयी सांगितले की ते जिंद येथे आले आहेत आणि ते पूर्ण संत आहेत. आम्ही डॉक्टर आणि मांत्रिकांच्या कडे जाऊन कंटाळलो होतो. माझा देवावरील विश्वासच उडाला होता. तरीही त्या भक्ताला मी नाही म्हटले. परंतु त्याने पुन्हा विनंती केली की ते स्वतः बन्दी छोड़ परमेश्वर च पृथ्वीवर आलेले आहेत. जर त्यांनी दया केली तर हा मुलगा वाचू शकतो. त्या भक्ताने इतका विश्वास दिल्यावर मी आपल्या आईला परवानगी दिली. माझी आई मुलाला घेऊन सतगुरु रामपालजी महाराजांच्या चरणी ठेवले आणि रडतच विनंती केली की महाराज हा मुलगा मेलेलाच आहे. आता आपणच ह्याला ठीक करू शकता. तेव्हा संकटमोचक सतगुरु रामपालजी महाराजांनी सांगितले की परमेश्वर कबीरजींच्या कृपेने तो बरा होईल. दुसऱ्या दिवशी जो मुलगा मरायचा होता, तो बरा झाला.

आमचे उध्वस्त झालले घर संकटमोचक सतगुरु रामपालजी महाराजांच्या कृपेने परत एकत्र आला. इतका चमत्कार पाहूनसुद्धा पाप कर्मांमुळे मी त्यांची दीक्षा घेतली नाही आणि पूर्वीच्याच भुतांच्या पूजा करत राहिलो. आमच्या घरी संकटमोचक शास्त्रानुकूल भक्तिने भक्तांचे झालेले लाभ गरीबदासजी महाराजांच्या वचनांचा पाठ संत रामपालजी महाराज करत असत आणि मी बाहेर जाउन दारू पीत असे. नंतर एक वर्षाने एक दिवस आमच्या घरी पाठ सुरु होता तेव्हा संध्याकाळी संकटमोचक सतगुरु रामपालजी महाराजांनी सत्संग केला. तेव्हा मी सत्संग ऐकला आणि दीक्षा घेतली. नंतर आमच्या घरात दुःख नावाची चीजच उरली नाही. माझ्या आईने कोणाच्या तरी सांगण्यावरून नामजप थांबविला. काही दिवसांच्या नंतर सन् २000 मध्ये माझ्या आईच्या पायात अचानक आग व्हायला लागली. डॉक्टरांना दाखविले, तेव्हा त्यांनी सांगितले की रक्ताचा कर्करोग आहे. ही दहा–पंधरा दिव्संच्यावर जगणार नाही. जर पीजीआय मध्ये चण्डीगढ़ला घेऊन गेलात तर तिथे दीड लाख रूपये खर्च येईल, दुखणेही कमी होईल पण तरीसुद्धा त्या एक वर्षाच्या वर जगणार नाहीत. संकटमोचक सतगुरु रामपालजी महाराजांनी सांगितले की तुमच्या माताजींनी नामजप बंद केला आहे. जसे विजेचे बिल न भरलयास ते जोडणी बंद करतात आणि मग वीज पुरवठा बंद होतो. तो पुन्हा नीट व्यवस्थित सुरु करावा लागतो. माझ्या आईने आपली चूक मान्य केली, क्षमा याचना केली. महाराजांनी परत दीक्षा दिली आणि डोक्यावर हात ठेवला. डोक्यावर हात ठेवताच पायात आग होणे आणि दुखणे बंद झाले. मग जवळपास दोन वर्षांच्या नंतर पाय बधीर होऊन हाडातून रक्त बाहेर येऊ लागले. डॉक्टरांनी औषध दिले आणि टांके सुद्धा घातले, परन्तु रक्त यायचे काही बंद होत नव्हते. मग डॉक्टरांनी परत तिच्या आजाराची तपासणी केली आणि सांगितले की ह्यांना रक्ताचा कर्करोग आहे आणि आता तो सगळीकडे पसरला आहे. आता ह्या बऱ्या होणे अवघड आहे. ह्यांना घरी घेऊन जा. हे रक्त निघाल्याने दोन दिवसात मरण पावतील. मग दुसऱ्या दिवशी त्यांच्या लघवी आणि संडासच्या जागेतून सुद्धा रक्त यायल सुरवात झाली. तेव्हा मी सतगुरु रामपालजी महाराजांना फोनवरून सांगितले की डॉक्टरांनी सांगितले आहे की ह्या दोन दिवसांच्या सोबती आहेत. तेव्हा सतगुरु रामपालजी महाराजांनी म्हटले की संकटमोचक जे करतील ते योग्यच असेल. मग दुसऱ्या दिवशी रात्री दोन वाजता यमदूत त्यांना घेण्यासाठी आले. माझ्या आईने म्हटले की तुझे वडील (ते दहा वर्षांपूर्वीच वारले होते) मला घ्यायला आले आहेत. असे म्हणत तो यमदूत माझ्या आईच्या शरीरात शिरला आणि म्हणू लागल की मी आज हिला घेऊनच जाणार. हिची वेळ झालेली आहे. मला चहा द्या. तेव्हा आम्ही त्याच्यासाठी चहा ठेवलाच होता, तेवढ्यात तो यमदूत म्हणू लागला की माहित नाहीं

पण तुमच्या घरात कोणतीतरी मोठी शक्ती आहे, ती मला मारते आहे. मी इथे आणखी थांबू शकत नाही. मला लवकर चहा द्या. मी चाललो आणि गरम चहा पिऊन गेला. जातेवेळी म्हणू लागला की तुमच्या घरी पूर्ण परमात्मा आले आहेत. मी हिला नाही नेऊ शकत असे म्हणत निघून गेला. एक मिनटाने रक्त बिल्कुल बंद झाले, काळे झालेले जीभ आणि दात बिल्कुल साफ झाले आणि संकटमोचक सतगुरु रामपालजी महाराजांच्या कृपेने ती आधीसारखीच बरी झाली. परमात्मा कबीर साहेबजींनी माझ्या आईचे आयुष्य पाच वर्षांने वाढविले. सत्य भक्ति करुन सतलोक प्रस्थान केले.

भक्त रमेश दास

मोबाईल नं. ७४०४४३८००

## ''परमात्म्याने यमदूतापासून वाचवले''

माझे नाव भक्तमती पालो देवी आहे. मी डेरा सच्चा सौदा सिरसा वाले महाराज यांच्या कडून नाम घेतले होते तसेच माझा मुलगा संजू शिव जीचा उपासक होता व कावड आणत होता. परंतु या उपासना करून सूद्धा मी आजारी राहत होती तसेच माझ्या फुफुसामध्ये त्रास राहत होता. मी दवाखान्यातून सुद्धा औषध घेऊन खाल्ले. परंतु आराम झाला नाही. माझ्यावर कर्माचे असे संकट आले कि माझा मुलगा बिन्दर चा मृत्यु झाला तसेच दोन महिन्यांनंतर माझ्या पतीचा मृत्यु झाला. आता मी तसेच दुसरा मुलगा संजूच घरात राहिलो होतो.

माझा मुलगा संजूने भक्त कुक्कू च्या समजावण्यावर संत रामपाल जी महाराज यांच्या कडून नाम उपदेश घेतला. मला देखील समजावयला लागला कि आई! तु देखील संत रामपालजी महाराज यांचेकडून नाम उपदेश घ्या. ते पूर्ण परमात्म्याचे अवतार आलेले आहेत. परंतु मी वारं-वार नकार देत राहिले.

एके दिवशी माझ्या मुलाने खूप समजावून सांगितले परंतु मी म्हणाले कि सर्व संत एक सारखेच असतात. माझा मुलगा नाराज झाला कि मी आता तुला कधीही नाम उपदेश घेण्यासाठी सांगणार नाही. त्यानंतर मी माझ्या आजाराच्या गोळ्या घेतल्या तसेच झोपून गेले. झोपल्यानंतर माझ्याकडे चार राक्षस आले ज्यांची चेहरे खूप भयानक होते. त्यांचे मोठे-मोठे दात आणि नखे होती. ते माझ्या हाताला व पायाला धरून दोन्हीकडे ओढू लागले. मी ओरडू लागले माझा मुलगा व सून छतावर झोपलेले होते. मी भरपुर ओरडल्यानंतर सुद्धा ते माझ्या आवाजास ऐकू शकले नाहीत.

त्यानंतर सदगुरु रामपाल जी महाराजांच्या रुपात परमात्मा आले तसेच म्हणू लागले कि तुम्ही यांना का परेशान करत आहात? त्या राक्षसानी सांगितले कि आम्ही हिला घेण्यासाठी आलो आहोत. आम्हाला यमराजाने पाठवले आहे. गुरुजींनी सांगितले कि तुम्ही हिला घेवून जावू शकत नाही. ही पुण्य आत्मा आहे, हिला भक्ति करायची आहे. जेंव्हा त्यांनी मला सोडले नाही तेव्हा गुरुजी माझ्या डोक्याकडे आले आणि माझ्या डोक्यावर हात ठेवला तसेच म्हटले की मुली ''सत साहेब'' म्हण. नंतर माझ्या ''सत साहेब'' म्हणल्यानंतर ते चारही राक्षस मला सोडून गेले. मला जाग आली तेव्हा गुरुजी देखील अन्तर्ध्यान झाले.

मी माझा मुलगा संजूला सांगितले कि तु तर मला उठुन पाहिले देखिल नाही, आज मी नरकात पडली होती. त्या दिवशी माझा मुलगा म्हणाला कि आई मला सत्संगास जायचे आहे. तू देखिल बरोबर चल आणि नाम उपदेश घे. त्यानंतर मी सतगुरु रामपाल जी महाराजांकडून

नाम उपदेश घेतला व सत्संग ऐकला. त्यामध्ये गुरुजींनी विधवा आई व तिच्या चार मुलांची कथा ऐकवली ज्याने महालामध्ये चोरी करण्यास जायचे होते. मी मन लावून सत्संग ऐकला. माझ्या डोळ्यातून अश्रु व्हावू लागले. त्यानंतर मला कुठलाही आजार परमात्माच्या दयेने झाला नाही. फुफुसाचा त्रास देखील समाप्त झाला.

आता सतगुरूच्या कृपेने माझा परिवार सुखी आहे तसेच मुलगा, सुन व नातीच्या बरोबर सतगुरु जी महाराजांच्या दयेने पूर्ण सुखी आहे. एक वेळेस चुकीने माझे नाव खंडित झाले. त्यानंतर माझ्यावर संकट येणे चालू झाले. मला विस-पंचविस दिवसापासून ताप येत होता. डॉक्टरांनी टायफइड सांगितला. माझ्या मुलांना सत्संगास जायचे होते. परंतु मला डॉक्टरांनी दवाखान्यात दाखल होण्यास सांगितले. मी त्यांना म्हणाले कि आपण तीन दिवसाच्या गोळ्या दया. माझी मुले सत्संगास जाणार आहेत. मी आश्रमात फोन केला. त्यावेळी मला खूप ताप होता. आश्रमामध्ये भक्तांनी गुरुजींना प्रार्थना केली कि महाराज जी! पालो भक्तमती चा ताप उतरत नाही. गुरुजींनी सांगितले कि सव्वा किलो तुपाची ज्योती बोला, ठीक होवून जाईल.

माझ्या घरी त्यावेळी मी रजाई घेवून बसले होते. त्याच वेळी मी गुरुजींच्या समोर प्रणाम केला तसेच पाच मिनिटांच्या आतमध्ये माझा ताप बरा झाला. त्या दिवसांनंतर मला आजपर्यंत ताप आला नाही.

।। बोलो सतगुरु देव कि जय।।

-भक्तमती पालो देवी

## ''भूते आणि आजारांनी त्रासलेल्या कुटुंबाला सुखी केले''

मी भक्तमति अपलेश देवी पत्नी श्री रामेहर पुत्र श्री माँगेराम, गाव-मिरच, तहसील चरखी दादरी, जिल्हा भिवानी (हरियाणा) ची राहणार आहे. मी आपल्या दु:खी जीवनाची एक झलक आपणास सांगत आहे.

६ डिसेंबर १९९५ च्या रात्री गुंडांनी माझ्या पतीला ते कामावर असताना जीवापासुन मारले होते. परंतु या पूर्ण परमात्म्याने (कबीर साहिब) आमच्यावर ध्यान ठेवले आणि माझ्या पतिला जीवनदान दिले जे आज आम्हाला परिवार सहित सतगुरु रामपाल जी महाराजांच्या दयेने पूर्ण परमात्म्याच्या चरणी स्थान मिळाले आहे. माझ्या पतिला स्वच्छ कपड़े घातले कि थोड्या वेळाने त्यांच्या अंडरवियर च्या वरील भागात जिथे रबर किंवा नाड़ी असते, तिथे चारही बाजूंनी कपडे रक्ताने रंगून जात तसेच मुलांना देखिल बलगमच्या बरोबर रक्त येत होते आणि मी देखिल एक वर्षापासून ह्रदयविकाराच्या आजाराने त्रस्त भरपुर परेशान झाली होते. ज्याच्यासाठी अनेक वर्षे औषधे खात होते. माझे पतिदेव दिल्ली पोलिस मध्ये आहेत. माझ्या सर्व शरीरावर फोड़-पुटकुळ्या येत होत्या. घरच्या समस्यांमुळे माझे पति रामेहर यांचे मानसिक संतुलन देखिल बिघड़ले होते.

या समस्यांमुळे सन् १९९५ ते जुलाई २000 पर्यंत एक डझनपेक्षाही अधिक लंगड़या, लोभी व हावरट गुरुंचे दरवाजे वाजवले तसेच भारत वर्षातील सर्व तीर्थस्थाने जसे जमुना, गंगा, हरिद्वार, ज्वाला जी, चामुन्डा, चिन्तपूरनी, नगर कोट, बाला जी, मेहन्दीपुर व गुड़गाँवा वाली माई तसेच गौरखटीला (राजस्थान) वाले इत्यादी-इत्यादी प्रत्येक स्थानांवर मुलांसहित कित्येक वेळा चकरा लावत राहिलो. परंतु आम्हाला काहीही फरक पडला नाही. आमचे

परिवाराची परिस्थीती येथपर्यंत आली होती कि आम्ही होळी व दिवाळी देखिल कोणत्या तरी देखिल मस्जिद मध्ये बसुन करत करु लागले होते.

आम्ही खुप भाग्यवान आहोत जे आम्हाला संत रामपालजी महाराजांद्वारा परम पूज्य कबीर परमेश्वरजींच्या शरण मिळाले. आता कुठे गेले ते कालाचे दूत तसेच ते आमचे आजार ज्यांचा उपचार ऑल इण्डिया हॉस्पीटलमध्ये सुरु होता जो सतगुरुदेवांच्या चरण धूळी पुढे त्यांचा टिकाव लागला नाही.

२५ फरवरी २००१ रोजी एक कालाच्या पूजाऱ्याने फोन करून विचारले तुझे नाव अपलेश आहे. काय म्हणून विचारले. मी म्हटले की होय, आपण आधी आपले नाव सांगा. तेव्हा तो शहाणा म्हणाला की हा बलवान कोण आहे आणि आपला कोण लागतो? मी म्हटले की तुम्ही कोण आहात तसेच हे सगळे का विचारीत आहात? तेव्हा तो शहाणा म्हणतो की मुली! तु माझे नाव विचारू नकोस. मी सांगु ईच्छित नव्हतो तसेच मी हांसीहून बोलतो आहे. बलवान तसेच त्याच्यासोबत एक माणुस आला आणि दोघांनी मला ३७०० रूपये तुमच्यावर करणी करण्यासाठी दिले. मी तुमचा फोन नंबर सुद्धा बलवानकडून घेतला होता कि तुम्हाला विचारू शकेल त्यांची दुर्गति झाली का नाही? जे मी हे वाईट कार्य मी रात्रीमध्येच केले. परंतु जसे झोपायला लागलो तर मला पांढऱ्या कपड़यामध्ये ज्या गुरुंची तुम्ही पूजा करत आहात, ते दिसले ज्यांनी मला सांगितले की याचा परिणाम तु स्वत: भोगशील. हा परिवार सर्व शक्तिमान सर्व कष्ट हरण परम पूज्य कबीर परमेश्वर जींच्या शरण मध्ये आहे. आपली ती काय औकात आहे? इथला धर्मराज सुद्धा आता या परिवाराचे काहीही बिघडवू शकत नाहीं.

गरीब, जम जौरा जासै डरै, मिटें कर्म के लेख। अदली अदल कबीर हैं, कुल के सद्गुरु एक।।

परम पूज्य कबीर परमेश्वर जींना यम (काल तसेच कालाचे दूत) तसेच मृत्यु सुद्धा घाबरतो. ते पुर्ण प्रभु पाप कर्माच्या लेखाला देखिल समाप्त करतात. त्यानंतर त्या शहाण्याने म्हटले की मुली तुला एक सांगतो की तू ज्या देव पुरुषोत्तमाची पूजा करतेस, ते अतिशय प्रबल शक्ती आहेत. मी २५ वर्षापासून हे करणी करण्याचे काम करतो आहे. माहीत नाही किती परिवार उजाड़ केली आहेत. परन्तु आज प्रथमच अयशस्वी झालो. मुली या शक्तिला सोडू नकोस, नाही तर मार खाशील. आपल्या विनाशासाठी बलवान इत्यादि फिरतच आहेत. मी म्हटले की आम्ही पूर्ण परमात्म्याची पूजा करत आहेत. बलवान माझ्या पतिचा मोठा भाऊ आहे. आमच्या जिवाचा शत्रू झाला आहे.

आज आम्ही इतके भाग्यवान आहोत की आमच्या मनात कोणतीही वस्तु किंवा कार्याची आवश्यकता होते तर त्यास सतगुरुदेव सत कबीर साहिब पूर्ण करतात.

गुरु गोविन्द दोन्हो खड़े, हम किसके लागे पाय।

हम बलिहारी सतगुरुदेव रामपालजी के चरणों में, जिन्हें परमेश्वर दिया मिलाय।

हे बंधु आणि भगिनींनो! आम्ही संपुर्ण परिवार मिळून आपणास हा संदेश देत आहे कि जर आपणास सतलोकचा मार्ग, पूर्ण मोक्ष व सर्व सुख प्राप्त करायचे असल्यास आणि सांसारिक दु:खांपासून सुटका पाहिजे असल्यास बन्दी छोड संत रामपालजी महाराजां कडून सतनाम प्राप्त करा आणि आपले अनमोल मनुष्य जन्म सफल करा.

।। सत साहिब ।।

भक्तमति अपलेश देवी

## ''लुटले गेलेल्यांना सहारा''

मी भक्त बलवान सैनी श्री कृष्ण सैनी यांचा मुलगा न्यू मॉडेल टाउन, हिसार चा रहिवाशी आहे. आम्ही पाच भाऊ–बहिण आहोत. आमच्या पूर्ण परिवाराने १८ वर्षापासून सिरसा डेरा येथून उपदेश घेतला आहे. आमच्या घरात भूत–प्रेत ची सर्वात जास्त त्रास होता. माझ्या बहिणीस आम्हास दोरीने बांधून ठेवावे लागत होते. प्रेतबाधा असल्यामुळे ती छतावरून देखील उडी मारत असे. माझ्या वडिलांचे फुफुस देखील खराब झाले होते. त्यामुळे ते अंथरुणातच असत. माझ्या आईच्या गुढघे खूप दुखत असत.

माझे वडील मिठाई बनवण्याचे काम करत असत. भूत–प्रेत आणि वडिलांचा आजार यामुळे आमचे काम पूर्ण पणे बंद झाले होते. अगोदर आमचे हासी येथे तिन घरे व एक दुकान होते. घरात नोकर काम करत असत. परंतु आमच्या कर्मानुसार सर्व विकावे लागले. घरात जेवणाचे देखील हाल झाले.

आम्ही देवी–देवता यांस देखील मानत होतो. आम्ही २००३ पासून प्रत्येक महिन्यास मेंहदीपूर येथे जात होतो. आमचा पूर्ण परिवार मेंहदीपूर येथेच होळी–दिवाळी साजरी करत असत. आम्ही डॉक्टर कडे जाऊन देखील थकलो होतो. आम्ही माता चौकी, सेवडों इत्यादी जंतर–मंतर करण्याकडे देखील जात होतो. आम्ही नरड पीर (राजस्थान) ची मंढी येथे एक वर्ष राहून आलो होतो. आम्ही पाच वर्ष प्रत्येक महिन्यास सजाडा धाम, जोधपुर जेथे शंकर भगवानाची पूजा होते होती, तेथे प्रदर्शना करण्यास जात होतो. परंतु कोणताच लाभ आम्हाला मिळाला नाही. मी व माझी आई व्रत देखील करत होतो. मी बाला जी धाम, सालासर येथे अनवाणी पायांनी दोन–तिन वेळा गेलो होतो. माता गुडगावा वाली आमची कुळ देवी होती. मी तेथे हातावर ज्योती ठेवून पंधरा मिनिटे आरती देखील केली होती. हाथ बिलकुल भाजला होता. परंतु कोणत्याच साधने पासून आम्हास आराम भेटला नाही. शेवटी आम्ही हरलो असे ठरवले होते. आम्ही दु:खी होऊन घरीच राहू लागलो. सर्व पूजा सोडून दिल्या.

मग मला २४ फेब्रुवारी २०१२ साली सतगुरू रामपालजी महाराज यांचे ''ज्ञान गंगा'' हे पुस्तक मिळाले. मी ते वाचले व संपूर्ण परिवारा सहित नाम घेतले. कोणत्याही देवी–देवताच्या ठिकाणी जाऊन पूजा करावयाची नाही असा नियम मला सांगण्यात आला. मी घरी आलो. मला रात्रभर झोप नाही आली, मी बेचैन झालो कारण मी खाटू श्याम, राधे कृष्ण यांना खूप मानत होतो. मी त्यांना सोडू शकत नव्हतो. दुसऱ्या दिवशीच मी खाटू श्याम येथे गेलो. तेथे ५–६ दिवस राहिलो. तेथे मी पैसे देऊन VIP लाईन मध्ये दर्शन घेऊ लागलो. जेव्हा मी दर्शन घेऊ लागलो तेव्हा आवाज आला कि बलवान! तु तर तुझा भगवान बरवाला येथे सोडून आलास, येथे काहीच नाही. परत मी रडत घरी आलो. मी पुन्हा संत रामपालजी महाराज यांच्या आश्रमात जाऊन नाम शुद्ध करून घेतले.

माझ्या वडिलांचे फुफुस खराब झाले होते. त्यांना होली हॉस्पिटल, हिसार येथे दाखल केले. त्यांची परिस्थिती खूपच खराब झाली व डॉक्टरानी उत्तर दिले. यांना घरी घेऊन जावा. हे काही तासाचे पाहुणे आहेत. मग मी आश्रमात फोन केला. गुरुजींना प्राथना केली. गुरुजीने सांगितले कि आम्ही पूर्ण परमात्माची भक्ती करत आहोत. ह्या मुलाच्या केसास देखील काही होणार नाही. आपण देवावर विश्वास ठेवा. मी पुन्हा डॉक्टरास प्राथना केली कि यांना दोन–तिन दिवस आय.सी.यु. मध्ये दाखल करा. डॉक्टर म्हणाले याचा काहीच फायदा नाही. नंतर मी वारंवार बोलल्यामुळे डॉक्टर ने माझी सही घेऊन व फी घेऊन आय.सी.यु. मध्ये दाखल

केले. माझी बहिण घरीच होती. तिला स्वप्न पडले कि सतगुरू रामपाल जी महाराज वडिलांच्या बेड पाशी उभे आहेत. दुसऱ्या दिवशी माझ्या वडिलांना शुद्ध आली व परिस्थिती सुधारू लागली. डॉक्टर देखील आश्चर्यचकित झाले कि हे सर्व देवानेच केले. आम्हास अशी काहीच अपेक्षा नव्हती.

त्या दिवसापासून आमचा संपूर्ण परिवार सुखात राहत आहे. माझ्या बहिणीचा आजार पूर्णपणे बरा झाला व तिचे लग्न देखील झाले. माझ्या आईचा गुडघ्याचा आजार पूर्णपणे बरा झाला. मग आम्ही हिसार येथे राहू लागलो व कुल्फी ची गाडी लावू लागलो. परमात्माच्या आशिर्वादाने आमचे काम चांगले होऊ लागले. आम्ही हिसार मध्ये पुन्हा घर घेतले.

लग्नाच्या दोन वर्षानंतर माझ्या बहिणीस ऑपरेशन्सद्वारे मुल होणार होते. तिला आम्ही अग्रोहा मेडिकल मध्ये भरती केले. मुलाच्या डिलिवरी च्या वेळेस डॉक्टरांच्या चुकीने गर्भाशयाची कोणतीतरी नस कापली गेली. माझ्या बहिणीचा रक्तस्त्राव बंद होत नव्हता. माझ्या बहिणीस मंगलम लैब येथून ४५ बाटल्या रक्त देण्यात आले. परंतु तेथे कोणताच आराम भेटला नाही. तेथून आम्ही बहिणीस जिंदल हॉस्पिटल येथे घेऊन आलो. तेथे देखील बारा दिवसापर्यंत कोणताच आराम नाही भेटला. डॉक्टरांनी सांगितले कि हि जगेल कि नाही हे काहीच सांगू शकत नाही. मग मी गुरुजीस प्राथना केली. गुरुजी म्हणाले कि मुला मी मुलीस जीवनदान दिले आहे. ती बरी होईल. मग तिसऱ्या दिवशी माझ्या बहिणीस शुद्ध आली व तिची परिस्थिती सुधारू लागली. संपूर्ण हॉस्पिटलमध्ये चर्चा होऊ लागली कि हे काम फक्त भगवानच करू शकतो. माझी बहिण आज एकदम व्यवस्थित आहे. तिला परमात्माने एक मुलगी दिली आहे ती देखील एकदम व्यवस्थित आहे. परमात्माच्या आशिर्वादाने आज आमच्या घरात कोणत्याच वस्तूची कमी नाही.

कबीर, पीछे लाग्या जाऊ था, मै लोक वेद के साथ ।
रास्ते मे सतगुरु मिले, दीपक दिन्हा हाथ ।।

।। सत साहेब ।।

भक्त बलवान दास

मोबाईल नंबर - ९९९६५९३०२१

## ''शास्त्रविरुद्ध साधनेपासून सुटका''

मी भक्त हेमचंद दास सोलन (हिमाचल प्रदेश) चा रहिवाशी आहे. अगोदर मी माझ्या गावात महाकाली मंदिरात पुजारी होतो. २५ वर्षापासून तेथे पुजारीचे काम करत होतो. भजन-कीर्तन आणि जे भी पूजा कार्य मंदिरात होत होते, ते सर्व मी करत असत. पितर पूजा, श्राद्ध घालणे, शिवजींना पाणी घालणे इत्यादी क्रिया करत असत. तरीदेखील आम्ही दु:खी होतो. माझी पत्नीला पैरालाईसिस झाला होता. घरची आर्थिक परस्थिती देखील खराब होती.

सन २००५-२००६ मध्ये संत रामपाल जी महाराजांचे काही लेख वर्तमान पत्रात मध्ये येत असत. मला ते समजत नसे, परंतु अशाप्रकारचे सर्व धार्मिक लेख असलेले कागद मी संभाळून ठेवत असत. काही कालावधीनंतर हे सर्व कागद मिळाले, मी ते वाचण्यास बसलो व वाचता-वाचता माझ्या काळजाला ठेच लागली कि आजपर्यंत हे ज्ञान कुठे लपले होते? मग मी त्यात लिहिलेले आश्रम चे फोन नंबर पाहिले व पुस्तक मागविले. त्यात जेव्हा मी वाचले कि तर मी आश्चर्यचकित झालो माझ्या पायाखालची जमीन सरकली कारण मी मंदिरात पुजारी

असल्यामुळे मी असे नविन ज्ञान कधीच ऐकले नव्हते.

मी अगोदर समजत होतो कि ब्रह्मा, विष्णू व शिवजी यांच्या वरती कोणीच नाही. परमात्मा निराकार आहे. संत रामपाल जी महाराजांच्या पुस्तकातून ज्ञान झाले कि परमात्मा साकार आहे, कबीर जी पूर्ण परमात्मा आहेत. परमात्मांनी अशी प्रेरणा दिली कि संत रामपाल जी महाराज यांच्या जवळ तो अमर मंत्र आहे ज्यामुळे आमचे कल्याण होणार आहे. याच्यामुळेच आमचा जन्म-मृत्यूचा भयंकर रोग समाप्त होईल. त्यांच्या ज्ञानाने प्रभावित होऊन मी संत रामपालजी महाराजांकडून अनुग्रह घेतला. मी सर्व प्रकारची शास्त्रविरुद्ध पूजा बंद केली. पितर पूजा, श्राद्ध घालणे इत्यादी सर्व सोडून दिले.

गुरुजी कडून उपदेश घेतल्यानंतर मला सर्वात मोठा अध्यात्मिक लाभ झाला. जन्म-मृत्यू पासून मुक्त होण्याचा खरा मार्ग मिळाला. माझ्या पत्नीला पैरालाईसिस चा आजार होता. सर्व ठिकाणचे मोठे-मोठे डॉक्टर व नीम-हकीमांकडे चकरा घालून झाल्या होत्या, परंतु परमात्माच्या आशीर्वादाने माझी भक्तमति बरी झाली. परमात्माच्या दयेने आमची आर्थिक स्थिती देखील ठीक झाली.

मग मी नंतर हा ज्ञान प्रचार करने सुरु केले. मला वाटले हे ज्ञान तर जन-जन पर्यंत पोहचले पाहिजे. परंतु माझ्या बोलण्यावर कोणीच लक्ष दिले नाही. लोकांनी विरोध केला व म्हणू लागले तु हे कोणते वेगळेच ज्ञान घेऊन आला आहे. असे बोलणे नको करू. परंतु मला ह्या ज्ञानापासून परमात्माच्या दयेने कोणीच डगमग नाही करू शकले. असे सत्यज्ञान व सत्य भक्ती मार्ग पृथ्वीवर कोठेच नाही.

माझी सर्वांना प्राथना आहे कि आपण प्रभूंच्या चरणी यावे. संत रुपात आलेल्या परमेश्वराच्या संदेश वाहक संत रामपाल जी महाराज यांना ओळखावे. मोफत नाम उपदेश प्राप्त करुन आपले कल्याण करावे.

भक्त हेमचंद दास<br>
मोबाईल नं. ९८१६७८१४८९

## ''भगवान असावा तर असा''

मी भक्त प्रल्हाद दास गाव-रुपपूरा, जिल्हा-जयपुर (राजस्थान) चा राहणारा आहे. मी शारीरिक, मानसिक व पारिवारिक स्थिति पासुन भरपुर परेशान होतो. मी हिन्दू धर्मामध्ये मानल्या जाणाऱ्या सर्व परंपरा जसे हनुमान जींची पूजा, शनिवार, मंगळवार चे व्रत ठेवणे, सुंदर कांड चे वाचन करणे, नवरात्री मध्ये अखण्ड रामायण पाठ करणे. गिरजि जी ची प्रत्येक महिन्यात जाऊन परिक्रमा करणे इत्यादी पुजा कर होतो. परंतु आमच्या घरामध्ये काहीही आराम नव्हता. माझी इतकी भक्ति करता-करता देखिल सन् २००८ मध्ये होळीच्या दिवशी माझ्या गळ्यामध्ये अगोदर पासुन गाठ होती. ती जोरात दुखू लागली. मी डॉक्टरांना जाऊन दाखवले. डॉक्टर म्हणाले कि याचे ऑपरेशन करावे लागेल. माझ्याकडून पाणी देखिल गळ्याच्या खाली उतरत नव्हते. मी म्हटले कि ऑपरेशन आत्ताच करा. डॉक्टरने ऑपरेशन करुन गाठ काढली. त्यास तपासणी करण्यासाठी पाठवण्यात आले. जेव्हा तपासणी होऊन रिपोर्ट आला तर त्यामध्ये (Crocinma) कैंसर पॉजीटीव सापडला. मला किमो आणि रेडीयो थैरपी करण्याचा सल्ला दिला गेला. नंतर मी जयपुर च्या महावीर कैंसर अस्पताल मध्ये जाऊन उपचार केला. रेडियो थैरपी चे ३५ शॉक लावले व किमो थैरपी लागली ज्याचे साइडिफैक्ट इतके झाले कि माझ्या गळ्यात जखमा झाल्या. ज्या कारणामुळे मी काहीही खात-पीत

नव्हतो. जवळपास १ वर्षापर्यंत केवळ पातळ वस्तु जसे ताक, दुध इत्यादी च्या १–२ चमचे मुश्किलतेने घेत होतो. त्याची देखिल उलटी होत होती. डॉक्टरांनी आपला उपचार पुर्ण केला. नंतर मला थाना गाजी (अलवर) ताल वृक्ष च्या जवळ एक धाम सांगितले कि तेथे कैंसर ठीक होतो आहे. मी तेथे गेलो ज्यामुळे मला ५% आराम ४–५ दिवसासाठी भेटत होता. मी प्रत्येक महिन्याला तेथे जात होतो. माझ्या भक्तमती मध्ये प्रेत बाधामुळे चौसू सामौत माता जी च्य मंदिरामध्ये घेऊन जात होतो. जेथे गेल्यावर ४–५ दिवसासाठी भक्तमति साठी आराम भेटत होता. या काळामध्ये थाना गाजी भरथहरी च्या जत्रेमध्ये संत रामपाल जी महाराजांचे शिष्य पुस्तक सेवा करत होते. तेथुन मी १0 रुपयाची ज्ञान गंगा पुस्तक खरेदीकरुन घरी आणले. मी त्या पुस्तकास वाचले तर मला ते ज्ञान खुप चांगले वाटले. त्यामध्ये लिहलेल्या साधना चैनल वर गुरुजी चे संत्संग पाहिले आणि ज्ञान समजले. भक्तांचा इंटरव्यू ऐकला तर मला वाटले कि ही साधना ठीक आहे. परंतु पुस्तकामध्ये नाम उपदेश घेण्यासाठी नियम लिहुन ठेवले होते. लोकलाज च्या कारणामुळे उपदेश घेऊ शकलो नाही. नंतर २0१३ पर्यंत त्याच धामांवर जाता–जाता देखिल माझ्या तोंडातुन रक्त येण्यास शुरु झाले. जेव्हा तपासणी केली तर टी.बी. चा आजार मिळाला. टी.बी. चा देखिल ९ महिन्याचा कोर्स घेतला. मग स्याणे, सेवडों, झाड फूंक, देवी धाम वर स्वत: चक्कर लावले. जेथे देखिल जातो तर प्राण्यांमध्ये आणि घरामध्ये परेशानी वाढत होती. दुर्घटना होत होती. मी २0१४ मध्ये कैंसर च्या लास्ट स्टेज वर पोहचलो होतो. तेव्हा मी विचार केला की मरणार तर आहे. एकदा संत रामपाल जींकडुन देखिल जाऊन विचारुयात कि काय आम्ही ठीक होऊ? जेव्हा गुरुजींच्या आश्रमामध्ये गेलो तेथे जाऊन उपदेश घेतला. जेव्हा गुरुजी आशीर्वाद देण्यासाठी आले तर गुरुजींना म्हटले कि गुरुजी खुप दु:खी आहे. गुरुजीने म्हटले मुला! भक्ती करा, परमात्मा दया करतील. त्या दिवसानंतर ३–४ महिन्यांपर्यंत थोडी फार औषधे खाल्ली. जी प्रत्येक महिन्यात ४000 रुपयाची औषधे खाल्ली. त्याच्या अगोदर जे पूजा–धोक करत होतो, ते बिल्कुल बंद केले. ते पित्तर प्रेत जे माझ्या आतमध्ये येत होते, ते देखिल सर्व बंद झाली आणि आज गुरुजींच्या दयेने बिलकुल १00% ठीक आहे. माझ्या भक्तमति ने नाम उपदेश घेतला होता. त्या दिवसापासुन आजपर्यंत त्यांना देखिल प्रेत बाधा नाही. सन् २0१९ मध्ये माझ्या भक्तमति च्या पोटामध्ये दुखू लागले. जेव्हा डॉक्टरांना दाखविले तेव्हा सोनोग्राफीमध्ये आली की अपैंडेक्स झाला आहे. अपैंडेक्स चे ऑपरेशन केले तर त्यामध्ये देखिल मोठ्या आतड्यामध्ये कैंसर सापडला. डॉक्टरांनी सांगितले कि मोठे ऑपरेशन करावे लागेल. आतड्याचा काही भाग काढावा लागेल. त्यानंतर थैरेपी लागेल. परंतु जेव्हा ऑपरेशन झाल्यानंतर जेव्हा गुरुजींना प्रार्थना केली कि गुरुजी! आम्ही कैंसरचा उपचार थैरपी करु शकत नाही तेव्हा गुरुजीचा आदेश आला कि परमात्मा दया करतील. तेव्हा आश्चर्याची गोष्ट आहे कि जेव्हा आतड्यास डॉक्टरांनी तपासणीसाठी पाठवले तर तो रिपोर्ट बिलकुल नॉर्मल आला आणि लवकरच ठीक झाली. आज बिलकुल ठीक आहे. एकदा २0१४ मध्ये जेव्हा मी आश्रम मध्ये झोपलो होतो तेव्हा माझ्या घरी स्वप्नामध्ये मी पाहिले कि एक खुप मोठे प्रेत होते ज्यास आम्ही जाळले तरी जळाले नाही, दगड मारले तरी मेला नाही. जेव्हा गुरुजींची आठवण काढली तेव्हा गुरुजी आले आणि म्हटले कि बेटा हा आपल्या पुर्ण घराला परेशान करत होता. आपण मर्यादामध्ये राहुन भक्ती करा. हा आपणास काहीही करणार नाही आणि यास कबीर भगवानाव्यतीरीक्त ब्रह्मा, विष्णु, महेश पर्यंत देखिल थांबवू शकत नाहीत.

मी भक्त समाजास हात जोडून प्रार्थना करतो कि हा मनुष्य जन्म वारं–वार भेटत

नाही. संपुर्ण विश्वास संत रामपाल जी महाराजांची लिहलेली पुस्तके वाचली पाहिजे आणि जितक्या लवकर शक्य असेल, ज्ञान समजून नाम–उपदेश घेऊन आपले कल्याण केले पाहिजे.

भक्त प्रहलाद दास
गाव–रुपपूरा, तहसील–बस्सी
जिला–जयपुर (राजस्थान)
संपर्क सूत्र :– ९४१४३७३१३८

## ''भक्तमती सविताची आत्मकथा''

।। बन्दी छोड़ सतगुरु रामपाल जी महाराज जी की जय।।

माझे नाव भक्तमती सविता आहे. माझा जन्म पटियाला (पंजाब) येथे एका धार्मिक परिवारात झाला. सतगुरू रामपालजी महाराजाकडुन नाम उपदेश घेण्याअगोदर मी अनेक प्रकारच्या धार्मिक पूजा करत असे. समाजात चालू असलेल्या सर्व प्रकारच्या पूजा जसेकी सोमवारचे व्रत, सत्य नारायणाचे व्रत करणे, नवरात्रिचे व्रत करणे, कंजक पूजा करणे इत्यादि. मी संतोषी मातेचे ४५ व्रत देखील केले जे कि केवळ १६ व्रत करणे गरजेचे असते. एव्हडे व्रत केल्यामुळे मी इतकी कमजोर झाले होते कि शाळेतच बेहोश होऊन पडत असे. माझी टीचर मॅडम हरलीन, ही मला घरी सोडायला येत असे आणि सांगत असे कि या मुलीला जेवायला देवूनच शाळेत पाठवत चला. रोज–रोजच्या व्रत करण्याने ती एके दिवशी मरेल. परंतु शेरावाली मातेवर माझी विशेष श्रद्धा होती. मी व्रत करणे कांही सोडले नाही. परंतु ह्या साधंनेपासून मला कधी कांही फायदाही झाला नाही. माझी आई देखील धार्मिक विचाराची बाई होती. ती ब्रह्मा–विष्णु–शिव सहित सर्व देवी–देवतांच्या पूजा करायची. पटियाला (पंजाब) मध्ये आमच्या कुल देवी काली माताचे फार प्राचीन आणि प्रसिद्ध मंदिर आहे.

माझ्या आई–वडीलास संतानरूपात माझ्या मोठ्या भावानंतर आम्ही दोन जुळ्या मुली प्राप्त झाल्या. माझी आई नेहमी म्हणायची कि काली माता आपल्या लेकराच सर्व विपदेपासून रक्षण करते आहे तसेच शेरावाली माता ची भक्ति केल्याने जीवाला कोणताच धोका उद्भवत नाही. परंतु झाले बिलकुल याच्या विपरीत, सहा वर्षाच्या वयामध्ये माझ्या जुळ्या बहिणीचा आजारी पणा मुळे अकाल मृत्यू झाला.

माझ्या आईने शेरावाली माताची भक्ति करत असताना आपल्या मुलीच्या अकाल मृत्यु साठी मातास प्रश्नवाचक नजरेने बघितले परंतु ती असहाय होती कि उत्तर कोणास मागणार? पुजारीस कि ती दगडाच्या मूर्तिस? शेवटी असहाय होऊन काही वेळ वाट पाहिली कि मातेने दिलेला एक पुत्र व एक पुत्रि तर आहेच. परंतु नियतीला कांही वेगळेच मंजूर होते. आमची आई कांही कामानिमित्त छतावर काम करत होती. जेव्हा सिडीवरुन खाली येऊ लागली तर तिचा पाय घसरला आणि पडल्यामुळे डोके फुटले. ति पाच दिवस दवाखान्यात जिवण व मरणाशी झुंजत होती आणि आम्ही देवी माताच्या मंदिरामध्ये पल पल देवी माताकडे आणि सर्व देवतांकडे त्यांचा जीवनाची भीक मागत होतो. परंतु तेच झाले, ते आमच्या अंध आस्था व आशेच्या बिलकुल विपरीत झाले. पाच दिवसांनंतर माझ्या आईचे पार्थिव शरीर दवाखान्यातुन परत आले. संपुर्ण घरात हाहाकार माजला. एकदा तर मी मातेला खूप कोसले कि माझी आई तुझी इतकी साधना करत होती. तिच्या भक्ती मध्ये अशी कोणती कमी राहिली होती कि आपण तिला इतका भयानक मृत्यु देऊन आमच्या पासून हिरावून घेतले.

एका मुलीसाठी आपल्या मातेचा मृत्यु वज्रपाता पेक्षा कमी नव्हता. परंतु माझी अंधश्रद्धा त्याच्या नंतर देखिल देवी-देवतांमध्ये लागुन राहिली, व जास्त भक्ति करण्यास सुरुवात केली कारण माझ्याकडे दूसरा पर्याय नव्हता.

काही दिवसांनंतर माझा मोठा भाऊ खूप आजारी पडला. मी त्याच्या साठी देखील व्रत केले. जेंव्हा तो बरा झाला नाही तेंव्हा मी एक खूपच कठोर व्रत (प्रण) केले, आणि माझ्या घरापासून काली देवी माता मंदिरापर्यंत दण्डवत् प्रणाम करीत जाईल जे चार किलोमीटर होते. मी सकाळी चार वाजताच घरापासून दण्डवत् करत जाणे सुरु केले. परंतु काही अंतर जाताच माझे शरीर सोलून निघाले व रक्त निघू लागले. पण आपल्या व्रत व प्रण यावर पक्की असल्याने आपल्या जिवाची पर्वा न करता प्रण पूर्ण करण्याने माताची प्रसन्नता समजून प्रण पूर्ण करण्याचे मनोबल केले कारण शास्त्रविरुद्ध भक्तिचे डोक्यात भूत सवार झाले होते. माझे संपुर्ण शरीर सोलले गेले आणि जखमेतून रक्त येऊ लागले. कोपरे व गुडघ्यांनी तर काम करणेच सोडून दिले. मी मर-मरत आपले प्रण पूर्ण केले. त्यानंतर काही दिवस हॉस्पीटल मध्ये राहिली. उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी मला खूप रागावले. इतक्या कठिण तपस्याच्या फलस्वरुप माताने माझ्या भावाला बरे केले नाही.त्यांचा काही महिने दवाखान्यामध्ये उपचार चालू राहिला.

परंतु पुर्ण रुपाने सतगुरू रामपाल जी महाराजांच्या शरण मध्ये येवून नाम उपदेश घेतल्यानेच बरा झाला. माझ्या वडिलांनी साधना टी. व्ही. वर सतगुरू रामपालजी महाराजांचा कार्यक्रम पाहिला तसेच सतलोक आश्रम बरवाला मध्ये जावून नाम घेतले. त्यानंतर काही महिन्यांपर्यंत मला वारं-वार समजावले. त्यांनी ''ज्ञान गंगा'' पुस्तक मला आणुन दिले आणि तेव्हा मी ज्ञानास समजले तसेच पुर्ण संत सतगुरु रामपाल जी महाराज यांच्या शरण मध्ये येऊन नाम घेतले आणि या कठिण आणि दु:खदायी साधनापासुन पिछा सोडवला जे की शास्त्रामध्ये मना आहे. आता आमचा पूर्ण परिवार सतगुरु रामपाल जी महाराजांच्या दयेने सुखी आहे. कोणालाही कोणतेही कष्ट नाही.

आता मला पूर्ण परमात्म्याची शास्त्रानुकूल सत्यभक्ति प्राप्त झाली आहे. आता मी सर्व भक्त समाजास प्रार्थना करेल कि सतगुरू रामपालजी महाराजांच्या शरणास येवून सत्यभक्ति प्राप्त करून आपले कल्याण करावे.

यह संसार समजदा नाहीं, कहंदा शाम दोपहारे नूं।<br>
गरीबदास यह वक्त जात है, रोवोगे इस पहरे(समय) नूं।।

।। सत साहेब ।।

सतगुरु चरणांची दासी<br>
भक्तमती सविता

☞ आपण वरील काही भक्तांच्या आत्मकथा वाचल्या. असे-असे भक्त हजारो-लाखो आहेत जे आपल्या आत्मकथा पुस्तकामध्ये लिहू इच्छितात. परंतु इथे जागेच्या अभावाच्या कारणामुळे आम्ही काही भक्तांच्याच आत्मकथा लिहू शकलो. जर सर्व भक्तांच्या आत्मकथा आम्ही लिहीत बसलो तर बहुतेक शेकडो पुस्तके छापले जातील. त्यामुळे समजदार व्यक्तींना संकेत पुरेशा आहे.

❑❑❑